# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

इतिहास : ऐच्छिक पेपर ३ सत्र ३

# आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

**(History of Modern Maharashtra)**
**(1900 to 1960)**

इतिहास : ऐच्छिक पेपर ५ सत्र ४

# आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

**(History of Modern Maharashtra)**
**(1960-2000)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**बी. ए. भाग-२**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
बी. ए. (आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास) भाग-२ इतिहास पेपर ३ व ५ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-93-9

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. एन. काशिद** (सदस्य सचिव)
I/c संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भरतभूषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजनेचा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच २०१९-२०२० पासून अभ्यासक्रम बदललेला आहे. सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-२ इतिहास पेपर क्र. ३ व ५ (सत्र ३ व ४) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास या पेपरचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे विद्यार्थी वर्गाला विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास या पेपरची माहिती दिलेली आहे. या पेपरमध्ये सत्र तीन साठी चार व सत्र चार साठी चार घटकांचा समावेश केलेला आहे. यामध्ये सत्र तीन साठी राष्ट्रवादाचा उदय, राष्ट्रीय चळवळीतील महाराष्ट्राचे योगदान, सामाजिक चळवळी, संयुक्त महाराष्ट्र चळवळ तसेच सत्र चार साठी नेते, महाराष्ट्रातील प्रमुख मुद्दे आणि घटना, सामाजिक चळवळी, शैक्षणिक विकास इत्यादींचा समावेश या पेपरमध्ये केलेला आहे. यामध्ये आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास चा अभ्यास बारकाईने करणे अगत्याचे आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी व विविध स्पर्धा परीक्षांच्यासाठी महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

सदर पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभार मानत आहे.


**■ संपादक ■**

**प्रा. बी. एस. माळी**
क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा

**प्राचार्य डॉ. अंकुश ल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास**
**बी. ए. भाग–२**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक | सत्र–४ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. हृषीकेश दळवी**<br>राजाराम कॉलेज, कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. सुमित संभाजी यादव**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा | २ | – |
| **डॉ. चांगदेव बंडगर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ | – |
| **प्रा. रामचंद्र गुरलिंग घुले**<br>मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर | ४ | – |
| **प्रा. उर्मिला क्षीरसागर**<br>कन्या महाविद्यालय शिवाजी रोड, शिवाज नगर, मिरज | – | १ |
| **डॉ. धिरज शिंदे**<br>श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महा., इचलकरंजी | – | १ |
| **प्रा. सुमित यादव**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड, जि. सातारा | – | १ |
| **डॉ. अजितकुमार जाधव**<br>आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, ता. जि. सातारा | – | १ |
| **श्री. सुरेश चव्हाण**<br>आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालय, गडहिंग्लज | – | २ |
| **प्रा. गौतम गणपती काटकर**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा | – | ३ |
| **डॉ. विकास मोहन सरनाईक**<br>रामकृष्ण परमहंस कॉलेज, उस्मानाबाद | – | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. बी. एस. माळी**
क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा

**प्राचार्य डॉ. अंकुश ल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सेमिस्टर–३ : पेपर–३ | |
| १. | राष्ट्रवादाचा उदय | १ |
| २. | राष्ट्रीय चळवळीतील महाराष्ट्राचे योगदान | ३३ |
| ३. | सामाजिक चळवळी | ५७ |
| ४. | संयुक्त महाराष्ट्र चळवळ | ९९ |
| | सेमिस्टर–४ : पेपर–५ | |
| १. | नेते | १२३ |
| २. | महाराष्ट्रातील प्रमुख मुद्दे आणि घटना | १६४ |
| ३. | सामाजिक चळवळी | १९६ |
| ४. | महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास | २३० |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१९-२० पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# राष्ट्रवादाचा उदय

**अनुक्रमणिका :**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ राष्ट्रवादाच्या वाढीला प्रोत्साहनात्मक परिस्थिती

१.२.२ राष्ट्रवादाची भावना निर्माण होण्याची कारणे

१.२.३ राष्ट्रवादाच्या उदयाचे परिणाम

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये :

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात भारतीय राष्ट्रवादाचा उदय १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्पष्टपणे दिसून येतो. भारतीय राष्ट्रवादाचा उदय हा एक नव्या पर्वाची सुरुवात होती ज्यामध्ये राष्ट्रीयत्वाची ओळख, समानता, व्यक्तिस्वातंत्र्य, व एकात्मता अशा अनेक नवीन विचार व संकल्पना भारतातील जनसामान्यांच्या समोर मांडल्या गेल्या. राष्ट्रवादाने प्रेरित होऊन भारतीय समाजातील अनेक घटक राष्ट्राभिमान व स्वराज्य यांच्या साठी झटू लागले. महाराष्ट्रात भारतीय राष्ट्रवादाची बीजे लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले व अशा अनेक विचारवंत नेत्यांनी रोवली. भारतीय राष्ट्रवादाचा उदय याच कालखंडात का झाला व या उदयास कोणते घटक सहाय्यभूत ठरले यावर इतिहासकारांनी विभिन्न मते मांडली आहेत. प्रस्तुत प्रकरणात या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर अध्ययनार्थीना खालील माहिती मिळण्यास मदत होईल.

१. राष्ट्रवाद म्हणजे काय हे जाणून घेता येईल.

२. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची पार्श्वभूमी जाणून घेता येईल.

३. भारतीय राष्ट्रवादाचा उदयास प्रेरणा कश्या प्रकारे मिळाली हे समजेल.

४. भारतीय राष्ट्रवादाच्या वाढीला सहाय्यभूत घटकांचे अध्ययन करता येईल.

५. भारतीय राष्ट्रवादाच्या वाढीचे परिणाम जाणून देता येतील.

## १.१ प्रास्ताविक :

प्लासी व बक्सारच्या युद्धानंतर इंग्रजांनी भारतात आपले राजकीय स्थान निर्माण केले. त्यानंतर मराठे, मैसुर, निझाम, शीख अश्या प्रस्थापित शक्तींना नमवून इंग्रजांनी भारतावरील आपली राजकीय पक्कड घट्ट केली. १८५७ च्या उठावानंतर इंग्रजांनी आपल्या धोरणामध्ये काहीसा बदल केला व नवीन प्रदेश थेट आपल्या आधिपत्याखाली न घेण्याचे ठरवले. परंतु भारताचे अधिकाधिक प्रभावीपणे आर्थिक शोषण सुरूच ठेवले. दरम्यान भारतीय समाजामध्ये नवीन राजकीय परिस्थितीची समज वाढली व काही घटकांनी स्वतःचे हित जपण्यासाठी राजकीय संस्थांची निर्मिती केली. जमीनदारांच्या हितसंरक्षणासाठी जुलै १८३८ मधे जमीनदारी असोसिएशनची स्थापना करण्यात आली. तसेच १८५१ मधे ब्रिटीश इंडियन असोसिएशनची स्थापना झाली. भारतीयांच्या हक्कांची इंग्रजांना जाणीव करुन देण्यासाठी २६ ऑगस्ट १८५२ रोजी मुंबई येथे बॉम्बे असोसिएशनची स्थापना झाली. तसेच मद्रास इलाख्यात मद्रास नेटिव असोसिएशनची स्थापना करण्यात आली. कालांतराने भारतीयांच्या मनात संपूर्ण भारतीय समाजाचे प्रतिनिधित्व करणारी एक राजकीय संस्था असावी असे विचार येऊ लागले व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची बीजे रोवली गेली. सर्व भारतीय एक आहोत हि संकल्पना भारतीय राष्ट्रवादाच्या उदयामुळेच जनसामान्यांमध्ये प्रचलित झाली. या कालखंडात भारतीय राष्ट्रवादाच्या वाढीला कोणते घटक सहाय्यभूत ठरले व राष्ट्रवादाच्या वाढीमुळे भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीत कश्या प्रकारचे बदल घडून आले हे अभ्यासणे रोचक ठरेल.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ राष्ट्रवादाच्या वाढीला प्रोत्साहनात्मक परिस्थिती :

इंग्रजांनी भारतावर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले व याचा बहुआयामी परिणाम भारतीय समाजावर झाला. इंग्रजांनी भारतामध्ये अनेक संस्थात्मक बदल घडवून आणले. तसेच भौतिकदृष्ट्या अमुलाग्र बदल घडून आले. या बदलांना भारतीयांनी एका नव्या जाणीवेतून प्रतिक्रिया दिली व या प्रतिक्रियांचा परिणाम भारतीय राष्ट्रवादाच्या वाढीच्या स्वरुपात दिसून आला. २० व्या शतकाच्या सुरवातीला इंग्रजांना भारतीय राष्ट्रवादाचे अस्तित्व स्वीकारावे लागले. या कालखंडात इंग्रजांनी भारतीय राष्ट्रवादाच्या प्रसाराचे श्रेय स्वतःच घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले भारतीय हे बौद्धिक भूमिकेतून आमचीच निर्मिती आहेत कारण आम्ही जे विचार भारतीयांच्या समोर ठेवले त्यांनाच स्वीकारून हे लोक राष्ट्रवादाकडे वळाले. काही ब्रिटीश अधिकारी वारंवार म्हणत असत कि 'भारतीय राष्ट्रवाद इंग्रज सत्तेचे अपत्य आहे'. परंतु भारतीय

राष्ट्रवादाच्या उदयाला फक्त इंग्रजांचे भारतावरील राज्य कारणीभूत होते असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

वास्तविकता ही आहे की फ्रेंच राज्य क्रांतीपासून राष्ट्रवादाची व आत्मनिर्णयाची जी भावना संपूर्ण जगात निर्माण झाली त्याचा अंश म्हणजे भारतीय राष्ट्रवाद होय. काही प्रमाणात भारतीय प्रबोधनाचा परिणाम, काही अंशाने इंग्रजांनी भारतात सुरू केलेल्या आधुनिकीकरणाचा परिणाम, काही अंशाने इंग्रजांच्या भारतातील वसाहत धोरणाचे परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रवादाचा उदय होय.

**१.२.२ राष्ट्रवादाची भावना निर्माण होण्याची कारणे :**

भारतीय राष्ट्रवादाच्या उदयास व वाढीस सहाय्यभूत ठरलेले घटक पुढील प्रमाणे आहेत:

**(१) ब्रिटीश सत्तेचा प्रभाव :**

ब्रिटीश साम्राज्यवादी शासकांनी भारतावर आपली पकड अधिक मजबूत करण्यासाठी आणि भारताचे आर्थिक शोषण करण्यासाठी राजकीय, आर्थिक, लष्करी, बौद्धिक अशा सर्वच क्षेत्रात आधुनिक पद्धतींचा वापर केला. आधुनिकीकरणाचा पायाच समानता, स्वातंत्र्य व राष्ट्रवाद या संकल्पनांवर आधारित असल्याने ब्रिटीश सत्तेने अवलंबलेल्या आधुनिकीकरणामुळे काही प्रमाणात का होईना, भारतीय राष्ट्रवादाला चालना मिळाली.

**(२) भारताचे राजकीय ऐक्य :**

भारतामध्ये काही प्रदेश इंग्रजांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली होते तर काही प्रदेश अप्रत्यक्षपणे संस्थानिकांच्या मध्यस्थीने नियंत्रणाखाली होते. नियंत्रणाचे स्वरूप कोणतेही असले तरी इंग्रजी सत्तेने संपूर्ण भारतावर राजकीय ऐक्य लादले होते. एकच सत्ता, समान समस्या, समान कायदेप्रणाली हयामुळे भारत एक सूत्रात बांधला गेला. प्रादेशिकतेचे प्रभाव सक्षम असूनही अखिल भारतीय भावना प्रकर्षाने समोर आली.

**(३) भारतात शांततेची व प्रशासकीय ऐक्याची निर्मिती :**

भारतातील १८ व्या शतकातील राजकीय अस्थिरता कमी करून इंग्रजांनी शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. भारतात इतकी दिर्घकालीन शांतता प्रथमच प्रस्थापित झाली असा इंग्रजांचा दावा होता. इंग्रजांच्या प्रशासनाचे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे ते वैयक्तिक प्रभावापासून मुक्त होते. जुन्या साम्राज्यांमध्ये प्रशासक बदलला की प्रशासनावर परिणाम होत होता. पण इंग्रजी साम्राज्यात असा प्रकार होत नसे. या प्रशासकीय दृढतेचा व ऐक्याचा भारतात राजकीय स्थिरता आणण्यात मोठा वाटा होता. भारताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यत एकच न्यायप्रणाली अवलंबली जाऊ लागली. फौजदारी व दिवाणी कायद्यांचा अंमल होता. त्यामुळे भारतात परंपरेने चालत आलेल्या सांस्कृतिक ऐक्याला नव्या स्वरुपाच्या राजकीय ऐक्याची जोड मिळाली.

**(४) जलद दळणवळण व संचार साधनांचा विकास :**

जलद गतीच्या दळणवळणाच्या साधनांची निर्मिती करण्यामागे प्रशासकीय सोय, लष्करी आवागमन, आर्थिक व व्यापारी शोषण इ. उद्दिष्टे होती. पक्के रस्ते बांधण्यात येऊन एक प्रांत दुसऱ्या प्रांताला व ग्रामीण भाग मोठमोठ्या शहरांना जोडण्यात आले. संपूर्ण देशाला जोडणारे महत्वाचे साधन म्हणजे रेल्वेमार्ग होता.

रेल्वेमुळे मिळालेल्या अनेक फायद्यांबरोबर महत्वाचा फायदा म्हणजे त्यामुळे राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण झाली. एका प्रांतातले लोक सहज दुसऱ्या प्रांताचा प्रवास करू लागले व विभिन्न प्रांतातील लोकांमधील संपर्क वाढल्यामुळे एकी निर्माण झाली.

१८५० नंतर सुरु झालेल्या डाकव्यवस्थेने तसेच तार यंत्रणेमुळे संपूर्ण देशात जलद संचार व्यवस्था पसरली. देशांतर्गत पत्र पाठविण्यासाठी सर्वत्र २ पैशाचे एकच तिकीट आणि वृत्तपत्रे व पार्सले पाठविण्यासाठी यापेक्षाही कमी दर यामुळे देशाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व बौद्धिक जीवनात बदल घडून आला. रेल्वे, मोटर यांच्यासारख्या दळणवळणाच्या साधनांनी तसेच डाक व तारायंत्रासारख्या शीघ्र संपर्क साधनांनी उपलब्ध सोयीसवलती दिल्या व त्यामुळे राष्ट्रीय स्थरावर राजकीय कार्य करणे शक्य झाले.

**(५) आधुनिक शिक्षणाचा प्रभाव :**

आधुनिक शिक्षणपद्धतीमुळे आधुनिक पाश्चात्य विचारांची भारतीयांना ओळख झाली व राजकीय विचार पद्धतीला एक नवीन दिशा मिळाली. आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे भारतीयांना तर्कसंगत विचारप्रणाली व शास्त्रीय दृष्टीकोन यांचे प्रशिक्षण मिळाले. तसेच भारतीयांना पाश्चात्य तत्त्वज्ञानाणे पुरस्कृत केलेल्या संकल्पना जशाकी समानता, नागरी हक्क व कायद्याचे राज्य यांची ओळख झाली. यामुळे भारतीयांना आपण माणूस म्हणून आपले कोणते हक्क आहेत याची जाणीव झाली. हे घडणारे बदल इंग्रजांना जाणवत होते व त्यांना उमजले होते कि आपण देत असलेल्या आधुनिक शिक्षणामुळे भारतीय जनता जागरूक होईल व एके दिवस ते आपल्या त्यांच्यावरील राज्याला विरुद्ध करून उठतील. परंतु इंग्रज अधिकार्यांना असा विश्वास होता कि आधुनिक शिक्षणपद्धतिच्या प्रभावामुळे जेंव्हा इंग्रजांवर भारत सोडून जाण्याची वेळ येईल तेंव्हा हि प्रक्रिया अतिशय समजूतदारपणे पार पडेल व ब्रिटीशांचे भारतीयांशी असलेले संबंध शांतीपूर्ण व ब्रिटनला लाभदायी राहतील. भारताशी सांस्कृतिक व व्यापारी संबंध ठीकून राहतील. मेकॉलेने १८३३ मधे कॉमन्स सभागृहासमोर बोलताना असे म्हणले कि आम्ही आपण उत्तम प्रशासनाद्वारे आपल्या भारतीय प्रजेचे उद्बोधन केले पाहिजे जेणे करून भारतीय लोक युरोपीय भाषेत शिक्षित होऊन भविष्यकाळात युरोपियन संस्थांची मागणी करतील.

प्रशासकिय निकडीतून पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार सुरु झाला असला तरी त्याचा प्रभाव असा झाला कि नवशिक्षितांसाठी पाश्चात्य उदारमतवादी विचारांचे दरवाजे खुले झाले. मिल्टन, बेंथम, मिल, स्पेन्सर, रुसो, वॉल्टेयर यांच्या विचारांनी भारतातील बुधीजीविंमध्ये स्वातंत्र्याची, राष्ट्रवादाची, स्वशासनाची ज्योत प्रज्वलित झाली. हया नवजागृतांना इंग्रजी साम्राज्यातील विरोधाभास जाणवू लागला. हा नवा बुद्धिजिवी वर्ग प्रामुख्याने खालच्या पदावरील प्रशासक, वकील, डॉक्टर, अध्यापक असा होता. यातील काहींनी इंग्लंडमधे शिक्षण घेतले होते. तेथे त्यांनी स्वतः राजकीय संस्थांचे कार्य पाहिले होते. भारतात परतल्यावर मात्र त्यांना असे आढळून आले की इंग्लंडच्या नागरिकांच्या विपरीत भारतीयांना कोणतेही मुलभूत अधिकार नाहीत व आपला देश फक्त गुलामगिरीच सहन करत आहे. भारतीयांना हे लक्षात आले की, १८३३ च्या चार्टर कायद्याद्वारे व १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याद्वारे आश्वासने दिलेली असली तरी उच्च पदांचे दरवाजे भारतियांसाठी बंद आहेत. परिणामी असंतोष वाढू लागला व त्याचे लोण सर्वत्र पसरू लागले. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, मनमोहन घोष, लालमोहन घोष,

अरविंद घोष यांना उच्च पदाचे दरवाजे बंद करण्यात आल्याने ते राष्ट्रीय चळवळीकडे वळले. हे प्रतिभाशाली व विद्वान लोक उदयास येत असलेल्या राजकीय असंतोषाचे केंद्रस्थान बनले आणि त्यांनी भारतीय राजकीय संस्थांचे नेतृत्व केले. इंग्रजी शिक्षणाचा आणखी एक फायदा दिसून आला. भारताच्या सर्वच भागात इंग्रजीचा प्रसार झाल्याने व त्याची लोकप्रियता वाढू लागल्याने सुशिक्षित भारतियांना संपर्क माध्यम प्राप्त झाले आणि इंग्रजीच्या माध्यमातून एकमेकांचे विचार जाणून घेणे व संमेलनात सहभागी होणे शक्य झाले. इंग्रजी सर्वाकरिता सामान्य भाषा सिद्ध झाली त्यामुळे चळवळीला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

**(६) आधुनिक वृत्तपत्रांचा उदय :**

भारतात इंग्रजांच्या प्रभावाखाली वृत्तपत्रांची सुरुवात झाली. कालांतराने भारतीय भाषांमध्ये वृत्तपत्रांचा विकास झाला. या वृत्तपत्रांना अनेक शासकीय बंधनांना सामोरे जावे लागले तरीही १९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय मालकांनी चालविलेल्या इंग्रजी व भारतीय वृत्तपत्राची संख्या चांगलीच वाढली. भारतीय वृत्तपत्रांनी राष्ट्रवादाच्या प्रसारात महत्वाची कामगिरी बजाविली.

इंडियन मिरर, बंगाली, अमृत बझार पत्रिका, बॉम्बे क्रॉनिकल, हिंदू पट्रिएट, मराठा, केसरी यासारख्या अनेक इंग्रजी व भारतीय वृत्तपत्रांनी ब्रिटीश साम्राज्याचे खरे स्वरूप उघड करण्यात मोलाची कामगिरी केली. या वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य, स्वराज्य, नागरिक हक्क यासारख्या मुद्यांवर जनजागृती केली.

**(७) मध्यवर्गीय बुद्धिजीवी वर्गाचा उदय :**

इंग्रजांच्या भारतातील शैक्षणिक व आर्थिक धोरणांमुळे भारतीय समाजात परिवर्तन होऊन मध्यमवर्गीय सामाजिक घटक निर्माण झाला. या मध्यमवर्गीय समाजातील व्यक्तींनी इंग्रजी भाषा शिकून घेतली जेणे करून ब्रिटीश राजवटीत नोकरी मिळवणे सहज शक्य होई. नवीन संधी मिळाल्याने या सामाजिक घटकाची झपाट्याने प्रगती झाली. संखेने जरी कमी असला तरी हा वर्ग अतिशय प्रभावशाली होता. कालांतराने या वर्गात समान उद्दिष्टांची व आकांक्षांची निर्मिती झाली वा ते संघटीत होऊ लागले. हा मध्यम वर्ग आधुनिक भारताचा आत्मा बनला व नंतरच्या काळात या वर्गाने संपूर्ण भारतात आपल्या शक्तीचा प्रत्यय आणून दिला.

**(८) ऐतिहासिक संशोधनाचा प्रभाव :**

विलियम जोन्स, मैक्समूलर, व इतर परकीय विद्वानांनी प्राचीन भारताच्या संस्कृती व राज्यव्यवस्थेचा अभ्यास करून अनेक संशोधने केली. त्यामुळे भारताची समृद्ध संस्कृती जगाच्या समोर आली. या क्षेत्रात झालेल्या कार्यामुळे व विशेषतः कनिंगहॅम सारख्या पुरातत्ववेत्यांनी केलेल्या उत्खननामुळे भारताच्या महानतेचे व गौरवशाली परंपरेचे असे नवे रूप दिसून आले जे प्राचीन रोमन व ग्रीक संस्कृतीपेक्षा कमी नव्हते. ह्या युरोपियन विद्वानांनी वेदांचे व उपनिषदांचे साहित्यिक श्रेष्ठत्व मान्य करण्याबरोबरच त्यातील मानवी मनाच्या सुंदर विश्लेषणाची भरपूर स्तूतीही केली. अनेक युरोपीय विद्वानांनी असा सिद्धांत मांडला की, भारतातील आर्य लोकांचा व युरोपियनांचा मूळ मानववंश एकच आहे. या सिद्धांतामुळे सुशिक्षित भारतियांच्या मनात मानसिक आत्मगौरवाची भावना निर्माण झाली. एक नवा आत्मविश्वास उत्पन्न होऊन त्याने राष्ट्रवादाला व राष्ट्रभक्तीला उत्तेजन दिले.

**(९) समकालीन युरोपीय चळवळीचा प्रभाव :**

१९ व्या शतकात दक्षिण अमेरिकेतील स्पेन वा पोर्तुगाल साम्राज्यांच्या अवशेषांवर अनेक राष्ट्र-राज्ये अस्तित्वात आली होती. युरोपमधील इटलीच्या व जर्मनीच्या एकीकरणाच्या प्रयत्नाची छाप भारतीय नेत्यांवर पडली होती. आयरलंडच्या स्वातंत्र्य चळवळीनेही भारतियांची मने प्रभावित केली. सुरेंद्रनाथ बॅनर्जी व लाला लजपतराय यांनी यंग इटली चळवळ व इटालियन राष्ट्रवादावर भाषणे केली व लेख लिहिले. एकंदरीतच युरोपियन राष्ट्रवादाची भारतीयांना चांगलीच ओळख झाली होती व त्याचा प्रभाव भारतीय मनावर होणे स्वाभाविक होते.

**(१०) सामाजिक व धार्मिक चळवळीचे प्रगतीशील रुप :**

१९ व्या शतकातील सुशिक्षित भारतीयांनी पाश्चात्य तत्वज्ञान व विज्ञानाच्या प्रकाशात आपल्या धार्मिक श्रद्धा, चालिरिती, सामाजिक प्रथाना पुन्हः तपासून पहाण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम म्हणजे ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, थिऑसॉफिकल सोसायटी, रामकृष्ण मिशन इत्यादिंची स्थापना होऊन त्यांनी हिंदू धर्मात काही सुधारणा केल्या. मुसलमान, शिख, पारशी जमातीमधेही अशा सुधारणावादी संस्था अस्तित्वात आल्या. धार्मिक क्षेत्रातील ह्या सुधारणावादी चळवळींनी मूर्तीपूजा, अंधश्रद्धा, परंपरागत पुरोहित प्रथा व इतर कर्मकांडे यांना आव्हान दिले. सामाजिक क्षेत्रात असे आव्हान जातीप्रथा, अस्पृश्यता व इतर अनिष्ट प्रथांना देण्यात आले, ह्या सर्वच चळवळी प्रगतीपथावर होत्या आणि त्यांचा उद्देश लोकशाही, सामाजिक व वैयक्तिक समता, तर्क, बुद्धिवाद, उदारता इ. आधारांवर समाजाची निर्मिती हा होता. धार्मिक सुधारणा चळवळीचा हेतू राजकीय स्वरुपाचा नव्हता पण त्यांच्या संपर्कात येणारे लवकरच आत्मसन्मानाच्या व देशभक्तीच्या भावनेने प्रभावित होत होते. बहुतांश सुधारक संस्थांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरांमधून प्रेरणा मिळत असल्याने अखिल भारतीय भावनेची व राष्ट्रवादाची जोपासना होत होती.

**(११) वंशवाद व भारतीयांना देण्यात येणारी हीन वागणूक :**

१८५७ च्या उठावानंतर ब्रिटीश शासक आणि भारतीय जनता यांचात वर्णभेदाची कटू भावना निर्माण झाली. इंग्लंडच्या प्रसिद्ध वर्तमानपत्रानी भारतीयांना पाशवी वृत्तीची जमात असे हिणवले. भारतातील ब्रिटीश नोकरशाहीने भारतियांप्रती घृणास्पद व्यवहार सुरू केला होता. भारतियांना कनिष्ठ वर्णाचे मानून विश्वासपात्र समजले जात नव्हते. या इंग्रजांच्या दृष्टिकोनामुळे भारतीय समाजातून प्रतिक्रिया निर्माण होऊ लागल्या. भारतियांनी इंग्रजांच्या वंशवादी वागणुकीचा विरोध सुरु केला व त्यांचात अशी भावना निर्माण झाली कि आत्मसम्मान टिकून ठेवण्यासाठी ब्रिटीश राजवटीला विरोध करणे आवश्यक आहे.

**(१२) आर्थिक शोषण :**

इंग्रजी सत्तेचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था उध्वस्त झाली. इंग्रजांच्या आर्थिक धोरणाचा उद्देश भारताच्या परंपरागत अर्थव्यवस्थेचा योजनापूर्वक विनाश हाच होता. इंग्रजांची पक्षपाती आर्थिक व राजस्व धोरणाला प्रतिक्रिया म्हणून आर्थिक राष्ट्रवादाचा उदय झाला. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंड

एक अग्रेसर औद्योगिक राष्ट्र बनले होते व त्याला स्वस्त दरात मिळणाऱ्या कच्च्या मालासाठी व तयार झालेल्या पक्क्या मालासाठी बाजारपेठेची गरज होती, म्हणूनच इंग्लंड च्या दृष्टिने भारताची अर्थव्यवस्था साम्राज्यवादाला पूरक अश्या स्वरुपाची असणे आवश्यक होते. कृषी, अवजड उद्योग, वित्त, शुल्क, परकीय व्यापार, परकीय भांडवल गुंतवणूक इ. क्षेत्रातील भारताचे आर्थिक धोरण इंग्लंडच्या वसाहतवादी धोरणाला अनुकूल असे करण्यात आले. इंग्रजांची इच्छा नसतानाही १८६० च्या दशकात आधुनिक भारतीय भांडवलदार वर्ग सक्रीय झाला. इंग्लंड मधील कापड उद्योजकांनी भारतीय उद्योगांकडून स्पर्धा निर्माण होऊ नये यासाठी ब्रिटीश सत्तेला भारतीय उद्योगांवर अन्यायकारी करप्रणाली लादण्यासाठी प्रवृत्त केले. जेंव्हा जेंव्हा भारताची आर्थिक प्रगती ब्रिटीशांच्या आर्थिक लाभाच्या विपरीत जाऊ लागे तेंव्हा तेव्हा भारतीय आर्थिक प्रगतीचा बळी दिला जाई. भारतातील वाढता लष्करी व प्रशासकीय खर्च, प्रशासनातील उच्च पदांपासून भारतियांना दूर ठेवणे इंग्लंडमधे भारतावर नियंत्रण ठेवण्यासाठी होणारा वाढता खर्च, भारतातून इंग्लंड कडे सातत्याने सुरू असलेला संपत्तीचा प्रवाह या सर्वामुळे भारतीय अर्थव्यवस्था क्षीण झाली. याचा सरळ प्रभाव भारतीय जनतेच्या आर्थिक क्षमतांवर पडत होता. त्यातच भारतात दुष्काळ पडणे सुरू झाले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात जवळजवळ २४ दुष्काळ पडले आणि त्यात ३ कोटी व्यक्तींनी आपले प्राण गमाविले. धक्कादायक बाब म्हणजे भारतात दुष्काळ असतानाही भारतातून अन्नधान्याची निर्यात केली जात होती.

भारतीय राष्ट्रवाद्यांनी भारतातील वाढत्या दारिद्राचा सिद्धांत विकसित करून त्याचे कारण इंग्लंडची भारत विरोधी आर्थिक नीति असे सांगितले. दारिद्र्य आणि परकीय गुलामगिरी यांची सांगड अशी आहे हे जनतेसमोर आणण्यात आले. त्याचा परिणाम जनमानसावर दिसून आला. भारतियांच्या मनात परकीय सत्तेविषयी तिरस्कार निर्माण झाला व स्वशासनाबदल तसेच स्वदेशी मालाबद्दल प्रेम निर्माण झाले. राष्ट्रवाद वाढण्यास त्यामुळे मदतच झाली.

**(१३) लॉर्ड लिटनचे अन्यायकारी धोरण :**

लॉर्ड लिटनच्या भारत विरोधी व अन्याकारी धोरणामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना उफाळून आली. लिटनच्या कालखंडात भारतीय युवकांसाठी भारतीय नागरी सेवेची (I.C.S.) परीक्षेची वयोमर्यादा २१ वर्षाहून १९ वर्षे केली गेली. भारतीय युवकांनी ही परीक्षा उत्तीर्ण करू नये हा त्यामागील दुष्ट हेतू होता. १८७७ मधे भीषण दुष्काळ पडला असता दिल्ली दरबारावर लक्षावधी रुपये उधळे गेले. भारतीय भाषातील वृत्तपत्रे कायदा आणि भारतीय शस्त्र कायदा हया लिटनच्या कृत्यांमुळे वर्णभेद अधिकच तीव्र बनला आणि सरकार विरोधी चळवळ चालविण्यासाठी भारतात अनेक राजकीय संस्था निर्माण झाल्या.

**(१४) इलबर्ट विधेयक वरील वाद :**

रिपन सरकारने वर्णभेदावर आधारित न्यायालयीन व्यवस्थेतील दोष काढून टाकण्याचा प्रयत्न केला. भारतीय जिल्हा व सत्र न्यायाधिशांना युरोपियन न्यायाधीशांप्रमाणे अधिकार देण्याचा इलबर्ट विधेयकाचा प्रयत्न होता. पण त्यावर युरोपियनांनी मोठे आकांड तांडव केले. त्यामुळे रिपनला विधेयकात परिवर्तन करावे लागले. भारतीयांना चांगलेच लक्षात आले की, युरोपियनांच्या विशेषाधिकाराचा प्रश्न असेल तर आपल्याला न्याय मिळू

शकत नाही. तसेच भारतीयांना ब्रिटीश राजवटीत चागंली वागणूक मिळू शकत नाही व त्यामुळे अश्या राजवटीला विरोध करणे हाच पर्याय आहे.

### १.२.३ राष्ट्रवादाच्या उदयाचे परिणाम :

१९ व्या शतकात भारतीय समाजामध्ये राष्ट्रवादाच्या उदयामुळे देशाच्या इतिहासाला एक वेगळी कलाटणी मिळाली. प्रांत व भाषा यासारख्या मुद्यांवर विभागलेला समाज एका समान विचाराच्या आधारे एकत्र आला. ब्रिटीश सत्तेने निर्माण केलेले आव्हाने पेलण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे अधिक उपयुक्त ठरेल हे भारतीयांच्या लक्षात आले. आपसातले भेद विसरून आपण एका राष्ट्राचे घटक आहोत हि भावना प्रचलित होऊ लागली. अशा राष्ट्रवादाच्या भावनेच्या उदयाचे परिणाम पुढील प्रमाणे दिसून येतात:

१) राष्ट्रीय स्थरावर एकत्रित येऊन भारतीयांच्या मागण्या ब्रिटीशांच्या समोर मांडण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सारखी संघटना प्रस्थापित करणे शक्य झाले. पूर्वीच्या प्रादेशिक व स्थानिक राजकीय संघटनांच्या तुलनेत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा प्रभाव अधिक सक्षम ठरला व ब्रिटीश सत्तेला अशा राष्ट्रीय स्वरूपाच्या संघटनेच्या मागण्यांचा अधिक गंभीरतेने विचार करावा लागला.

२) राष्ट्रवादाच्या उदयामुळे समाजातील विवध घटकांचा देशबांधव म्हणून एकत्रित विचार होऊ लागला. आपल्या देशबांधवांचे प्रश्न हे आपले हि प्रश्न आहेत अशी भावना जागृत झाली. समाजातील गरीब व वंचित घटक जे शिक्षणाच्या अभावामुळे आपले प्रश्न मांडू शकत न्हवते त्यांच्यासाठी शिक्षित मध्यमवर्गीय देशबांधव संघर्ष करू लागले.

३) सर्व भारतीय समाजाला इंग्रजांकडून सुरु असलेला अन्याय व शोषण याची जाणीव झाली व अशा साम्राज्यवादी धोरणांना विरोध करण्याचा आत्मविश्वास भारतीयांमध्ये निर्माण झाला. एक समान ध्येय डोळ्यासमोर ठेऊन भारतीय समाज कार्य करू लागला.

## १.३ सारांश :

इंग्रजांनी भारतात सुरू केलेल्या आधुनिकीकरणाचा परिणाम, काही अंशाने इंग्रजांच्या भारतातील वसाहत धोरणाचे परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रवादाचा उदय होय. तसेच एकच सत्ता, समान समस्या, समान कायदेप्रणाली हयामुळे भारत एक सूत्रात बांधला गेला. भारतात परंपरेने चालत आलेल्या सांस्कृतिक ऐक्याला नव्या स्वरुपाच्या राजकीय ऐक्याची जोड मिळाली. एका प्रांतातले लोक सहज दुसऱ्या प्रांताचा प्रवास करू लागले व विभिन्न प्रांतातील लोकांमधील संपर्क वाढल्यामुळे एकी निर्माण झाली. आधुनिक शिक्षणपद्धतीमुळे आधुनिक पाश्चात्य विचारांची भारतीयांना ओळख झाली व राजकीय विचार पद्धतीला एक नवीन दिशा मिळाली.

इंग्रजी सर्वाकरिता सामान्य भाषा सिद्ध झाली त्यामुळे चळवळीला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. भारतीय वृत्तपत्रांनी ब्रिटीश साम्राज्याचे खरे स्वरूप उघड करण्यात मोलाची कामगिरी केली. या वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य, स्वराज्य, नागरिक हक्क यासारख्या मुद्द्यांवर जनजागृती केली. मध्यमवर्गीय सामाजिक घटक निर्माण झाला

कालांतराने या वर्गात समान उद्दिष्टांची व आकांक्षांची निर्मिती झाली वा ते संघटीत होऊ लागले. ऐतिहासिक संशोधनाचा एक नवा आत्मविश्वास उत्पन्न होऊन त्याने राष्ट्रवादाला व राष्ट्रभक्तीला उत्तेजन दिले तसेच युरोपियन राष्ट्रवादाची भारतीयांना चांगलीच ओळख झाली होती व त्याचा प्रभाव भारतीय मनावर होणे स्वाभाविक होते. धार्मिक सुधारणा चळवळीचा हेतू राजकीय स्वरुपाचा नव्हता पण त्यांच्या संपर्कात येणारे लवकरच आत्मसन्मानाच्या व देशभक्तीच्या भावनेने प्रभावित होत होते. बहुतांश सुधारक संस्थांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरांमधून प्रेरणा मिळत असल्याने अखिल भारतीय भावनेची व राष्ट्रवादाची जोपासना होत होती. भारतियांनी इंग्रजांच्या वंशवादी वागणुकीचा विरोध सुरु केला व त्यांचात अशी भावना निर्माण झाली कि आत्मसम्मान टिकून ठेवण्यासाठी ब्रिटीश राजवटीला विरोध करणे आवश्यक आहे.

भारतीय राष्ट्रवाद्यांनी भारतातील वाढत्या दारिद्राचा सिद्धांत विकसित करून त्याचे कारण इंग्लंडची भारत विरोधी आर्थिक नीति असे सांगितले. दारिद्र्य आणि परकीय गुलामगिरी यांची सांगड अशी आहे हे जनतेसमोर आणण्यात आले. लॉर्ड लिटनच्या भारत विरोधी व अन्याकारी धोरणामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना उफाळून आली. रिपन सरकारने वर्णभेदावर आधारित न्यायालयीन व्यवस्थेतील दोष काढून टाकण्याचा प्रयत्न तर केला परंतु त्यावर युरोपियनांनी मोठा आकांड तांडव केला. या सर्व बाबींमुळे भारतात राष्ट्रवादाचा उदय व प्रसार झाला.

राष्ट्रवादाच्या उद्याचा परिणाम म्हणजे भारतीयांच्या मागण्या ब्रिटीशांच्या समोर मांडण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सारख्या संघटनेची स्थापना. समाजातील विविध घटकांचा देशबांधव म्हणून एकत्रित विचार होऊ लागला. आपल्या देशबांधवांचे प्रश्न हे आपले हि प्रश्न आहेत अशी भावना जागृत झाली. भारतीय समाजाला इंग्रजांकडून सुरु असलेला अन्याय व शोषण याची जाणीव झाली व अशा साम्राज्यवादी धोरणांना विरोध करण्याचा आत्मविश्वास भारतीयांमध्ये निर्माण झाला.

## १.४ पारिभाषिक शब्द :

उत्खनन – ऐतिहासिक संशोधनासाठी पुरावशेष उकरून काढून, जतन करून ठेवण्याची प्रक्रिया.

पाश्चात्य – पश्चिमेकडील. युरोपीय व अमेरिका इत्यादी देशांसाठी वापरला जाणारा शब्द.

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**योग्य पर्याय निवडा.**

१) ............. यांच्या काळात इलबर्ट विधेयक आणले गेले.

अ) कर्झन ब) लिटन क) रिपन ड) मिंटो

२) इंग्रजांच्या भारतातील शैक्षणिक व आर्थिक धोरणांमुळे भारतीय समाजात परिवर्तन होऊन ............. सामाजिक घटक निर्माण झाला.

अ) कनिष्ट ब) मध्यमवर्गीय क) उच्चवर्णीय ड) जमीनदार

३) भारतीय भाषांमध्ये वृत्तपत्रांचा विकास झाला व त्यांनी ............ कार्य केले.

अ) प्रचारचे ब) जाहिराती करण्याचे क) जनजागृतीचे ड) अर्थार्जनाचे

४) भारताच्या सर्वच भागात इंग्रजीचा प्रसार झाल्याने राष्ट्रवादाच्या प्रसारास ............ .

अ) मदत झाली ब) हानी झाली क) विरोध झाला ड) फरक पडला नाही

**उत्तरे :** १) क २) ब ३) क ४) अ

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**टीपा लिहा :**

१) आधुनिक शिक्षणाचा प्रभाव

२) भारतीय वृत्तपत्रांचे राष्ट्रवादाच्या प्रसारासाठी कार्य

३) सामाजिक व धार्मिक चळवळी व राष्ट्रवादाचा उदय

४) भारतीय आर्थिक राष्ट्रवाद

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची करणे सांगा

२) ब्रिटीशांचे साम्राज्यवादी आर्थिक शोषण भारतीय राष्ट्रवादाच्या उदयास कश्या प्रकारे कारणीभूत ठरले?

३) 'भारतीय राष्ट्रवाद इंग्रज सत्तेचे अपत्य आहे' असे म्हणणे किती प्रमाणात सत्य आहे? विवेचन करा.

४) भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाचे परिणाम सांगा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) पंडित नलिनी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, मॉडर्न बुक डेपो, मुंबई

२) बी. एल. ग्रोवर, एन. के. बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास एक नवीन मुल्यांकन, एस चन्द प्रकाशन, नवी दिल्ली.

३) बिपन चंद्र, भारताचा स्वातंत्र संग्राम, पेंग्विन प्रकाशन, नवी दिल्ली

❖❖❖

# गोपाळ कृष्ण गोखले यांचे योगदान

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जीवनातील सुरुवातीचा कालखंड

१.२.२ राजकीय जीवनाची सुरुवात

१.२.३ वेल्बी कमिशन समोर साक्ष

१.२.४ गोखलेंचा माफीनामा

१.२.५ गोखले यांचे काँग्रेसमधील कार्य

१.२.६ गोपाळ कृष्ण गोखले यांचे कायदेमंडळातील कार्य

१.२.७ भारत सेवक समाज (Servants of India Society)

१.२.८ गोपाळ कृष्ण गोखले यांचे शिक्षणविषयक कार्य

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये :

गोपाळ कृष्ण गोखले (इ. स. १८६६ – इ. स. १९१५) यांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीत मोलाचे कार्य आहे. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर अध्ययनार्थीना त्यांच्याबद्दल खालील माहिती मिळेल.

१. गोपाळ कृष्ण गोखले यांचे राष्ट्रीय उन्नतीसाठीचे विचार व कार्य

२. गोपाळ कृष्ण गोखले यांचा भारतीयांच्या आर्थिक व सामाजिक सुधारणेसाठीचे कार्य

## १.१ प्रास्ताविक:

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजात आधुनिक राजकीय चेतना जागृत करण्यासाठी ज्या राष्ट्रपुरुषांनी कार्य केले त्यांचामध्ये गोपाळ कृष्ण गोखले यांचे कार्य अद्वितीय ठरले. ४८ वर्षांच्या अल्प जीवनकाळात त्यांनी

अनेक महत्वाची कार्ये पुर्णत्वास नेली. १८ व्या वर्षी पदवी, २० व्या वर्षी प्राध्यापक, २२ व्या वर्षी प्रोव्हिंशीयल कॉन्फरन्स चे सचिव, २४ व्या वर्षी पुणे सार्वजनिक सभा त्रैमासिकाचे संपादक, २९ व्या वर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सचिव, ३० व्या वर्षी वेल्बी कमिशन समोर साक्ष, ३४ वय वर्षी प्रांतीय कायदेमंडळ सदस्य, ३६ व्या वर्षी केंद्रीय कायदेमंडळ सदस्य, ३९ व्या वर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष व भारत सेवक समाजाची स्थापना, ४६ व्या वर्षी लोकसेवा संबंधी रॉयल कमिशनचे सदस्य असा अथक प्रवास गोपाळ कृष्ण गोखले यांनी पूर्ण केला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत आणि जडणघडणीत महाराष्ट्राचा मोठा सहभाग होता. इ. स. १८८५ ते इ. स. १९०५ पर्यंतचा राष्ट्रीय काँग्रेसचा काळ हा मवाळवादी कालखंड म्हणून ओळखला जातो. मवाळ कालखंडात राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांनी संविधानिक पद्धतीचा उपयोग करून भारतीयांच्या रास्त मागण्या ब्रिटीश सत्ते कडून मान्य करून घेण्याचा प्रयत्न केला. गोपाळ कृष्ण गोखले यांनी मवाळवादी विचारसरणी जोपासूनही ब्रिटीश सत्तेच्या अन्यायकारी धोरणांच्या विरुद्ध कायद्यांचे उल्लंघन न करता बंड पुकारले. राजकारणाला आध्यात्मिकरणाचा विचार त्यांनी मांडला. त्यांनी आपल्या तल्लख बुद्धिमत्ता तसेच कायदा व अर्थकारणाच्या अफाट ज्ञानाच्या आधारे वसाहतवादी वृत्तीला प्रतिकार केला. त्यांच्या विचारसरणीचा मोठा प्रभाव महात्मा गांधी यांच्यावर झालेला दिसून येतो.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जीवनातील सुरुवातीचा कालखंड :

रत्नागिरी जिल्ह्यातील कोतळूक या खेड्यात जन्मलेल्या गोपाळ कृष्ण गोखले यांचे बालपण कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षणही येथेच झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे वडील बंधू गोविंदराव यांनी स्वतःचे शिक्षण सोडून आणि त्यांच्या पत्नी ने स्वतःचे दागिने विकून केलेल्या त्यागामुळे गोपाळ कृष्ण गोखल्यांचे उच्च शिक्षण कोल्हापूरचे राजाराम कॉलेज व मुंबईचे एलफिन्स्टन कॉलेज येथे होऊ शकले. वयाच्या १८व्या वर्षी ते पदवीधर झाले. १८८४ मध्ये बी.ए. (गणित) पदवी घेऊन जानेवारी १८८५ मध्ये त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. त्यापुढे पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्यत्व, फर्ग्युसन कॉलेजमध्ये अध्यापन व प्राचार्यपद, १८९५ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर फेलो म्हणून नियुक्ती असा प्रवास सुरू असतानाच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून त्यांचा सार्वजनिक जीवनात प्रवेश झाला. गोपाळ गणेश आगरकरांनी सुरू केलेल्या ‘सुधारक’ च्या इंग्रजी आवृत्तीची जबाबदारी गोखले यांनी काही काळ सांभाळली. सार्वजनिक सभा, राष्ट्रसभा समाचार या वृत्तपत्रांतूनही त्यांनी लेखन केले. वृत्तपत्रातील लिखाणाद्वारे ते समाजसुधारणांचा सतत पाठपुरावा करत.

### १.२.२ राजकीय जीवनाची सुरुवात :

वयाच्या २० व्या वर्षी गोखले हे न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या संपर्कात आले व पुढचे सात वर्षे (१८८६-१८९३) ते जवळपास रोजच रानडे यांना भेटत असत. न्या. रानडे यांच्या संपर्कामुळे गोपाळ कृष्ण

गोखले यांची सामाजिक कार्याची रुची अधिक वाढली. १८८८ मध्ये पुणे येथे आयोजित केलेल्या मुबई प्रांतीय कॉन्फरन्सचे गोखले सहसचिव झाले तसेच पुढे १८९० मध्ये ते सार्वजनिक सभेचे सचिव व सभेच्या त्रैमासिकाचे संपादक झाले. गोखले यांनी १८८९ मधे राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सहभाग घेतला व पुढे ते अनेक वर्षे काँग्रेसच्या अधिवेशनात सहभागी होत राहिले व वेगवेगळ्या मुद्द्यांवर आपले मतप्रदर्शन केले. १८९६ मध्ये जेंव्हा डेक्कन सभेची स्थापना झाली तेंव्हा गोखले सभेचे पहिले सचिव झाले. सार्वजनिक सभेचे सचिव म्हणूनही त्यांनी काही काळ कार्य केले. शेतकऱ्यांचे कर्ज, दुष्काळ व सावकारांचा त्रास आदी विषयांचा सखोल अभ्यास करून सरकारकडे निवेदने पाठवणे, त्याबाबत पाठपुरावा करणे अशा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांविषयक कार्यांत त्यांनी शिस्त निर्माण केली. त्यामुळे त्यांच्या निवेदनांना सर्वत्र मान्यता मिळाली.

बाळ गंगाधर टिळक आणि त्यांचा राजकीय प्रवास एकाच व्यासपीठावरून सुरू झाला. टिळकांना जहालवादी राजकारण मान्य होते तर गोखलेंनी मवाळवादाचा मार्ग स्वीकारला. त्यांनी लोकशिक्षण, अस्पृश्यता/जातिनिर्मूलन, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य यांच्याशी संबंधित समाजकार्य केले. तत्कालीन इंग्रजी शासकांना समजेल अशा प्रकारे त्यांनी समाज सुधारणा मांडल्या आणि त्या मान्य करून घेतल्या.

### १.२.३ वेल्बी कमिशन समोर साक्ष :

१८९५ मध्ये वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली भारतात होणाऱ्या सरकारी खर्चाची चौकशी करण्यासाठी रॉयल कमिशनची नेमणूक झाली. कमिशनच्या चौकशी प्रक्रीयेमध्ये काही निवडक भारतीयांची साक्ष घेण्याचे ठरले. गोपाळ कृष्ण गोखले यांना साक्ष देण्यासाठी पाचारण करण्यात आले. अवघे ३० वर्षे वय असणाऱ्या गोखलेंची अतिशय वरिष्ठ व अनुभवी सदस्यांनी साक्ष घेतली व प्रतिप्रश्न केले. गोखले यांनी सैन्यावर होणारा खर्च कमी करण्याची विनंती केली. भारतीयांना वरिष्ठ प्रशासकीय पदांवर नेमण्याचीही विनंती त्यांनी केली. शेतसारा कमी करावा, विकास व भूतारण बँका स्थापन करणे, कालवे बांधणे, लोककल्याणकारी कामे सुरु करणे, लहान मोठे उद्योग स्थापन करण्यास लोकांना प्रोत्साहन देणे इत्यादी सूचना त्यांनी सरकारला केल्या.

या प्रक्रियेमध्ये गोखले यांनी आपले विषयावरील प्रभुत्व तर दाखवलेच परंतु आपल्या हजरजबाबी शैलीने कमिशनच्या सर्वच सदस्यांना प्रभावित केले. या प्रसंगी विल्लीयम वेडरबर्न म्हणतात कि 'गोखेल यांची साक्ष आतापर्यंतची सर्वोत्तम साक्ष होती. कैन यांनी मला पत्राद्वारे कळविले कि त्यांनी यापूर्वी इतका ज्ञानी व विषयाची उत्तम जान असलेला भारतीय मी पाहिलेला नाही'. गोखले यांना कमिशनला सादर करण्यासाठीचा अल्पमतधारकाचा मसुदा तयार करण्याची विनंती करण्यात आली. हि गोखले यांच्या कार्याची पावतीच होती.

### १.२.४ गोखलेंचा माफीनामा :

यावेळी एक विचित्र प्रसंगास गोपाळ कृष्ण गोखले यांना सामोरे जावे लागले. भारतामध्ये प्लेगची साथ सुरु होती व प्लेग ला प्रतिबंध करण्यासाठी ब्रिटीश सरकारने पावले उचलणे सुरु केले होते. प्लेगचे रोगी शोधून काढताना ब्रिटीश सैन्याने भारतीय नागरिकांना वाईट वागणूक दिली. गोखले यांना लंडन येते त्यांच्या भारतीय सूत्रांकडून बातमी मिळाली कि ब्रिटीश सैनिकांनी दोन भारतीय स्त्रियांसोबत दुराचार केला व एका स्त्रीने त्यामुळे

आत्महत्या केली. गोखले यांनी हि माहिती काही पत्रकारांना दिली. ज्यावेळी या घटनाक्रमाची चर्चा सुरु झाली तेव्हा भारत मंत्री स्यांडहर्स्ट यांनी गोखलेंनी दिलेली माहिती पूर्णपणे चुकीची व खोडसाळपणाची असल्याचे सांगितले. गोखले त्वरित भारतात परतले व त्यांनी आपल्या सूत्रांना त्यांनी दिलेल्या माहितीचे पुरावे मागितले. त्यावेळी गोखले यांना समजले कि त्यांना मिळालेली माहिती सत्य नव्हती. लगेच गोखले यांनी त्यांच्या विधानाबद्दल सरकारची विनाशर्त माफी मागितली. गोखले यांचे माफी मागणे अनेक भारतीयांना आवडले नाही व त्यांना विरोधाला सामोरे जावे लागले. गोखले यांनी आपल्या चुकांचे प्रायश्चित्त म्हणून प्लेग व दुष्काळ निर्मूलनासाठी स्वयंसेवक म्हणून कार्य करायला सुरुवात केली. गोखले यांना थोड्याच दिवसात पुन्हा लोकप्रियता लाभली व १८९९ मध्ये ते प्रांतिक कायदे मंडळाचे सदस्य म्हणून निवडले गेले. या सर्व प्रसंगामुळे गोखले यांचा निर्भीडपणा, सत्यनिष्ठा, व निश्चयवृत्ती दिसून येते.

### १.२.५ गोखले यांचे काँग्रेसमधील कार्य :

इ.स. १८८९ मध्ये काँग्रेसच्या व्यासपीठावर केलेल्या पहिल्या भाषणापासून गोपाळ कृष्ण गोखले यांचा काँग्रेसशी संबंध प्रस्थापित झाला. आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते काँग्रेसशी एकनिष्ठ राहिले. काँग्रेसचे ते राष्ट्रीय पातळीवरील नेते म्हणून गणले जात. काँग्रेस मधील मवाळ गटाचे त्यांनी नेतृत्व केले. काँग्रेसचे कार्य त्यांनी भारतात व इंग्लंडमध्येही केले.

१९०५ सालच्या डिसेंबरमध्ये बनारस येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. आपल्या अध्यक्षीय भाषणात गोखलेंनी बंगालच्या फाळणीला विरोध दर्शविल व स्वदेशी चळवळीला समर्थन दिले. ते आपल्या भाषणात पुढे म्हणतात कि 'बंगाल प्रांतात राष्ट्रवादाच्या जाणिवेची लाट आली आहे व या लाटेमध्ये सर्व मतभेद विरून गेले आहेत. बंगाल मधल्या चळवळीने संपूर्ण भारतामध्ये एक नवचेतना निर्माण झाली आहे. आज भारतामध्ये जर सर्वात जास्त कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती राष्ट्रभक्तीची. मातृभूमीची सेवा हे प्रत्येक व्यक्तीचे ध्येय असले पाहिजे'. काँग्रेस च्या कार्याबद्दल बोलताना गोखेले म्हणाले कि 'हे काँग्रेसचे ध्येय आहे कि भारताचे राज्य भारतीयांच्या भल्यासाठी चालविले गेले पाहिजे. कालांतराने भारतामध्ये अश्या प्रकारचे स्वराज्य प्रस्थापित केले गेले पाहिजे जसे कि सध्या ब्रिटीश साम्राज्यातील इतर वसाहतींमध्ये अस्थित्वात आहे.' गोखले यांना राजकीय वास्तविकतेचे भान होते व त्यांना माहित होते कि ब्रिटीश साम्राजापासून तुटून बाहेर पडणे त्या परिस्थितीत शक्य नव्हते. गोखले यांच्या या विचारसरणीला काँग्रेस मधील एका गटाने विरोध केला. लोकमान्य टिळक, अरविंदो घोष, लाला लजपत राय, बिपिनचंद्र पाल यांनी काँग्रेस मधील पूर्वीच्या नेत्यांच्या कार्यप्रणालीला विरोध केला. १९०६ मधेच टिळकांनी भारतासाठी संपूर्ण स्वराज्याची मागणी केली. पुढे टिळकांनी आपल्या विचारात बदल करून ब्रिटीश राष्ट्रकुलातच भारताला स्वराज्य मिळावे अशी मागणी केली.

भारताला स्वराज्य मिळून देण्यासाठी गोखलेंनी संविधानिक पद्धतिच्या मार्गाचा आग्रह धरला. परंतु गोखलेंच्या मते संविधानिक पद्धत म्हणजे फक्त विनंती व निवेदन सादर करणे इतकेच नाही. अधिक व्यापक स्वरुपात संविधानिक पद्धतीचा वापर करणे शक्य असल्याचे गोखलेंचे मत होते. हिंसा करणे, उठाव करणे किंवा

शत्रू राष्ट्रांना मदत करणे या तीन गोष्टीना सोडून इतर प्रत्येक पद्धत हि संविधानीक पद्धतच आहे असे गोखलेंचे मत होते. जनमताचा प्रभाव प्रशासनावर पाडून बदल घडवून आणणे हि पद्धत गोखलेंना सर्वात उपयुक्त वाटत.

गोपाळ कृष्ण गोखले यांना पराधीनता अपमानास्पद वाटत होती परंतु त्यांना असेही वाटत होते कि देशाच्या त्या कालखंडातील विशिष्ट परिस्थितीत सर्वांगीण प्रगतीसाठी ब्रिटीश राजवट उपयुक्त आहे. त्याचमुळे गोखलेंनी आपल्या अर्थव्यवस्थेच्या अभ्यासाच्या आधारे ब्रिटीश अधिकार्यांना लोककल्याणासाठी योग्य धोरणे अवलंबण्यासाठी प्रवृत्त करण्याचा अथक प्रयत्न केला. गोखले यांच्या मते भारतीय राजकीय नेत्यांनी ब्रिटीश साम्राज्यातील इतर वसाहतींप्रमाणे भारतातही स्वराज्य प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यासाठी ब्रिटीश साम्राज्याच्या बाहेर पडण्याची आवश्यकता नाही.

भारतात सर्वप्रथम कायद्याचे राज्य, शांतता, सुव्यवस्थेचे प्रस्थापन, आधुनिक विचारांचे केलेले बीजारोपण, देशात केलेल्या अनेक सुधारणा यांमुळे इंग्रजी सत्तेविषयी त्यांचे धोरण मवाळ होते. कोणतीही चळवळ कायद्याच्या चौकटीतून करणे, स्वदेशीच्या वापरातून आपल्या देशातील उत्पादनास चालना देऊन आर्थिक उद्दिष्ट साध्य करणे असे त्यांचे विचार असत.

'राजकारणाचे आध्यात्मीकरण' हि एक वेगळी संकल्पना त्यांनी भारतात मांडली. राजकारण हे साधन शुचितेला महत्त्व देऊन, सेवाभावाने करायचे विशेष कार्य आहे, असे त्यांचे ठाम मत होते. चारित्र्य, नैतिकता, नि:स्वार्थी वृत्ती या सद्‌गुणांचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला, स्वतःचे आदर्श उदाहरणही तत्कालीन नेत्यांसमोर व जनतेसमोर ठेवले.

१९०६ मध्ये केलेल्या आपल्या भाषणामध्ये गोखले यांनी जनसामान्यांच्या परिपूर्ण उद्धारासाठी खालील योजना सुचवली :

१) शेतीवरील करबोजा कमी करणे.

२) ग्रामीण कर्जांची पुनः आखणी.

३) अडचणीच्या वेळी शेतकर्यांना स्वस्त दराने कर्ज व्यवस्था.

४) शास्त्रशुद्ध शेती व सिंचन.

५) व्यावसायिक व तंत्र शिक्षण.

६) मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण.

७) स्वच्छता सुधारण्यासाठी कार्य.

गोपाळ कृष्ण गोखले न्या. रानडे व दादाभाई नौरोजी यांच्या सारख्या थोर नेत्यांकडून अनेक गोष्टी शिकले परंतु अनेकदा त्यांच्या विचारांच्या विरुद्ध जाण्याची धमक हि गोखले यांच्याकडे होती. दादाभाई नौरोजी यांनी देशाच्या संपत्तीचा ब्रिटन कडे जाणारा प्रवाह हे वाढत्या गरीबीचे कारण सांगितले. गोखले यांनी या संकल्पनेला अधिक महत्व दिले नाही. जरी दादाभाई नौरोजी यांचे मत गोखलेंना मान्य होते तरी त्यांनी हि अधिक विस्तृत

करण्याचा प्रयत्न केला नाही. तसेच न्या. रानडे यांचे मत असे होते कि जर सर्व नियमांचे पालन झाले तर भारतीय मजुरांची दक्षिण आफ्रिका येथे होणारे स्थलांतर भारतीयांसाठी लाभदायी ठरेल. गोखलेंनी मात्र या विचारला विरोध केला. १९१० मध्ये गोखले यांनी केंद्रीय कायदेमंडळात भारतातून दक्षिण आफ्रिकेला मजूर व कुली यांचे स्थलांतर थांबविण्याचे अधिकार सरकारकडे असावेत असा प्रस्ताव मांडला. अश्या स्थलांतरा विरोधात गोखले यांनी अतिशय आवेशात आपले म्हणणे मांडले. गोखलेंच्या मते अश्या स्थलांतरामुळे भारतीयांचे शोषण तर होतेच परंतु त्याहून महत्वाचे म्हणजे हि पद्धत म्हणजे संपूर्ण राष्ट्राचा अवमान आहे.

### १.२.६ गोपाळ कृष्ण गोखले यांचे कायदेमंडळातील कार्य :

मे १९०१ मध्ये मुंबई प्रांतिक कायदे मंडळात शेतसारा कायद्यात सुधारणा आणण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. भारतीय नेत्यांनी मसुद्यामध्ये काही बदल सुचविले परंतु ब्रिटीश सरकारने बदल स्वीकारण्यास नकार दिला. गोखले यांनी या प्रसंगी अतिशय प्रभावी भाषण करून शेतकऱ्यांचे प्रश्न सरकारसमोर मांडले. यावेळी सरकारच्या धोरणांना विरोध करत फिरोजशाह मेहता, गोकुळदास पारेख, दाजी आबाजी खरे यांच्या सोबत गोखले यांनीही सभात्याग केला. गोखले यांची शेतसारा कायदा सुधारणा मसुद्यावरचे भाषण हे प्रांतीय कायदे मंडळातील शेवटचे भाषण ठरले कारण डिसेंबर १९०१ मध्ये गोखले यांची केंद्रीय कायदेमंडळात निवड झाली.

१९ व्या शतकाच्या समाप्तीच्या कालखंडात भारतातील वाढती गरिबी हे एक अतिशय काळजीचे कारण बनले होते. १८६७ मध्ये इस्ट इंडिया असोसिएशन च्या स्थापनेपासूनच दादाभाई नौरोजी यांनी भारतातील गरिबीचा मुद्दा अनेक मंचांवर चर्चिला होता. वारंवार उद्भवणारे दुष्काळ व मनुष्यहानी यांच्यामुळे गरिबीचा प्रश्न अधिकच बिकट बनला होता. ब्रिटीश सरकारने भारतातील गरीबीचे अस्थित्व तर स्वीकारले परंतु त्यांचे म्हणणे असे होते कि गरिबी हि हळूहळू कमी होत आहे. भारतात वाढणारी मूल्यवान धातूची आयात, उत्पादन कर व सीमाशुल्क यांच्या प्राप्तीमध्ये वृद्धी यांचे दाखले देऊन ब्रिटीश सरकार गरिबी कमी होत असल्याचे सांगत होते. या ब्रिटीश प्रचाराला गोपाळ कृष्ण गोखले यांनी आपल्या १९०२ च्या अर्थसंकल्प भाषणमध्ये प्रतिउत्तर दिले. त्यांनी भारतामध्ये अधिकाधिक खोल रुजणाऱ्या गरिबीचे विश्लेषण मांडले. शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा त्यांनी विस्तृत उल्लेख करत त्यांच्या व्यथा सभाग्रहासमोर मांडल्या. अर्थमंत्री यांनी अतिरिक्त आर्थिक उपलब्धता दाखविल्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला होता. परंतु गोखलेंनी टीका केली कि अतिरिक्त आर्थिक उपलब्धता हि चलनाच्या कृत्रिम फुगवट्यामुळे आहे व खरेतर यामुळे अधिकच छुपा कर गोळा केला गेला आहे. तसेच जास्तचा गोळा केलेला कर इंग्लंडला पाठवू नये तर तो जनकल्याणासाठी वापरला जावा. वाइसरॉय लॉर्ड कर्झन गोखलेंच्या युक्तीवादासमोर निशब्द झाले.

पुढील वर्षी १९०३ मध्ये अर्थसंकल्प भाषणमध्ये गोखले यांनी नमूद केले कि 'जर सुतीच्या कापडाची आयात वाढली असेल तर याचा अर्थ असाच होतो कि स्वदेशी कुटिरोद्योगांचा नाश झाला आहे. काही वस्तूंमुळे कर प्राप्ती वाढली याचा अर्थ असा होत नाही कि गरिबी कमी होत आहे. याविरुद्ध प्लेग व दुष्काळ या कारणाव्यतिरिक्त इतर कारणांमुळे मृत्यू दर वाढतो आहे तसेच ग्रामीण कर्जबाजारीपणा वाढतो आहे याचा अर्थ असा होतो कि देशात गरिबी फक्त खोलवर पोहचली नसून अधिकाधिक खोल होत आहे'. १९०४ मध्ये

गोखले यांच्या प्रयत्नांमुळे सरकारणे गरीब शेतकऱ्यांच्या सोयीसाठी सहकारी पतसंस्था स्थापन केली.

या दरम्यान गोखलेंच्या क्षमतेची दखल घेऊन तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो यांनी त्यांना १९०९ सालच्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याचा मसुदा तयार करण्यास सांगितले. त्यासाठी ते इंग्लंड येथे वास्तव्य करून होते. त्या दरम्यान त्यांनी तेथील पार्लमेंटच्या सदस्यांना भेटून भारतातील समस्या आणि प्रश्न त्यांच्या कानी घातले आणि त्याकारणी त्यांचा पाठिंबा मिळविण्यात यशस्वी झाले.

१९११ मध्ये भारतीय कारखान्यांमधले कामगार नियम बदलण्यासाठीचा प्रस्ताव कायदेमंडळात सादर केला गेला. गोखलेंनी एक महत्वाची सुधारणा सुचवली कि कारखान्यात कार्यरत लहान मुलांना कारखाना मालकांकडून मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जावे.

## १.२.७ भारत सेवक समाज (Servants of India society) :

भारताच्या सेवेसाठी तरुण त्यागी, निष्ठावान कार्यकर्ते घडवण्याच्या उद्देशाने १३ जून, १९०५ रोजी गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची (The Servants of India Society) स्थापना केली. या समाजाचे मुख्य ध्येय देशातील तरुणांना राजकीय शिक्षण व प्रशिक्षण देणे हे होते. भारत सेवक समाजाने तरुणांना राष्ट्रहितासाठी आपले सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण दिली. लोकसेवा आध्यात्मिक स्तरावर जाऊन करण्याचीही शिकवण समाजाने तरुणांना दिली. प्रत्येक सदस्याकडून अपेक्षा होती कि त्याने देशप्रेमाचा प्रसार करावा, विविध सामाजिक घटकांमध्ये सहकार्य व बंधुता अशा भावना निर्माण कराव्या. समाजातील वंचित घटक -दलित व स्त्रिया यांच्या उद्धारासाठी प्रयत्न करणे तसेच त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणे असेहि सदस्याकडून अपेक्षित होते. प्रत्येक सदस्याला आजीवन देशसेवेचे वचन घावे लागे. अनेक होतकरू तरुण भारत सेवक समाजाकडे आकर्षित झाले व आपले सर्व स्वार्थ बाजूला ठेऊन ते देशसेवेत मग्न झाले. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या स्पुर्तीदायक मार्गदर्शनाखाली भारत सेवक समाज अनेक वर्षे कार्यरत राहिला व देशबांधवांच्या उद्धारासाठी त्यांनी मोलाचे काम केले.

## १.२.८ गोपाळ कृष्ण गोखले यांचे शिक्षणविषयक कार्य :

गोपाळ कृष्ण गोखले यांचा सुरवातीपासूनच शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन होता. १९०६ मध्ये आपल्या अर्थसंकल्प भाषणामध्ये गोखले यांनी सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीसाठी भरगोस प्रयत्न करणे आवश्यक आहे असे सांगितले. गोखले पुढे म्हणतात कि सरकारने आपली जबाबदारी ओळखली पाहिजे व समोर स्पष्ट ध्येय ठेऊन उत्साहात शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे. चांगल्या भविष्यासाठी चांगले शिक्षण आवश्यक आहे.

गोखले यांनी असे मत मांडले कि प्राथमिक शिक्षण हे मोफतच दिले गेले पाहिजे. विध्यार्थ्यांकडून दरसाल जवळपास ३०.५ लक्ष इतके शुल्क प्राप्त होते. सरकारसाठी हि रक्कम खूप मोठी नाही व त्यामुळे हा बोजा सरकारने घ्यावा. पुढील टप्प्यात सरकारने मोफत व सोबतच सक्तीचे शिक्षण द्यावे. टप्याटप्याने मुले व मुली दोघांनही सक्तीचे शिक्षण संपूर्ण देशामध्ये लागू करावे. मार्च १९१० मध्ये गोखले यांनी प्राथमिक शिक्षणाचा

प्रस्ताव प्रस्तुत केला. मसुद्यामध्ये मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची शिफारस केली. गोखले यांनी सूचना दिल्या कि अधिकारी व नागरिक यांची एकत्रित समिती स्थापित करून याची अंबलबजावणी व्हावी. अनेक दुसऱ्या देशांच्या तुलनेत भारतात शिक्षणाची प्रगती कमी प्रमाणात झालेली आहे. सुरुवातीला मुलांना शिक्षण सक्तीचे केले जावे व कालांतराने मुलींनाही सक्तीचे शिक्षण दिले जावे. शिक्षण प्रसारासाठी केंद्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थाना अनुदान द्यावे. तांत्रिक शिक्षणसंस्था स्थापन केल्या जाव्या.

मार्च १९११ मध्ये गोखलेंनी वरील सर्व मुद्यांवर आधारित मसुदा केंद्रीय कायदेमंडळात सादर केला. सरकारने यावेळी पूर्वीपेक्षा अधीक सकारात्मक प्रतिसाद दिला. कायदेमंडळात गोखलेंच्या मसुद्यावर सखोल चर्चा झाली. अनेक सदस्यांनी आपल्या शंका व मते मांडली. गोखलेंनी प्रभावीपणे तथ्ये व आकडे सादर करून सदस्यांच्या शंका दूर करण्याचा प्रयत्न केला. शेवटी हा मसुदा जनतेची मते जाणून घेण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला. कालांतराने हा मसुदा विशेष समितीकडे हस्तांतरित झाला. शिक्षणाची सक्ती या मुद्यावरून रूढीवादी कायदेमंडळ सदस्यांनी गोखलेंच्या मसुद्याला मोठा विरोध केला व त्यामुळेच या मसुद्याचे कायद्यात रुपांतर होऊ शकले नाही. ब्रिटीश सरकार जरी गोखलेंच्या मसुद्याबद्दल सकारात्मक असल्याचे दाखवत असले तरी त्यांना भीती होती कि शिक्षणाच्या प्रसारामुळे ब्रिटीश सत्तेलाच धोका निर्माण होऊ शकतो व त्याचमुळे मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला ब्रिटीश सत्तेने स्वीकारले नाही.

## १.३ सारांश :

गोपाळ कृष्ण गोखले यांनी मवाळवादी विचारसरणी जोपासूनही ब्रिटीश सत्तेच्या अन्यायकारी धोरणांच्या विरुद्ध कायद्यांचे उल्लंघन न करता बंड पुकारले. राजकारणाला आध्यात्मिकरणाचा विचार त्यांनी मांडला. त्यांनी आपल्या तल्लख बुद्धिमत्ता व तसेच कायदा व अर्थकारणाच्या अफाट ज्ञानाच्या आधारे वसाहतवादी वृत्तीला प्रतिकार केला. त्यांच्या विचारसरणीचा मोठा प्रभाव महात्मा गांधी यांच्यावर झालेला दिसून येतो. गोखलेंनी १८८९ मधे राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सहभाग घेतला व पुढे ते अनेक वर्षे काँग्रेसच्या अधिवेशनात सहभागी होत राहिले व वेगवेगळ्या मुद्द्यांवर आपले मतप्रदर्शन केले. शेतकऱ्यांचे कर्ज, दुष्काळ व सावकारांचा त्रास आदी विषयांचा सखोल अभ्यास करून सरकारकडे निवेदने पाठवणे, त्याबाबत पाठपुरावा करणे अशा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांविषयक कार्यांत त्यांनी शिस्त निर्माण केली. त्यामुळे त्यांच्या निवेदनांना सर्वत्र मान्यता मिळाली. वेल्बी कमिशनसमोर त्यांनी दिलेली साक्ष लक्षवेधी ठरली.

गोखले यांना राजकीय वास्तविकतेचे भान होते व त्यांना माहित होते कि ब्रिटीश साम्राजापासून तुटून बाहेर पडणे त्या परिस्थितीत शक्य नव्हते. गोपाळ कृष्ण गोखले यांना पराधीनता अपमानास्पद वाटत होती परंतु त्यांना असेही वाटत होते कि देशाच्या त्या कालखंडातील विशिष्ट परिस्थितीत सर्वांगीण प्रगतीसाठी ब्रिटीश राजवट उपयुक्त आहे. 'राजकारणाचे आध्यात्मीकरण' हि एक वेगळी संकल्पना त्यांनी भारतात मांडली. राजकारण हे साधन शुचितेला महत्त्व देऊन, सेवाभावाने करायचे विशेष कार्य आहे, असे त्यांचे ठाम मत होते. गोपाळ कृष्ण गोखले न्या. रानडे व दादाभाई नौरोजी यांच्या सारख्या थोर नेत्यांकडून अनेक गोष्टी शिकले परंतु अनेकदा त्यांच्या विचारांच्या विरुद्ध जाण्याची धमक हि गोखले यांच्याकडे होती.

कायदे मंडळात गोखले यांनी आपल्या बुद्धिमत्ता व विचारांनी छाप पाडली. भारताच्या सेवेसाठी तरुण त्यागी, निष्ठावान कार्यकर्ते घडवण्याच्या उद्देशाने १३ जून, १९०५ रोजी गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची (The Servants of India Society) स्थापना केली. गोपाळ कृष्ण गोखले यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले.

## १.४ पारिभाषिक शब्द :

मवाळवादी : चर्चा, विचार विनिमय, निवेदने इत्यादी मार्गांनी आपल्या मागण्या मांडणारा काँग्रेस चा गट

रॉयल कमिशनची : ब्रिटनच्या राणी / राजाच्या नावाने नेमलेली समिती

शेतसारा : शेतावरील कर

शास्त्रशुद्ध : शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करून

कुली : शारीरिक श्रम / मजुरी करून उदरनिर्वाह करणारा व्यक्ती

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**योग्य पर्याय निवडा.**

१) ........... यांच्या संपर्कामुळे गोपाळ कृष्ण गोखले यांची सामाजिक कार्याची रुची अधिक वाढली.

अ) दादाभाई नौरोजी ब) लोकमान्य टिळक क) न्यायमूर्ती रानडे ड) फिरोजशहा मेहता

२) ........... मध्ये वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली भारतात होणाऱ्या सरकारी खर्चाची चौकशी करण्यासाठी रॉयल कमिशनची नेमणूक झाली.

अ) १८९१ ब) १८९५ क) १८९६ ड) १८९९

३) गोपाळ कृष्ण गोखले यांनी ........... मध्ये काँग्रेसच्या व्यासपीठावर पहिले भाषण केले.

अ) १८८५ ब) १८८९ क) १९०६ ड) १९०५

४) गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९०५ सालच्या डिसेंबरमध्ये ........... येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

अ) पुणे ब) अलाहाबाद क) बनारस ड) कराची

५) ........... मध्ये गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली.

अ) १९०३ ब) १९०४ क) १९०५ ड) १९०६

६) गोपाळ कृष्ण गोखले यांनी मोफत व सक्तीच्या ........... शिक्षणाचा हट्ट धरला.

अ) माध्यमिक ब) प्राथमिक क) उच्च ड) तांत्रिक

**उत्तरे :** १) क  २) ब  ३) ब  ४) क  ५) क  ६) ब

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**टिपा लिहा :**

१) गोपाळ कृष्ण गोखले यांचे कायदेमंडळातील कार्य

२) भारत सेवक समाज

३) गोपाळ कृष्ण गोखले यांचे शिक्षणविषयक कार्य

**खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरें लिहा :**

१) गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जीवन व कार्याचे मूल्यमापन करा

२) गोपाळ कृष्ण गोखले यांचे भारतीय समाजाच्या उद्धारासाठीचे योगदान स्पष्ट करा

३) गोपाळ कृष्ण गोखले यांचे संविधानिक पद्धतीबद्दलचे विचार स्पष्ट करा

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) डॉ. सूर्यकुमार भुयां, अनु. विद्या शर्मा, 'महात्मा गोपाळ कृष्ण गोखले', चिनार प्रकाशन.

२) ममता झा, गोपाळ कृष्ण गोखले, प्रभात प्रकाशन.

३) गोविंद तळवलकर, गोपाळ कृष्ण गोखले, गांधींचे राजकीय गुरु, पेनटागोंन प्रेस.

४) टी आर देवगिरीकर, गोपाळ कृष्ण गोखले, पब्लिकेशन्स डिविजन.


❖❖❖

# लोकमान्य टिळक यांचे योगदान

**अनुक्रमणिका :**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनातील सुरुवातीचा कालखंड

१.२.२ बाळ गंगाधर टिळक यांचा सामाजिक जीवनात प्रवेश- त्यांचे शैक्षणिक कार्य

१.२.३ बाळ गंगाधर टिळक यांची पत्रकारिता

१.२.४ लोकमान्य टिळकांतर्फे राष्ट्रवाद चा पुरस्कार

१.२.५ टिळकांचे दुष्काळ निवारणासाठीचे कार्य

१.२.६ प्लेग निवारणासाठी कार्य

१.२.७ टिळकांचे काँग्रेस मधील कार्य - जहालवादी कालखंडाची सुरुवात

१.२.८ समाज सुधारणा विषयक टिळकांचे विचार

१.२.९ टिळकांच्या कार्याचे मूल्यमापन

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१.० उद्दिष्ट्ये :

या प्रकरणात अध्ययनार्थींना भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या कार्याबद्दल माहिती मिळेल. या प्रकरणाचा अभ्यास केल्यास विध्यार्थ्यांना लोकमान्य टिळक यांची विचारधारा, त्यांचे राष्ट्र उन्नतीसाठीचे कार्य व बलिदान याची जाणीव होईल. अध्ययनार्थी या प्रकरणात भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जहालवादी कालखंडातील विविध घटनांबद्दलही अवगत होतील.

## १.१ प्रास्ताविक :

या आधीच्या प्रकरणामध्ये आपण गोपाळ कृष्ण गोखले या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील मवाळवादी व्यक्तिमत्वाची ओळख करून घेतली. तसेच राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरुवातीच्या कालखंडा बद्दलही आपल्याला माहिती मिळाली. या प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील पुढील टप्प्यातील जहालवादी विचारसरणीचे प्रणेते लोकमान्य टिळक यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेणार आहोत. लोकमान्य टिळक यांच्या प्रभावी विचारसरणीमुळे व त्यांच्या परिणामकारक कार्यमुळे भारताच्या इतिहासामध्ये एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. टिळकांनी पत्रकारिता, राजकारण, समाजकारण व अर्थकारण या सर्वच क्षेत्रांमध्ये आपला ठसा उठविला. जनसामाण्यामध्ये राजकीय जागृतता आणून भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला लोकचळवळीचे स्वरूप टिळकांनी मिळून दिले.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनातील सुरुवातीचा कालखंड :

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील चिखलगाव येथे झाला. टिळकांचे वडील हे शिक्षक होते. इ.स. १८६६ मध्ये ते असिस्टंट डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून पुणे येथे आले. आई-वडिलांच्या मृत्यू नंतर टिळकांचा सांभाळ पुणे येथे त्यांचे चुलते गोविंदराव टिळकांनी केला. टिळकांनी पुणे येथे इंग्रजी शिक्षणासाठी सिटी स्कूलमध्ये प्रवेश घेतला. इ.स. १८७२ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. पुणे येथील डेक्कन कॉलेजमधून इ.स. १८७६ मध्ये टिळकांनी गणित विषयात बी.ए. पदवी प्राप्त केली. इ.स. १८७९ मध्ये त्यांनी एल.एल.बी.ची पदवी प्राप्त केली.

### १.२.२ बाळ गंगाधर टिळक यांचा सामाजिक जीवनात प्रवेश- त्यांचे शैक्षणिक कार्य :

बाळ गंगाधर टिळक यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात शैक्षणिक कार्यापासून केली. राष्ट्रासाठी समान पातळीवर राष्ट्रीय शिक्षणाची योजना तयार केली. अशा शिक्षणामुळेच समाजाला देशाची उज्वल परंपरा आणि स्फूर्तिदायी इतिहासाची शिकवण मिळेल असे टिळकांना वाटत होते. त्यांनी व्यावसायिक शिक्षणाचाही आग्रह धरला. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या मनात राजकीय जागृती व राष्ट्रप्रेम निर्माण झाले पाहिजे असे टिळकांना वाटत होते.

डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतांना टिळकांचा गोपाळ गणेश आगरकर यांचाशी परिचय झाला. देशहितासाठी काहीतरी करावे अशी या दोघांची तीव्र इच्छा होती. त्यांनी या विषयावर भरपूर चर्चा केल्यानंतर शिक्षण क्षेत्रात कार्याच्या निष्कर्षापर्यंत ते आले. यामधूनच टिळकांनी १ जानेवारी १८८० रोजी आगरकर व विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या साहाय्याने न्यू इंग्लिश स्कूल स्थापन केले. यानंतर टिळकांनी २४ ऑक्टोबर १८८४ रोजी पुणे येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. या सोसायटीने शिक्षण चळवळीत महत्त्वाची भूमिका बजाविली व मुंबईचे गवर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांच्या आश्रयाने २ जानेवारी १८८५ रोजी फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या महाविद्यालयात टिळक हे गणित व संस्कृत या विषयांचे

प्राध्यापक झाले. पुढे टिळक यांचे आगरकर व गोखले यांच्यासोबत मतभेद वाढले व १८९० मध्ये राजीनाम देऊन टिळक डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या बाहेर पडले. लोकमान्य टिळकांनी त्यानंतर सार्वजनिक सभेवर आपले लक्ष केंद्रित केले.

**१.२.३ बाळ गंगाधर टिळक यांची पत्रकारिता :**

भारत देशाची स्थिती कशी आहे हे लोकांना समजावून त्यांच्या मनात देशभक्ती निर्माण करण्यासाठी विष्णुशास्त्री चिपळुणकर, गोपाळराव आगरकर आणि लोकमान्य टिळक यांनी वृत्तपत्र सुरू करण्याचे निश्चित केले. रविवारी मराठा आणि मंगळवारी केसरी ही साप्ताहिके सुरू करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार रविवार दि. २ जानेवारी १८८१ रोजी मराठा या सप्ताहिकाचा पहिला अंक निघाला तर मंगळवार दि. ४ जानेवारी १८८१ रोजी केसरी साप्ताहिकाचा पहिला अंक निघाला. मराठा हे इंग्रजी भाषेतुन व केसरी मराठी भाषेतून प्रसिद्ध होत होते. मराठाचे संपादक लोकमान्य टिळक होते तर केसरीचे संपादक गोपाळ आगरकर होते.

पुढे सामाजिक प्रश्नावर टिळक व आगरकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. आगरकरांनी सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला तर टिळकांनी राजकीय सुधारणांचा पुरस्कार केला. आगरकांनी इ.स. १८८७ मध्ये केसरीच्या संपादकपदाचा राजीनाम दिला आणि इ.स. १८८८ मध्ये सुधारक हे वृत्तपत्र सुरू केले. टिळकांनी मराठा व केसरीचे दोनीहीचे संपादन करायला सुरुवात केली.

**१.२.४ लोकमान्य टिळकांतर्फे राष्ट्रवाद चा पुरस्कार :**

राष्ट्राविषयी लोकांच्या मनात असलेली प्रेमाची आणि अभिमानाची भावना म्हणजे राष्ट्रवाद होय. राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी एकात्मकतेची जाणीव होणे महत्त्वाचे आहे असे टिळकांना वाटत होते. यासाठी त्यांनी प्राचीन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनावर अधिक भर दिला आहे. सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेच्या आधारे देशात राष्ट्रवादाचा प्रसार करणे शक्य असल्याचे मत टिळकांचे होते. त्यामुळेच त्यांनी सार्वजनिक गणेश उत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू केले. धार्मिक समारंभाच्या निमित्ताने लोकांना संघटित करून त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचे माध्यम म्हणून टिळकांनी सार्वजनिक उत्सवास महत्त्व दिले.

● **सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात :**

भारतीय जनलेत राष्ट्रवाद निर्माण करुन त्यांच्यात एकी निर्माण करणे आवश्यक होते. यासाठी लोकमान्य टिळक यांनी इ.स. १८९४ मध्ये सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात केली. गणेश उत्सवाच्या आधारे लोकमान्य टिळकांनी जनतेला एकत्र आणले व त्यांना संघटित केले. गणेश उत्सव हा जरी धार्मिक स्वरूपाचा असला, तरी या उत्सवाचा खरा हेतू राजकीय होता. या उत्सवात क्रांतिकारकांना एकत्र करून त्यांना अन्यायाविरुद्ध बंड करण्यासाठी प्रेरणा देण्याचा प्रयत्न झाला. तसेच लोकांमध्ये स्वसंस्कृती व धर्माचा अभिमान निर्माण करण्यासाठी त्यांना एकत्र आणण्याची गरज टिळकांना वाटत होती.

टिळकांनी सुरू केलेल्या उत्सवांबद्दल रानडे, गोखले, आगरकर, चाफेकर यांनी त्यांच्यावर टीका केली. गणेशोत्सवाच्या माध्यमातून राजकीय ध्येयासाठी धर्माचा उपयोग करणे हे या नेत्यांना पटले नाही. इ.स. १८९३

मध्ये पुणे येथे हिंदू-मुस्लिम दंगल झाली. हिंदू वा मुस्लीम यांच्यातील सद्भावना कमी होऊ लागली होती. टिळकांनी धर्माच्या आधारे लोकांना संघटीत केल्याने समाजातील दुफळी अधिक वाढली अशी टीका विरोधक टिळकांवर करू लागले.

शिवजयंती उत्सवाची सुरुवात: महात्मा फुले यांनी इ.स. १८६९ मध्ये सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली. त्यांनीच सर्वप्रथम शिवाजी महाराजांच्या रायगडावरील समाधीचा शोध लावला व तिची साफसफाई केली. पुढे राष्ट्रकार्याला निःस्वार्थपणे वाहून घेणारी तरूणांची पिढी तयार करण्यासाठी, तसेच भारतीय लोकांत राष्ट्रवाद निर्माण करून एकी निर्माण करण्याच्या हेतूने टिळकांनी इ.स. १८९५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव सुरू केला.

स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा उत्सव हा पूर्णपणे राजकीय स्वरूपाचा होणार असे टिळकांना वाटत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात सर्व जाती-जमातीचे लोक आनंदाने आणि समाधानाने राहत होते. त्यामुळे राष्ट्रीय भावना जागृत करून सर्व धर्माच्या आणि प्रांताच्या लोकांना एकत्र आणण्यासाठी शिवजयंती उत्सव उपयोगी होता. २६ एप्रिल १८९६ रोजीच्या केसरीत शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव या अग्रलेखात टिळकांनी लोकांत एकराष्ट्रीयत्वाची भावना दृढमय होण्यासाठी थोर पुरुषांच्या चरित्राचा उपयोग होऊ शकतो आणि छत्रपती शिवाजी महाराज हे थोरात थोर पुरुष असल्याचे म्हटले. शिवाजी महाराजांना अखिल भारतीय राष्ट्र विभूतीच्या स्थानावर नेऊन ठेवण्याची टिळकांची महत्त्वकांक्षा होती.

### १.२.५ टिळकांचे दुष्काळ निवारणासाठीचे कार्य :

महाराष्ट्रात वारंवार दुष्काळ पडत असल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. इ.स. १८९६ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. दुष्काळी परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आणी शेतकर्यांना मार्गदर्शन करण्यासाठी टिळकांनी एजंट नेमले आणि त्यांच्याकडून मालेल्या माहितीच्या आधारे तयार केलेले अहवाल सरकारकडे पाठविण्यात येत असत. याच अहवालाच्या आधारे 'केसरीत' बातमी प्रसिद्ध करीत असत. बातम्यातून सरकारची बेफिकरी व अधिकार्यांची मुजोरी यावर आपोआपच प्रकाश पडत असे, कायद्याच्या मर्यादा सांभाळून टिळक हे सर्व करीत असत. याबाबत आपण सरकारलाच मदत करीत आहोत असा त्यांचा दावा होता. शेतकऱ्यांना सरकारला साथ देऊ नका असे टिळक कधीच महणाले नाहीत. कर्ज काढून सारा देऊ नका असे ते म्हणत असत आणि असे करण्यास सरकारनेही मुभा दिली आहे, असे म्हणून त्याचीही जबाबदारी सरकारवरच टाकत असत. त्यामुळे नेमके काय करावे हेच सरकारला कळत नसे. शेतकऱ्यांना त्यांचे न्याय्य हक्क समजण्यासाठी सरकारने बनविलेल्या फेमिन रिलीफ कोड या कायद्याचा मराठी अनुवाद करून सरकारने त्याच्या प्रति लोकांना उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी टिळकांनी सरकारकडे केली परंतु हे काम सरकार करणार नाहीच याची जाणीव टिळकांना असल्याने त्यांनी या कायद्याच्या सारांश पुस्तिका तयार करून त्या मोफत वितरणासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविल्या. परंतु यामध्ये त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सरकारचेच पितळ उघडे पडले. हे राज्य कायद्याचे आहे, दांडगाईचे नाही या सूत्राचा ते नेहमी उच्चार करीत असत. टिळकांनी पुणे येथील व्यापाऱ्यांना दुष्काळ निवारणासाठी स्वस्त धान्य दुकाने सुरू करण्यासाठी प्रवृत्त केले.

### १.२.६ प्लेग निवारणासाठी कार्य :

पुणे येथे इ.स. १८९७ मध्ये प्लेगची साथ आली. या साथीस तोंड देण्यासाठी सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना लष्करी अधिकार दिला. तसेच सातारा येथील सहायक जिल्हाधिकारी वाल्टर रँड यांची फेब्रुवारी १८९७ मध्ये प्लेग कमिशनर म्हणून नेमणूक केली. प्लेग झालेल्या माणसांना सरकार चुकीच्या पद्धतीने वागत असल्याची जाणीव टिळकांना झाली. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर दवाखाना आणि छावणी उभारली व रुग्णांची सेवा केली. प्लेग निवारणाच्या नावाखाली रँड यांनी सुरू केलेल्या दडपशाही विरोधात टिळकांनी केसरीत लिखाण केले. रँडच्या अन्याय अत्याचारास लोक कंटाळले होते. पुढे २२ जून १८९७ रोजी बाळकृष्ण व दामोदर या चाफेकर बंधूंनी पुणे येथे गणेश खिंडीजवळ आयर्ट आणि रँड यांचा गोळ्या झाडून खून केला. यानंतर सरकारने दडपशाहीचा अवलंब केला. तेव्हा त्याचा निषेध करताना 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' असा प्रश्न टिळकांनी केला. अशावेळी खून प्रकरणात टिळकांचाही हात असल्याचे समजून सरकारने त्यांना अटक करून दीड वर्षांची शिक्षा ठोठावली. सप्टेंबर १८९८ मध्ये टिळकांची कैदेमधून सुटका झाली.

### १.२.७ टिळकांचे काँग्रेस मधील कार्य – जहालवादी कालखंडाची सुरुवात :

सरकारला अर्ज, विनंत्या, प्रस्ताव व निवेदने देऊनच आपल्या मागण्या मांडण्याचे धोरण मवाळवादी काँग्रेस नेत्यांचे होते. मवाळाचा ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर विश्वास होता. म्हणूनच त्यांनी ब्रिटिश शासनाशी एकनिष्ठा व्यक्त केली. सरकारला न दुखावता वाटचाल करण्याचे धोरण काँग्रेसच्या मवाळ नेत्यांचे होते. टिळक, लाला लजपतराय व बिपीनचंद्र पाल या तरुणांना मवाळांची विचारसरणी व मार्ग पसंत नव्हता. सरकारच्या दडपशाही नीतीला न जुमानता काँग्रेस सरकारविरोधी निष्क्रिय प्रतिकाराच्या चळवळीचा पुरस्कार करावा, असे टिळक आदी नेत्यांचे मत होते. वैचारिक मतभेदांमुळे काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ असे दोन गट पडले.

- **सुरत अधिवेशन :**

टिळकांचा काँग्रेसला जहाल वळण देण्याचा निश्चय होता. इ.स. १९०७ च्या सुरतच्या अधिवेशनासाठी लाला लजपतराय यांना अध्यक्षपद देण्याची टिळकांची सूचना मवाळांनी मान्य केली नाही. कलकत्ता अधिवेशनात संमत केलेले ठराव पुन्हा काँग्रेसने अधिकृतपणे स्वीकृत करून ते मान्य करावेत, या टिळकांच्या सूचनेलाही मवाळांनी विरोध केला. त्यामुळे जहाल व मवाळांतील मतभेद पराकोटीला पोहोचले. असे असतानाही टिळकांनी मवाळांशी सामोपचाराने तडजोड करण्याचे प्रयत्न केले; परंतु त्यांना मवाळांनी प्रतिसाद दिला नाही. अशा वेळी अध्यक्ष निवडीच्या बाबत बोलण्यासाठी टिळक व्यासपीठावर गेले असता अधिवेशनात हल्लकल्लोळ माजून गोधळास सुरुवात झाली. मवाळांनी जहालांना काँग्रेसमध्ये राहण्यास विरोध केला. त्यामुळे जहालांनी स्वतंत्ररीत्या राष्ट्रीय चळवळीचे कार्य करण्याचे ठरविले. या सर्व घटनाक्रमामुळे काँग्रेसमध्ये फुट पडली व काँग्रेसचे कार्य क्षीण पडले.

- **टिळकांचा चतु:सूत्री कार्यक्रम :**

स्वराज्याची प्राप्ती करणे, हे सर्व भारतीयांचे ध्येय असले तरी ते साध्य करण्यासाठी कोणत्या मार्गाचा

अवलंब करावयाचा? याबाबतीत कॉंग्रेसच्या नेत्यांमध्ये एकमत नव्हते. न्या. रानडे, गोखले, मेहता या नेत्यांची स्वराज्यप्राप्तीच्या ध्येयपूर्तीसाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब करण्याचे निश्चित केले होते. घटनात्मक मार्गाने स्वराज्यप्राप्ती करणे टिळकांना मान्य नव्हती परंतु त्यांनी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला नाही. आपली स्वराज्याची चळवळ यशस्वी करण्यासाठी टिळकांनी स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वदेशी या चतुःसूत्री कार्यक्रमांचा उपयोग केला. या कार्यक्रमात त्यांनी सर्वसामान्य लोकांना ओढून घेतले आणि त्यांच्याच जोरावर होमरूल आंदोलन सुरू केले. या चतुःसूत्री कार्यक्रमाचे घटक पुढीलप्रमाणे होते.

**१) स्वराज्य :**

चतुःसूत्री कार्यक्रमात स्वराज्याचा उल्लेख टिळकांनी केला असला, तरी स्वराज्य हे साधन नव्हते, तर जे जनतेचे ध्येय होते. स्वराज्याचा अर्थ स्वातंत्र्य असले, तरीही टिळकांना स्वराज्याचा एवढाच अर्थ कधीच अभिप्रेत नव्हता. स्वराज्य ही कल्पना पुरातन असून तो ऋग्वेद व प्राचीन शास्त्रे या काळात आधारित असल्याचे त्यांचे मत होते. स्वराज्याची कल्पना धर्माला अनुसरून असून स्वराज्याशिवाय एकही व्यक्ती स्वतःच्या धर्माप्रमाणे आचरण करू शकत नाही, असेही टिळकांचे मत होते. स्वराजायाशिवाय कोणताच विकास होत नसल्यामुळे आमच्या देशाची सत्ता आमच्या हातात असली पाहिजे. त्याशिवाय देशाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होणार नाही, असे टिळकांनी म्हटले होते. २ मे १९०८ रोजी टिळकांनी वऱ्हाडच्या दौऱ्यावर असताना अकोले येथील छत्रपती शिवाजी जयंती उत्सवात 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच' अशी घोषणा केली.

**२) बहिष्कार :**

बहिष्कार म्हणजे परकीय वस्तूंचा त्याग करणे. टिळकांनी म्हटले की, परकीय सत्ता व जनता यांच्यात संघर्ष सुरू असताना परकीय वस्तूंवर बहिष्कार टाकणे सोयीचे असते. मी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करीत नाही आणि आमच्यात तशी ताकदही नाही; परंतु बहिष्कार या अस्त्राद्वारे आम्ही सरकारला वठणीवरही आणू शकतो आणि देशाची खालावत चाललेली आर्थिक परिस्थिती सावरू शकतो. बहिष्कार या अस्त्रामुळे स्वदेशीचा विकास होतो आणि परकीय राजवटीची अर्थव्यवस्थाही कोलमडण्यास मदत होते. इ.स. १९०५ पासूनच स्वदेशी बहिष्काराच्या आंदोलनाला सुरुवात झाली होती. बंगालमध्ये कृष्णकुमार मित्र यांनी 'संजीवनी' पत्रात प्रथम बहिष्काराचा पुरस्कार केला. स्वदेशी कपडा वापरण्याचे व परकीयांवर बहिष्कार टाकण्याचे सत्र इ.स. १८९४ पासूनच सुरू झाले होते. इ.स. १८९६ मध्ये न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी परदेशी कापडाची होळी केली होती. टिळकांची बहिष्काराची कल्पना विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्यापूरतीच मर्यादित नव्हती. ब्रिटिशांना शासन करण्यासाठी मदत न करणे सरकारी शाळांवर बहिष्कार टाकणे, तसेच सरकारला कोणत्याच बाबतीत सहकार्य न करण्याचा धोरणाचा पुरस्कार केला. टिळकांच्या बहिष्कार चळवळीचे ब्रिटनवर मोठे दुष्परिणाम झाले. ब्रिटनचा व्यापार मंद झाला. या प्रकारच्या बहिष्कारामुळे सशस्त्र क्रांतीपेक्षाही अधिक फटका ब्रिटनला बसला.

### ३) स्वदेशी :

बहिष्काराच्या आंदोलनाला पूरक अशी स्वदेशी चळवळ होती. परकीय मालावर बहिष्कार टाकून आणि परदेशी कापडाच्या होळ्या करूनच केवळ भागणार नव्हते, तर बाहिष्काराच्या चळवळीस स्वदेशी चळवळ जोडली पाहिजे, असे टिळकांचे मत होते. स्वदेशी चळवळीचा हेतू देशी व्यापार उद्योगधंद्यांचा विकास करणे आहे. ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणामुळे भारतातील उद्योग डबघाईला आले होते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वदेशी वस्तूचा वापर केला पाहिजे, असा संदेश टिळकांनी दिला. आपण स्वदेशी वस्तूंचा वापर करण्यास सुरुवात केल्याशिवाय देशी उद्योगधंद्यांना चालना मिळणार नाही. टिळकांनी स्वतःच्या वर्तमानपत्रासाठी भारतीय कागद वापरात आणला होता, जर एखादी वस्तू मिळणे कठीण असेल, तर ती वस्तू ब्रिटन सोडून कोणत्याही दुसऱ्या देशापासून विकत घ्यावी, असे टिळकांनी जनतेला सांगितले. देशातील उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी त्यांनी इ.स. १९०३ मध्ये पैसा फंड आंदोलन सुरू केले. या फंडातून त्यांनी अनेक उद्योगधंद्यांना मदत केली. इ.स. १९०६ मध्ये मुंबईत स्थापन झालेल्या स्वदेशी सहकारी भांडारास आर्थिक मदत केली.

### ४) राष्ट्रीय शिक्षण :

टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळी बरोबर राष्ट्रीय शिक्षणाचाही हिरीरीने पुरस्कार केला. त्या काळातील शाळा व महाविद्यालये सरकारच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे, अशा शाळा व महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संस्कृती, धर्म, राजकीय स्थिती आणि देशप्रेम याबद्दलचे धडे देण्यात येत नव्हते. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्याला आपल्या देशाची परिस्थिती माहित नसल्यामुळे त्यांच्यात देशप्रेम कसे निर्माण होणार, असा प्रश्न टिळकांनी उपस्थित केला. टिळकांनी राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या अनेक संस्थांना आर्थिक मदत केली. इ.स. १९०६ मध्ये महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळास टिळकांनी २० हजार रूपये देणगी दिली. धार्मिक शिक्षणावरही त्यांनी भर दिला. शिक्षण हे मातृभाषेतूनच देण्यात यावे, तसेच परकीय भाषासुद्धा विद्यार्थ्यांना शिकविल्या जाव्यात, असाही त्यांचा आग्रह होता.

### ● मंडालेचा कारावास :

खुदीराम बोस व प्रफुल्ल चक्रवर्ती यांनी ३० एप्रिल १९०८ रोजी मुझफ्फरपूर येथे न्यायमूर्ती किंग्जफोर्डवर बॉम्ब टाकला. पण किंग्जफोर्डची मोटार ओळखण्यात गफलत झाल्याने तो वाचला व दुसऱ्याच मोटारीत बसलेल्या दोन इंग्रज स्त्रिया ठार झाल्या. त्यामुळे खुदीराम बोस यांना फाशी दिली गेली व प्रफुल्ल चक्रवर्ती यांनी स्वतःवर पिस्तुल झाडून आत्महत्या केली. मुझफ्फरपूर येथील बॉम्बस्फोटाचे पडसाद देशभर उमटले. टिळकांनी केसरीत १२ मे १९०८ रोजी देशाचे दुर्दैव अग्रलेख प्रसिद्ध करून त्यात हिंसेचा निषेध केला; परंतु लोकांची स्वातंत्र्याची आकांक्षा दडपण्याचा प्रयत्न केल्यानेच हा हिंसाचार भडकला असे म्हटले. यानंतर टिळकांचे सहकारी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी केसरीत दुहेरी इशारा, बॉम्ब गोळ्याचा खरा अर्थ व बॉम्ब गोळ्याचे रहस्य हे ३ अग्रलेख प्रसिद्ध केले. ९ जून १९०८ च्या अंकात हे उपाय टिकाऊ नाहीत हा अग्रलेख होता. सरकारने टिळकांच्या विरुद्ध प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट ॲस्टन यांच्याकडे दिलेल्या फिर्यादीत १२ मे १९०८ च्या केसरीतील 'देशाचे दुर्दैव' या अग्रलेखामुळे सरकार प्रति द्वेष पसरवण्याच्या व जाती जातीत वैमनस्य पसरवण्याची

तक्रार केली. त्यामुळे २४ जून १९०८ रोजी लोकमान्य टिळकांना अटक झाली. २२ जुलै १९०८ रोजी टिळकांना सहा वर्षाची काळ्या पाण्याची सजा व एक हजार रुपये दंड सुनावला गेला. टिळकांना मंडाले येथे नेले गेले. याच तुरुंगात त्यांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. जून १९१४ मध्ये टिळक आपली शिक्षा पूर्ण करून पुण्यात परत पोहोचले.

**● टिळकांचा काँग्रेसमध्ये पुनः प्रवेश :**

सुरातच्या अधिवेशनात काँग्रेसमध्ये फूट पडली, याचा फायदा सरकारने घेतला. सरकारने जहालांची चळवळ दडपण्यासाठी दमन नीतीचा अवलंब केला. एकापाठोपाठ अनेक जहाल नेत्यांना अटक करण्याचे सत्र सरकारने सुरु केले. मुझफ्फरपूर बाँबस्फोट प्रकरणी अग्रलेखाबद्दल झालेल्या तुरुंगवासातून टिळकांची सुटका १७ मे १९१४ रोजी झाली. त्यावेळी राष्ट्रीय चळवळ थंडावली होती. टिळकांसारख्या लोकनेत्याचा प्रवेश काँग्रेसमध्ये झाल्याशिवाय राष्ट्रीय आंदोलनाला गती येणार नाही, याची जाणीव श्रीमती ॲनी बेझंट यांना झाली. त्यांनी टिळकांना पहिल्यांदा काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न केला; पण मेहता, गोखले, रानडे यांच्या विरोधामुळे तो प्रयत्न अयशस्वी झाला. इ.स. १९१५ मध्ये टिळकांनी काँगेसमध्ये आणण्याचा पुन्हा प्रयत्न केला. १९१५ मध्ये टिळकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि ते काँग्रेसचे नेते बनले.

**● लखनौ करार १९१६ :**

राजकीय क्षेत्रातील टिळकांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे काँग्रेस व लीग यांच्यात झालेला लखनौ करार होय. ब्रिटिशांचे मुसलमानविषयक बदलते धोरण, बंगालची रद्द केलेली फाळणी, मुस्लिम लीगच्या नेतृत्वात झालेला बदल आणि तुर्कस्तानला दुर्बल बनविण्याचा रशिया व ब्रिटनचा प्रयत्न या घटनांमुळे मुस्लिम लीगचे नेते अस्वस्थ झाले होते. याशिवाय टिळकांनी नुकताच काँग्रेसमध्ये आपल्या अनुयायांसह प्रवेश केला होता. टिळकांनाही राष्ट्रीय ऐक्य वाढवून राष्ट्रीय चळवळीस गती द्यावयाची होती. यासाठी काँग्रेस व लीग यांची अधिवेशने लखनौ या ठिकाणी होऊन या दोन संघटनांत तडजोड होऊन इ.स. १९१६ मध्ये एक करार करण्यात आला.

**● होमरूल चळवळ –स्वराज्याची मागणी :**

ब्रिटिशांच्या अटकेतून सुटका झाल्यानंतर टिळकांना राष्ट्रीय चळवळ थंडावल्याचे दिसते. त्याच वेळी त्यांनी स्वराज्याची मागणी करून राष्ट्रीय आंदोलन सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी महाराष्ट्रात टिळकांनी व मद्रासमध्ये डॉ. बेझंट यांनी होमरूल लीगची स्थापना इ.स. १९१६ मध्ये केली. होमरूल लीगने लोकजागृती घडवून आणली. त्यामुळे टिळक व डॉ. ॲनी बेझंट यांना सरकारने अटक केली. टिळकांनी हायकोर्टात दाद मागून खटल्यातून निर्दोष मुक्तता करून घेतली. होमरूल ही निःशस्त्र प्रतिकार चळवळ होती. सरकारच्या दडपशाही व अन्यायी कायद्यांमुळे लोकांनी न डगमगता आपली चळवळ पुढे चालू ठेवण्याचा टिळकांनी जनतेला संदेश दिला. होमरूल चळवळीचे खरे यश म्हणजे सामान्य जनतेचे घडून आलेली राजकीय जागृतता.

## १.२.८ समाज सुधारणा विषयक टिळकांचे विचार :

टिळक आणि आगरकर यांच्यात सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा आधी याबाबत चर्चा होत असे. राजकीय स्वातंत्र्य तर हवेच परंतु अगोदर सामाजिक सुधारणा होणे महत्त्वाचे असल्याचे मत गोपाळ आगरकरांचे होते तर सामाजिक सुधारणापेक्षा राजकीय सुधारणांना टिळक प्राधान्य देत होते. टिळकांनी राजकीय चळवळीच्याबाबत जितकी जहाल भूमिका घेतली तितकीच मवाळ भूमिका त्यानी धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या बाबतीत घेतली. त्यामुळेच त्यांन राजकारणात जहाल आणि सामाजिक क्षेत्रात मवाळ अर्थात नेमस्त म्हणतात.

सुधारणेच्या नावाखाली पदाधिकाऱ्यांनी धर्मात हस्तक्षेप करू नये असे टिळकांचे मत होते. राजकीय उद्दिष्ट प्राप्त झाल्यानंतर सामाजिक सुधारणा घडवून आणता येतील असे त्यांचे मत होते. त्यामुळेच टिळक आणि आगरकर यांच्यात मतभेद वाढत गेले. अस्पृश्यता समाज स्वास्थ्य उपयोगी असल्याचे प्रतिपादन टिळकांनी केले. त्यांनी अस्पृश्यता निवारण परिषदेत व्यक्तिगत जीवनात अस्पृश्यता, माणनार नाही या विठ्ठल शिंदे यांच्या निवेदनावर सही केली नाही. त्यांनी भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व सांगताना चातुर्वर्ण्याचा पुरस्कार केला. स्त्री शिक्षणाबाबतहि टिळकांचा दृष्टीकोन खूप सकारात्मक नव्हता.

वेदोक्त प्रकरणाबाबत टिळकांची भूमिका: शाहू महाराज धार्मिक प्रवृत्तीचे होते. ते नियमित पूजा-अर्चा करीत असत. तसेच ते पवित्र तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी देवदर्शनास जात असत. महाराज कार्तिक स्नान करण्यासाठी पंचगंगा नदीवर जात असत. पूर्वापार प्रथे प्रमाणे महाराज ऑक्टोबर १८९९ मध्ये कार्तिक महिन्यात पंचगंगा नदीवर स्नानास गेले. महाराजांचे स्नान चालू असताना नारायण भटजी हे स्वतः स्नान न करताच वेदोक्त मंत्र ऐवजी पुराणोक्त मंत्र उच्चार होते. छत्रपती शाहू महाराज हे वेदोक्त मंत्राचे अधिकारी असतांना हे भटजी पुराणोक्त मंत्र म्हणत असल्याचे राजारामशास्त्रींनी महाराजाच्या नजरेस आणून दिल्यावर महाराजांनी त्यांस जाब विचारला. त्यावर भटजीने महाराजांना शूद्र म्हणून हिणविले व वेदोक्त मंत्र उच्चारायला नकार दिला. महाराजांना या धार्मिक अन्यायाची चीड आली. छत्रपती घराण्याचे धार्मिक विधी करण्यासाठी अप्पासाहेब राजोपाध्ये यांना ३०,००० रुपये वार्षिक इनाम मिळाले होते. राजोपाध्ये हेही महाराजांच्या पंचगंगेवरील कार्तिक स्नानाच्यावेळी हजर होते. नोव्हेंबर १९०१ मध्ये राजघराण्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचे फर्मान राजश्री शाहू महाराजांनी सोडले; परंतु राजोपाध्ये यांनी त्यास नकार दिला. त्यामुळे ६ मे १९०२ रोजी महाराजांनी राजोपाध्ये यांना नोकरीवरून काढले व त्यांचे वतन रद्द केले. हे वेदोक्त प्रकरण महाराष्ट्रात पसरले आणि या प्रकरणावर ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे दोन गट निर्माण झाले. लोकमान्य टिळक व महाराष्ट्रातील सनातनी ब्राह्मणांनी राजोपाध्ये यांना पाठिंबा दिला. लोकमान्य टिळकांनी पुढे केसरीत लेख लिहून शाहू महाराजांच्या विरोधात आकाश पाताळ एक केले. याप्रकारे टिळकांच्या विचारसरणीत समाजसुधारणे बाबत प्रतिगामी कल दिसून येतो.

## १.२.९ टिळकांच्या कार्याचे मूल्यमापन :

भारताच्या राष्ट्रीय चळवळीतील एक खंदे कार्यकर्ते व जहाल विचारसरणीचे प्रमुख नेते म्हणून टिळकांनी फार मोठे कार्य केले. त्यांनीच लढाऊ राष्ट्रवादाच्या नवीन पर्वाचा प्रारंभ केला. आपल्या विचारांचा प्रसार

करण्यासाठी तसेच लोकजागृती करण्यासाठी टिळकांनी 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्राचा माध्यम म्हणून वापर केला. राष्ट्रकार्याला निःस्वार्थीपणे वाहून घेणाऱ्या तरुणांची पिढी तयार व्हावी तसेच राष्ट्रीय ऐक्य घडून यावे यासाठी त्यांनी शिवजयंती आणि गणेश उत्सव सरू केले. टिळकांनी देशासाठी तुरुंगवास भोगला. ते एक कुशल संघटक व महान कर्मयोगी होते. टिळकांनी 'गीता रहस्य' व 'Arctic Home of the Vedas' हे ग्रंथ लिहिले. सर व्हेलेंटाइन चिरोल या इंग्रजाने ('लंडन टाइम्स' चे प्रतिनिधी) 'Indian Unrest' या ग्रंथात भारतीय असंतोषाचे जनक म्हणून लोकमान्य टिळकांचा उल्लेख केला; तो सार्थच वाटतो. टिळकांचा मृत्यू १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या मृत्यूमुळे भारतीय राष्ट्रीय चळवळीतील टिळक पर्वाचा अंत झाला परंतु त्याचवेळी एका नव्या युगाला सुरुवात झाली. या युगाला आपण गांधीयुग म्हणून ओळखतो.

## १.३ सारांश :

लोकमान्य टिळक यांच्या प्रभावी विचारसरणीमुळे व त्यांच्या परिणामकारक कार्यमुळे भारताच्या इतिहासामध्ये एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. टिळकांनी पत्रकारिता, राजकारण, समाजकारण व अर्थकारण या सर्वच क्षेत्रांमध्ये आपला ठसा उठविला. जनसामाण्यामध्ये राजकीय जागृतता आणून भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला लोकचळवळीचे स्वरूप टिळकांनी मिळून दिले. बाळ गंगाधर टिळक यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात शैक्षणिक कार्यापासून केली. टिळकांनी २४ ऑक्टोबर १८८४ रोजी पुणे येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. लोकांच्या मनात देशभक्ती निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळक यांनी मराठा आणि केसरी ही साप्ताहिके सुरू केली. सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेच्या आधारे देशात राष्ट्रवादाचा प्रसार करणे शक्य असल्याचे मत टिळकांचे होते. त्यामुळेच त्यांनी गणेश उत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू केले. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी टिळकांनी प्रयत्न केले. तसेच प्लेगच्या साथीच्या वेळी पीडितांची सेवा केली. टिळकांना मवाळांची विचारसरणी व मार्ग पसंत नव्हता. टिळकांचा काँग्रेसला जहाल वळण देण्याचा निश्चय केला. १९०७ च्या सुरतच्या अधिवेशनामध्ये काँग्रेस मध्ये फुट पडली. आपली स्वराज्याची चळवळ यशस्वी करण्यासाठी टिळकांनी स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वदेशी या चतुःसूत्री कार्यक्रमांचा उपयोग केला. १९०८ मध्ये टिळकांना मुझफ्फरपूर बाँबस्फोट प्रकरणी अग्रलेखाबद्दल सहा वर्षाची काळ्या पाण्याची सजा व एक हजार रुपये दंड सुनावला गेला. कारावास पूर्ण केल्यानंतर १९१५ मध्ये टिळकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि ते काँग्रेसचे नेते बनले. राजकीय क्षेत्रातील टिळकांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे काँग्रेस व लीग यांच्यात झालेला लखनौ करार होय. महाराष्ट्रात टिळकांनी व मद्रासमध्ये डॉ. बेझंट यांनी होमरूल लीगची स्थापना इ.स. १९१६ मध्ये केली. टिळकांच्या विचारसरणीत समाजसुधारणे बाबत प्रतिगामी कल दिसून येतो.

## १.४ पारिभाषिक शब्द :

राष्ट्रवाद : राष्ट्राविषयी लोकांच्या मनात असलेली प्रेमाची आणि अभिमानाची भावना

स्वसंस्कृती : स्वतःच्या समाजाची संस्कृती

सद्भावना : भले / चांगले व्हावे अश्या भावना

बहिष्कार : त्याग करणे / वाळीत टाकणे

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**योग्य पर्याय निवडा.**

१) १९०७ मध्ये ............ च्या अधिवेशनात काँग्रेसमध्ये फुट पडली.

अ) सुरत ब) मुंबई क) अलाहाबाद ड) कलकत्ता

२) पुणे येथे ............ मध्ये प्लेगची साथ आली.

अ) १८९१ ब) १८९७ क) १८९६ ड) १८९९

३) टिळकांनी इ.स. ............ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव सुरू केला.

अ) १८८५ ब) १८९५ क) १९०६ ड) १९०५

४) लोकमान्य टिळक यांनी इ.स. ............ मध्ये सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात केली.

अ) १८९४ ब) १८९१ क) १८९५ ड) १८८५

५) ............यांनी सुधारक हे वृत्तपत्र सुरू केले.

अ) गोपाळ कृष्ण गोखले ब) लो. टिळक क) न्या. रानडे ड) गोपाळ आगरकर

**उत्तरे :** १) अ २) ब ३) ब ४) अ ५) ड

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**टिपा लिहा.**

१) सार्वजनिक गणेश उत्सावाची सुरुवात

२) टिळकांचे पत्रकारिता कार्य

३) सुरत अधिवेशन

४) होम रुल चळवळ

५) डेक्कन शिक्षण संथेची स्थापना

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) टिळकांचे शैक्षणिक कार्य स्पष्ट करा

२) टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम स्पष्ट करा

३) टिळकांचे राष्ट्रवाद प्रसाराचे कार्य विषद करा

४) टिळकांनी राष्ट्रीय स्वतंत्रता संग्रामाला वेगळे वळण कसे दिले ते विस्तृतपणे सांगा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) सदानंद मोरे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, सकाळ प्रकाशन, २०१९

२) गोवर्धन पारीख, भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार - बाळ गंगाधर टिळक, मौज प्रकाशन, २०११

३) धनंजय कीर, लोकमान्य टिळक, पॉप्युलर प्रकाशन, २०११.


❖❖❖

**घटक – २**

# राष्ट्रीय चळवळीतील महाराष्ट्राचे योगदान

**अ) क्रांतिकारी चळवळ**

**ब) असहकार चळवळ**

**क) सविनय कायदेभंग आंदोलन**

**ड) चले जाव किंवा छोडो भारत चळवळ**

---

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.२.१ क्रांतिकारी चळवळ

    २.२.२ असहकार चळवळ

    २.२.३ सविनय कायदेभंग आंदोलन : विशेष संदर्भ – सोलापूरमधील उठाव

    २.२.४ चले जाव किंवा छोडो भारत चळवळ : विशेष संदर्भ – सातारा प्रतिसरकार

२.३ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.४ सारांश

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकातून आपल्याला खालील बाबी लक्षात येतील.

१. महाराष्ट्रातील ब्रिटीशविरोधी झालेल्या क्रांतिकारी चळवळीची माहिती मिळेल.

२. महाराष्ट्रात असहकार चळवळ कशा प्रकारे चालविली गेली हे पाहणे.

३. महाराष्ट्रातील सविनय कायदेभंग आंदोलनाची माहिती घेणे.

४. महाराष्ट्रातील छोडो भारत चळवळ कशी लढली गेली हे पाहता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

१९५७ च्या उठावानंतर ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीची राजवट संपुष्टात येवून भारतावर ब्रिटीश सरकारचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. १९५७ चा हा उठाव क्रांतिकारकांना प्रेरणास्थान वाटू लागला. भारताच्या 'स्वातंत्र्याचा पहिला संग्राम' या शब्दात क्रांतिकारकांनी या उठावाचा गौरव केलेला आहे. परकीय ब्रिटीश सत्तेपासून जनतेस मुक्त करण्यासाठी भारतीय स्वातंत्र्यवीरांनी मवाळ, जहाल, गांधीवादी व क्रांतिकारी चळवळीचा अवलंब केला होता. प्रखर राष्ट्रवादी भावनेने पेटून उठलेल्या भारतीय तरुणांनी सुरू केलेली ही क्रांतिकारी चळवळ आधुनिक भारताच्या इतिहासातील महत्त्वाचा घटक समजली जाते.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ क्रांतिकारी चळवळ :

१९ व्या शतकाच्या अखेरीपासून काही धाडसी तरूण सशस्त्र क्रांतीच्या खडतर मार्गाकडे वळले. ते ब्रिटीश सरकारची ताकद जाणून होणे. मुठभर ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या हत्या करून आपल्याला स्वातंत्र्य मिळणार नाही, हे ही ते जाणून होते. पण आपल्या कृत्यामुळे लोकमत जागृत होऊन जनता स्वातंत्र्यासाठी प्रयत्नवादी बनेल अशी त्यांची धारणा होती.

भारताला पारतंत्र्यातून मुक्त करणे हे क्रांतिकारकांचे प्रमुख ध्येय होते. यासाठी त्यांनी आत्मबलिदानाचीही तयारी ठेवली होती. अर्ज, विनंती, निवेदने, सत्याग्रह, उपोषण या मार्गानी भारताला स्वातंत्र्य मिळणे अवघड आहे. म्हणून क्रांतिकारकांनी हाती शस्त्र घेवून जुलमी इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करणे, सरकारी खजिना लुटणे, सरकारी कार्यालये जाळणे, ब्रिटीशांची दळणवळण यंत्रणा बंद पाडणे, शस्त्रास्त्रे गुप्त मार्गाने भारतात आणणे, सरकारच्या जुलमी नितीविरोधात वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके यातून लेखन करणे, गुप्तपणे तरूणांना संघटित करणे इत्यादी मार्गाचा अवलंब करून आपली चळवळ चालू ठेवली.

क्रांतिकारकांनी आपले राष्ट्रीय स्वातंत्र्याचे ध्येय साध्य करण्यासाठी बलशाली इंग्रज साम्राज्याविरुद्ध संघर्ष आरंभिला होता. देशभर अनेक क्रातिकारक व क्रांतिकारी संघटना स्थापन झाल्या होत्या. परंतू क्रांतिकारकांना देशव्यापी संघटन निर्माण करण्यात अपयश आले होते. परस्पर समन्वयाऐवजी स्थानिक पातळीवर छोटे-छोटे गट संघटित करून त्यांच्या मार्फत क्रांतिकार्य केले जात होते. क्रांतिकारकांच्या कारवायामुळे ब्रिटीश शासनाच्या स्थैर्यात फारसा फरक पडला नाही. मात्र भारतीय जनतेच्या मनात स्वातंत्र्याची भावना सतत तेवत ठेवण्यात या चळवळीला यश आले.

#### २.२.१.१ महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळ :

छत्रपती शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाने पावन झालेला महाराष्ट्र परकीय इंग्रजी राजवटीच्या गुलामगिरीतून मातृभूमिला मुक्त करण्यासाठी आघाडीवर राहिलेला आहे. सन १९१८ च्या सेडिशन कमिटीच्या अहवालातही भारतातील क्रांतिकारी चळवळीचा प्रारंभ महाराष्ट्रातून झाला असल्याचे म्हटले आहे. क्रांतिकारी चळवळीतील

महाराष्ट्राचे योगदान उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रातील १९ व्या शतकातील क्रांतिकारी चळवळ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### २.२.१.२ महाराष्ट्रातील १८५७ चा उठाव :

सन १८१८ मध्ये दुसऱ्या बाजीरावाचा पराभव करून इंग्रजांनी शेवटच्या बलाढ्य मराठ्यांच्या सत्तेचा शेवट करून भारतात आपले निर्विवाद वर्चस्व निर्माण केले. पुढील काळात साम, दाम, दंड, भेद या नितीचा अवलंब करून भारतीय जनतेचे शोषण केले. इंग्रजी राजवटीत इनाम कमिशनच्या माध्यमातून सरदार, जहागीरदार इत्यादींना कायदेशीररित्या लुटले. खालसा धोरणाचा अलवंब करून अनेक संस्थानिकांना दुखावले. तर शेतकऱ्यांची पिळवणूक, हस्त व्यवसायांचा नाश, व्यापाराचे खच्चीकरण आदी मार्गाने संपूर्ण देश परावलंबी बनवला.

संपूर्ण भारतात ब्रिटीश राजवटीविषयी कमालीचा असंतोष होता. या पार्श्वभूमीवर १८५७ चा देशव्यापी उठाव झाला. या उठावाचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले. सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, बेळगांव मुंबई, खानदेश इत्यादी ठिकाणी सशस्त्र उठाव झाले. परंतू ब्रिटीशांनी ते निष्ठूरपणे मोडून काढले. इंग्रजांविरोधी झालेला हा सशस्त्र उठाव जरी दडपला गेला असला तरी अनेक भारतीय क्रांतिकारकांना यापासून प्रेरणा मिळाली.

### २.२.१.३ वासुदेव बळवंत फडके :

वासुदेव बळवंत फडके यांना 'आद्य क्रातिकारक' म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म रायगड (कुलाबा) जिल्ह्यातील शिरढोण या गावी १८४५ मध्ये झाला होता. इंग्रजी पाचवीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी रेल्वे खात्यात लेखनिकाची नोकरी स्वीकारली. परंतू तिथून राजीनामा देवून पुढील काळात फडकेंनी १८६३ मध्ये लष्कराच्या हिशेबी खात्यात नोकरी पत्करली. पुढे १८७९ मध्ये ब्रिटीशांविरोधी उठाव करेपर्यंत ते तेथेच नोकरीला होते. आपल्या या सरकारी नोकरीच्या काळात त्यांना सरकारच्या अन्यायी धोरणाची जाणीव झाली. तसेच वैयक्तिक पातळीवरही अपमानास्पद वागणूकीला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. संपूर्ण महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडलेला होता. जनतेचे प्रचंड हाल होत होते. त्याचवेळी त्यांनी ब्रिटीश सरकारविरोधात बंडाची योजना आखली.

वासुदेव फडकेंनी उठावासाठी पुणे परिसरातील रामोशी लोकांचे संघटन केले. पुण्याजवळील लोणीकंद येथे आपले प्रमुख ठाणे बनविले. २२ फेब्रुवारी १८७९ ला इंग्रजाविरोधी बंड पुकारल्याचे जाहीर केले.

सावकारांची घरे, सरकारी खजिने, धान्य कोठारे लूटली. तेथील अन्नधान्य गोरगरीबांना वाटून टाकले. लुटीतून मिळालेल्या पैशातून त्यांनी शस्त्रास्त्रे घेतली. रेल्वे रूळ, तुरुंग, तार आणि टपाल कचेऱ्या मोडून ब्रिटीशांचे दळणवळण मोडकळीस आणले. इंग्रजी सत्तेपुढे मोठे आव्हान उभे राहिले. तेव्हा सरकारने फडकेना पकडण्यासाठी मोठे बक्षीस जाहीर करून सैनिकी कारवाई सुरू केली. यासाठी मेजर डॅनियल या खास अधिकाऱ्याची नियुक्ती केली.

फितूरीने २१ जुलै १८७९ मध्ये झोपेत असतानाच त्यांना अटक करण्यात आली. कोर्टाने फडकेना

जन्मठेपेची शिक्षा देवून जानेवारी १८८० मध्ये भारतापासून दूर एडणच्या तुरुंगात पाठविले. तेथून पळून जाण्याचा त्यांचा प्रयत्न फसला. त्यामुळे आता भारतात परत जाता येणार नाही हे लक्षात आलेल्या या क्रांतिकारकाने १८८३ मध्येच अन्न ग्रहण करणे सोडून दिले व मरणाला जवळ केले. अशाप्रकारे या क्रांतिकारकाचा शेवट झाला. त्यांच्या क्रांतीकार्यापासून प्रेरणा घेवून महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही अनेक क्रांतिकारक तयार झाले.

**२.२.१.४ चाफेकर बंधू व रँडची हत्या :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात दामोदर, वासुदेव व बाळकृष्ण हे तीन भाऊ 'चाफेकर बंधू' म्हणून ओळखले जातात. ब्रिटीशांच्या दडपशाहीने ते जहाल क्रांतिकारक झाले होते. दामोदर चाफेकर यांनी १६ ऑक्टोबर १८९६ ला व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला डांबर फासून चपलाचा हार घातला होता. तसेच पुण्यात चाफेकर क्लब व व्यायाम मंडळ स्थापन करून तरुणांचे संघटन केलेले होते. ब्रिटीशांविरोधी समाजजागृती करण्यासाठी ते महाराष्ट्रभर किर्तने करत असत. इंग्रजांना घालविण्यासाठी सशस्त्र लढाच दिला पाहिजे असे त्यांचे मत होते.

सन १८९६-९७ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. यातच पुण्यात प्लेगची भयंकर साथ पसरली हेती. हजारो लोकांचा यात बळी गेला होता. ही साथ आटोक्यात आणण्यासाठी सरकारने रँड या अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. परंतू रँडने प्लेगच्या आजाराचे उच्चटन करताना देवघराची विटंबना, स्त्रियांची बेअब्रु करून जनतेवर प्रचंड जुलूम केला. रँडच्या या कृतीने खवळून जावून चापेकर बंधूंनी २२ जून १८९७ रोजी व्हिक्टोरिया राणीच्या हिरक महोत्सवाच्या कार्यक्रमाहून परत जात असताना रँडची हत्या केली. पुढे सरकारला फंदफितूरीने या कटाचा सुगावा लागला. चाफेकर बंधूना अटक करून फाशी दिली गेली.

सरकारच्या या कृतीचा निषेध करताना लो. टिळकांनी 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे?' या शिर्षकाचा लेख केसरी या वर्तमानपत्रातून लिहिला. चाफेकर बंधूच्या हौतात्म्याने/बलिदानाने अनेक तरुणांना क्रांतिकार्याची स्फूर्ती मिळाली.

**२.२.१.५ विनायक दामोदर सावरकर :**

विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ ला नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. त्यांना लहानपणापासूनच क्रांतिकार्यांची आवड होती. चाफेकर बंधूच्या बलिदानापासून प्रेरणा घ्रेवन वि. दा. सावरकरांनी १९०० साली नाशिक येथे 'मित्रमेळा' या संघटनेची स्थापना केली. पुढील काळात सप्टेंबर १९०४ मध्ये संघटनेचे नाव बदलून 'अभिनव भारत सोसायटी' असे ठेवले. महाराष्ट्रात या संघटनेच्या अनेक शाखा सुरू झाल्या होत्या. सशस्त्र क्रांतिच्या मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे संघटनेचे ध्येय होते. सावकरांनी भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने, १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध, हिंदू पातशाही इत्यादी ग्रंथ लिहून तरुणांच्यामध्ये जोश निर्माण केला होता. पुढे वि. दा. सावरकर उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. तेथून ते भारतात शस्त्रास्त्रे पाठवित असत. संघटनेची भारतातील जबाबदारी त्यांचे बंधू गणेश सावरकर हे पाहत होते.

इंडिया हाऊसमधील क्रातिकारक मदनलाल धिंग्रा याने कर्झन वायली या अधिकाऱ्याचा खून केला.

त्यानंतर इंग्रज सरकारने सावरकरांच्या लंडन व नाशिक येथील कार्यालयावर छापे घातले. गणेश सावरकरांच्या घरी काही आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली. त्यामुळे गणेश सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा दिली. याचा बदला घेण्यासाठी अनंत कान्हेरे या तरूणाने नाशिकचा न्यायाधिश जॅक्सनला गोळ्या घालून ठार केले. या घटनेचे धागेदोरे वि.दा. सावरकरांपर्यंत पोहोचल्याने त्यांना लंडन येथे कैद केले गेले. तेथून भारतात आणत असताना सावरकरांनी फ्रान्सच्या किनाऱ्यावर पळून जाण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

नाशिक येथे सावरकरांवर खटला भरून त्यानां ५० वर्षाची कैदेची शिक्षा देवून १९११ मध्ये अंदमान बेटावर पाठविले गेले. पुढील काळात १९३७ मध्ये मुंबई प्रांतात काँग्रेसचे सरकार आल्यानंतर त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. नंतर सावरकरांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी खर्च केले. अशा या राष्ट्रवादी सरकारांचे क्रांतिकारक चळवळीत वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान आहे.

### २.२.१.६ अनंत लक्ष्मण कान्हेरे :

अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात झाला होता. त्यांचे शिक्षण हैद्राबाद प्रांतातील औरंगाबाद येथे मामाकडे झाले. या काळात त्यांचा क्रांतिकाऱ्यांशी संपर्क येवून ते अभिनव भारत सोसायटीचे सदस्य झाले. पुढे सरकारविरोधी कारवायातील सहभागामुळे गणेश सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा दिली गेली. यामध्ये नाशिकचा न्यायाधिश जॅक्सन हा आघाडीवर होता. तसेच जॅक्सनने अनेक क्रांतिकारकांना छोट्या कारणावरूनही कडक शिक्षा दिलेल्या होत्या. याचा बदला घेणेसाठी कान्हेरेने आपल्या सहकाऱ्यांसह जॅक्सनला मारण्याचा कट केला. १९ एप्रिल १९१० ला त्यांने जॅक्सनची गोळ्या घालून हत्या केली. पोलीसांनी त्यांना लगेचच पकडले. त्यांच्यावर खटला भरून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. अनंत लक्ष्मण कान्हेरेचे हे कार्य क्रांतिकारकांना प्रेरणादायी ठरले.

### २.२.१.७ सेनापती बापट :

सेनापती बापट यांचे मुळ नाव पांडुरंग महादेव बापट असे होते. त्यांचा जन्म नगर जिल्ह्यात झाला. परदेशात जावून राहणारे व क्रांतिकार्य करणारे पहिले मराठी भाषिक म्हणून सेनापती बापटांचे नाव घेतले जाते. उच्च शिक्षणासाठी लंडनमध्ये असताना त्यांचा क्रांतीकाऱ्यांशी संपर्क आला. ते अभिनव भारत सोसायटीचे सदस्य झाले. संघटनेतर्फे बॉम्ब बनविण्याचे तंत्रज्ञान आणण्यासाठी बापट पॅरिसला गेले होते. तेथे त्यांनी ते तंत्रज्ञान आत्मसात करून बॉम्ब बनविण्याचे रनशियन ज्ञान इंग्रजी भाषेत भाषांतरीत करून भारतात पाठविले होते. देशव्यापी संघटना स्थापन करून ब्रिटीशांविरुद्ध सशस्त्र उठाव घडवून आणण्याचे त्यांचे विचार होते. यासाठी पुढील काळात त्यांनी प्रयत्न केले.

### २.२.१.८ विष्णू गणेश पिंगळे :

विष्णू गणेश पिंगळे यांचा जन्म १८८८ मध्ये पुणे जिल्ह्यात झाला. उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेला गेले. लाला हरदयाळ यांनी अमेरिकेत भारतीय जनतेच्या स्वातंत्र्यासाठी 'गदर पार्टी' ची स्थापना केली होती. लाला हरदयाळांच्या प्रभावामुळे पिंगळे गदर पार्टीत सामील झाले. पुढे भारतात परतल्यानंतर पुणे जिल्ह्यातील

गदर पार्टीचा प्रमुख म्हणून त्यांनी कार्य केले. भारतात ब्रिटीशांविरोधी एकाच वेळी उठाव झाला तरच त्यांचा पराभव होईल असे त्यांचे म्हणणे होते. या उठावाच्या नियोजनासाठी मीरत येथील सैनिकी छावणीत गेले असताना ते पकडले गेले. सरकारने पिंगळेवर खटला भरून त्यांना फाशीची शिक्षा दिली.

**२.२.१.९ शिवराम हरी राजगुरु :**

शिवराम हरी राजगुरु यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील खेड येथे १९०८ मध्ये झाला. शिक्षण घेत असतानाच पुण्यात त्यांचा क्रांतिकाऱ्यांशी संबंध आला. राष्ट्रवादी विचारांचे राजगुरु 'हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी' या संघटनेत दाखल झाले. तेथे चंद्रशेखर आझाद, जतीनदास, भगतसिंग, सुखदेव आदीशी त्यांची मैत्री झाली. सायमन कमिशनच्या विरोधातील लाहोर येथील शांततामय मोर्चावर पोलीसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात लाला लजपतराय या वृद्ध नेत्याचा मृत्यू झाला. याचा बदला घेण्यासाठी या हल्ल्यातील प्रमुख अधिकारी सॉँडर्स याला मारण्याचे भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांनी ठरविले. त्यानुसार १७ डिसेंबर १९२८ ला या तिघांनी गोळ्या झाडून त्यांचा खून केला. पुढे ३० डिसेंबर १९३० ला राजगुरुंना पुणे येथे अटक करण्यात आली. त्यांच्यावर खटला चालून २३ मार्च १९३१ ला भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना लाहोर येथे फाशी देण्यात आले.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१ :**

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. ................ यांना आद्य क्रांतिकारक म्हणून ओळखले जाते.

अ) चाफेकर बंधू ब) वि.दा. सावरकर क) सेनापती बापय ड) वासुदेव बळवंत फडके

२. वि.दा. सावरकर यांनी सन १९०० मध्ये ........... ही संघटना स्थापन केली.

अ) अनुशिलन समिती ब) मित्रमेळा क) सोशॅलिस्ट पार्टी ड) युगांतर समिती

३. अनंत लक्ष्मण कान्हेरेने जॅक्सनची ............... साली गोळ्या घालून हत्या केली.

अ) १८ मार्च १९११ ब) १९ एप्रिल १९११ क) १९ मार्च १९१० ड) १९ एप्रिल १९१०

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दामोदर चाफेकरने चाफेकर क्लबची स्थापना कोठे केली होती?

२. सेनापती बापट बॉम्ब तयार करण्याचे शिक्षण घेण्यासाठी कोठे गेले होते?

३. राजगुरु शिवराम हरी यांना कोठे फाशी देण्यात आली?

**२.२.२ असहकार चळवळ :**

दक्षिण अफ्रिकेतील यशानंतर महात्मा गांधीजींचे १९१५ मध्ये भारतात आगमन झाले. यामुळे भारतीय

राजकारणात नवीन प्रवाहास सुरूवात झाली. १९२० ते १९४७ पर्यंत महात्मा गांधीजींनी भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. ब्रिटिशांविरोधी लढा देण्यासाठी गांधीजींनी सुरू केलेली पहिली चळवळ म्हणजे असहकार चळवळ होय.

ब्रिटीशांच्या न्यायबुद्धीवर गांधीजींचा व भारतीय जनतेचा विश्वास होता. पहिल्या महायुद्धातील सहकार्यानंतर भारतीयांना इंग्रजांकडून भरीव सहकार्याची अपेक्षा होती. परंतू १९१९ च्या सुधारणा कायद्याने भारतीयांची घोर निराशा झाली. तसेच रौलट ॲक्ट, जालीयनवाला बाग हत्याकांड करून सरकारने दडपशाहीचे धोरण अवलंबिले. त्यामुळे भारतीय जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला होता. अशा स्थितीत गांधीजीचा जुलमी सरकार विरोधात एक राष्ट्रव्यापी चळवळ उभी करण्याच्या विचाराप्रत आले.

**२.२.२.१ असहकार चळवळीचा प्रस्ताव :**

देशातील संवेदनशील जनतेच्या भावनांना वाट करून देण्यासाठी कलकत्ता येथे ४ सप्टेंबर रोजी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचे खास अधिवेशन बोलविले गेले. यात गांधीजींनी मांडलेला असहकार आंदोलनाचा प्रस्ताव पास केला गेला. पुढे कॉंग्रेसच्या डिसेंबर १९२० मधील नियमित अधिवेशनात असहकार चळवळ सुरू करण्याचा प्रस्ताव बहुमताने मान्य केला गेला.

**२.२.२.२ असहकार चळवळीचे स्वरूप :**

असहकार आंदोलन करण्यासाठी गांधीजीनी ब्रिटिशांच्या पदव्या व मानसन्मानाचा त्याग करणे, शाळा-कॉलेजवर बहिष्कार टाकणे, सरकारी कार्यक्रमांना हजर न राहणे, स्वदेशीचा पुरस्कार करणे, परदेशी मालावर बहिष्कार टाकणे, न्यायालयावर बहिष्कार टाकणे, सरकारी नोकरीचा त्याग करणे इत्यादी मार्गाचा कार्यक्रम सांगिला होता. चळवळीच्या प्रारंभीच गांधीजीनी स्वत: 'कैसर-ए-हिंद' या आपल्या पदवीचा त्याग केला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आय.सी.एस. पदवीचा त्याग केला. तर रविंद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा त्याग केला. असंख्य तरूण-तरुणींनी इंग्रजी शाळांवर बहिष्कार टाकला. संपूर्ण देशभर ही चळवळ प्रचंड उत्साहात चालविली गेली. महाराष्ट्र ही यात आघाडीवर होता.

**२.२.२.३ महाराष्ट्रातील असहकार चळवळ :**

महात्मा गांधीजींपूर्वी राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेतृत्व हे लोकमान्य टिळकांकडे होते. टिळकांच्या मृत्यूनंतरही त्यांना मानणारा मोठा वर्ग महाराष्ट्रात होता. महात्मा गांधीजींनी ब्रिटिशांशी संघर्ष करण्यासाठी सुरू केलेली असहकार चळवळ व त्याचा मार्ग हा संपूर्ण भारतीयांप्रमाणे महाराष्ट्रालाही नवीन होता. तरीही कॉंगेसच्या प्रतिष्ठेसाठी व देशप्रेमापोटी आचार्य शंकरराव जावडेकर काकासाहेब खाडिलकर, हरिभाऊ फाटक, न. चि. केळकर, बॅ. जयकर, चिंतामणराव वैद्य इत्यादींच्या नेतृवाखाली महाराष्ट्रीयन जनतेने असहकाराच्या कार्यक्रमात हिरीरीने भाग घेतला. महाराष्ट्रातील असहकाराची चळवळ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**२.२.२.३.१ न्यायालयावर बहिष्कार :**

असहकार आंदोलनातील कृत्याच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून देशभरातील अनेक वकीलांनी आपल्या

वकिली व्यवसायाचा एक वर्षासाठी किंवा कायमचा त्याग केला. तर काहींनी नवीन केसेस न घेण्याचा मनोदय जाहीर करून ब्रिटीश शासनावरील आपला राग स्पष्ट केला. महाराष्ट्रातही बॅ. जयकर, रामचंद्र शंकर राजवाडे, वासुदेवराव दास्ताने, अष्टपुत्रे इ. वकिलांनी आपल्या वकिली व्यवसायाचा त्याग करून सर्व वेळ देशकार्यासाठी खर्च करण्यास सुरूवात केली.

### २.२.२.३.२ शाळा व कॉलेजवर बहिष्कार :

सरकारी शळा व कॉलेजमधून ब्रिटीशधार्जिणे, वसाहतवादी व इंग्रजांचे श्रेष्ठत्व विशद करणारे शिक्षण दिले जात असे. यातून शिकलेले बहुतांश जण इंग्रजी सत्तेचे गोडवे गात असत. यामुळे या विद्यार्थ्यांना आपल्या उज्वल इतिहासाची ओळख होत नव्हती. इंग्रजांना भारतातून घालविण्यासाठी आपला गौरवशाली इतिहास माहित असणारी व राष्ट्रवादी विचाराने भारावलेली पिढी निर्माण करण्याच्या दूरगामी हेतूने असहकाराच्या कार्यक्रमात सरकारी शाळा व कॉलेजवर बहिष्कार घालून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण करण्याचा कार्यक्रम आंदोलनात ठेवलेला होता. त्यानुसार महाराष्ट्रातील तात्यासाहेब देशपांडे, शंकरराव जावडेकर, स. का. पाटील, श्रीपाद अमृत डांगे, काका कारखानीस, आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे इत्यादी तरुणांनी सरकारी शाळातील शिक्षण अर्धवट सोडून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळांत सहभाग घेतला. काहीनी तेथे अध्यापनाचेही कार्य केले. पुढील काळात या विद्यार्थ्यांपैकी अनेक जणांनी राष्ट्रीय चळवळीत सहभाग घेतला. पुणे येथे टिळकांच्या नावाने एक महाविद्यालय सुरू झाले तर १९२१ ला मुंबईत राष्ट्रीय महाविद्यालयही सुरू केले गेले.

### २.२.२.३.३ टिळक स्वराज्य फंड :

चळवळीच्या कार्यक्रमात एक कोटी लोकांना काँग्रेसने सदस्य करून घेणे. ३० जून १९२१ पूर्वी १ कोटी रुपयांचा स्वराज्य निधी टिळकांचे स्मारक म्हणून गोळा करणे तसेच खेड्यापाड्यात २० लाख चरखे वापरले जातील अशी व्यवस्था करण्याचेही निश्चित केले गेले होते. मुंबईतून व्यापारी समाजाने या टिळक स्वराज्य फंडासाठी ३६ लाख रुपये जमविले. गिरणी कामगार, कारकून, शिक्षक आणि सर्वसामान्य जनतेतूनही उत्स्फुर्तपणे या फंडासाठी देणग्या मिळाल्या. महाराष्ट्रातील नाटक कंपन्यांनी नाटकाचे प्रयोग करून त्यामधून मिळणारा पैसा निधीला दिला. ३० जूनला ९८ लाख रुपये जमा झाले होते. तरीही टिळक फंडासाठी २ लाख रुपये कमी होते. तेव्हा गांधींनी मुंबईत सभा गेऊन जनतेला आवाहन केले. याला लगेचच प्रतिसाद देवून अमर सोभानी व जमनालाल बजाज यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांची जादाची देणगी दिली.

### २.२.२.३.४ परदेशी कपड्यावर बहिष्कार :

स्वदेशीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी गांधीजींनी परदेशी कपड्यांवर बहिष्कार घालण्याचे ठरविले होते. प्रारंभी महात्मा गांधीजींनी मुंबईतील गिरणी मालकांशी संवाद साधून परदेशी कपड्यावरील बहिष्कारावेळी कपड्यांच्या किंमती वाढवून जनतेची लूट न करण्याविषयी आवाहन केले. बहुतांश व्यापाऱ्यांनी याला मान्यता दिली.

३१ जुलै १९२१ ला अमर सोभानीच्या एलफिन्स्टन मिलच्या पटांगणात गांधीजींनी परदेशी कपड्यांची

पहिली होळी केली. यात त्यांनी स्वत:च्या अंगावरील परदेशी कपड्यांचा त्याग केला. पुढे ९ ऑक्टोबर १९२१ ला पुन्हा त्याच ठिकाणी दुसऱ्यांदा परदेशी कपड्यांची होळी केली. तसेच यावेळी गांधीजींनी खादीचा पंचा व धोतर हा आपला देशी पेहराव ठेवला. पुढील संपूर्ण आयुष्यभर त्यांचा हाच पोशाख राहिला. नंतर १७ नोव्हेंबर १९२१ ला ब्रिटनचे राजकुमार आठवे एडवर्ड मुंबईत आल्यावर एलफिन्स्टन मिलजवळच पुन्हा परदेशी कपड्यांची होळी केली. याप्रसंगी २५,००० लोक उपस्थित होते.

### २.२.२.३.५ असहकार चळवळीचा शेवट :

अहिंसेच्या मार्गाने चाललेली असहकार चळवळ संपूर्ण देशभर पसरली होती. ब्रिटीश सरकारने दडपशाहीचे धोरण अवलंबून ही चळवळ दडपून टाकण्यास सुरूवात केली होती. जानेवारी १९२२ पर्यंत जवळजवळ ३०,००० स्वातंत्र्यविरांना कैदेत टाकले गेले होते. चळवळ ऐन जोमात होती. गांधीजींनी पुढच्या टप्प्यात बोर्डोलीला सविनय कायदेभंग करणार असल्याचे गव्हर्नरला पत्राने कळविले होते. यासाठी ते बोर्डोलीलाही पोहोचले होते. तेव्हाच या अहिंसात्मक आंदोलनाला हिंसक वळण लागले. ५ फेब्रुवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील चौरीचौरा येथील शांततेने चाललेल्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. तेव्हा संतप्त झालेल्या जमावाने पोलीस कचेरीस आग लावली. यात २१ पोलीस व एक फौजदार मरण पावला या घटनेने दु:खित झालेल्या गांधीजींनी १२ फेब्रुवारी १९२२ ला असहकार चळवळ स्थगित करत असल्याचे कॉंग्रेस वर्किंग कमिटीत जाहीर केले. याला मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय इत्यादी नेत्यांनी विरोध केला. परंतु शेवटी गांधीजींचा निर्णय सर्वांनी स्वीकारला. १० मार्च १९२२ ला सरकारने गांधीजींना पकडून सहा वर्षाची कैदेची शिक्षा दिली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**अ. योग्य पर्याय निवडुन विधाने पुन्हा लिहा.**

१. महात्मा गांधीजींनी मांडलेला असहकार आंदोलनाचा प्रस्ताव ........... येथील खास कॉंग्रेस अधिवेशनात पास केला गेला.

अ) कलकत्ता ब) मुंबई क) मद्रास ड) दिल्ली

२. असहकार चळवळीत नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आपल्या ........... पदवीचा त्याग केला?

अ) महात्मा ब) नेताजी क) फिल्डमार्शल ड) आय.सी.एस.

३. असहकार चळवळीत मुंबईत .............. साली राष्ट्रीय महाविद्यालयाची स्थापना झाली.

अ) १९२० ब) १९२१ क) १९२२ ड) १९२३

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. टिळक स्वराज्य फंडासाठी किती रुपयांचा निधी जमविण्याचे ठरले?

२. असहकार चळवळीतील मुंबर्समध्ये परदेशी कपड्यांची होळी कोठे केली गेली?

३. महात्मा गांधीजींनी आपला खादीचा पंचा व धोतर हा देशी पेहराव परिधान करण्यस केव्हापासून सुरूवात केली.

### २.२.३ सविनय कायदेभंग चळवळ : विशेष संदर्भ सोलापुरातील उठाव

३१ डिसेंबर १९२९ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. यात प्रथमच 'संपूर्ण स्वराज्य' मिळविण्याचा ठराव पास केला गेला. २६ जानेवारी १९३० हा दिवस भारतीय स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्याचे ठरले. आपल्या मागणीची पूर्तता करवून घेण्यासाठी सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचे ठरविण्यात आले. पुढे १९ फेब्रुवारी १९३० ला महात्मा गांधीजींना काँग्रेस कार्यकारिणीने या चळवळीचे सर्वाधिकार दिले.

#### २.२.३.१ सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम :

महात्मा गांधीजींनी जनतेपुढे या चळवळीचा कार्यक्रम जाहीर केला तो पुढीलप्रमाणे -

१) मीठ व तत्सम अन्यायी कायद्यांचा भंग करणे.

२) शेतसारा व अन्य सरकारी कर न देणे.

३) परदेशी मालावर बहिष्कार टाकणे.

४) जंगल कायद्याचा भंग करणे.

५) निवडणुका, सरकारी कार्यालये, शाळा-महाविद्यालये, सरकारी नोकरी इत्यादीवर बहिष्कार टाकणे.

६) दारू व इतर मादक पदार्थांच्या दुकानासमोर आंदोलन करून ती बंद पाडणे.

#### २.२.३.२ महाराष्ट्रातील सविनय कायदेभंगाची चळवळ :

महात्मा गांधीजींनी ५ एप्रिल १९३० रोजी गुजरातमधील दांडी येथे मीठ उचलून अन्यायकारक अशा मिठाचा कायदा भंग करून सविनय कायदेभंग चळवळीचा शुभारंभ केला. जनतेत उत्साह संचारला. गांधीजींनी कायदेभंगाच्या कार्यक्रमाची आपापल्या परीने अंमलबजावणी करण्याचे जनतेला आवाहन केले. चळवळीची व्याप्ती वाढू लागल्यामुळे ब्रिटीश सरकारने गांधीजीना ५ मे १९३० ला कराची येथे अटक करून पुण्याच्या येरवडा जेलमध्ये ठेवले. गांधीजींच्या अटकेनंतरही चळवळीचा जोर कायम होता. महाराष्ट्रही यात आघाडीवर राहिला होता. महाराष्ट्रातील सविनय कायदेभंगाची चळवळ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येइल.

#### २.२.३.३ मीठाचा सत्याग्रह :

महाराष्ट्राला भरपूर समुद्रकिनारा लाभलेला आहे. येथेही अनेक ठिकाणी मीठ तयार केले जात होते. गांधीजींच्या दांडी येथील मीठ सत्याग्रहानंतर नाथ घाणेकर, बॅ. नरिमन, लक्ष्मणराव निफाडकर, आचार्य जावडेकर, शामराव पाटील, नानासाहेब देवगिरीकर, रावसाहेब पटवर्धन इत्यादी नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली

महाराष्ट्रात शिरोडा, वडाळा, चिंचणी, डहाणू, उंबरगाव आदी ठिकाणच्या समुद्रकिनाऱ्यावर मिठाचे सत्याग्रह झाले. तसेच अकोला जिल्ह्यातील दहिहंडा या गावी खाऱ्या पाण्याच्या विहिरी होत्या. बापूसाहेब सहस्त्रबुद्धेच्या नेतृत्वात तेथील विहिरीतून पाणी काढून त्यापासूनही मीठ बनवून कायदेभंग करण्यात आला.

ब्रिटिश सरकारने प्रचंड दडपशाही सुरू केली होती. तरीही प्रभातफेऱ्या, निदर्शने ही मुंबईत नित्याचीच बाब झाली होती. पुरुषांबरोबर प्रेमा कंटक, राधाबाई आपटे, पार्वतीबाई ठकार, अवंतीकाबाई गोखले, आनंदीबाई जोगळेकर इत्यादी स्त्रियांनी चळवळीत सहभाग गेतला होता. हिंदुस्थान सरकारचा मुंबई दौऱ्यावर आलला प्रतिनिधी एच. जी. हेंगने 'मुंबई' ही हिंदुस्थानातील सविनय कायदेभंगाची सर्वात मोठी रणभूमी आहे. असे मुंबईचा तत्कालीन गव्हर्नर आपल्याला सांगत असल्याचे हेगने आपल्या टिपणात नमूद केलेले आहे.

**२.२.३.४ जंगल सत्याग्रह :**

मीठाच्या सत्याग्रहात समुद्रकिनाऱ्या अभावी भाग घेऊ न शकलेल्या लोकांनी ब्रिटीशांविरोधी कायदेभंग करण्यासाठी जंगल सत्याग्रह सुरू केले. ९ मे १९३० ला 'महाराष्ट्र सविनय कायदेभंग कमिटीची' सभा विलेपार्ले येथे होवून नैसर्गिक जंगलांवर असणारे अन्यायी कायदे मोडून सत्याग्रह करण्याचे ठरविले गेले. जंगल सत्याग्रह समितीचे मुख्य कार्यालय अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर येथे करण्यात आले. लालाजी पेंडसे, रामकृष्ण महाराज, अच्युतराव पटवर्धन, श्रीपाद शंकर नवरे, डॉ. कृष्णराव अंत्रोलीकर आणि गोविंदराव देशपांडे या सहा सदस्यिय कमिटीने महाराष्ट्रातील जंगल सत्याग्रहाचे नियोजन केले.

समितीच्या मार्गदर्शनाखाली अहमदनगरमधील संगमनेर व अकोले तालुके, नाशिक जिल्ह्यातील बागलाण, सटाणा व कळवण तालुके आणि सातारा जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात सर्वसामान्य जनतेने या जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला. विशेत: सातारा जिल्ह्यातील बिळाशी येथील जंगल सत्याग्रह उल्लेखनीय ठरला होता. हा बिळाशीचे बंड म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. बिळाशीत तीस फूट उंचीच्या सागवाणी सोटावर तिरंगा झेंडा जनतेने फडकविला होता. पोलीसांनी तो झेंडा उतरविण्याचा प्रयत्न करताच शेकडो स्वातंत्र्यवीर त्यांच्या रक्षणासाठी धावले. ब्रिटीशांच्या लाठीहल्ल्याला न जुमानता राजूताई कदम या महिलेने त्या सागवानी सोटालाच मिठी मारली पण तिरंगा थेंडा उतरू दिला नाही. शेवटी पोलीसांनी तेथे बेछूट गोळीबार सुरू केला. यात सिताराम भाऊ चांभार व धोंडी संतू कुंभार हे तरूण मृत्यूमुखी पडले. तर अनेकजण जखमी झाले. हा सत्याग्रह कमालीचा यशस्वी झाला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीनिवास सरदेसाई, क्रांतिसिंह नाना पाटील, वामन जोशी, बापूजी अणे इत्यादीनी जंगल सत्याग्रहासाठी कारावास भोगला होता.

**२.२.३.५ हुतात्मा बाबु गेनू :**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात महाळुंगे पडवळ या गावचा रहिवाशी असलेला हुतात्मा बाबु गेनू आपल्या विधवा आई सोबत मुंबईत राहत होता. कायदेभंगाच्या चळवलीत परदेशी कापडावरील बहिष्काराच्या मोहिमेत तो आघाडीवर होता. १२ डिसेंबर १९३० रोजी मुंबईतील काळबादेवीच्या नवीन हनुमान रस्त्यावरुन परदेशी कपड्याने भरलेला ट्रक अडविण्यासाठी २० वर्षीय बाबू गेनू त्यांच्यासमोर रस्त्यावर आडवे पडले होते.

परंतू यांच्या प्रतिबंधाला न जुमानता तो ट्रक तसाच पुढे आला. बाबू गेनूही कायदेभंगाच्या आपल्या निर्णयावर ठाम राहिले. ड्रायव्हरने त्याच्या अंगावरून ट्रक पुढे नेला. यामध्ये बाबू गेनू हुतात्मा झाले. बाबू गेनूचे बलिदान अनेकांना प्रेरणा देणारे ठरले.

**२.२.३.६ सविनय कायदेभंग चळवळीचे दुसरे पर्व (१९३२–३४) :**

पहिल्या गोलमेज परिषदेच्या अपयशानंतर ब्रटीश सरकारने भारतीय नेत्यांची तुरुंगातून सुटका केली. व्हाईसराय आयर्विन व गांधीजी यांच्यात करार झाला. सवनय कायदेभंग आंदोलन तात्पुरते स्थगित करून गांधीजींनी वाटाघाटीसाठी दुसऱ्या गोलमेज परिषदेला लंडनला जाण्याचे मान्य केले. परंतू या परिषदेतून काहीच निष्कन्न झाले नाही. तेव्हा इंग्लंडहून परतल्यानंतर गांधीजींनी कायदेभंगाची चळवळ १९३२ मध्ये पुन्हा केली.

सरकारने या चळवळीची व्याप्ती वाढू नये म्हणून गांधीजीसहीत सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली. तरीही जनतेने प्रचंड आंदोलन उभारले. इंग्लंडचे पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांनी १६ ऑगस्ट १०३२ रोजी जातीय निवाड्याचा तोडगा काढून अस्पृश्य समाजाला वेगळा मतदारसंघ देण्याचे जाहीर केले. यामुळे हिंदू समाजात फूट पाडण्याचा सरकारचा असलेला कुटील हेतू लक्षात आल्यामुळे गांधीजींनी पुण्यात तुरुंगातच याविरोधात आमरण उपोषण सुरू केले. देशभर अस्वस्थता पसरली. तेव्हा अस्पृश्याचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गांधीजींची येरवडा येथील तुरुंगात भेट घेतली. गांधीजी व डॉ. आंबेडकर यांच्यात तुरुंगात करार होवून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघा ऐवजी राखीव जागा मान्य करण्यात आल्या. हा करार 'पुणे करार' म्हणून ओळखला जातो. सरकारनेही याला संमती दिली.

सरकारच्या दडपशाहीला जनता धैर्याने तोंड देवून आंदोलन करत होती. १९३३ पर्यंत सरकारने देशभरात ७५ हजार लोकांना तुरुंगात डांबले होते. यापैकी मुंबई इलाख्यातील १४,१०१ लोक होते. यावरून महाराष्ट्रातील कायदेभंगाची तीव्रता लक्षात येते. सरकार आता आपल्याला जास्तीचे काहीच देणार नाही. हे लक्षात आल्यामुळे जनतेची ताकद दुसऱ्या लढ्याला वाचविण्यासाठी गांधीजींनी १९३४ मध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ बंद केली. आपले सर्व लक्ष सामाजिक सुधारणा करून जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी केंद्रित केले.

**२.२.३.७ विशषे संदर्भ – सोलापूरातील उठाव :**

सविनय कायदेभंग चळवळीत महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात झालेले आंदोलन वैशिष्ट्यपूर्ण असे आहे.

**२.२.३.७.१ नगरपालिकेच्या इमारतीवर तिरंगा झेंडा :**

कायदेभंगाच्या चळवलीत सोलापूर शहराच्या नगरपालिकेच्या इमारतीवर देशप्रेमी नगरसेवकांनी ६ एप्रिल १९३० रोजी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रतिक असलेला तिरंगा ध्वज फडकाविला. तेव्हा ब्रिटीश अधिकारी पेज ने नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांना तिरंगा ध्वज काढण्यास सांगितला. परंतु नगराध्यक्षांनी नगरपालिकेच्या सदस्यांच्या संमतीशिवाय आपल्याला ध्वज उतरवता येणार नसल्याचे ठामपणे सांगितले. त्यामुळे कर्नल पेज

ने सैनिकांमार्फत ध्वज काढून माणिकचंद शहाना लष्करी न्यायालयापुढे उभे केले. तेथे त्यांना दहा वर्षे सक्तमजूरी व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली. पुढे ब्रिटिशांनी सोलापुरात झेंडा न फडकविण्याविषयी हुकूम काढला. पण हा बंदी हुकूम मोडून बार्शी, पंढरपूर, सांगोला इ. ठिकाणी तिरंगी झेंडे फडकाविण्यात आले. तेव्हा सरकारने प्रचंड दडपशाही करून हे आंदोलन मोडून काढले.

**२.२.३.७.२ सोलापूर लष्करी कायदा (मार्शल लॉ) लागु :**

सोलापूरमध्ये कापड गिरण्यांचे प्रमाण भरपूर होते. मुंबईतील कामगारांप्रमाणे येथील कामगारही देशप्रेमाने भारावलेले होते. गांधीजींना ४ मे १९३० ला झालेल्या अटकेच्या निषेधासाठी संपूर्ण जिल्हाभर हरताळ, मिरवणूका व सभाचे आयोजन केले गेले. ६ मे १९३० ला संपूर्ण गिरणी कामगारांनी संप पुकारला. या पार्श्वभूमीवर सोलापूरात लष्कर तैनात करण्यात आले. ७ मे ला जनतेची प्रचंड मिरवणूक निघाली. यामध्ये शहरातील दारूच्या दुकानांना आगी लावल्या गेल्या. परदेशी कापडांची रस्त्यावर होळी केली गेली. तिरंगी झेंडे फडकाविले गेले. तर ८ मे १९३० रोजी स्वातंत्र्यवीरांच्या एका समूहाने सोलापूर-तुळजापूर रस्त्यावरील मादक पदार्थांच्या निर्मितीत उपयोग असणारी ताडीची झाडे तोडण्यास सुरूवात केली. जिल्हाधिकारी हालने जनतेचा हा प्रयत्न हाणून पाडला. काही जणांना अटक केली. तेव्हा चिडलेल्या जमावाने पोलीसांवर दगडफेक केली. पोलीसांनीही याला प्रत्युत्तर म्हणून गोळीबार केला. यात शंकर शिवदारे हा स्वातंत्र्यसैनिक ठार झाला. जमाव फारच प्रक्षुब्ध झाला. पोलीसांना माघार घ्यावी लागली. जमावाने मंगळवार पेठेतील पोलीस चौकीवर हल्ला केला. यात दोन पोलीस कर्मचारी ठार झाले. पुढे जनतेने न्यायालयाची इमारत पेटवून दिली.

सरकारच्या दडपशाही विरोंधात विविध ठिकाणी सभा व मिरवणूकांचे आयोजन केले गेले. पोलीसांनी आंदोलकांवर प्रचंड गोळीबार केला. यात विविध ठिकाणी मिळून नऊ लोकांचा मृत्यू झाला. सोलापूर शहरातील परिस्थिती जास्तच स्फोटक बनली. तेव्हा मुंबई सरकारचे गृहमंत्री हॉटसन यांनी सोलापूर शहरात लष्करी कायदा म्हणजेच मार्शल लॉ लागू केल्याचे जाहीर केले. १२ मे च्या रात्री संपूर्ण शहराचा ताबा लष्कराने घेतला. कर्नल पेज यांनी लष्करी प्रशासक म्हणून नेमणूक झाली. हा लष्करी कायदा पुढे ४९ दिवस शहरात होता. याकाळात मार्शल लॉ तोडणे हाच कायदेभंग चळवळीचा प्रमुख भाग बनून राहिला.

**२.२.३.७.३ गांधी टोपीसाठी लढा :**

सोलापूर शहरातील मार्शल लॉ च्या ११ व्या अधिनियमानुसार तिरंगा झेंडा व अन्य राष्ट्रीय प्रतिके यांचा वापर करण्यास मनाई केली होती. तेव्हा कायदेभंग करण्यासाठी सोलापूरातील स्वातंत्र्यवीरांनी गांधी टोपी घालून आंदोलन करण्याचे ठरविले. सोलापूर काँग्रेस कमिटीचे चिटणीस तुळशीदास जाधव यांनी गांधी टोपी घालून प्रथम आंदोलन केले. लष्कराने गांधी टोपी काढून टाकण्यास सांगितले. परंतू त्यांनी नकार दिला. तेव्हा सैनिकांनी त्यांना बेदम मारहाण करून टोपी काढली. पुढे जाधवांना लष्करी न्यायालयापुढे उभे केले. त्यांना कारावासाची शिक्षा दिली गेली.

सोलापूर जनतेने गांधी टोपी घालून सरकारविरोधातील आपली नाराजी प्रकट करण्याची मोहिमच सुरू

केली. तेव्हा इंग्रजी सैनिकांनी टोकाला हुक बांधलेल्या लांब काठ्या जनतेच्या डोक्यावरील गांधी टोप्या काढण्यासाठी ठेवलेल्या होत्या. तरीही आंदोलक पहिली टोपी निघाली की, दुसरी घालून येवून आंदोलन करू लागले. ब्रिटनच्या संसदेतील मजूर पक्षाचे खासदार फेनर ब्रॉनवे हे भारतीय स्वातंत्र्य चळवलीचे पाठीराखे होते. त्यांनी स्वत: ब्रिटीश संसदेत प्रश्नोत्तराच्या वेळी गांधी टोपी घालून सोलापूरातील गांधी टोपी काढण्याचा सक्ती विषयी भारतमंत्री वेजबूड वेनना प्रश्न विचारला. यावरून सोलापुरातील गांधी टोपीसाठी जनतेने दिलेल्या लढ्याचे महत्त्व आधोरेखित होते.

### २.२.३.७.४ सोलापुरातील चार हुतात्मे :

सोलापूरात लष्करी कायद्याचा अंमल असतानाही जनतेने प्रचंड मोठे आंदोलन उभारले हाते. असे उठाव देशातील अन्य ठिकाणीहोऊ नयेत म्हणून सरकारने सोलापूरातील उठावाचे प्रमुख मल्लाप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, श्रीकृष्ण सारडा या चौघांना १२ जानेवारी १९३१ ला फासावर लटकविले. जनतेत दहशत निर्माण केली. कायदेभंगाच्या आंदोलनात संपूर्ण भारतात फक्त सोलापूरातच लष्करी कायदा पुकारावा लागला होता. यावरूनच या आंदोलनाची तीव्रता लक्षात येते.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडुन विधाने पुन्हा लिहा.**

१. 'मुंबई' ही हिंदुस्थानातील सविनय कायदेभंगाची सर्वात मोठी रणभूमी आहे. असे मुंबईचा तत्कालीन गव्हर्नर आपल्याला सांगत असल्याचे ............ ने म्हटले आहे.

अ) एच.जी. हेग  ब) लॉर्ड आयर्विन  क) जॉन सायमन  ड) रेम्स मॅकडोनाल्ड

२. महाराष्ट्र सविनय कायदेभंग कमिटीची स्थापना ............ साली झाली.

अ) ९ जून १९३०  ब) ९ मे १९३०  क) ९ मे १९३१  ड) ९ डिसेंबर १९३०

३. कायदेभंग चळवळीत बाबू गेनू ............ येथे शहीद झाले.

अ) कलकत्ता  ब) पुणे  क) मुंबई  ड) नागपूर

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सोलापूर शहराच्या नगरपालिकेवरील तिरंगा ध्वज कोणी उतरविला?

२. सोलापूर येथे मार्शल लॉ केव्हा पुकारण्यात आला?

३. ब्रिटीश संसदेत गांधी टोपी घालून भारतमंत्र्यांना कोणी प्रश्न विचारले?

## २.२.४ चले जाव किंवा छोडो भारत चळवळ : विशेष संदर्भ–सातारा प्रतिसरकार :

'भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा' शेवटचा टप्पा म्हणून १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाकडे पाहिले जाते. या आंदोलनात सामान्य जतेने असामान्य शौर्य दाखविले. सन १९४१ च्या मध्यामध्ये दुसरे जागतिक महायुद्ध

त्याच्या चरमसीमेला पोहोचले होते. जर्मनीने जूनमध्ये रशियावर आक्रमण केले, तर जपानने युद्धाची तयारी करून संपूर्ण दक्षिणपूर्व आशिया या अर्धा चीन आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. अशा विकट परिस्थितीत हिंदी जनतेचे सहकार्य मिळावे म्हणून इंग्लंडने जुलै, १९४२ मध्ये गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात व युद्ध सल्लागार मंडळात काही हिंदी लोकांच्या नेमणूका केल्या. तसेच हिंदुस्थानला युद्ध समाप्तीनंतर सवलती दिल्या जातील असेही जाहीर केले. तसेच सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळही भारतात पाठविले. पण क्रिप्स यांच्या शिष्टाईमुळे महात्मा गांधीजी व संपूर्ण जनतेची मोठी निराशा झाली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यासाठी एक मोठे आंदोलन उभारण्यास महात्मा गांधीजी तयार झाले. पुढे वर्धा येते कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली. यात 'जागतिक फॅसिझम संपविण्यासाठी आणि लोकशाही मूल्यांची पुर्नस्थापना करण्यासाठी हिंदुस्थानातून ब्रिटीशांनी आता चालते व्हावे' हा ठराव संमत करण्यात आला. हा 'छोडो भारत' ठरावाचा मूळ मसुदा होय.

### २.२.४.१ ८ ऑगस्ट १९४२ चा ठराव :

वर्ध्यातील कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या १४ जुलै १९४२ रोजीच्या ठरावाच्या पार्श्वभूमीवर होणारे मुंबई येथील अखिल भारतीय कॉंगेसचे अधिवेशन देशाचे भाग्य घडविणारे ठरले. या अतिमहत्त्वाच्या अधिवेशनास ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टॅंक मैदानावर प्रारंभ झाला. अधिवेशनास लाखोंच्या संख्येने देशाच्या कानाकोपऱ्यातून कॉंग्रेसचे कार्यकर्ते हजर होते. पंडित नेहरूंनी वर्धा येथील कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा 'चले जाव' ठराव मांडला. सरदार वल्लभभाई पटेलांनी त्याला अनुमोदन दिले.

८ ऑगस्टला दुपारी ठरावावर विस्तृत चर्चा होवून ऐतिहासिक 'चले जाव' ठराव प्रचंड बहुमतांनी मंजूर करण्यात आला. ठराव संमत झाल्यानंतर सायंकाळी गांधीजींनी अधिवेशनात आवेशपूर्ण भाषण सादर केले. त्यात ते म्हणतात, ''परकीय सत्तेपासून देश मुक्त करण्यासाठी अहिंसात्मक लढ्याची शिकवण मी देशाला दिली व स्वातंत्र्याची वाट पाहत राहिलो. पण आता माझे विचार बदलत चालले आहेत. मला आता फक्त स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यच हवे आहे. आणि ते सुद्धा लवकरात लवकर शक्य झाले तर अगदी आतासुद्धा मी आता फार काळ वाट पाहू शकत नाही. मी जर वाट पाहण्यास सुरू ठेवले तर जगाच्या अंतापर्यंत मला थांबावे लागेल. तोपर्यंत आम्ही भोवतालच्या आगीमध्ये नामशेष होवून जावू. म्हणून समोर धोका दिसत असतानाही मी सत्याग्रहींना गुलामगिरीचा प्रतिकार करण्यास सांगत आहे. याचा अर्थ कोणीही असा घेवू नये की, माझी अहिंसेवरील श्रद्धा कमी होत चाललेली आहे. सत्याग्रहीजवळ माझ्याविषयी अतिप्रेम किंवा अहिंसा कदाचित नसेलही. परंतु ती अहिंसा त्यांना यातून वाचवेल. मी तुम्हाला छोटासा मंत्र देतो, तुम्ही तो हृदयात ठसवा. तो मंत्र म्हणजे ''करू किंवा मरू'' तसेच सर्वांनी या क्षणापासून स्वत:ला स्वतंत्र समजून कृती करावी'' अशा प्रकारे कॉंग्रेसने राष्ट्रवादाचा पुरस्कार करून या अखेरच्यालढ्याचे रणशिंग फुंकले.

अधिवेशनाचे त्या दिवसाचे कामकाज रात्री १० वाजता समाप्त झाले. अधिवेशनासाठी मैदानात घातलेला मंडप रिकामा होवून जनता व कार्यकर्ते आपापल्या ठिकाणी पोहोचण्यापूर्वी सरकारने जलदगतीने कारवाई करून महात्मा गांधीजींसहीत सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली. तसेच देशातील सर्व प्रांतातील 'अ' वर्ग व 'ब' वर्ग

कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली. ९ ऑगस्टच्या पहाटेच मुंबईतील गोवालिक टँक परिसरात बंदी हुकूम जारी करून अचानकपणे काँग्रेसच्या हजारो कार्यकर्त्यांवर अमानुष लाठी हल्ला, अश्रूधूर याचा वापर करून अधिवेशन उधळून लावले. मुंबईवर प्रचंड दहशत बसविली. पोलीसांचा ससेमिरा चुकवत मिळेल त्या मार्गाने कार्यकर्ते आपापल्या भागाकडे रवाना होवू लागले.

**२.२.४.२ – १९४२ ची महाराष्ट्रातील चळवळ :**

१९४२ च्या या चळवळीत महाराष्ट्राने बहुमोल असे योगदान दिलेले आहे.

**२.२.४.२.१ मुंबईतील लढा :**

मुंबई येथील काँग्रेसच्या अधिवेशनातच महात्मा गांधीजींच्या उपस्थितीत छोडो भारताचा ठराव पास झाला. ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटे महात्मा गांधीजीसहीत प्रमुख वरिष्ठ काँग्रेस नेत्यांना अटक झाली. त्यामुळे या आंदोलनाचा मुंबईतच प्रथम भडका उडाला. ९ ऑगस्टला दिवसभर अश्रूधूर, लाठीहल्ला, गोळीबार व अटकसत्र मुंबईत सुरू होते. यामुळे अरुणा असफअली, अच्युतराव पटवर्धन, सानेगुरुजी, एम.एम. जोशी इ. नेते भूमिगत झाले. त्यांनी 'सेंट्रल डिरोक्टोरेट' ही भूमिगतांची मध्यवर्ती संघटना मुंबईत स्थापन केली. मुंबईतील लढ्याचे नियोजन यामार्फत केले जावू लागले. मुंबईतील ९ ऑगस्टला झालेले आंदोलन दडपताना पोलीसांनी विविध ठिकाणी केलेल्या गोळीबारात ८ जण मृत्यूमुखी पडले तर ४ जण जखमी झाले.

२७ ऑगस्ट १९४२ ते १२ नोव्हेंबर १९४३ पर्यंत मुंबर्सत उषा मेहता, नानक मोटवानी, बाबूभाई खाकर इ. नी राममनोहर लोहियांच्या मार्गदर्शनाखाली 'काँगेस रेडिओची' स्थापना केली. यातून चळवळीची वाटचाल व काँग्रेसची ध्येय धोरणे सांगून चळवळ जोमाने चालविली गेली. जनतेत कमालीचे चैतन्य पसरले होते. सरकारच्या ससेमिऱ्यामुळे या रेडिओ केंद्राचे ठिकाण सतत बदलले जाईल. शेवटी प्रयत्नांची पराकाष्ठा करून या रेडिओ स्टेशनला सकारने बंद पाडले. यातील सहभागी लोकांवर खटले भरले.

**२.२.४.२.२ पुणेतील चळवळ :**

केशवराव जेधे, धनंजयराव गाडगीळ, शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली पुण्यातील चले जावची चळवळ चालविली गेली. सरकारने त्यांना अटक करताच पुणे शहर व परिसरात संतापाची तीव्र लाट आली. मिरवणूका काढून निषेध व्यक्त केला जावूलागला. तेव्हा सरकारने दडपशाही सुरू केली. पोलीसांच्या गोळीबारात नारायण दाभाडे व मथुराबाई मार्टेसह सात जण मृत्यूमुखी पडले.

**२.२.४.२.३ खानदेशातील आंदोलन :**

साने गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली खानदेशातील भूमिगत लढे चालविले गेले. मधू लिमयेंच्या नेतृत्वात खानदेशातील रेल्वेचे रूळ उखडून टाकले गेले. ९ सप्टेंबर १९४२ ला नंदूरबार शहरातून विद्यार्थ्यांनी इंग्रज सरकारचा निषेध करण्यासाठी प्रचंड मिरवणूक काढली. यावर पोलीसांनी गोळीबार केला. यामध्ये शिरीषकुमार सहित सात विद्यार्थी मृत्यूमुखी पडले.

अमळनेर येथे डॉ. उत्तमराव पाटील व त्यांच्या पत्नी लिलाताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरकारचा निषेध करण्यासाठी मोर्चा काढला गेला. मोर्चाने टपाल कचेरी, न्यायालय व रेल्वे स्टेशन पेटवून दिले. तेव्हा सरकारने गोळीबार केला. यात महादेवभाई देसाई ठार झाले. तर उत्तमराव पाटील व लिलाताई पाटील यांसहीत अनेकांना पकडून जेलमध्ये टाकले गेले.

**२.२.४.२.४ विदर्भातील उठाव :**

मदनलाल बागडी यांनी १९३९ मध्ये लाल सेनेची स्थापना करून जनतेत जागृती निर्माण केली होती. ९ ऑगस्ट १९४२ ला लाल सेनेने चिटणीस पार्कमध्ये जाहीर सभा घेतली होती. यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वत: रचलेली राष्ट्रभक्तीपर गीते गावून जनतेच्या राष्ट्रप्रेमाला उधाण आणले होते. अशातच पोलीसांनी लाठीहल्ला सुरू करून तुकडोजी महाराजांना अटक करून सभा उधळून लावली. तेव्हा बागडींच्या नेतृत्वाखाली लाल सेनेने नवावपुरा, इतवारी, बजारिया, मोमीनपुरा आदि पोलीस ठाण्यांवर हल्ला करून ती पेटवून दिली. १० ऑगस्टला नागपूरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. चले जाव चळवळीने उग्र रूप धारण केले. २८ ऑगस्ट १९४२ पर्यंत नागपूरात १,०८८ लोकांना अटक करण्यात आली. तर विविध ठिकाणी केलेल्या गोळीबारात ६४ जण मृत्यूमुखी पडले तर १०२ जण जखमी झाले होते.

**२.२.४.२.५ अष्टीचा लढा :**

१६ ऑगस्ट १९४२ मध्ये अष्टी या गावातील ३००० लोकांनी तेथील पोलीस ठाण्यावर हल्ला केला. यामध्ये पोलीस उपनिरीक्षकासह पाच पोलीस ठार झाले. तर ७ स्वातंत्र्यवीरही मारले गेले. त्यानंतर पोस्ट ऑफीस व विश्रामगृहालाही आग लावली गेली. सरकारने तत्परतेने पावले उचलून अनेकांना अटक करून कठोर शिक्षा दिल्या. यामध्ये १० जणांना फाशी, ५४ जणांना जन्मठेप व १६ जणांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा केल्या गेल्या. तर आष्टीच्या ग्रामस्थांकडून ५०,०००/- रुपये सामूदायिक दंड सक्तीने वसूल केला गेला.

**२.२.४.२.६ चिमूरची चळवळ :**

चंद्रपूर जिल्ह्यातील चिरमूर या गावी उद्धव कोरेकर यांनी सरकारला जनतेने कर देवू नये म्हणून जागृती केली. त्यामुळे जनतेने कर वसूलीला आलेल्या सब डिव्हीजनल ऑफीसर, नायब तहसिलदार, परिमंडल निरीक्षक व एक शिपाई यांच्यावर दगड व काठ्यांच्या मदतीने हल्ला करून त्यांना ठार मारले. त्यानंतर जनतेने चिमूरमधील सरकारी दवाखाना वगळता उर्वरित सर्व सरकारी इमारतींना आगी लावल्या. तेव्हा सरकारने लष्कर पाठवून प्रचंड दडपशाही करून हे आंदोलन मोडले.

**२.२.४.२.७ कोल्हापूरमधील लढा :**

कोल्हापूर संस्थानातील गारगोटी येथे भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांनी पोलीस ठाण्यातील शस्त्रागार लुटले. तुरुंगातील राजकैद्यांची सुटका केली. तसेच रत्नाप्पा कुंभार यांनी आपल्या १३ साक्षीदारांसह २७ जुलै १९४४ ला जेजूरीच्या श्री खंडेरायाचा खजिना लुटला. या खजिन्याचा वापर स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामी करून देशाला स्वातंत्र्य मिळताच उरलेला खजिना व दागदागिणे खंडेरायाच्या मूर्तीवर पुन्हा चढविण्याचे ठरविले.

### २.२.४.२.८ विशेष संदर्भ – सातारा प्रतिसरकार :

१९४२ च्या चळवळीत भागलपूर, बलिया, मिदनापूर व सातारा या ठिकाणी प्रतिसरकारे स्थापन झाली होती. सातारा येथील प्रतिसरकार वगळता इतर ठिकाणची प्रतिसरकारे फारशी प्रभावी नव्हती. साताऱ्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले प्रतिसरकार हे स्वातंत्र्यप्रेमी जनतेने स्वाभिमानाचे रक्षण करण्यासाठी केलेला स्वयंस्फूर्त उठाव होता. हिंसक कारवायांनी समाजकंटकांना दहशत बसविणे हे या सरकारचे धोरण होते.

### २.२.४.२.८.१ सातारा जिल्ह्यातील आंदोलन :

सातारा जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते ऑगस्ट १९४२ च्या मुंबई येथील काँग्रेसच्या अधिवेशनासाठी गेलेले होते. सरकारच्या अटकसत्रातून वाचून मिळेल त्या वाहनाने बरीच मंडळी साताऱ्यात परतली. आपापल्या भागात येताच त्यांनी प्रभातफेऱ्या, हरताळ, सभा घेून इंग्रजांविरोधी लढ्याचे रणशिंग फुंकले. सरकारच्या दहशतीचा निषेध करण्यासाठी २४ ऑगस्ट १९४२ ला कराड तहसिल कचेरीवरील काढलेला अहिंसात्मक मोर्चा यशस्वी झाला. पाठोपाठ पाटण व तासगांवचाही मोर्चा यशस्वी झाला. परंतू त्यानंतरील वडूज व इस्लामपूर येथील शांततापूर्ण मोर्चावर पोलीसांनी गोळीबार केला. त्यामध्ये ११ आंदोलक हुतात्मे झाले. सरकार आपली अहिंसात्मक आंदोलने बळाने दडपणार हे दिसताच जिल्ह्यातील लोकांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली भूमिगत लढा सुरू केला.

सातारा जिल्ह्यातील भूमिगतांनी सरकारच्या प्रतिकांवर व सामर्थ्यस्थळांवर हल्ले चढवले. टेलिफोन, टेलिग्राफच्या तारा व खांब पाडून सरकारची संदेशवहन यंत्रणा कोलमडून टाकली होती. रेल्वे स्टेशने चाळली होती. तसेच दळणवळणाला अडथळा करण्याचा घातपाती कार्यक्रम पहिल्यांदाच यशस्वीपणे अंमलात आणला. १९४२ मध्ये एकूण ४६ वेळा जिल्ह्यात विविध ठिकाणी रेल्वेचे रूळ उकडून टाकून घातपात करण्यात आला. परंतू या प्रत्येक घातपाती कार्यक्रमात अगदी नियोजनपूर्वक फक्त मालगाड्याच पाडल्या गेल्या. यात एकाही व्यक्तीचा मृत्यू झाला नाही किंवा कोणताही भूमिगत पकडला गेला नाही. ब्रिटीश सरकार हतबल झाले होते. यावरून सातारच्या भूमिगतांनी नियोजनपूर्वक केलेल्या घातपाती कृत्यांचे महत्त्व लक्षात येते.

### २.२.४.२.८.२ सातारा प्रतिसरकारची स्थापना :

फेब्रुवारी १९४३ मध्ये महात्मा गांधीजींच्या उपोषणानंतर साताऱ्यातील भूमिगत आंदोलनात शिथीलता आलेली होती. तेव्हा मार्च १९४३ मध्ये नाना पाटील यांनी कुंडल येथे भूमिगतांची सभा घेवून, 'पोलीसांच्या हातून मरण्यापेक्षा इंग्रजांशी लढत लढतच मरू' हा विचार सांगून प्रतिसरकारची कल्पना प्रथम मांडली होती. यासाठी शस्त्रसज्ज सेना उभारण्यासाठी त्यांनी जी. डी. लाड व नागनाथ नायकवडी यांची नियुक्ती करून त्यांना दीड महिन्याचा अवधी दिला होता.

पुढे १ जून १९४३ रोजी कामेरी, ता. वाळवा येथे सातारा जिल्ह्यातील प्रमूख भूमिगतांची बैठक एका उसाच्या मळ्यात झाली. बैठकीला क्रांतिसिंह नाना पाटील, पांडू तात्या बोराटे, बर्डे मास्तर, नागनाथ नाईकवडी,

जी. डी. लाड, भिकू नाना साळुंखे, बाबुजी पाटणकर, शेख काका, के. डी. पाटील, शंकरराव निकम इ. प्रमुख भूमिगत हजर होते. या बैठकीत ब्रिटीशांविरोधी लढण्यासाठी प्रतिसरकारची स्थापना करण्याचे सर्वानुमते ठरले.

**२.२.४.२.८.३ प्रतिसरकारची कार्यकारिणी :**

प्रतिसरकारच्या ३ ऑगस्ट १९४३ रोजी पणुंब्रे येथील बैठकीत आंदोलन निर्धाराने सुरू ठेवण्याचे ठरविले गेले. तसेच औंध संस्थानच्या धर्तीवर प्रतिसरकारची घटना निर्माण करण्याचेही ठरले आणि सातारा प्रतिसरकारची कार्यकारिणीही तयार केली. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची प्रमूख म्हणून नियुक्ती केली गेली. डिक्टेटटर म्हणून के. डी. पाटील यांना निवडले गेले. तर क्रांतिवीर नाथाजी लाड व क्रांतिवीर डी. जी. देशपाडे यांना संघटक म्हणून नेमले गेले. तसेच सातारा जिल्ह्याचे अठरा विभागात विभाजन करून त्यांचे विभाग नायक व उपनायकही जाहीर केले.

या कार्यकारिणीत संपूर्ण चळवळ होईपर्यंत फारसा बदल झाला नाही. डिक्टेटर के. डी. पाटील यांच्या अटकेनंतर कासेगांवकर वैद्य सप्टेंबर १९४३ ला डिक्टेटर झाले. तर फेब्रुवारी १९४४ ला नाथाजी लाड व फेब्रुवारी १९४५ ला किसन वीर डिक्टेटर झाले. प्रतिसरकार अस्तित्वात असेपर्यंत थोड्याफार फरकाने हीच स्थिती कायम होती.

कार्यकारिणीने भूमिगतांच्या ऐक्याची व निर्धाराची कसोटी म्हणून जिल्ह्यात एकाच वेळी टेलिफोन आणि टेलिग्राफच्या तारा तोडण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे २० ऑगस्ट १९४३ रोजी नीरा ते वारणा नदी दरम्यानचे जवळजवळ २००० डांब व त्यावरील तारा तोडून सर्व संदेशवहन यंत्रणा बंद पाडली. जिल्ह्यात आठ दिवस सर्व सरकारी व्यवहार बंद होते. प्रतिसरकारच्या या कारवाईमुळे ब्रिटीश सरकारही हतबल झाले.

**२२.४.२.८.४ प्रतिसरकारची रचना :**

सातारा प्रतिसरकार हे ब्रिटीश विरोधी लढा चालू ठेवण्याच्या प्रयत्नातून स्थापन झाले होते. भूमिगतांची सर्वसाधारण बैठक ही या प्रतिसरकारची सर्वोच्च संस्था होती. या बैठकांत चर्चा होवून प्रतिसरकारचे कायदे व नियम बनत असत. प्रतिसरकार हे एक युद्धकाळातील सरकार असल्यामुळे त्याचा कार्यालयीन व्याप कमी होता. थोड्या भूमिगतांनी स्वेच्छेने कार्यालयीन कामकाज पाहिले. प्रतिसरकारची रचना ही साधी व सुटसुटीत होती. प्रामुख्याने तीन भागात प्रतिसरकारची रचना केलेली होती. ते तीन भाग पुढीलप्रमाणे –

१) तुफान सेना

२) ग्रामराज्य / लोकराज्य

३) न्यायव्यवस्था

**१) तुफान सेवा :**

तुफान सेना हे सातारा प्रतिसरकारचे अत्यंत महत्त्वाचे व जबाबदार असे खाते होते. कोणत्याही सरकारला अंतर्गत सुरक्षा व कार्यक्षम कारभारासाठी स्वत:चे पोलीस, सैनिक असणे गरजेचे होते. या गरजेतूनच तुफान सेनेची

निर्मिती झाली. याचे उत्तरदायीत्व नाना पाटील यांचेकडे होते. तर या विभागाची सर्व जबाबदारी जी. डी. लाड यांचेवर होती. तुफान सेनेतील सहभागी तरूणांना कुंडल येथे प्रशिक्षण दिले जाईल. शंभर युवक गटागटाने तलवार, काठी, बंदूक, पिस्तुल इ. च्या वापराचे प्रशिक्षण घेत असत. या केंद्रातून प्रशिक्षण घून बाहेर पडणारे तरूण आपापल्या गावी जावून इतर स्वयंसेवकांना प्रशिक्षित करीत.

तुफान सेनेमार्फत अंतर्गत सुरक्षा सुरक्षितपणे पाहिली जाई. जिल्ह्यातील दरोडेखोर, सरकार, सरकारचे खबरे यांचा बंदोबस्त सेनेमार्फत केला गेला. गावागावातील भांडणे मिटविणे, अमली पदार्थांचा व्यापार बंद पाडणे, स्त्रीयांना संरक्षण देणे, गावगुंडांचा बंदोबस्त करणे आदी कामेही तुफान सेनेमार्फत केली गेली.

तुफान सेनेत कॅ. लिलाताई पाटील यांच्या नेतृत्वात महिला विभागही स्थापन झाला होता. त्यामध्ये विठाबाई पवार, इंदूमती पाटणकर, कोंडाबाई इ. महिलांचा समावेश होता. या महिलांनी अनेक धाडसी कामात सहभाग घेतला होता.

**२) ग्रामराज्य / लोकराज्य :**

महात्मा गांधीजींना अभिप्रेत असणारी ग्रामराज्ये ही क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारची मध्यवर्ती प्रेरणा होती. सर्वसामान्य जनतेवरील अन्याय दूर करून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी साताऱ्यात ग्रामराज्याची स्थापना झाली होती. प्रतिसरकारच्या घटनेप्रमाणे राष्ट्रसेवा दलाचे हजारो स्वयंसेवकांच्या मदतीने न्यायदान कमिट्या न्याय देण्याचे काम करत. तुफान सेनेने गुंड व दरोडेखोरांचा बंदोबस्त करून जनतेला अभय दिले होते. स्त्रियांवर अन्याय करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिल्या. ग्रामसफाई, दारूबंदी, गांधी लग्न पद्धती, खादी प्रसार, साक्षरता प्रसार, हुंडाबंदी, अस्पृश्यता निवारण इ. १४ कलमी विधायक कार्यक्रम राबविला गेला.

**३) न्यायव्यवस्था :**

जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सातारा प्रतिसरकारमध्ये स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था निर्माण केली गेली होती. या न्यायमंडळाची रचना चार स्तरीय होती.

अ) गावातील न्यायदान मंडळ

ब) गट न्यायमंडळ

क) जनता कोर्ट किंवा फिरते न्यायमंडळ

ड) सर्वोच्च न्यायमंडळ

सातारा जिल्ह्याचे दोन भाग करून दक्षिण भागाच्या न्यायदान मंडळासाठी बापूराव लाड व उत्तर भागाच्या न्यायदान मंडळासाठी बापूराव घोरपडे यांनी प्रमूख न्यायाधिश म्हणून काम पाहिले. या न्यायदान मंडळामार्फत जमिनी संबंधीचे वाद, चोऱ्या, मारामाऱ्या, बलात्काराचे गुन्हे, बायकांना न नांदविणे इत्यादी बाबत न्यायदान केले जाई. या न्यायालयात अर्ज करण्यासाठी प्रत्येक आठ आणे म्हणजेच पन्नास पैसे एवढी फी होती. प्रत्येक न्यायमंडळातील पंच एकत्र बसून बहुमताने न्यायनिवाडा करत असत. तसेच या न्यायालयातील खटल्यांचे निकाल

जलद गतीने दिले जात. त्यामुळे जनतेचा त्रास कमी होवून ही न्यायालये जनतेत प्रिय झाली होती.

**२.२.४.२.८.५ प्रतिसरकारचे कार्य :**

संपूर्ण देशातील आंदोलन थंडावत असताना सातारा जिल्ह्यात महात्मा गांधीजींच्या 'करा किंवा मरा' या मंत्राने क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारची स्थापना झाली. हे प्रतिसरकार 'जशास तसे' या न्यायाने वागत होते. ब्रिटीश सरकारच्या दडपशाहीविरोधात सशस्त्र लढ्याचा मार्ग त्यांनी स्विकारला होता. कोण्याही लढ्याच्या यशस्वीतेसाठी भक्कम आर्थिक पाठबळाची गरज असते. याची कल्पना साताऱ्यातील भूमिगतांना होती. परंतू युद्धसदृश्य परिस्थितीत प्रतिसरकारचे आर्थिक नियोजन शिस्तबद्ध व कायदेबद्द करणे शक्यच नव्हते. म्हणून त्यांनी ब्रिटीश सरकारने भारतीय जनतेकडून कररुपाने वसूल केलेला पैसाच लुटून आपल्या कार्यासाठी वापरण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी सातारा जिल्ह्यातून रेल्वे कामगारांचा पगार घेून जाणारी पे-स्पेशल ट्रेन जून १९४३ मध्ये लुटली. पुढील काळात एप्रिल १९४४ मध्ये धुळेचा खजिना लुटला. तसेच जनतेकडूनही उत्स्फुर्तपणे मदत मिळत असे. यातून प्रतिसरकारचे कार्य सुलभतेने चालविले गेले.

या सातारा प्रतिसरकारच्या माध्यमातून गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी ग्रामराज्यांची स्थापना केली होती. दारूबंदी, साक्षरता प्रसार, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव व हक्काची बाजारपेठ, ग्रामस्वच्छता, जुगारबंदी, अस्पृश्यता निवारण, हुंडाबंदी इ. १४ कलमी विधायक कार्यक्रम राबवून जनतेचे हित साधण्याचा प्रयत्न केला. पोलीस खबरे, गावगुंड, दरोडेखोर यांचा बंदोबसत करून जनतेला भयमुक्त केले. ७ सप्टेंबर १९४३ मध्ये देवराष्ट्रे येथील मारुती पाटील या पोलीस पाटील व खबऱ्यास पहिली पत्री मारून ब्रिटीश धार्जिन्या लोकांवर वचक बसविला.

प्रतिसरकारने स्वत:ची घटना बनवून लोकप्रिय शासन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आपल्या मर्यादा ओळखून भूमिगतांनी सातारा प्रतिसरकारचे कार्य केले. हे सरकार ब्रिटीशांना संपविता आले नाही. पुढे ते भारत स्वतंत्र झाल्यावर भारतात समाविष्ट झाले. १९४२ च्या लढ्यातील रोमहर्षक पर्व म्हणून या सातारा प्रतिसरकारकडे पाहिले जाते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ४**

**अ) योग्य पर्याय निवडुन विधाने पुन्हा लिहा.**

१. चले जाव आंदोलनाचा ठराव ............. यांनी मांडला.

अ) महात्मा गांधी ब) पं. नेहरू क) सरदार पटेल ड) विनोबा भावे

२. सातारा प्रतिसरकारची स्थापना .......... साली झाली.

अ) १ मे १९४३ ब) १ मे १९४४ क) १ जून १९४३ ड) १ जुलै १९४३

३. जेजूरीच्या खंडेरायाचा खजिना ........... यांनी लुटला

अ) रत्नाप्पा कुंभार ब) नाथाजी लाड क) जी. डी. लाड ड) नागनाथ नायकवडी

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. काँगेस रेडिओची स्थापना कोठे झाली होती?

२. विदर्भात लाल सेनेची स्थापना कोणी केली ?

३. धुळे खजिन्याची लूट केव्हा झाली.

## २.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्नंची उत्तरे –१**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** | १) वासुदेव बळवंत फडके | २) मित्रमेळा, | ३) १९ एप्रल १९१० |
| **ब)** | १) पुणे | २) पॅरिस | ३) लाहोर |

**स्वयं अध्ययन प्रश्नंची उत्तरे –२**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** | १) कलकत्ता | २) आय.सी.एस. | ३) १९२१ |
| **ब)** | १) १ कोटी | २) एलफिन्स्टन मिल | ३) असहकार चळवळ |

**स्वयं अध्ययन प्रश्नंची उत्तरे –३**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** | १) एच. जी. हेग | २) ९ मे १९३० | ३) मुंबई |
| **ब)** | १) कर्नल पेज | २) १२ मे १९३० | ३) फेन ब्रानवे |

**स्वयं अध्ययन प्रश्नंची उत्तरे –४**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** | १) पं. नेहरू | २) १ जून १९४३ | ३) रत्नाप्पा कुंभार |
| **ब)** | १) मुंबई | २) मदनलाल बागडी | ३) एप्रिल १९४४ |

## २.४ सारांश :

व्यापार करण्यासाठी आलेल्या ब्रटीशांनी हिंदुस्थानातील अस्थिरतेचा फायदा घेवून आपली राजकीय सत्ता स्थापन केली. आपल्या हुशारीने इंग्रजांनी एकेक करून सर्व भारतीय सत्तांचा शेवट केला व ते हिंदुस्थानचे मालक बनले. प्रारंभी भारतीयांनी इंग्रजांचे स्वागतच केले. परंतू कालांतराने ब्रिटीश सत्तेचे साम्राज्यवादी स्वरूप व धोरण लक्षात आल्यानंतर भारतीयांनी त्यांना विरोध सुरू केला. स्थानिक पातळीवरील विरोध ब्रिटीशांनी मोडून टाकले. पुढे १८५७ ला संपूर्ण देशव्यापी असा सशस्त्र उठाव झाला. ब्रिटीशांनी अतिशय निष्ठूरपणे हा उठाव दडपून टाकला. पण स्वातत्र्य मिळविण्याची भारतीयांची उर्मी यामुळे नष्ट झाली नाही.

१८५७ नंतर सशस्त्र मार्गाने होणारे उठाव कमी झाले. तरी काही अतिजहाल तरुणांनी क्रांतिकारी मार्ग अवलंबिला वासुदेव बळवंत फडके यांनी महाराष्ट्रातूनच याची सुरूवात केली. त्यांना आद्य क्रांतिकारक मानले

जाते. पुढील काळात चाफेकर बंधू, वि. दा. सावरकर, सेनापती बापट, राजगुरु इत्यादींनी क्रांतिकारक चळवळीत मोलाचे योगदान देवून महाराष्ट्राला या लढ्यातही पुढे ठेवले होते.

सशस्त्र उठावाद्वारे बलाढ्य इंग्रजांविरोधी लढणे अवघड आहे. हे जाणल्यामुळे बहुसंख्य सुशिक्षित तरूणांनी सनदशीर मार्गाचा स्वीकार करून लढा उभारला. यातूनच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. सुरूवातीच्या काळात मवाळ व जहाल मार्गाने ब्रिटीश विरोधी चळवळी उभारल्या गेल्या. १९२० मध्ये भारतीय राजकीय क्षितिजावर महात्मा गांधीजींचा उदय झाला. याला गांधीयुग असे म्हणतात. यामध्ये असहकार, सविनय कायदेभंग व चलेजाव चळवळ गतिमान होवून खेडोपाड्यात पोहोचली. सर्वसामान्य जनताही यात बहुसंख्येने सामिल झाली.

या गाधीयुगात महाराष्ट्रही अग्रेसर होता. असहकार आंदोलनातील परदेशी कपड्यांची होळी असो की, टिळक स्वराज्य फंडासाठी रक्कम गोळा करणे असो महाराष्ट्रातील जनता सक्रियपणे यात सामील होती. पुढे सविनय कायदेभंगाच्या चळवळीत संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलने उभी राहिली. यात साताऱ्यातील बिळाशीचा सत्याग्रह व सोलापूरचा मॉर्शल लॉ या घटना विशेष उल्लेखनीय होत्या. १९४२ च्या चलेजाव आंदोलनात संपूर्ण देशातील आंदोलन थंडावत असताना मुंबई व उर्वरित महाराष्ट्रात ही चळवळ जोमाने चालविली गेली. विशेषत: सातारा जल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्थापन केलेले प्रतिसरकार हे रोमहर्षक व अभूतपूर्व असे पर्व होते. भारतीय जनतेने चालविलेल्या स्वातंत्र्यचळवळीचा परिपाक म्हणून १५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. यामध्ये महाराष्ट्राचे बहुमोल असे योगदान आहे.

## २.५ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीचा आढावा घ्या?

२. महाराष्ट्रातील असहकार चळवळीविषयी चर्चा करा?

३. महाराष्ट्रातील सविनय कायदेभंग चळवळ स्पष्ट करा?

४. सविनय कायदेभंग आंदोलनातील मार्शल लॉ चा आढावा घ्या?

५. १९४२ ची चळवळ आणि महाराष्ट्र याविषयी चर्चा करा.

६. सातारा प्रतिसरकारचे कार्य विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

१. वासुदेव बळवंत फडके

२. वि. दा. सावरकर

३. राजगुरु

४. मीठाचा सत्याग्रह

५. टिळक स्वराज्य फंड

६. जंगल सत्याग्रह

७. बाबू गेनू

८. चिमूरचा लढा

९. लाल सेना

१०. तुफान सेना

११. ग्रामराज्य

## २.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ.


१. V. D. Mahajan, Modern Indian History, S. Chnd Publication, New Delhi.

२. फडके य.दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, अकंड ४, (१९३०-३९), के सागर प्रकाशन पुणे.

३. डॉ. कोलारकर श.ग., आधुनिक भारत (१७६० ते १९५०), मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. विबिन चंद्र, मॉडर्न इंडिया (मराठी अनुवाद) डॉ. काळे एम. व्ही., के सागर पब्लिकेशन, पुणे.

५. डॉ. ग्रोवर बी. एल व डॉ. वेल्हेकर एन. के., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चन्द आणि कंपनी लि., रामनगर, दिल्ली.

६. डॉ. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, प्रसंग आणि व्यक्ती, उषा प्रकाशन, कोल्हापूर.

७. डॉ. सुमित यादव, क्रांतिसिंह नाना पाटील जीवन व कार्य (१९०० ते १९७६), सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा.


❖❖❖

## घटक – ३

# सामाजिक चळवळी

## (Social Movements)

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ शेतकरी व कामगार चळवळ

 ३.२.२ स्त्री हक्काच्या चळवळी

 ३.२.३ मागासवर्गीयांच्या उन्नतीच्या चळवळी

३.३ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.४ सारांश

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


**३.० उद्दिष्ट्ये :**

या घटकातून आपल्याला खालील बाबी लक्षात येतील.

१. महाराष्ट्रातील शेतकरी व कामगार चळवळीची माहिती प्राप्त करून घेता येईल.

२. महाराष्ट्रातील स्त्री हक्काच्या चळवळीची माहिती घेता येईल.

३. महाराष्ट्रातील मागासवर्गीयांच्या उन्नतीच्या चळवळीची माहिती करून घेता येईल.

**३.१ प्रस्तावना :**

संपूर्ण भारतामध्ये कमी-अधिक प्रमाणात सर्व समाजामध्ये विविध प्रकारच्या चळवळी उदयाला आल्या. महाराष्ट्राच्या दृष्टीने विचार करता सरंजामशाही काळापासून सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक तसेच राजकीय हेतूने प्रेरित अशा अनेक चळवळी घडून आल्या आहेत. चळवळी ह्या कधी संघटनात्मक तर काही असंघटनात्मक स्वरूपाच्या घडत असतात. सर्व माणसे समान आहेत. सर्वांना सारख्या प्रमाणात जीवन

जगण्याचा मुक्तपणे संचार करण्याचा अधिकार आहे. अशी नैसर्गिक स्थिती अताना जेव्हा एक व्यक्ती व समूहाद्वारे दुसरी व्यक्ती वा समूहांना सारख्या प्रमाणात जगण्याचे अधिकार हिरावून घेतले जातात. तेव्हा व्यक्ती अथवा समूह चळवळी करतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चळवळी, कामगारांच्या चळवळी, स्त्रीयांच्या चळवळी व मगासर्वीयांच्या उन्नतीच्या चळवळीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ शेतकरी व कामगार चळवळ :

**अ) शेतकऱ्यांच्या चळवळी :**

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा इतिहास पाहिल्यास त्याची वैचारिक पार्श्वभूमी इ.स. १८८३ साली महात्मा फुले यांच्या विचारात आढळते. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसुड' या पुस्तकात शेतकऱ्यांची अवनति आणि सावकार, जमिनदार यांच्याकडून होणारे अमानुष शोषण याचे चित्र पहायला मिळते. कर्जातच जन्मणाऱ्या, जगणाऱ्या आणि मरणाऱ्या शेतकऱ्याची स्थिती सुधारण्यासाठी वैज्ञानिक आणि तांत्रिक आधार देऊन त्याचा विचार करण्याची कल्पना म. फुले यांनी मांडली. म. फुले यांच्या नंतर वासुदेव बळवंत फडके यांनी शेतकऱ्यांना आपल्या शोषणाच्या विरोधात बंड करण्यास प्रवृत्त केले. त्यानंतरच्या काळात डाव्या पक्षानी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. तसेच १९५१ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. यामध्ये शेती विकासाला प्राधान्य देण्यात आले. इ.स. १९५२ मध्ये सर्वांगीण ग्रामीण विकासासाठी सामूहिक विकास योजना सुरू झाल्या आणि शेतकऱ्यांना शेती, जोडधंदा आणि इतर संलग्न प्रश्न यांच्यासाठी सर्व मदत साधने आणि सल्ला देण्याची सुरूवात झाली. लहान धरणे, बंधारे यांच्याद्वारे पाणी पुरवठा होऊ लागला. तसेच सिंचनासाठी डिझेल व विजेवर चालणारे पंप पुरविण्यात आले. शेतकऱ्यांच्यासाठी सहकारी तत्वावर पतपुरवठा आणि ग्रामीण खरेदी-विक्री संस्थाही सुरू करण्यात आल्या. मात्र असे असले तरी निवडक सधन शेतकरी सोडल्यास इतर शेतकऱ्यांच्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारपणाही कमी झाला नाही. परिणामत: शेतकऱ्यांच्या स्थितीत फारसा बदल घडून आलेला दिसून येत नाही.

- **शेतकरी चळवळीची पार्श्वूमी / कारणे :**

**१) ब्रिटीशांकडून होणारी आर्थिक पिळवणूक :**

ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी व व्यापारी हे देशातील शेतकरी व मजूर तसेच जनतेची आर्थिक पिळवणूक करत. भारतीय लोकांकडून कमीतकमी किंमतीमध्ये माल घेत असत व युरोपातून येणारा माल भारतात जास्त किंमतीला विकत असत. अशाप्रकारे देशातील आर्थिक लुट करून संपूर्ण संपत्ती ही इंग्लंडमध्ये घेवून जाऊ लागले. त्याचबरोबर ब्रिटीशांनी महसूल वसूलीसाठी रयतवारी, महालवारी पद्धती लागू केली. जास्तीत जास्त कर वसुली हे त्यांचे धोरण होते. शेतातील उत्पन्नाचा अधिक अधिक भाग हा शेतसारा म्हणून सरकारकडे जाऊ

लागल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होवू लागले. लोकसंख्या वाढीमुळे कुटुंबातील अनेक सदस्यांत शेतीची वाटणी झाली. शेतीचे अशाप्रकारे लहान-लहान भाग झाल्याने मालकांना वर्षभर पुरेल एवढे धान्य शेतीतून मिळणे कठीण झाले. अशातच ब्रिटीशांनी करवसुलीसाठी कठोर उपाययोजना केली. यामुळेशेतकरी सावकाराकडे वळला. अगोदरच सरकारी कर व नंतर सावकाराचे कर्ज यामुळे तो आणखीनच कर्जामध्ये बुडाला.

**२) शेतकऱ्यांमधील जागृती :**

ब्रिटीशांच्या काळात भारतात काही सामाजिक सुधारणा झाल्या. दळणवळणाची साधने निर्माण झाली. चलन व्यवस्था अस्तित्वात आली. या काळात शेतकऱ्यांना अन्य प्रांतात घडणाऱ्या घडामोडीचे ज्ञान मिळू लागले. त्यामुळे शेतकऱ्यांच्यामध्ये जागृती निर्माण झाली. याचा परिणाम १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात देशाच्या विविध भागात शेतकरी चळवळीने आकार घ्यायला सुरवात केली.

**३) शेतीच्या व्यापारीकरणाचा परिणाम :**

ब्रिटीश काळात भारतात शेतीच्या व्यापारीकरणाला सुरूवात झाली. शेतीमधुन पैसा मिळवून देणारी ऊस, कापूस, ज्यूट, नीळ, गहू इत्यादी पिके घेण्यास सुरूवात झाली. शेतकऱ्यांना बंगाल, बिहारमध्ये तांदूळ उत्पादन करण्याऐवजी निळीचे उत्पादन करण्याची सक्ती करण्यात आली. त्याचबरोबर चहा, साखर, ताग व अफु अशा उत्पादनाचीही सक्ती करण्यात आली. याप्रकारच्या व्यापारीकरणामुळे ब्रिटीशांना अधिक नफा मिळू लागला. परंतु शेतकऱ्यांच्यावरती फार मोठे दूरगामी परिणाम घडून आले.

**४) शेतकऱ्यांचे विविध उठाव :**

ब्रिटीशांच्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी खालावत गेली व त्यांचे सामाजिक जीवन हालाकीचे झाले. यामुळे शेतकरी वर्गात असंतोष पसरत गेला. त्यामधूनच १८६० मध्ये बंगाल मधील शेतकऱ्यांचा उठाव, १८६६ मध्ये बिहारमधील दरभंगा व चंपारण्यामधील उठाव, १८७० मध्ये बंगालमधील कुळांनी केलेला उठाव, १८७४ व १८७९ या काळात पुणे व अहमदनगर प्रदेशातील लोकांनी केलेले उठाव हे शेतकऱ्यांची चळवळ निर्माण होण्यास कारणीभूत ठरले आणि यातूनच पुढे शेतकऱ्यांची चळवळ सुरू झाली.

- **महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ :**

**१) सन १८५७ चा शेतकऱ्यांचा उठाव किंवा दख्खनचे दंगे :**

सन १८५७ ते १८७७ च्या दरम्यान महाराष्ट्रातील पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांचे जे मोठे बंड झाले त्याचा 'दख्खनचे दंगे' म्हणून ब्रिटीशांच्या कागदोपत्री उल्लेख आढळतो. या बंडाचे लोंढा महाराष्ट्रातील इतरही जिल्ह्यात व देशाच्या अनेक भागात पसरले. तरी पण अहमदनगर व पुणे जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या उठावाणे उग्र स्वरूप धारण केले होते.

या काळात वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी अधिकाधिक उग्र रूप धारण केले होते. त्यातच लोभी राज्यकर्ते आणि दुसरीकडे निष्ठूर सावकार यांच्या कैचीत सापडलेल्या व चिडलेल्या शेतकऱ्यांनी नगर, पुणे व सोलापूर

इत्यादी जिल्ह्यांत सावकाराकडे आपला मोहरा वळविला. बंडाची पहिली ठिणगी शिरूर तालुक्यात पडली. शिरूर तालुक्यातील करडे गावात काळूराम नावाचा एक जुलमी सावकार होता. त्याने बाबासाहेब देशमुख या शेतकऱ्याविरुद्ध कोर्टातून हुकूमनामा मिळवून त्यांच्या वाड्याचा लिलाव केला. तो लिलाव काळूराम सावकारने १५० रुपयाला घेतला. बाबासाहेबांनी विनंती करूनही सावकाराने वाडा पाडण्यास सुरूवात केली. या लहानशा घटनेतूनच दख्खनच्या शेतकऱ्यांच्या बंडाची ठिणगी पडली. सावकार व सरकार या दोघांनी संगनमताने ही लुट चालवलेने पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील घटनेची प्रतिक्रिया म्हणून ९ सप्टेंबर १८७५ रोजी पहिला संघर्ष झाला. यामध्ये सावकारांच्या घरावर हल्लेकरून आपली शेतीवाडी, जमीन जुमल्याची गहाण खते, कागदपत्रे काढून सार्वजनिक ठिकाणी जाळायची, परंतु माणसांना अजिबात इजा करावयाची नाही असे या उठावाचे स्वरूप होते. शेतकऱ्यांनी सावकाराकडील करारपत्रे एकत्र करून जाळली. परंतु शेतकऱ्यांच्या उठावाचे स्वरूप पाहता सरकारने कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली हालचाली सुरू केल्या. सरकारने मोठ्या प्रमाणावर पोलीस पथके व लष्कर पाठवून शेतकऱ्यांची धरपकड सुरू केली व हे आदोलन मोडून काढले. या उठावात सहभागी असणाऱ्या ५५९ लोकांविरुद्ध खटले भरण्यात आले. या उठावामुळे खेड्यामध्ये पूर्वी सहसा न दिसलेली एकी दिसून आली. उठावानंतर सरकारने दंगलीची चौकशी करण्यासाठी 'डेक्कन रायट्स कमिशन' नेमले. या कमिशनने उठावाची चौकशी करून काही शिफारशी सरकारला सुचवल्या. त्यासाठी सरकारने ''दि डेक्कन ॲग्रीकल्चरिस्ट रिलिफ ॲक्ट'' सन १८७९ ला पास केला. या कायद्याने शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठीच्या उपाययोजना सुचवल्या होत्या. अशाप्रकारे आपल्यावरील सरकार व सावकार यांच्याकडून होणारा अन्याय दूर करण्यासाठी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी संघटीतपणे केलेली ही देशातील पहिली चळवळ होती.

● **महात्मा फुले व शेतकरी चळवळ (१८२७-१८९०)**

'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथामध्ये शेतकऱ्यांची दयनीय स्थिती मांडण्याचे सर्वप्रथम काम महात्मा फुले यांनी केले. शेतकऱ्यांची नोकरशाही व सावकारशाही यांच्याकडून कशाप्रकारे आडवणूक व शोषण होते याची मांडणी केली. त्याचबरोबर 'दीन बंधू' या वृत्तपत्राच्या लिखानामधून ब्रिटीशांचे राज्य आलेने लाखो शेतकरी बेकार झाले व त्याचा बोजा शेतीवर पडला. याचा हिशोब मांडून शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडली.

महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातील चौथ्या प्रकरणामध्ये शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, अन्न, वस्त्र, घरे, दागिणे, लग्नातील पदार्थ इत्यादीचे निवेचन केले. १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती हालाखीची झाली. त्यामध्ये सुधारणा होण्यासाठी महात्मा फुले यांनी महाराष्ट्र व्यापी चळवळ सुरू केली. ही चळवळ खतफोडीचे बंड म्हणून ओळखली जाते. सावकारी फसवणूक व शेतकऱ्यांचे दारिद्र्य याबद्दल फुले यांचे म्हणणे मान्य करून ब्रिटीश शासनाने शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज मिळवून देणारा कायदा केला. इ.स. १८८८ मध्ये पुणे येथे इंग्लंडचा ड्यूक ऑफ कॅनाट आला होता. त्याच्या समारंभामध्ये महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या वेशात उपस्थित राहून त्याला शेतकऱ्यांच्या स्थितीविषयक निवेदन दिले. व्हिक्टोरिया राणीला शेतकऱ्यांच्या सुधारणा करण्याविषयी निवेदनात विनंती करण्यात आली. त्वाचबरोबर

पाटीलकीसाठी किमान सातवी पास ही अट ठेवण्यात यावी म्हणजे पाटीलकीच्या आशेने शेतकरी आपल्या मुलांना शिकवतील असेही सुचवले. अशा प्रकारे म. फुले यांनी शेतकरी चळवळीत आपले योगदान दिले.

**● विठ्ठल रामजी शिंदे व शेतकरी चळवळ (१८७३-१९४४) :**

विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुणे येथे १९२८ साली शेतकरी परिषद भरवून शेतकऱ्यांची बिकट अवस्था दूर करणे, शासकीय नोकर व सावकार यांच्याकडून होणारी त्यांची अडवणूक थांबवण्यासाठी आवाज उठवला. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून आपल्या भाषणातून त्यांनी १९२७ मध्ये मुंबई कायदेमंडळात गृहराज्यमंत्र्याने मांडलेल्या तुकडेबंदी व सारा वाढीसंबंधीच्या विधेयकास विरोध केला. कष्टाळू शेतकऱ्यांची स्थिती सुधारली नाही. तर सत्याग्रह करावा लागेल असा इशारा शासनास दिला. त्याचबरोबर त्यांनी मुंबई, तेरदल, बोरगाव, चांदवड व नगर जिल्ह्यात दोन शेतकऱ्यांच्या परिषदा भरविल्या. त्यांनी विविध शेतकरी परिषदाचे अध्यक्षपद भूषविले. त्या परिषदा पुढीलप्रमाणे -

१) संस्थानी शेतकरी परिषद, तेरदल (दक्षिण कोकण) ३ जून १९३२

२) शेतकरी परिषद बोरगांव, ता. वाळवा, जि.सातारा - ६ जून १९३२

३) चांदवड तालुका शेतकरी परिषद, वडनेर - १९ सप्टेंबर १९३१

त्यांनी शेतकऱ्यांच्या विषयी मांडलेले विचार पुढीलप्रमाणे -

१) तुकडेबंदीच्या विधेयकामुळे शेतकरी लहान-लहान जमिनीच्या तुकड्यास मुकतील, त्यांच्या जवळ पैसा राहणार नाही.

२) शेतकऱ्यांना अमेरिकन शेतकऱ्यांप्रमाणे आपल्या शेतमालाची किंमत ठरविता आली पाहिजे.

३) अमेरिकन शेतकरी, कुणबी, भांडवलदार व जमिनदार आहेत त्याचा आदर्श घ्यावा.

अशा पद्धतीने विठ्ठल रमाजी शिंदे यांनी शेतकरी चळवळीत आपले योगदान दिले.

**● मुळशी सत्याग्रह :**

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील मुळशी पेट्यात मुळा व मुठा नद्यांच्या संगमावर धरण बांधून जल विद्यूत निर्मिती करण्याची महत्त्वकांक्षी योजना टाटा कंपनीने हाती घेतली. मुळशी धरणाखाली ५४ गावांतील जमिनी पाण्याखाली जाणार होत्या आणि हजारो लोकांना त्याचे परिणाम भोगावे लागणार होते. १९१९ च्या जून मध्ये सरकारने भूसंपादन कायद्यातील चौथ्या कलमानुसार शेतकऱ्यांना नोटीसा दिल्या. परंतु शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सरकारला देण्याचे नाकारले. आवळस व मुळशी या गावी २६ व २७ डिसेंबर १९१९ रोजी शेतकऱ्यांनी सभा घेतल्या व एक मंडळ स्थापन केले. या मंडळाचे चिटणीस आप्पासाहेब गद्रे यांनी जिल्हाधिकारी, गव्हर्नर व मुख्य सचिव यांच्या भेटी घेतल्या. परंतु अर्ज, विनंत्याचे, भेटी गाठीचे प्रयत्न निष्फळ ठरले. १९२० नंतर देशभर सत्याग्रहाचे वारे वाहू लागले. मुळशी धरणाला विरोध करण्यासाठी सत्याग्रहाची भाषा

बोलली जाऊ लागली. त्यामध्ये सेनापती बापट, भुस्कुटे, केळकर यांनी सत्याग्रह करण्याचे ठरवले व त्यांनी शेतकऱ्यांसह सत्याग्रह केला. १६ एप्रिल १९२१ रोजी बापट स्वत: रेल्वे रुळावर आडवे झाले. कंपनीने बापट व त्यांच्या सहकाऱ्यांसह खटले भरले. २० ऑक्टोबर १९२१ रोजी ६ महिने कैद व १०० रु. दंडाची शिक्षा ठोठावली व त्यांना येरवडा कारागृहात डांबले. बापट सजा भोगून आल्यानंतर मुळशी सत्याग्रहाचे नेतृत्व पुन्ह त्यांच्याकडे आले व त्यांना 'सेनापती' हे बिरूद देण्यात आले. अशाप्रकारे सेनापती बापट यांनी मुळशी धरणामुळे विस्थापितांसाठी कार्य केले. धरणामुळे विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांनी केलेले हे देशातील पहिले आंदोलन ठरले.

● **काँग्रेसच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळ :**

प्रारंभीच्या काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे काँग्रेसने फारसे गांभीर्याने पाहिले नाही. परंतु सन १९१५ नंतर महात्मा गांधीजींचा भारतीय राजकारणात प्रवेश झाल्यानंतर देशव्यापी चळवळ चालविण्याच्या भूमिकेतून त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न उचलून धरले. गांधीनी चंपारण्य, खेडा व बार्डोली या तीन ठिकाणी शेतकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व व मार्गदर्शन केले.

● **शेतकऱ्यांचे जंगल सत्यागृह :**

सन १८६६ च्या कायद्याने जंगलाबाबत अनेक जाचक निर्बंध लादण्यात आले होते. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांवर गदा आली होती. महात्मा गांधींनी कायदेभंगाची चळवळ हाती घेतली. २२ जुलै १९३० रोजी संगमणेर तालुक्यात एक लाख लोकांनी तर नाशिकच्या बागलाण तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी जंगमल सत्याग्रह केला व जंगलाचे कायदे मोडले. या सत्याग्रहाचे नेतृत्व काँग्रेस नेत्यंनी केले. बागलाण शिवाय सटाणा, कळवण या तालुक्यातही सत्याग्रह झाले. वनचराईसाठी लादलेले कर लोकांच्याकडून वसूल करणेही सरकारी नोकरांना अवघड झाले. अशा प्रकारे जंगल सत्याग्रहात हजारो शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. तसा यापूर्वीच्या चळवळीत कधीही घेतला नव्हता.

● **तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक :**

मुंबई कायदेमंडळात इ.स. १९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या गृहमंत्र्याने तुकडेबंदी व सारावाढीचे एक विधेयक मांडले. हे विधेयक पास झाल्यास लहान शेतकऱ्यांना जमिनीस मुकावे लागत होते. तसेच शेतसाराही वाढणार होता. त्यामुळे केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांनी शेतकऱ्यांच्या सभा घेवून या विधेयकाला विरोध केला. २५ जुलै १९२८ रोजी पुणे येथे त्यांनी मुंबई इलाखा शेतकरी परिषद घेतली. या परिषदेत ८००० शेतकरी हजर होते. तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक सरकारणे पास करू नये असा ठराव या परिषदेत घेण्यात आला. ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांनी 'मुंबई इलाखा ब्राह्मणेतर शेतकरी संघ' ही संघटना स्थापन केली. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे आणि त्यांना जागृत करणे ही या संघटनेची उद्दिष्ट्ये होती. मुंबई प्रांतात इ.स. १९२० ते १९२१ च्या दरम्यान काँग्रेस व ब्राह्मणेतर चळवळीतील कर्मचाऱ्यांनी शेतकरी चळवळी केल्या.

● **फैजपूर काँग्रेस आणि शेतकऱ्यांचे प्रश्न :**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली जळगांव जिल्ह्यातील फैजपूर येथे डिसेंबर १९३६ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन घेण्यात आले. हे पहिलेस ग्रामीण अधिवेशन होते. याच अधिवेशनात अखिल भारतीय किसान सभेचे दुसरे अधिवेशन घेण्यात आले. या किसान सभेचे अध्यक्ष एन. जी. रंगा हे होते. मनमाडपासून फैजपूरपर्यंत २०० मैलांची पदयात्रा किसानांनी काढली होती. आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना नेहरूंनी वर्ग संघर्षाऐवजी समाजवादी तत्वप्रणालीवर श्रद्धा व्यक्त केली. या अधिवेशनात शेतकऱ्यांसंदर्भात पुढील ठराव पास करण्यात आले.

१) काँग्रेस अंतर्गत शेतकरी व मजूरांच्या संघटना स्थापन कराव्यात.

२) जमीन महसूल पन्नास टक्के कमी करावा.

३) जमिनीचा खंड पन्नास टक्के कमी करावा.

४) शेतकऱ्यांची कर्ज वसुली थांबवावी.

५) शेतमजूरांना योग्य प्रमाणात वेतन द्यावे.

६) शेतकऱ्यंना सवलतीच्या दराने कर्ज द्यावे.

७) शेतीचा विकास व उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करावी.

● **साने गुरुजी व शेतकरी चळवळ :**

साने गुरुजींनी खानदेशामध्ये शेतकऱ्यांचे संघटन करण्यासाठी अनेक ठिकाणी दौरे केले. इ.स. १९३९ मध्ये पुर्ण खानदेशात अतिवृष्टी झाल्याने अनेक पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे साने गुरुजींनी जळगावच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करावा अशी मागणी केली. त्यांनी या मोर्चामध्ये स्वत: लिहिलेली स्फूर्तीगीते गायली. त्याच बरोबर त्यांनी कामगारांनाही न्याय मिळवून देण्यासाठी परिश्रम घेतले.

● **शेतकरी कामगार पक्ष आणि शेतकरी चळवळ :**

मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांचा कारभार शेतकरी व कामगार वर्गाच्या विरोधी आणि भांडवलशाही दार्जिणा आहे असे शंकरराव मारे आणि केशवराव जेधे यांना वाटत होते. इ.स. १९४६ मध्ये केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, के.डी. पाटील, नाना पाटील, दत्ता देशमुख, यशवंतराव चव्हाण, पी. के. सावंत, आचार्य प्र. के. अत्रे, रामभाऊ नलवडे, तुळशीदास जाधव, डॉ. केशवराव शंकरराव धोंगडे व गुरुनाथराव कुरुडे यांनी काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन केला. पण अशाप्रकारचा काँग्रेस अंतर्गत उपपक्ष असू नये अशी भूमिका अखिल भारतीय रशष्ट्रीय काँग्रेस कार्यकारीणीने घेतल्यामुळे वरील मंडळीनी २६ एप्रिल १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला. या पक्षाचे पहिले अधिवेशन सोलापूर येथे झाले.

शेकापच्या विकासासाठी शंकरराव मोरे, नाना पाटील, तुळशीदास जाधव, केशवराव जेधे, डॉ. केशवराव धोंडगे आणि गुरुनाथराव कुरूडे यांनी फार प्रयत्न केले. या पक्षाचे 'जनसत्ता' हे मुखपत्र होते. नाशिक जिल्ह्यातील दाभाडी येथे इ.स. १९५० मध्ये पक्षाचे दुसरे अधिवेशन भरले. या अधिवेशनात पक्षाने दाभाडी प्रबंध स्वीकारला. यात पक्षाची ध्येय धोरण मांडले आहे. पुढे पक्षाच्या जेष्ठ नेत्यांमध्ये वैचारिक मतभेद होवून केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव आणि खाडिलकर पक्षातून बाहेर पडले व कॉंग्रेसमध्ये गेले. प्रारंभीच्या काळात १९५२ आणि १९५७ च्या निवडणुकामध्ये पक्षाला चांगले यश मिळाले. या पक्षाने विधानसभा आणि विधानसभे बाहेर देखील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये लेव्ही पद्धत, धान्य नियंत्रण पद्धतीवर टिका करून कुळांना संरक्षण देण्याची मागणी केली. शेतीमालास योग्य भाव, रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकार योजना इत्यादीचा समावेश होतो. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे व त्यांचे कल्याण करणे हे या पक्षाचे मुख्य काम होते ते या पक्षाने करण्याचा प्रयत्न केला.

**ब) कामगार चळवळ :**

कामगार चळवळ युरोप खंडात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाली. १९ व्या शतकात ती वाढली आणि २० व्या शतकात ती जगभर पसरली. औद्योगिक क्रांतीने कामगार वर्ग निर्माण केला व त्याच बरोबर कामगारांना विपन्नावस्थेत ठेवणारी एक समाजव्यवस्था प्रस्तापित केली. कामगार चळवळ जन्माला आली ती या समाज व्यवस्थेला विरोध करण्यासाठी व तिच्या जागी समतेची व संपन्नतेची नवी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी.

भारतात साधारणत: १९ व्या शतकाच्या शेवटी कामगार चळवळीस सुरूवात झाली. त्याचे श्रेय मुंबईतील थोर कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांना जाते. त्या काळातील भारतीय कामगार अशिक्षित व अडाणी होते. संघटना बनविणे ही गोष्ट त्यांना परिचित नव्हती. त्यामुळे कामगारांना संघटना स्थापन करणे यासाठी त्यांना इतरावर अवलंबून राहवे लागत असे. अशा अनेक अडचणीतून भारतात कामगार संघटनाची वाटचाल सुरू झाली हीच परिस्थिती महाराष्ट्रातही होती.

- **कामगार चळवळीच्या उदयाची कारणे :**

**१) उद्योगधंद्यांचा विकास व कामगारांच्या संख्येत वाढ :**

ब्रिटनच्या स्वार्थी औद्योगीक धोरणामुळे भारतात विविध प्रकारचे उद्योगधंदे उदयास आले व विकास पावले. भारतात सुती वस्त्र उद्योग, लोखंड, कोळसा, साखर, कागद, सिमेंट, कातडी, काच, रसायन आणि मशीन औजार उद्योगाचा विकास भरपूर प्रमाणात झाला. इ.स. १८५१ ते इ.स. १८५४ मुंबई व अहमदाबाद या ठिकाणी सुती उद्योगांचा विकास झाला. मुंबई, अहमदाबाद व कानपूर ही सुती उध्योगाची प्रमुख केंदे बनली. विदेशी वस्तुवर बहिष्कार व स्वदेशी वस्तुंचा वापर यामुळे सुती वस्त्रोद्योगाचा विकास होत गेला. रेल्वेच्या निर्मितीबरोबरच कोळशाला मागणी वाढली. त्यामुळे मध्यप्रदेश व राणीगंज आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशातील खाणीची संख्या वाढली. लोखंड, पोलाद, साखर, कातडी उद्योगांचाही विकास झाला. १८६९ मध्ये

सरकारने चाकड्याचा कारखाना काढला. इ.स. १९१३ मध्ये टाटानगर येथे लोखंड व पोलादाचा कारखाना उघडण्यात आला. पहिल्या महायुद्धाच्या काळात विविध गरजांच्या पुर्तीसाठी अनेक प्रकारच्या उद्योगाचा विकास झाला. जसजसा उद्योगांचा विकास झाला त्याच बरोबर कामगारांच्या संख्येत वाढ होत गेली. कामगारांना अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या आणि त्यातूनच कामगार चळवळीचा उदय झाला.

**२) कामगारांच्या समस्या :**

भारतात उद्योगधंद्यांचा विकास होत गेला आणि त्याच बरोबर कामगारांच्या समस्याही वाढत गेल्या. कामगारांना मिळणारे वेतन, कामाची वेळ, कामाच्या ठिकाणची स्वच्छता, आरोग्याच्या समस्या, आवश्यक सेवा, सुविधांचा अभाव, व्यवस्थापक व कारखानादाराकडून होणारे अन्याय, अत्याचार, भरती प्रक्रिया, अधिकाऱ्यांची मनमानी अशा प्रकारच्या समस्यांचा सामना कामगारांना करावा लागत असे इत्यादी समस्या सोडविण्यासाठी कामगार संघटना व चळवळीची आवश्यकता होती.

**● बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन :**

‘बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनची स्थापना मुंबईतील गिरणी मालकांनी केली. फॅक्टरी ॲक्ट लागू होणार या भितीतून ही संघटना निर्माण करण्यात आली. यामध्ये कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष करून कारखानदाराच्या हिताला महत्व देण्यात आले. त्यामुळे कामगार आपले प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करू लागले.

**● कामगारांसाठी पहिले फॅक्टरी कमिशन (कामगार आयोग) :**

इ.स. १८७५ मध्ये वस्त्र उद्योगाच्या मालकीच्या विनंतीवरून सरकारने पहिला आयोग नियुक्त केला. याचे अध्यक्ष मुंबईचे जिल्हाधिकारी अर्बुभ नॉट होते. त्यातील बरेचशे सदस्य हे गिरणी मालकच होते. या कमिशनने आपला अहवाल सादर केला. त्यामुळे कामगार आपल्या प्रश्नाबाबत जागृत झाले.

**● फॅक्टरी ॲक्टने कामगार चळवळी सुरू होण्यास मदत :**

कामगार उध्योगांच्या शिफारशीवरून सरकारने १८८१ मध्ये फॅक्टरी ॲक्ट पास केला. या ॲक्टनुसार ७ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांना कामावर घेऊ नये. बालकांना ९ तासांपेक्षा काम देवू नये. धोकादायक यंत्राच्या भोवती तारेचे कुंपन असावे, निरीक्षकांची नियुक्ती करावी. अशाप्रकारच्या तरतुदी होत्या. तसेच स्त्रियांचे कामाचे ११ तास असावेत, आठवड्यातून एक दिवस सुट्टी, गिरणीमध्ये स्वच्छता, प्रकाश हवा असावी, पाणी पुरवठा असावा. या शिफारशी १८८१ च्या नवीन फॅक्टरी ॲक्टमध्ये पास करण्यात आल्या. यामुळे कामगार चळवळीला पोषक वातावरण तयार झाले.

**● वृत्तपत्रे आणि इतर व्यक्ती व संघटनांचे कार्य :**

गिरणी कामगारांच्या प्रश्नांमध्ये अनेक विचारवंत, पत्रकार, समाजसेवक लक्ष घालू लागले. अर्ज, विनंत्या देवू लागले. नेटिव्ह ओपिनियन, राफ्त गोफ्तर, इंदुप्रकाश, दीन बंधू, सुबोध पत्रिका इत्यादी वृत्तपत्रांनी गिरणी कामगारांच्या प्रश्नाविषयी लेखन केले. त्यामुळे कामगार संघटीत होऊ लागले. त्याची सुरूवात नारायण मेघाजी

लोखंडे यांनी १८९० मध्ये केली. त्याचबरोबर १९०७ मुंबईतील पोस्ट कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी 'द बॉम्बे पोस्टल युनियन' स्थापन केली. यासह अशा अनेक संघटना स्थापन होवू लागल्या. यामधूनच कामगार चळवळ निर्माण होण्यास मदत झाली.

**● महाराष्ट्रातील कामगार चळवळ :**

भारतीय कामगार जगतात मुंबई नगरीतील परिवर्तनाचा वाटा महत्त्वाचा आहे. यासाठी १८७५ मध्ये मुंबई नगरीने पहिला सामान्य व असंघटित प्रयत्न केला. सोराबजींच्या नेतृत्वाखाली कायदा व्हावा म्हणून आवाज उठविण्यात आला. कामगारांना संघटित करून पहिला संघटनात्मक प्रयत्न १८९० मध्ये मुंबई येथून नारायण मेघाजी लोखंड यांनी केला. 'बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन'च्या उभारणीमुळे ही चळवळ जन्मास आली. मनोहर कदम यांनी लिहिलेल्या 'नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र' या ग्रंथात प्रो. दिनेश चक्रवर्तींनी लिहिले आहे की, एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी २० वर्षात भारतात कामगार चळवळीस सुरूवात झाली. १८९० साली कामगार वर्गामध्ये खऱ्या अर्थाने जाणीव निर्माण झाली. यावेळी भारतीय कामगार अशिक्षित व अडाणी होते. त्यांच्यात जातिभेद व भाषाभेद होता. गावातून जावून राहणारे हे नवखे कामगार होते. त्यांना इंग्रजी येत नव्हते. संघटन बनविण्याचे तंत्र त्यांना अवगत नव्हते. आपली नेमकी भूमिका काय आहे हे ही माहित नव्हते. कामगार विश्वाबाहेरचे (आऊट साईडर्स) म्हणजे डॉक्टर, वकील व राजकीय पुढारी त्यांचे संघ बनवून जबाबदारी घेत. म्हणून त्यांना 'आऊट साइडर्स' नाव पडले. तरी कामगारांसाठी ते बाहेरचे नसायचे. ते काम संघ कायद्यान्वये सन्मान्य सभासद म्हणून निवडून येत.

**अ) नारायण मेघाजी लोखंडे :**

ब्रिटिश काळामध्ये झालेल्या मुंबईच्या औद्योगिक विकासामुळे महाराष्ट्रातील मुंबई प्रांतात कामगार चळवळीने मूळ धरले. या चळवळीला आकार देण्यात नारायण मेघाजी लोखंडे सर्वात आघाडीवर होते. महाराष्ट्राप्रमाणेच देशभरातील चळवळींतही त्यांचे नाव या चळवळीच्या उभारणीसाठी अग्रदूत म्हणून घेतले जाते. त्यांचे पुळ गांव पुणे जिल्ह्यातील कन्हेरसर (तालुका खेड) हे होते. त्यांचा जन्म १८४८ मध्ये ठाणे येथे झाला. तेथेच ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. १८९० पर्यंत रेल्वे लोकामोटिव्ह खात्यात कारकून व नंतर पोस्ट विभागात त्यांनी नोकरी केली.

सुरूवातीच्या काळात १८७० पासूनच नारायण लोखंडे यांनी बहुजन समाजाचे अज्ञान, चालीरीती, शिक्षणाची आवश्यकता याविषयी स्फूट लेखन केले. पूर्वीची नोकरी सोडून ते मांडवीच्या मिलमध्ये स्टोअरकिपर बनले. ब्राह्मणेतरांचे प्रथम वृत्तपत्र (१८७७) 'दीनबंधू'चे ते संपादक होते. या मिलच्या नोकरीद्वारे त्यांना कामगारांचे जीवन जवळून पाहण्याची व अनुभवण्याची संधी मिळाली. त्यावेळी कावसजी दावर यांची १८५४ पासून चालणारी पहिली कापड गिरणी मुंबईत होती. नंतर या गिरण्यांची संख्या सतत वाढत गेली. मुंबईच्या कापड गिरण्यांचा कारभार पाहण्यात मॅनेजिंग एजन्टस्ना महत्त्व होते. मॅनेजर दैनंदिन कामकाज व व्यवस्थापन सांभाळत. विविध खात्यांचे मास्टर्स व असिस्टंट कार्डिंग, विव्हिंग आणि स्पिनिंगची कामे पाहत. त्यांच्या हाताखाली जॉबर्स व सुपरवायझर्स असत. त्यांचा कामगारांशी संपर्क असे. गिरणीत नोकरी मिळवून देणारा

‘जॉबर’ हा महत्त्वाचा घयक असून त्या कामासाठी तो ‘बक्षीस किंवा दस्तुरी’ घेत असे. दोन ते पाच रुपये इतकी रक्कम स्त्री–पुरुष त्यास देत. हा प्रकार चांगला नव्हता. तो बंद करण्याचे प्रयत्न ‘बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन’ने केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. १९३३ मध्ये ते थांबले. पण तोपर्यंत ‘जॉबर्स’ हे कामगारांचे शोषण करतच होते. नवी गिरणी निघाली की अशिक्षित, अकुशल कामगार काम मागत. सशक्त पण कोवळ्या वयाच्या मुलांना संधी मिळायची. पाच ते सहा वर्षाच्या मुलांनाही कामात गुंतवले जाई. गिरण्या वाढल्या तशी कामगारांची संख्याही वाढत गेली. गिरणी मालकांचे उत्पन्न व नफा प्रचंड वाढला पण कामगारांची वेतवाढ फारच कमी झाली.

कामगार जीवनाच्या समस्या वाढतच होत्या. भरतीत जातीचा विचार होत असे. जॉबर आपल्या जातीची माणसे कामासाठी आणत असे. ‘युनायटेड स्पिनिंग अँड विव्हिंग मिल’ चे उदाहरण पाहिले तर असे दिसून येते की, या मिलमध्ये मागासवर्गीयांना कामावर घेत नसत. कारण यात विव्हिंग विभागात सर्व विभागांपेक्षा जास्त वेतन होते. कामाच्या तासाविषयी शोषण चालत असे. सूर्योदयाच्या उजेडापासून सूर्यास्त व पूर्ण अंधार होईपर्यंत हिवाळ्यात १२ ते १३ आणि उन्हाळ्यात १३ ते १४ तास काम करून घेत. उशीर केला की कामगारांच्या वेतनातून कपात केली जात असे.

अशा सर्व परिस्थितीमुळे कामगारांचे जीवन हलाखीचे बनले होते. लोखंडे यांनी १८८४ मध्ये ५५०० कामगार उघड्यावर गिरणीबाहेर झोपत अशी नोंद केली आहे. कामगारांच्या कामाचे वेळापत्रक व काम अनिश्चित होते. ९० ते १०० अंश उष्णतेत, कोंदट वातावरणात काम करावे लागत असे. हिंदू सणाच्या वेळी अर्धा दिवस काम बंद राही बाकी सुट्ट्या नसत. ‘बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन’चे १६ नियम दिखाऊ होते. कारण ते पाळलेच जात नसत. या परिस्थितीमुळे नारायण मेघाजी लोखंडे यांना कामगार जीवनासाठी चळवळ हाती घेण्यास प्रेरित केले. यासोबत फॅक्टरी व चळवळीच्या प्रारंभाचाही आपण अभ्यास केला. या सर्व बाबींतून कामगार चळवळीची सुरूवात झाली व तिचा हळूहळू विस्तार होत गेला.

**आ) लोखंडे यांचे संघटनात्मक व जागृती कार्य :**

फॅक्टरी ॲक्ट आणि कामगार चळवळीची सुरूवात याविषयी आपण माहिती जाणून घेतली. १८८१ मध्ये ‘फॅक्टरी ॲक्ट’ लागू करण्याची शिफारस करण्यात आली. लोखंडे यांनी ‘इंडियन स्पेक्टेटर’ व ‘राफ्त गोफ्तर’ या दोन पत्रांमधून कामगारांसाठी संघटना असावी अशी गरज व्यक्त केली. त्यांनी ‘दिनबंधू’ मधूनही कामगारांची दु:खे स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला. यासोबत त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना ‘बॉम्बे मिल हँड असोसिएशन’ या नावाने स्थापन केली. त्यांच्या या संघटनात्मक कार्याला रघू भिकाजी, गेनू बाबाजी, नारायण सुकौजी यांसारख्या जॉबर्सनी मदत केली. हे खूप उल्लेखनीय आहे. या दरम्यान सत्यशशेधक समाज बहुजनांसाठी झटत होता. त्यामार्फत रघू कोरगांवकर, कृ. स. केळुसकर, रामचंद्र शिंदे, नारायण पवार इत्यादींनी कामगार चळवळीत आपला सहभाग नोंदवला.

लोखंडे एकीकडे गिरणी–कारखाने, त्यातील कामगार जीवन यांतील वस्तुस्थितीचा अभ्यास करत तर

दुसरीकडे शासकीय कायदेशीर बाजूंचाही अभ्यास करत. १८८१ च्या फॅक्टरी ॲक्टचा अभ्यास करून त्यातील अपूर्णता त्यांनी सर्वांसमोर मांडली. त्यात त्यांनी काही अपेक्षित सुधारणाही सुचविल्या. २२ व २३ सप्टेंबर, १८८४ रोजी परळ तसेच भायखळा येथे सभा घेऊन कामगारांमध्ये जागृती केली.

**इ) फॅक्टरी कमिशनला सादर केलेल्या मागण्या :**

कामगारांचा उत्स्फुर्त पाठींबा मिळवून वरील सभामध्ये ठराव पास केले. त्यात करण्यात आलेल्या पुढील मागण्या त्यांनी फॅक्टरी कमिशनचे अध्यक्ष डब्ल्यू. बी. मूलक यांना सादर केल्या.

१) गिरणी कामगारांनी रविवारी पूर्ण दिवस विश्रांती द्यावी.

२) दुपारी अर्धा तास कामगारांना सुट्टी असावी.

३) सकाळी ६.३० पासून सुर्यास्तापर्यंत काम व्हावे.

४) कामगारांना महिन्याच्या १५ तारखेपर्यंत वेतन द्यावे.

५) कामावर कामगाराला दुखापत झाली तर तो बरा होईपर्यंत त्याला पूर्ण पगार द्यावा. कामावर कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला पेन्शन दिली जावी.

मुंबईतील मागण्यांवर विचार चालू असतानाच कामगारांनी १८८५ मध्ये दोन गिरण्यांमध्ये पगार कपात व पगारास नकार या कारणास्तव संप केला.

कुर्ल्याच्या स्वदेशी मिलमध्ये १८८७ मध्ये संप झाला. याला टाटांनी उत्तरेतून मजूर आणून अयशस्वी शह दिला. स्त्रिया सनासुदीला कामावर येत नाहीत म्हणून मालकांची नाराज होती. फॅक्टरी ॲक्टप्रमाणे काही बदल करता यावेत म्हणून लोखंडे यांनी ३ जून १८८९ रोजी मुंबई सरकारला पत्राद्वारे कायदा करण्याची विनंती केली. प्रारंभी रविवारच्या सुट्टीस कामगारांचा विरोध झाला. कारण ख्रिश्चनांचा चर्चचा आणि हिंदूंचाही खंडोबा व कुलस्वामिनीचा हा वार होता. ब्रिटीशांचाही सोयीचा हाच वार होता. शेवटी रविवारची आठवडी सुट्टी कामगारांना लोखंडे यांच्या सभेतील मार्गदर्शनानंतर १० जून १८९० मध्ये मान्य झाली. हा चळवळीचा फार मोठा विजय होता. त्यामुळे लोखंडे यांची कामगार जीवनाशी जवळीक वाढली. त्यामुळे कामगारांचे विविध प्रश्न ओळखून त्यांना त्यांची सोडवणूक करण्यात यश आले.

**ई) १८९१ चा फॅक्टरी ॲक्ट :**

संपूर्ण जगभर कामगार पुरुषांचेच नव्हे तर स्त्रियांचे व बालकांचेही प्रश्न चर्चेत आले. १८९० मध्ये बर्लिन परिषदेमध्ये याची चर्चा झाली. कारण ही आंतरराष्ट्रीय परिषद होती. मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्सने भारतीय कापड गिरणी उद्योगातील सुधारणा तात्काळ लागू करण्याची मागरी केली. पण याला गिरणी मालक संघाचा विरोध झाला. यासाठी मेजर लेथब्रीजच्या अध्यक्षतेखाली सरकारने कमिशन नेमले. यात भारतीय सदस्यांचाही समावेश करण्यात आला होता. या कमिशनने विविध कामगार संघटना, गिरणी मालक संघटना यांना भेटी देऊन त्यांची मते जाणून घेतली. त्यानंतर नवा फॅक्टरी ॲक्ट मान्य झाला. हाच तो १८९२ चा लागू झालेला कायदा होय.

● १९९२ ला लागू झालेल्या फक्टरी ॲक्टमधील तरतुदी :

**१) फॅक्टरीची व्याख्या :** जेथे ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार चार महिने वा अधिक काळ काम करतात अशी उत्पादनाची जागा.

**२) कामाचे तास :** स्त्रियांसाठी ११, दुपारी १ ते १-३० दरम्यान अर्धा तास विश्रांती.

३) स्त्री कामगारांना सकाळी ६ पूर्वी कामावर बोलवू नये. सायंकाळी ६.३० नंतर कामासाठी थांबवू नये.

४) मुलांचे वय १४ वयापर्यंत मानावे. (क) वयोमर्यादा ९ ते १४ वर्षे. (ख) मुलांना ५.१५ ते सकाळी ८.३० पर्यंत काम करून शाळेत हजर रहावे. (इ) दुपारी १२.३० ते ३.४५ काम करून घरी जावे. (ई) दुसऱ्या पाळीतील मुलांनी ८.३० ते १२ सकाळी गिरणीत काम करावे, नंतर ३.४५ पर्यंत शाळा करून पुन्हा ३.४५ ते सायं. ६.४५ गिरणीत काम करावे इत्यादी. दोन्ही पातळीतील मुलांना साडे सहा तासांपेक्षा जास्त काम देऊ नये.

५) सर्व गिरण्यांत १२ ते २ दरम्यान अर्धा तास मध्यंतर व आठवडी एक तास सुट्टी रविवारी ठेवावी.

६) कामाच्या ठिकाणी पाणी पुरवठा, सांडपाणी, स्वच्छता व हवा पाण्याची पुरेशी सोय असावी. या कामासाठी स्थानिक शासनाने पुढाकार घ्यावा.

या देशातील स्थानिक कामगार चळवळ या कायद्याने फलद्रूप झाली. यासाठी लोखंडे यांचे फार सहकार्य लाभले होते. सरकारने १८९१ चा गिरणी मालक संघाचा कायदा झाल्यावर त्यांचा सत्कार करून गौरव केला.

**उ) रॉयल कमिशन आणि लोखंडे यांची साक्ष :**

१८९१ मध्ये 'रॉयल कमिशनर ऑन लेबर' ची स्थापना झाली. त्यात तीन समित्या बनविण्यात आल्या. त्यांनी कामगार संघटना, मालकांची संघटने यांबरोबर चर्चा केली. कमिशनसमोर लोखंडे यांची साक्ष महत्त्वाची होती. त्यातील काही महत्त्वपूर्ण मुद्दे पुढीलप्रमाणे -

१) कामगारांना सुट्टीच्या दिवशी अर्धा दिवस काम करावे लागते.

२) त्या अर्ध्या दिवसाच्या कामाचा मोबदला मिळत नाही.

३) चूक झाली म्हणून कामावरून कमी करणे, पगार गोठवणे चुकीचे आहे.

४) पगार दोन किंवा त्यापेक्षा जास्त महिन्यांनी दिला जातो.

५) गिरणीतील एजंट वा मॅनेजर नको असेल त्या कामगारास कधीही काढतात.

६) त्याविरुद्ध जाब विचारण्याची सोय नाही.

या साक्षींधारे भावी कायदे करण्यास मदत झाली. लोकमान्य टिळक, महत्मा फुले, भालेकर यांच्याशी आपल्या प्रतिभा सामर्थ्याने लोखंडे यांनी वाद केले व स्वमत टिकविले. १८९३ च्या हिंदू-मुस्लीम दंग्यात त्यांनी

घेतलेल्या उत्कृष्ट भूमिकेमुळे सरकारने त्यांना १८९५ मध्ये 'रावबहाद्दूर' पदवी बहाल करून त्यांचा गौरव केल. १८९२-९३ मध्ये लोखंडे यांनी निर्माण केलेल्या चैतन्यामुळे मुंबई कामगार संप यशस्वी झाला.

फेब्रुवारी १८९७ मध्ये वयाच्या ४९ व्या वर्षी प्लेगमुळे लोखंडे मृत्यू झाले.

- **विसाव्या शतकातील कामगार चळवळ :**

राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे घडणाऱ्या विविध घटनांचे परिणाम कामगार चळवळीवर होणे अनिवार्य होते. बंगालची फाळणी झाली. तिचे पडसाद देशभर उमटले. संपूर्ण देशात देशप्रेम उफाळून आले होते. कामगारांच्या जीवनाशी याचा संबंध फार कमी होता. पण कामगारांनीही संप केले. त्यांनी कामाचे तास कमी करण्याची मागणी केली. पोस्ट खात्यातही त्याचे परिणाम उमटले. त्यात संघटन उदयास आले. १९०७ मध्ये 'बॉम्बे पोस्टल युनियन' ही संघटना स्थापन करण्यात आली. राजकीय क्षेत्रात बंगालच्या फाळणीप्रमाणे देशव्यापी परिणाम करणारी दुसरी घटना म्हणजे १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना झालेली अटक होय. कामगार वर्ग पेटून उटला. महाराष्ट्राच्या व राष्ट्राच्या अस्मितेचा हुंकार सर्वत्र जाणवला. टिळकांना झालेली ६ वर्षांची शिक्षा संपूर्ण देशात कामगारांना अस्वस्थ करणारी ठरली. देशव्यापी संपात महाराष्ट्राने सहा दिवस संप करून आपला वाटा नोंदवला. १९०८ मध्ये श्री. स्मिथ यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांचे प्रश्न समजून व सोडवून त्यांना शांत ठेवण्यासाठी कमिशन नियुक्त केले. सर्व परिस्थिती अभ्यासून कमिशनने अहवाल सादर केला. विसाव्या शतकाचे पहिले दशक संपण्यापूर्वीच १९१० मध्ये (१) कामगार हितसंवर्धन सभा, मुंबई आणि (२) सोशल सर्व्हिस लीगची स्थापना होऊन या चळवळीला गती आली.

**आ) दुसरे दशक :**

स्मिथ कमिशनने आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यावर विचार होऊन १९११ चा फॅक्टरी ॲक्ट तयार झाला. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे -

१) वर्षातून चार महिन्यांपेक्षा कमी काळ चालणाऱ्या कारखान्यांनाही कायदा लागू असेल.

२) कामगारांना वयाचा दाखला अनिवार्य असेल.

३) कापड गिरणीत मुलांना सहा तास काम द्यावे.

४) स्त्रियांना रात्री काम देऊ नये.

५) पुरुषांसाठी कापड गिरणीत १२ तास काम असेल. वेळ पहाटे ५ ते सायंकाळी ७ दरम्यान असेल. शिफ्टसाठी हा नियम असेल.

६) अपघात, स्वच्छता, उजेड या संदर्भातील नियम कारखान्यांना लागू असतील.

जागतिक स्तरावर पहिले महायुद्ध सुरू झाले. याच दरम्यान रशियन राज्यक्रांतीने कार्ल मार्क्सच्या 'जगातील कामगारांनो एक व्हा' या साम्यवादी घोषणेने प्रभावित केले. अनुसूयाबेन यांनी अहमदाबाद येथे

गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली कामगारांचा एक संघ स्थापन केला. १९१८ मध्ये पी. बी. वाडीया यांनी 'मद्रास लेबर युनियन' बनवला. राष्ट्रीय स्तरावरील कामगार चळवळीने गती घेतली. १९२० सालाची All India Trade Union Congress ची स्थापना झाली. याचे अध्यक्ष म्हणून लाला लजपतराय यांनी नेतृत्व केले.

हा काळ राजकीय धामधुमीचा होता. स्वातंत्र्य लढा तीव्र बनत चालला होता. स्वाभाविकच लढाऊ कामगार चळवळीला पाठिंबा मिळाला. कामगार चळवळीतील इतर विचार मागे पडू लागले. कामगार संघटनांनी राजकारणात भाग घेऊ नये असे मत होते. पण परकीय जुलमी सत्तेच्या कारभारामुळे हा विचार मागे पडू लागला. ऑल इंडिया ट्रेड युनियन स्थापन झाली. तेव्हाचा काळ हा खूप राष्ट्रीय धामधुमीचा होता. याच दरम्यान झालेला जालियनवाला बाग हत्याकांड ही देशाला चिंतेत टाकणारी घटना होती. तसेच खिलाफत चळवळ, होमरूल चळवळ, मोपल्यांचे बंड, ब्रिटीश युवराजांच्या भेटीवर टाकलेला बहिष्कार या घटना घडल्या. या घटनांच्या परिणामांमुळे परस्परांना प्रभावित केले. यातून क्रांतिकारक चळवळ वाढत गेली. संपांना राजकीय स्वरूप येऊ लागले. ब्रिटीश युवराजाच्या भारत भेटीवर बहिष्कार म्हणून एन. डब्ल्यू. रेल्वेच्या कामगारांनी संप केला. काँगेसच्या बहिष्काराच्या व असहकाराच्या चळवळीला पाठिंबा देणारे व दडपशाहीचा निषेध करण्यासाठी संपही केले. जगभर साम्राज्यशाहीचा व भांडवलशाहीचा धिक्कार करणाऱ्या घोषणा कामगार देत होते.

कामगार चळवळीत राजकारण आणू नये असे महात्मा गांधी यांचे मत होते. तर लाला लजपतराय यांसारखे पुढारी 'संघटित कामगार हाच भांडवलशाही व साम्राज्यशाहीवर उतारा आहे.' असे मानत असत. परंतु सी. आर. दास यांचे म्हणणे होते की, 'राष्ट्रीय चळवळीत व कामगारांच्या चळवळीत झगडा येण्याचे कारण नाही. स्वराज्य जनतेसाठी आहे.'

**इ) तिसरे शतक :**

ना. म. जोशी यांनी १९२१ मध्ये कामगार संघांना कायदेशीर मान्यता मिळवून देण्याच्या संदर्भात एक विधेयक मांडले. पण ते संमत होऊ शकले नाही. त्यामुळे देशात विविध संघटनांना एकत्र आणण्याची गरज निर्माण झाली. त्यातूनच 'अखिल भारतीय ट्रेड युनियन' चा जन्म झाला. १९२२ मध्ये सर्व प्रांतीय संघटनांना एकत्र आणण्यासाठी फेडरेशन स्थापन झाले. आंतरराष्ट्रीय श्रमसंस्थेत देशाच्या एका संघटनेमुळे सहभाग शक्य झाला. १९२२ मध्ये फॅक्टरी ॲक्ट मान्य झाला. या कायद्यामुळे -

१) यांत्रिक शक्ती वापरणाऱ्या आणि २० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांना हा कायदा लागू करण्यात आला.

२) प्रांताना गरज वाटली तर १० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या व यांत्रिक शक्ती वापरणाऱ्या कारखान्यांनाही हा कायदा लागू करता येईल.

३) १२ वर्षाखालील मुलांना कामावर घेऊ नये.

४) आठवडी ६० व दर दिवशी ११ तास (स्त्री व पुरुषांसाठी) काम असावे.

५) स्वच्छता, हवा, प्रकाश या तरतुदी निरीक्षणार्थ इन्स्पेक्टर ठेवणे कारखान्यांची जबाबदारी असेल.

१९२२ मध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांनी 'अखिल भारतीय रेल्वे कर्मचारी संघा'ची स्थापना केली. १९२६ मध्ये कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता मिळाली. त्यामुळे नोंदणी झालेल्या संस्थांची संख्या वाढली. देशात साम्यवादी विचारप्रवाहाचा प्रभाव वाढत होता. १९२६ पासून साम्यवाद्यांनी कामगार संघटनांवर आपली पकड निर्माण करण्याचा प्रयत्न चालू केला. त्यापूर्वी काँग्रेसची पकड जास्त प्रभावी होती. १९२७ मध्ये मुंबईमध्ये वेगळ्या 'गिरणी कामगार संघा'ची स्थापना करण्यात आली. यातील सभासद संख्या ५४,००० झाली. १९२८ मध्ये श्रीपाद अमृत डांगे गिरणी कामगार युनियनचे काम करीत होते. भास्करराव जाधवांना मुंबईत डांगेचे (एक ब्राह्मण) नेतृत्व नको होते. काही काळ जवळकर दिनकररावांनी डांगेना विरोध केला. १९२८ मध्ये संप मुंबईत सहा महिने सुरू राहिला. १९२९ मध्ये कम्युनिष्टांनी नागपूर अधिवेशनात दोन ठराव संमत करून घेतले. त्यामध्ये एक म्हणजे रॉयल कमिशनवर बहिष्कार व दुसरा म्हणजे मास्कोमधील तिसरी आंतरराष्ट्रीय संलग्नता होय. या सोबत ट्रेड युनियनवर साम्यवादाचा प्रभाव वाढला. परिणामी कम्युनिष्टेतर पुढारी गिरी, जोशी, बखले, चिमणलाल, दिवाण, शिवराम यांनी 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन'ची स्थापना केली. दोन्ही संघटनांत तीव्र मतभेद निर्माण झाले. त्यामुळे 'ऑल इंडिया रेड ट्रेड युनियन काँग्रेस' हा डाव्या पक्षांची संघटना तर 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन अशा दोन संघटना १९२९ मध्ये अस्तित्वात आल्या. मि. व्हिटलेच्या अध्यक्षतेत एक कमिशन भारत मंत्र्यांने तयार केले. या लेबर कमिशनने अभ्यास करून शिफारशी केल्या.

**इ) चौथे दळक (१९४० ते १९४७) :**

मि. व्हिटले यांच्या कमिशनने दिलेल्या अहवालाच्या आधारे १९३४ चा फॅक्टरी ॲक्ट' तयार करण्यात आला. या कायद्याने कारखान्यांचे 'कायमचे व हंगामी' असे दोन भाग करण्यात आले.

पहिल्या दर्जातील कारखान्यांसाठी कामाचे तास १० व आठवडी तास ५४ ठरले. दुसऱ्या (हंगामी) कारखान्यात ११ तास व आठवडी तास ६० हे प्रमाण ठरले. तसेच मुलांसाठी ५ तास काम देण्याचे ठरले. १५ ते १७ वयोगट वेगळा करण्यात आला. कारखान्यांनी प्रौढ कामगारांना सतत १३ तास व मुलांना ७.३० तास काम देऊ नये. मालकांनी कारखान्यात योग्य ते हवामान राखावे, इन्स्पेक्टर ठेवावा. प्रथमोपचाराची व्यवस्था स्त्रियांसाठी स्वतंत्र खोली, कामगारांसाठी विश्रांतीगृहे, कारखाना आणि गिरणी मालकांनी करावीत. अशा विविध बंधनांमुळे सुधारणा अपेक्षित होत्या.

भारतात एकीकडे कामगार सुधारणांचे कायदे हळूहळू सोयी उपलब्ध करून कामगार जीवनाचा दर्जा पूर्वीपेक्षा सुधारण्याचा प्रयत्न करत होते. तर दुसरीकडे देशभर शेतकरी-कामगार संघटनांचे जाळे विणले जावे यासाठी प्रयत्न सुरू होता. १९३४ पर्यंत कम्युनिष्ट पक्षाला काँग्रेसच्या मंत्रिमंडळाच्या काळात (१९३७) थोडी सूट मिळाली होती. आता हे बेकायदेशीर ठरल्यामुळे पूर्णत: नेस्तनाभूत करण्याचा प्रयत्न झाला. ही बंदी १९४२ पर्यंत राहिली. दुसऱ्या महायुद्धामुळे काँग्रेसने सत्तात्याग करताच साम्यवाद्यांना धारेवर धरण्यात आले. या काळात मोठ्या संख्येतील कैदी हे साम्यवादी व त्यांचे सहकारी होते. १९३८ मध्ये 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन' व

'ऑल इंडिया रेड ट्रेड युनियन काँग्रेस' हे 'एसआयटीयुसी' मध्ये समाविष्ट झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सरकारला कामगारांचा पाठिंबा हवा होता. म्हणून कामगारांच्या मागण्या मान्य करण्यासाठी त्यांनी कारखानदारांना भाग पाडले होते.

१९३६ मध्ये भूमिहीन, गरीब कुळे, शेतकरी आणि कामगार यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. हा राजकीय पक्ष होता. या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. लेखक प्रो. मो. नि. ठोके यांच्या 'आधुनिक महाराष्ट्राचे उद्‌गाते' या ग्रंथात हा जाहीरनामा देण्यात आला.

या पक्षामार्फत कामगारांच्या हिताचे कायदे व्हावे, जनतेत उत्पादन शक्ती आणि कार्यक्षमता वाढावी म्हणून प्रयत्न केले जातील. नवीन धंदे सुरू करण्यात येतील. ज्या कुळांची मालकांकडून पिळवणूक होते ती पिळवणूक थांबविण्यासाठी प्रयत्न केले जातील. भूमिहीन, मजूर, कामगार यांच्या हितासाठी हा पक्ष प्रयत्न करणार आहे' त्यांनी १९३७ मध्ये निवडणूका लढवून मिळालेल्या १७ जागांवरील उमेदवारांना सहकार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईतून निवडून आले. शेतकरी, कामगार यांच्या संघटना बांधून व निवडलेल्या १३ उमेदवारांमार्फत विधिमंडळातही त्यांनी प्रभावी काम केले.

१९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलन प्रसंगी इंग्रजांना कामगारांचे सहकार्य हवे होते. त्यांना 'छोडो भारत' आंदोलनापासून दूर न्यावयाचे होते. गव्हर्नर जनरलनी बाबासाहेबांना कार्यकारी मंडळात मजूर मंत्री नेमले. बाबासाहेबांनी महात्मा गांधीजींच्या 'करेंगे या मरेंगे' या घोषणेचा धिक्कार करून १३ नोव्हेंबर १९४२ रोजी मुंबई आकाशवाणीवर 'भारतीय मजूर पक्ष आणि महायुद्ध' या विषयावर भाषण दिले. त्यामध्ये त्यांनी लोकशाही पक्षाचा विजय झाला तर स्वातंत्र्य व नवीन समाजरचना लाभेल. स्वातंत्र्यासोबत योग्य राज्यघटना व समाजरचनासुद्धा यावी. कामगारांनी अपाली संपूर्ण शक्ती एकवटून 'छोडो भारत' ही मागणी करण्यापेक्षा नवीन भारताची मागणी करावी. हिंसेला शरण जाऊन मिळालेली शांतता ही खरी शांतता नव्हे, ती आत्महत्या होय असे वक्तव्य केले. (आधुनिक महाराष्ट्राचे उद्‌गाते - प्रा. मो. नि. ठोके)

१९४६ मध्ये कोवराव जेधे, भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव, शंकरराव मोरे यांनी पुढाकार घेऊन काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन केला. या संघाच्या कामात क्रांतिसिंह नाना पाटील, दत्ता देशमुख, व्यंकटराव पवार, पी. के. सावंत, रा. भ. नलावडे, यशवंतराव चव्हाण, के. डी. पाटील यांनीही भाग घेतला. खेर मंत्रिमंडळाने ज्याप्रमाणे शेतकरी कामगार संघाची दखल घ्यायला हवी होती; तशी ती दखल घेतली नाही. पुढे वरील सदस्यांनी काँग्रेस सोडून स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

**उ) स्वातंत्र्योत्तरकालीन संदर्भ :**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रेरणेतून 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस' ची स्थापना करण्यात आली. खूप कमी काळामध्ये या संघटनेने आपला प्रभाव देशभर निर्माण केला. आंतरराष्ट्रीय संस्थेत प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार 'आयटक' ऐवजी 'इंटक' ने मिळविला.

### १) शेतकरी कामगार पक्ष :

महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाने कलाटणी घेतली. १३ जून, १९४८ मध्ये यापूर्वी दिलेल्या नेत्यांनी 'शेतकरी कामगार पक्ष' (शेकाप) ची स्थापना केली. केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांनी पक्ष स्थापनेची घोषणा केली. १९४८ मध्ये सोलापूर येथे पक्षाचे पहिले अधिवेशन झाले. 'जनसत्ता' हे मुखपत्र फेब्रुवारी १९४९ मध्ये सुरू झाले. केशवरावांनी याचा प्रचार पुणे, कोल्हापूर, बेळगांव या भागात केला. नाना पाटील व मामासाहेब वाघ यांनी त्यांना मदत दिली. दाभाडी अधिवेशन होऊन 'दाभाडी प्रबंध' तयार झाला. त्यात पक्षाचे धोरण मांडण्यात आलेले आहे. मात्र नवजीवन संघटनेला या पक्षात घ्यावे अथवा नाही यावरून वाद होऊन दत्ता देशमुख व नाना पाटील वेगळे झाले. त्यांनी कामगार-किसान पक्ष बनवला. शेकापचे मराठवाड्यातील नेते नरसिंहराव काटीकर व नंतर भाई उद्धवराव पाटील यांनी समर्थपणे विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकापर्यंत चालू ठेवले. कामगारांसाठी त्यांनी केलेले कार्य लक्षात ठेवण्याजोगे आहे. एन. डी. पाटील, घोडके, कपले, धोंगडे यांची नावेही या पक्ष कार्यात उल्लेखनीय आहेत.

### २) १९४८ चा राज्य कामगार विमा कायदा :

१९४८ चा राज्य कामगार कायदा हा जम्मू काश्मीर सोडून भारतभर लागू करण्यात आला. ४०० रुपयांपर्यंत दरमहा पगारापर्यंतची मिळकत असणाऱ्यांना याचा फायदा मिळणार होता. दुखापत, बाळंतपण, आजारपण यामुळे कामास असमर्थ असणाऱ्यांना वैद्यकीय फायदे (अवलंबिताना) व इतर असे पाच फायदे मिळतील. कामगाराने फायदा घेताना मजुरीच्या प्रमाणात विशिष्ट दराप्रमाणे रक्कम भरावी. योजना व्यवस्थापन एका विमा कार्पोरेशनकडे असेल. केंद्रीय मजूर मंत्री कार्पोरेशनचे पदसिद्ध अध्यक्ष मानले जातील तसेच १२ व्यक्तींचे कार्यकारी मंडळ अंमलबजावणीसाठी नेमण्यात येईल. कामगारांना स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वीपेक्षा सुरक्षित जीवन लाभावे असा प्रयत्न या कायद्याने करण्यात आला.

### ३) इतर काही संदर्भ :

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसमधून बाहेर पडळेल्या समाजवाद्यांनी 'हिंद मजदूर पंचायत' ही कामगार संघटना स्थापन केली. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर'चे यात विलीनीकरण झाले. 'आयटक' व 'हिंदी मजदूर सभा' यातून बाहेर पडलेल्यांनी 'युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस' या संघटनेची बांधणी केली. जनसंघवादी लोकांनी १९५५ मध्ये 'भारतीय मजदूर संघ' बनविला. देश पातळीवर कामगार हितासाठी भारतीय मजदूर संघ, हिंद मजदूर सभा, आयटक, इंटक इत्यादी संघटना होत्या. या सर्व प्रमुख संघटनांची कार्यालये महाराष्ट्रात कामगारांच्या संघटनांचे काम करून महत्त्वाची कामगिरी करीत आहेत. १९९३-९४ पर्यंतची आकडेवारी पाहता शेती, जंगल, मत्स्य, खाण, उत्पादन, बांधकाम, वाहतूक, वीज, गॅस, पाणी, उद्योग, सिंचन, साखर कारखाने, एस.टी. व इतर क्षेत्रांत कामगारांचे संघ आहेत. महाराष्ट्रात ३६४९ नोंदणीकृत कामगार संघटना असून ३९,८१,००० एवढे कामगार त्यांचे सदस्य आहेत. नोंदणी नसलेल्याही अनेक संघटना आहेत. त्यातूनही हजारो कामगारांना एकत्र आणले जात आहे. मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक

इत्यादी मोठ्या शहरांतून कामगार चळवळीची केंद्रे प्रभावी आहेत. औद्योगिक क्षेत्र विकासासोबत कामगार संघटनांचा जन्म अनिवार्य घटक आहे.

**● कामगार चळवळ प्रखर करण्यासाठी काही उपाययोजना :**

कामगार चळवळ प्रखर करावयाची असल्यास नवे नेतृत्व निर्माण केले पाहिजे. तसेच राजकीय प्रभावापासून संघटना मुक्त ठेवणे, उद्योगनिहाय एकच संघ ठेवणे, विधायक कामावर भर देणे इत्यादी उपाययोजना केल्यास कामगार चळवळ प्रभावी बनू शकेल. कामगार नेत्यांनी कामगार शिक्षण, आरोग्य, स्त्री कामगारांचे वेगळे प्रश्न जसे प्रसुती रजा, बोनस, दैनंदिन कामाचे नियम, बाल श्रमिकांवर आळा याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. योग्य वेतन, निश्चित कालावधीत वेतनाची प्राप्ती, विशिष्ट प्रसंगी फायदे मिळवून देणे यांकडे लक्ष पुरवले पाहिजे. तसेच कामगार चळवळींची सामुदायिक शक्ती वाढविली पाहिजे.

१९८२ मध्ये कापड गिरणी कामगारांचा (मुंबई) संप दीर्घकाळ चालला. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील औद्योगिक कामगारांत निरुत्साह वाढला. एकूण उत्पादन, त्यावरील कर, याचे नुकसान, मुंबईत पसरलेली मंदीची लाट इत्यादी परिणाम दिसून आले. त्यामुळे सरकारने यावर उत्तर शोधून १३ गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांच्या आधुनिकीकरणावर १४० कोटी रुपये खर्च मान्य केला. त्यांचे व्यवस्थापन हळूहळू कामगार प्रतिनिधींकडे देण्याचेही ठले. १९८५ पासून नवे वस्त्रोद्योग धोरण लागू करण्यात आले. कृत्रिम धाग्यावर भर, आधुनिकीकरण, स्वयंचलिकरणावर भर दिला. म्हणून परंपरागत सुती उद्योगाला फटका बसला. संगणकीकरण, स्वयंचलीकरण व आधुनिक स्वरूपामुळे खाजगी क्षेत्रातील नोकरभरती ठप्प होऊन बेकारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

**● स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) दि डेक्कन ॲग्रीकल्चरीस्ट रिलिफ ॲक्ट केव्हा पास करण्यात आला.

२) महात्मा फुले यांनी आपल्या कोणत्या ग्रंथात शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे वर्णन केले आहे?

३) शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केव्हा झाली?

४) नारायण मेघाजी लोखंडे यांचा जन्म केव्हा झाला.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) मुळशी धरणामुळे ............ गावांतील जमिनी पाण्याखाली बुडणार होत्या.

अ) ५०  ब) ५३  क) ५४  ५) ५५

२) फैजपूर येथे भरलेल्या अधिवेशनाच्यावेळी किसान सभेचे अध्यक्ष ........... होते.

अ) प्रो. एन. जी. रंगा  ब) गुरुनाथ कुरडे  क) मुकुंदराव पाटील  ड) एम.डी. रंगा

३) कामगार हितवर्धक सभेची स्थापना भिवाजी तरे यांनी ......... यांच्या मदतीने स्थापन केली.

अ) नारायण मेघानी लोखंडे व गोपालकृष्ण देवधर

ब) श्रीपाद अमृत डांगे व केशवराव जोगळेकर

क) सिताराम बोले व बॅ. हरिश्चंद्र तालचरेकर

ड) ना. म. जोशी व नारायण लोखंडे

४) महात्मा फुले यांनी ............ वृत्तपत्रातून शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडली.

अ) दीनबंधू ब) रास्त गोफ्तार क) केसरी ड) मराठा

५) फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन ........... साली झाले.

अ) १९४० ब) १९३६ क) १९४५ ड) १९३७

**३.२.२ स्त्री हक्काच्या चळवळी** (Women's Rights) :

● **प्रस्तावना :**

स्त्री व पुरुष हे समाजव्यवस्थेचे अत्यंत महत्त्वपूर्ण दोन घटक आहेत. समाजाचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी या दोन्ही घटकांची गरज आहे. स्त्री आणि पुरुष हा भेद नैसर्गिक आहे. परंतु स्त्री म्हणून स्वतंत्र अस्तित्व न मानता तिच्याकडे मानवी इतिहासाच्या वाटचालीत पुरुष केंद्रित दृष्टीकोनातून पाहिले गेले. त्यामुळे स्त्रीला समाजात दुय्यम स्थान मिळाले. स्त्री ही कोणातरी पुरुषांची मुलगी, बहिण, पत्नी, माता, आजी म्हणूनच जीवन जगत राहिली. वंश निर्मिती व वंश सातत्यात स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम राहिले आहे. या काळामध्ये महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात समानता, सामाजिक एकता यासारख्या विचारांचे अस्तित्वही नव्हते. तर जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह, बाल-जरठविवाह, बहुपत्नीकत्व, विधवा केशवपन, सती अशा अनेक अनिष्ठ परंपरा प्रचलित होत्या. स्त्रीयांना सामाजिक जीवनात कोणतेही स्वतंत्र स्थान नव्हते.

एकोणीसाव्या शतकात स्त्री सुधारणेस प्रारंभ झाला. या काळात महिलांच्या बाबतीत जेवढ्या सुधारणा झाल्या तेवढ्या सुधारणा या पूर्वीच्या काळात झालेल्या नव्हत्या. सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रबोधनास ब्रिटीशांच्या राजवटींमुळे या काळात सुरवात झाली. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार व शोषणाकडे लक्ष वेधले गेले. बंगाल, महाराष्ट्रातील सुशिक्षित तरूण वर्ग आपल्या समाजातील वाईट प्रथांकडे चिकित्सकपणे पाहू लागला. ब्रिटीशांच्या संपर्कात आलेल्या तरुणामध्ये वैचारिक बदल होऊ लागला. स्त्री शिक्षणावर भर देण्यात आला. यामधून स्त्रीमुक्ती व स्त्री हक्काची चळवळ उभी राहिली.

● **एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती :**

महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकात स्त्री जीवन अत्यंत करूणाजनक होते. पुरुष प्रधान कुटुंब व्यवस्थेत स्त्रीचे स्थान दुय्यम होते. महाराष्ट्राच्या इतिहासात राधाबाई, गोपिकाबाई, अहिल्याबाई यासारख्या स्त्रियांची नावे गाजली

असली तरी महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्त्रियांना प्रतिष्ठा नव्हती. स्त्रिला आपले मत व्यक्त करण्याचा, सल्ला देण्याचा, कौटुंबिक निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. त्याच बरोबर शिक्षणाचा अधिकार नव्हता, बालविवाहाची पद्धत रूढ होती. वयाच्या आठव्या वर्षातच मुलीचा विवाह केला जात असे. बालविवाहाच्या प्रथेमुळे अनेक स्त्रियांना वैधव्य प्राप्त होई. विधवा स्त्रीला केशवपन करावे लागत असे. व्रतवैकल्ये व अनेक बंधनाचे पालन करीत जीवन जगावे लागत होते. बंधनाचे पालन न केल्यास तिला कठोर शिक्षा केली जात होती. बहुपत्नीकत्वाची पद्धत प्रचलित होती. त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात कितीही लग्ने करीत असे. माणुसकीला काळीमा फासणारी सतीची पद्धत समाजात प्रचलित होती. पुरुषांच्या मृत्यूनंतर स्त्रीने जगणे पाप समजले जात होते. त्यातून सतीच्या प्रथेला प्रोत्साहन मिळाले. कित्येकदा स्त्रीयांना जबरदस्तीने सती जाण्यास भाग पाडत असत. थोडक्यात या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्त्रीला कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. तिचे जीवन अत्यंत निकृष्ट दर्जाचे व हालाखीचे होते.

**● महाराष्ट्रातील स्त्री हक्काची चळवळ :**

महाराष्ट्रात १९ व्या शतकापासून स्त्री हक्काची चळवळ सुरू होण्यास सुरूवात झाली. या कालखंडामध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी झगडणाऱ्या समाज सुधारकांच्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**१) महात्मा फुले (१८२७ ते १८९०)**

सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड पुकारणारे, बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण करणारे, स्वातंत्र्य, समता व बंधुता या प्रथांवर नितांत विश्वास असणारे, शेतकरी, कष्टकरी यांच्या दुखाचे, दारिद्र्याचे निवारण करणारे, चातुर्वर्ण्य व जातिभेदावर कडाडून हल्ला करणारे, बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आग्रह धरणारे महात्मा जोतिबा फुले व महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिले थोर पुरुष होत. त्यांनी स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांच्यावरील इतर जाचक अटी नष्ट करण्यासाठी, त्यांना रूढी परंपरेच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. स्त्रियांना सर्व प्रकारच्या बंधनात जखडून ठेवले होते. त्यांना सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. स्त्रियांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी त्यांनी जाणिवपूर्वक प्रयत्न केले. त्यामुळे स्त्री मुक्ती चळवळीचे अग्रणी म्हणून महात्मा फुले यांना ओळखले जाते.

**● स्त्री शिक्षण :**

समाजक्रांतीचे एक प्रमुख साधन शिक्षण असून मानवी हक्क आणि कर्तव्य यांची जाणीव करून देण्याचे माध्यम शिक्षण आहे. महात्मा फुले यांनी समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्री शिक्षण हाती घेतले. कारण स्त्रीयांना शिक्षण घेण्यास बंदी होती. महात्मा फुले यांनी सनातनी लोकांच्या मतांचा धिक्कार करून महाराष्ट्रात प्रथम स्त्रीयांना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू केली. या शाळेत जोतिबा स्वत: शिक्षक म्हणून काम करत असत. त्याकाळी मुलींच्या शाळेत काम करण्यासाठी दुसरा शिक्षक मिळत नव्हता. म्हणून जोतिबांनी आपली पत्नी सावित्री यांना प्रथम घरी लिहण्या-वाचण्यास शिकवले. त्यानंतर पुण्यातील नॉर्मल स्कूलमध्ये सावित्रीबाई आणि सगुणाबाई यांना दाखल केले. याठिकाणाहून त्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर सावित्रीबाई पुण्याच्या शाळेत शिक्षिका

म्हणून काम करू लागल्या. काम करत असताना सनातन्यांकडून त्यांना फार त्रास सहन करावा लागला. परंतु त्यांनी आपले कार्य नेटाने चालूच ठेवले. सनातन्यांनी चिडून सावित्रीबाईंच्या सासऱ्यांचे कान भरून आपल्या सूनेचे काम योग्य नसून हे काम ताबडतोब बंद करण्याची समज दिली. गोविंदरावानी म्हणजे सावित्रीबाईंच्या सासऱ्यांनी शिक्षीकेचे काम बंद करावे किंवा घर तरी सोडावे अशी अट घातली. महात्मा फुल्यांनी घर सोडण्याचा निर्णय घेतला. पण समाज सुधारणेचा मार्ग सोडला नाही. अशाप्रकारे व्यक्तीगत पातळीवर मुलींसाठी शाळा सुरू करणारे जोतिबा हेच पहिले समाजसुधारक व स्त्री शिक्षणाचे आद्यजनक आहेत.

**● विधवा पुनर्विवाह :**

भारतीय समाजात बालविवाह पद्धत रूढ होती. जरठ कुमारी विवाह होत असत. त्यामुळे समाजात विधवांची संख्या मोठी होती. विधवा स्त्रियांना सहन करावे लागणारे दु:ख पाहून त्यांचे मन अस्वस्थ होत असे. स्त्रियांचे होणारे हाल थांबवावेत, त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून जोतिबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने प्रसार केला व स्वत: पुढाकार घेवून पुण्यातील गोखल्यांच्या बागेत सन १८६४ मध्ये एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला. अशा पद्धतीने विधवा पुनर्विवाहासाठी कार्य सुरू केले.

**● बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :**

विधवा पुनर्विवाहाची चळवळ लगेच समाजाच्या पचनी पडने हे अवघड होते. त्यासाठी बराच अवधी जाणार होता. एखाद्या विधवेचे चुकून वाकडे पाऊल पडले तर संतती निर्माण होत होती. अशावेळी समाजापासून स्वत:ला वाचविण्यासाठी, आपली विटंबना टाळण्यासाठी भ्रूणहत्या करत किंवा स्वत: आत्महत्या करत असत. या आपत्तीतून या स्त्रियांची सुटका व्हावी म्हणून महात्मा फुले यांनी सन १८६३ मध्ये विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आपल्या घराशेजारी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. या गृहात बाळंतपणासाठी येणाऱ्या विधवा स्त्रियांच्या मुलांच्या पालन पोषणाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी स्विकारली.

**● बहुपत्नीकत्वाला विरोध :**

बहुपत्नीकत्वाची प्रचलित असणारी पद्धत बंद झाली पाहिजे यासाठी महात्मा फुले यांनी अग्रही भूमिका घेतली. अशाप्रकारे आपल्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये महात्मा फुले यांनी स्त्री उद्धाराचे कार्य केले. बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, केशवपन, सती प्रथा, वाघ्या व मुरळी इत्यादी अनिष्ठ प्रथा विरुद्ध महात्मा फुले व त्यांच्या अनुयायांनी चळवळी सुरू केल्या. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना स्त्रियांचे कैवारी समजले जाते.

**● जनाक्का शिंदे (१८७८-१९५६)**

जनाक्का या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भगिनी आहेत. त्यांचा विवाह वयाच्या ५ व्या वर्षी झाला होता. जनाक्का त्यांच्या सासरकडून होणाऱ्या त्रासामुळे सासरला कायमच्या मुकल्या होत्या. विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांना महर्षी कर्वे यांच्या हिंगणे येथील शाळेत व वसतीगृहात ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु ''ब्राह्मणेत्तरांच्या मुलींना वसतिगृहात ठेवण्याचा हा काळ नाही. त्यासाठी किमान १०० वर्षे वाट पहावी लागेल.'' असे महर्षी

कर्वे यांनी शिंदे यांना उत्तर दिले. त्यामुळे जनाक्का यांना हुजूरपागा (पुणे) येथील शाळेत ठेवण्यात आले. शिक्षण घेत असताना त्यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले.

जनाक्का पनवेल येथे नगरपालिकेच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करू लागल्या. परंतु त्यांना प्रतिगाम्यांचा त्रास सहन करावा लागला. महर्षी वि. रा. शिंदे यांनी स्थापन केलेल्या संस्थेत त्यांनी आपले कार्य सुरू केले. त्यांनी अस्पृश्य महिलांसाठी विविध उपक्रम राबविले. प्रार्थता समाजाच्या वतीने स्पृश्य-अस्पृश्य स्त्रियांचे अधिवेशन ५ जून १९१० रोजी जनाक्कांनी प्रथमच नगर जिल्ह्यात भरविले. तसेच १९३३ वाई येथे झालेल्या अस्पृश्य निवारण परिषदेसाठी त्या गेल्या होत्या. देवदासी प्रथा बंद व्हावी यासाठी त्यानी समाजामध्ये प्रबोधन केले. या कामासाठी त्यांना अनेकांचे आर्थिक सहकार्य लाभले. जनाक्का शिंदे यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे यासाठी 'जागृती' पत्रात लेख लिहून आग्रह धरला होता. १२ फेब्रुवारी १९२० रोजी पुणे नगरपालिकेवरती निघालेल्या मोर्चाचे जनाक्का व वि. रा. शिंदे यांनी नेतृत्व केले. अशाप्रकारे जनाक्का शिंदे यांचे स्त्रियांच्या मुक्ती साठीचे कार्य केलेले होते.

**● महर्षी धोंडो केशव कर्वे :**

भारतामध्ये स्त्रियांच्या उध्दारासाठी ज्या महापुरुषांनी आपले आयुष्य खर्ची घातले अशा महापुरुषापैकी महर्षी धोंडो केशव कर्वे हे एक होते. यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी मुरड पासून १५ मैलावर अणाऱ्या शेखली या गावी झाला. महर्षी कर्वे यांनी स्त्रियांच्या सुधारणेसाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी विधवा विवाहोत्तेजक मंडळी (१८९३) या संस्थेची स्थापना करून विधवा विवाहाचा पुरस्कार केला. याशिवाय त्यांचे मित्र नरहरपंत यांच्या विधवा बहिणीशी म्हणजे गोदूबाई जोशी यांच्याशी विवाह केला. या विवाहामुळे त्यांना समाजाकडून आणि जवळच्या नातेवाईकांकडून त्रास सहन करावा लागला. गावकऱ्यांनीही त्यांच्यावर बहिष्कार टाकला. ही घटना त्यांच्या जीवनात परिवर्तन करणारी ठरली. तेथून पुढे त्यांनी स्त्री-मुक्तीसाठी आयुष्यभर कार्य करण्याचे ठरविले. १३ एप्रिल १८९५ रोजी 'विधवाग्रह' स्थापून त्यांच्या शिक्षणाची सोय केली. १८९६ मध्ये त्यांनी हिंगणे येथे मुलींच्या शिक्षणासाठी 'अनाथ बालिकाश्रम' ही संस्था स्थापन केली. पुढे याच संस्थेचे 'हिंगणे स्त्री शिक्षण संस्था' असे नामकरण करण्यात आले. त्यांनी १९१६ मध्ये महिला विद्यापीठाची स्थापना केली. विठ्ठलदास ठाकरसी यांनी मातोश्री नाथीबाई दामोदर ठाकरसी यांच्या स्मरणार्थ १५ लाख रुपयांची देणगी दिल्यामुळे या विद्यापीठाला श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (S.N.D.T.) असे नाव देण्यात आले. यापूर्वीच त्यांनी १९०७ मध्ये हिंगणे या ठिकाणी महिला महाविद्यालय स्थापन करून तेथे स्त्रियांच्या जीवनाला आवश्यक विषय शिकवले जात. ज्यामध्ये गृहजीवशास्त्र, आरोग्यशास्त्र, शिशू संगोपणशास्त्र यासारखे विषय शिकवले जात. देशातील पहिले महिला विद्यापीठ म्हणून एस्.एन.डी.टी. ची ओळख आहे. आपल्या कार्याच्या प्रचारासाठी त्यांनी 'समता संघ' व 'मानवी क्षमता' ही मासिक सुरू केली. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने भारतरत्न हा किताब देवून त्यांना सन्मानीत केले.

**● पंडिता रमाबाई (१९५९ ते १९२२) :**

१९ व्या शतकात महाराष्ट्रात ज्या अनेक कर्तबगार व बुद्धीमान स्त्रिया होऊन गेल्या त्यामध्ये प्रामुख्याने

पंडिता रमाबाई यांचे नाव घ्यावे लागते. ज्या काळात स्त्रियांच्या कर्तबगारीला वाव नव्हता, स्त्रियांना हीन लेखले जात होते, त्यांच्यावर अनेक बंधने लादली होती त्या काळात पंडिता रमाबाई आपल्या बुद्धीमत्तेच्या कर्तबगारीच्या आणि धाडसाच्या जोरावर महत्त्वपूर्ण कामगिरी करून दाखविली. २३ एप्रिल १८५८ रोजी त्यांचा जन्म कर्नाटकातील मंगळूर जिल्ह्यातील गंगामूळ या गावी झाला. त्यांचा १३ ऑक्टोबर १८८० रोजी बाबू बिपीन बिहारीदास मेथानी यांच्याशी विवाह झाला. हा आंतरजातीय विवाह होता. रमाबाईना संसार सुख फार काळ लाभले नाही. ४ फेब्रुवारी १८८२ रोजी त्यांच्या पतीने निधन झाले.

रमाबाई या उत्तम वक्त्या होत्या. आपल्या व्याख्यानामधून त्यांनी स्त्रियांची निरक्षरता, स्त्री दास्य, स्त्रियांचे हक्क या विषयावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. विधवा असूनही स्वत:च्या इच्छेप्रमाणे त्यांनी आपल्या जीवनास वळण दिले. स्त्रियांच्या स्थितीबद्दल जागृती करण्यासाठी १ मे, १८८२ रोजी पुणे येथे 'आर्य महिला समाजाची' स्थापना केली. भारतीय शिक्षण विषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी सरकारने नेमलेल्या हंटर कमिशनपुढे साक्ष देताना स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. याशिवाय मुलींच्या शाळेत केवळ स्त्री शिक्षीकाच नव्हे तर इन्स्पेक्टर सुद्धा स्त्री असण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

रमाबाईंनी अमेरिकेतील स्त्री-पुरुषांत बालविधवाबद्दल कमालीची सहानुभूती उत्पन्न केली. त्यांच्या कार्याला मदत करण्यासाठी 'रमाबाई असोसिएशन' नावाची संस्था त्यांनी सुरू केली. (१३ डिसेंबर १८८७) त्यासाठी अमेरिकेतील लोकांनी त्यांना मदत केली. नंतर ही संस्था बंद करून त्याऐवजी 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' ही संस्था स्थापन केली. ही संस्था केडगावातील 'शारदा सदन' या संस्थेशी निगडीत होती. त्यांनी ११ मार्च १८८९ रोजी रमाबाईनी स्त्रियांसाठी केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे 'शारदा सदन' ची स्थापना होय. १८८९ मध्ये त्यांनी मुंबईत या संस्थेची स्थापना केली. या संस्थेत निराश्रीत विधवा व अनाथ स्त्रियांच्या राहण्याची व भोजनाची मोफत व्यवस्था तेथे करण्यात आली. शारदा सदनला जोडूनच त्यांनी 'कृपा सदन' परितक्त्या स्त्रियांसाठी संस्था काढली. पुनर्विवाहानंतरही विधवेला इस्टेटीतील वाटा मिळायला हवा असे पंडिता रमाबाई यांनी सांगितले. त्यांनी इंग्लंड येथे जाऊन हिंदू बालविधवांच्या प्रश्ना संदर्भात 'द हायकास्ट हिंदू वूमन' हे पुस्तक लिहिले. १९१९ साली त्यांच्या कार्याबद्दल त्यांना 'कैसर-इ-हिंद' हे सुवर्णपदक सरकारच्या वतीने देणेत आले. एका स्त्रीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना देत हे कार्य यशस्वीपणे पार पाडले. अशा महान स्त्रीचे इ.स. १९२२ मध्ये निधन झाले.

**● बाबा पद्मनजी (१८३१ ते १९०६) :**

या काळात राजकीय स्थित्यंतराबरोबरच सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात भारतात बदलास प्रारंभ झाला. हिंदू धर्मातील अनिष्ठ चालीरिती, रूढी, परंपरा विरुद्ध आवाज उठवून हिंदू धर्मातच सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न काही विचारवंतांनी चालविला होता. या काळात ख्रिस्ती धर्मातील मानवतावादी तत्त्वाचे काहींना आकर्षण वाटले. त्यामुळे त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. बाबा पद्मनजी यांनीही ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला होता. बाबा पद्मजी यांचा जन्म मे, १८३१ मध्ये बेळगांव येथे झाला. त्यांचे मुळचे आडनांव मुळे असे होते. त्यांचे घरचे वातावरण अत्यंत धार्मिक स्वरूपाचे होते. साहजीकच लहानपणापासूनच त्यांच्यावर धार्मिक संस्कार झाले होते.

बाबा पद्मजीचा भारतीय समाजातील अनिष्ठ, चालिरीती, रूढी, परंपरांना विरोध होता. ते दादोबा पांडुरंग यांनी स्थापन केलेल्या परमहंस सभेचे सभासद होते. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला पाठींबा दर्शविला होता. आपल्या लिखानाद्वारे हिंदू धर्मातील स्त्रियांच्या दु:खद स्थितीकडे लोकांचे लक्ष वेधले. त्यांनी आपल्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीतून विधवा स्त्रियांच्या दु:खाचे दर्शन समाजाला घडविले होते. १८८४ मध्ये त्यांनी 'अरुणोदय' हे आत्मचरित्र लिहिले. तसेच इंग्रजी-महाराठी व संस्कृत-मराठी शब्दकोश तयार केले. काही काळ त्यांनी 'सत्यदिपीका' हे नियतकालिक चालविले. महात्मा फुल्यांचे प्रारंभीचे बरेचसे लिखाण बाबा पद्मजीच्या सत्य दिपीकेत प्रकाशित झाले होते. तसेच 'ब्राह्मणांचे कसब' या महात्मा फुलेंच्या ग्रंथास बाबा पद्मजीची प्रस्तावना आहे. बाबा पद्मजींच्या कार्याला काही मर्यादा होत्या. तरी सामाजिक व धार्मिक सुधारनासंबधी त्यांची तळमळ होती.

### ● ताराबाई शिंदे (१८५० ते १९१०) :

ताराबाई शिंदे यांनी महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली होती. ताराबाईचे वडील बापूजी हरि शिंदे हे महात्मा फुलेंचे अनुयायी होते. ताराबाईचे वडील सत्यशोधक समाजाचे पदाधिकारी होते. त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या विचारांचा वारसा यांना मिळाला होता. ताराबाईंचे मराठी, इंग्रजी, संस्कृत भाषेवर प्रभूत्व होते.

### ● स्त्री-पुरुष समानता :

ताराबाई शिंदे यांनी आपल्या 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथातून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. ताराबाई शिंदे यांचे भाऊ रामचंद्र हरि शिंदे हे जोतिबांच्या कॉन्ट्रॅक्ट कंपनीत भागीदार होते. त्यामुळे ताराबाईच्या घरात सुरूवातीपासूनच स्त्री-पुरुष समानतेचे वातावरण होते. ताराबाई शिंदे यांनी आपल्या पुस्तकात विधवा विवाहास उच्चवर्णीयांनी केलेली मनाई, केशवपनासारख्या दुष्ट रुढी तसेच पुरुषांना अनेक लग्न करायची असलेली मुभा या सर्व प्रथांवर टीका केली. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात योगदान दिले. त्यांनी स्त्रियांच्या शोषणाच्या विरोधाला दिलेला लढा हा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना देणारा होता. ज्या ईश्वराने पुरुष व स्त्रियांना निर्माण केले त्या स्त्रियांना समान संधी का नाही? असा प्रश्न विचारला. पती कसाही असला त्याने आपल्या पत्नीवर अमानुष अन्याय, अत्याचार केले तरी स्त्रीने पतीला परमेश्वर मानून त्याची पूजा करावी. पती हा परमेश्वर असेल तर पतीने ही परमेश्वरासारखे वागले पाहिजे असे परखड विचार त्यांनी मांडले. महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष विषमतेविरुद्ध लढा उभारला. त्याला पुरक धोरण ताराबाईंनी अवलंबिले. त्यांचे लेखन बंडखोर व तत्कालीन समाजाला हादरवून सोडणारे होते. त्यांनी पुरुषी वर्चस्व संपल्याशिवाय समाजाची निकोप वाढ होणार नाही असे स्पष्ट मत मांडले.

### ● डॉ. रमाबाई राऊत (१८६४ ते १९५५) :

रमाबाईंनी पुरुष मक्तेदारी व स्त्रियांवरील अन्याय याविषयी आवाज उठविला. १८८४-१८८७ या चार वर्षात रमाबाई व तिचे पती दादाजी यांच्यातील खटल्याने सर्व महाराष्ट्राचे लक्ष वेधले होते. सन १८७४ मध्ये त्यांचा

विवाह दादाजी ठाकूर बरोबर झाला. पती अशक्त व आजारी असल्यामुळे त्यांनी नवऱ्याबरोबर राहणे व संसार करणे यास नकार दिला. पतीने कोर्टात केस केल्यानंतर कोर्टाने नवऱ्याबरोबर राहा अथवा सहा महिने तुरुंगवास अशी शिक्षा रखमाबाईंना दिली. या खटल्यात तडजोड करून रमाबाईंनी दंड भरला. स्त्री हक्क व स्वातंत्र्यासाठी त्या झगडत राहिल्या. ब्रुसेल्स विद्यापीठातून त्यांनी एम.डी. पदवी संपादन केली. १९०७ मध्ये स्त्रियांसाठी कार्य करण्यासाठी 'वनिता आश्रम' ही संस्था काढली. या संस्थेमार्फत त्या स्त्रीयांच्या प्रश्नासाठी कार्य करत होत्या.

● **रमाबाई रानडे (१८६२–१९२४) :**

सातारा जिल्ह्यातील 'देवराष्ट्रे' या गावी कुर्लेकर सरदार घराण्यात १८६२ मध्ये रमाबाईंचा जन्म झाला. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांचा विवाह न्या. रानडे यांच्याशी झाला. त्यांनी स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य केले. हिंदू सोशल ॲण्ड लिटररी क्लब या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत स्त्रियांसाठी कला, भाषा, विज्ञान यांचे शिक्षण देणारे वर्ग त्यांनी सुरू केले. पुढे त्यांनी पुणे येथे 'सेवा सदन' नावाची संस्था १९०८ मध्ये सुरू केली. या संस्थे मार्फत स्त्रियांच्या स्वावलंबनासाठी रुग्ण परिचारिकेचे वैद्यकीय प्रशिक्षण सुरू केले. भारत महिला परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्ष रमाबाई झाल्या. स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून त्यांनी १९२१ मध्ये आंदोलन सुरू केले. स्त्रियांना त्यांच्या हक्काची व अधिकारांची जाणीव व्हावी म्हणून त्यांनी आयुष्यभर शर्थीने प्रयत्न केले.

● **राजर्षी छत्रपती शाहू महाराज (१८७४ ते १९२२) :**

राजर्षी शाहू महाराजांनी क्रांतीकारी कायदे करून स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण केले. त्यांनी आपल्या राज्यात स्त्रियांच्या शिक्षणासाठी अनुकूल धोरण स्विकारले होते. त्यांनी आपल्या राज्यात मुलींना शिक्षण मोफत केले होते. मुलींच्या शिक्षणाला चालना मिळावी म्हणून अनेक उत्तेजनार्थ योजना व शिष्यवृत्त्या ठेवल्या होत्या. मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी १९१९ मध्ये खास हुकूमनामा काढला होता. त्यानुसार स्त्रियांच्या राहणे व जेवणाची व्यवस्था दरबाराकडून मोफत केली जाणार होती. स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी पुढील कायदे पास केले.

१) विधवा पुनर्विवाहाचा कायदा (१९१७)

२) स्त्रियांवरील अत्याचारास प्रतिबंध करणारा कायदा (१९१९)

३) आंतरजातीय विवाह संमती कायदा (१९१९)

४) स्त्रियांना घटस्फोटचा हक्क देणारा कायदा (१९१९) देशातील पहिला कायदा.

५) अनौरस संततीला वारसा हक्क (१७ जानेवारी १९२०) पतीत स्त्रियांच्या उद्धारासाठी.

६) देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदा.

वरली कायदे पास करून स्त्रियांच्या उद्धारासाठी शाहू महाराजांनी कार्य केले.

**● रघुनाथ धोंडा कर्वे (१८८२-१९५३) :**

र. धों. कर्वे व त्यांची पत्नी मालतीबाई यांनी भारतात संतती नियमनाचा सल्ला देण्याचे केंद्र व संतती नियमनाच्या साधनांची विक्री १९२१ मध्ये सुरू केली. रघुनाथरावांनी 'संतती नियमन' हे मराठी पुस्तकही लिहिले. दोघांनी मुंबईत परळ भागात संतती नियमनाची साधने विकावयास सुरूवात केली. ती कशी वापरावयाची याचा सल्ला दोघेही देत. जुलै १९२७ मध्ये रघुनाथरावांनी 'समाज स्वास्थ्य' हे मासिक सुरू केले.

**● डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिल व स्त्रियांचे हक्क :**

इ.स. १९४१ मध्ये सर बी. एन. राव यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने हक्क समिती नेमली होती. (Hindu law Committee) त्या समितीने सर्व देशभर दौरा काढून नामवंत कायदेपंडित व विचारवंतांची मते विचारात घेवून हिंदू संहिता विधेयक तयार केले. दुसऱ्या महायुद्धामुळे त्याकडे दुर्लक्ष झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेचे कार्य पुर्ण झाल्यानंतर या बिलाकडे लक्ष दिले. परंतु यावेळी या बिलाला मोठा विरोध केला गेला. डॉ. बाबासाहेबांनी हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठी आग्रह धरला. भारतीय घटना परिषदेने जात, धर्म व लिंग असा भेदभाव न करता स्वातंत्र्य व समता या तत्वाचा पुरस्कार केला होता. डॉ. आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल संमत झाल्यामुळे २६ सप्टेंबर १९५१ रोजी कायदा मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

यानंतर पंडितजीना हिंदू कोड बिलाचे चार निरनिराळे भाग करून हे चारही कायदे निरनिराळ्या वेळी संमत करून घ्यावे लागले.

१) हिंदू विवाह कायदा (१९५५)

२) हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६)

३) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा (१९५६)

४) हिदू दत्तक व पोटगी कायदा (१९५६)

१९५५-५६ मध्ये संमत झालेले चार हिंदू कायदे म्हणजे कायद्याच्या इतिहासातील क्रांतीकारक घटना होती. या बिलाची वैशिष्ट्ये हा कायदा सर्व देशभर लागू करण्यात आला. हा नवा कायदा जाती पंथातील भेद मानत नाही. हिंदूतील सर्व जातीजमाती, पंथ, उपपंथ, आर्य व लिंगायत समाज इत्यादींचा हिंदूत समावेश झाला. त्याचप्रमाणे जैन, बौद्ध, नवबौद्ध आणि शीख धर्मीय देखील या कायद्याखाली येतात.

**● हिंदू कोड बिल व स्त्री कल्याण :**

हिंदू कोड बिल हे स्त्रियांसाठी सुरक्षा कवच आहे. स्त्रियांमध्ये जो भेदभाव केला होता त्याला आळा बसेल. स्त्रिया अधिक सक्षम बनतील असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. या बिलाच्या मसुद्यावरील चर्चेच्या वेळी ते म्हणाले हाते ''समाजातील वर्गा-वर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता, तशीच अस्पर्शीय राहू देऊन आर्थिक समस्यांशी निगडीत कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे होय. हे करणे म्हणजे शेणाचा ढिगाऱ्यावर राजप्रसाद बांधण्यासारखे आहे.'' या बिलामुळे स्त्रियांना मिळणारी अपमानास्पद

वागणूक व परावलंबी अवस्थेतून बाहेर काढले. तसेच या बिलामुळे स्त्रियांना वारसा हक्क मिळाला, कुटुंबातील प्रतिष्ठा वाढली. आपल्या हक्काची जाणीव त्यांना करून दिली.

**● हिंदू कोड बिलामधील महत्त्वपूर्ण तरतुदी :**

१) या कायद्याने प्रथमच स्त्री-पुरुष समान मानून घटस्फोटाचा हक्क देण्यात आला. विवाह संदर्भात अनेक तरतुदी व शिक्षेचे स्वरूप मांडले गेले. १९०६ च्या कायद्यानुसार किंवा क्रिमिनल प्रोसिजर कोड १९७६ अन्वये पतीने पत्नीला पोटगी द्यावी अशी तरतूद आहे.

२) स्त्री-पुरुष असा भेद नष्ट करून स्त्रीला सासर-माहेरच्या संपत्तीमध्ये वारसा हक्क मिळवून देणारा कायदा १९५६ मध्ये मंजूर झाला.

३) मुलगा किंवा मुलगी दत्तक घेण्याच हक्क किंवा वृद्ध आई-वडीलांना मुलांकडून किंवा मुलीकडून स्वत:साठी पोटगी घेण्याचा अधिकार तसेच विधवा सुनेला सासरकडून आणि घटस्फोटीत पत्नीला पतीकडून पोटगी घेण्याचा हक्क कायदा १९५६ मध्ये मंजूर केला.

४) १९७२ मध्ये 'गर्भपात कायदा' मंजूर केला व १९८४ मध्ये 'गर्भजल परिक्षा' कायदा संमत करण्यात आला.

५) १९६१ मध्ये 'हुंडा-विरोधी कायदा' मंजूर करण्यात आला. परंतु १९८४ मध्ये यात सुधारणा करण्यात आली. हुंडा देणे-घेणे हे प्रकार निषिद्ध मानण्यात आले.

२५ डिसेंबर १९५२ रोजी कोल्हापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्त्रियांच्या संस्थामार्फत मानपत्र अर्पण करण्यात आले. त्यावेळी ते म्हणाले ''जोपर्यंत स्त्रियांना संपत्तीचा वारसा हक्क मिळत नाही तोवर त्यांची गुलामगिरी संपणार नाही.''

**● स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भारतीय प्रबोधनाचे अग्रदूत कोणाला म्हणतात.

२) ताराबाई शिंदे यांचे कोणते पुस्तक प्रसिद्ध आहे?

३) अनाथ बालिकाश्रमाची स्थापना कोणी केली?

४) 'यमुना पर्यटन' ही कादंबरी कोणी लिहिली?

५) पहिल्या भारतीय स्त्री शिक्षिका म्हणून कोणाला संबोधले जाते?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) महात्मा जोतीबा फुले यांनी पुण्यात पहिली शाळा इ.स. ............ मध्ये सुरू केली.

अ) १८५१ ब) १८५० क) १८४८ ५) १८४९

२) बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना ............ साली झाली.

अ) १८६३ ब) १८७३ क) १८९४ ड) १८८३

३) 'वनिता विश्राम' ही संस्था ............ यांनी काढली.

अ) डॉ. रखमाबाई खरात ब) रमाबाई रानडे क) साराबाई शिंदे ड जनाक्का शिंदे

४) शाहू महाराजांनी १९१७ साली ............ हा कायदा केला.

अ) विधवा पुनर्विवाहाचा कायदा ब) आंतरजातीय विवाचा कायदा

क) देवदासी प्रथा बंदी कायदा ड) शिक्षणाचा कायदा

५) महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना ............ रोजी हिंगणे येथे केली.

अ) ३ जून १९१६ ब) ३ जून १९१८ क) ३ जुलै १९१९ ड) १० मार्च २०१५

**३.२.३ मागासवर्गीयांच्या उन्नतीच्या चळवळी :**

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या ज्यांना अनेक वर्षे वंचित ठेवले गेले, बहिष्कृत केले गेले, माणूस म्हणून जगण्याचे हक्कही ज्यांना मिळाले नाहीत. जातीव्यवस्तेच्या उतरंडीमध्ये ज्यांना दुय्यम स्थान मिळाले त्यामध्ये प्रामुख्याने दलित व आदिवासी यांचा उल्लेख करावा लागेल. ब्रिटीश राजवटीत समाजातील प्रत्येक घटकाला समान न्याय मिळाला पाहिजे या संकल्पनेचा प्रसार होऊ लागला. आपल्यावर अनेक वर्षे अन्याय होत आहे व गुलामगिरीचे जिणे जगावे लागत आहे याची जाणीव खालच्या वर्गाला झाली. यामधूनच संघर्षाची बिजे पेरली व महाराष्ट्रात दलित व आदिवासीच्या न्याय हक्कांची चळवळ उभी राहिली. दलित चळवळीत अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्व दलित चळवळ ब) डॉ. आबेंडकरांची दलित चळवळ, क) डॉ. आंबेडकरांच्या नंतरची दलित चळवळ असे तीन टप्पे पडतात. याशिवाय आदिवासी सुधारणा चळवळीही त्यांच्या हक्कासाठी कार्यरत राहिल्याचे दिसून येतात.

**अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व मागासवर्गीयांच्या उन्नतीची चळवळ :**

१९ व्या शतकात दलितांचा उद्धार व्हावा यासाठी महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य उल्लेखनीय आहे. याबरोबर महाराजा सयाजीराव गायकवाड, गोपाळबाबा वळसंगकर, शिवराम जनबा कांबळे, किसन बंदसोडे इत्यादींनी समाज सुधारणेचे कार्य कृतीशी लपणे हाती घेतले. यामधूनच दलित चळवळ उभी राहिली. महात्मा जोतीबा फुले यांनी अस्पृश्यांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी म्हणून त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे कार्य हाती घेतले. त्यासाठी १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरू केली. सन १८५३ साली अस्पृश्य लोकांस विद्या शिकवणारी 'मंडळी' ही संस्था स्थापन केली. त्याच बरोबर १८१८ मध्ये स्वत:च्या घरातील पिण्याचा पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला केला. 'गुलामगिरी' हा ग्रंथ

लिहून उच्चभ्रू जमातीवर कठोर टीका केली. सन १८७३ मध्ये महात्मा फुले यांनी 'सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाची चळवळ ही एक विशिष्ट वर्गाविरुद्ध नव्हतनी. बहुजन समाजात जागृती घडवून आणण्यासाठी समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता हा विचार रुजवण्यासाठी होती.

महात्मा जोतीबा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन गोपाळबाबा वळसंगकर यांनी देखील अस्पृश्योद्धाराचे कार्य सुरू केले. त्यांनी १८९३ मध्ये दापोली येथे 'अनार्य दोष परिहार समाज' या संस्थेची स्थापना केली. जनजागृतीसाठी गोपाळबाबांनी जे अभंग लिहिले ते 'अखंड' या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'विटाळ विध्वंसक' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यांची आद्यदलित पत्रकार विद्रोही साहित्यिक, कीर्तनकार म्हणून ओळख होती. सन १९०० ते १९६० या काळातील सुधारक व त्यांचे कार्य पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

- **शिवराम जानबा कांबळे (१८७५-१९४०) :**

शिवराम काबंळे यांनी गोपाळबाबा यांच्या नंतर अस्पृश्य चळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. ते मराठीतील एक नामांकित लेखक होते. त्यांचे वडील जानबा कांबळे हे पुण्यातील भांबुर्डे गावचे वतनदार महार होते. त्यांनी आपला गावकीचा व्यवसाय सोडून पुण्यामध्ये युरोपीयनांकडे नोकरी धरली. त्यांचे सुपुत्र शिवराम यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे शिकविले, त्यांनी मराठी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान संपादन केले.

शिवराम काबंळे यांनी सासवड येथे इ.स. १९०३ मध्ये महार समाजाच्या ५१ गावातील लोकांची सभा बोलवली. या सभेत समाजातील लोकांना शिक्षण मिळावे आणि महार बटालियनचे पुनर्गठण करून लष्करात तसेच पोलीस खात्यात नोकऱ्या मिळाव्यात यासाठी सरकार दरबारी अर्ज दाखल करण्याचे ठरविले. ते पुण्याच्या पर्वती मंदीर सत्याग्रहात सहभागी होते. अस्पृश्यता निवारण्यासाठी त्यांनी अनेक सभा, संमेलने, अधिवेशने भरविली. १९०४ साली 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मिश्र सभा' स्थापन केली. या समाजाच्या वतीने ग्रंथालय सुरू केले. त्यांनी १९३० च्या नागपूर येथील अखिल भारतीय बहिष्कृत वर्ग परिषदेत प्रभावी भाषण केले. जुन्या चालिरितींना विरोध केला. जातिभेद हे सर्व सुधारणांच्या मार्गातील अडथळे आहेत असे त्यांचे मत होते.

- **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३ ते १९४४) :**

महर्षी वि.रा. शिंदे यांचे अस्पृश्य जातीच्या उद्धारासाठी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. समाजातील अस्पृश्यांची स्थिती पाहून त्यांना खूप वाईट वाटत असे. १९०५ मध्ये महर्षी शिंदे यांना अहमदनगर जवळच्या भिंगार गावी अस्पृठ्यांच्या परिषदेत निमंत्रित केले होते. या परिषदेत अस्पृश्यांनी आपणास भोगाव्या लागणाऱ्या मरणप्राय यातनांचे निवेदन केले. या परिषदेत अस्पृश्य समाजास भोगाव्या लागणाऱ्या हाल अपेष्ठांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. या समाजासाठी काहीतरी कृती करणे आयवश्यक आहे असे त्यांच्या संवेदनशील मनाला वाटले. या जाणिवेतून ते अस्पृश्योद्धारांच्या कार्याकडे वळले.

- **डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना :**

अस्पृश्य बांधवांच्या उद्धार कार्यासाठी महर्षी वि. रा. शिंदे यांनी १९०६ मध्ये 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन

सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे होते.

१) अस्पृश्य बांधवांच्या अडी अडचणी समजून घेवून त्यांचे निवारण करणे.

२) अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे.

३) अस्पृश्य बांधवांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे.

४) अस्पृश्य बांधवांना खऱ्या धर्माची शिकवण देणे इत्यादी.

या मिशनच्या शाखा मुंबई, पुणे, हुबळी, सातारा, ठाणे, दापोली, मालवण, मंगळूर, मद्रास, अकोला, अमरावती, इंदूर, भावनगर, कोल्हापूर या ठिकाणी उघडण्यात आल्या. या संस्थेच्या वतीने अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढणे, वसतीगृहे उघडणे, कीर्तने आयोजन करणे, व्याख्याने आयोजीत करणे इत्यादी उपक्रम हाती घेतले होते.

**● अस्पृश्यता निवारण परिषदांचे आयोजन :**

अस्पृश्यांचे प्रश्न समजून घेणेसाठी त्यांनी देशभर दौरे काढले व या प्रश्नावर जनजागृती घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ठिकठिकाणी अस्पृश्यता निवारण परिषद भरविल्या. सन १९१७ मध्ये कोलकत्ता येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात अस्पृश्यता निवारण्यासंबंधीचा ठराव संमत व्हावा म्हणून पुढाकार घेतला. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याची दिशा ठरविण्यासाठी महर्षी शिंदे यांनी २३ व २४ मार्च १९१८ रोजी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद आयोजीत केली. सन १९३३ मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक लिहून या प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

महर्षी शिंदे यांनी आपले संपूर्ण जीवन समाजसेवेसाठी वेचले. समाजातील दीन, दुबळ्या व उपेक्षितवर्गाचे दु:ख दूर करण्यासाठी झटले. कसल्याही फळाची अपेक्षा न बाळगता आपले अंगीकृत कार्य जीवनाच्या अखेरपर्यंत चालू ठेवले. निराश्रीतांसाठी निवारा निर्माण करणाऱ्या माणसाला देव मानणारा आणि समाज हेच मंदिर समजणारा हा महापुरुष कर्मयोगी होता.

**● कालिचरण नंदा गवळी (१८८० ते १९६२) :**

यांनी अस्पृश्योद्धारासाठी १९११ मध्ये गोंदिया जिल्ह्यात मुलींची शाळा काढली. तसेच वाचनालय सुरू केले. अस्पृश्यांच्या व्यथा, वेदना, छळ, अन्याय, अत्याचार यास वाचा फोडण्यासाठी 'विटाळ विध्वंसक' या साप्ताहिकातून विचार मांडले. १९२० ते १९२३ या काळात ते मध्य प्रांत वऱ्हाडच्या कायदेमंडळावर गव्हर्नर नियुक्त अस्पृश्यांचे प्रतिनिधी होते. त्यावेळी त्यांनी अंदाजपत्रकात अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासासाठी केलेली तरतूद किती अपुरी आहे हे दाखवून दिले.

**● किसन बंदसोडे :**

यांनी अस्पृश्यांची शैक्षणिक, आर्थिक प्रगती व्हावी यासाठी 'सन्मान बोधक निराश्रित समाज' स्थापन

केला. तसेच १९१० मध्ये त्यांनी 'निराश्रित हिंदू नागरिक' हे साप्ताहिक सुरू केले व 'विटाळ विध्वंसक' हे साप्ताहिक १९१३ मध्ये सुरू केले. तसेच मजूर पत्रिका, चोखामेळा ही साप्ताहिकरूपी पत्रके काढली. त्यांचे हे लेखन दलित वर्गात क्रांती घडवून आणणारे ठरले. बंदसोडे यांनी नाटकाचे अनेक प्रयोग केले. तसेच त्यांना कथाकार, निबंधकार, संशोधक व कवी म्हणूनही ओळखले जात होते. त्यांनी 'महार जातीचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला. अस्पृश्यता निवारणेसाठी सहभोजन व झुणका-भाकरीचे यशस्वी प्रयोग केले.

● **राजर्षी छत्रपती शाहू महाराज (१८७४ ते १९२२) :**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सुधारणांद्वारे बहुजन समाजाला जागृत करण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. प्रजेची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी शाहू महाराज होते. त्यांनी विचारपूर्वक सामाजिक आणि राजकीय सुधारणा तत्वांबाबतीत कधीही तडजोड केली नाही. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व फक्त कोल्हापूर संस्थान, महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता भारतातही लोकप्रिय झाले. कोल्हापूर संस्थानाचे अधिपती या नात्याने त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यावर त्यांनी भर दिला. समाजसुधारणेच्या दृष्टीने अनेक कायदे केले. अस्पृश्य व दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. बहुजन समाजाला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी राजर्षी शाहूंनी प्रस्थापित समाजाविरुद्ध संघर्ष केला. त्यांच्या या कार्यामुळेच ते बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून लोकप्रिय झाले.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे धोरण स्वीकारले होते. शिक्षणाच्या प्रसारासाठी 'विद्याप्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली होती. कोल्हापूर येथे 'अस्पृश्य मुलींसाठी 'मिस क्लार्क वसतीगृह' सुरू केले (१९०७). तेथे अस्पृश्य मुलींची राहणे व भोजनाची व्यवस्था केली. १९१९ मध्ये कोणत्याही शिक्षकानी शाळेत अस्पृश्यांच्या मुलांची अस्पृश्यता मानावयाची नाही. त्यांना इतर मुलांप्रमाणे वागवावे. समान वागणूक देणेत यावी असे आदेश दिले. त्यांच्या संस्थानात अस्पृश्याना दरबारात राजवाड्यात नोकरीसाठी घेतले. शाहू महाराजांनी गंगाराम कांबळे या अस्पृश्याला कोल्हापूरात मध्यवस्तीत हॉटेल बांधून दिले. महाराज स्वत: तेथे चहा घेत असत. हरिजन तलाठी नेमले, त्यांना बढत्या दिल्या. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे बांधली. अस्पृश्यता पाळू नये असा हुकूम काढला. अस्पृश्यांना शाळा, विहिरी, तलाव, दवाखाने, पाणवठे खुले केले. वटहुकूम काढून सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे गुन्हा ठरविला. सुशिक्षित अस्पृश्य तरूणांना वकिलीच्या सनदा दिल्या. आंतरजातीय विवाह घडवून आणले. बेरड, रामोशी व फासेपारधी यांना समाजात दर्जा देण्याचा प्रयत्न केला. सन १९१९ मध्ये बलूतेदारी पद्धत बंद करण्याविषयीच्या कायद्याचा भंग करणाऱ्यांला शिक्षा देणारा कायदा केला. अस्पृश्य जातीतील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक साह्य करून त्यांना पुढील शिक्षणाची संधी मिळवून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही शिक्षणासाठी आर्थिक सहकार्य केले. सन १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे अस्पृश्यांची परिषद भरवली. नागपूर व दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदांचे अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले. अस्पृश्यंना नोकरीत आरक्षण दिले. अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाराचे केवळ विचार मांडले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीही केली.

## ● दलित चळवळीतील आंबेडकर पर्व :

दलित चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदय झाला. तेव्हा परिस्थिती बरीच पालटलेली होती. प्रश्नांचे स्वरूप अतिशय क्लिष्ट झाले होते. राष्ट्रसभेची चढती कमान, ब्रिटीश राज्यकर्त्यांचा प्रतिसाद, बदलते जागतिक राजकारणाचे संदर्भ, एकापाठोपाठ एक मंजूर होत असलेले सुधारणा कायदे, हिंदू-मुस्लिम तणावाचा वाढत चाललेला गुंता, अस्पृश्यांच्या प्रश्नांचे स्पष्ट होत चाललेले सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व मानसिक पदर आणि त्या अनुषंगाने सामाजिक सुधारणा चळवळीची कक्षा व्यापक करावी लागणार होती. ती डॉ. आंबेडकर यांनी दलित चळवळीच्या रूपाने या कालखंडात व्यापक केली असे दिलीपसिंह निकुंभ यांनी आपल्या 'महाराष्ट्रातील दलित चळवळ' शोध प्रबंधामध्ये म्हटले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समजल्या गेलेल्या महार जातीत जन्मलेले असल्यामुळे त्यांना अगदी बालपणापासूनच अस्पृश्यतेचे चटके बसले होते. १९१७ मध्ये इंगलंडमधून परत आल्यानंतर त्यांनी बडोदा संस्थानात नोकरी सुरू केली. त्यावेळी अस्पृश्य जातीमुळे त्यांना इतरांकडून जी मानहानीकारक वागणूक मिळाली त्यामुळे त्यांचे मन पेटून उठले. त्यामुळे साहजिकच त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सर्वाधिक महत्त्व दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य बांधवांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्यास व त्यांचा स्वाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न सुरू केला. १९२० मध्ये कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रोत्साहनाने 'मूकनायक' हे मासिक सुरू केले. अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देताना ''अस्पृश्य देखील याच देशाचे नागरिक असून इतरांइतकाच त्यांचा देखील या देशावर हक्क आहे. अस्पृश्यांनी इतरांच्या मेहरबानीवर व सहानुभूतीवर जगण्याचे कारण नाही. त्यांनी अन्यायाविरुद्ध झगडून आपले न्याय हक्क मिळवले पाहिजेत.'' अशी शिकवण त्यांनी आपल्या बांधवांना दिली. दलितांना आपले हक्क मिळवून देण्यासाठी लढाऊ कार्यक्रम देऊन त्यांच्या जाणीव-जागृती घडवून आणण्यासाठी अस्पृश्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला.

### अ) बहिष्कृत हितकारिणी सभा :

अस्पृश्यांचा आर्थिक व राजकीय विकास घडवून आणण्यासाठी व त्यांना सामजिक दास्यातून मुक्त करण्यासाठी तसेच भारतीय समाजापुढे जातिसंस्थेने उभा केलेले भीषण आव्हान समूळ मोडून काढण्यासाठी २० जूलै, १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. या संस्थेमार्फत अस्पृश्य समाजात सुधारणा, जागृती व शिक्षण प्रसारावर भर देऊन दलित समाजात शिक्षणाचा प्रसार केला. अस्पृश्यांना शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही. अशी त्यांची खात्री निर्माण झाल्यामुळे प्रथमपासूनच शैक्षणिक कार्याकडे त्यांनी लक्ष केंद्रीत केले. शिक्षणामुळेच अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव होऊन ते प्राप्त करून घेण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील. असे बाबासाहेबांना वाटत होते म्हणून या संस्थेमार्फत त्यांनी दलित समाजातील तरूण व प्रौढ व्यक्तींसाठी रात्रीच्या शाळा चालविल्या. तसेच वाचनालये सुरू केली. शिक्षणासारख्या पवित्र व मानवतावादी कार्याची जबाबदारी, दलित विद्यार्थ्यांकडून सहानुभूतीने पाहू शकतील व त्याचा तेजोभंग करणार नाहीत, अशा शिक्षकांवर सोपवली पाहिजे. यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. सोलापूर, पनवेल, ठाणे

इत्यादी ठिकाणी विद्यार्थी वसतीगृहे सुरू करून दलितांच्या शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली.

**ब) समता सैनिक दल :**

१९२६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित-शोषितांची एक गैरराजकीय व सांस्कृतिक संघटना म्हणून समता सैनिक दलाची स्थापना केली. युवकांचे ऐक्य, कल्याण आणि उत्कर्ष, तसेच त्यांचे जीवित, प्रतिष्ठा व मालमत्ता यांच्या संरक्षणासाठी 'शीलावर आधारीत शक्ती' असे बोधवाक्य देऊन समता सैनिक तल उभे केले. या दलाद्वारे दलित, शोषित तरूणांच्या मानसिक, शारीरिक व आर्थिक सामर्थ्यात भर टाकण्यास त्यांनी शिक्षण अनुशासन, आत्मनिर्भरता व रचनात्मक कार्यासाठी शक्तीचा वापर करण्याची प्रेरणा मिळाली.

**क) महाडचा सत्याग्रह :**

महाड या गावामध्ये चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेण्याचा अधिकार नव्हता. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढा उभारला. वास्तविक पाहता तेथील नगरपालिकेने एक ठराव करून ते तळे अस्पृश्यांसाठी अधीच खुले केले होते. पण अस्पृश्य बांधव स्पृश्यांच्या भितीमुळे त्यापासून लांबच राहिले होते. म्हणून अस्पृश्यांना आपला हक्क बजावण्यासाठी संघटित करून २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह करून महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले करून घेतले. आस्पृश्य आपल्या हक्कांची आता भीक मागणार नाहीत तर ते आपले हक्क स्वत:च्या बळावर मिळवतील असा इशारा लढ्याने देऊन महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांचाही हक्क आहे हे आपल्या कृतीने पटवून दिले.

**ड) मनुस्मृतीचे दहन :**

मनुस्मृती हा हिंदू समाजाचा एक धर्मग्रंथ आहे. पण याच ग्रंथाने जातिव्यवस्था व अस्पृश्यतेसंबंधीचे निर्बंध यांचे समर्थन करून हिंदू समाज पद्धती व जातिसंस्था यांना बळकटी प्राप्त करुन देण्याचे काम केले आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत. तेव्हा सामाजिक विषमता व उच्च-नीच भेदभाव यांचे समर्थन करणाऱ्या या ग्रंथांविरुद्ध प्रतिकात्मक कृती करण्यासाठी २५ डिसेंबर १९२७ रोजी त्यांनी मनुस्मृतीचे दहन केले.

**इ) मंदिर प्रवेशासाठी सत्यागृह :**

हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्य जातीतील लोकांना अनेक हक्कांपासून वंचित ठेवले होते. मंदिरामध्ये प्रवेशाचा हक्कही त्यांना नाकारण्यात आला होता. अस्पृश्यांना हा हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करण्याचे ठरविले. या संदर्भात ते म्हणाले की, ''आम्हाला ही गोष्ट सिद्ध करावयाची आहे की, आमच्या प्रवेशाने देवालये भ्रष्ट होत नाहीत किंवा स्पर्शाने मुर्तीचे पावित्र्य कमी होत नाही. देवळे जरी स्पृश्य हिंदूनी बांधली तरी ती हिंदू धर्माची असून हिंदू धर्माकरिता बांधलेली आहेतच. हिंदुत्व जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे तितकीच अस्पृश्यांचीही आहे.'' मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहासाठी नाशिक येथील काळाराम मंदिराची निवड करून सत्याग्रह केला. त्यानंतर महाराष्ट्रात इतर ठिकाणी अशा प्रकारचे सत्याग्रह करून अस्पृश्यांसाठी मंदिर प्रवेशासाठी सुरूवात करण्यात आली.

**ई) धर्मांतर :**

हिंदू धर्मात राहूनच अस्पृश्यांचे हक्क मिळवून घेण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले. पण सवर्ण हिंदूंची अस्पृश्यासंबंधीची अनुदार वृत्ती अनुभवल्यानंतर हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांना स्वाभिमानाने जगता येणार नाही. म्हणूनच १९३५ मध्ये येवला येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी असे म्हणाले की, ''दुर्दैवाने मी हिंदू म्हणून अस्पृश्य जातीत जन्माला आलेलो असलो तरी मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही.''

हिंदू धर्मात अस्पृश्यांना न्याय द्यावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. तरीही हिंदूंच्या वृत्तीत फरक न पडल्याने १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर लाखो दलित बांधवांसह नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा त्यांनी घेतली.

- **अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक हक्कांसाठी जसा लढा दिला तसेच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांचे नेतृत्व केले. १९२७ मध्ये सरकारने त्यांना विधीमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त केले. तेव्हापासून त्यांनी दलितांच्या न्याय्य हक्कासाठी जे वेगवेगळे लढे दिले व अस्पृश्यांच्या राजकीय व शैक्षणिक हक्कांसाठी कार्य केले ते खालीलप्रमाणे -

**अ) स्वतंत्र मतदारसंघाची मागणी व पुणे करार :**

१९३० ते १९३२ च्या दरम्यान इंग्लंडमध्ये ज्या तीन गोलमेज परिषदा घेण्यात आल्या त्यात अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. यापूर्वी मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले होते. अस्पृश्यांनाही राजकीय न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद नव्या घटनेत करावी अशी मागणी डॉ. आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत केली. परिणामी १९३२ मध्ये इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्स मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य केली. पण महात्मा गांधी यांचा अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास विरोध होता. त्यामुळे त्यांनी येरवडा तुरुंगात उपोषण सुरु केले. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न केले. महात्मा गांधींचे प्राण वाचावेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी तडजोडीस मान्यता दिली. महात्मा गांधी व डॉ. आबेंडकर यांच्यात एक करार झाला. हा करार 'पुणे करार' म्हणून ओळखला जातो. या करारानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह सोडून अस्पृश्यांसाठी राखीव जागा असाव्यात हे मान्य केले.

**ब) स्वतंत्र मजूर पक्ष :**

पूर्वास्पृश्यांच्या प्रतिनिधीत्वासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जसा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे शेतकरी-कष्टकरी वर्गाच्या आर्थिक दुरावस्थेची कारणमिमांसा करून श्रमिकांची जातीनिरपेक्ष तत्वावर संघटना बांधण्यासाठी प्रयत्न केले. भारतीय श्रमिकांची जातिबंधनापासून मुक्तता करण्यासाठी, सामाजिक क्रांतीला राजकीय व आर्थिक

आधार देण्यासाठी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्यांच्या मते 'येथील कामगार चळवळीची उद्दिष्टे केवळ आर्थिक असून भागणार नाही; ती शोषणमुक्ती जातीमुक्ती अशा दुहेरी असली पाहिजे.' १९३७ च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणूकीत या पक्षाला चांगले यश मिळाले. मुंबई विधिमंडळात विरोधी पक्ष म्हणून महत्त्वाची भूमिका स्वतंत्र मजूर पक्षाने पार पाडली. यावेळी खोती निर्मूलन विधेयक, महार-वतने नष्ट करणारे विधेयक, शेतकऱ्यांचा मोर्चा, गिरणी कामगारांचा संप अशा कित्येक कामे विधिमंडळात व बाहेर या पक्षाच्या वतीने दलित-कामगार-शेतकरी समाजात केली गेली. स्वतंत्र मजूर पक्षाचे सामाजिक, आर्थिक ध्येय धोरण हा दलित चळवळीला लाभलेल्या आंबेडकरी वारशाचा अत्यंत मोलाचा भाग आहे.

**क) शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन :**

देशातील अमानुष आणि विषम समाजव्यवस्थां, लोकांच्या हाडी मुलेली जातिप्रथा आणि समाजातील स्पृश्यास्पृश्यता यांच्या परिणामातून स्वतंत्र मजूर पक्षाऐवजी अनुसूचित जातींच्या विशिष्ट हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर दलितांची उपेक्षा होऊ नये, त्यांना विशेष सोयी-सवलती व संरक्षण प्राप्त करून घेता यावे साठी त्यांची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी १९४२ मध्ये 'शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन'ची स्थापना केली. या फेडरेशनने पूर्वास्पृश्यांना हिंदूपासून वेगळा अल्पसंख्यांक गट म्हणून मान्यता मिळावी आणि त्यांचे हित व हक्क सुरक्षित रहावेत याकरिता विशेष संविधानिक तरतुदी करण्याचा फेडरेशनचा आग्रह धरला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकार्य मिळविण्यासाठी पंडित नेहरूंनी पुढाकार घेतला. नवस्वतंत्र राष्ट्राच्या संविधानिक जडणघडणीमध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. त्यांनी संविधान परिषदेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अपार परिश्रम घेतले. संविधानामध्ये दलितांसाठी काही हक्क संरक्षण व सवलती नमूद केल्या. त्या आधारे दलितांना नवीन प्रतिष्ठा व सन्मान प्राप्त करून दिला. अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव जागा व सवलती देऊन हजारो उच्चशिक्षित, दलित तरुणांना सनदी अधिकार पदावरून व विधानसभांतील जागावर जाण्याच्या वाटा खुल्या केल्या. याच काळात पंडित नेहरुंच्या मंत्रिमंडळात कायदा मंत्री असताना डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मातील जाती-जमातीत एकात्मता निर्माण करण्याकरिता हिंदू कोड बिल केले. या बिलाला विरोध झाल्याने डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

**ड) रिपब्लिकन पक्ष :**

संविधानामध्ये दलितांच्या राखीव जागांचा समावेश केला असला तरी प्रत्यक्षात त्याचा लाभ सधन व साधनसंपन्न दलितांनीच घेतल्यामुळे सर्वसामान्य दलित लाभापासून वंचित राहिले. १९५२ च्या निवडणुकांमध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशनला अपयश आले. विधानसभांच्या ५५२ जागा लढवलेला पक्ष फक्त १६ जागांवरच विजयी झाला. या निवडणुकीमध्ये स्वत: बाबासाहेबांनाही हार पत्करावी लागली. म्हणून नव्या राजकारणाच्या संदर्भात दलितांच्या संघटनांना उभा करून भागणार नाही तर स्पृश्यांमधील एखाद्या मोठ्या गटाचे सहकार्य मिळावे लागेल हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले. स्पृश्यास्पृश्य, गरीब स्पृश्य, अनुसूचित जाती व जमाती यांची एकत्र ताकद उभी करून काँग्रेसला तुल्यबळ ठरू शकेल व याचबरोबर दलितांच्या हितसंबंधांच्या संरक्षण-संवर्धनाच्या दृष्टीनेही हे संघटन उपयोगी ठरेल याची तयारी डॉ. आंबेडकरांनी सुरू केली. पण ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे

महानिर्वाण झाल्यामुळे हा संकल्प तडीस गेला नाही. परंतु दलित चळवळीतील अन्य कार्यकर्त्यांनी डॉ. आंबेडकरांचा हा संकल्प पूर्ण करण्यासाठी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन विसर्जित करून नवा पक्ष काढण्याचा निर्णय घेतला. १९५७ च्या निवडणूकीत महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचा घटक पक्ष म्हणून शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे अनेक उमेदवार विधानसभेसाठी, लोकसभेसाठी निवडून आले होते. पण दलित चळवळीचा उद्देश तेवढ्याने साध्य होणार नव्हता म्हणून दलित चळवळीच्या नेत्यांनी ऑक्टोबर १९५७ मध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन विसर्जित करून रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. या पक्षाची मूख्य भूमिका जाती-पोटजातींच्या मर्यादांमध्ये न अडकता इतर जातींनाही, ज्यांची लोकशाही समाजवादावर निष्ठा आहेत त्यांना प्रवेश द्यावा अशी होती. पक्षाच्या सुरूवातीला तीन मागण्या होत्या त्या म्हणजे -

१) दलितांच्या सवलती नव बौद्धांनाही मिळाव्यात.

२) महार वतन रद्द व्हावे.

३) नागपूरची दिक्षाभूमी आंबेडकर स्मारकासाठी मिळावी.

● **अस्पृश्यांच्या शिक्षणाचे कार्य :**

शिक्षण हे समाजोन्नतीचे एक प्रभावी साधन आहे. शिक्षणातून व्यक्तीचा मानसिक आणि बौद्धीक विकास होतो. असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हा त्यांचा शैक्षणिक व तत्त्वज्ञानाचा पाया आहे. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी २० जुलै १९२४ रोजी डॉ. बाबासाहेबांनी 'बहिष्कृत हितकारिणीसभा' या संस्थेची स्थापना केली. १९४६ मध्ये त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सासोयटीची' स्थापना केली. यास संस्थेच्या वतीने मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली. दलित समाजाच्या अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी वसतिगृहांची निर्मिती केली. परिषदा, मेळावे, सभा घेऊन स्त्री-पुरुषांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले.

● **वृत्तपत्रे व ग्रंथ :**

वर्तमानपत्र हे समाजाच्या विचारांना चालना देण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य करते. भारतातील अस्पृश्यतेच्या मुक्ततेच्या लढ्यासाठी वृत्तपत्रांची नितांत आवश्यकता आहे याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. अस्पृश्यांच्या चळवळीमागील भूमिका स्पष्ट करणे व या चळवळीला ज्यांनी विरोध केला त्यांना सडेतोड उत्तर देण्यासाठी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मुकनायक' पाक्षिक सुरू केले. या पाक्षीकासाठी राजर्षी शाहू महाराजांनी अडीच हजार रुपये देणगी दिली. सन १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' पाक्षीक सुरू केले. १९२८ साली समता परिषदे तर्फे 'समता' पत्र सुरू केले. त्यानंतर बाबासाहेबांनी 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' ही पत्रे सुरू केली. त्यांनी या वृत्तपत्रांतून अस्पृश्यांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्यायाला वाचा फोडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ग्रंथाला गरु मानत असत. परदेशात असताना त्यांनी विविध विषयावर चिंतन केले. कोणत्याही विषयाची मांडणी सखोल संशोधन करून मांडणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. प्रारंभीच्या काळातील आर्थिक स्थिती व सिद्धांता विषयीचे त्यांचे प्रबंध व ग्रंथ नंतरच्या काळातील हिंदू धर्माच्या मीमांसेच्या संदर्भात

त्यांनी केलेले लिखान यावरून त्यांच्या विध्वत्तेची व बुद्धीमत्तेची प्रचीती येते. शिक्षण संस्था, वाचनालये, वृत्तपत्रे, सभा, संमेलने, परिषदा आणि विविध ग्रंथ याद्वारे आपल्या अस्पृश्य बांधवांना संघटित करून सुशिक्षित करण्याचे कार्य केले. त्यामध्ये 'हू वेअर दी शुद्राज?', बुद्ध ॲण्ड हिज धम्म, द अनटचेबल्स, दि प्रॉब्लम ऑफ रुपी, रिडल्स इन हिंदुझम, थॉटस् ऑफ पाकिस्तान, महाराष्ट्र ॲण्ड अलिग्विस्टिक स्टेट आणि स्टेट ॲण्ड मायनॉरिटीज इत्यादींचा समावेश होतो.

अशा पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याला भारताच्या इतिहासात तोड नाही.

**● डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतरची दलित चळवळ :**

सुरूवातीला आपण डॉ. आंबेडकर यांच्या पुर्वीच्या दलित चळवळींचा अभ्यास केला. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळात त्यांनी कशा प्रकारे दलित उद्धारासाठी कार्य केले त्याचा आढावा घेतला. डॉ. आंबेडकरानंतर जेव्हा आपण दलित चळवळीचा आढावा घेतो त्यामध्ये दादासाहेब गायकवाड, सी. एन. शिवराज, जी. टी. मेश्राम, बी.सी. कांबळे, आर.एस. गवई, बळवंतराव वराळे, बी. जी. खोब्रागडे, हरिहर सोनुले इत्यादींचा समावेश होतो. डॉ. आंबेडकरांनी आर्थिक व राजकीय स्वरूपाचे प्रश्न सोडवण्यासाठी नागपूर येथे व्यापक तत्त्वज्ञानावर आधारीत नव्या रिपब्लिकन पक्षाची स्थापना करणार अशी घोषणा केली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या अनुयायांनी ऑक्टोबर १९५७ मध्ये सी. एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापन केला. या पक्षाच्या वतीने दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूमिहीनांचा सत्याग्रह घडवून आणला. त्यामुळे दलित व भुमिहिनांना सरकार पडीक जमिनी मिळाल्या. त्यामुळे दलित, आदवासी व शोषित समाजाला आर्थिक व सामाजिक न्याय मिळाला. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यामध्ये सी.एन. शिवराज, दादासाहेब गायकवाड, आर. डी. भंडारे, बी.सी. कांबळे, राजभोज, राजाभाऊ खोब्रागडे ही प्रमुख मंडळी होती.

**● डॉ. आंबेडकरानंतरचे दलित साहित्य :**

दलितांच्या प्रश्नांविषयी व स्थितीविषयी साहित्याची निर्मिती डॉ. बाबासाहेबानंतर अनेक दलित लेखक, कवी व साहित्यीकांनी केली. त्यामध्ये 'जेव्हा मी जात चोरली' हे बाबुराव बागुल लिखित विद्रोही कथासंग्रहाने बंडखोरीचा पुरस्कार केला होता. यानंतर आणखीन काही ग्रंथ साहित्य पुढे लिहिले गेले. यामध्ये दया पवार – बलुत, आठवणीचे पक्षी – प्र. इं. सोनकांबळे, उपरा – लक्ष्मण माने, अक्करमाशी – शरणकुमार लिंबाळे, कोल्हाट्याच पोर – डॉ. किशोर काळे, माझ्या जन्माची चित्तरकथा – शांताबाई कांबळे, आभरान – पार्थ पोळके, उचल्या – लक्ष्मण गायकवाड, एक गाव पाणवठा – बाबा आढाव, जिणं आमचं – बेबी कांबळे, मिटलेली कवाड – मुक्ता सर्वगाडे इत्यादी तसेच अनेक काव्य संग्रहानीही दलितांवर झालेले अन्याय, अत्याचार, वेदना, दुःख इत्यादीना वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यामध्ये दया पवार – कोंडवाडा, वामन निंबाळकर – गावकुसाबाहेरच्या कविता, त्रिंबक सपकाळे – सुरुंग, प्रल्हाद चेंदवणकर – ऑडिट, प्रज्ञा कांबळे – उत्कट जीवघेण धर्मांतर, नामदेव ढसाळ – गोलपिठा इत्यादींचा समावेश होता.

या बरोबरच दलित समाजातील एक प्रभावी लेखक म्हणून आण्णाभाऊ साठे यांचेकडे पाहिले जाते. त्यांचे योगदान संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही महत्वाचे आहे. भटक्या समाजाचे प्रश्न आण्णाभाऊंनी अत्यंत आत्मीयतेने, कथा-कादंबऱ्यांमधून मांडले. 'स्मशानातील सोन' ही कथा व 'फकिरा' ही कादंबरी सर्वोत्तम आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून दलितांच्या जीवनाची मांडणी केली.

अशाप्रकारे महाराष्ट्राच्या इतिहासात मागासवर्गीयांच्या उन्नतीच्या चळवळी उभ्या राहिल्या. त्यांनी मागासवर्गीयांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनात परिवर्तन करण्याचा महत्त्वपूर्ण व प्रभावीपणे प्रयत्न केला. त्यामुळे क्रांतिकारी परिवर्तनवादी चळवळ म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांचा उल्लेख केला जातो.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विटाळ विध्वंसक हे साप्ताहिक कोणी सुरू केले.

२) मिस क्लार्क वसतिगृहाची स्थापना कोणी केली.

३) स्मशानातील सोनं ही कथा कोणाची आहे.

४) डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना कोणी केली.

५) सन्मान बोधक निराश्रीत समाज ची स्थापना कोणी केली.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) ............ यांनी सन १८५३ मध्ये महार, मांग इत्यादी लोकांना विद्या शिकवण्याकरीता मंडळी नावाची संस्था काढली.

अ) शिवराम जानबा कांबळे  ब) महात्मा फुले

क) राजर्षी शाहू महाराज ५) महर्षी वि. रा. शिंदे

२) अस्पृश्य समाजातील व्यक्तीला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र ............ यांनी दिला.

अ) बाबा पद्मनजी  ब) शिवराम कांबळे

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर  ड) सर चंदावरकर

३) महाडचा सत्याग्रह ............ साली झाला.

अ) १९२०  ब) १९२७  क) १९४०  ड) १९३०

४) स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना ........... साली झाली.

अ) १९४० ब) १९३६ क) १९४४ ड) १९५०

५) गोपालपिठा या काव्यसंग्रहाचे ........... हे लेखक होते.

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) आण्णाभाऊ साठे

क) नामदेव ढसाळ ड) लक्ष्मण माने

## ३.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सन १८७९ २) शेतकऱ्यांचा आसूड ३) सन १९४८

४) १९४८ ५) नारायण मेघाजी लोखंडे

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) ५४ २) प्रो. एन. जी. रंगा ३) सीताराम बोले व कॅ. हरिश्चंद्र तालचरेकर

४) दीन बंधू ५) १९३६

- **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) राजाराम मोहन रॉय २) स्त्री-पुरुष तुलना ३) महर्षी धोंडो केशव कर्वे

४) बाबा पद्मनजी ५) सावित्रीबाई फुले

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) १९४७ २) १८६३ ३) डॉ. रखमाबाई राऊत

४) विधवा पुनर्विवाहाचा कायदा ५) १० मार्च १९१५

- **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) किसन बंदसोडे २) छत्रपती शाहू महाराज ३) आण्णाभाऊ साठे

४) विठ्ठल रामजी शिंदे ५) किसन बंदसोडे

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) महात्मा फुले  २) डॉ. बाबासाहेब आंबेडकर  ३) १९२७

४) १९३६  ५) नामदेव ढसाळ

## ३.४ सारांश :

महाराष्ट्रातील पारंपारिक सामाजिक चळवळी म्हणून शेतकरी, कामगार, दलित व स्त्रीयांच्या चळवळीचा अभ्यास आपण या घटकामध्ये केला. शेतकरी चळवळी प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळात जोमाने सुरू झाल्या. परंतु त्यांची सुरूवात ही ब्रिटीश राजवटीतच झाली. शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्यावर सावकार, भांडवलदार मोठे जमिनदार यांच्याकडून होणारी पिळवणूक कमी करण्याच्या उद्देशाने शेतकरी चळवळी अस्तित्वात आल्या. त्यामुळेच काही प्रमाणात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे शक्य झाले.

कामगारांना कामाची शाश्वती, कामाचा योग्य मोबदला, त्यांना संरक्षण व सहाय्य मिळावे या हेतूने कामगार चळवळी अस्तित्वात आल्या. त्यासाठी कामगार संघटनांची निर्मिती झाली. ब्रिटीश राजवटीपासून आजपर्यंत कामगार चळवळी कामगारांच्या हितासाठी कार्यरत असल्याचे दिसते.

शेतकरी, कामगार यांच्या हक्काप्रमाणेच स्त्रियांना आपले हक्क व न्याय मिळवून देणेसाठी व त्यांच्या शिक्षणासाठी अनेक समाज सुधारकांनी योगदान दिले. त्यामध्ये महात्मा जोतीबा फुले, महर्षी कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे यांचे योगदान महत्वाचे आहे.

दलित चळवळीच्या साह्याने दलित वर्गाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांना जागृत व संघटित करणे, शिक्षणातून त्यांच्यावर सुसंस्कार घडवून आणणे, चळवळीत सक्रिय सहभागी होण्यास प्रवृत्त करणे इ. त्यासाठी संघटनाबांधून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक व राजकीय विकास घडवून आणण्याचे कार्य या चळवळीने केले. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अगोदर व डॉ. आंबेडकरांच्या काळामध्ये व नंतरही चळवळी घडून आलेल्या आहेत.

## ३.५ सरावासाठी प्रश्न.

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या चळवळीची माहिती द्या.

२) नारायण मेघाजी लोखंडे यांचे कार्य स्पष्ट करा.

३) महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्री मुक्तीसाठी केलेल्या कार्याची माहिती द्या.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याची माहिती द्या.

५) राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्योद्धारासाठीचे कार्य स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) शिवराम जानबा कांबळे

२) महर्षी वि. रा. शिंदे

३) पंडिता रमाबाई

४) मुळशी सत्याग्रह

५) शेतकरी कामगार व सर्व शेतकरी चळवळ

६) ताराबाई शिंदे

७) रिपब्लिक पक्ष

९) फैजपूर अधिवेशन

९) कामगार चळवळीच्या उदयाची कारणे

१०) महर्षी धोंडो केशव कर्वे

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१) जोशी शरद, शेतकरी संघटना : विचार आणि कार्य पद्धती, शेतकरी प्रकाशन, १९८२.

२) पाध्ये रमेश : शेतकरी आदोलन, एल्गार प्रकाशन, १९८५.

३) महात्मा फुले : शेतकऱ्यांचा आसुड.

४) कदम मनोहर : नारायण मोघाजी लोखंडे यांचे चरित्र.

५) डॉ. शिंदे पी. एन., थोरात ए. जी : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१९०० ते १९६०), फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) पाटील व्ही. बी. : १९ व्या शतकातील समाज सुधारणेचा इतिहास, के. सागर प्रकाशन, पुणे.

७) महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास (संपा) विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

८) सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नोटस्.

९) डॉ. गणेश राऊत, डॉ. पी. एन. शिंदे, प्रा. ए. जी. थोरात : आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९५०) डायमंड पब्लिकेशन, पुणे.

१०) फडके य. दि. : विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते २, मौज प्रकाशन, मुंबई.


❖❖❖

**घटक – ४**

# संयुक्त महाराष्ट्र चळवळ

**अनुक्रमणिका :**

४.० उद्दिष्टये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ महाराष्ट्राचा भूगोल व ऐतिहासिक वारसा

४.२.२ भाषावार प्रांतरचनेची पार्श्वभूमी

४.२.३ संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी.

४.२.४ महाराष्ट्र राज्य निर्मितीतील घटनाक्रम.

४.२.५ संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना व कार्य (१९५६).

४.२.६ मुंबई पुनर्रचना कायदा (१९६०) व महाराष्ट्राची निर्मिती.

४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

**४.० उद्दिष्टये :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी समजेल.

२. आंदोलनातील लोकसहभाग व विविध पक्ष-संघटनीचे योगदान स्पष्ट होईल.

३. संयुक्त महाराष्ट्र समितीचे योगदान स्पष्ट होईल.

४. महाराष्ट्र राज्य निर्मितीतील घटनाक्रम समजून येईल.

५. साहित्यीक, पत्रकार व शाहिरीचे योगदान समजून येईल.

६. भाषावार प्रांतरचनेचे लोकशाही संघराज्यातील महत्त्व समजून येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

मानवी संस्कृतीत भाषा ही संदेश वहनाचे माध्यम आहे. तसेच समुहाला भावनिक पातळीवर एकत्र आणणारी प्रादेशिक अस्मिता सुद्धा आहे. मराठी भाषा महाराष्ट्रातील जनतेसाठी मायबोली आहे. मराठी भाषिकांचे राज्य अस्तित्वात आणण्यासाठी १०६ हुतात्म्यांना रक्त सांडावे लागल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र राज्य १ मे, १९६० साली स्थापन झाले. लेखक, कलावंत, पत्रकार विविध पक्ष-संघटना कामगार व विविध जातीधर्माच्या सर्वसामान्य लोकांनी स्वतंत्र भारतातील सर्वात मोठा लोकलढा उभा करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले. भाषा, प्रशासकीय सोय व लोकमानस या त्रिसुत्रीच्या आधारे भारतात विविध राज्ये अस्तित्वात आली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये मराठी, गुजराथी, उर्दु, हिंदी व तेलगू भाषिकांनी उत्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

मराठी साहित्य संमेलन, संयुक्त महाराष्ट्र समिती श्रीधर तथा एस्. एम. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, प्र. के. अत्रे, केशवराव जेधे, जयवंतराव टिळक, प्रा. मधु दंडवते, यशवंतराव मोहिते, धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, डॉ. बाबासाहबे आंबेडकर, लोकशाही अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आदिंनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेतृत्व केले. कामगार वर्गाने मोठे आंदोलन उभे केले. भाषावार प्रांतरचना राष्ट्रीय एकात्मतेला बाधक ठरेल असे काँग्रेस नेतृत्वाला वाटत होते. परंतू भाषिक अस्मिता, प्रादेशिक प्रशासकीय सोय व लोकमानसाच्या दबावापुढे भाषावार प्रतिरचनेचे तत्त्व केंद्रीय प्रशासनाला स्विकारावे लागले. राष्ट्रीय काँगेस पक्ष, कम्युनिष्ठ पक्ष, जनतापक्ष शेतकरी कामगार पक्ष, सोशालिस्ट, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, प्रजासमाजवादी पक्ष तसेच विविध कामगार संघटनांनी लोकशाहीच्या सनदशिरमार्गाने लोकलढा उभा करून नव्या आधुनिक महाराष्ट्राचे तोरण बांधले.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ महाराष्ट्राचा भूगोल व ऐतिहासिक वारसा :

आजच्या महाराष्ट्र राज्याचे त्याच्या भौगोलिक परिस्थितीनुसार पाच विभाग पडतात. कोकण, देश, खानदेश मराठवाडा व विदर्भ हे होय. दख्खन पठारावर वसलेल्या या प्रदेशाला अरबी समुद्र किनारपट्टी आहे. १५° ४४'' ते २२° ०६'' उत्तर अक्षांश आणि ७२° ३६'' ते ८०° ५४ पूर्व रेखांशावर हे राज्य वसलेले आहे. राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढे आहे. महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे, ३५८ तालुके, ३७८ नगरे व ४३,७११ खेडी आहेत. तर लोकसंख्या ११,२३,७४,३३ (सन २०११ जनगणना)

महाराष्ट्र हा पुराणकाळात दंडकारण्याचा अर्थात दक्षिणापथाचा एक भाग होता. मौर्यपुर्वकाळात भारतात जी सोळा महाजनपदे होती. त्यापैकी अश्मक व मुचक महाराष्ट्रात होती. महाराष्ट्राच्या विविध भागात मौर्य,

सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, कदंब, शिलाहार, चालुक्य व यादव यांच्या राजवटी प्राचीन काळात होऊन गेल्या. मध्ययुगीन काळात अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणाने महाराष्ट्रात इस्लामी राजवटीचा प्रारंभ झाला. बहामनी राज्याची स्थापना व विघटन होऊन अहमदनगर, विजापूर, बिदर, बुऱ्हाणपूर व गोवळकोंडा येथे पाच शाह्या निर्माण झाल्या. मुघलसत्ता काही काळ महाराष्ट्रातील प्रदेशावर राहिली. मध्ययुगातील या राजवटींच्या विरुद्ध संघर्ष करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र व स्वाभिमानी मराठी सत्तेची स्थापना केली. पुढे पेशवाईच्या काळात स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले. ब्रिटीशांनी पेशवाईचा अस्त करून महाराष्ट्र ताब्यात घेतला. या इंग्रजी राजवटीबरोबर महाराष्ट्रात प्रबोधनाचे युग सुरू झाले. पाश्चात्य शिक्षणाने महाराष्ट्रातील समाज भारावून गेला. धार्मिक व सामाजिक चळवळी सुरू झाल्या. त्यातूनच जनतेतील राष्ट्रवाद जागृत झाला. राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम, भाषा प्रेम यांची रूजवणूक झाली. २० व्या शतकात स्वातंत्र्य चळवळ तिव्र बनली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. राष्ट्रीयत्वाची व राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रखर बनत गेली. तशीच प्रादेशिक अस्मिता सुद्धा वाढीस लागली. स्वयंनिर्णयाचे तत्त्व केंद्राप्रमाणेच प्रांताला सुद्धा लागू झाले पाहिजे असे जनतेला वाटू लागले. राष्ट्रीय चळवळ सुरू असतानाच भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरू लागली होती.

**४.२.२ भाषावार प्रांतरचनेची पार्श्वभूमी :**

इंग्रजांनी भारतात जी प्रांतरचना केली होती ती कोणत्याही शास्त्रीय तत्वावर आधारलेली नव्हती. म्हणून लोकशाही स्वराज्य पक्षाने (काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी) आपल्या उद्देशपत्रिकेत भाषावार प्रांतरचनेचा आग्रह धरला होता. राष्ट्रपिता म. गांधीजींनी शालेय शिक्षणाचे माध्यम मातृभाषेतूनच असावे असा आग्रह धरला होता. ब्रिटीशांनी निर्माण केलेले एक-एक प्रांत बहुसांस्कृतिक व बहुभाषिक होते. मातृभाषेतून शिक्षणाद्वारेच भाषिक तत्वावरील राज्ये निर्माण होणार होती हे जाणूनच राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने मातृभाषेतूनच आपले राजकीय कार्य सुरू केले. सन १९२० सालच्या नागपूर अधिवेशनात राष्ट्रपिता म. गांधीजींनी भाषावार प्रांतरचनेचा ठराव मांडला. सन १९१९ च्या मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड अहवालात राज्यपुनर्रचनेची रुपरेशा दिली गेली. १९२८ सालच्या नेहरू रिपोर्टने भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केला. भारतीय स्वातंत्र्य दृष्टीपथात आल्यानंतर फुटिरवादी वृत्ती वाढीस लागून भारतीय संघराज्याच्या एकात्मतेला धोका निर्माण झाला. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरूं सारख्या राष्ट्रीय नेतृत्वांना भाषिकतत्त्वांवर प्रांतरचनेचा प्रश्न तुर्तास मागे ठेवावा लागला.

याचवेळी भारतीय राज्यघटना लिहिण्याचे काम सुरू झाले. भाषावार प्रांतरचना करावी की नको या मुद्यावर दोन परस्पर विरोधी गट पडले.

**अ) भाषावार प्रांतरचना केल्यामुळे :**

१) त्या प्रांताची भाषा व संस्कृती यांचे संरक्षण व संवर्धन होईल.

२) त्या प्रांताचे सरकार व जनता यांची एकच भाषा झाल्याने त्यांच्यातील आदान-प्रदान वाढून लोकशाहीचा विकास होईल.

३) भाषिक एकता प्रस्थापित होईल.

**ब) भाषावार प्रांतरचना करू नये :**

१) भाषावार प्रांतरचना केल्यामुळे राज्याराज्यात फुटीरपणा बळावेल.

२) राष्ट्रीय एकात्मतेस घातक ठरेल.

३) प्रांताप्रांतात भांडणे व संघर्ष विकोपाला जाईल.

अशी भूमिका परस्पर विरोधी गटांनी घेतली. अशावेळी भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्यासाठी न्या. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली पहिलाच आयोग सन १९४७ साली नेमला गेला. या आयोगाने सन १९४८ साली आपलाअहवाल सादर करून त्यामध्ये भाषावर प्रांतरचनेला विरोध केला. भारताची फाळणी काश्मिरचा प्रश्न यामुळे हा प्रश्न अधिक उग्र व गंभीर बनला होता. संकुचित राष्ट्रवादाला खतपाणी मिळून राष्ट्रीय एकात्मतेला तडे जातील अशी भिती सर्वांनाच वाटत होती.

या अहवालाविरुद्ध तिव्र प्रतिक्रिया उमटल्या. संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी करणारे मराठी भाषिकांच्या संतप्त प्रतिक्रिया उमटून चळवळ अधिक गतिमान झाली. आंध्रप्रदेशाच्या निर्मितीसाठी तेलगू आंदोलकांनी उग्र निदर्शने केली.

**४.२.३ संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी :**

प्राकृत भाषा महाराष्ट्री व पैशाची आदि भाषेतून आधुनिक मराठी भाषेचा उगम झाला आहे. विंध्य-सातपुडा पर्वतरांगा पासून ते कृष्णा-पंचगंगा बेळगांव पर्यंत प्रदेशात ही भाषा बोलली जात होती. महावंश या बौद्ध धर्मग्रंतात महाराष्ट्र प्रदेशाचा उल्लेख येतो. मध्यप्रदेशातील एरणगांव येथे स.स. ३६५ च्या शिलालेखात 'महाराष्ट्रीय' असा पहिला लिखित उल्लेख येतो. इ.स. ७१२ मधील बदामी चालुक्य राजा पुलकेशी दुसरा याच्या ऐहोळ शिलालेखात महाराष्ट्राचा उल्लेख सापडतो. सातवाहनांच्या शिलालेखात महाराष्ट्रातील महारथी, महाराणी व महाभोज यांचा उल्लेख येतो. महाराष्ट्र शब्दाच्या व्युत्पत्ती विषयी विविध मतमतांतरे आहेत. डॉ. भांडारकर यांच्या मते, ''महाराष्ट्रातील राष्ट्रीकांनी स्वत:ला महाराष्ट्रीक वा महारठ्ठ व संस्कृतमध्ये महाराष्ट्र असे नाव मिळाले. डॉ. ओपार्ट यांच्या मते, 'महाराष्ट्रालाच मल्लराष्ट्र म्हणत असत. मार म्हणजे मल्ल व मार लोकांनाच म्हार असे म्हणत. त्यावरून मल्लांचे राष्ट्र हे महाराष्ट्र हे देशनाम तयार झाले. डॉ. जॉन विल्सन यांनी 'महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र' अशी व्युत्पत्ती दिली होती. श्रीधर व्य. केतकर यांच्या मते, ''भोई, कोळी, महार व रठ्ठ या जाती महाराष्ट्रात कुरुयुद्धकालीच होत्या. महार व रठ्ठ यांचे एकराष्ट्रीकरण इ.स. पू. दुसऱ्या सहस्त्रकात झाले असावे. त्यांचेच संख्याबळ अधिक असल्याने त्यांचेच नाव या देशास पडले असावे.''

या महाराष्ट्रातील पहिले अस्सल मराठी साम्राज्य म्हणजे प्राचीन सातवाहनांचे घराणे होय. यांनतर पुढे वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, शिलाहार, देवगिरीचे यादव, खिलजी घराणे, बहामनी सत्ता महाराष्ट्रात आल्या. मुस्लिम शाह्यांपासून मराठी स्वराज्याची स्वतंत्रपणे स्थापना करून छ. शिवाजी राजे महाराष्ट्र राज्याचे प्रेरणास्थान बनले. पेशवाई पर्यंतच्या अनेक सत्तांनी महाराष्ट्राची खास अशी स्वतंत्र

सांस्कृतिक ओळख निर्माण केली. संत, समाज सुधारकांनी आपल्या वाणी-लेखणीने मराठीमन जागृत केले. कवी-नाटककार, साहित्यीक, विचारवंत व पुढाऱ्यांनी मायबोली मराठी द्वारे एकतेची व आपलेपणाची जाणीव निर्माण करून दिली. स्वातंत्र्य आदोलनावेळी आपल्या मराठी भाषिकांचे एक राज्य असावे अशी मागणी त्यांनी सुरू केली.

**४.२.३.१ मराठी साहित्य संमेलन :**

सन १९३८ साली मुंबई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत बनवावा प्रथमच अशी मागणी करण्यात आली. सन १९३९ साली अहमदनगर येथे भरलेल्या याच मराठी साहित्य संमेलनामध्ये 'संयुक्त महाराष्ट्र' असा प्रथमच शब्द प्रयोग करण्यात आला. पुढील काळात सन १९४० मध्ये मुंबई येथे श्री. रामाव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र सभा' ही संघटना स्थापन करण्यात आली. दरम्यान दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने या संघटनेचे कामकाज थंडावले. महायुद्धानंतर महाराष्ट्राच्या मागणीचा जोर वाढू लागला. परंतु ही सभा निष्प्रभ ठरली.

**४.२.३.२ साहित्यीकांची संयुक्त महाराष्ट्र समिती (१९४६) :**

सन १९४६ साली बेळगांव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात ''संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. या समितीमध्ये ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. केशवराव जाधव, श्री. शंकरराव देव, श्री. द. वा. पोतदार इ. सदस्य होते. या समितीद्वारे संमेलनात दोन ठराव मांडण्यात आले.

१) संयुक्त महााष्ट्र निर्माण होईपर्यंत भाषिक, शैक्षणिक व सांस्कृतिक  विकास होण्यासाठी मराठवाडा व गोमंतक या प्रदेशांना प्रादेशिक स्वायत्तता असावी.

२) संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करीत असतानार्ा समेवरील बेळगांव, कारवार, गुलबर्गा, बिदर, निमाड इ. जिल्ह्यात मिश्र भाषिकांची वस्ती आहे. तेथील प्रत्येक खेड्यातील स्थानिक जनतेचा कौल प्रौढ व गुप्तमतदान पद्धतीने घेऊन ते भाग कोणत्या प्रांतात घालावयाचे हे ठरवावे.

येथुनच पुढे खऱ्या अर्थाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस सुरूवात झाली. या समितीने आपले उद्देश स्पष्ट करून लोकशाही पद्धतीने लोक आंदोलन करण्याचे निश्चित केले. कामगार, शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, पत्रकार व साहित्यिक यांच्या सहभागाने आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी पुणे येथे बैठक बोलविली. बैठकीत संयुक्त महाराष्ट्र परिषद भरविण्याचे ठरले.

**४.२.३.३ संयुक्त महाराष्ट्र परिषद (१९४६) :**

२८ जुलै १९४६ साली मुंबई येथे श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली. या परिषदेत संयुक्त महाराष्ट्र समितीचे विसर्जन करून 'संयुक्त महाराष्ट्र परिषदेची' स्थापना करण्यात आली. या परिषदेत दोन महत्त्वाचे ठराव पास करण्यात आले. ते म्हणजे -

१) सर्व सलग मराठी भाषिकांच्या प्रदेशांचा एकच मराठी भाषिक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापन करावा.

२) मराठी भाषिक प्रांत बनवताना मुंबई, वऱ्हाड, विदर्भ, मराठवाडा व गोमंतक या मराठी भाषिक प्रदेशांचा विचार करावा.

श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कार्य जोमाने सुरू झाले. साहित्य परिषद, कम्युनिष्ठ पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आदिंनी परिषदेची कायम पाठराखन केली. काँग्रेस व जनसंघाने या प्रश्नासंदर्भात सोयीस्कर भूमिका घेतली. सरदार पटेलांचा 'मुंबई' महाराष्ट्रात सामिल करण्यास विरोध होता. पटेलांच्या विरोधात ठाम भूमिका घेतल्यामुळे शंकरराव देव यांचे काँग्रेसमधील महत्त्व संपविण्यात आले. डांगी, कोकणी, अहिराणी व हळबी या मराठीच भाषा आहेत. अशी ठाम भूमिका मराठी सह्यि संमेलनाने घेतली.

### ४.२.४ महाराष्ट्र राज्य ंनिर्मितीतील घटनाक्रम :

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या चळवलीची मुहूर्तमेढ प्रथमत: मराठी साहित्य संमेलन व त्यतून स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीने केली. एस.एम. जोशी, प्र.के. अत्रे भाऊसाहेब हिरे, धनंजयराव गाडगीळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सेनापती बापट, डॉ. केशवराव धोंडगे, कॉ. श्रीपाद अमृत डांगे मधू दंडवते व प्रबोधनकार ठाकरे आदींचे योगदान चळवळीत महत्त्वपूर्ण ठरले.

महायुद्ध संपून भारतीय स्वातंत्र्य दृष्टिपश्चात आले. भारतीय राज्य घटना निर्मिती प्रक्रियेला सुरूवात झाली होती. येथून पुढे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेला वेग आला. सर्वच पक्ष व संघटनांनी हा प्रश्न कमी अधिक प्रमाणात लावून धरला. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने सन १९४६ ते सन १९५५ पर्यंत कार्य केले. मुंबईसह मध्यप्रदेशातील वऱ्हाड, हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा, कोकण, बेळगांव सह कारवार पर्यंतचा मराठी भाषिकांचे एक सलग राज्य असावे अशी त्यांची न्याय भूमीका होती. जळगांव येथे १९४७ साली शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेत याचा पाठपुरावा करण्यात आला. दरम्यान भाषावार प्रांतरचनेचा विचार करण्यासाठी दार कमिशन येणार होते. वऱ्हाड व नागपूर येथील नेत्यांच्या मनात कसलीही शंका नको म्हणून ४ ऑगस्ट १९४७ साली अकोला येथे पुन्हा परिषद भरविली. १६ प्रमुख नेत्यांनी वाटाघाटी करून 'अकोला करार' करण्यात आला. त्यामध्ये महाविदर्भ उपप्रांताचा आग्रह धरण्यात आला.

#### ४.२.४.१ दार कमिशनर (१९४७) :

भाषावार प्रांतरचना करावी की नको? या प्रश्नावरून घटना समितीमध्ये दोन गट पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडक व घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सुद्धा भाषावार प्रांतरचनेबद्दल सहानुभूती वाटत होती. म्हणून त्यांनी जून १९४७ मध्ये जम्मू काश्मिरचे न्या. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली कमिशन नेमले. यावेळी म. गांधींनी 'भाषावार प्रतिरचनेला धरून मुंबईने योग्य ती सर्वमान्य योजना तयार करावी, राष्ट्रभाषा मातृभाषांचे स्थान कधीही घेवू शकणार नाही.'' अशी भाषावार प्रांतरचनेला अनुकूल भूमिका घेतली. स.का. पाटील यांनी यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला कडाडून विरोध केला. दार कमिनला १) भाषावार

प्रांतरचना करावी की नाही? २) भाषावार प्रांतरचना करताना कोणकोणते व कसे प्रांत बनवावेत यासंबंधी चौकशी करून अहवाल द्यायचा होता.

दा कमिशनर महाराष्ट्रात येणार आहे हे समजल्यावर ऑक्टोबर १९४८ साली मुबंई येथे श्री. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र समितीचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात लोकशाहीर कॉ. आण्णाभाऊ साठे यांचे 'माझी मुंबई' हे लोकनाट्य सादर केले. यामध्ये मुंबई ही महाराष्ट्राची आहे हे ठामपणे सांगितले. मुंबई शहर हे महाराष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न बनवला. शाहीर अमरशेख यांनी आपल्या शाहिरीने आंदोलकांच्यात रोमांच उभे केले. मराठी भाषिकांचा एक सलग असा प्रांत बनवावा असा ठराव पास झाला. तसे निवेदन दार कमिशनला दिले. अनेकांच्या साक्षी, निवेदने झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दार कमिशनला एक निवेदन दिले. त्यामध्ये भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न स्फोटक असून देशात भाषावार प्रांतरचना करून जनमताला मान्यता द्यावी. महाराष्ट्र आणि मुंबईचा संबंध अतुट असून महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करू नये असे स्पष्ट केले.

१० डिसेंबर १९४८ साली दार कमिशनने आपला अहवाल प्रसिद्ध करताच महाराष्ट्रात मोठा जनक्षोभ उसळला. कारण महाराष्ट्रीय लोकांबद्दल म्हटले होते ''महाराष्ट्रीय लोक जुन्या आक्रमक सरंजामी वृत्तीचे आहेत. पुणेरी वृत्ती ही तर भयंकर स्वरूपाची आहे. मुंबईवर महाराष्ट्राचा मुळीच हक्क नाही. तीला कोणत्याही एका प्रांतात घालता येणार नाही. कारण ती सार्वदेशीय आहे.'' आत्तापर्यंत सहा राज्ये भाषावार प्रांतरचनेनुसार अस्तित्वात आली होती. महाराष्ट्र राज्य निर्मितीविषयी पुर्वग्रहदुषितपणा ठेवून देशाचे तुकडे होतील ही भिती कमिशनने दाखवून महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला विरोध केला. भाषावार प्रांतरचना भारताच्या ऐक्यास व एकात्मतेस मारक ठरेल असे स्पष्ट केले.

**४.२.४.२ शेतकरी कामगार पक्षाची भूमिका :**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला गती देण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाने मोठ्या जोमाने केले. सर्वपक्षीयांना एकत्र करून आंदोलनाची व्यापकता वाढविली. त्यासाठी

१) कायदेमंडळातील मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व सदस्यांनी राजीनामे देणे.

२) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व सदस्यांनी राजीनामे देणे.

३) जनतेने कर न देणे.

४) सर्व पक्षांची परिषद भरवणे.

असा कृतिकार्यक्रम दिला. जनसत्ताच्या अंकात श्री. शंकरराव मोरे यांनी 'कर्नाटकी बंड व महाराष्ट्र थंड' या शिर्षकाचा लेक लिहून जनमत जागृत केले. डॉ. केशवराव धोंडगे व गुरुनाथराव कुरुडे यांनी चळवळ ग्रामीण भागात पोहोचवली. केशवराव धोंडगे यांनी कंधार नांदेड, मुंबई व दिल्ली येथे सत्याग्रह करून मोर्चे काढले.

### ४.२.४.३ जे. व्ही. पी. समिती अहवाल व (१९४८) तिव्र प्रतिक्रिया :

महाराष्ट्रातील जनतेने दार कमिशन अहवाल स्विकारला नाही हे लक्षात येताच सन १९४८ साली जयपूर काँग्रेस अधिवेशनात या अहवालावर चर्चा झाली. पुन्हा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काँग्रेसने पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सितारामय्या या तिघांची त्रिसदस्यीय समिती नेमली. त्यालाच जे.व्ही.पी. समिती असे म्हटले जाते. तीन महिने या समितीने अभ्यास करून आपला अहवाल प्रसिद्ध केला. परंतु या सुद्धा अहवालात मुंबई वगळून महाराष्ट्राची मागणी मान्य केली होती. या समितीचा अहवाल प्रसिद्ध होताच महाराष्ट्रात तिव्र प्रतिक्रिया उमटल्या.

श्री. भाऊसाहेब हिरे व सेनापती बापट यांनी महाराष्ट्रभर जनजागृतीस सुरूवात केली. सन १९४९ साली प्र. के. अत्रे यांनी मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव पास करून घेतला. याच प्रकारचा ठराव मुंबई विधानसभेपुढे श्री. यशवंतराव मोहिते यांनी मांडला. परंतु या ठरावाला मोरारजी देसाई यांनी विरोध केल्याने हा ठराव बारगळल. सेनापती बापट, संत गाडगेबाबा, लालजी पेंडसे, अमरशेख, केशवराव जेथे व शंकराव देव यांनी जनमत प्रचंड जागृत केले. 'जगेन आणि मरेन' फक्त संयुक्त महाराष्ट्रासाठी असा निर्धार श्री. माधवराव गायकवाड यांनी जाहीर केला. अशा धगधगत्या परिस्थितीत डांग जिल्हा गुजरातला जोडल्याने परिस्थिती स्फोटक बनली. सन १९५१ साली भरलेल्या अमरावती परिषदेने 'डांग दिन' साजरा करून या कृतीचा निषेध केला.

भारतात पहिल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूका लागल्या. महाराष्ट्रातील काँग्रेस नेतृवाची भूमिका संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीत दुटप्पी वा विरोधी असल्यामुळे महाराष्ट्रातून काँग्रेसला १९ ते ४३% मते मिळाली. बंगालचे खासदार श्री. तुषार चटर्जी यांनी १९५२ साली भाषिक तत्वावर राज्यांच्या पुनर्रचना व्हाव्यात असा ठराव लोकसभेत मांडला. परंतु तो ७७ विरुद्ध २६१ मतांनी फेटाळला गेला. आंध्र प्रदेश मध्ये मोठा आगडोंब उसळला. श्री. पोय्टी रामल्लू यांनी आंध्रात प्राणांतिक उपोषण केले. उपोणाच्या ५८ व्या दिवशी रामल्लूंचे निधन झाले. आंध्रात भयंकर वातावरण पेटले. त्यामुळे पं. जवाहरलाल नेहरूंनी १९ डिसेंबर १९५२ साली स्वतंत्र आंध्रराज्याची घोणा केली.

### ४.२.४.४ नागपूर करार (१९५३) :

अकोला कराराचे ऐतिहासिक महत्त्व संपुष्टात आल्यानंतर चळवळीला अधिक गती देण्यासाठी तसेच महाराष्ट्राच्या विविध विभागातील नेत्यांच्या मनातील शंका-कुशंका दूर करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या तिन्ही विभागातील प्रमुख नेतेमंडळी नागपूर येते २८ सप्टेंबर १९५३ साली एकत्र जमली. त्यांच्यात ११ कलमी करार झाला. त्यास 'नागपूर करार' किंवा नागविदर्भ करार असे म्हणतात. यातील महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे-

१. मराठी भाषिकांचे एक सलग राज्य निर्माण करताना सर्व विभागातील लोकांचा निर्णय यावा.

२. मुंबई राज्य, मध्यप्रदेश आणि हैद्राबाद येथील मराठी भाषिकांचे सलग एक राज्य बनविण्यात यावे.

त्याला महाराष्ट्र असे संबोधण्यात येवून त्याची राजधानी मुंबई असावी.

३. महाराष्ट्राच्या विकासासाठी व राज्यकारभाराच्या सोयीसाठी 'महाविदर्भ', 'मराठवाडा' व 'पश्चिम महाराष्ट्र' असे तिन विभाग असावेत.

४. प्रत्येक विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात विधानसभेत व मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

५. मुंबई व नागपूर येथे दोन उच्च न्यायालयाचे असावीत.

६. विदर्भ व मराठवाड्यातील लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्या दिल्या जाव्यात.

७. राज्यात सत्तेचे विकेंद्रिकरण करण्यात यावे.

८. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असावी, राज्याच्या विधानसभेचे किमान एक अधिवेशन दरवर्षी नागपूरला देण्यात यावे.

हा करार म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अत्यंत महत्त्वाची घटना होय. तिन राज्यात विभागलेले मराठी भाषिक समान भाषा या तत्वावर एकत्र येऊन संयुक्त (United) महाराष्ट्र राज्याची स्थापना करणार होते. महाराष्ट्रातील काँग्रेस श्रेष्ठी प्रथमच या मुद्यावर एकत्र येऊन त्यांनीच या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. फक्त स.का. पाटील यांनी विरोध केला. भाऊसाहेब हिरे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका या करारात बजावली.

### ४.२.४.५ फाजल अली कमिशनर (राज्य पुनर्रचना आयोग) :

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भाषिक तत्वावर भारतातील प्रांताची रचना करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश एस्. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली सन १९५३ साली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली. या आयोगात श्री. हृदयनाथ कुंझरु व सरदार के. एस. पण्णीकर यांचाही समावेश होता. या कमिशनने जवळपास दिड वर्षे भाषावार प्रांत रचनेसंबंधी सर्वांगीण अभ्यास केला. २६७ पानांचा अहवाल १० ऑक्टोबर १९५५ साली केंद्रशासनाला सादर होताच महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली या कमिशनने –

१. महाविदर्भाचे स्वतंत्र राज्य असावे.

२. गुजरात व महाराष्ट्र यांचे मिळून द्विभाषिक राज्य निर्माण करावे.

अशा शिफारसी सुचवल्या. मुंबई महाराष्ट्रापासून अलग केली. मराठी भाषिकांचा मोठा अपमान करण्यात आला. जनता संतप्त झाली. लोक उत्स्फूर्तपणे एकत्र येऊन निषेध नोंदवू लागले. महाराष्ट्राचे दोन विभाजन करण्यात आले. राष्ट्रीय राजकारणात महाराष्ट्राचे महत्त्व कमी करण्याचा हा कुटिल डाव आहे. असे अनेकांचे मत बनले. महाराष्ट्रावर जाणून-बुजून अन्याय करण्यात येत आहे. अनेक नेत्यांचे मत बनले.

### ४.२.४.६ तिव्र आंदोलनाला सुरूवात :

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाने उग्र रूप धारण करताच जनमत प्रक्षुब्ध बनले. या चवळीत आपण भाग न घेतल्यास संयुक्त महाराष्ट्राबरोबर आपण महाराष्ट्राच्या राजकारणातून कायमचे नामशेष होऊ असे महाराष्ट्रातील

काँग्रेस नेत्यांना वाटले. त्यामुळे सर्वजण शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरुंनी शंकरराव देव यांना विचारले, ''तुम्हाला मुंबई हवी की महाराष्ट्र हवा आहे?'' तेव्हा देव म्हणाले ''हा तुमचा प्रश्न शरीर हवे की आत्मा हवा? असा आहे. मुंबई शिवाय संयुक्त महाराष्ट्राची मी कल्पनाच करू शकत नाही.'' राष्ट्रीय काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी 'विदर्भ, मुंबई व गुजरात' सह द्विभाषिक मुंबई राज्याच्या निर्मितीचा प्रयोग पुढील पाच वर्षासाठी करण्याचा निर्णय घेतला. परंतु ही तडजोड काँग्रेस व्यतिरिक्त अन्य पक्षाच्या नेत्यानी अमान्य केली. ६ नोव्हेंबर १९५५ रोजी संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा करावा असे ठरले. श्री. एस्. एम्. जोशी कोणत्याही तडजोडीस तयार नव्हते. सर्व मराठी आमदार, खासदारांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी झाली. मुंबईच्या फणसवाडी येथे कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली कम्युनिष्ठ पक्ष, प्रजासमाजवादी, शेतकरी कामगार पक्ष, जनसंघ व विविध कामगार संघटना यात सहभागी झाल्या. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा पुनरुच्चार करण्यात आला.

फाजल अली कमीशनच्या शिफारशी व पं. नेहरु व काँग्रेस पक्षश्रेष्ठीनी गुजराती-मराठी लोकांचे मुंबई द्वैभाषिक राज्यांची शिफारसीला कडाडून विरोध करण्यासाठी ५ नोव्हेंबर १९५५ रोजी हिंद-मजदूर सभा, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस, युनायटेड युनियन काँग्रेस यांनी एकत्र येऊन नरे पार्क वरती विरोध नोंदविला. बालगोपाल परिषद व महिला परिषदेनेही त्यांना साथ दिली. सौ. सुमतीबाई गोरे, उर्दु लेखिका इस्मत चुगताई, दुर्गा भागवत, तारा रेडी व सुलतान जोहारी आदि महिलांनी आंदोलनात भाग घेतला. एस्. एम. जोशी अध्यक्ष होते.

मराठी जनतेचा तिव्र विरोध पाहून भविष्यातील राजकारणाचा विचार करून काँग्रेस वर्किंग कमिटीने ८ नोव्हेंबर १९५५ साली त्रिराज्याचा प्रस्ताव मांडला. त्यामध्ये -

१) गुराथी भाषिकांचे एक राज्य असावे.

२) मुंबई व त्यांच्या उपनगराचे एक राज्य असावे.

३) मराठवाड्यासह महाराष्ट्र राज्य असावे.

त्रिराज्य प्रस्तावामुळे महाराष्ट्रात प्रचंड जनक्षोभ उसळला. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा हा कुटिल डाव होता. त्रिराज्य स्थापनेचे बिल विधानसभेत चर्चेला येणार होते.

त्रिराज्य निर्माण करण्याच्या या आघाताविरुद्ध संघटित होऊन बिल हाणून पाहण्यासाठी एम. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली कामगारांची ट्रेड युनियन व विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांची एक सभा होवून 'कृती समितीची' स्थापना करण्यात आली. १५ नोव्हेंबर १९५५ रोजी पुन्हा शिवाजी पार्क येथे एस्. एम्.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एका परिषदेचे आयोजन करण्यात आले. एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारुन मुंबई विधानसभेवर मोर्चे नेऊन तेथे निदर्शने करून त्रिराज्य योजनेचे बिल हाणून पाडण्याचे ठरविण्यात आले. १८ नोव्हेंबर १९५५ रोजी सेनापती बापट, आचार्य अत्रे, भाई मिरजकर, केशव सिताराम ठाकरे, क्रांतिसिंह नाना पाटील, के. एस. देसाई, कृष्णा देसाई, रसिकभट, लालजी पेंडसे, एम. जी. पाटकर यांच्या नेतृत्वाखाली

विधानसभेवर ५०० सत्यागृहिंचा मोर्चा नेण्यात आला. एस्. एम्. जोशींनी विधानसभेत बिलास विरोध करून दुरुस्त्या सुचविल्या. सेनापती बापट, प्र. के. अत्रे व इतर नेत्यांना अटक झाली या अटकेच्या निषेधार्थ २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईत हरताळ-संप करण्याचे निश्चित झाले.

### ४.२.४.७ संप-सत्याग्रह व गोळीबार :

त्रिराज्य बिलाच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी स. का. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गिरगांव चौपाटीवर २० नोव्हेंबर १९५५ साली सभा घेतली. या सभेत स. का. पाटील म्हणाले, ''तुम्ही सारे संयुक्त महाराष्ट्रवाले नालायक आहात. राज्य करण्याची तुमची पात्रता नाही. पाच वर्षात काय, पण पाच हजार वर्षात मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, आकाशात चंद्र-सुर्य असेपर्यंत मुंबई तुम्हाला मिळणार नाही.'' मोरारजीभाई देसाई यांनी सुद्धा प्रक्षोभक भाषण करताना म्हणाले, ''जोपर्यंत काँग्रेस जिवंत आहे तोपर्यंत मुंबई तुम्हाला मिळणार नाही.'' दोघांच्या अशा महाराष्ट्रद्वेषी भाषणामुळे लोकांनी स्टेजवर जोड्यांचा मारा केला. स. का. पाटलांना चपलांचा हार घालण्यात आला. सभा संपूर्ण उधळली गेली. त्या दोघांनी सभेतून पलायन केले. प्रायश्चित्त म्हणून शंकरराव देव यांनी ५ दिवसाचे उपोषण केले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईत हरताळ व सार्वत्रिक संप पुकारण्यात आला. ४ लाख कामगारांनी संप पुकारला. एक लाखापेक्षा अधिक कामगार व जनतेचा मोर्चा फ्लोरा फाऊंटन व विधानसभेवर धडकला. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली कॉ. बापूराव जगताप, साथी भगीरथ झा, विनायक भावे आदिंनी बंदि आदेश मोडून नेतृत्व केले. पोलीसांनी लाठीमार, अश्रुधूर व गोळीबार केला. त्यातील १५ जणांना हौतात्म्य आले. ३०० जखमी झाले. ४०० लोकांना अटक झाली. चिडलेल्या आंदोलकांनी जाळपोळीचे सत्र सुरू केले. एस्. एम्. जोशींनी जमावाला शांत केले. मुंबई महानगरपालिकेत ६३ विरुद्ध ४४ मतांनी बिल फेटाळले गेले.

### ४.२.४.८ मुंबई केंदशासित आणि दुसरा भिषण गोळीबार :

१६ जानेवारी १९५६ रोजी सर्व महाराष्ट्रवाद्याची सभा होती. परंतु पहाटेपासून सर्व कम्युनिष्टनेते व प्रबोधनकार ठाकरेंची पोलीसांनी धरपड करून दडपशाहीस सुरूवात केली. त्याच रात्री ८-३० वा. पं. नेहरुंनी आकाशवाणी वरून मुंबई केंद्रशासित केल्याचे जाहीर केले.

या निर्णयाने मुंबई अक्षरश: पेटून उटली. मुंबई शहरात दंगे सुरू झाले. पोलीसांनी आंदोलकांना दडपवण्यासाठी लाठीमार व अश्रुधुरांचा वापर केला. मुख्यमंत्री मोरारजी देसाईंनी दिसता क्षणीच आंदोलकांवर गोळीबार करण्याचे आदेश दिले. चार दिवसात पोलीसांनी ४६१ वेळा गोळीबार केला. मुंबर्सतील गोळीबारात ९१ सत्याग्रही मारले गेले. १८ जानेवारी १९५६ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या गोळीबारात शंकरराव तोरस्कर हुतात्मे झाले. बेळगांव व नाशिक येथेही हुतात्मे धारातिर्थी पडले. या हुतात्म्यांत बहुसंख्य कामगार, शेतकरी, श्रमिक महिला, विद्यार्थी व बिगर मराठी सुद्धा होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी एकूण १०६ लोकांना हौतात्म्य आले. ३२० जण जखमी झाले. आपल्या कृतीचे समर्थन करताना अमेरिकन 'लाईफ' व 'टाईम' या मासिकाला मुलाखत

देताना मोरारजीभाई म्हणाले, ''हे महाराष्ट्रीय लांडगे आहेत. त्यांना दया दाखवू नका. मला प्रत्येक माराष्ट्रीयनाला गोळी घालून ठार करावे लागले तरी चालेल, पण शहरात मी पुन्हा सुव्यवस्था स्थापन करीन, मुंबईचा कारभार चालविण्याची क्षमता मराठी भाषिकांच्यात नाही. मुंबईचा विकास बिगर मराठी भाषिकांनी केला आहे. मुंबई शहर मराठी भाषिकांच्या हातात दिले तर ते पाच वर्षातच मुंबईचे वाटोळे करतील'' अशा मुरारजीभाईला आचार्य अत्रे 'नरराक्षस' म्हणत. त्यात काय चूक? प्रसंगी लष्कर व रणगाडे वापरून चळवळ चिरडण्याची त्यांची तयारी होती. मुंबईतील बडे बडे उद्योगपती व व्यापाऱ्यांचा मुंबईवर डोळा होता तो निराळाच!

आंदोलकांच्यावर दडपशाही करताना ३१०९२ आंदोलकांना अटक केली. १९४४५ लोकांवर खटले भरले. १८१४१९ लोकांना कैदेची शिक्षा झाली. ग्रामीण भागात दंगली निर्माण झाल्या. ५०० दुकाने लुटली गेली. ३० ट्रामा गाड्या २२५ बसेसची तोडफोड झाली.

**४.२.५ संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना व कार्य (१९५६) :**

भाषावार प्रांतरचनेची निकड अधिकच भासू लागली. महाराष्ट्र प्रजा समाजवादी पक्षाने प्रश्न अधिक धगधगत ठेवण्याचे कार्य केले. शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त महाराष्ट्र परिषद निष्प्रभ ठरली. तिचे २३ ऑक्टोबर १९५५ साली विसर्जन झाले. ही परिषद बरखास्त करण्यापूर्वी तिने दिल्लीत जाऊन द्वैभाषिक राज्याचा पर्याय सुचविला. परंतु त्यास एस्. एम्. जोशी, श्रीपाद अ. डांगे, दत्तो वामन पोतदार व यशवंतराव मोहिते आदिंनी तिव्र विरोध केला. यावेळी एस्. एम्. जोशी यांनी केलेले भाषण अत्यंत प्रेरणादायी आहे. ''आंध्र झाला तसा संयुक्त महाराष्ट्र होऊन जाईल या कल्पनेत राहू नका. लक्ष्मीनारायण विरुद्ध दरिद्रीनारायण असा हा लढा आहे. तो सहजासहजी सफल होणार नाही. राज्याशी असहकार करावा लागेल. ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंत आपआपल्या पदांचे राजीनामे द्यावे लागतील संयुक्त महाराष्ट्र परिषदेतून फुटून निघण्याचा महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचा ठराव हा या चळवळीशी द्रोह आहे. पक्ष मोठा की लोक मोठे? लोकशाही राजवटीत पक्ष कधीही लोकांच्या डोक्यावर बसत नसतो. जेव्हा तो बसू लागतो, तेव्हा तो पक्ष हुकूमशाही दिशेने वाटचाल करू लागतो.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे विभाजन दोन कालखंडात करता येते. पहिला कालखंड इ.स. १९४६ ते इ.स. १९५५ व दुसरा कालखंड १९५५ ते १९६० असा करता येतो. सन १९४६ साली स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेतून सन १९५६ साली काँग्रेसपक्षाने अंग काढून घेतल्याने परिषद फुटली अशा परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सुसुत्रता आणण्यासाठी एका व्यासपीठाची गरज निर्माण झाली. या गरजेतूनच ६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेथे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात सर्व पक्षीय सभा होऊन त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. या समितीमध्ये साम्यवादी, प्रजासमाजवादी, समाजवादी शेतकरी कामगार पक्ष, लाल निशाण गट, मजदूर किसान पक्ष, भारतीय जनसंघ, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, हिंदू महासभा, जन काँग्रेस व अपक्ष असे बिगर काँग्रेस पक्षाचे 'पक्ष' सामिल झाले. या समितीचे अध्यक्षपद भाई श्रीपाद अमृत डांगे बनले. आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव मोहिते व दुर्गा भगवान आदिं सारखे मातब्बर नेते समितीला लाभले.

या समितीने आपली १५ कलमी घटना बनवून तिचे उद्देश साधने, घटकपक्ष, समितीची रचना, नियम व मार्ग स्पष्ट केले.

● **समितीचे उद्देश :**

१) भाषावार राज्य रचनेच्या तत्त्वानुसार महाराष्ट्र राज्यात अजून समाविष्ठ न झालेले मराठी भाषिकांचे सलग प्रदेश या राज्यास जोडून घेणे.

२) लोकसत्ताक व समाजवादी महाराष्ट्र प्रस्थापित करणे.

३) सामाजिक, आर्थिक व राजकीय समता स्थापन करून महाराष्ट्राच्या जीवनाची सहकारी तत्त्वावर उभारणी करणे.

४) समितीने पुरस्कारलेला कार्यक्रम पूर्ण करणे.

हा उद्देश सफल करण्यासाठी शांततामय, सनदशीर लोकशाही मार्गाचा अवलंब करण्याचे निश्चित झाले. जनजागृती व संघटन करून पर्यायी शक्ती निर्मार करणे. महाराष्ट्राच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे. त्यासाठी निवडणुकांमध्ये भाग घेण्याचे निश्चित झाले. सहकारी जीवन व समाजवाद यांचे जनतेला शिक्षण देणे अशी साधने ठरविण्यात आली.

संयुक्त महाराष्ट्र समितीने लोकांच्यापुढे पाच कलमी कार्यक्रम ठेवला. खेडोपाडी व सिमावर्ती भागात समितीच्या शाखा उघडल्या. चळवळीचे लोन संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले. समितीच्या कार्यकर्त्यांनी दिल्लीत मोर्चा काढला. मुंबई, बेळगांव, कारवार, निपाणी व डांग सह संयुक्त महाराष्ट्र झालच पाहिजे' या घोषणेने सर्व महाराष्ट्र निनादून गेला. केंद्र सरकार व पं. नेहरूंवर दबाव वाढत गेला. समिती आणि महागुजराथ जनता परिषद यांच्यामध्ये वाटाघाटी होऊन खेडेगाव हा आधारभूत घटक मानून दोन्ही राज्यांनी सीमा आखाव्यात असे निश्चित झाले.

थोर सर्वोदयी नेते जयप्रकाश नारायण यांनी पं. नेहरूंची भेट घेऊन मुंबई महाराष्ट्राला देण्याचा आग्रह धरला. हैद्राबाद काँग्रेस पक्षाने सुद्धा मुंबई केंद्रशासित न करता महाराष्ट्रात समाविष्ट करावी असे सांगून घरचा आहेर दिला. फिरोज गांधी यांनी सुद्धा संसदेतील भाषणात मुंबई महाराष्ट्राला देण्याचा आग्रह धरला.

### ४.२.५.१ संयुक्त महाराष्ट्र व समितीचा संघर्ष :

१६ जानेवारी १९५६ रोजी प्रतिबंधक स्थान बद्धतेच्या कायद्याखाली क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.डांगे, कॉ. पाटकर, कॉ. मिरजक, कॉ. जगताप, कॉ. गणाचार्य व कॉ. परुळेकर यांना मोरारजी देसाई यांनी अटक केली. पालघर, डहाणू, जाव्हार आदि भागातील लाल बावट्याच्या आदिवासींनी सार्वजनिक हरताळ पाळून रहदारी बंद पाडली. ''मुंबई आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची'' अशा घोषणा दिल्या गेल्या.

समितीच्या स्थापनेनंतर विधीमंडळातून व बाहेरून दोन्ही आघाड्यांवरून समितीने जोरदार संघर्ष केला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्व पक्षीय गोलमेज परिषद भरविण्याची मागणी केली. ही सूचना अमान्य होताच २९ फेब्रुवारी १९५६ रोजी सत्याग्रह पुकारला. संयुक्त महाराष्ट्रावादी

लोकप्रतिनिधींनी लोकसभा, विधानभा, नगरपालिका, ग्रामपंचायत व जिल्हा बोर्डाच्या सदस्यत्वाचे राजीनामे दिले. याचवेळी बी. सी. कांबळे यांनी मुंबई विधानसभेत आवाज उठवून संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. हैद्राबाद विधानसभेने मुंबई महाराष्ट्रात समाविष्ठ करावी असा ठराव पास केला. शेतकरी-कष्टकरी, महिला-दलितांनी महाराष्ट्रातील विविध भागात संघर्ष केला. ९ मार्च ते ४ एप्रिल १९५६ या काळात २३४३ सत्याग्रहिना अटक करण्यात आली. १५ मे पर्यंत हा अकाडा १३४८९ पर्यंत गेला. श्री. चिंतामणराव देशमुख यांनी लोकसभेत महाराष्ट्रवाद्यांची बाजू मांडून पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना ''तुमच्या मनामध्ये महाराष्ट्राविषयी आकस आहे'' असे स्पष्ट बोलून केंद्रिय अर्थ मंत्रीपदाचा राजीनामा देऊन महाराष्ट्र निष्ठा दाखवून दिली. याचवेळी बेळगांव, कारवार व निपाणी हा भाग म्हैसूर राज्यात घातला गेला. त्यामुळे समितीने ९ मार्च १९५६ रोजी जयवंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली बेळगांव येथे सत्याग्रह केला. दिल्लीत एस्.एम्. जोशींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्यात आला.

राष्ट्रीय काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन २ व ३ जून १९५६ रोजी भरले असता मुंबईतच शिवाजी पार्कावर सर्वपक्षीय परीषद व जनतेचा मेळावा समितीने आयोजित केला. काँग्रेस अधिवेशनास नेहरू आले असता काळे झेंडे दाखवून त्यांचा मुकनिषेध करण्यात आला. काँग्रेस अधिवेशनाला ५० हजार तर समितीच्या मेळाव्यास २ लाख लोकांची उपस्थिती होती. यांनतर चळवळ अधिकतर तिव्र करण्यासाठी एस्. एम्. जोशींनी करबंदी चळवळीचा इशारा दिला. पं. नेहरुंनी त्यांना चळवळ थांबविण्याची सूचना केली. परंतु सं. महाराष्ट्र समितीने आश्वासन दिल्याशिवाय चळवळ थांबणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

संयुक्त महाराष्ट्र समितीने लंडन येथे शाखा स्थापन करून गोळीबारात शहिद झालेल्या सत्याग्रहींच्या कुटुंबियांसाठी मदत निधी गोळा केली.यावेळी लंडन येथे आलेल्या पं. नेहरुंना मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करण्याचे निवेदन केले. दिल्ली येथे सत्याग्रह करण्यासाठी समितीचे अनेक नेते महाराष्ट्र, बेळगांव, निपाणी ते अमरावतीहून दिल्लीस पोहोचले. महाराष्ट्रीयन व बिगर मराठी खासदारांच्या भेटी घेऊन संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची बाजू भक्कमपणे मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी रामानंद तिर्थ, हरिभाऊ पाटसकर, काकासाहेब गाडगीळ व जगन्नाथ भोसले आदिंच्या भेटी घेऊन पाठींबा मिळविला. समितीच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नेहरुंची भेट घेऊन आपला प्रश्न मांडला. परंतु चर्चा निष्फळ ठरली. सत्याग्रहींचा मोठा लोंढा दिल्लीत पोहचला. सुचेता कृपलानी यांनी सत्याग्रहींचे स्वागत केले. २६ जुलै १९५६ रोजी लोकसभेसमोर २००० महाराष्ट्रीय स्त्री-पुरुषांनी सहभाग घेतला. या सत्याग्रहात क्रांतिसिंह नाना पाटील यांची ८० वर्षाची आई, त्याच वयाचे वेदपाठक, भांडारकर हे वयोवृद्ध लोक होते. अत्यंत शिस्तीत व शांततेत अहिंसा मार्गाने हा मोर्चा यशस्वी झाला. गुरुनाथराव कुरुडे यांनी दिल्ली सत्याग्रहाचे नेतृत्व केले. प्र. के. अत्रे, डांगे, जोशी, माडखोलकर, दंडवते, सोवनी, ठाकरे, जेथे, बागल व कुरुडे आदिंनी लोकसभेला घेरावा घातला. त्यांना अटक करून दिल्लीच्या बाहेर सोडून देण्यात आले.

समितीच्या प्रमुख नेत्यांनी राजघाटावर जाऊन गांधीजींच्या समाधीला वंदन केले. दिल्ली येथे झालेल्या सत्याग्रहात 'दिल्लीवालो साथ दो बंबईको न्याय दो', 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' 'We want

Bombay' अशा गगनभेदी घोणा देण्यात आल्या. शाहीर अमरशेख यांनी आपल्या पहाडी आवाजाने 'जाग मराठा आम जमाना बदलेगा' या गिताने रोमांच उभे केले.

### ४.२.५.२ विशाल द्विभाषिक राज्याची निर्मिती (१९५६) :

महाराष्ट्रातील वाढता जनक्षोप पाहून असंतोष कमी करण्यासाठी केंद्र सरकारने तात्काळ म्हणजे दि. ३१ ऑक्टोबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची घोषणा केली. १ नोव्हेंबर १९५६ रोजी गुजरात, महाराष्ट्र असे मुंबई द्वैभाषिक राज्य अस्तित्वात आले. या राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. असे राज्य गुजरातच्या जनतेलाही मान्य नव्हते. गुजराती लोकांनी केलेल्या आंदोलनावर गुजरात पोलीसांनी केलेल्या गोळीबारात १५ ठार व १६७ लोक जखमी झाले. अनुताई लिमये यांनी गजुरातमध्ये जाऊन सत्याग्रह केला. संयुक्त महाराष्ट्र समितीने द्वैभाषिक राज्यास कडाडून विरोध केला. त्यासाठी ऑक्टोबर मध्ये मुंबईतील शिवाजी पार्कवर द्वैभाषिक राज्य विरोधी परिषद आयोजित करून विरोध केला. मार्च ते सप्टेंबर या काळात ४५ हजार स्त्री पुरुषांनी कारावास भोगला.

स. का. पाटील, यशवंतराव चव्हाण, अशोक मेहता, कुंटे व भाऊसाहेब हिरे आदिंनी द्वैभाषिक राज्यास पाठिंबा दिला. महागुजरात जनता परिषदेने स्वतंत्र गुजरात राज्याच्या निर्मितीसाठी आंदोलन छेडले. गुजरात व महाराष्ट्रात या वर्षी दिवे न लावता काळी दिवाळी साजरी करण्यात आली. दोन्ही राज्यात भावनिक ऐक्य प्रस्थापित झाले नाही. जनतेच्या इच्छेविरुद्ध द्वैभाषिक राज्य लादण्यात आले. प्र. के. अत्रे यांनी 'मराठा' नावाचे दैनिक सुरू करून 'महाद्विभाषिक निषेध विशेषांक' काढला. त्यामध्ये 'पाताळात गाडा हे महाद्विभाषिक', 'मुंबई गेली बेळगाव मेले, संयुक्त महाराष्ट्र जमीन दोस्त झाला' असा खरमरीत लेख लिहिला.

### ४.२.५.३ सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूका व संयुक्त महाराष्ट्र समितीचे यश :

१ मार्च व ११ मार्च १९५७ रोजी मुंबई द्वैभाषिक विधानसभा, लोकसभा, मुंबई व पुणे महानगरपालिकेच्या निवडणूका झाल्या. संसदेत व विधानसभेत निवडणूकीच्या माध्यमातून जाऊन आपला प्रश्न सोडविण्याचे समितीने निश्चित केले. काँग्रेसच्या विरोधातील सर्व घटक पक्षांना एकत्र करून संयुक्त महाराष्ट्र समितीने निवडणूका लढविल्या. समितीने संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या (मुंबईसह) निर्मितीच्या प्रश्नावरून निवडणूका लढविल्या. सयुक्त महाराष्ट्र समितीच्या विरोधकांनी सातारा जिल्ह्यात प्रचाराला जातीय रंग आणताना त्याला ब्राह्मण-ब्राम्हणेत्तर वादाचा रंग चढविला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही भटा-ब्राह्मणांनी पेशवाईचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सुरू केली आहे. असा जोरदार प्रचार चालविला. जनता या प्रचाराला बळी पडली नाही. पुणे महानगरपालिकेची समितीने एका हाती सत्ता मिळविली. मुंबई महानगरपालिकेत १३१ पैकी ७१ जागा मिळवून सत्ता हस्तगत केली. समितीने प्रथमच ६, ७ दलित आमदार निवडून आणले. यशवंतराव चव्हाण, कऱ्हाडमधून अवघ्या १६२६ मतांनी निवडून आले. लोकसभा निवडणूकीत ४४ पैकी २३ जागा समितीने जिंकल्या. विधानसभेच्या २६४ जागांपैकी १२९ जागांवर समितीने विजय मिळवून जोरदार चपराक दिली. काँग्रेसच्या बड्या दिग्गजांचा पराभव झाला. एस्. एम. जोशी यांची विधानसभेत विरोधी पक्ष नेतेपदी निवड झाली. समितीचे हे अभुतपूर्व यश पाहून चळवळीच्या प्रखरतेची जाणीव केंद्र सरकारला झाली.

### ४.२.५.४ प्रतापगडचा मोर्चा व समितीचे उग्र निदर्शने :

सन १९५६ मध्ये प्रतापगडावर उभारलेल्या छ. शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ठरविले. या प्रसंगी नेहरुंना काळे झेंडे दाखवून उग्र निदर्शने करण्याचे समितीने ठरविले. त्याची दोन कारणे होती. पं. नेहरू यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात छ. शिवाजी राजांविषयी चुकीची विशेषणे वापरली होती व संयुक्त महाराष्ट्र समितीची प्रखर जाणीव व्हावी या दोन कारणांच्यामुळे भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली प्रतापगडावर भव्य निदर्शन मोर्चा ३० नोव्हेंबर १९५७ रोजी काढण्यात आला. पं. नेहरुंच्या ऐवजी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या मातोश्री यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण व्हावे असे समितीचे मत होते.

महाराष्ट्राच्या विविध भागातून मोठ्या संख्येने स्वयंसेवक पाचगणी, महाबळेश्वर व पसरणी घाटात रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून पं. नेहरुंना काळे झेंडे दाखविले. द्वैभाषिक राज्याच्या व नेहरुंच्या धिक्काराच्या घोषणा दिल्या गेल्या. ''मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे'' अशा घोषणांनी आसमंत दुमदुमन गेला. प्र. के. अत्रेंची प्रखर वाणी व लेखनी तोफेसारखी धडधडू लागली. याप्रसंगी प्रत्यक्ष नेहरूंना मराठी जनतेच्या प्रखर जनरोषाला सामोरे जावे लागले. मराठी जनतेच्या मनातील संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याची त्यांना जाणीव झाली.

### ४.२.५.६ समितीचे सन १९६० पर्यंतचे कार्य :

प्रतापगडच्या निदर्शनानंतर समितीने विविध मुद्यांवर सरकार विरुद्ध अविश्वास ठराव आणला. १९५६ साली बिदर व नांदेड जिल्ह्याची फोड करून काही मराठी तालुके कर्नाटक व आंध्र मध्ये जोडण्यात आले. भालकी संतपूर, बेळगाव, औराद, मुधोळ, म्हैसा व गुजरातमधील डांग हा मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात जोडावा. यासाठी सीमावर्ती भागात आंदोलनाला सुरूवात झाली. बेळगांव, कारवार व बिदरचा समावेश कर्नाटकात झाल्याने तेथील मराठी जनतेवर अन्यय झाला. १ नोव्हेंबर १९५८ साली भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली सीमा भागात सत्याग्रह करण्यात आला. बेळगावचे महत्त्व सांगताना अत्रे म्हणत, 'बेळगांव ही संयुक्त महाराष्ट्राची गंगोत्री आहे'' तीचा समावेश महाराष्ट्रात झालाच पाहिजे. कंधार आणि उद्‌गीर तालुक्यातील लोकांनी भालकी किल्ल्यातील तहसील कचेवरील मोठा मोर्चा काढला. डॉ. केशवराव धोंडगे यांना अटक करण्यात आली.

१ नोव्हेंबर १९५८ रोजी सीमा सत्याग्रह सुरू करण्यात आला. संयुक्त महाराष्ट्र समितीने १८ डिसेंबर १९५८ रोजी दिल्लीत संसदेवर मोर्चा काढून 'बंबई लेके रहेंगे, बेलगाम कारवार लेके रहेंगे' अशा घोषणा दिल्या. बेळगांव, कारवार, निपाणी, संयुक्त महाराष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न बनला. म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री निजलिंगाप्पा यांनी बेळगांव, कारवार निपाणीच्या प्रश्नाला वाटण्याच्या अक्षता लावून मुंबई सरकारशी बोलणी फिस्कटवली. १८ जानेवारी १९५९ रोजी सीमा लढा समितीने करबंदी चळवळ सुरू केली. बेळगावचे नेते बा. र. सुंठणकर यांनी सीमा लढ्याचे नेतृत्व केले.

सीमा लढा सुरू असताना द्वैभाषिक राज्याविरोधी लढा पुकारला तर सीमा लढ्याकडे दुर्लक्ष होईल अशी

समितीच्या नेत्यांना भीती वाटत होती. याच प्रश्नावरून मतभेद वाढत जाऊन समितीमध्ये मतभेद वाढत गेले. समितीमध्ये जहाल व मवाळ गट निर्माण झाले. बापट, अत्रे, ठाकरे, बागल, कोठारी यांनी स्वतंत्र महाराष्ट्र जनता आघाडी स्थापन करून पक्षबाजीला आळा घालण्याचा प्रयत्न केला. समितीची घटना तयार करून तिचा एक पक्ष बनवावा या मुद्यावर समितीमधील घटक पक्षांमध्ये मतभेद वाढत गेले. घटक पक्षांसाठी मार्गदर्शनपर नियम बनविण्यात आले.

सन १९५९ साली मा. इंदिरा गांधी अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा झाल्या. सन १९६२ च्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मुंबईचा दौरा केला. ९ लोकांची कमिटी त्यांनी तात्काळ नेमली. कमिटीच्या शिफारशी स्विकारून तात्काळ द्वैभाषिक मुंबई राज्याच्या विभाजनाचा निर्णय घेण्यात आला. परंतु मुंबई कुणाची या प्रश्नावर अद्याप निर्णय झाला नव्हता. द्वैभाषिक राज्याचे विभाजन झाले तर दोन्ही राज्यात काँग्रेसला बहुमत मिळेल असे काँग्रेस पक्षाला वाटू लागले.

काँग्रेस पक्षातील या घडामोडीनंतर संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याची चिन्हे दृष्टीपक्षेपात आाली. ध्येय साध्य होताच प्रजासमाजवादी पक्षाच्या नेत्यांनी समितीतून बाहेर पडण्याचे जाहीर केले. डांग जिल्हा, उंबरगाव मधील सोळा गावे गुजरात मध्ये तर बेळगांव, निपाणी व कारवार कर्नाटक राज्यात समाविष्ट करण्यात आली. याबाबत काँग्रेस पक्ष व समितीतील काही सदस्यांनी तडजोडीची भूमिका घेतली. स्वतंत्र विदर्भाची मागणी व चिनी आक्रमणाच्या प्रश्नावरून पुढे समिती मोडकळीस आली. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या रुपाने महाराष्ट्रात डावी आघाडी उभी राहू नये असे पं. नेहरुंना वाटतच होते. त्यामुळे त्यांना द्वैभाषिक राज्य विसर्जित करून संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी मान्य करणे शेवटी भाग पडले.

### ४.२.६ मुंबई पुनर्रचना कायदा व संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती :

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यात पं. नेहरू, इंदिरा गांधी, सरदार पटेल व काँग्रेसच्या श्रेष्ठींनी अनुकूलता दर्शविली. तयार होणाऱ्या नव्या राज्याला 'मुंबई राज्य' असे सुविण्यात आले. परंतु समितीने 'महाराष्ट्र' नावाचा आग्रह धरला. तो मान्य करण्यात आला. महाराष्ट्र व गुजरात द्वैभाषिक राज्य भंग करणारे बिल यशवंतराव चव्हाण यांनी १४ मार्च १९६० रोजी मुंबई विधानसभेत मांडून ते मंजूर करून घेतले. २८ मार्च १९६० रोजी गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी हेच बिल लोकसभेत मांडले. लोकसभेने २१ एप्रिलला तर राज्य सभेने २३ एप्रिलला ते मंजूर केले. राष्ट्रपतींनी त्यास मंजूरी दिली. केंद्र सरकारचा मुंबई पुनर्ररचना कायदा पास झाला. त्यानुसार १ मे १९६० रोजी मुंबई राजधानी असणाारे 'महाराष्ट्र' आणि गुजराथी भाषिकांचे स्वतंत्र 'गुजतरात' अशी दोन स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली.

नव्या महाराष्ट्र राज्याचे २६ जिल्हे 'महाराष्ट्र राज्य निर्मितीचा जाहीरनामा' केंद्र सरकारने प्रसिद्ध केला. त्यानुसार गुतरातीभाषिक सर्व जिल्हे गुजरात राज्याला जोडण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रातील १३ जिल्हे, मराठवाड्यातील ५ जिल्हे, विदर्भातील ८ जिल्हे महाराष्ट्रात जोडण्यात आले. अशाप्रकारे एकूण २६ जल्हे महाराष्ट्रात जोडण्यात आले. या नव्या महाराष्ट्र राज्याचे ४ प्रशासकीय विभाग पाडण्यात आले ते म्हणजे मुंबई विभाग, नागपूर विभाग, औरंगाबाद विभाग व पुणे विभाग हे होय.

महाराष्ट्राने डांग व उंबरगांव प्रदेशावर पाणी सोडले. गुजरातला राजधानीसाठी १० कोटी द्यावेत असे ठरले. परंतू बेळगांव, निपाणी व कारवारचा प्रश्न अनुत्तरीतच राहिला. १ मे, १९६० रोजी कामगार दिनी महाराष्ट्र राज्याची पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी मुंबईच्या शिवाजी पार्कवर घोषणा केली. त्याच दिवशी यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रदिर्घ लढ्याला यश प्राप्त झाले. सर्वत्र दिवाळी साजरी केली गेली. महाराष्ट्राविषयीचे स्वप्न यशवंतराव चव्हाण यांच्याच शब्दात पुढील प्रमाणे ''मी, परमेश्वराची प्रार्थना करतो की देवा आम्हाला अशी दानत दे की, महाराष्ट्र राज्य जनतेचे राज्य होईल. हे राज्य लोककल्याणाकरीता झटेल आणि भारताच्या नकाशावरील ताऱ्यात एका नव्या तेजस्वी ताऱ्याची भर टाकेल.....''

### ४.२.६.१ साहित्यीकांचे योगदान :

भाषावाद प्रांतरचनेला खरी चालना मिळाली ती १९४६ साली झालेल्या बेळगांव साहित्य संमेलनापासूनच होय. ग. त्र्यं. माडखोलकर संयुक्त महाराष्ट्राचे सुतोवाच केले. पहाडी आवाजाने शाहीर कॉ. अमरशेख आणि प्रतिभावंत साहित्यीक लोकशाहीर कॉ. अण्णा भाऊ साठे व शाहीर गव्हाणकर यांनी आपल्या प्रतिभेतून स्फुरलेली महाराष्ट्र गीते केवळ महाराष्ट्रातच नाहीत तर दिल्लीतही बुलंद करून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला अविस्मरणीय योगदान दिले. डॉ सुधीर फडके यांचे 'जनतेच्या सत्तेची ज्योत जगती', 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे स्फुर्तीगीत तर द. ना. गवहाणकर यांचे ''महाराष्ट्र वळुनी बघ जरा'' या आवाहन गितांनी मराठी भाषिकांना लढ्यास प्रेरणा मिळाली. अण्णाभाऊ-अमरशेख गव्हाणकरांच्या लाल बावटा पथकाने १९४८ सालापासून गोवागी मराठी अस्मितेचे स्फुल्लिंग जागृत केले.

लोकशाहीर अण्णाभाऊंच्या लावणी (छक्कड) संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रेरणा गीत ठरले.

''माझी मैना गावावर राहिली. माझ्या जिवाची होतीया काहिली'', ''महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळूनी काया'' या लावण्यांमधून संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, सीमावाद, मुंबईचा प्रश्न त्यांनी मांडला.

आचार्य प्र. के. अत्रे यांनी आपल्या धारदार लेखनीने आंदोलनाला गती दिली. दै. मराठा, दै. नवाकाळ, दै. केसरी, दै. प्रभात, साप्ताहिक मौज व विविध वृत्त इ. वृत्तपत्रांनी जनमत जागृत केले.

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१) भाषावार प्रांतरचना - भाषिक तत्वावर भारतीय संघराज्याची निर्मिती.

२) संयुक्त महाराष्ट्र - मराठी व मराठी भाषेच्या विविध बोली भाषा बोलणाऱ्या प्रांताचे मिळून एक राज्य.

३) समिती - कृतिशली संघटन.

४) प्रांत - प्रदेश

५) परिषद - एकाच मुद्यावर बोलविलेली बैठक

६) पुनर्रचना – पुनर्रमांडणी

७) करार – तह

८) चळवळ – लोकांनी आपल्या न्याय हक्कासाठी एकत्र येऊन सनदशीर मार्गाने उभारलेला लढा.

९) निदर्शने – अन्यायाचा लोकशाही व अहिंसात्मक मार्गाने निषेध नोंदविणे.

१०) संप – काम बंद आंदोलन.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### ४.४.१ एका वाक्यात उत्तरे द्या.

१. महाराष्ट्राचा सर्वात प्राचीन उल्लेख कोणत्या शिलालेखात आढळतो.

उत्तर – ऐरणगाव (इ.स. ३६५)

२. संयुक्त महाराष्ट्र असा शब्दप्रयोग सर्वप्रथम कोणत्या संमेलनात करण्यात आला.

उत्तर – मराठी साहित्य संमेलन अहमदनर (१९३९)

३. संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना कोणाच्या अध्यक्षतेखाली झाली?

उत्तर – शंकरराव देव

४. घटना समितीने भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नावर कोणते कमिशन नेमले?

उत्तर – दार कमिशन (१९४७)

५. सन १९५३ साली झालेल्या नागपूर करारानुसार महाराष्ट्राची उपराजधानी कोणती असावी असे ठरले.

उत्तर – नागपूर.

६. संयुक्त महाराष्ट्र समितीचे पहिले अध्यक्ष कोण होते?

उत्तर – श्रीपाद अमृत डांगे.

७. संयुक्त महाराष्टाच्या चळवळीत किती आंदोलकांना हौतात्म्य आले.

उत्तर – १०६

८. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांचे स्मारक कोठे आहे?

उत्तर : फ्लोरा फाऊंटन (मुंबई)

९. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी आपल्या केंद्रिय अर्थमंत्रीपदाचा राजीनामा देणारे नेते कोण होते?

उत्तर – श्री. चिंतामणराव देशमुख.

१०. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी गुजरातमध्ये जाऊन सत्याग्रह करणाऱ्यानेत्या कोण?

उत्तर – अनुताई लिमये.

११. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्र. के. अत्रे यांनी कोणते वत्तपत्र सुरू केले?

उत्तर : दै. मराठा

१२. सन १९५७ साली झालेल्या निवडणूकीत द्वैभाषिक राज्याच्या विधानसभेत विरोधी पक्ष नेतेपदी कोणाची निवड झाली.

उत्तर – एस्. एम्. जोशी.

१३. संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री कोण होते.

उत्तर – श्री. यशवंतराव चव्हाण.

१४. महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो.

उत्तर – १ मे, १९६०

१५. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती आंदोलनातील 'माझी मैना गावाकडे राहिली' ही लावणी कोणी लिहिली?

उत्तर – कॉ. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे

**४.४.२ रिकाम्या जागा भरा.**

१. न्या एस. के. दार यांनी आपला अहवाल ................ साली सादर केला.

उत्तर – सन १९४८

२. ........... या बौद्ध धर्मग्रंथात महाराष्ट्र या प्रदेशाचा उल्लेख येतो.

उत्तर – महावंश

३. साहित्यीकांची संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना .......... साहित्य संमेलनात झाली.

उत्तर – बेळगांव (१९४६)

४. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर १६ प्रमुख नेत्यांची वाटाघाटी बैठक ........... येथे भरली.

उत्तर – अकोला (१९४७)

५. 'कर्नाटकी बंड व महाराष्ट्र थंड' नावाचा लेख जनसत्ताच्या अंकात ........... यांनी लिहिला.

उत्तर – श्री. शंकरराव देव.

६. नागपूर करार (१९५३) नुसार ........... ही महाराष्ट्राची राजधानी ठरविण्यात आली.

उत्तर – मुंबई.

७. राज्य पुनर्ररचना आयोगास .......... असेही म्हणतात.

उत्तर – फाजल अली कमिशन.

८. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात कोल्हापूर येथे ............ हे हुतात्मा झाले.

उत्तर – शंकरराव तोरस्कर.

९. सन १९४८ साली मुंबई येथील संयुक्त महाराष्ट्र अधिवेशनात कॉ. लो. अण्णा भाऊ साठे यांनी ............ हे लोकनाट्य सादर केले.

उत्तर – माझी मुंबई

१०. बेळगांव ही महााष्ट्राची गंगोत्री आहे असे .......... म्हणत असत.

उत्तर – प्र. के. अत्रे.

११. संयुक्त महाराष्ट्र समितीने विदेशात ............ येथे शाखा स्थापन केली.

उत्तर – लंडन

१२. २६ जुलै १९५६ साली दिल्ली येथे झालेल्या सत्याग्रहाचे नेतृत्व ......... यांनी केले.

उत्तर – गुरुनाथ कुराडे

१३. २६ जुलै १९५६ रोजी दिल्ली येथील सत्याग्रहास 'जागा मराठा आम जमाना बदलेगा' हे गित .......... यांनी गायले.

उत्तर – शाहिर अमर शेख

१४. सन १९५७ साली झालेल्या विधान सभा निवडणूकीत समितीने .......... जागा जिंकल्या.

उत्तर – १२९

१५. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्यात .......... जिल्हे होते.

उत्तर – २६.

## ४.५ सारांश :

भाषावार प्रांतरचना म्हणजे जातीवर व धर्मनिहाय प्रांतरचना नव्हे की, बहुसंख्यांकांनी अल्पसंख्यांकावर राज्य करणे नव्हे. समानभाषा बोलणाऱ्यांच्यामध्ये समरसता, एकसंघपणा व बंधुभाव निर्माण होऊन लोकशाहीची

उदात्त मुल्ये अधिकच बळकट करण्याचे ते माध्यम आहे. बहुसांस्कृतिकता जोपासताना ज्यांची त्यांची अस्मिता जोपासण्याची दिली गेलेली ती एक संधी आहे. आदर्श राज्यव्यवस्थेची ती एक उपलब्धी आहे. ब्रिटीशांनी त्यांच्या प्रशाकीय सोयीसाठी निर्माण केलेल्या मुंबई राज्यात गुजराथी, हिंदी, तेलगु, कानडी, पारशी, शिख, मल्याळी इ. अनेक बहुभाषिक होते. मराठी भाषिकांचे विभाजन ब्रिटीश प्रांत, अनेक संस्थानिक, हैद्राबादची निझामी राजवट इ. प्रदेशात होऊन त्यांचा शक्तीक्षय झाला होता. एकात्मता नष्ट झाली होती छ. शिवाजी राजे यांनी स्वराज्य स्थान करून अखिल हिंदुस्थानात मराठी भाषिकांचा दबदबा वाढविला होता. पेशवाईच्या काळात मराठी भाषिक हिंदुस्थानचे राज्यकर्ते बनले. ईस्ट इंडिया कंपनी, ब्रिटीश सरकार व पुढे उत्तर भारतीय प्रभावी काँग्रेसी व बिगर काँग्रेसी नेतृत्वाने मराठी लोकांच्या राज्यकर्त्या प्रवृत्तीच्या उच्चाटनासाठी मराठी संघभानेच्या वा एकसंधीकरणाला विरोध केल्याचे दिसते.

भारतीय स्वातंत्र्यानंतर लोकशाहीमध्ये लोकशाहीच्या हक्कासाठी झालेले हे आत्तापर्यंतचे सर्वात मोठे आंदोलन होते. हिंदी, मराठी, तेलगू, उर्दु व गुजराती भाषिक १०७ सत्याग्रहींनी मराठी भाषिकांनी मुंबईसहित संयुक्त महाराष्ट्र व्हावे यासाठी बलिदान देऊन हौतात्म्य पत्करले. लाखो कामगार, शेतकरी, शेतमजूर, महिला तरूणवर्ग, विद्यार्थी व अबाल वृद्धांनी संप, निदर्शने, सत्याग्रह करून आपल्या न्याय्य हक्कासाठी लढा दिला. ग. त्र्यं. मांडखोलकर, प्र. के. अत्रे, शाहिर अमर शेख, कॉ. शाहिर अण्णा भाऊ साठे, शाहिर गव्हाणकर, सेनापती बापट, सुधीर फडके यांच्या लेखी, वाणीने महाराष्ट्र प्रेम जनमानसाच्या ह्रदयात जागृत झाले. एस्. एम्. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, भाऊसाहेब हिरे, शंकरराव देव, गोदावरी परुळेकर, प्रेमा ओक, क्रांतिसिंह नाना पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रा. मधु दंडवते, प्रबोधनकार ठाकरे, बी. सी. कांबळे, गुरुनथराव कुकडे, केशवराव धोंगडे, चिंतामणराव देशमुख, यशवंतराव मोहिते, जयवंतराव टिळक व धनंजयराव गाडगीळ आदिंच्या नेतृत्वाखालील विविध चळवळी, निवेदन व त्याग्रहांमुळे आंदोलनाला योग्य दिशा मिळत गेली.

साहित्यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीने राजकीय स्वरूप धारण करून विविध राजकीय पक्ष, संघटना, प्रशावंत, बुद्धिवंत, लेखक, पत्रकारांच्या सहभागाने दिल्लीश्वराला संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करावी लागली. मुंबईवरील महाराष्ट्राचा नैसर्गिक हक्कही अबाधित राहिला. मा. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार, विलासराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण व मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील विविध प्रदेशाचा, अल्पसंख्यांक गट, विविध जाती-जमाती व बहुधर्मियांचा समतोल आर्थिक विकास होत राहिला. संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य, सामाजिक-आर्थिक विकासात अग्रेसर राहिले.

### ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील (दिर्घोत्तरी) प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्र राज्याचा ऐतिहासिक वारसा सांगून भाषावार प्रांतरचनेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला साहित्यिकांचे योगदान स्पष्ट करा.

३. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीतील घटनाक्रम सांगा?

४. संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीमध्ये 'संयुक्त महाराष्ट्र समितीचे योगदान स्पष्ट करा.

५. मुंबई पुनर्रचना कायदा व संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती विषयी माहिती द्या?

**ब) टीपा लिहा.**

१. मुंबई पुनर्रचना कायदा

२. संयुक्त महाराष्ट्र समिती.

३. बेळगांव साहित्य संमेलन (१९४६)

४. दार कमिशन

५. एस्. एम. जोशी व संयुक्त महाराष्ट्र समिती.

६. नागपूर करार (१९५३)

७. राज्य पुनर्रचना आयोग

८. संयुक्त महाराष्ट्र निर्मिती व प्र. के. अत्रे.

९. अकोला करार (१९४७)

१०. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व शेतकरी कामगार पक्ष.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ.


१. श्री. श्रीधर व्यंकटेश केतकर, प्राचीन महाराष्ट्र, वरदा बुक्स, पुणे.

२. गेल ऑमव्हेट, वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे.

३. वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे.

४. प्र. के. अत्रे, आलाच पाहिजे प्रकाशन, सौ. नम्रता मुळे.

५. य. द. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ व २, के. सागर प्रकाशन, पुणे.

६. य. दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ३ व ४, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

७. डॉ. अनिल कठारे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लि. औरंगाबाद.

८. अनंत भालेराव, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, पौज प्रकाशन, मुंबई.

९. भास्कर भोळे व किशोर बेडकिहाळ, बदलता महाराष्ट्र प्रकाशन, आंबेडकर अकादमी, सातारा.

१०. कृष्णा खोपकर, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि डाव्या पक्षांचे योगदान, जनशक्ती प्रकाशन, मुंबई.

११. V. D. Mahajan, The Nationalist Movement in India, Sterling Pub. Delhi.

१२. धनंजय किट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

❖❖❖

# घटक – १

# नेते

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ काँग्रेस नेतृत्व

१.२.२ समाजवादी नेतृत्व

१.२.३ कम्युनिष्ट नेतृत्व

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.५ अधिक वाचनासाठी संदर्भ

## १.० उद्दिष्टे :

नवनिर्मित महाराष्ट्र राज्य १ मे १९६० साली अस्तित्वात आले. या मराठी राज्याची निर्मिती अतिशय मोठ्या संघर्षातून झालेली आहे. या नव्या मराठी भाषक राज्याला आपल्या कार्याने कार्याने एकप्रकारे आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. विकासात्मक सामाजिक बदलाचे आयाम देण्यासाठी संघर्ष करणाऱ्या व्यक्तीमत्वांची माहिती विद्यार्थ्यांना माहिती होणे आवश्यक असल्याचा उद्देश आहे.

## १.१ प्रास्ताविक :

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर नवनिर्मिती महाराष्ट्र कसा असला पाहिजे यावर बरेच चिंतन आणि मंथन झाले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात झालाच पाहिजे हा शब्द जसा परवलीचा शब्द म्हणून पुढे आला तसा महाराष्ट्र हा असाच पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करणारी एक वडीलधारी पिढी पुढे आली. या पिढीने महाराष्ट्राला आपल्या कृतीने आणि वाणीने एक वैचारिक अनुबंध दिला. भारतीय स्वातंत्रलढ्यात प्रत्यक्ष लढलेल्या या पिढीने महाराष्ट्राच्या लोकजीवनाला एक वळण देणारा लढा त्यांनी उभा केला होता. यातील नेतृत्वाचे दोन भागात विभाजन करता येईल एक म्हणजे सत्तेत राहून आपल्या भूमिका यशस्वी करणे आणि दोन म्हणजे सत्तेच्या बाहेर राहून लढा उभारणे. मार्ग वेगवेगळे जरी असले तरी ध्येय मात्र एकच असल्याचे दिसते. राजकीय विचारधारा वेगवेगळ्या असल्या तरी नवसमाज निर्मिती हा एक समान धागा दिसून येतो. अशा कांही

निवडक व्यक्तींचा अभ्यास या घटकात करायचा आहे. यामध्ये तीन राजकीय विचारधारा आहेत त्यामध्ये काँग्रेस, समाजवादी आणि कम्युनिष्ट आहेत. काँग्रेसमधील दोन नेते यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, समाजवादी विचारधारेतील पद्मभूषण क्रांतिवीर डॉ नागनाथअण्णा नायकवडी, एस एम जोशी, आचार्य प्र के अत्रे कम्युनिष्ट पक्षाचे कॉम्रेड एस ए डांगे असे एकूण सहा नेतृत्वाचा अभ्यास यामध्ये अंतर्भूत केलेला आहे.

### १.२.१ काँग्रेस नेतृत्व

### १. यशवंतराव चव्हाण :

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र हे प्रथमपासून आघाडीचे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्राची गणना प्रगत राज्यांमध्ये होते. गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राला जे राजकीय स्थैर्य लाभले त्यामुळेच हे शक्य झाले. कर्तृत्ववान नेत्यांची परंपरा लाभल्याने हे स्थैर्य महाराष्ट्राला मिळाली व त्यामुळे महाराष्ट्राच्या विकास साधला गेला. महाराष्ट्राच्या आजवरच्या वाटचालीकडे नजर टाकली तर लक्षात येईल की आपल्या राज्याने एकीकडे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात संपूर्ण देशात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे तर दुसरीकडे औद्योगिक सहकार आणि कृषी क्षेत्रात ठसा उमटविला आहे. सामाजिक न्याय आणि सामंजस्याचा जो आदर्श राज्याने निर्माण केला आहे त्यामागे अनेक व्यक्तींची तपस्या आहे ,त्या पैकीचत्यापैकीच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे माननीय यशवंतराव चव्हाण होय. राज्याच्या स्थापनेपासून त्यांनी सर्वकष विकासासाठी अनेक दूरगामी निर्णय जाणीवपूर्वक घेतले घेतले.

**जीवन वृत्तांत :**

महाराष्ट्राच्या व देशाच्या सामाजिक आर्थिक शिक्षण व शेती विषयक सर्व समस्यांची जाण असणारे व बहुजनांच्या हितासाठी आयुष्यभर वाटचाल करणारे लोक नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण होय .त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे नावाच्या खेड्यात १२ मार्च १९१३ रोजी झाला. चव्हाण यांचे मुळगाव ढवळेश्वर. वडिलांचे नाव बळवंतराव, तर आईचे नाव विठाबाई. यशवंतरावांना ज्ञानोबा व गणपतराव हे बंधू तर राधाबाई या भगिनी होत्या. १९१७ सालीच्या प्लेग साथीत बळवंत रावांचे निधन झाल्याने कुटुंब निराधार झाले, त्यावेळी यशवंतरावांचे वय चार वर्षाचे होते. यशवंतरावांच्या जडणघडणीत आईचा मोठा वाटा आहे. रूढ अर्थाने विठाबाई शिक्षित नव्हत्या पण त्यांचे संस्कार पुण्याई साधेपणा प्रेम शिकवण या गुणांचा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडला .त्यांना माध्यमिक शिक्षणासाठी कराडला जावे लागले. १९२७ मध्ये व्हर्नाक्युलर परीक्षा पास झाली व टिळक हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. भारताच्या सामाजिक व राजकीय वास्तवाचा जो परिचय यशवंतरावांना लहानपणापासून आपोआपच होत होता त्यामुळे राजकीय पारतंत्र्य आणि सामाजिक विषमता हे जटिल प्रश्न त्यांना सतत प्रत्ययास येत होते. विजयी मराठा, राष्ट्रवीर ,मजूर इत्यादी वृत्तपत्रांमुळे यशवंतरावांच्या मनावर अधिक व्यापक स्वरूपाचे संस्कार झाले. यशवंतरावांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग विद्यार्थिदशेपासूनच सुरू झाला होता. कोल्हापुरात त्यांनी उच्च शिक्षण घेतले.

इतिहास व राज्यशास्त्र विषयात १९३८ साली ते बीए झाले. यादरम्यान अनेक काँग्रेस नेत्यांशी त्यांचा संबंध आला. १९४१ झाली वकीलझाले. त्यांच्या उच्च शैक्षणिक जीवनाचा प्रवास हा त्यांच्या वैचारिक पार्श्वभूमीला पैलू पाडून गेला. १९४२ झाली वेणूताईंशीत्यांचा विवाह झाला. त्यानंतर त्यांची राजकीय कारकीर्द विकसित होत गेली. अनेक पदे त्यांनी भूषविली शेवटी २५ नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी नवी दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. सन १९२७ ते १९४० हा पंधरा वर्षाचा काळ शिक्षणाबरोबरच यशवंतरावांची राजकीय मनोभूमी तयार करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला .ग्रामीण समाज काँग्रेसच्या झेंड्याखाली उभा करण्यासाठी खेड्यापाड्यात जाऊन यशवंतरावांनी लोकजागृतीचे कार्य केले. २६ जानेवारी १९३० ला स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी प्रतिज्ञापत्र बनवून ते कराडमध्ये त्यांनी वाटले झेंडावंदन करून स्वातंत्र्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करावयाचे अशी शपथ त्यांनी घेतली. सातारा जिल्ह्यातील बिळाशी बंडा वेळी तेथे जाऊन यशवंतरावांनी लोकांना दिलासा दिला. मसूर काँग्रेस परिषदेत त्यांनी सहभाग घेतला .टिळक हायस्कूलमध्ये असताना त्यांनी तिरंगा फडकाविला त्याबद्दल अठरा महिने कैदेची शिक्षा झाली. यशवंतरावांच्या मानसिक व बौद्धिक विकासाची प्रक्रिया तुरुंगवासात घडली. तात्विक व राजकीय शिक्षण पण त्यांना तुरुंगात मिळाले.परिणामी विचारांमध्ये अधिक प्रगल्भता आली. महात्मा गांधी व पंडित नेहरू यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पगडा त्यांच्यावर होता कराड तालुक्यातील खेडेगावांमध्ये काँग्रेस विचारसरणीचा प्रसार करणे, तेथील लोकांची सभासद नोंदणी करणे, डोक्यावर गांधी टोपी घालणेइत्यादी कामे १९३० च्या कायदेभंग चळवळी दरम्यान त्यांनी केली. १९४२ च्या चळवळीदरम्यान प्रमुख नेत्यांनी ब्रिटिशांनी तुरुंगात टाकल्याने स्थानिक पातळीवरील नेत्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारले. सातारा जिल्ह्यात यावेळी भूमिगत चळवळ सुरू झाली. भूमिगत्यांचेनेतृत्व यशवंतराव चव्हाण व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याकडे होते .अनेकांना त्यांनी प्रेरित केले .सातारा जिल्ह्याचे डिक्टेटर या नात्याने त्यांनी चळवळीचा प्रसार केला .सातारा जिल्ह्यात लोकविलक्षण स्वातंत्र्यलढ्यात सुरुवात झाली होती .अनेक गावात त्यांनी सभा घेतल्या. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मोठे मोर्चे न्यावयाचे व कचोरीवर झेंडा लावायचा असा कार्यक्रम होता. कराड, वडूज, पाटण, तासगाव इत्यादी ठिकाणच्या मोर्चा ना त्यांनी मार्गदर्शन केले. याच दरम्यान फलटण येथे आपल्या आजारी पत्नीस भेटावयास यशवंतराव गेले असता त्यांना १७ मे १९४३ ला अटक झाली .कौटुंबिक जबाबदारी असतानाही त्यांचे लक्ष चळवळीकडे अधिक होते पुढे १९४५ मध्ये सुटून आल्यावर पुन्हा नव्या उमेदीने सार्वजनिक कामात लागले.

**पार्लमेंटरी सेक्रेटरी :**

१९४६ साली असेंबली निवडणुक यशवंतरावांनी लढवली व यश मिळविले. सातारा जिल्ह्यातील त्यांचे नेतृत्व आता मुंबईत पोहोचले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही पक्षनिष्ठा जपून आपल्या कर्तृत्वाच्या आधारे त्यांनी महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल भारतीय राजकारणावरही आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी यशवंतरावांची पार्लमेंटरी सेक्रेटरी पदी नियुक्ती केली. त्यांनी सामान्य माणसाला दिलासा मिळेल असे अनेक निर्णय घेतले. त्यावेळी नागरी संरक्षणाच्या कामात नागरिकांना सामील करून घेण्याची आवश्यकता वाटल्याने होमगार्ड संघटना स्थापली. आपल्या प्रशासन कौशल्याचा उपयोग करून पोलीस यंत्रणेची सूक्ष्म तपासणी केली. त्यांनी तमाशा या लोककलेला प्रतिष्ठा मिळवून दिली. शासनाची मान्यता प्राप्त

करून दिली आणि त्यातून तमाशा बोर्ड अस्तित्वात आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते आमदार म्हणून निवडून आले, त्यांच्याकडे नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी आली.

### ३. द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री :

१९५२ ते १९५६ या मंत्रीपदाच्या काळात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे नेते म्हणून प्रस्थापित झाले. प्रारंभी द्वैभाषिक मुंबई राज्यात यशवंतरावांचा विरोध होता पण पक्षशिस्त म्हणून त्यांनी द्विभाषिक राज्याची कल्पना स्वीकारली. भाषिक राज्याच्या मुख्यमंत्री पदाची जबाबदारी १ नोव्हेंबर १९५६ रोजी त्यांनी स्वीकारली .१९५५ ते १९६० म्हणजे संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येईपर्यंत पाच-सहा वर्षांचा काळ हा यशवंतरावांचा कर्तुत्वाचा मुत्सद्दी पणाचा बुद्धिमत्तेच्या कसोटीचा काळ ठरला. संयुक्त महाराष्ट्रासाठी जनतेचे आंदोलन सुरू होते. यशवंतरावांना संयुक्त महाराष्ट्र हवा होता पण तो केंद्रीय नेतृत्वाचे मन वळवून मिळवावा ही त्यांची भूमिका होती. १९५७ च्या ऐतिहासिक निवडणुकीनंतरही ते पुन्हा मुख्यमंत्री झाले . संयुक्त महाराष्ट्र परिषदेने काँग्रेसपुढे मोठे आव्हान उभे केले होते. यशवंतरावांनी अवघड कामगिरी मोठ्या हिरीरीने पार पाडली. त्यांच्या राजकारणाचे कौशल्य यातून महाराष्ट्राच्या समोर आले. राज्यातील जनतेत एकात्मतेची भावना निर्माण झाली नाही म्हणून मुख्यमंत्री या नात्याने राज्य चालवणे अवघड आहे हे कटुसत्य केंद्रीय नेतृत्वाला पटवून देण्यात यशवंतरावांना यश आले, यामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या दुरदर्शी नेतृत्वाची खरी ओळख दिसून येते. एप्रिल १९६० मध्ये संसदेने द्वैभाषिक राज्याची पुनर्रचना करून मुंबईसह महाराष्ट्र व गुजरात असे दोन राज्य निर्माण करण्याचा ठराव यावर शिक्कामोर्तब केले.

### ४. संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री :

जाती-अंत बहुजनवादी विचार यावर आधारित राजकारण करणेहे त्यांच्या विचार व कार्याचे प्रमुख सूत्र होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतराव मुख्यमंत्री झाले. एकसंघ समाजाची उभारणी करणे हे त्यांच्या समोरील मोठे आव्हान होते. महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जडणघडणीमध्ये निर्माण झालेले असे संकुचित स्वरूपाचे वाद त्यांना हद्दपार करावयाचे होते व खऱ्या अर्थाने महाराष्ट्र धर्माची जोपासना करावयाची होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावांनी आपली सर्व शक्ती बुद्धी व महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकास साध्य करण्यावर केंद्रित केली. त्यांनी जनतेत जागृती निर्माण करून विकासाच्या विधायक कामासाठी जनतेची मने मनगटे तयार करण्यावर भर दिला व धोरणात्मक निर्णय घेतले. यशवंतरावांनी नेहमीच व्यापक दृष्टिकोन ठेवला. जरी ते अल्पकाळ मुख्यमंत्री होते तरी या काळात त्यांनी जे कार्य केले त्यामुळे महाराष्ट्राचे प्रगत अशा राज्यात त्यांनी परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या या कार्यामुळेच सन १९६२ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला फायदा झाला .महाराष्ट्रात काँग्रेसचा फार मोठा प्रभाव निर्माण झाला. काँग्रेसला मिळालेले यश हे यशवंतरावांच्या सुसंस्कृत राजकारणाला मिळालेले यश होते.

### ५. काँग्रेस पक्ष्याच्या बांधणीतील योगदान :

वयाच्या सतराव्या वर्षी काँग्रेसचा झेंडा घेऊन राष्ट्रीय चळवळीत यशवंतराव उतरले होते. यशवंतराव

आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत काँग्रेसच्या अथांग प्रवाहात एकरूप झाले. आपली निष्ठा त्यांनी ढळू दिली नाही .यशवंतराव चव्हाण वकाँग्रेस हे समीकरण म्हणूनच अभेद्यराहिले. सन १९२५ पर्यंत ते काँग्रेस चळवळीचे पाईक राहिले व नंतर काँग्रेसच्या राजकीय पक्षाशी ते बांधले गेले. राष्ट्रसभेचे आंदोलन लोकाभिमुख करण्यात त्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्वतःला झोकून दिले व आपल्या नेतृत्वाची पायाभरणी केली. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी दक्षिण महाराष्ट्रात विशेषत ग्रामीण भागात फार मोठे तरुण कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले होते. ते संघटना कुशल होते .यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्र काँग्रेसचा डळमळीत डोलारा सांभाळला. शेतकरी कामगार पक्ष जेव्हा स्थापन झाला तेव्हा हे आव्हान काँग्रेसच्यावतीने यशवंतरावांनी स्वीकारले व काँग्रेस पक्षाला एखाद्या जाती-जमातीचे अथवा प्रादेशिक स्वरूप येऊ नये म्हणून प्रयत्नांची पराकाष्टा केली. काँग्रेसचे राजकारण यशवंतरावांनी जातीच्या ,प्रदेशाच्या,विभागाच्यावरतीनेले. शेकापच्या पक्षीय पातळीवरील धोक्यापासून काँग्रेसचे रक्षण केले. कठीण काळात काँग्रेस पक्षाचे संघटन यशवंतरावांनी मुत्सद्देगिरीने केले. १९५७ नंतर पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसला अपयशातूनआलेली मरगळ झटकून त्यांनी पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. जे नेते महाराष्ट्राच्या प्रश्नावरून काँग्रेस सोडून गेले होते ,त्यांना परत काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न केला व बेरजेचे राजकारण केले. कार्यकर्त्यांची शिबिरे घेतली व मार्गदर्शन केले. काँग्रेस कार्यकर्त्यांचे प्रबोधन होऊन त्यांची संख्या वाढून पक्ष अधिक अधिक मजबूत व्हावा यासाठी ते कार्यरत राहिले.

## ६. शिक्षणविषयक योगदान :

यशवंतराव चव्हाण हे राजकारणातील लोकनेते व समाजकारणातील लोकशिक्षक होते. आयुष्यभर लोककल्याणाचा हेतू त्यांनी मला ठेवला व शिक्षणासंबंधी मूलगामी धोरणात्मक स्वरूपाची भूमिका घेतली. शिक्षण, शिक्षण प्रणाली, शिक्षणाची जीवनातील भूमिका प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठ स्तरावरील शिक्षणाची दिशा आणि ध्येय, ग्रामीण स्तरावरील शिक्षण प्रणाली आधी संदर्भात त्यांनी वेळोवेळी आपली भूमिका वेगवेगळ्या कार्यक्रमानिमित्त आयोजित समारंभातून व्यक्त केली. शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन मानले. पंचायत राजची स्थापना झाल्यावर प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेकडे सोपविले .समाजातील कोणत्याही व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी ठोस निर्णय घेतले. माध्यमिक शिक्षण हे अर्थपूर्ण व सर्वस्पर्शी असले पाहिजे समाजाच्या आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक अनेक विविध प्रश्नांचा त्यात विचार असला पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी १९६० मध्ये स्वतंत्र बोर्डाची स्थापना केली. माध्यमिक शिक्षणात तांत्रिक शिक्षणाचीही सोय निर्माण करून शिक्षणात विविधता आणली सातारा येथे सैनिक स्कूलची स्थापना हे सैनिकी शिक्षण क्षेत्रातले यशवंतरावांचे एक चिरंतन कार्य उभे राहिलेले आहे.

देशाची प्रगतीही तेथील शिक्षणावर अवलंबून असते हे जाणून व शिक्षणाचे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे हे ओळखून यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक वातावरणाला गतिमान केले ग्रामीण शिक्षणावर भर देणे हे शासनाचे मुख्य धोरण त्यांनी निश्चित केले होते त्यासाठी पंचायत राज यांच्या माध्यमातून शिक्षणाची चळवळ सार्वत्रिक केली. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाची क्रांतिकारी योजना अमलात आणली आणि

शिक्षणाची दारे सर्वांसाठी उघड झाल्यामुळे महाराष्ट्रात एक वेगळी क्रांती घडून आली. आदिवासींसाठी आश्रम शाळा त्यांनी स्थापन केलेल्या यशवंतरावांनी कृषी, उद्योग, व्यवस्थापन, कायदा, कला, विज्ञान, वाणिज्य, सहकार इत्यादी प्रकारच्या शिक्षण व प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. यशवंतरावांच्या काळात केवळ महाविद्यालय स्थापन झाली नाही तर विद्यापीठांची स्थापना झाली. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी विविध स्तरावरील तांत्रिक आणि अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्रात सुरू करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. कृषी शिक्षणाचे महत्त्व जाणून कृषी महाविद्यालय उभारण्यात सहकार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची धुरा यशवंतरावांनी सांभाळून रयत शिक्षण संस्थेची सेवा केली.

**७. लोककल्याणकारी निर्णय :**

मंत्री व मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रातील जनतेच्या कल्याणासाठी व सर्वांगीण विकासासाठी अनेक लोक कल्याणकारी निर्णय घेऊन यशवंतरावांनी ते राबविले, त्यामुळे महाराष्ट्राची मोठ्या वेगाने आधुनिकतेकडे वाटचाल झाली. खऱ्या अर्थाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे भाग्यविधाते ठरले.

**८. वने व वन्यप्राणी, अभयारण्य –वनसंरक्षण :**

पशु पक्ष्यांचे संरक्षण याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी मानवी असल्याने त्यांनी कायदा केला. मुंबई राज्य हे वनसंपदा वन्यपशू पक्ष्यांचे संरक्षण विषयक कायदा करणारे देशातील पहिले राज्य ठरले. अभयारण्य उभारण्याची कायदेशीर तरतूद करुन प्राण्यांच्या शिकारीवर त्यांनी बंदी घातली.

**९. प्रशासकीय सुधारणा :**

महाराष्ट्र राज्याची सहा विभागात विभागणी केली. त्यामुळे कारभारात सुकरताआली. जनतेच्या सोयीसाठी प्रशासकीय कामांची व्यवस्था करण्यात त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

**१०. सचिवालयाचा विस्तार :**

सर्व खात्यांची व खातेप्रमुख यांच्या कार्यालयाची पंचवीस टक्के वाढ करण्याची योजना यशवंतरावांनी अमलात आणली, त्यामुळे कार्यभाराचेयोग्य वाटप करणे शक्य झाले. मुंबईतील सचिवालयाच्या भव्य सहा मजली इमारतीचे बांधकाम मुख्यमंत्री झाल्यावर अवघ्या बारा दिवसांनी त्यांनी सुरू केले.

**११. विभागीय सल्लागार मंडळ :**

राज्याच्या सर्व विभागांचा समान विकास व्हावा म्हणून विभागीय विकास कामांना गती देण्यासाठी सल्लागार मंडळाची स्थापना यशवंतरावांनी केली.

**१२. महाराष्ट्र परिचय केंद्र स्थापना :**

मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठी माणसाविषयी खरी वस्तुस्थिती कळावी याकरता दिल्लीमध्ये महाराष्ट्र परिचय केंद्र स्थापन केले, त्याचा महाराष्ट्रीय जनतेला लाभ झाला.

**१३. कसेल त्याची जमीन :**

नवा कायदा लागू करून कसेल त्याची जमीन हे तत्त्व व्यवहारात लागू केले.कुळांना जमिनीचा मालकी हक्क मिळाल्याने जमीन सुधारणेला चालना मिळाली व शेतमालाचे उत्पादन वाढले.

**१४. भूमिहीनांना जमीन वाटप :**

शेतजमिनीवर कमाल भूधारणा मर्यादा कायदा लागू केल्याने कायद्यापेक्षा अधिक असलेल्या जमीनी मालकाकडून काढून भूमिहीन शेतकऱ्यांना वाटल्या.

**१५. राज्य पाटबंधारे मंडळ :**

कोरडवाहू शेतीस पाणी पुरवठा व्हावा यासाठी त्यांनी योजना आखल्या .पाटबंधारे योजनांना प्रोत्साहन दिले.स.गो.बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पाटबंधारे मंडळ स्थापन केले. संपत्तीची पाहणी केली व त्यांच्या शिफारसी नुसार कार्यवाही केली.

**१६. सहकारातून समाजवादाकडे :**

विविध कार्यासाठी सेवा सहकारी संस्थांच्या निर्मितीस त्यांनी प्रोत्साहन दिले. जिल्हा सहकारी बँका, कृषी उत्पन्न बाजार समित्या ,खरेदी विक्री संघ ,शेतमाल प्रक्रिया सहकारी संघ, सहकारी गृह बांधणी संस्था, सहकारी साखर कारखाने इत्यादी शेतजमिनीचे आकारमान किफायतशीर असावे म्हणून १९५९ मध्ये तुकडे बंदी ,तुकडे जोड कायदा अमलात आणला.

**१७. पायाभूत सुविधा :**

पाणीपुरवठा, वीजपुरवठा, रस्ते, दूरध्वनी, टपाल व्यवस्था इत्यादी पायाभूत सुविधा औद्योगिक वसाहतीतून निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला व कुटीर उद्योगांचा विकास साधला.

**१८. सत्तेचे विकेंद्रीकरण :**

यशवंतरावांनी पंचायत राज्याच्या दर्जा सुधारण्यासाठी व स्थानिक नेतृत्व वृद्धिंगत करण्यासाठी वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीचा पुरेपूर अंमल करून पंचायत राज्यास बळकटी आणण्याचा प्रयत्न केला. सत्तेचे विकेंद्रीकरण करणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत राज्याची योजना प्रत्यक्षात एक मे १९६२ रोजी अमलात आली.

**१९. नवबौद्धना सवलती व डॉ आंबेडकर स्मारक :**

हरिजनांना मिळणाऱ्या सर्व सवलती नवबौद्ध यांना यापुढे चालू राहतील असे आदेश त्यांनी काढले. दीक्षाभूमीवर डॉक्टर आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय यशवंतरावांनी घेतला.

**२०. राजभाषा मराठीच :**

मराठी राजभाषा करण्यासाठी त्यांनी भाषा संचालनालय निर्माण केले. शासकीय कार्यालयीन कारभार

मराठीतून चालवण्याचा निर्णय यशवंतरावांनी घेतला. शासकीय निवासस्थानांनाअसणारी ब्रिटिश अधिकाऱ्यांची नावे बदलून मराठी नावे दिली. राज्य निर्मितीनंतर विरोधकांशी चर्चा करून महाराष्ट्र राज्य हे नाव निश्चित करून विधानसभेत एकमुखाने संमत करून घेतले.

**२१. मुख्यमंत्री निधीची स्थापना :**

आपदग्रस्तांना अर्थसाहाय्य करण्यासाठी यशवंतरावांनी महाराष्ट्रात प्रथमच मुख्यमंत्री निधी या स्वतंत्र निधीची स्थापना केली. या निधीतून सेवाभावी संस्था व संघटनांना आर्थिक सहाय्य केले जाते, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत केली जाते.

**२२. सफाई कामगारांना प्रतिष्ठा :**

सामाजिक विषमतेवर आधारित वाईट प्रथा म्हणजे डोक्यावरून महिला वाहून नेणे, ही प्रथा २० सप्टेंबर १९६२ रोजी कायदा करून त्यांनी बंद केली.

**२३. नागपूरचे महत्त्व कायम ठेवले :**

द्वैभाषिक राज्य नंतर नागपूर हे राजधानीचे महत्त्व संपले होते, पूर्वी नागपूर मध्य प्रदेश ची राजधानी होती. हिवाळी अधिवेशन नागपूरला भरवण्याचा यशवंतरावांनी निर्णय घेतला व नागपूर शहराचे महत्त्व कायम ठेवले.

**२४. साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान :**

यशवंतराव एक अभिजातसाहित्यिक होते .मराठी साहित्यामध्ये विविध प्रकारचे लेखन त्यांनी केल. ललित, चरित्रात्मक, प्रवासवर्णनपर, स्फुट, वैचारिक इत्यादी प्रकारच्या ग्रंथातून त्यांच्या ललित प्रवृत्तीचा आपल्याला परिचय होतो. कृष्णाकाठ, शिवनेरीच्यानौबती, सह्याद्रीचे वारे, युगांतर, भूमिका, ऋणानुबंध इत्यादी ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. साहित्यिकांना त्यांनी प्रोत्साहन दिले. १७६ पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या. यशवंतरावांचे ग्रंथावर मनापासून प्रेम होते. मराठी लेखकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. ते सर्जनशील कलावंत, उत्तम समीक्षक होते. त्यांची राजकीय भाषणे ही साहित्यिक भाषणे होत होती. भाषा, अभिरुची, रसिकता, ग्रंथप्रेम, काव्य समीक्षा, नाटके, लोककला इत्यादीविषयी ते जाणकारीने बोलत व लिहिताही. साहित्याचा जीवनवादी विचार त्यांनी आपल्या विवेचनातून मांडला. साहित्याची संस्कारक्षमता व शब्दांचे सामर्थ्य यावर त्यांचा विश्वास होता. साहित्य व समाजजीवन यांच्यात त्यांनी कधी फारकत केली नाही म्हणून यशवंतरावांच्या साहित्य विचारातसमाज चिंतनातअग्रस्थान आहे. त्यांनी सतत वांग्मय विकासाचा विचार केला होता. अनेक साहित्य विषयक व सांस्कृतिक उपक्रम त्यांनी चालू केले .महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोश, भाषा संचालनालय, सांस्कृतिक विभाग, प्रीतीसंगम उद्यान, मराठी रंगभूमी त्याला उत्तेजन देऊन करमुक्त केले. शास्त्रीय आणि लोकसाहित्याच्या जोपासण्यासाठी अनेक साहित्य विषयक व सांस्कृतिक उपक्रम त्यांनी चालू केले. सांस्कृतिक स्तर उंचावण्यासाठी साहित्यक सारखे दुसरे प्रभावी साधन नाही, हा विचार त्यांनी मांडला. मराठी भाषा मराठी संस्कृती यांच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. मराठी ही ज्ञानभाषा व्हावी, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारसा जतन व्हावा व त्यामध्ये नवनिर्मिती व्हावी म्हणून विश्वकोश निर्मितीस प्रोत्साहन

दिले. साहित्य संमेलनात त्यांचा थेट सहभाग असे. साहित्यिकाने सामाजिक बांधिलकी मानावी असे आवाहन आपल्या विचारातून त्यांनी व्यक्त केले. मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांनी दलित साहित्याला मुख्य प्रवाहात आणले. यशवंतरावांनी कलावंतांना साहित्यिकांना नेहमीच प्रोत्साहन दिले. कलाकार, गायक, नट, तमासगीर, कुस्तीगीर, शाहीर या सर्वांसाठी त्यांनी अनुदाने सुरू केली. कलाकारांना सन्मानाने वागविले. त्यांच्या रसिकतेमुळे साहित्य, कला, संगीत, नाट्य, चित्रपट, लोकनाट्य या सर्वच क्षेत्रात प्रगती झाली. जरी ते केंद्रात मंत्री म्हणून कार्यरत होते तरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वाशी एकरूप झाले होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतरावांनी दाखविलेली दूरदृष्टी व घेतलेले अचूक निर्णय यातूनच आजचा प्रगतीशील महाराष्ट्र घडलेला आहे. सांस्कृतिक क्षेत्रातील महाराष्ट्राचा थोर वारसा त्यांनी पुढे नेला. साहित्य संस्कृती आणि राजकारण यांचा यशवंतरावांनी साधलेला समन्वय हा त्यांच्या साहित्य प्रेमाचे संस्कृती प्रेमाचे आणि मूल्याधिष्ठित राजकारणाचे दर्शन घडवणारा आहे.

**२५. राष्ट्रीय स्तरावरील कारकीर्द :**

सन १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले, त्यामुळे यशवंतरावांना नेहरूंच्या सूचनेनुसारकेंद्रात संरक्षणमंत्री पदाचीजबाबदारी स्वीकारावी लागली. त्यानंतर केंद्रीय स्तरावर त्यांच्या कक्षा रुंदावत गेल्या. १९६२ ते १९८४ अशी २२ वर्षे त्यांनी दिल्लीत काढली व आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा तेथील राजकारणावरून उमटविला.

**२६. भारताचे संरक्षणमंत्री सन १९६२ ते १९६६ :**

या काळात संरक्षण मंत्री या नात्याने यशवंतरावांनी सैन्यदलात आत्मविश्वास निर्माण केला. संरक्षण योजना तयार केली. अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. खचलेल्या सैन्याचे मनोधैर्य उंचावण्यासाठी युद्ध आघाड्यांवर भेटी देऊन यशवंतरावांनी चीनच्या आक्रमणास सडेतोड उत्तर दिले. पहिली संरक्षण विषयक पंचवार्षिक योजना तयार करून भारतीय बनावटीची लढाऊ विमाने, वैजयंता रणगाड्यांचे उत्पादन केले. रशियाशी करार करून मिग विमाने तयार करण्याचा कारखाना नाशिक येथे काढला. सीमावर्ती राज्यांना भेटी देऊन लष्कराची फेररचना केली. १९६५ च्या युद्धात पाकिस्तानचा पराभव करून १९६६ मध्ये ताश्कंद करार घडवून आणला. संरक्षण विषयक विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र समित्या नेमल्या. जनसामान्यांमध्ये लष्कराच्या भूमिके संबंधी सकारात्मक जाणीव वाढविण्याचे प्रयत्न केले.नेहरूसोबत लडाख आसामचा लष्करी ठाणे यांचा दौरा केला. आपल्या देशाच्या लष्करात आधुनिक शस्त्रास्त्रे विविध सुविधांची कशा पद्धतीने वाढ करता येईल याबाबत ते सतत जागृत असत. भारत शांतताप्रिय असला तरी बलवान आहे याची जाणीव सर्व जगाला त्यांनी करून दिली. थोडक्यात यशवंतराव चव्हाण यांच्या काळात त्यांच्या कार्यशैलीमुळे भारताच्या संरक्षण खात्याचा दबदबा जगभर निर्माण झाला होता.

**२७. गृहमंत्री काळातील कार्य :**

सन १९६६ मध्ये गुलजारी लाल नंदायांच्या राजीनाम्यामुळे यशवंतरावांना गृहमंत्रीपद मिळाले. या काळात

त्यांची राजकीय परिपक्वता, दूरदृष्टी, वाद-विवाद कौशल्य, घटनात्मक पेच प्रसंगावर मात करण्याची पद्धत, अतिशय बिकट राजकीय पेचप्रसंग तोंड देण्याची तयारी दिसून आली. गोहत्याबंदी, प्रादेशिक फुटीरता, विद्यार्थी व केंद्रीय पोलिसांचीही आंदोलने, सीमारेषेवरील पाकिस्तान व चीन ची विघटनकारी शक्तींना फूस, केंद्र व राज्य यांच्या संबंधातील तणाव, संसद राज्यपाल सभापती मुख्यमंत्री यांच्या अधिकार क्षेत्रात संबंधीचे वाद, पक्षांतराच्या समस्या, जातीय दंगली, नक्षलवादी कारवायांचे वाढते प्रमाण, बिकट, बनलेला पंजाबचा प्रश्न अशा अनेक समस्यांनी यशवंतरावांना गृहमंत्री पदाच्या कार्यकाळात ग्रासले होते. परंतु हे प्रश्न त्यांनी चांगल्या पद्धतीने हाताळून गृह खात्यातील अधिकाऱ्यांच्या नैमित्तिक बैठका, योग्य नियोजन व धोरण तसेच समजूतदार भूमिका घेऊन सर्व समस्यावर यशस्वीपणे मात केली.

**२८. अर्थमंत्री म्हणून कार्य (जून १९७० ते ऑक्टोबर १८७४) :**

या काळासाठी त्यांच्याकडे अर्थमंत्रीपद सोपविण्यात आले. आर्थिक दृष्ट्या सरकार अडचणीत असताना ही यशवंतरावांनी या काळात अनेक नव्या योजना सुरू करून मंत्रालयाचे कामकाज कुशलपणे चालविले. अर्थमंत्री म्हणून सर्व बँकांना समाजाभिमुख कार्य प्रणाली राबविण्याचा सल्ला दिला. त्यांनी देशाचे अंदाजपत्रक बनविताना शासकीय लाभ सर्व सामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी चांगला प्रयत्न केला. आपल्या देशाचा विकास आणि सामाजिक न्यायाची सांगड घालण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला व महत्त्वाचे कायदे मंजूर करुन काळा पैसा साठविण्याच्या वृत्तीला लगाम घातला. आयात-निर्यात विषय आपली आंतरराष्ट्रीय नीती जाहीर केली. सुशिक्षित बेकार भाववाढ शहरी व ग्रामीण बेकारी जमीन सुधारणाविषयक प्रश्न इत्यादी अडचणी त्यांच्या खात्याला भेडसावत होते, तरीदेखील त्यांनी त्यावर मात करून आपली कारकीर्द यशस्वी करून दाखविली.

**२९. भारताचे परराष्ट्रमंत्री (ऑक्टोबर १९७४ ते मार्च १९७७) :**

या काळात त्यांनी परराष्ट्र मंत्री पद भूषविले. आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका यासारख्या खंडातील अनेक देशांना कामानिमित्त भेटी दिल्या. भारताच्या संबंधाबाबत कोण उदासीन आहे, विरोधी कोण, मित्र कोण इत्यादी बाबींचा अंदाज बांधून वाटचालीस प्रारंभ केला. भारतीय उपखंडात शांतता निर्माण करून चीन पाकिस्तानच्या साम्राज्यवादी वृत्तीला शह दिला. त्यामुळे यशवंतराव हे परराष्ट्र धोरणातील मुत्सद्दी मानले गेले. संयुक्त राष्ट्रांशी त्यांचा संबंध आला तेव्हा त्या ठिकाणी अनेक प्रतिनिधी समोर अभ्यासपूर्ण भाषणे त्यांनी दिली. भारता विरोधी देशांची विरोधाची धार कमी करणे, योग्य रित्या आपल्या देशाबद्दलचे मतपरिवर्तन घडवून आणणे भारताला जास्तीत जास्त सहकार्य करणाऱ्या मित्र राष्ट्रांची संख्या वाढविणे इत्यादी गोष्टीसाठी सातत्याने यशवंतरावांनी प्रयत्न केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक देशांशी आर्थिक व लष्करी करार करून मैत्रीपूर्ण संबंधवृद्धिंगतकेले. परराष्ट्रमंत्री म्हणून केलेल्या कामाच्या अनुभवावरून त्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण आणि विदेश भेट ही पुस्तके लिहिली. चरणसिंग भारताचे पंतप्रधान झाल्यानंतर १९७९ मध्ये यशवंतराव उपपंतप्रधान झाले. परंतु या सरकारच्या काळात उपपंतप्रधान म्हणून त्यांची कारकीर्द अत्यंत ठरली. दिल्लीच्या राजकारणात यशवंतरावांचे योगदान मोठे होते. पंतप्रधानपदाचा अपवाद वगळता इतर सर्व महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली.

### ३०. समारोप :

विसाव्या शतकातील आधुनिकनेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे स्थान अग्रगण्य आहे. समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, व्यवहार चतुर, कुशल प्रशासक, अफाट लोकसंग्रह, कलारसिक, कुटुंबवत्सल, तत्त्वचिंतक अशा विविध पैलूंनी यशवंतरावांचे व्यक्तिमत्व समृद्ध आहे. संवेदनक्षम मन व मनमिळावू स्वभाव या दोन गोष्टींचा यशवंतरावांच्या नेतृत्व उभारणीत फार मोठा वाटा आहे. राजकारण करताना भावना वेगापेक्षा बौद्धिक प्रेरणेला त्यांनी महत्व दिले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांनी राज्याच्याच नव्हे तर देशाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले दिसते. सत्तेचे विकेंद्रीकरण करून सरंजामशाही समाज रचना मोडीत काढणारे महाराष्ट्रातील ते पहिले नेते ठरले. महाराष्ट्राच्या व देशाच्या सामाजिक, आर्थिक, शिक्षण व शेती विषयक सर्व समस्यांची जाण असणारे व बहुजनांच्या हितासाठी आयुष्यभर वाटचाल करणारे ते लोक नेते होते. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांनी सामाजिक समरसतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन समाजातील उपेक्षित व दुर्बल घटकांना सर्वांगीण विकास आणि प्रगतीच्या संधी मिळाव्या म्हणून आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात विविध धोरणे आणि योजना आखल्या, त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. त्यांना तळागाळातल्या जनतेच्या प्रश्नांची अचूक जाण होती. बहुजन समाजाला बरोबर घेत अभिजनांचा आदर करीत केवळ बेरजेचे राजकारण करण्यावर भर दिला. त्यांना तळागाळातील जनतेच्याप्रश्नांची अचूक जाण होती. बहुजन समाजाला बरोबर घेत अभिजनांचा आदर करीत केवळ बेरजेचे राजकारण करण्यावर भर दिला. शिक्षण, सहकार, कृषी, उद्योग, विज्ञान तंत्रज्ञान, कला अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांवर त्यांच्या व्यक्तिमत्वाची विचारांची छाप आजही पडलेली दिसते. सुसंस्कृत नेतृत्वाचा आदर्श वस्तुपाठ ठरलेल्या यशवंतरावांनी आपले संस्कार महाराष्ट्रालादिले. त्यांनी ज्या जबाबदारीच्या जागी काम केले त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. बहुजन समाजातील सर्वसामान्य वर्गातून येऊन त्यांनी देशाच्या राजकारणात मौलिक योगदान दिले .आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण लोकशाही मूल्यावर तसेच समाजवादी समाजरचना वर झाली पाहिजे हे त्यांच्या विचार व कार्याचे सूत्र होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्यांनी आपली सर्व शक्ती व बुद्धी महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यासाठी केंद्रित केली. महाराष्ट्र समोर कृषि अर्थ उद्योग शिक्षण पाणीपुरवठा दळणवळण वीज रस्ते असे अनेक प्रश्न होते ,त्या सर्वावर मात करून जनतेमध्ये जागृती केली.प्रशासनाचेही स्वरूप बदलून महाराष्ट्राला सर्वोच्च स्थानी ठेवण्याचा सतत प्रयत्न केला. यशवंतरावांनी महाराष्ट्रात कृषी औद्योगिक विकास साधताना शिक्षण चळवळ उभारली, सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून साहित्य संस्कृती कला क्रीडा क्षेत्रांना उत्तेजन दिले. त्यामुळे आज महाराष्ट्र सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे असे दिसते .महाराष्ट्र जर खर्या अर्थाने समृद्ध करावयाचा असेल तर यशवंतराव चव्हाण यांचा विचार व वारसा आपण जपला पाहिजे.

### २. वसंतरावदादा पाटील :

पद्मविभूषण वसंतराव पाटील हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. एक स्वतंत्र सैनिक, लोकसंघटक, कृषी, सहकार क्षेत्राची उत्तम जान असणारे प्रशासक, कुशल राजकारणी, मुत्सद्दी, चार टर्म महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषवलेले, राजस्थानचे राज्यपाल म्हणूनही कार्यरत असणारे, बहुआयामी असे वसंतराव

पाटील एक सामान्य कार्यकर्ता ते मुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास ठरला. त्यांनी घेतलेले अनेक दूरगामी निर्णय महाराष्ट्राच्या समाजकारण, राजकारणाला दिशादर्शक ठरले.

**वसंतदादा पाटील यांचा पूर्वपरिचय :**

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात पद्माळे या छोट्या गावात १३ नोव्हे. १९१७ रोजी दिवाळीच्या लक्ष्मी पुजनादिवशी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव रुक्मिणीबाई व वडिलांचे नाव बंडूजी होते. वसंतरावदादांचे पाळण्यातील नाव यशवंत परंतु वसंत हेच नाव पुढे रुढ झाले. ऐन दिवाळीत जन्मलेला वसंता काहीतरी असे करेल कि घराघरात आनंद निर्माण करील, हे आजीचे वाक्य त्यांनी खरे करून दाखवले. वसंतरावांचे बालपण कागलला आजोळी मामाकडे गेले. दहाव्या वर्षी ते आपल्या गावी पद्माळ्याला आले. आजीच्या पुढाकाराने घरातच त्यांची शाळा सुरु झाली.वसंतरावाना शिक्षणाची आवड होती परंतु ७ वी पर्यंतच त्यांचे शिक्षण झाले.त्यानंतर त्यांनी शाळा सोडून दिली. आपल्या मामाची कन्या मालती हिच्यासोबत २२ व्या वर्षी विवाह केला. १९४७ ला त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव त्यांनी प्रकाश ठेवले.

**कार्यकर्ता, स्वातंत्रसैनिक म्हणून जडणघडण :**

इयत्ता ७ मध्ये शाळा सोडल्यानंतर शेतीकामात त्यांनी लक्ष घातले. शेतीकामातील बारकाव्याचा त्यांनी अनुभव घेतला. शेती बागायत नसल्याने शेतीची कामे नसताना विविध प्रकारच्या त्यांनी नोकऱ्या केल्या. त्यांनी लोकवर्गणी काढून आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने तासगाव ते पद्माळा हा रस्ता तयार करून घेतला. नदीवरती घाट बांधणीचेही काम केले.काहीकाळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवरतीही जात होते. पण पुढे संघ सोडून दिला आणि सत्यशोधक चळवळीत ते काम करू लागले. इ.स.१९३० पासून राष्ट्रीय काँग्रेसचे काम करण्यात सुरवात केली. इ.स.१९३७ मध्ये ते तालुका काँग्रेसचे सरचिटणीस झाले. १९४२ च्या स्वतंत्रलढ्यात भूमिगत राहून त्यांनी भाग घेतला. त्याना कारावासाची शिक्षा झाली. तेथे त्यांनी तुरुंग फोडण्याचा धाडसी प्रयत्न केला. त्याबद्दल त्यांना पुण्यातील येरवडा कारागृहात १३ वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली. परंतु जनरेट्यामुळे अडीच वर्षातच त्यांची २५ एप्रिल १९४६ रोजी सुटका झाली. त्यांच्या सुटकेनंतर संपूर्ण सांगली जिल्ह्यातून ५० हजारावरती लोकांनी उस्फुर्तपणे स्वागत केले.

**विधायक राजकारणाची सुरवात :**

जेलमधून सुटकेनंतर ते काँग्रेसच्या सक्रीय राजकारणामध्ये आले. त्यातच ते १४ मे १९४६ रोजी जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस झाले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वातंत्र्यानंतर सांगलीच्या स्टेशन चौकात त्यांनी तिरंगा फडकाविला. ३० जाने. १९४८ रोजी म. गांधीजींच्या हत्येनंतर उसळलेली सांगलीतील दंगल शमविण्यात त्यांनी योगदान दिले. शिस्तबद्ध स्वयंसेवकांची फळी निर्माण करण्याच्या संकल्पनेतून होमगार्ड हि नवी संकल्पना उदयाला आली. सांगली जिल्हा कमांडर म्हणून दादांची नियुक्ती झाली.

इ.स. १९५२ मध्ये स्वातंत्र भारतातील पहिली सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली. त्यावेळी सांगली

विधानसभा मतदार संघातून ते निवडून आले. संयुक्त महाराष्ट्र लढ्याची चळवळ जोमाने सुरु असताना आणि काँग्रेसविरोधी वातावरण असतानाही इ.स. १९५७ च्या निवडणुकीत ते २४ हजार मतांनी ते निवडून आले.

**सहकार, कृषी, शिक्षण, नाट्यक्षेत्रातील योगदान :**

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूनी देशातील वाढती साखरेची मागणीच्या पूर्ततेसाठी २३ नव्या कारखान्यांना परवानगी दिली.त्यात सांगली जिल्हयामध्ये ३१ मे १९५६ रोजी स्वामी रामानंद भारतीच्या नेतृत्वाखाली प्रगतीशील शेतकऱ्यांची बैठक आयोजित करून साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. मळीपासून अल्कोहोल निर्मितीचा प्रकल्प निर्माण केला आणि पूरक उद्योगांची सुरवात झाली. १५ जुलै १९६० रोजी वसंतदादाच्या नेतृत्वाखाली बैठक होऊन सांगलीत सहकारी औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात आली.सहकार,कृषीत कार्यरत राहताना शिक्षणाची निकड पूर्ण करण्यासाठी लठ्ठे एज्यूकेशन सोसायटीचीच्या माध्यमातून नवीन महाविद्यालयाला परवानगी मिळवून दिली.सांगलीची नाट्यपंढरी म्हणून ओळख दृढ करण्यासाठी सांगलीमध्ये आकाशवाणी केंद्र व्हावे अशी जनतेची मागणी लक्षात घेऊन दादांनी त्यासाठी खास प्रयत्न करून इ.स १९६३ मध्ये सांगली आकाशवाणी केंद्र मंजूर झाले.

**काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष,पाटबंधारे मंत्री म्हणून कार्यरत :**

संयुक्त महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतरच्या निवडणुकीत ते पुन्हा इ.स १९६२ मध्ये आमदार म्हणून निवडून आले. तल्लख बुद्धिमत्ता, प्रश्न समजावून घेण्याची कुवत, प्रचंड लोकसंपर्क यामुळे १९६२ मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे ते सरचिटणीस झाले.त्याचवर्षी त्यांनी श्रीमती शालिनीताई पाटील यांच्याशी वयाच्या ५० व्या वर्षी दुसरा विवाह केला. शालिनीताईना ४ मुले होती. त्यांना आपलीच मुले मानून त्यांनी नव्याने संसार सुरु केला. पुढे वसंतरावदादा–शालिनीताई यांनी राजकारण, समाजकारण यात सक्रियपणे भाग घेतला. पुढे दादा १९६६ मध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष झाले नंतर १९७२ च्या निवडणुकीतही दादा विजयी होऊन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळामध्ये पाटबंधारे हे महत्वाचे खाते देण्यात आले.पुढे मुख्यमंत्री झालेल्या शंकरराव चव्हाण यांनी त्यांना मंत्रिमंडळातून वगळले. त्यामुळे अचानक १३ नोव्हे.१९७६ रोजी त्यांनी राजकारणामधून संन्यास घेतला.पुढे १७ एप्रिल १९७७ रोजी दादांनी पुन्हा सक्रीय राजकारणात प्रवेश केला.

**वसंतदादांची मुख्यमंत्रीपदावर निवड :**

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर देशात, महाराष्ट्रात काँग्रेस पक्षास उतरती कळा लागल्याने महाराष्ट्रात नेतृत्व बदलाची गरज निर्माण झाली. नवीन मुख्यमंत्री निवडीसाठी १७ एप्रिल १९७७ रोजी आमदारांची बैठक झाली.सी.सुब्रमण्यम हे केंद्रीय निरीक्षण होते. त्यांनी विधिमंडळ पक्षनेता निवडीसाठी मतदान घेण्याचा निर्णय घेतला.त्या मतदानात वसंतरावदादाना १८९ तर त्यांचा विरोधात उभे राहिलेल्या यशवंतराव मोहिते यांना ८८ मते मिळाली आणि वसंतराव पहिल्यांदा मुख्यमंत्रीपदावर विराजमान झाले. विशेष म्हणजे वसंतराव कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. त्यांनी १७ एप्रिल १९७७ ते ७ मार्च १९७८ अशी साधारणतः ११ महिने पहिली टर्म मुख्यमंत्री पदावर होते.

**मुख्यमंत्री वसंतरावदादांचे धोरणात्मक निर्णय :**

३७ वर्ष लोकप्रतिनिधी म्हणून वसंतरावदादांनी कार्य केले. मुख्यमंत्री पदावर येताच धोरणात्मक निर्णय घेण्यास सुरवात केली.त्यांनी शेतकऱ्यांची थकबाकी रद्द केली. ५० पैशांपेक्षा कमी शेतसारा असणाऱ्या कोरडवाहू शेतजमिनीची बंडिंग,टेरेसींगची कामे शासनामार्फत केली. कोयना भूकंपग्रस्तांची कर्जे माफ केली, शेतकऱ्यांची १५०० रुपयांपेक्षा कमी कर्जे व्याजासहित माफ केली. सर्व जनतेसाठी मंत्रालय खुले केले.१ मे १९७७ या महाराष्ट्र दिनी प्रशासनात मराठीचा जास्तीत जास्त वापरासाठी प्रोत्साहन दिले. वृत्तपत्रावरील आणीबाणी काळातील निर्बंध हटविले.रोजगार हमी योजनेमधील जो काम मागेल त्याला १५ दिवसात काम मिळेल असा कायदा संमत करून घेतला.

**मुख्यमंत्रीपदी दुसऱ्यांदा निवड लोककल्याणकारी कार्य :**

फेब्रुवारी १९७८ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होऊन पुन्हा काँग्रेस विधिमंडळ नेतेपदी वसंतरावदादांची फेरनिवड झाली. ७ मार्च १९७८ रोजी त्यांची मुख्यमंत्रीपदाची दुसरी टर्म सुरु झाली. या दुसऱ्या टर्मकाळात अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले. धान्यउत्पादन वाढीसाठी विशेष योजना, जमीन सुधारणा, मागासवर्गीयांची कर्ज वसुलीतून मुक्ती, बेघरांना घरे, अतिरिक्त जमीनीचे वाटप, रोजगार हमी योजनेस प्राधान्य, ग्रामीण भागात पक्के रस्ते बांधणी, सुशिक्षित बेरोजगारांसाठी भांडवलाची सोय, शेतीवीज ग्राहकांना सवलती,शहरीक्षेत्र घर टंचाई निवारण, झोपडपट्टी सुधारणा असे महत्वाचे निर्णय त्यांनी अमलात आणले. वसंतरावदादांचे जनकल्याणकारी कार्य सुरु असतानाच त्यांचा विरोधी गटही काँग्रेसमध्ये कार्यरत होता.१२ जून १९७८ रोजी शरद पवार, सुंदरराव सोळंकी, सुशीलकुमार शिंदे, दत्ता मेघे या चार मंत्र्यानी राजीनामे देऊन शरद पवार यांनी जनता दलाशी वाटाघाटी करून पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) ची स्थापना करून शरद पवार मुख्यमंत्री झाले.

**वसंतदादा तिसऱ्यावेळी मुख्यमंत्रीपदावर :**

इ.स १९७८ मध्ये मुख्यमंत्रीपद सोडल्यानंतर ५ वर्षानंतर इ.स १९८३ मध्ये तिसऱ्यावेळी मुख्यमंत्री म्हणून निवडले गेले.त्यावर्षी तीव्र दुष्काळ संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाला होता.त्यांनी संपूर्ण राज्याचा दौरा करून दुष्काळासंबधी निर्णय घेतले. त्यासाठी तातडीने ४ कोटी बजेट मंजूर करून घेतले. खाजगी विहिरींचा ताबा कायद्याने सरकारने घेतला. दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांची फी मुख्यमंत्री फंडामधून भरण्यात आली. दुष्काळग्रस्त भागातील रोजगार हमी योजनेमधील मजुरांना दररोज साडेपाच ते साडेसहा रुपये रोजगार दिला. महीला मजुरांना १ महिना पगारी रजा मंजूर केली.गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्यात आले.विदर्भ-मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी अर्थतज्ञ वि.म दांडेकर यांची समिती नेमण्यात आली. विदर्भासाठी स्वतंत्र अमरावती विद्यापीठ निर्माण करण्यात आले.१९८३ चा क्रिकेटमधील विश्वविजेत्या भारतीय संघाचा सत्कार ४ जुलै १९८३ रोजी वानखेडे स्टेडियमवर हजारोंच्या साक्षीने मुख्यमंत्री वसंतरावदादांनी केला.

**विनाअनुदानीत धोरण,तंत्रशिक्षणाचे ऐतिहासिक धोरण:**

शिक्षणक्षेत्र वसंतदादांच्या आवडीचे,जिव्हाळ्याचे क्षेत्र होते. माध्यमिक,उच्चमाध्यमिक परीक्षा उत्तीर्ण

होणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना महाविद्यालयेच नसल्याने प्रवेश मिळत नाही या प्रश्नावर चर्चा करून ५% विद्यार्थ्यांनाही प्रवेशाची राज्याची क्षमता नाही याचा सारासार विचार करून विनाअनुदानित तत्वावरती शिक्षण संस्था उभ्या राहिल्यास राज्याच्या शिक्षणास गती मिळेल तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचीही चांगली सोय होईल म्हणून १९८३ मध्ये राज्यात ५१ नवी अभियांत्रिकी महाविद्यालये, ८० तंत्रनिकेतन आणि १०० तंत्रशाळांना परवानगी देण्याचा ऐतिहासिक निर्णय दादांनी तात्कालिक शिक्षणमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या साथीने घेतला. या महत्वाच्या निर्णयाबरोबरच मुलीना ५ वी ते ८ वी पर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला.शुल्कमाफिसाठी पालकांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्यात आली. ४८०० उत्पन्न मर्यादेवरून १०००० रुपयांपर्यंत नेण्यात आली. पुढे विद्यापीठास संत नामदेव अध्यासन सुरु करण्यास १० लाख रुपये देण्यात आले.

**मुख्यमंत्रीपदी चौथ्यांदा निवड नंतर राजस्थानचे राज्यपाल म्हणून कार्य :**

१९८३ ते १९८५ या काळात चौथ्यावेळी वसंतरावदादा मुख्यमंत्रीपदावर निवडले गेले. दादांनी चौथ्या टर्ममधेही महत्वाचे निर्णय घेतले. मुंबईच्या विकासासाठी केंद्राकडून १ हजार कोटी रुपयाची मागणी करण्यात आली,पर्यावरण रक्षणास स्वतंत्र पर्यावरण विभाग, प्रत्येक खेड्यात गोबरगॅस प्रकल्प, प्रत्येक तालुक्यात १ मुलींचे शासकीय वसतीगृह, शाळांमार्फत रोपवाटिका तयार करणे, कृषी विद्यापीठात कमवा व शिका या योजनेची अंमलबजावणी, पुणे नागपूरसाठी विकास प्राधिकरणाची स्थापना, जागतिक बँकेच्या सहाय्याने गृहनिर्माण प्रकल्प, मुंबईत परप्रांतीयांच्या लोंढ्याबाबत त्यांनी धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला. पुढे अंतर्गत राजकारणातून त्यांनी राजीनामा दिला. २० नोव्हे.१९८५ रोजी केंद्र सरकारने त्यांना राजस्थानचे राज्यपाल म्हणून नियुक्त केले. लोकाभिमुख कार्यपद्धती हे त्यांचे वैशिष्ट्य राजस्थानचे राज्यपाल म्हणूनही कायम राहिले. राजभवनात सर्वसामान्यांना मुक्त प्रवेश दिला. अखेर जुलै १९८७ मध्ये राज्यपाल पदाचा राजीनामा देऊन पुन्हा सक्रीय राजकारणात परतले. १३ नोव्हे. १९८७ रोजी ३ लाखावर शेतकऱ्यांचा मेळावा त्यांनी सांगलीत घेतला. तब्येत साथ देत नसतानाही त्यांनी १९८७ ते १९८९ पर्यंत शेतकरी संघटना उभारणी कार्याकडे लक्ष दिले.

सततची ढासळती तब्येत, दौरे, नियोजनामुळे एकदा सांगलीतून सोलापूरला कार्यक्रमास जात असताना त्यांना त्रास झाला. औषधोपचारासाठी त्यांना दाखल करण्यात आले. पण उपचारास त्यांचा प्रतिसाद मिळेना म्हणून त्यांना मुंबईला हलविण्यात आले. मुंबईत १ मार्च १९८९ रोजी त्यांचे निधन झाले. सहकार, अर्थकारण, समाजकारणात प्रचंड मोठे योगदान देणाऱ्या वसंतदादा पाटील हे महाराष्ट्राचे शिल्पकार ठरले.

### १.२.२ समाजवादी नेतृत्व

**१. पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी :**

नागनाथ अण्णा नायकवडी यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य अतिशय स्फूर्तिदायी असे आहे.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतःला राजकीय समीकरणात न अडकवता सर्वसामान्य जनतेलाही खऱ्या स्वातंत्र्याची फळे चाखायला मिळावीत यासाठी आपले संपूर्ण आयुष्य नागनाथ अण्णांनी समाजकार्यासाठी समर्पित केले होते. १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांच्या संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या पुरोगामी महाराष्ट्राच्या

जडणघडणीमध्ये अनेकांनी आपले योगदान दिलेले आहे. त्यामध्ये क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

**पूर्वायुष्य :**

नागनाथ अण्णा नायकवडी यांचा जन्म १५ जुलै १९२२ रोजी पूर्वीच्या दक्षिण सातारा म्हणजेच आजच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा या ठिकाणी एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामचंद्र गणपती नायकवडी व आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. नागनाथ अण्णांचे दहावीपर्यंतचे शिक्षण वाळवा, सातवी आष्टा येथे तर आठवी ते मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूलमध्ये झाले. मॅट्रिकला असतानाच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित होऊन भारतीय स्वातंत्र्यासाठी सुरू झालेल्या १९४२ च्या 'चले जाव' या आंदोलनात उडी घेतली. नागनाथअण्णांनी क्रांतीसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली वाळवा परिसरात प्रतिसरकार चळवळ चालविली. यासाठी गोव्यातून हत्यारांची आयात करणे, ब्रिटिश पोलिसांची हत्यारे पळविणे, पे- स्पेशल ट्रेन लुटणे, धुळे खजिन्याची लूट, चोर-दरोडेखोरांचा बंदोबस्त करणे यामध्ये हिरीरीने सहभाग घेतला.यामुळे सन १९४४ मध्ये ब्रिटिशांनी नागनाथ अण्णांना पकडून सातारा येथील तुरुंगात ठेवले.परंतु अल्पावधीतच ते सातारा तुरुंगाच्या तटावरुन उडी मारून पळून गेले. पुढे देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत ते इंग्रजांशी अविरत लढत राहिले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गोरगरीब जनतेचे हित व न्याय हक्कासाठी नागनाथअण्णांनी संपूर्ण आयुष्यभर लढे दिले. महाराष्ट्र विधानसभेवर ते दोनदा आमदार म्हणून निवडून गेले होते.तर खासदारकीची निवडणूक हरले होते. एका निवडणुकीत त्यांना सिंह हे चिन्ह मिळाले होते. तेव्हा त्यांनी पिंजऱ्यातील जिवंत सिंह प्रचारात फिरविला होता. अशा या बहुआयामी लोकप्रिय नेत्याचे वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबई येथे २२ मार्च २०१२ रोजी निधन झाले. विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या नागनाथ अण्णांचे कार्य पुढील प्रमाणे अभ्यासता येईल.

**हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना :**

वाळवा येथे ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालकीचा सहकारी साखर कारखाना काढण्याचे नागनाथ अण्णांनी ठरविले. त्यास आपले मित्र हुतात्मा किसन अहिर यांचे नाव दिले. असंख्य अडचणींवर मात करून १९८१ साली केंद्र सरकारची कारखान्यास परवानगी मिळविली. शेतकऱ्यांकडून शेअर्स व कर्जरूपाने पैसा उभा करून अवघ्या एक वर्षाच्या आत कारखान्याची इमारत उभारली. या कारखान्याचे संस्थापक नागनाथ अण्णा असले तरी ते त्याचे सभासद नव्हते.परंतु बाहेर राहून संपूर्ण कारखान्याच्या वाटचालीवर त्यांचे बारीक लक्ष असे.आज शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त भाव देणारा व उत्तम नियोजन असणारा महाराष्ट्रातील एक अग्रगण्य कारखाना म्हणून तो ओळखला जातो. नागनाथ अण्णांचे हे फार मोठे यश आहे. आर्थिक खंबीर करून आण्णांनी पुढे अनेक चळवळी आणि लोककल्याणकारी योजना अंमलात आणल्या त्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

**सामाजिक व सांस्कृतिक कार्य :**

समाजात समानता निर्माण व्हावी, सर्वांचे जीवन सुखी व समाधानी व्हावे यासाठी नागनाथ अण्णांनी

आयुष्यभर अविरतपणे प्रयत्न केले. त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. 'महार वतन' गुलामगिरी विरुद्ध आंदोलन :**

भारतीय समाजजीवनाचे जातीव्यवस्था हे वैशिष्ट्य आहे. या समाजरचनेत खालच्या थरातील समाज घटकांवर घोर अन्याय होत असे. महार हा त्यापैकीच एक घटक होता.महारांना गावातील सर्व कामे करावी लागत. त्याबदल्यात त्यांना उपजीविकेसाठी जमिनी दिलेल्या होत्या त्यालाच 'महार वतन' असे म्हणत.या वतनामुळेच महार समाजाची अधोगती होत आहे. हे जाणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतन नष्ट करण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच प्रयत्न सुरू केले होते. स्वातंत्र्यानंतर नागनाथअण्णांनी या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी वाळवा व तासगाव तालुक्यातील ८० गावातील महार समाजाला संघटित केले.वाळवा येथे भव्य परिषद भरवून सरकारकडे महार वतन रयतावा करण्याची मागणी केली.महारानी गावातील कामे करण्याचे बंद केले. हे या परिषदेचे यश होते. १९५२ ते १९५७ या काळात आमदार असताना अण्णांनी अतिशय जोरकसपणे या मागणीचा पाठपुरावा केला.पुढे संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी हे वतन खालसा केले.

**२. फासेपारधी समाजासाठी कार्य :**

इंग्रज सरकारने १८७१ च्या कायद्याने भारतातील २८० जमातींना गुन्हेगार म्हणून घोषित केले होते. त्यांच्यावर अनेक जाचक अटी होत्या. त्या समाजात जन्मलेले बालक ही गुन्हेगार ठरत असे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५२ मध्ये भारत सरकारने या जमातींना गुन्हेगार कायद्यातून मुक्त केले होते.तरीही जनता त्यांच्याकडे साशंकतेच्या नजरेनेच पहात होती. फासेपारधी ही यापैकीच एक जमात होय. त्यांच्या पुनर्वसनासाठी अण्णांनी १९७५ मध्ये लक्ष घातले.वाळवा येथे त्यांना आश्रय दिला रोजगार देऊन त्यांच्या पोटापाण्याची सोय केली. तसेच त्यांच्या मुलांना शिक्षणही दिले. शिक्षित फासेपारधी तरुणांना नोकऱ्या दिल्या. 'एक गाव एक पारधी कुटुंब' हे अभियान राबविले. वाळवा तालुक्यातील २३ गावांनी त्याला प्रतिसाद दिला. अण्णांच्या या कार्यामुळे फासेपारधी ही जमात स्थिर होऊ लागली.

**३. धरणग्रस्त पुनर्वसनासाठी कार्य :**

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र मध्ये अनेक धरणांची निर्मिती झाली. या धरण क्षेत्रातील अनेक लोक बेघर झाले. त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम शासन अतिशय मंद गतीने करत होते. यामुळे धरणग्रस्तांना समोर अनेक प्रश्न उभे राहिले.चांदोली धरण प्रकल्पातील विस्थापितांचे प्रश्न सोडविण्यासाठी ऑगस्ट १९८५ मध्ये अण्णांनी 'वारणा धरण संग्राम' संघटनेची स्थापना केली.धरणग्रस्तांच्या वसाहतींच्या चावडीवर निदर्शने केली.अनेक संघटनात्मक मोर्चे काढले. याचा परिणाम म्हणून शासनाने पुनर्वसित वसाहतींच्या ठिकाणी लाईट, रस्ते, पाणी, आरोग्याच्या सोयी सुविधा केल्या. महाराष्ट्र सरकारने १९९६ साली कृष्णा खोरे महामंडळा ची स्थापना करून अपूर्ण धरणांची कामे पूर्ण करण्याच्या कामास गती दिली. परंतु धरणातील बाधितांच्या पुनर्वसनाकडे लक्ष दिले नाही.त्यामुळे अण्णांच्या नेतृत्वाखाली सातारा, सांगली जिल्ह्यातील अनेक धरणांवर आंदोलने सुरू झाली. विस्थापित लोकांना

पर्यायी जमीन व जमिनीला पाणी देईपर्यंत महिना ३०००/- रुपये भत्त्याची मागणी त्यांनी केली. आंदोलनाच्या शेवटी सरकारने ६०० रुपये निर्वाह भत्ता धरणग्रस्तांसाठी मंजूर केला. लढ्याला काही प्रमाणात यश आले. १९ जानेवारी २००४ रोजी अण्णांनी सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे जिल्ह्यातील धरणग्रस्तांना एकत्रित करून मोठे आंदोलन केले. याची दखल म्हणून केंद्र सरकारने धरणग्रस्त पुनर्वसनासाठी १५०० कोटींचा निधी त्वरित मंजूर केला.

**४. दलित, आदिवासी - ग्रामीण साहित्य संमेलने :**

साहित्य संमेलने म्हणजे सामाजिक व सांस्कृतिक ऐक्याची प्रतीके असतात. २९ ते ३१ ऑक्टोबर १९८८ रोजी नागनाथ अण्णांनी वाळवा येथे हे संमेलन आयोजित केले होते.याचे अध्यक्ष कविवर्य नारायण सुर्वे तर स्वागताध्यक्ष सौ. कुसुमताई नायकवडी होत्या. यावेळी डॉ.बाबा आढाव, गिरिष करनाड, कॉम्रेड शरद पाटील, डॉ.आनंद यादव इत्यादी विचारवंत उपस्थित होते. तसेच २० ते २२ जानेवारी १९९६ रोजी वाळवा येथेच चौथे दलित, आदिवासी-ग्रामीण साहित्य संमेलन संपन्न झाले. याचे उद्घाटक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व सिनेअभिनेते निळू फुले होते, तर स्वागताध्यक्ष नागनाथ अण्णा होते.या संमेलनात झालेले परिसंवाद, साहित्य प्रवाह, मांडलेले विचार हे समाजासाठी अतिशय उपयुक्त व मार्गदर्शक असे होते.

**५. धर्मांध शक्तीस विरोध :**

सर्वधर्मसमभाव व धार्मिक सहिष्णुता हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. परंतु अलीकडील काळात धार्मिक कट्टरता, पराकोटीचा धार्मिक द्वेष वाढविणाऱ्या अनेक घटना घडत आहेत. यातून धर्मांध शक्तींना बळ मिळते.अशीच घटना म्हणजे ६ डिसेंबर १९९२ ला अयोध्येतील बाबरी मशिदीचे झालेले पतन होय. यामुळे हिंदू व मुसलमानांतील दरी अधिकच वाढून दंगे उसळले होते.तेव्हा समाजातील धार्मिक तेढ कमी करण्यासाठी अण्णांनी सभा व मेळावे घेतले. ६ डिसेंबर १९९३ ला कोल्हापूरच्या गांधी मैदानावर हा दिवस धर्मांध शक्तींचा 'बीमोड दिन' म्हणून साजरा केला. पुढील काळात सोलापूर, सातारा, सांगली, कराड, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी हा बिमोड दिन साजरा केला गेला. अशाप्रकारे समाजात धार्मिक सलोखा टिकविण्यासाठी अण्णांनी कार्य केले.

**६. पाणी परिषद व दुष्काळग्रस्तांसाठी चळवळी :**

महाराष्ट्रातील दुष्काळी पट्ट्यातील शेतीला पाणी मिळावे यासाठी नागनाथ अण्णांनी डॉ. भारत पाटणकरांच्या मदतीने ११ जुलै १९९३ रोजी आटपाडी येथे पाणी परिषद आयोजित केली.सुमारे ३०,००० शेतकरी या परिषदेसाठी उपस्थित होते.या परिषदेने दुष्काळी भागातील जनतेत आत्मविश्वास व उत्साह निर्माण केला. अण्णांनी ३१ मे २००० साला पर्यंत कृष्णेचे पाणी अडवून त्याचे समान न्याय वाटप झाले पाहिजे अशी घोषणा दिली. १९९३ ते १९९८ या काळात पाच पाणी परिषद घेतल्या.टेंभू योजनेतून दुष्काळी आटपाडी तालुक्याला बारमाही पाणी मिळावे म्हणून अण्णांनी हजारो स्त्री-पुरुषसह आटपाडी तहसीलदार कचेरीवर ६ एप्रिल २००१ रोजी मोर्चा काढला. विविध ठिकाणी आंदोलने केली. नागनाथ अण्णांच्या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने समान पाणी वाटपाला तत्वतः मान्यता दिली.

### ७. रिपब्लिकन पक्षाच्या खासदारांना गाड्या भेट :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात सर्व दलित समाज एकवटलेला होता. परंतु त्यांच्या निर्वाणानंतर रिपब्लिकन पक्षात फूट पडली. त्यामुळे सामाजिक दृष्ट्या उपेक्षित राहिलेल्या दलित समाजाचे खूप नुकसान झाले. नागनाथ अण्णांनी खासदार रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, रा.सु.गवई, जोगेंद्र कवाडे यांना एकत्र आणण्यासाठी ३० ऑगस्ट १९९३ ला वाळवा येथे एकाच व्यासपीठावर बोलाविले. पुढे रिपब्लिकन पक्षाच्या मुंबईतील एकीकरणाच्या कार्यक्रमासही सक्रिय सहकार्य केले. तसेच हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याच्या मार्फत त्यांना सुमो गाड्याही भेट दिल्या. अशा प्रकारे अण्णांनी रिपब्लिकन पक्षाच्या बळकटीसाठी प्रामाणिक प्रयत्न केले. पण त्यात त्यांना यश आले नाही.

### ८. वीज दरवाढीस विरोध व भूमिहीनांसाठी लढा :

स्वातंत्र्यानंतरही सरकारी धोरणामुळे भारतातील शेती व शेतकऱ्यांची स्थिती बिकटच होती.अशातच १९९८ मध्ये महाराष्ट्र विद्युत मंडळाने शेतीवरील वीज बिलाच्या दरात अवाजवी वाढ केली. यामुळे शेतीवरील उत्पन्न व पिकांसाठी लागणारा खर्च यात शेतकरी भरडून निघाला. म्हणून नागनाथ अण्णांनी १६ सप्टेंबर १९९८ रोजी सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एकत्रित करून किणि येथे मेळावा आयोजित केला. मेळाव्यात वीज मंडळाच्या कार्यालयावर वीजदर कमी करण्यासाठी मोर्चे काढण्याचे ठरले. त्यानुसार अनेक मोर्चे काढले गेले. याची दखल घेऊन सरकारने काही प्रमाणात दरवाढ कमी केली. वीज दरवाढ लढ्याप्रमाणे नागनाथ अण्णांनी धरणे व इतर प्रकल्पांमुळे जे लोक भूमिहीन झाले होते अशांसाठी लढा उभारला. तसेच झोपडपट्ट्यांना संरक्षण मिळावे, ज्यांना जमिनी नाहीत त्यांना शासनाच्या ताब्यातील अतिरिक्त असणाऱ्या जमिनींचे वाटप करावे अशा मागण्या सरकारपुढे मांडल्या. या भूमी हक्कासाठी अनेक परिषदांचे आयोजन करून सर्व भूमिहीनांना एकत्र आणून सार्वत्रिक लढा उभारला.थोडक्यात नागनाथ अण्णांनी आयुष्यभर समाजातील सर्वसामान्य लोकांचे प्रश्न लोकसेवेच्या माध्यमातून सोडविण्याचे प्रयत्न केले.

### ९. विद्रोही साहित्य संमेलने :

विद्रोही साहित्य संमेलने ही समाजाच्या सर्वांगिन जडणघडणीमध्ये मोलाचे योगदान देणारे अशी आहेत. यामुळे शेकडो प्रकारच्या दलित, शोषित, सर्जनशील स्त्री-पुरुष साहित्यिकांना आत्मविश्वास, आत्मप्रतिष्ठा व सांस्कृतिक प्राविण्य मिळविण्यास मदत झाली आहे. क्रांतिकारी विचारांचे व समाजकार्यात अग्रेसर असणारे नागनाथ अण्णा नेहमी विद्रोही साहित्य संमेलनास उपस्थित राहत असत. सावंतवाडीच्या संमेलनाचे तर अण्णा अध्यक्ष होते. मनुस्मृति सारखे ग्रंथ नष्ट झाले पाहिजेत.सामाजिक गुलामगिरी संपली पाहिजे. सर्वधर्मसमभाव व सामाजिक समता स्थापन करणे हे आपले ध्येय आहे. अशा प्रकारचे विचार नागनाथअण्णांनी संमेलनातून मांडले त्यांच्याप्रमाणेच डॉ.आ.ह.साळुंखे व निळू फुले यांनीही या विचारांना दुजोरा दिला.

### शैक्षणिक कार्य :

चळवळी करणे, जनहिताचे लढे उभारणे यात संपूर्ण आयुष्य व्यतीत करणाऱ्या नागनाथ अण्णांनी शैक्षणिक

क्षेत्रातही आपला ठसा उमटविला आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या महान कार्यापासून प्रेरणा घेऊन अण्णांनी वयाच्या १७ व्या वर्षीच समविचारी मित्रांच्या मदतीने शिराळ्याच्या दुर्गम भागात २४ व्हालंटरी शाळा सुरू केल्या होत्या. १९४९ मध्ये वाळवा येथे किसान शिक्षण संस्थेची स्थापना करून किसन अहिर विद्यालय सुरू केले. मुलांच्या राहण्यासाठी वसतिगृहे काढली. तेथे गरीब मुलांना राहण्याची व जेवण्याची मोफत सोय केली. १९६६ मध्ये संस्थेमार्फत मुलींसाठी स्वतंत्र जिजामाता विद्यालय सुरू केले. पुढील काळात अनेक महाविद्यालये काढली गेली. तर १९७५ मध्ये उच्च माध्यमिक शिक्षणाचीही सोय केली गेली. १९९२ साली संस्थेमार्फत उच्च शिक्षणासाठी वाळवा येथे क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय सुरू केले. महाराष्ट्रातील किल्लारी या भूकंपग्रस्त भागातील १०८ मुलांना दत्तक घेऊन आपल्या संस्थेच्या माध्यमातून पदवीपर्यंतचे मोफत शिक्षण देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपली. १९९९ ला इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी शाखा सुरू केली. सामाजिक क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचे नाव पुणे विद्यापीठास मिळावे यासाठी अण्णांनी आंदोलने केली होती. पण त्यास यश आले नाही. पुढील काळात सावित्रीबाई फुले यांचे नाव विद्यापीठास दिले गेले.

**नागनाथ अण्णांचा मानसन्मान :**

समाजातील उपेक्षित असणाऱ्या समाजघटकांचे हित जपण्यासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या या थोर क्रांतिवीराला जनतेने भरभरून प्रेम दिले.विविध संघटना व संस्थांकडून त्यांचे सत्कार झाले.त्यांना ३५ पेक्षा अधिक पुरस्कार मिळाले मिळाले आहेत.तर २००९ साली भारत सरकारने नागनाथ अण्णांना पद्मभूषणने सन्मानित केले. मरणोपरांत शासनाने अण्णांच्या जन्मगावी त्यांचे भव्य स्मारक उभारले आहे.

**२. एस.एम.उर्फ श्रीधर महादेव जोशी (इ.स.१९०४ ते१९८९) :**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात एक प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणून एस. एम. उर्फ श्रीधर महादेव जोशी यांचे नाव घेतले जाते. झुंजार स्वातंत्र्यसेनानी, सामाजिक न्यायासाठी लढणारे, आर्थिक विषमतेविरुद्ध संघर्ष करणारे, कामगार नेते, भारतीय समाजवादाचे प्रणेते व राष्ट्रवादी म्हणून एस. एम. जोशींना ओळखले जाते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये बहुमूल्य योगदान देण्याबरोबरच संयुक्त महाराष्ट्र आंदोलनामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

देशातील विविध राजकीय आणि सामाजिक चळवळींचे नेतृत्व करण्याबरोबरच त्यांनी या चळवळीची व्याप्ती वाढविण्याचे काम केले. एक तळमळीचे समाजवादी नेते आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. विसाव्या शतकात झालेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक चळवळींच्या माध्यमातून प्रेरणा घेऊन त्यांनी समाज हितासाठी लढा उभारला. महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशाच्या राजकारणामध्ये आपल्या कार्याने वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला.

**पूर्वपरिचय :**

एस. एम. या नावाने प्रसिद्ध पावलेले श्रीधर महादेव जोशी यांचा जन्म १२ नोव्हेंबर १९०४ रोजी जुन्नर

येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील गोळप हे होते. जुन्नरच्या कोर्टामध्ये श्रीधर यांचे वडील म्हणजे महादेव जनार्दन जोशी हे कारकुनी चे काम करत. श्रीधर उर्फ एस. एम. यांना पाच भाऊ, तीन बहिणी अशी आठ भावंडे होती. श्रीधर यांचा जन्म जुन्नरला झाला असला तरी एकत्रित कुटुंब पद्धतीमुळे ते आपल्या चुलता, चुलती व आईसह गोळप या गावीच राहत असत. त्यांचे प्राथमिक शिक्षण गोळप या ठिकाणी झाले. श्रीधर यांचे गाव सनातनी वृत्तीचे असल्यामुळे जात-पात, रूढी, प्रथा- परंपरा अतिशय कठोरपणे पाळल्या जात होत्या. गावात महारांना व स्त्रियांना मिळणारी वागणूक पाहून श्रीधरला हळहळ वाटे व अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची ऊर्मी जागृत होत असे. श्रीधरचे आई - वडील ब्राह्मणी संस्कृतीत वाढलेले असले तरी त्यांचा दृष्टिकोन उदारमतवादी व पुरोगामी होता. श्रीधर तिसरी पास झाल्यानंतर पुढील शिक्षणाची सोय गोळपला नसल्यामुळे वडील त्याला जुन्नरला घेऊन गेले व तेथे चौथीत प्रवेश घेतला. परंतु वडील सेवानिवृत्त झाल्यानंतर अल्पावधीतच १० डिसेंबर १९१५ साली त्यांचा विषमज्वराने मृत्यू झाला. पुन्हा त्यांच्या शिक्षणाची फरफट सुरू झाली. वडिलांच्या अचानक जाण्याने घरात दारिद्र्य आले. कुटुंबाची जबाबदारी श्रीधर यांच्या मोठ्या भावावर आल्याने तो कुटुंबाचा भार वाहू लागला.

श्रीधर चुलतभावाबरोबर नागपूरला पुढील शिक्षणासाठी गेले. तेथे त्यांनी पाचवीत प्रवेश घेतला. परंतु चुलत भावाची नोकरी गेल्याने त्यांना शिक्षणासाठी पुन्हा भटकंती करावी लागली. पुढे शिक्षणासाठी पुण्याला जाऊन गोविंदराव जोशी यांच्याकडे आश्रित विद्यार्थी म्हणून राहून आपले शिक्षण चालू ठेवले. पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांना 'फ्री स्टुडन्टशिप' मिळाली. या शाळेच्या शेजारीच लोकमान्य टिळकांचा वाडा होता. श्रीधरने शाळेत असतानाच दुपारच्या सुट्टीत गायकवाड वाड्यात जाऊन लोकमान्य टिळकांचे दर्शन घेतले. त्यांना टिळकांच्या कार्याबद्दल आदर वाटू लागला. शालेय जीवनात श्रीधरला गोपीनाथ तळवळकर, शिखरे, तारकुंडे, गोरे, खाडिलकर, शिरुभाऊ लिमये, ग.भा.निरंतर यासारखे वर्गमित्र मिळाले. त्यावेळी शाळेतील विद्यार्थी एकमेकांना इंग्रजी आद्याक्षराने बोलवत असत. त्यामुळे सर्व मित्र त्यांना एस. एम. म्हणत असत व तेच नाव पुढे श्रीधर च्या ऐवजी एस. एम. असे लोकप्रिय झाले. १९२५ साली मॅट्रिकची परीक्षा पास झाले आणि फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. तेथे त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला. त्याचबरोबर राज्यशास्त्र विषयाचे खूप वाचन केले. त्यानी लिहिलेल्या 'कॉन्स्टिट्यूशन' या विषयावरील निबंधाला पारितोषिकही मिळाले होते .

सन १९२८ साली बी.ए. झाले. त्यावेळी महाराष्ट्रात तत्कालीन सामाजिक जीवनात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा वाद चालू होता. १९२३ सालापर्यंत ब्राह्मण वस्तीतील सार्वजनिक हौद ब्राह्मणेतरांना खुले नव्हते. यावेळी महात्मा फुले यांचे अनुयायी केशवराव जेधे यांनी पुण्यातील हौद हे सर्व सामान्यांना खुले करावेत असा ठराव मांडला. परंतु या ठरावास न. चि. केळकर व इतर लोकांनी विरोध केला. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांचा संघर्ष शिगेला पोहोचला होता अशा वेळी भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही जोमात सुरू होती. याच काळात श्रीधर उर्फ एस. एम. यांचे वैचारिक मनपरिवर्तन घडून आले.

प्रारंभी श्रीधर यांना हिंदुत्ववादी विचाराबद्दल आकर्षण होते. युथ लीगच्या कार्यास सुरुवात केल्यानंतर

मात्र त्यांच्यामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आपले आयुष्य अर्पण करायचे असा निर्धार करून त्यांनी युथ लीगच्या माध्यमातून भारताला संपूर्ण स्वातंत्र्य, जातीयवादाशी लढा आणि स्वदेशीचा वापर अशी प्रतिज्ञा केली. युथ लीग चे एक तडफदार कार्यकर्ते म्हणून ते ओळखले जाऊ लागले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी हवा तो त्याग करण्याची खूणगाठ मनाशी बांधून त्यांनी आपल्या कार्यास सुरुवात केली. फेब्रुवारी १९२८ मध्ये सायमन कमिशन विरोधात पहिले जहाल भाषण पुण्यातील शिवाजी मंदिरात केले. राजकीय प्रश्नांप्रमाणेच सामाजिक प्रश्नावरही त्यांनी आवाज उठविला. ब्राह्मणेतर चळवळीचे नेते केशवराव जेधे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुण्यातील अनुयायी पा.ना. राजभोज आणि एस.एम. उर्फ श्रीधर यांनी युथ लीगच्या माध्यमातून पुण्याच्या पर्वती मंदिरात दलित बांधवांसह प्रवेश करण्याचे ठरवून पर्वती सत्याग्रह केला.

१९३० साली महात्मा गांधींनी सविनय कायदेभंग चळवळीचे रणसिंग फुंकले. महाराष्ट्रात शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली चळवळ सुरू झाली. या चळवळीत श्रीधर यांनी सक्रिय सहभाग घेतल्याने त्यांना ब्रिटिशांनी कारावासात टाकले. १९३५ साली पुन्हा त्यांना तुरुंगवास सहन करावा लागला. स्वातंत्र्यलढ्याचे कार्य चालू असतानाच १९ ऑगस्ट १९३९ रोजी एस. एम. उर्फ श्रीधर व ताराबाई (मूळ नाव तारा पेंडसे) हे नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध झाले. त्यांना अजय व अभय अशी दोन मुले झाली. येरवडा तुरुंगात असताना त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांचे 'Task before us' हा ग्रंथ वाचला होता. रॉय यांचे विचार वाचल्यानंतर त्यांची समाजवादी विचारसरणी अधिक दृढ होत गेली. पुढे अनेक समाजवादी विचाराच्या लोकांनी एकत्र येऊन २१ ऑक्टोबर १९३४ रोजी मुंबई येथे हे 'काँग्रेस समाजवादी पक्षा'ची स्थापना केली. यामध्ये जयप्रकाश नारायण हे जनरल सेक्रेटरी, नानासाहेब गोरे हे जॉइंट सेक्रेटरी तर एस. एम. उर्फ श्रीधर हे कार्यकारिणीचे सदस्य झाले. काँग्रेस सोशालिस्ट पार्टी तर्फे एस.एम. यांनी सहभाग घ्यायला सुरुवात केली. गोर-गरीब, श्रमिकांना न्याय देण्यासाठी आपण सतत संघर्ष केला पाहिजे असे सर्व तरुण समाजवादी कार्यकर्त्यांना ते नेहमी सांगत असत.

राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून दलप्रमुख म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. राष्ट्र सेवा दलाची भूमिका सांगताना ते म्हणतात, 'तरुणांना स्वातंत्र्य लढ्यात येण्याची प्रेरणा देण्यासाठी राष्ट्र सेवा दल सुरू करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा देण्याऐवजी 'सैन्यात जा' म्हणून ब्रिटिश साम्राज्याला सहकार्य करण्याची भूमिका घेतो आहे.'

सन १९४२ मध्ये चले - जाव आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. ते भूमिगत झाले. पुढे देश स्वतंत्र झाला. समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला. १९५३ च्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत एस. एम. उर्फ श्रीधर यांना विजय प्राप्त झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत (१ मे १९६०) लढा दिला.

**समाजवादी चळवळीतील कार्य :**

समाजवादी पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक म्हणजे एस. एम. उर्फ श्रीधर जोशी होत. समाजवादी पक्षाच्या वाटचालीत जनतेच्या मनात समाजवाद रुजविण्याचे मोठे कार्य केले. या पक्षाने नेहमीच गरिबांच्या बाजूने लढा उभारला. अन्यायाविरुध्द लढणारा पक्ष असा या पक्षाचा लौकिक तयार झाला. देशातील आर्थिक आणि

सामाजिक विषमतेचे विरुद्ध लढा दिला पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्या वेळी या चळवळीत आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ राममनोहर लोहिया, युसूफ मेहरअली, नानासाहेब गोरे यांच्यासमवेत एस.एम. उर्फ श्रीधर यांनी दीर्घकाळापर्यंत ही चळवळ पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले. परंतु पुढील काळात या चळवळीत वैचारिक मतभेद निर्माण झाले आणि समाजवादी चळवळीत फूट पडली. तरीही समाजवादी विचाराचे एकनिष्ठ राहून ही चळवळ पुढे नेण्यासाठी एस. एम. यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. दलित आणि शोषित यांच्याबद्दल असणारी उपजत कणव हीच त्यांच्या समाजवादामागील प्रेरणा होती. त्यांनी समाजवादी विचारांचा प्रचार आणि प्रसार अतिशय निष्ठेने केला. लोकशाही समाजवादाचा विचार हा मानव जातीला सर्वात हितकारक आहे असे त्यांचे ठाम मत होते. १९८४ सालच्या आपल्या भाषणात ते म्हणतात, 'समतेवर आधारलेल्या समाज निर्मितीसाठी आवश्यक ती संघटना उभी करून जेव्हा समाजवादी चळवळीसाठी सर्वस्व आपण करणारे कार्यकर्ते निर्माण होतील. तेव्हा समाजवादाचा विचार यशस्वी होण्याची शक्यता वाढेल.'

**विधानसभा सदस्य म्हणून कारकीर्द :**

सन १९५३ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये एस. एम. आमदार झाले. सन १९५३ ते १९६२ सालापर्यंत त्याने विधानसभा सदस्य म्हणून कारकीर्द गाजविली. वैचारिक स्पष्टता, सडेतोड मांडणी, सत्ताधारी पक्षावर निर्वैर घणाघाती टीका, कोणत्याही प्रश्नाची संपूर्ण माहिती करून घेणे आणि विधायक स्वरूपाचा तीव्र विरोध या गुणांवर त्यानी राजकारणात लोकप्रियता मिळविली. त्यांच्याप्रती स्व पक्षाबरोबरच इतर पक्षातील लोकांच्या(नेते) मनामध्ये आदर निर्माण झाला. विधानसभा सदस्य म्हणून आपल्या कारकिर्दीत त्यांनी २८ विधेयकांच्या चर्चेत भाग घेऊन दुरुस्त्या सुचविल्या. त्यामध्ये प्रामुख्याने शेतीविषयक विधेयकं मधून शेतीची पुनर्रचना, कसेल त्याला शेती, दलित भूमिहीन शेतमजुरांना जमीन मिळवण्यासाठी प्रयत्न केले. शेतीसाठी पाणी आडवा मोहीम, कर्जबाजारी शेतकऱ्यांचे प्रश्न, शेती वरील उपाय योजना, पाचोरा येथील डालडा कारखान्यातील कामगारांचा प्रश्न, सोलापूर, जळगाव, चाळीसगाव येथील कापड गिरणी कामगारांचे प्रश्न विधानसभेत मांडले.

**लोकसभा सदस्य म्हणून कारकीर्द :**

१९६७ लोकसभा निवडणुकीत पुणे मधून एस.एम. निवडून आले लोकसभेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी आवाज उठविला. विशेष म्हणजे शेतमालास योग्य भाव मिळावा भूमिहीन शेतमजूर व दलित यांना जमिनीचे वाटप व्हावे जमीनदारी नष्ट व्हावी. अशा अनेक विषयांवर आपली परखड मते नोंदविली. त्यावेळी तत्कालीन सरकारने आणलेल्या नदीच्या पाणी वाटपाबाबत चे दुरुस्ती विधेयकाचे त्यांनी स्वागत करून विधेयकास पाठिंबा दिला. त्यांचे हिंदी भाषेवर उत्तम प्रभुत्व असल्याने लोकसभेत आपली मांडणी ते हिंदी भाषेतून करत असत. परंतु दक्षिणेकडील राज्यांचे प्रश्न मांडावयाचे असतील तेव्हा ते इंग्रजीतून बोलत असत. खासदार म्हणून आपले विचार ते अतिशय तळमळीने मांडत असत आणि त्यांच्या विचारांना सर्व सदस्य अनुमोदन देत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळेच त्यांना अजातशत्रू असेही संबोधले जात असे. काश्मीरबाबतचे ३७० कलम रद्द करावे अशी सूचना अटलबिहारी वाजपेयी यांनी लोकसभेत मांडली. या सूचनेला एस.एम. यांनी तीव्र विरोध केला. त्यांच्या मते 'काश्मीरचे विशेषाधिकार काढल्यास विघटनवादी प्रवृत्ती डोके वर काढतील. त्या अधिक

उफाळून येतील आणि देशाची अखंडता व एकात्मता नष्ट होईल, अशी या विरोधामागे भावना होती. कोठारी आयोगाच्या शिफारशी शिक्षकांना लागू कराव्यात. यासाठी दिल्ली टीचर्स असोसिएशने संप केला होता. त्या संपास एस.एम. यांनी पाठिंबा दिला होता. लोकप्रतिनिधी असताना त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

**कामगार क्षेत्रातील कार्य :**

एस.एम. यांनी सुरुवातीपासूनच कामगारांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी कार्य केले होते. १९३० च्या जी. आय. पी.रेल्वे संपात त्यांनी सहभाग घेतला. १९४६ साली संरक्षण खात्यातील ६० ते ७० हजार कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांची संघटना बांधली. पुढे १९५३ सालापर्यंत या संरक्षण क्षेत्रातील कामगारांनी एस.एम. यांच्या नेतृत्वाखाली लढा दिला. ११ जुलै १९६० चा केंद्रीय कर्मचाऱ्यांचा संपाला पाठिंबा देऊन त्यांनी पंडित नेहरूंचे आव्हान स्वीकारले. पाचोरा येथील डालडा कारखाना बंद पडल्यामुळे ७०० कामगार बेकार झाले. तसेच सोलापूर, जळगाव, चाळीसगाव येथील कापड गिरणी कामगारांवर सुद्धा अशाच प्रकारे बेकारीची वेळ आली. याविरुद्ध त्यांनी विधानसभेमध्ये आवाज उठविला. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी एस.एम. यांच्या सूचनांचा स्वीकार करून ताबडतोब महाराष्ट्रात बंद झालेल्या गिरण्या सुरू करण्याचे आदेश दिले. विधानसभेत कामगारांची बाजू मांडताना कामगारांनी संप केला आणि संपानंतर ते कामावर रुजू होण्यासाठी आले, तर त्यास न आडवता कामावर रुजू करून घ्यावे. कोणत्याही प्रकारचे अर्ज, विनंत्या करण्याची प्रक्रिया ठेवू नये, अशीही सूचना त्यांनी मांडली. कामगारांची कार्यक्षमता वाढून देशाचे उत्पन्नही वाढले पाहिजे यासाठी ते सतत आग्रही राहिले. संरक्षण कामगारांच्या संघटनेच्या अध्यक्ष पदाबरोबरच त्यांनी ऑल इंडिया स्टेट बँक एम्पलॉइज फेडरेशन, स्टेट ट्रान्सपोर्टचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. कामगार नेता म्हणून कार्य करीत असताना कोणत्याही अयोग्य आणि अवाजवी मागण्या त्यांनी कधीही सरकारकडे अथवा कारखान्यांच्या केल्या नाहीत. समाजकारण व राजकारणाबरोबरच कामगार नेता म्हणून त्याने खूप मोठे योगदान दिले.

**ट्रेड युनियनमधील कार्य :**

समाजातील विषमता कमी करण्यासाठी लोकांच्या न्याय हक्काचे संरक्षण झालेच पाहिजे, यासाठी प्रस्थापित असणाऱ्या श्रीमंत वर्गाशी संघर्ष करावा लागेल असे त्यांचे ठाम मत होते. प्रस्थापित वर्गाशी संघर्ष करण्यासाठी संघटना प्रभावीपणे काम करू शकते असा त्यांना विश्वास होता. १९३४ साली अखिल भारतीय कापड कामगार परिषद, मुंबई येथे भरली होती. या परिषदेला पुण्याच्या कामगारांचे प्रतिनिधी म्हणून ते परिषदेला हजर होते. पुण्यामध्ये कारखान्यातून काम करणाऱ्या संघटनेची बांधणी दत्तोबा लाड यांना मदतीला घेऊन एस.एम. यांनी केली. पुण्यामध्ये तांब्या-पितळेची भांडी बनवण्याचे अनेक लहान लहान कारखाने सुरू होते. अशा कारखान्यातून काम करणाऱ्या कामगारांचे प्रश्न त्यांनी हाताळले. विडी कामगारांच्या संघटनामधून कार्य करून त्यांनाही न्याय हक्क नेऊन देण्याचा प्रयत्न केला.

**पूर्णिया जिल्ह्यातील सत्याग्रह :**

१९६९ साली संयुक्त सोशालिस्ट पार्टीच्या अध्यक्षपदाच्या कर्तव्यातून मुक्त झाल्यानंतर एस. एम. यांनी बिहारमध्ये जाऊन विधायक कार्य करण्याचे ठरविले. पूर्णिया जिल्ह्यातील अनेक गावांना भेटी देऊन तेथील

लोकांच्या समस्या जाणून घेतल्या. या समस्यामध्ये जमीनदाराकडून भूमिहीनांवर अन्याय होत असल्याचे पाहून त्यांनी भूमिहीनांना न्याय मिळवून देण्यासाठी 'जमीन बळकाव सत्याग्रह' सुरू केला. या सत्याग्रहास प्रजा समाजवादी पक्ष व संयुक्त समाजवादी पक्ष या दोन्ही पक्षांनी पाठिंबा दिला. १९७० साली भारत-नेपाळ सरहद्दीवरील पूर्णिया जिल्ह्यात एस.एम. यांनी अनेक गावात जाऊन प्रचाराला सुरुवात केली. पूर्णिया जिल्ह्यातील मोहनबाबू या जमीनदारास हजारो एकर जमीन होती. या जमीनदाराच्या अठरा एकर जमिनीत भूमिहीन संथाळ आदिवासींना घेऊन एस. एम. जोशी यांनी सत्याग्रह केला व ती जमीन ताब्यात घेतली.त्या जमिनीत उडीदाचे पीक पेरले. परंतु पोलिसांनी कारवाई करून एस. एम. जोशी व जयप्रकाश नारायण यांचे सेक्रेटरी कालिकाबाबू जगदीशभाई अशा पंधरा लोकांना अटक करून तुरुंगात टाकले. पंचवीस दिवसांनी त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. एस. एम. पुन्हा उडीद पीक पेरले, त्याठिकाणी गेले. परंतु जमीनदार मोहनबाबू हे पीक माझेच आहे असे म्हणू लागले. मोहनबाबूंचा हा विरोध पाहून एस.एम. यांनी संथाळ आदिवासींच्या मदतीने ते पीक काढून पोलीस स्टेशनला नेले. शेवटी उडीदाचे पीक संथाळ आदिवासींना मिळाले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या उत्तरार्धातील एक महत्त्वाचे नैतिक अधिष्ठान असलेले नेते म्हणून एम.एस. जोशी यांचा उल्लेख करावा लागेल. चळवळीच्या पूर्वार्धात अनेकांनी योगदान दिले. त्यामध्ये साथी ना.ग. गोरे हे एक होते. याच काळात गोवा मुक्ती आंदोलनाची चळवल देखील सुरू होती. साथी गोरे हे गोवा मुक्ती आंदोलनात सहभागी झाले आणि त्यांना पोर्तुगीज सरकारने अटक केली. यावेळी त्यांची जागा साथी एम.एम. जोशी यांनी घेतली. सन १९५५ मध्ये त्रिराज्य योजना आली आणि त्याला मुंबईमध्ये विरोध झाला. त्या मोर्चावर गोळीबार झाला त्यामुळे विधानसभेकडे येणाऱ्या स्वत: एस. एम. नी पुढे जाऊन ती स्थिती आटोक्यात आणली. पुढे १९५६ साली संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे नामांतर संयुक्त महाराष्ट्र समिती असे झाले, त्याच्या सरचिटणीसपदी साथी जोशी यांनी निवड झाली. मुंबई मधील दंगल शांत करणे आवश्यक होते. त्यावेळी एस. एम. हे पुढे आले. याचा एक उल्लेख परदेशी पत्रकार ताया झीन्कीन यांनी ''रिपोर्टिंग इंडिया'' या ग्रंथात केला आहे. त्या म्हणतात ''मला फक्त पुण्यातील समाजवादी एम. एम. जोशी दिसत आहेत, जे जमाव शांत करतात आणि दिल्लीकडील निर्णय पाहू असे सांगत प्रक्षुब्ध जमावाला दंगल करण्यापासून परावृत्त करतात.'' एस. एम. जोशी हे चळवळीकडे कोणत्या दृष्टीने पाहत होते याबाबत त्यांनी आपल्या लेखनात मांडले आहे, ''आपला आगामी लढा केवळ महाराष्ट्राचा नसून तो वाढत्या हुकूमशाही प्रवृत्तीविरुद्ध लोकशाहीचा लढा आहे. या लढ्यात हिंसेला थारा नाही. हा लढा कोणत्याही जमातीविरुद्ध नाही म्हणनूच अल्पसंख्यांकाविरुद्ध द्वेष भावना निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रयत्नांचा निषेध झाला पहिजे.''

सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूका असोत अथवा सरकार बरोबरच्या चर्चा असोत सर्व टप्प्यावर एस.एम. अग्रेसर राहिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या अंतिम टप्यात देखील त्यांनीच मा. यशवंतराव चव्हाण यांना पाठींबा दिला. सन १९६० नंतर महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात सीमा तंटा निर्माण झाला, त्यामध्ये एस. एम. पुढे राहिले. बेळगांव भागातील साराबंदी चळवळ किंवा पुढे सचिवालयावरील मोर्चा असेल त्यामध्ये एस. एम. नेहमीच पुढे राहिले.

**समारोप :**

समाजवादी चळवळीतील आघाडीचे नेते म्हणून एस. एम. जोशी यांना ओळखले जाते. समाजवादी पक्षाच्या वाटचालीत सर्वसामान्य जनतेमध्ये समाजवाद पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. देशातील सामाजिक व आर्थिक विषमता दूर करून अन्यायाविरुद्ध लढणारा पक्ष अशी समाजवादी पक्षाची ओळख देशाला करून दिली. स्वातंत्र्यपूर्वकाळात सविनय कायदेभंग, चळवळ चलेजाव आंदोलन, राष्ट्रसेवा व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. राजकीय जीवनात सहभाग घेऊन विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य म्हणून भरीव स्वरूपाचे कार्य केले. कामगारांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी विविध संघटना उभारून कामगारांचे प्रश्न सोडविले. शेतकऱ्यांच्या समस्या मांडून त्या सोडवण्यासाठी उपाययोजना सुचविल्या. पूर्णिया जिल्ह्यातील भूमिहीन संथाळ आदिवासींचे प्रश्न, नागा जमातीचे प्रश्न, मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ इत्यादी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ते अविरत धडपडत राहिले.

त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून १९६५ साली पुणे महानगरपालिकेने मानपत्र दिले. टिळक स्मारक ट्रस्टच्या माध्यमातून १९८३ साली 'लोकमान्य टिळक सन्मान पारितोषिक' देण्यात आले. १९८६ साली पुणे विद्यापीठाने सन्मानाची डी. लिट. ही पदवी बहाल केली. त्यांच्या 'मी एसेम' या आत्मकथनाला मॅजेस्टिक प्रकाशनाचा पुरस्कार मिळाला. त्यांना मिळालेले हे पुरस्कार म्हणजे त्यांनी केलेल्या देशसेवेचा गौरवच होय. अशा या थोर विभूतीचा मृत्यू कर्करोगाने १ एप्रिल १९८९ रोजी झाला.

**२. आचार्य प्र.के.अत्रे :**

प्रल्हाद केशव अत्रे उर्फ आचार्य प्र.के.अत्रे हे मराठीमधील ख्यातनाम लेखक, कवी, नाटककार, पत्रकार, उत्कृष्ठ स्तंभ लेखक, संपादक, मराठी आणि हिंदी चित्रपटाचे निर्माते, शिक्षणतज्ञ, राजकारणी आणि वक्ते होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमधील एक अग्रणी नेते म्हणून त्यांनी केलेली कामगिरी मोलाची ठरली या अष्टपैलू व्यक्तीत्वामुळे ते प्रचंड लोकप्रिय होते.

**प्र.के.अत्रे यांचा पूर्ववृत्तांत :**

प्रल्हाद अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८८९ रोजी कोडीत खुर्द (सासवड) या पुण्यातील पुरंदर तालुक्यात झाला. प्राथमिक, माध्यमिक शिक्षण सासवड येथे पूर्ततेनंतर त्यांनी पुणे आणि त्यानंतर लंडन येथे उच्चशिक्षण प्राप्त केले.नंतर लंडन नजीकच्या हॅरो या शहरात त्यांनी अध्यापनाचेही कार्य केले. पुढे पुण्यात परतल्यानंतर कॅम्प एजुकेशन सोसायटीच्या शाळेत ते शिक्षक झाले. अल्पावधीत त्याच शाळेचे मुख्याध्यापक झाले. तेथे असतानाच पुण्यातील राजा धनराज गिरजी हायस्कूल (१९२७) आणि मुलींचे आगरकर हायस्कूल (१९३४) या शाळांच्या स्थापनेत भाग घेतला.

**अत्रेंची चतुरस्त्र लेखनशैली :**

कॅम्प शाळेचे मुख्याध्यापक असताना त्यांनी विविध प्रकारच्या लिखाणास सुरुवात केली अल्पावधीत समाजमनाची पकड घेणाऱ्या त्यांच्या लेखणीची ताकद सर्वसामान्य वाचकांना प्रत्ययास येऊ लागली. कधी

सडेतोड, खरमरीत, व्रात्य, विनोदी तर कधी हृदयस्पर्शी अशा विविध प्रकारे लिखाण त्यांनी सुरु केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीवेळी त्यांनी राजकीय व्यक्तींवर केलेल्या सडकून टीकेमुळे त्याच्या प्रतिक्रियाही वादळी असत. त्यांच्या विरोधात कोर्टामध्ये अब्रूनुकसानीचे खटले उभे राहत, पण खंबीरपणे अत्रे त्यास सामोरे जात.त्यांच्या या लिखाणातून त्यांच्यावर शारीरिक हल्ले सुद्धा होत.परंतु त्यांनी आपली लेखनशैली बदलली नाही.याच विविधांगी लेखनामुळे अल्पवाधीत ते तत्कालीन मुंबई प्रांतात प्रसिद्ध झाले.

**संपादक म्हणून प्र. के. अत्रेंची कामगिरी :**

इ.स.१९२३ मध्ये प्र. के. अत्रेंनी अध्यापन हे मासिक सुरु केले. पुढे १९२६ मध्ये रत्नाकर आणि १९२९ मध्ये मनोरमा हि आणखी २ मासिके सुरु केली. मासिक निर्मितीची परंपरा पुढे चालू ठेवताना १९३५ मध्ये नवे अध्यापन आणि १९३९ मध्ये इलाखा शिक्षक हि मासिके काढली.हि सर्व मासिके त्यांनी सुरु केली तरी राजकारण विषयक लेखन प्रामुख्याने त्यांनी साप्ताहिक नवयुग, सांजदैनिक जयहिंद आणि दैनिक मराठा मधून केले.

यापैकी जयहिंद हे सांयदैनिक २ जून १९४७ साली त्यांनी सुरु केले. परंतु ते वर्षभरच चालले. मराठा दैनिक १५ नोव्हे.१९५६ रोजी सुरु केले. ते पुढे त्यांच्या मृत्युनंतरही काही काळ सुरु होते. नवयुग साप्ताहिक त्यांनी १९ जाने.१९४० रोजी सुरु केले.

**साप्ताहिक नवयुग ने निर्माण केलेले युग :**

नवयुग साप्ताहिक सुरु होई पर्यंत अत्रेंचे राजकीय लेखन सुरु नव्हते. नवयुग हे साप्ताहिक प्रचंड लोकप्रिय होणार असे भाकीत त्यांचे स्नेही ज्ञानप्रकाशकार काकासाहेब लिमये यांनी पहिला अंक पाहूनच वर्तवले होते. त्याचा प्रत्ययही त्यांना अल्पाधीत आला. पहिल्या अंकापासून नवयुगने राजकीय चौफेर लिखाणास आरंभ केला. अत्र्यांचे राजकीय, साहित्यिक व्यक्तींशी झालेले वाद नवयुग मधून आकर्षक मथळ्यासह प्रसिद्ध होत. त्यामुळे पहिल्या काही महिन्यांमधेच नवयुगचा खप ५ हजारांवरून १६ हजारांवर गेला. त्यातून साप्ताहिक नवयुगने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात लोकप्रीयता मिळवून प्रचंड प्रतिसाद मिळवला.

**उत्कृष्ठ नेते, वक्ते म्हणून नावलौकिक :**

कवी, लेखक, नाटककार, उत्तम शिक्षक, संपादक म्हणून अत्रे परिचित होतेच तसेच उत्कृष्ठ वक्ते म्हणूनही अल्पावधीत ते परिचित झाले. लहानांपासून थोरापर्यंत आणि तरुणांपासून वृद्धांपर्यंत प्रचंड गर्दी खेचणारा आणि हशा टाळ्यांनी हजारोंची सभा दणाणून टाकणारा त्यांचा सारखा वक्ता तत्कालिक परिस्थितीत महाराष्ट्रात नव्हता. त्यावेळी महाराष्ट्र काँग्रेस मध्ये काकासाहेब गाडगीळ,शंकरराव देव,केशवराव जेधे यांच्यावर पक्षाची जबाबदारी होती. १९३८ मध्ये पुणे काँग्रेसने नगरपालिकेची निवडणूक लढविण्याचे निश्चित केले. परंतु जनतेस आकृष्ट करून घेणारा वक्ता कॉग्रेस पक्षाकडे नव्हता त्यामुळे गाडगीळ, जेधे यांनी अत्रेंच्या वक्तृत्व कौशल्याचा वापर करून घेण्याचे निश्चीत केले. १९३८ मध्ये पुणे नगरपालिकेच्या निवडणुकी आरंभी प्र.के. अत्रे काँग्रेस मध्ये आले. त्यांनी पुण्याच्या पेठा-पेठामधून जोरदार भाषणे केली.त्यांच्या सभांना प्रचंड गर्दी होत असे, या सभांमुळेच काँग्रेस पक्ष

विजयी झाला. स्वत: अत्रेही नगरसेवक म्हणून निवडून आले.नोव्हे.१९३८ मध्ये पुणे स्थायी समितीचे ते अध्यक्ष झाले.

**पुण्यातील काँग्रेसचे नेते म्हणून कामगिरी :**

स्थायी समितीचे अध्यक्ष असताना काँग्रेस पक्षात बंडखोरी होऊन १५ नगरसेवक फुटले आणि पक्षाचा राजीनामा दिला. त्यावेळी अत्रेंनी साप्ताहिक नवयुगमधून या फुटीरांचा समाचार घेताना पंधरा हरामखोर अशा जळजळीत भाषेत एक लेख ७ जुलै १९४० रोजी लिहला. फुटीरांच्या खाजगी भानगडी त्यांनी बाहेर काढल्या. त्या १५ नगरसेवकांनी अत्रेंवर अब्रुनुकसानीचा दावा ठोकला होता.

अत्र्यांचा काँग्रेस पक्षाचा प्रचार नवयुग मधून सुरु होता. १९४२ च्या स्वतंत्र लढा, गांधी-जीना भेटीवरील अग्रलेख,आझाद हिंद सेना फौजेचा इतिहास अशा महत्वाच्या विषयांवरती काँग्रेसला पूरक लेखन अत्रेंनी नवयुग मधून केले. तरी अत्रेंनी नवयुग हे काँग्रेसचे मुखपत्र बनवले नाही.वेळप्रसंगी न पटलेल्या गोष्टींवरती त्यांनी टीकाही केली. त्यांच्या पंधरा हरामखोर या लेखामुळे पुढे काँग्रेस पुणे नगरपालिकेमध्ये विसर्जित करावी लागली. पुढे पालिकेच्या सभांना हजर राहण्याचेही अत्रेंनी सोडून दिले. नंतर पुणे सोडून ते मुंबईस स्थायिक झाले.

**चित्रपट कथालेखक ते निर्मातेपर्यंत अत्रेंची वाटचाल :**

मुंबईमध्ये प्र.के.अत्रे स्थायिक झाल्यानंतर चित्रपट क्षेत्रांशीही अत्रेंचा घनिष्ठ संबंध आला. त्यापूर्वीच १९३४ मध्ये सरस्वती सिनेटोनच्या दादा तोरणेंच्या आग्रहावरून अत्रेंनी नारद-नारदी या चित्रपटाची कथा आणि संवाद लिहले होते. पुढे १९३७ मध्ये अत्र्यांनी ३ चित्रकथा लिहल्या. त्या हंस प्रोडक्शन हाउससाठी त्या अनुक्रमे धर्मवीर, प्रेमवीर, बेगुन्हा या चित्रपटांच्या कथा लिहल्या. पुढे ब्रम्हचारी या चित्रपटाची कथाही त्यांनी लिहिली पुढे त्यांचा गाजलेला चित्रपट म्हणजे ब्रँडीची बाटली हा होय. त्यांनी चित्रपट कथाकार म्हणून योगदान दिल्यानंतर चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात पदार्पण केले. सुरवातीस एआरए नावाने नंतर नवयुग चित्रपट कंपनी सुरु केली. पुढे या कंपनीचा विस्तार करून नवयुग पिक्चर्सनाव ठेवले.

१९४० मध्ये नवयुग पिक्चर्स मार्फत लपंडाव, संत सखू या चित्रपटांची निर्मिती केली. नंतर वैचारिक मतभेदातून या कंपनीचा त्यांनी राजीनामा दिला. पुढे त्यांनी एका धनिक व्यक्तीच्या सहाय्याने त्यांनी मुंबईमध्ये स्वतःचा स्टूडीओ खरेदी केला आणि अत्रे पिक्चर्स कंपनी सुरु केली.इ.स १९४० च्या दिवाळी पाडव्याला पहिल्या चित्रपटाचा मुहूर्त केला. मराठीमध्ये पायाची दासी आणि हिंदीमध्ये चरणों कि दासीया नावाने चित्रपट तयार केला. चित्रपट व्यवसायामधील अनिश्चितता, प्रचंड गुंतवणूक यामुळे इ.स. १९४० ते १९५४ या कालखंडात अत्रे यश, अपयश, कर्ज अशा अनेक समस्यांना तोंड देत होते.

**काँग्रेसचा त्याग व संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार :**

इ.स १९४६ नंतर प्र.के अत्रेंचे काँग्रेसशी संबंध दुरावू लागले. १ ऑगस्ट १९४८ रोजी लोकमान्यांच्या पुण्यतिथी मुहूर्तावर नवयुगने अधिकृतरीत्या काँग्रेसचे चिन्ह त्यागुन संयुक्त महाराष्ट्राचा निर्भयपणे पुरस्कार करणारे साप्ताहिकअसे नवे शीर्षक धारण केले.आचार्य अत्रेंनी काँग्रेसशी दुराव्याचे कारण देताना स्पष्ट केले कि, मुस्लीम

लीगचा पाकिस्तानी प्रचार जसा जास्तीत जास्त अत्याचारी होऊ लागला त्याबरोबर नवयुगने पाकिस्तान विशेषांक काढून या धोरणाविरोधी प्रखर टिका केली. नवयुगमधुन मुस्लीम लीगच्या अत्याचाराची माहिती दिली जाऊ लागली.तशी नवयुगला ताकीतीची पत्रे येऊ लागली आणि एक दिवस त्यांनी नवयुगकडे ६ हजार रुपयांचा जामीन मागितला.त्यामुळे अधिकृतरीत्या त्यांनी काँग्रेस पक्षाचा त्याग केला.

काँग्रेस सोडल्यानंतर काही काळ ते समाजवादी पक्षात सामील झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचा निर्भयपणे पुरस्कार करणारे साप्ताहिक झाले. याबाबत अत्रे लिहितात, ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्र हा शब्द सुद्धा महाराष्ट्रातील कोणताही राजकीय पक्ष वा कोणतेही मराठी वृतपत्र उच्चारीत न्हवते, तेव्हापासून संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्काराचे ध्येय नवयुगने पत्करले आहे.

**अजरामर चित्रपटांची निर्मिती, लेखन, दिग्दर्शन :**

वृत्तपत्रीय लेख लिहायचे, प्रेसची जबाबदारी, महाराष्ट्रभर विविध व्याख्यानांसाठी दौरे, कविता, साहित्यिक अशा विविध जबाबदाऱ्या पाहत पुन्हा चित्रपट क्षेत्रातही ते कार्यरत होते. त्यांनी १९४४ मध्ये दिल की बात या चित्रपटाचे दिग्दर्शन, १९४५ मध्ये परिंदे, १९४६ मध्ये ब्राहमण कन्या, दुल्हा, १९४७ मध्ये खंडणी या चित्रपटांची निर्मिती केली.या व्यतीरिक्त चार्लीज आंन्ट या नाटकावरून मोरूची मावशी ही चित्रपट कथा लिहली. लग्नाची बेडी वरून ब्रह्मघोटाळा ही कथा लिहिली.१९४९ मध्ये आपले मित्र मराठे यांच्यासाठी चोरावर मोर या चित्रपटाची कथा, संवाद लिहिले. १९५१ मध्ये त्यांनी ही माझी लक्ष्मी या चित्रपटाची निर्मिती केली.

या पुढील त्यांचे २ चित्रपट अजरामर ठरले. त्यापैकी पहिला श्यामची आई यास पहिले राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले. दुसरा महात्मा फुले यालाही राष्ट्रपती रौप्यपदक मिळाले. आचार्य प्र.के अत्रे यांनी १९३५ ते १९५४ या काळात २५ चित्रपट कथा लिहल्या आणि हिंदी-मराठी १४ चित्रपट निर्माण केले.

**संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीसाठी सर्वस्वी योगदान :**

इ.स १९५४ नंतर आचार्य प्र.के अत्रे यांनी तन, मन, धन आणि सर्वस्व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी वाहून घेतले. बेळगावच्या साहित्य संमेलनानंतर २८ जुलै १९४६ रोजी महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली. या परिषदेमध्ये संयुक्त महाराष्ट्राविषयी अनेक ठराव करण्यात आले. त्यानंतर अत्रे या चळवळीत सक्रीय झाले.

१९ फेब्रुवारी १९४७ रोजी बेळगाव जिल्हा मराठी मायबोली जनता परिषदेचे अधिवेशन भरले. त्याचे अध्यक्षपद प्र.के अत्रे यांनी भुषविले. त्यानंतर निपाणी,कोल्हापूरमध्ये त्यांनी आपली संयुक्त महाराष्ट्राविषयीची भूमिका मांडली. कधी स्वता विस्तृत लेखन करून, कधी आपल्या अत्रे उवाच या स्तंभातून, कधी निनावी,कधी दुसर्याचे लेख छापून इतरांच्या आणि स्वताच्या सभेचे वृत्तांत छापून हा प्रश्न सतत जागता ठेवला. या दरम्यान पूर्व खान्देशामध्ये भरलेली समाजवादी युवक परिषद, बेळगावची आणि नगरची पत्रकार परिषद अशा ठिकाणी त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नास सातत्याने वाचा फोडली. दरम्यान देशामध्ये भाषावार प्रांत रचनेच्या अभ्यासासाठी दार कमिशनची नियुक्ती केली होती त्यांची महाराष्ट्रविरोधी प्रतिकूल भूमिका पाहता त्यांच्यावरही सडकून टीका केली. ५ ऑक्टो १९४७ च्या नवयुगच्या अंकात जाड ठशात त्यांनी मत मांडले, मुंबई हि

महाराष्ट्राची आहे. ती  महाराष्ट्राची राजधानी झाली पाहिजे. या विषयावर प्रत्यक्ष परमेश्वराशी भांडण्याचा प्रसंग आला तरी आम्ही मागे हटणार नाही, असे लिखाण केले. ८ नोव्हे.१९४८ मध्ये दार कमिशनने साक्षी निवेदने स्वीकारली आणि १० नोव्हे.१९४८ रोजी दार कमिशनचा अहवाल आला आणि आंध्र,कर्नाटक,केरळ महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. ६ फेब्रु. १९४९ ला अत्रे दार कमिशनवर वैचारिक हल्ला केला. महाराष्ट्राचे काळीज चराचरा कापले! असा अग्रलेख लिहुन या अहवालाचे शास्त्रशुद्ध चिरफाड केली.या नंतर शेकडो अग्रलेख लिहून जनता आणि सरकार दरबारी हा प्रश्न तेवत ठेवला. अनेक समित्या या नंतर महाराष्ट्राच्या प्रश्नासाठी नेमल्या गेल्या.

१० ऑक्टो. १९५६ रोजी महाराष्ट्राच्या विरोधी फाजल अली कमिशनचा अहवाल प्रसिध्द झाला. व त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात त्याविरोधी संतापाची लाट उसळली. हजारो मोर्चे, सभा, निदर्शने संपूर्ण महाराष्ट्रात सुरु झाले.या वेळी अत्रेंनी वाणी आणि लेखणीतून सरकारवर टीकेची झोड उठवली.त्यांनी यानंतर सर्व जबाबदाऱ्या बाजूला ठेवून संयुक्त महाराष्ट्रासाठी अग्रेसर राहिले. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासाठी दैनिकाच्या गरजेतून १५ नोव्हेंबर १९५६ रोजी दैनिक मराठा सुरु केले. हजारो बातम्या, लेख, अग्रलेख, विशेष लेख, खास संपादकीय मधुन संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नास धार आणली.जानेवारी १९५६ मध्ये प्रचंड घडामोडी मुंबईमध्ये घडत होत्या.१५ जानेवारी १९५६ रोजी एका दिवशी सलग ६ भाषणे करून अत्रे घरी आले आणि १६ जानेवारी रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या अनेक नेत्यांना अटक झाली.त्यादिवशी पंतप्रधान पंडित नेहरूंनी मुंबई केंद्रशासित केल्याचा निर्णय आकाशवाणीवरुन घोषित केला आणि त्याच दिवशी संध्याकाळी मुंबईच्या कामगार मैदानावर लाखोंची सभा झाली.त्या सभेत पंडित नेहरू आणि मोरारजी देसाई यांच्यावर घनाघाती टिका अत्रेंनी केली परिणामी त्यांना अटक झाली.तुरुंगामधूनही त्यांनी नवयुगला टोपण नावाने लेख लिहिले. ५ एप्रिल १९५६ रोजी त्यांची सुटका झाली पुन्हा जोमाने त्यांनी कार्य सुरु केले.

इ.स१९५७ च्या द्विभाषिक राज्य निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रचारक म्हणून त्यांनी झंझावाती दौरे,शेकडो भाषणे केली.स्वतः अत्रे गिरगाव मतदार संघातून निवडून आले.या दरम्यान नागपूर मधून मराठाची आवृत्ती सुरु केली.पुढील ४ वर्षाच्या सततच्या आंदोलनातून १ मे १९६० रोजी द्विभाषिक राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र आणि गुजराथ अशी २ राज्ये निर्माण झाली.१लाखावर लोकांची मशाल मिरवणूक निघाली.हुतात्मा चौकाच्या स्मारक स्तंभाभोवती प्रचंड मोठी सभा भरली.त्या सभेत आचार्य अत्रेंनी जोरदार भाषण केले.

महाराष्ट्र राज्य निर्मितीचे स्वप्न पूर्ण झाल्यानंतर १९६२ मध्ये अत्रेंनी नवयुग साप्ताहिक बंद केले. पुढे १९६९ पर्यंत नूतन महाराष्ट्र राज्याच्या समाजकारण,राजकारणात ते अग्रेसर राहिले. आचार्य अत्रेंचे १३ जून १९६९ रोजी मुंबईत निधन झाले.खऱ्या अर्थाने एका अष्टपैलू व्यक्तिमत्वास महाराष्ट्र मुकला. अत्रेंविषयी तात्कालिक राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी अत्रेचे वर्णन करताना थीळींशी  ऋळसहींशी`ष चरहरीरीहर्रीीर अशा शब्दात गौरव केला.

### १.२.३ कम्युनिष्ट नेतृत्व

**कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे :**

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणी, जडणघडणीमध्ये अनेक नेत्यांनी महत्वाची भूमिका बजावली. अनेक

भूमिका, विचारप्रणालीच्या नेतृत्वाने महाराष्ट्राची वैचारिक भूमिका प्रगल्भ केली. २० व्या शतकाच्या आरंभी जगभरात प्रसारित होणाऱ्या नव्याने साम्यवादी तत्वज्ञानाची ओळख आणि त्याचा महाराष्ट्रात प्रसार करणारे महत्वाचे नेते म्हणजे कॉ. श्रीपाद अमृत डांगे होय. कामगारांचे संघटन, स्वातंत्र्य आंदोलनात भाग, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये सक्रीय, गोवा मुक्तीसंग्रामात भाग, राजकारणात मौलिक योगदान अशा अनेक प्रसंग, घडामोडींमध्ये कॉ.डांगे आघाडीवर होते.

**कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचा पूर्ववृत्तांत :**

कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांचा जन्म १० ऑक्टो.१८९९ रोजी नाशिकजवळील कारंजगाव येथे ब्राम्हण कुटुंबात झाला. पुढे डांगे कुटुंबीय मुंबईमध्ये रोजगारासाठी स्थायिक झाले. त्यांच्या वडिलांनी मुंबईत एका फर्ममध्ये नोकरी स्विकारली. श्रीपाद डांगे दीड वर्षाचे असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला.त्यानंतर त्यांची काकी दगुबाई यांनी त्यांचे पालनपोषण केले. आपल्या काकींसोबत ते पुन्हा नाशिकला आले. प्राथमिक शिक्षण त्यांनी नाशिकमध्ये पूर्ण केले. या दरम्यान वयाच्या आठव्या वर्षी त्र्यंबकेश्वर येथे डांगे यांची मुंज झाली. त्यांच्या काकी दगुबाई मराठा असल्याने कर्मठ ब्राम्हणांनी श्रीपाद यांना त्यांच्या हातचे अन्न खाण्यास मनाई केली.तेव्हा त्यांनी लहान वयातच त्यांनी बंड करून आपल्या काकीच्या हातचे अन्न खाण्यास सुरवात केली. प्राथमिक शिक्षण नाशिकमध्ये झाल्यानंतर मुंबईमध्ये त्यांचे पुढील शिक्षण झाले. भरडा हायस्कूलमधून माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. इ.स.१९१७ मध्ये ते मॅट्रिक झाले. त्यानंतर विल्यन कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. या कालावधीत त्यांनी आपले चौफेर वाचन वाढवले. त्यांच्यावरील धार्मिक पगडाही कमी झाला. कॉलेजमध्ये त्यांना अनेक मित्र मिळाले.

**लो. टिळकांच्या प्रभावाने स्वातंत्र चळवळीमध्ये सक्रीय :**

विल्सन महाविद्यालयात विद्यार्थ्यांना बायबल शिकण्याची सक्ती केली होती. त्याविरोधी डांगे व त्यांच्या मित्रांनी बंड पुकारले. परिणामी डांगे व त्यांच्यासमवेत १२ विद्यार्थ्यांना कॉलेजमधून काढून टाकले. नंतर त्यांनी झेवियर्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. इ.स. १९१९ मध्ये लो. टिळक लंडनहून भारतात परतले. कामगारांच्या सभांमधून त्यांची तडाखेबाज भाषणे होत. ते कामगारांना संघटना बनवून अन्यायाविरोधी संघर्षांची शिकवण देत. टिळकांच्या विचारांनी प्रभावित होऊन डांगेनी लो.टिळकांची भेट घेतली. त्यांनी डांगेना परदेशी मजुरांच्या प्रश्नांवरती चळवळ उभी करण्याची सूचना केली. या काळात मुंबईत एन्फ़्लुएन्झाची साथ कामगार वस्तीमध्ये पसरली होती. तेव्हा डांगेनी कामगार वस्तीत काम करण्यास सुरवात केली. इ.स. १९२० मध्ये ऑल इंडीया ट्रेड युनियन कॉंग्रेस किवा आयटक ची स्थापना झाली. आणि या संघटनेचे पहिले अधिवेशन मुंबईमध्ये झाले. त्यात डांगेनी सक्रीय सहभाग घेतला. त्याबरोबर महात्मा गांधीनी सुरु केलेल्या असहकार चळवळीतही ते सामील झाले.

**कम्युनिस्ट विचारानुरूप कार्यरत :**

असहकार चळवळीत भाग घेत असताना त्यांच्या मनात कम्युनिस्ट विचारांबाबतही आकर्षण निर्माण झाले.

इ.स.१९२१ मध्ये त्यांनी लेनिन विरुद्ध गांधी या नावाने पुस्तक प्रकाशित करून गांधीजींच्या मार्गाबरोबरच स्वतंत्रप्राप्तीसाठी लेनिनचा मार्गही कसा उपयुक्त आहे याची मांडणी केली. त्यांनी समाजवादावरील अनेक पुस्तकांचे वाचन केले. दरम्यान डांगेंची नेमणूक काँग्रेस नेते विठ्ठलभाई पटेल यांचे सचिव म्हणून झाली. इ.स.१९२२ मध्ये त्यांनी सोशॅलिस्ट नावाचे वर्तमानपत्र सुरु केले. या नियतकालीकामधून उघडपणे त्यांनी समाजवादी भूमिका घेण्यास सुरवात केली. या नियतकालीकाच्या छापखान्यामधून कम्युनिस्टांचा जाहीरनामा,वेतन व श्रम, भांडवल आणि इतर मार्क्सवादी पुस्तके प्रकाशित केली.

**भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेत डांगेंचे योगदान :**

भारत आणि भारताबाहेर कम्युनिस्ट विचारांचे अनेक गट होते. या सर्वांनी मिळून डिसेंबर १९२५ मध्ये कानपूर येथे जेष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ.चेट्टीयार यांच्या नेतृत्वाखाली बैठक झाली. त्यात डांगे, मुजफ्फर अहमद, गुप्ता असे भारतातील अनेक कम्युनिस्ट नेते उपस्थित होते. त्यात सर्वानुमते ठराव संम्मत करून भारतीय कम्युनिस्ट पार्टी (CPI) ची स्थापना करुन त्याचे मुख्यालय मुंबईत करण्यात आले. भारतात कम्युनिस्ट विचारसरणी रुजू होऊ द्यायची नाही असे ब्रिटीशांचे धोरण होते. त्यामुळे इतर कम्युनिस्ट नेत्यांच्या बरोबरीने कॉ.डांगेंच्या सर्व हालचालींवर ब्रिटीशांची गुप्त नजर होती. चळवळीमधूनच इ.स.१९२४ मध्ये कॉ.डांगेंना अटक झाली. मुंबईहून कानपूरला त्यांना स्थलांतरित करण्यात आले. तुरुंगातील वातावरण अनुभवावरून नरकपुरी गवसली या पुस्तकाचे त्यांनी लेखन केले. त्यांना ४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा झाली. त्यांच्या चांगल्या वागणूकीमुळे त्यांना १२ महिने अगोदर सोडण्यात आले.

**गिरणी कामगारांचे संघटन आणि चळवळ :**

मुंबईमध्ये कापड उद्योग हा महत्वाचा उद्योग होता. कापड गिरण्यांमध्ये दीड लाखांवर कामगार होते. कमकुवत संघटनेमुळे कामगारांची स्थिती बिकट झाली होती. ऑगस्ट १९२७ मध्ये गिरण्यांमध्ये संपास सुरवात झाली. काँग्रेसच्या अधिवेशनातही ३० हजार कामगारांनी मोर्चा काढला. १६ एप्रिल १९२८ रोजी १ लाखावर कामगार विविध मागण्यांसाठी कॉ. श्रीपाद डांगेंच्या नेतृत्वाखाली संपावर गेले. डांगेनी क्रांती या साप्ताहिकातून आपली भूमिका, विचार, मागण्या प्रभावीपणे मांडल्या. एप्रिल ते सप्टेंबर १९२८ पर्यंत सलग सहा महिने चिकाटीने डांगेनी संप सुरु ठेवला अखेर यशस्वी वाटाघाटी होऊन ६ ऑक्टोबर १९२८ रोजी संप मागे घेण्यात आला. गिरणी कामगारांच्या प्रश्नासाठी समिती नेमण्यात आली. या संघर्षातून कामगारांना राजकीय शिक्षण, संघटनेचे महत्व समजले. या संपातून ३० ऑक्टो. १९२८ रोजी गिरणी कामगार युनियन नावाची बलाढ्य संघटना कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली निर्माण झाले. वर्षाखेरीस ५४००० सदस्य संख्या या युनियनची झाली. या दरम्यान स्वतःवरील हिंसक हल्ले त्यांनी धीराने सोसले. कामगारांच्या अनेक ठिकाणी सभा घेणे, सेक्रेटरी म्हणून युनियनचे काम पाहणे, क्रांती साप्ताहिकाचे कार्य, प्लासेट कमिशन पुढे सतत कामगारांची बाजू मांडणे इत्यादी गोष्टी ते करत होते. भारतातील कम्युनिस्ट नेत्यांवर कारवाईच्या धोरणामुळे २० मार्च १९२९ रोजी डांगेना २८ कम्युनिस्ट नेत्यांसहित अटक झाली. या सर्व नेत्यांना खटला चालवण्यासाठी दिल्लीजवळ मीरत येथे नेण्यात आले. संपूर्ण देशभर मीरत खटला त्यावेळी गाजला. जवळपास ७ वर्षानंतर १९३५ मध्ये त्यांची सुटका झाली.

**पुण्यामध्ये स्थायिक व संपूर्ण देशात दौरे :**

कम्युनिस्ट चळवळीअंतर्गत मतभेद आणि मुंबईतील कम्युनिस्ट संघटनेवरील कॉ.रणदिवेंचे वर्चस्व आणि भारतीय इतिहास, संस्कृतीचा मार्क्सवादी दृष्टीने अभ्यासासाठी म्हणून मुंबईमधील मुक्काम हलवून डांगे व त्यांच्या पत्नी उषाताई पुण्यात आल्या व केसरीच्या कार्यालयाशेजारील जागा भाड्याने राहण्यासाठी घेतली. ती इतिहासकार श्री.वा.सी.बेंद्रे यांच्या शेजारी होते. पुण्यात कम्युनिस्ट पक्षाचा फारसा प्रभाव नव्हता, कामगार चळवळी नव्हत्या. तेथे सखोल अभ्यासास कॉ.श्रीपाद डांगेनी सुरवात केली. त्याचबरोबर विविध विषयांवर भाषणे केली. विशेषता मार्क्सवादावरील त्यांची भाषणे गाजली. नंतरच्या काळात त्यांनी पुण्यात मुद्रणालय कर्मचारी, रेल्वे, लाकडाची मिल, कापडाची मिल येथील संघटना उभारण्यास मदत केली. मार्क्सवादी विचाराच्या प्रसारास या काळात त्यांनी महाराष्ट्रभर दौरे केले. सातारा, वाई, अहमदनगर, अकोला, अमरावती, नागपूर येथे त्यांची व्याख्याने झाली व त्यातून समाजवाद समजावून सांगण्याचे कार्य केले. कामगार, किसान, विध्यार्थी, पुरोगामी, स्त्रिया यांच्या चळवळी उभारण्यास सुरवात केली.१९३६ मध्ये आयटक संघटनेची एकी करण्यात पुढाकार घेतला. त्याच वर्षीच्या आयटक अधिवेशनाचे झेंडावंदन कॉ.डांगेंच्या हस्ते झाले. पुढे दक्षिण भारतात आंध्र प्रदेश, कर्नाटकचेही दौरे केले. त्यानंतर त्यांनी उत्तर भारताचा दौरा केला. त्यातून संपूर्ण देशात त्यांची लोकप्रियता वाढत गेली.

**काँग्रेस पक्षात कार्य व विविध आंदोलनात सहभाग :**

ब्रिटीशांनी कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातल्यानंतर कम्युनिस्टांनी काँग्रेस पक्षात राहून काम करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यातून डांगे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेससाठी निवडणूक लढविली आणि जिंकली. काँग्रेसचे फैजपूर अधिवेशन संपल्यावर डांगेनी पुण्याहून पुन्हा मुंबईस स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. परळच्या कामगार चाळीतील मोतीराम मेन्शन मध्ये राहावयास आले.

इ.स. १९३७ नंतर राज्य विधानसभांच्या निवडणुका होऊन मुंबई प्रांतात काँग्रेसचे बाळासाहेब खेर मुख्यमंत्री झाले. काँग्रेस राजवटीमध्ये अनेक प्रश्नांवर कामगार आणि किसान यांचे लढे कम्युनिस्ट पक्षाने उभारले. गिरणी मालकांनी महामंदी काळात २५% कामगारांच्या पगारात कपात केली होती त्यामुळे १९२९,१९३४ साली कामगारांनी मोठे संप केले. त्यावर विचारासाठी ब्रेलवी कमिशन नेमले. त्यात कामगारांची बाजू प्रभावीपणे मांडली.१९३९ ते १९६० कालखंडात सतत आंदोलने,तुरुंगवास यामुळे त्यांचे नेतृत्व चमकले.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये योगदान :**

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या लढयामध्ये कॉ.डांगे अग्रस्थानी होते. १९५३ च्या फाजल अली कमिशन विरोधी २१ नोव्हे. १९५३ रोजी झालेल्या मोर्चाचे त्यांनी नेतृत्व केले. १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्षपद कॉ. डांगेना देण्यात आले. कॉ. डांगे मध्य मुंबईमधून देशात सर्वाधिक मते घेऊन निवडून आले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये एक चतुर्तांश सत्याग्रही कम्युनिस्ट पक्षाचे होते.कामगारांनी मोठा उठाव करून मुंबईस केंद्रशासित होण्याचा निर्णय घेण्यापासून परावृत्त केले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामधील १०५ पैकी ८५

हुतात्मे मुंबईतील गिरणी कामगार होते. या गिरणी कामगारांचे नेतृत्व कॉ. डांगेंकडे होते. गिरणी कामगारांच्या संयुक्त ताकतीमुळेच महाराष्ट्रास मुंबई शहर मिळाले. दरम्यान कॉ. डांगे अखिल भारतीय ट्रेड युनियनचे अध्यक्ष झाले. १९४५ साली लंडन येथील आयोजित जागतिक ट्रेड युनियनच्या परिषदेस भारताचे प्रतिनिधी म्हणून हजर होते. १९४७ मध्ये मास्कोला भेट देऊन विविध सेव्हिएत नेत्यांशी चर्चा केली.

**भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे दीर्घकाळ अध्यक्ष :**

सीमा प्रश्नांच्या कारणांना पुढे करून चीनने भारतावर ऑक्टो.१९६२ मध्ये आक्रमण केले. यावेळी राष्ट्रहित विचारात घेऊन कॉ.डांगेनी नेहरुंना पाठींबा दिला. या दरम्यान कम्युनिस्ट पक्षांतर्गत २ गट निर्माण झाले.१९६२ मध्ये सरचिटणीस पदाबरोबरीने पक्षाध्यक्षपद निर्माण करून कॉ.डांगेंची निवड करण्यात आली. १९६२ ते १९८० या प्रदीर्घ काळापर्यंत ते पक्षाध्यक्ष होते. पक्षाध्यक्ष म्हणून त्यांनी नव्याने चळवळीना सुरवात केली. त्यानुसार २२ सप्टें १९६३ रोजी कम्युनिस्ट पक्षाने प्रचंड मोठा मोर्चा संघटीत करून सक्तीची बचत योजना रद्द,बँकांचे राष्ट्रीयीकरण या मागण्यांसाठी हा मोर्चा होता. पुढे कम्युनिस्ट पक्षामध्ये फुट पडली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भा.क.प) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (मा.क.प) असे दोन पक्ष पडले. कॉ.डांगे भा.क.प. सोबत राहिले.

**कॉ. डांगेंचे काँग्रेसशी सहयोगाचे धोरण :**

१९६७ च्या निवडनुकीनंतर भा.क.प ला २२ आणि मा.क.प ला १९ जागा मिळाल्या कॉ.डांगेंची भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या संसदीय नेतेपदी निवड झाली. इ.स.१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धावेळी राष्ट्रहिताचा विचार करून कॉ. डांगेनी पंतप्रधान इंदिरा गांधीना पाठींबा दिला. इ.स.१९७४ रोजी कॉ. डांगेंच्या आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्य शिवाजी पार्क,मुंबई मध्ये मोठा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.व्ही.व्ही.गिरी, परराष्ट्र मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत झाला. जगातील अनेक कम्युनिस्ट पक्षांनी डांगे यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमानिमित्य ऑर्डर ऑफ लेनिन हा सेव्हिएत युनियनने दिला. पुढे १९७५ मध्ये डांग्यांनी आणीबाणीस पाठींबा दिला. इ.स.१९७८ मध्ये भटिंडाच्या अधिवेशनात भाकपने आपल्या धोरणात बदल करताना सर्व डाव्या पक्षांच्या आणि काँग्रेसविरोधी धोरण ठेवले.कॉ. डांगेंची फेरनिवड पक्षाध्यक्ष म्हणून झाली. परंतु पक्षावर सरचिटणीस राजेश्वरराव यांचे वर्चस्व निर्माण झाले. पक्ष नेतृत्वाशी डांगेंचे संबंध बिघडू लागले.त्यानंतर डांगे यांच्या कन्या रोझा देशपांडे यांनी कॉ.श्रीपाद डांगे गटाचा स्वतंत्र मेळावा घेतला. डांगेनी या मेळाव्याचे उद्घाटन व मार्गदर्शन केले. परिणामी भाकपने डांगेंना पक्षातून निलंबित केले आणि त्यांचे अध्यक्षपदही रद्द केले. त्यानंतर डांगेनी स्वताचा स्वतंत्र कम्युनिस्ट पक्ष काढला पण त्या पक्षाचा फारसा प्रभाव पडला नाही.

**कॉ.डांगेंची राजकीय निवृत्ती, निधन, समग्र योगदान :**

इ.स.१९८० नंतर डांगेनी राजकीय निवृत्तीकडे वाटचाल सुरु केली. त्यांच्या पत्नी उषाताई डांगे यांचे १९७६ मध्ये निधन झाले.त्यानंतर त्यांचा सांभाळ त्यांच्या कन्या रोझा देशपांडे यांनी केला. दुर्दैवाने कॉ.डांगेंच्या अखेरच्या काळामध्ये त्यांचा कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेस पक्ष दोघांनीही त्यांच्यांकडे दुर्लक्ष केले. २२ मे १९९१

रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या अंत्ययात्रेत हजारो कामगार, कष्टकरी वर्ग सामील झाला. जवळपास पूर्ण शतक भारतीय राजकारण,समाजकारणावर प्रभाव असणारे नेतृत्व म्हणून कॉ.श्रीपाद अमृत डांगेंना भारतीय इतिहासात ओळखले जाते.

कॉ.श्रीपाद डांगें जवळपास ६० ते ६५ वर्ष स्वातंत्र्य लढा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ,गोवा मुक्ती लढा, साम्यवादी चळवळीत कार्यरत होते. आयुष्यभर त्यांनी आंतरराष्ट्रीय कामगार चळवळ,राष्ट्रीय राजकारण,महाराष्ट्राचे राजकारण या मध्ये महत्वाची भूमिका बजावली. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त,राष्ट्रीय व राजकारणामधील प्रभावी नेतृत्व आणि लोकप्रियता भारतातील कोणत्याही कम्युनिस्ट नेत्यास लाभली नाही.त्यांनी विविध विषयांवरती मराठी व इंग्रजीमधून लिखाण केले. त्यांनी वयाच्या २२ व्या वर्षी गांधी विरुद्ध लेनिन तर वयाच्या ७५ व्या वर्षी भारतातील भांडवलशाहीचे अरिष्ट आणि वेतन गोठवणूक हे अखेरचे पुस्तक लिहले. एकूणच त्यांच्या कामगिरीमुळे महाराष्ट्राचे शिल्पकार ते आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट नेता असा त्यांचा प्रदीर्घ प्रभाव राहिला.

## १.३ सारांश

महाराष्ट्राच्या इतिहासातील, राज्य निर्मितीचा लढा जसा संघर्षाचा आहे तसाच सन १९६० ते २००० हा काळ देखील संघर्षाचा आहे. राज्य निर्मिती काळात संघर्ष हा केंद्रीय सत्तेशी होता तर नंतरचा संघर्ष हा राज्यांतर्गत असल्याचे दिसते. अशा काळात विकासात्मक आंदोलनाने सामाजिक बदल आणि आणि राजकीय व्यवस्था या बदलून गेल्या आहेत. या काळातील एक वैशिष्ट्य म्हणजे वरील सर्वच नेते हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे भागीदार आणि साक्षीदार असल्याने राजकीय मतभिन्नता असली तरी एकमेकांच्या मताला सन्मान देणारी पिढी होती. यातील सर्वच नेत्यांनी एक संदेश दिला आहे तो म्हणजे सत्ता कोणतीही असो पण प्रतिक्रिया देणारा गट समाजात अस्तित्वात असला पाहिजे नाहीतर लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता असते. संसदीय लोकशाही हे खरे राष्ट्राचे बळ आहे यावर परिपूर्ण विश्वास असणाऱ्या या नेत्यांनी महाराष्ट्र घडवला.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

### अ) काँग्रेस नेतृत्व– यशवंतराव चव्हाण

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१) यशवंतराव चव्हाण यांचा जन्म ...................... येथे झाला.

अ) कराड ब) देवराष्ट्रे क) बोरगाव ड) पुणे

२) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील.................. मध्ये यशवंतराव चव्हाण यांचा सहभाग होता.

अ) प्रतिसरकार ब) संस्थांनी क) प्रजापरिषद ड) जंगल सत्याग्रह

३) ...................... साली द्विभाषिक राज्याचे पहिले मुख्यमत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी पदभार स्वीकारला.

अ) १९५५ ब) १९५६ क) १९५८ ड) १९६०

४) ...................... साली यशवंतराव चव्हाण हे भारताचे उपपंतप्रधान झाले.

अ) १९७७ ब) १९७८ क) १९७९ ड) १९८०

५) ...................... हे यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र आहे.

अ) हरवलेले दिवस ब) कृष्णाकाठ क) गेले ते दिन ड) अग्निपंख

**टिपा लिहा**

१) स्वातंत्र्यसैनिक यशवंतराव चव्हाण

२) संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण

३) साहित्यक यशवंतराव चव्हाण

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या कामगिरीची माहिती लिहा.

२) यशवंतराव चव्हाण यांच्या संरक्षण मंत्री पदावरील धोरणात्मक निर्णयांची माहिती द्या.

**ब) काँग्रेस नेतृत्व– वसंतदादा पाटील**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) वसंतदादा पाटील यांचा जन्म सांगली जिल्हयातील ...................... या गावी झाला.

अ) रामपूर ब) पद्माळे क) वडगाव ड) विश्रामबाग

२) १९४२ च्या आंदोलनात त्यांना अटकेनंतर पुण्यातील...कारागृहात ठेवण्यात आले.

अ) कसबा ब) शिवाजीनगर क) पाषाण ड) येरवडा

३) सांगलीची नाट्यपंढरी म्हणून ओळख दृढ करण्यासाठी १९६३ मध्ये वसंतदादानी ...................... मंजूर करून आणले.

अ) आकाशवाणी केंद्र ब) नाट्यगृह क) नाट्यशाळा ड) वेशभूषा केंद्र

४) वसंतदादा पाटील ...................... या वर्षी पहिल्यावेळी मुख्यमंत्री म्हणून निवडले गेले.

अ) १९७९ ब) १९७४ क) १९७७ ड) १९७२

५) केंद्र सरकारने मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यावर वसंतदादा पाटील यांची...................... राज्याचे राज्यपाल म्हणून नेमणूक केली.

अ)आसाम ब) राजस्थान क) उत्तर प्रदेश ड) कर्नाटक

**टीपा द्या**

१) स्वातंत्रसैनिक वसंतदादा पाटील

२) मुख्यमंत्री वसंतदादा पाटील

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून वसंतदादा पाटील यांच्या कामगिरीची माहिती लिहा.

२) वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्री पदावरील धोरणात्मक निर्णयांची माहिती द्या.

**अ) समाजवादी नेतृत्व – नागनाथअण्णा नायकवडी**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१) ....................... या ठिकाणी नागनाथ अण्णा नायकवडी यांचा जन्म झाला.

अ) वाळवा ब) बहे क) मिरजवाडी ड) इस्लामपूर

२) स्वातंत्र्यलढ्यातील ....................... यांच्या नेतृत्वाखालील चळवळीत नागनाथअण्णा हे अग्रेसर होते.

अ) अच्युतराव पटवर्धन ब) गोविंदभाई श्रॉफ क) स्वामी रामानंद तीर्थ ड) क्रांतिसिंह नाना पाटील

३) नागनाथअण्णा यांनी 'एक गाव ....................... ही पुनर्वसन मोहीम राबवली

अ) एक शाळा ब) एक पाणवठा क) एक पारधी ड) एक कारखाना

४) आटपाडी येथे १९९३ सालापासून नागनाथअण्णा यांनी ....................... हा लढा उभा केला

अ) पाणी परिषद ब) दुध संकलन क) समान शेती ड) समान काम

५) नागनाथअण्णा यांनी ....................... या भूकंपग्रस्त भागातील १०८ मुलांना दत्तक घेऊन येथून पदवी पर्यंतचे शिक्षण मोफत केले.

अ) किल्लारी ब) कोयना क) नाशिक ड) डहाणू

**टिपा लिहा**

१) हुतात्मा सहकारी साखर कारखाना

२) नागनाथअण्णा आणि साहित्य चळवळ

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) एक आदर्श समाज सेवक म्हणून नागनाथअण्णांच्या कार्याचे वर्णन करा.

२) धरणग्रस्त आणि दुष्काळग्रस्त चळवळीचे नेते म्हणून नागनाथअन्नाच्या कार्याचा आढावा घ्या

**ब) समाजवादी नेतृत्व –एस.एम जोशी**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१) एस एम जोशी यांचा जन्म ....................... या ठिकाणी झाला.

अ) पुणे ब) पुरंदर क) जुन्नर ड) सासवड

२) एस. एम जोशी हे ....................... विचाराचे अनुयायी होते

अ) कम्युनिष्ट ब) समाजवादी क) भांडवलवादी ड) परंपरावादी

३) ....................... साली लोकसभा निवडणुकीत पुणे मधून एस.एम. निवडून आले

अ) १९६७ ब) १९६८ क) १९६९ ड) १९७०

४) पूर्णिया येथील ....................... आदिवासींच्या लढ्याचे नेतृत्व एस.एस. यांनी केले.

अ) वारली ब) संथाल क) ठाकर ड) भिल्ल

५) एस.एम यांचे मी.एस.एम हे ....................... आहे.

अ) आत्मचरित्र ब) चरित्र क) कथन ड) ललित काव्य

**टिपा लिहा**

१) एस. एम.जोशी

२) एस. एम. जोशी व कामगार विषयक

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) एस. एम. जोशी यांचे कार्य स्पष्ट करा

२) एस.एम जोशी विधानसभा व लोकसभेतील कार्य स्पष्ट करा

**क) समाजवादी नेतृत्व –आचार्य अत्रे**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) आचार्य प्र.के अत्रे यांनी आरंभी लंडनमधील ....................... या शहरात अध्यापनाचे कार्य केले.

अ) केंब्रिज ब) इरा क) **हॅरो** ड) लेंकशायर

२) १९ जानेवारी १९४० रोजी आचार्य प्र.के अत्रेनी ....................... हे साप्ताहिक सुरु केले.

अ) रत्नाकर ब) अध्यापन क) जयहिंद **ड) नवयुग**

३) १९३८ च्या ....................... नगरपालिकेमध्ये अत्रे प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले.

अ) **पुणे** ब) नागपूर क) नाशिक ड) मुंबई

४) प्र.के अत्रे निर्मित ....................... चित्रपटास पहिले राष्ट्रपती सुवर्ण पदक मिळाले.

अ) **श्यामची आई** ब)महात्मा फुले क)मोरूची मावशी ड)सत्याग्रह

५) ....................... रोजी आचार्य प्र.के अत्रेंना अटक झाली.

अ)२४ जाने.१९५५ ब)२० फेब्रु.१९५४ क)**२६ जाने. १९५६** ड)२२ मार्च १९५३

**टीपा द्या**

१) चित्रपटनिर्माते प्र.के अत्रे

२) वृतपत्र क्षेत्रातील प्र.के अत्रेचे योगदान

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) आचार्य प्र.के अत्रेचे राजकिय योगदान स्पष्ट करा.

२) संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमधील आचार्य प्र.के अत्रेची भूमिका विषद करा.

**कम्युनिष्ट नेतृत्व- कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे**

**प्रश्न १ खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१) ....................... या महाविद्यालयात बायबल शिकवण्याच्या सक्तीमुळे डांगेनी बंड पुकारले.

अ) फोर्ट ब) विल्सन क) सेंट पॉल ड) पीटर्सबर्ग

२) परदेशी मजुरांच्या प्रश्नावर कार्य करण्याचा सल्ला डांगेना ....................... यांनी दिला.

अ) सावरकर ब)महात्मा गांधी क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर ड)लोकमान्य टिळक

३) इ.स १९२२ मध्ये डांगेनीवृतपत्र सुरु केले.

अ) सोशालीस्ट ब) कम्युनिस्ट क) मार्क्सवाद ड) कम्युन

४) १९३५ मध्ये कामगारांच्या आंदोलनामुळेखटला प्रसिद्ध झाला.

अ) मुंबई ब) मीरत क) कलकत्ता ड) भोपाळ

५) कम्युनिस्ट पक्षापासून वेगळा डांगे गटाचा मेळावायांनी घेतला.

अ) अभय डांगे ब) रोझा देशपांडे क) राजेश्वरराव ड) मुजफ्फर अहमद

**प्रश्न २ टीपा द्या**

१) कॉ डांगेंचे स्वातंत्रलढ्यामधील कार्य

२) कॉ डांगेंची कामगार वर्गासाठी आंदोलने

**प्रश्न ३ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) कॉ डांगेंचे विविध आंदोलनामधील कार्य स्पष्ट करा.

२) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून कॉ डांगेंची कामगिरी सांगा.

## १.५ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. ऋणानुबंध (ललित लेख) (१९७५)

२. कृष्णाकाठ (आत्मचरित्र १ला खंड) (१९८४) हे पुस्तक बोलके पुस्तक या स्वरूपातही आहे.

३. भूमिका (१९७९)

४. सह्याद्रीचे वारे (१९६२) भाषण संग्रह.

५. राजा माने, महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा पाटील, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ महाराष्ट्र शासन २०११.

६. पाटील शालिनीताई, डॉ वसंतदादा पाटील,चरित्र भाग-३, विश्वामित्र प्रकाशन पुणे,

७. अहिर जयवंत, क्रांतिवीर नागनाथअण्णा, भाग १ व २, गौरव समिती वाळवा, २००९.

८. पारेकर नंदा, महाराष्ट्राचे शिल्पकार , क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, साहित्य संस्कृती मंडळ महाराष्ट्र शासन २०१८.

९. सनदे सा.बा. जीवन संग्राम, साहित्य संस्कृती मंडळ महाराष्ट्र शासन १९८३.

१०. माळगी एम.एस. (संपा) क्रांतिसूर्य, क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी स्मृतीग्रंथ, २०१३

११. पाटणकर भारत (डॉ) महाराष्ट्राचे शिल्पकार क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, साहित्य संस्कृती मंडळ महाराष्ट्र शासन २००२

१२. प्रधान ग. प्र., महाराष्ट्राचे शिल्पकार एस. एम. जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती, मुंबई, नोव्हेंबर, २००० .

१३. कपोले अरविंद, सत्याग्रही समाजवादी एस.एम., राष्ट्रसेवा दल प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २००३.

१४. प्रधान ग. प्र., महाराष्ट्राचे शिल्पकार एस. एम. जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती, मुंबई, नोव्हेंबर, २०००.

१५. कपोले अरविंद, सत्याग्रही समाजवादी एस.एम., राष्ट्रसेवा दल प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २००३.

१६. लव्हे पुंडलिक, आचार्य अत्रे झेप आणि झुंज, पुंडलिक प्रकाशन.

१७. पेडणेकर आ.ना., भारतीय साहित्याचे निर्माते, प्रल्हाद केशव अत्रे, साहित्य अकादमी.

१८. आचार्य अत्रे, (आत्मचरित्र) कर्हेचे पाणी, खंड १ ते ४.

१९. डांगे श्रीपाद अमृत, माझी स्मरणिका, बारा भाषणे, लोकवाङ्मय गृह.

२०. चौसाळकर अशोक, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, लोकवाङ्मय गृह.

❖❖❖

# घटक – २

# महाराष्ट्रातील प्रमुख मुद्दे आणि घटना

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ महाराष्ट्राच्या कृषी विकासातील वसंतराव नाईक यांचे योगदान.

  २.२.२ उद्योग साखर (प्रवरा) व दुध डेअरी (मुंबई)

  २.२.३ नैसर्गिक आपत्ती (भूकंप-कोयना १९६७ व लातूर १९९३)

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्दांचे अर्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी.


## २.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत प्रकरणात (घटकात) आपणास लक्षात येईल की –

- कृषी क्षेत्र व विकास म्हणजे काय.
- कृषी क्षेत्राच्या विकासातील वसंतराव नाईक यांचे योगदान समजले जाईल.
- कृषी विकाससंबंधीच्या विविध योजना समजल्या जातील.
- विठ्ठलराव विखे पाटील यांचे साखर कारखाना क्षेत्रातील कार्य काय होते
- प्रवरा सहकारी साखर कारखान्याचा इतिहास समजुन घेता येर्सल.
- मुंबईच्या आरे दुध डेअरीसंबंधीची संपूर्ण महिती जाणून घेता येईल.
- आपत्ती म्हणजे काय.

- दुध महापूर योजना समजून घेता येईल.
- आपत्तीचे विविध प्रकार समजले जातील.
- कोयना भूकंपाचा (१९६७) अभ्यास करता येईल.
- लातूर भूकंपाचा (१९९३) इतिहास समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

पुरोगामी व विकसीत राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अधुनिक महाराष्ट्राच्या जडण घडणीमध्ये अनेक व्यक्ती व संस्तांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ते उद्धवराव ठाकरे यांच्यापर्यंत महाराष्ट्राला लाभलेल्या मुख्यमंत्र्यांच्या मालिकेत वसंतराव नार्सक यांचे योगदानही विशेष महत्त्वाचे ठरले. इतरांच्या तुलनेत जास्त काळ महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर राहिलेल्या वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्राचा कायापालट करून महान कार्य केले. शेती हाच त्यांचा मुळपिंड सअल्याने काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिष्ठा मिलवून देण्यासाठी व त्यांचे जीवन अधिक सुसह्य घण्यासाठी त्यांनी विविध उपाययोजना आकल्या आणि विविध प्रयोगही केले. त्याचाच आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये गेण्यात आलेला असून विठ्ठलराव विखे पाटील यांनी पहिला सहकारी साखर कारखाना काढून साखर उद्योगाची मुहुर्तमेड रोवली. विशषष संदर्भ म्हणून प्रवरा सहकारी साखर कारखरान्याचा अभ्यास करत असताना या उद्योगामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा काापालट झालेला दिसतो. एवढेच नव्हे तर प्रवरा साखर कारकान्यचाी स्थापना करून विखे पाटलांनी साखर उद्योगात क्रांतीच घडवून आणली होती.

शेतीचा जोडव्यवसाय म्हणून ओळखला जाणारा व शेतकऱ्यांच्या जीवनाला आर्थिक स्थिरता निर्माण करून देणारा व्यवसाय म्हणजेच दुग्ध व्यवसाय होय. या व्यवसायाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून प्रापनिधीक स्वरूपात मुंबर्स येथील आरे दुध डेअरीचा थोडक्यता आढावा घेण्यात आला आहे. देशाच्या किंवा राज्याच्या जनतेला नेहमीच विविध नैसर्गिक आपत्तीनाही सतत तोंड द्यावे लागत असते. त्यामध्ये भुकंप ही मानवी जीवन उध्वस्त करून टाकणारी तीव्र स्वरूपाची नैसर्गिक आपत्ती होय. प्रस्तुत प्रकरणामध्ये भुकंप या संकल्पनेचे विवेचन करत असतानाच १९६७ मध्ये झालेला कोयना भूकंप व १९९३ मध्ये झालेला लातूरचा भूकंप यांची विशेष संदर्भ म्हणून माहिति दिलेली असून या दोन्ही भूकंपामध्ये महाराष्ट्राची झालेली प्रचंड हाणी व त्याच्या निवारणासंदर्भातील व्यवस्थापनाचेही विवेचन केलेले आहे.

## २.२ विषय विवेचन :

**अ) महाराष्ट्राच्या कृषी विकासातील वसंतराव नाईक यांचे योगदान** (Agricultural Development with special reference to Role of Vasantrao Naik) :

महाराष्ट्राची भूमी शेती व शेतकऱ्यांची भूमी म्हणून ओळखली जाते. म्हणजेच महाराष्ट्राला कृषीप्रधान राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील शेतीव्यवसाय हा देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेचा विशेषत: ग्रामीण

अर्थव्यवस्थेचा कणा माणला जातो. खरीप व रब्बी पिके घेणाऱ्या महाराष्ट्रात ब्रिटीश काळामध्ये सुद्धा नगदी पिके घेत असल्याची नोंद मिळते. जसे की ऊस व कापूस या नगदी पिकांबरोबरच अलिकडे तंबाखू, तेलबिया, फळे, भाजीपाला, मिरची यासारखी विविध पीकेही प्रामुख्याने घेतली जाऊ लागली आहेत. महाराष्ट्राच्या कृषीविकासाचा आढावा गेत असताना अनेक मुख्यमंत्र्यांचे योगदान राहिलेले आहे. विकसीत महाराष्ट्र राज्याचे स्वप्न बाळगणाऱ्या व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या बरोबरच महाराष्ट्र राज्याला कृषी क्षेत्राच्या अर्थाने सुजलाम सुफलाम करण्यामध्ये वसंतराव नाईक यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणाला त्यांची कृषी क्षेत्रातील योगदानाची माहिती करून घ्यावयाची आहे.

● **जडणघडण :**

महाराष्ट्राच्या सर्वांगीण जडणघडणीत ज्या दिवंगत मुख्यमंत्र्यांचा समावेश करावा लागतो. त्यात दिवंगत मुख्यमंत्र्यांचा समावेश करावा लागतो. त्यात दिवंगत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे विशेष स्थान आहे. यवतमाळ या मागासलेल्या जिल्ह्यातील व पुसद तालुक्यातील निसर्गाच्या कुशीत वसलेल्या गहुली या गावातील बंजारा कुटुंबात त्यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी झाला. वडील फुलसिंग व आई होनूबाई हे शेतकरी कुटुंबातलेच होते. त्यांचे मुळ नाव हाजुसिंग असे असले तरी त्यांना वसंता म्हणजेच वसंतराव नाईक म्हणूनच ओळखले गेले. तर या घराण्याचं मुळ आडनाव राठोड असे असले तरी लोक त्यांना नार्सक म्हणूनच ओळखत असत. गरिबांना मबदत केली पाहिजे हे बाळकडू लहानपणीच वसंतरावांना देणाऱ्या त्यांच्या आई वडीलांना बंजारा समााजत मोठा मान होता. गावात शाळाच नसल्यामुळे त्यांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण वेगवेगळ्या गावातील शाळांमधून पूर्ण करावे लागले. नागपूरमधल्या निलसिटीहायस्कूलमधून ते मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण जाले. हरीभाऊ आपटे, नाथमाधव या साहित्यकारांचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फउले यांच्या विचारांचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला होता. १९३७ मध्ये म्हणजेच वयाच्या २४ व्या वर्षी त्यांनी मॉरिस महाविद्यालयातून बी.ए. ची पदवी प्राप्त केली. पुढे नागपूर विद्यापीठ विधी महाविद्यालय, नागपूर येथून एल.एल.बी. ची पदवी संपादन करून वकीली सुरू केली. यावेळी त्यांचा बंजारा समाजातील वकिली करणारा पहिला वकील असा नावलौकिक झाला. डॉ. पंजाबराव देशमुख या नामवंत कायदेपंडीतांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत प्रामाणिकपणे वकिली व्यवसाय करत असतानाच वयाच्या २८ व्या वर्षी त्यांचा ब्राह्मण समाजातील वत्सलाबाई या मुलीशी विवाह झाला.

● **राजकीय कारकिर्द :**

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात विविध पदावर काम तर केलेच. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे बारा वर्षे (१९६३ ते १९७५) मुख्यमंत्री म्हणून कारकिर्द गाजवणारे ते महाराष्ट्राचे एकमेव मुख्यमंत्री ठरले. कारण एवढी प्रदिर्घ मुख्यमंत्रीपदाची कारकिर्द वसंतरावांच्या शिवाय इतर कोणाच्याही आलेली नाही. त्यांच्या राजकीय पेशाची सुरूवात पुसदच्या स्थानिक राजकारणापासूनच झालेली दिसते. पुढे त्यांनी पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष, पुसद कृषी संघटनेचे प्रमुख, पुस्द हरिजन मोफत वसतीगृहाचे अध्यक्ष, विदर्भ प्रदेश काँग्रेस समितीचे व कार्यकारीणीचे सदस्य, पहिल्या सार्वजनिक निवडणूकीमध्ये (१९५२) मध्यप्रदेश मंत्रीमंडळामध्ये महसुल

खात्याचे उपमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जुन्या मंत्रीमंहळात सहकार, कृषी व दुग्धव्यवसाय मंत्री, स्वतंत्र महारोट्र राज्याच्या निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखालील पहिल्या मंत्रीमंडळात महसुलमंत्री म्हणून नियुक्ती झाली. तर पुढे १९६३ ते १९७५ या कालखंडात त्यांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काकाज पाहिले. याशिवाय वाशिम लोकसभा मतदारसंघातून लोकसभा सदस्य, इत्यादी विविध पदावर काम करण्याची संधी मिळालेल्या ईनाक साहेबांनी आधुनिक महाराष्ट्र घडविण्याच्या दृष्टिकोणातून अतिशय महत्त्वपूर्ण योगदान दिले. बहुतांशी सर्वच क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या वसंतराव नाईक यांचे १९७९ रोजी हृदयविकाराने दुःख निधन जाले.

**● कृषी विकासातील योगदान :**

वसंतराव नाईक यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजेच त्यांनी कृषी क्षेत्राचा केलेला विकास होय. त्यांचा मुळचा पिंचड शतकरी असल्यामुळे शेती हाच त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला होता. शेतीकडे व्यवसाय म्हणून पहातानाच शेतकऱ्यांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. द्विभाषिक मुंबईराज्याच्या मंत्रीमंडळात कृषीमंत्री म्हणून व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी प्रामुख्याने शेती क्षेत्राला प्राधान्य दिले. त्यांच्याच कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कृषी क्षेत्राच्या विकासाचा वेग गतीमान झाला होता. महाराष्ट्र राज्याच्या मुलभूत विकासासाठी कै. यशवंतराव चव्हाण यांनी निश्चित केलेली दिशा प्रत्यक्ष अमलात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वसंतराव नाईक यांनी केले. कृषीक्षेत्रातील विविध समस्या हाताळताना महाराष्ट्र धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण कसा होईल याकडे लक्ष दिले. दोन वर्षात महाराष्ट्र राज्य धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही. तर मी स्वत: फासावर जाईन असे ठणकावून सांगणाऱ्या वसंतराव नाईक यांची त्यामधून कृषीक्षेत्राविषयी असणारी तळमळ स्पष्टपणे दिसून येते.

**● शेतीच्या आधुनिकीकरणाला चालना :**

स्वत: शेती करणारे वसंतराव नाईक हे शेती व शेतकऱ्यांवर प्रेम करणारे होते. जिथे जाईल तिथे शेतीच्या प्रचार व विकासाबरोबरच शेती समस्या सोडविण्यावर त्यांचा नेहमीच भर असे. शेतकऱ्यांचा पारंपारिक शेती करण्याचा दृष्टीकोन नाहीसा होवून त्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी यासाठी त्यांनी दौरे करून विशेष प्रयत्न केले. आपल्या अभ्यासपूर्व व अमोघ वाणीने शेतकऱ्यांच्यामध्ये शेती औजारे, खते-बियाणे यासारख्या महत्त्वपूर्ण बाबींच्या बद्दल विश्वास व नवचैतन्य निर्माण केले. जादूची कांडी फिरवून आपण एका दिवसात स्वयंपूर्ण होणार नाही तर त्यासाठी साधणे मी पुरवणार आहे. पण कष्ट तुम्हाला करायचे आहे असे ते आवर्जून सांगायचे. त्यांच्या या प्रामाणिक प्रयत्नामुळेच महाराष्ट्रातील शेतीच्या आधुनिकरणाला माठी चालना मिळाली.

**● हरितक्रांतीसाठीचे प्रयत्न :**

पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र राज्याच्या हरितक्रांतीसाठी केलेल्या प्रयत्नामध्ये वसंतराव नाईकांनी भर घातली. शेती उत्पादन वाढावे म्हणून संकरित बि-बियाणांचा वापर करणे. कृषी विद्यापीठांतून बियाणांची निर्मिती करणे व ती शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे, शाळाशुद्ध पद्धतीने रासायनिक खतांचा वापर करणे, शेतीसाठी शाास्त्रीय

तंत्रज्ञानाचा वापर करणे, जल व्यवस्थापनाला प्राधान्य देणे, दुग्ध व्यवसायाला चालना देणे, यासारख्या बहुउद्देशीय उपक्रमावर भर विशेष भर दिला. शिवाय त्यांनी प्रत्येक तालुका स्तरावर माहितीयंत्रणा वापरली. पडणाऱ्या पावसाचे पाणी शेतात मुरावे म्हणून मृदसंधारण योजना अस्तीत्वात आणली. नदिनाल्यातील व्यर्त वाहणाऱ्या पाण्याचा वापर शेतीच्या ओलितासाठी केला. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी. शेतमालाला योग्य किंमत मिळवावी, शेतीवर काम करणाऱ्या मजूरांना योग्य मंजूरी मिळवावी यासाठी धोरणात्मक निर्णय त्यांनी घेतले. त्यांच्या या अमुल्य योगदानामुळेच वसंतराव नाईक यांना हरितक्रांतीचे प्रणेते म्हणून ओळखले जाते.

**● शेतीच्या उत्पादनवाढीसाठी योगदान :**

वसंतराव नाईक यांनी शेतीच्या उत्पादनवाढीसाठी व अन्नधान्याच्या स्वयंपूर्ततेसाठी भरिव स्वरूपाचे योगदान दिले. शेतीउत्पादन वाढीसाठीचा त्यांचा चारकलमी उपक्रम होता तो म्हणजे (१) पाण्याचा कसोशीने वापर करणे, २) अधिकाधिक उत्पन्न देणाऱ्या सुधारित बियानांचा वापर करणे, (३) रासायनिक खतांचा वापर करणे, (४) पिकांचे संरक्षण करणे, याच अनुषंघाने १९६५ रोजी पुण्याच्या शनिवारवाड्यासमोर जमलेल्या मोठ्या जनसमुदायासमोर एक ऐतिहासिक घोषणा केली की, ''येत्या दोन वर्षामध्ये महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर मला याच शनिवारवाड्यासमोर फाशी द्या'' यावरून नाईक साहेबांची शेती उत्पदान वाढवण्यासाठीची तबळमळ स्पष्ट होते. या त्यांच्या घोषणेमध्ये पुढील काळात संस्था कार्यकर्ते व शेतकरी यांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण घेण्यास मदतच झाली.

**● ज्वारी एकाधिकार योजना :**

शेतकऱ्यांसाठी जे जे करावे लागेल ते ते करण्यास नाईकसाहेबांनी धन्यता माणली. १९६४ रोजी त्यांनी जाहीर केले की, ज्वारी खरेदीचा हक्क फक्त सरकारकडे राहील. ज्वारी हे आपल्या राज्यातील जनतेचे खाद्य आहे. त्यामुळे यापुढे ज्वारी कोणत्याही खाजगी धंदेवाल्यास खरेदी करता येणार नाही. त्यासाठीची पुरेशी यंत्रणाही सरकारने कमी केली आहे. सरकार ज्वारी-गहू, तांदूळ व इतर धान्ये यांच्या विक्रीचे दर निश्चित करत आहे. त्यांच्या या धोरणास बहुतांशी नेत्यांचा विरोद होता. पण नाईक साहेबांनी मात्र सर्वांचा विरोध पत्करून शेती मालाच्या किंमती व शेतीविषयक विचारांना नवी दृष्टी दिली. त्यांनीच महाराष्ट्रात सर्वप्रथम एकाधिकार पद्धती सुरू करून नव्या धोरणांची अंमलबजावणी केली. एकूणच शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांच्या चांगल्या भावाची हमी देवून आर्थिक उत्पादनास चालना देणारी व जनतेला वाजवी किंमतीने धान्य पुरवण्याची व्यवस्था करणारी त्यांची ज्वारी एकाधिकार योजना निश्चितच महत्त्वपूर्ण ठरली.

**● अन्नधान्य विषयीची बारा कलमी योजना :**

महाराष्ट्र राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी १९६५ रोजी धाडसाने बारा कमी योजना वसंतराव नाईक यांनी आणली होती. विशेषत: रब्बी हंगामातील पिकांना मोफत पाणी द्यायचे व ऊस लागवडीखालील दहा टक्के जमीन अन्नधान्य उत्पादनाखाली आणावयाची हे या योजनेचे मुख्य सुत्र होते. या योजनेमध्ये पुढील बारा कलमांचा सामवेश होता.

१) प्रवरा व गोदावरी नद्यांच्या कालव्यातील पाणी ऊसाऐवजी रब्बी हंगामातील अन्नधान्य पिकांसाठी वापरावे.

२) रब्बी हंगामातील दुसऱ्या पिकांना पाण्याचा पुरवठा मोफत करणे.

३) मोफत पाणीपुरवठा सवलतीचा फायदा शेतकऱ्यांना करून गेता यावा म्हणून त्यांना मोफत पाणी उपलब्ध करून देणे.

४) उरमोडी व तराळी या बंदाऱ्यातील पाणी उपसा सिंचन पद्धतीने हंगामी पिकांसाठी द्यावयाची ज्या शेतकऱ्यांना परवानगी आहे. त्यांना यापुढे या पद्धतीने अन्नधान्य पिकांसाठी मागणी करून पाणी वापरण्याची परवानगी देणे.

५) कालव्यांना चाऱ्या बांधण्याची मोहीम हाती घेणे.

६) हिवाळी ऊसाची लागवड करताना ऊसाखालची जमीन दहा टक्क्यांनी कमी करून अन्नधान्याच्या पिकाकाली आणणे.

७) खरीप व रब्बी पिकांना कालव्याचे पाणी देताना परवानगी नसेल जी शेती कालव्यांच्या क्षेत्रात येते त्यांना मोफत पाणी देण्यात येर्सल.

८) खरीब व रब्बी पिकांना कालव्याचे पाणी देताना ते १८ दिवसांच्या अंतराने व उन्हाळी पिकांसाठी १४ दिवसांच्याअ ंतराने देण्यात येईल.

९) नाशिक जिल्ह्यातील बंधारे सोडून सर्व नद्या, उपनद्या, नाले व त्यांच्या बंदाऱ्यातील पाणी ज्यांना उपसा सिंचन पद्धतीने घ्यावयाचे असेल त्यांना यासाठी यापुढे परवानगी लागणार नाही. परंतु यांनी हे पाणी अन्नधान्याच्या पिकासाठीच वापरले पाहिजे.

१०) विदर्भ व इतर भागातील ज्या तलावातील पाणी पुढील हंगामासाठी काही प्रमाणात राकून ठेवण्यात येते त्यातील सर्व पाणी येत्या रब्बी हंगामातील अन्नदान्य पिकांसाठी यावर्षी वापरता येईल. सोलापूर जिल्ह्यातील तलावातील पाणी मात्र १८ महिने पुरेल या बेताने वापरावे लागेल.

११) तलावातील पाणी आटू लगल्यानंतर उघडी होणाीर गाळ जमीन रब्बी हंगामातील लागवडीसाठी शेतकऱ्यांना ताबडतोब खंडाने देण्यात येईल.

१२) वर्धा जिल्ह्यातील नदिवरील धारणाचे काम पूर्ण नसल्याने त्यातील पाणी उपसा सिंचन पद्धतीने कालव्यात सोडण्यात येईल हे पाणी आडवून शेतकऱ्यांना पिकासाठी वापरता येईल.

**● संकरित पिकांना प्रोत्साहन :**

महाराष्ट्रीील शेतकऱ्यांनी संकरित पिकांच्या जातीचा अवलंब करून धान्य उत्पादन वाढवावे अशी नाईक साहेबांची धारणा होती. त्यासाठी गुजरातमधील 'एच फोर' ही कापसाची जात फलदायी होती तर सी.टी. पटेल

हे त्या संकरित कापसाच्या जातीचे जनक होते. म्हणून वसंतराव नाईकांनी पटेलांना बोलावून घेऊन नव्या जातीची माहिती त्यांच्याकडून स्वत: समजावून घेवून स्वत:च्या शेतात त्याची लागवड केली. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील कृषीतज्ञ डॉ. गोपाळकृष्ण यांच्या मदतीने एच. फोर कापूस प्रसारात आणला. शिवाय स्वत:च्याच शेतात सुवर्णा ही हायब्रीड ज्वारी उत्पादित करण्याचा प्रयत्न केला पण तो अपयशी ठरला याचाही अर्त असा की कोणताही प्रयोग ते स्वत:च्या शेतावर करत असत हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते. पुढे महाराष्ट्र शासनाने १९६६ पासून संकरीत पिकांची लागवड करण्यास मोठ्या प्रमाणात चालना दिली.

**● कापूस एकाधिकार योजना :**

महाराष्ट्र सरकारने १९७२ पासून वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली उचललेले एक क्रांतीकारक पाऊल म्हणजेच कापूस एकाधिकार योजना होय. कापूस उत्पादन करणारा शेतकरी हाच महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधार आहे याची नाईक साहेबांना जाणीव होती. कापूस हे पैसा देणारे पिक असल्यामुळे शेतकरी वर्षाची आर्थिक तरतूद याच पिकाच्या भरवश्यावर करीत असे. पूर्वी शेतकऱ्यांचा कापूस आडतवाले व दलाल यांच्याकडून खरेदी केली जात असे. त्यामुळे आडत्यांसमोर (दलाल) शेतकऱ्यांना लाचार व्हावे लागत होते. शिवाय ते शेतकऱ्यांच्या अडचणीचा फायदा घेवून अतिशय कमी दराने कापूस खरेदी करत असत. म्हरजेच कापसाचे उत्पादन चांगले आले की, हमकास भाव पडत असत. या जाचातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठीच त्याीं कापूस एकाधिकार योजना १९७१ साली सुरू केली.या योजनेनुसार कापसाचे हमीभाव ठरवून देण्यात आले. शिवाय कापूस खरेदीवर लाभांश दिला त्यामुळे शेतकऱ्यांना कापूस पिकांचे चांगले पैसे मिळू लगाले. हे भाव ठरविताना लागवडीचा खर्च बाजाराचा कल, भारत सरकारने निश्चित केलेले भाव किंवा दर लक्षात घेूवनच भाव निश्चित केले या महत्त्वाच्या निर्णयामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची आडत व कचाट्यातून सुटका होवू शकली.

**● फलोत्पादनास प्रोत्साहन :**

वसंतराव नाईक यांनी फलोत्पादनास नेहमीच प्रोत्साहन दिले. त्यांच्या या भूमिकेमुळेच मानसिक भागाबरोबरच पश्चिम विदर्भातही द्राक्ष उत्पादन मोठ्या प्रमाणात घेवू लागले. पुसदसारख्या विविध भागात शेतकऱ्यांनी द्राक्षांच्या बागा फुलविल्या. याकामी कृषी विद्यापीठाचे कुलगुरु व ख्यातनाम द्राक्षतज्ञ डॉ. गोपाळकृष्णन यांचे नाईकासाहेबांनी सहकार्य व मार्गदर्शन गेतले. विविध जातीच्या द्राक्ष उत्पादनावर विशेष भर दिला. परिणामता शेतकऱ्यांना द्राक्ष उत्पादनातून बऱ्यापैकी पैसा मिळू लागल्याने फयदाच झाला. ओलिताखाली किंवा लगवडीखाली शेती आल्याने व दुबार पिके घेतल्याने शेतकऱ्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने समृद्धी आली.

**● रोजगार हमी योजना :**

वसंतराव नाईक यांच्याच कालावधीत महाराष्ट्रातील लहान जमीनदार, शेतकरी, गरीब कष्टकरी, शेतमजूर यांच्यासाठी सुरू करण्यात आलेली अत्यंत महत्त्वाची योजना म्हणजेच रोजगार हमी योजना होय. १९६९ मध्ये सरकारने सुरू केलेल्या या योजनेची संकल्पना श्री. वि. स. पागे यांनी मांडली. त्यावेळी ते विधानपरिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी ही योजना मांडल्यामुळेच या योजनेला पागे योजना याही नावानी ओळखले जाते. नाईक साहेबांनीच

वि. स. पागे व रा. सु. गवई यांच्यासारख्या अभ्यसू कार्यकर्त्यांना या योजनेचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी दिली होती. त्यांनीही अतिशय अभ्यासपूर्वक आराखडा तयार करून ही योजना मांडली. दुष्काळजन्म परिस्थितीत शेतकरी, कष्टकरी, मजूर व सामान्य जनतेला वाऱ्यावर न सोडता त्याला रोजगार मिळवून देणे या तत्त्वावर ही योजना आधारलेली होती. ही योजना महाराष्ट्रात प्रथम सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील १० ते ११ खेड्यांमध्ये प्रायोगीक तत्त्वावर कार्यानन्वीत करण्यात आली. या रोजगार हमी योजना महाराष्ट्राच्या वाटचालीतून जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असून तीची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती. १) मागेल त्याला काम, २) सर्व धडधाकट स्त्री पुरुषांना उपयुक्त कामधंदे मिळवून देणे, ३) जनतेमधील दारिद्र्याचे निर्मूलन करणे, ४) छोट्या शेतकरी कुटुंबामध्ये मोठ्या शेतकऱ्यांशी स्पर्धा करण्याची आर्थिक क्षमता निर्माण करणे.

या योजनेमुळे हजारो लोकांना कठिण परिस्थितीत हाताला काम मिळाल्यामुळे विशेषत: दुष्काळी भागातील जनतेसाठी वरदान ठरली. जमीन सपाटीकरण, रस्त्याची निर्मिती, पाझर तलाव बांधणे, विहीर खुदार्स यासारखी विविध कामे या योजनेतून मोठ्या प्रमाणात झाली १९७४-७५ या आर्थिक वर्षात शासनाने या योजनेवर १७० कोटी रुपये खर्च केले होते. महाराष्ट्रात सुरू करण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेचा आराखडा जसाच्या तसा केंद्र सरकारने पुढील काळात देशपातळीवर लागू केला हे या योजनेचे यशच म्हणावे लागेल.

● **कृषी विद्यापीठाची स्थापना :**

मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे कृषीक्षेत्रातील सर्वात भरीव योगदान म्हणजे त्यांनी केलेली कृषीविद्यापीठाची निर्मिती होय. कृषी विद्यापीठे ही त्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोणाचा कळस होती. कोठारी आयोगाला शेती सुधारणेच्या कार्यक्रमाला आक्रमण देण्याची शिफारस करत असताना प्रत्येक राज्यात एखादे कृषी विद्यापीठ असावे असे सुचविले हाते. नाईकसाहेबांनी या विषयाचा बारकाईने अभ्यास केल्यावर कृषी विद्यापीठाचे महत्त्व यांच्या लक्षात आले. एवढेच नव्हे तर कृषी क्षेत्रातील विविध प्रश्नांवर अभ्यास व संशोधन व्हावे म्हणून त्यांनी कृषी संचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समितीही स्थापन केली. परिणामी पुढे महाराष्ट्र शासनाने राज्यासाठी एक कृषी विद्यापीठ नगर जिल्ह्यातील राहुरी येथे २५ मार्च १९६८ मध्ये स्थापन करण्यात आले. पुढे त्यांनीइतर ठिकाणीही अशी विद्यापीठे स्थापन करून कृषीक्षेत्राच्या विकासाला गतीदेऱ्याचे ठरविले असल्याने फक्त राहुरी येथेच नव्हे तर मराठवाडा, विदर्भ आणि कोकण या विभागासाठीही स्वतंत्र कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आले. त्यानुसार अकोला येथे पंजाबराव कृषी विद्यापीठ स्थापन करण्यात आले. तर पुढील काळात पुणे, दापोली येथेही कृषी विद्यापीठाची स्थापना केली. कृषीक्षेत्रामध्ये संशोधन, अध्यापन व कृषीसेवा या त्रिसुत्रीतूनच पहिले कृषी विद्यापीठाची स्थापना झाल्याचे दिसून येते. या विद्यापीठांनी पुढील काळात कृषीक्षेत्राच्या विकासामध्ये अतिशय मोलाची भूमिका बजावलेली आहे.

शेती व्यवसायाला पूरक व्यवसायांची जोड दिल्याशिवाय महाराष्ट्राचा शेतकरी प्रगीपथावर जाणार नाही म्हणून त्यांनी शेतक्रांती घडवून आणली. महाराष्ट्रातील अपेक्षित दुधाची गरज भागवण्याच्या व उत्पादन वाढविण्यासाठी संकरित कार्याचा उपक्रम - दुधाची समस्या सुटली पाहिजे, शेतकऱ्यांना अधिकचे पैसे मिळाले पाहिजेत व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे हा यांचा प्रमुख दृष्टीकोण होता. म्हणूनच त्यांनी अतिशय

खंबीरपणे संकरित गायीची संकल्पना राबविली होती. पशुसंवर्धन व विकास क्षेत्र यामध्ये प्रगत तंत्रज्ञनाचा वापर करण्यावर अधिकचा भर दिला. व्यवस्थापनाचे तंत्र अंगी बाळगून गायींचा सांभाळ करावा आणि गायींना सकस आहार देवून दुध उत्पादनात वाढ करावी यावर त्यांचा सदैव कटाक्ष राहिला. त्यांच्या या प्रयत्नामुळेच महाराष्ट्रात श्वेत किंवा धवलक्रांती घडून आल्याचे आपणास पहावयास मिळते. वरील कार्याबरोबरच वसंतराव नाईक साहेबांनी गरीबी हटाव योजना कमाल जमीन धारणा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, दारू धोरणातील व्यवहार्यता, साखर कारखान्यांना दारू गाळपाची परवानगी आणि लॉटरी सुरू करण्याचा निर्णय यासारख्या महत्त्वाच्या निर्णयामध्ये ठाम भूमीका घेवून कृषी क्षेत्राच्या विकासाला पुरक असणारी भूमिका शेवटपर्यंत घेतलेली दिसून येते.

सलग बारा वर्षे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविणारे वसंतराव नाईक हे या राज्याच्या इतर मुख्यमंत्र्यांच्या तुलनेत सर्वाधिक कारकिर्द लाभलेले एकमेव मुख्यमंत्री होते. आपल्या कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलून टाकला. समाजाचे उदर भरण करणाऱ्या शेतकऱ्यांचाही सन्मान राखला जावा म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना सन्मान करण्याची योजना राबविली. शेती विकासाच्या अनुषंगाने विविध उपाय योजना प्रत्यक्षात आणून त्यांनी कृषीक्षेत्रातील विकासाची एक क्रांतीच घडवून आणली. ज्याच्यावर कृषीक्षेत्राचा विकास अवलंबून आहे. अशा कृषी विद्यापीठांची स्थापना करण्याचा इतिहास त्यांच्याच नावावर राहिलेला आहे. त्यांनी कृषीक्षेत्रात दिलेल्या अमुल्य योगदानामुळेच त्यांना महाराष्ट्र राज्याच्या हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून ओळखले जाते.

- **स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) ............... यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर सर्वात जास्त काम पाहिले.

अ) यशवंतराव चव्हाण ब) शंकरराव चव्हाण क) वसंतराव नाईक क)विलासराव देशमुख

२) ............ रोजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा मृत्यू झाला.

अ) १९६९ ब) १९७९ क) १९८९ ड) १९९९

३) ............... यांना महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे प्रणेते म्हणून ओळखले जाते.

अ) विलासराव देशमुख ब) विलसा चव्हाण क) देवेंद्र फडणवीस ड) वसंतराव नाईक

४) वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्र राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविण्यासाठी ............ कलमी योजना आणली.

अ) दहा ब) आकरा क) बारा ड) तेरा

५) महाराष्ट्रातील पहिले कृषी विद्यापीठ १९६८ मध्ये .............. येथे स्थापन करण्यात आले.

अ) पुणे ब) नाशिक क) दापोली ड) राहुरी

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून किती वर्षे काम पाहिले.

२) महाराष्ट्रामध्ये रोजगार हमी योजना कोणी सुरू केली.

३) महाराष्ट्र शासनाने कोणत्या वर्षी कापूस एकाधिकारशाही योजना मानली

४) कोणत्या मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाची स्थापना झाल्या.

५) कोणत्या वर्षी महाराष्ट्रात रोजगार हमी योजना लागू करण्यात आली.

**२.२.२ उद्योग – साखर उद्योग (प्रवरा) व दुध डेअरी (आरे, मुंबई)**

(Inddustry - Sugar (Pravara) and Milk (Aareya Dairy Mumbai) :

औद्योगिक महाराष्ट्र हे भारतातील महत्त्वाचे व प्रमुख राज्य म्हणून ओळखले जाते. किंबहूना महाराष्ट्राच्याच राजधाणीने म्हणजेच मुंबईला देशाची आर्थिक (औद्योगिक) राजधानी म्हणूनही ओळखले जाते. महाराष्ट्र राज्यात पारंपारीक उद्योगाबरोबरच विकसीत उद्योगांचाही झपाट्याने विकास झालेला आहे. यामध्ये साखर आणि पशुधनाच्या उद्योगांचा बाच मोठा वाटा राहिला आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरे औद्योगिकीकरणासाठी प्रसिद्ध असून ती राज्याच्याच नव्हे तर देशाच्याही औद्योगिक विकासात महत्त्वाचा वाटा उचलित आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास साखर उद्योग विशेष संदर्भाने प्रवरा सहकारी साखर कारखाना प्रवरानगर व दूध उद्योग (व्यवसाय) विशेष संदर्भाने आरे दूध डेअरी मुंबई या घटकांचा अभ्यास कावयाचा आहे.

**अ) प्रवरा सहकारी साखर कारखाना :**

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत प्रवरा सहकारी कारखान्याने विकासाचे नवे दालन खुले केले. याच कारखान्याने महाराष्ट्रात साखर कारखान्यांच्या स्थापनेची मुहूर्त मेढ रोवली. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या साखर कारखान्यांच्या परंपरेत प्रवरा साखर कारखान्यास मानाचे स्थान द्यावे लागते. साखर कारखान्यांची परंपरा ब्रिटीशांनी १९१९ च्या दरम्यान अहमदनगर जिल्ह्यामध्ये प्राथमिक आवस्थेत सुरू केली होती. तर सहकारी तत्वावरील साखर कारखान्यांची संकल्पना प्रथम श्री. हिरेमठ व श्री. सहस्त्रबुद्धे यांनी मांडली. पण खऱ्याअर्थाने ही सहकारी साखर कारखान्याची संकल्पना प्रत्यक्ष अंमलात आणण्याचा यशस्वी प्रयत्न विठ्ठलराव विखे पाटीलयांनी केल्याचे दिसून येते.

**● विठ्ठलराव विखे पाटील यांची पार्श्वभूमी :**

महाराष्ट्राच्या सहकारी साखर कारखान्याचे आद्य प्रवर्तक, सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर झटणारे व सहकारातून समृद्धीकडे हा शाश्वत राजमार्ग दाखवणाऱ्या विठ्ठलराव विखे पाटील यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील लोणी गावातील एका शेतकरी कुटुंबात झाला. समाजातील श्रीमंत वर्गाकडून शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक लक्षात घेवून त्यांनी आपल्या गावात सहकारी पतपेढीची स्थापना करून सामाजिक कार्याची सुरूवात केली. पुढे तर त्यांनी नगर जिल्ह्यामध्ये सहकारी संस्थांचे जाळेच निर्माण केले. खेड्यातील गोरगरीब

व भटके जीवन जगणाऱ्यांना एकत्र 'मजूर सहकारी सोसायटीची स्थापना केली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील व गाडगे महाराज यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी ब्रिटीशांच्या तुकडेजोड व तुकडेबंदीच्या धोरणाला प्रखर विरोध करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली शेतकऱ्यांच्यालढ्याचे नेतृत्व केले. सहकारमहर्षी विठ्ठलराव विखे-पाटीलयांनीच महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना १९५० रोजी अहमदनगर जिल्ह्यातील लोणी या ठिकाणी प्रवरा सहकारी सारखर कारखाना नावाने सुरू केला. त्यानंतर दुसरा सहकारी साखर कारखाना सांगली येथे पद्मभूषर वसंतदादा पाटील यांनी शेतकरी सहकारी साखर कारखानानावाने सुरू करून महाराष्ट्रातील साखर उद्योगाला प्रोत्साहन दिले. विके पाटलांना कारखाना चालवता येणार नाही व कारखान्याला ऊस सुद्धा मिळणार नाही यासारखी बोचरी टिका त्यांना सहन करावी लागली. तरी त्यांनी खंबीरपणाने आपल्या कामावर लक्ष केंद्रीत करून साखर कारखान्याबरोबरच गोरगरीब, शेतकरी, मजूर व कष्टकरी सामान्य जनतेच्या उन्नतीसाठी इतरअनेक संस्थांची उभारणी करून त्या उत्तमपणे चालवून एक सहकारातील आदश निर्माण केला. एकूणच विखे पाटलांच्या रूपाने भारतात पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याचा मान महाराष्ट्रालामिळाला.

त्यांनी शेतकऱ्यांना बचतीचे महत्त्व पटवून देवन अल्प बचतीची योजना यशस्वीरित्या राबविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्याबद्दल १९६५ मध्ये भारताचे तत्कालीन अर्थमंत्री कृष्णम्माचारी यीं त्यांचा खास मानपत्र देवून गौरव केला. सावकारांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिळवणूकी विरोधात सुरू झालेल्या सावकार मुक्ती अभियानामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेवून आवेषपूर्ण भाषणे देवून अभियानाला गती दिली. अतिशय अल्प शिक्षण असणाऱ्या या माणसाने १९४१ मध्ये गावात छोटसं वाचनालय सुरू केले. तर १९४२ मध्ये कापड व किराणा मालाचे दूकान सुरू करून गोरगरीब जनतेची गरज भागवली. एवढेच नव्हे तर १९४३ मध्ये सोसायटीच्या वतीने शेतीची औजारे तयार करणचे वर्कशॉप काढल्याने शेतकऱ्यांना लागणारी छोटी-मोठी अवजारे सहजगत्या मिळू लागली. प्रवरा शिक्षणोत्तेजक सहकारी पतपेढीचे संस्थापक अध्यक्ष, साखर कामगार हॉस्पीटलचे अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक व अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे संचालक व उपाध्यक्ष, प्रवरा मेडीकल ट्रस्टचे अध्यक्ष यासारख्या विविध महत्त्वाच्या पदावर त्यांनी काम केले. त्यांच्या विविध क्षेत्रातील वैविध्यपूर्ण कार्यामुळेच भारत सरकारने १९६१ मध्ये पद्मश्री हा किताम देवून गौरव केला. पुणे विद्यापीठाने डी.लिट व राहूली येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स या पदव्या प्रदान करून त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

**● प्रवरा सहकारी साखर कारखाना :**

सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी प्रमुख मार्ग म्हणजे सहकारी तत्वावर केलेले प्रयत्न होय. असा विखे पाटलांचा विश्वास होता. सावकारांच्या पळवणूकीला बळी पडलेल्या शेतकऱ्यांच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी एखादा शेतकऱ्यांच्या मालकीचा सहकारी तत्वावरील साखर कारखाना असायला हवा असे विखे पाटील यांना मनोमन वाटत होते. त्याचाच एक भाग म्हणून प्रसिद्ध शास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली १९४५ मध्ये श्रीरामपूर येथे संपन्न झालेल्या शेतकऱ्यांच्या बागायतदार परिषदेमध्ये त्यांनी सर्वांनी

एकत्र येवून सहकारी साखर कारखाना काढण्याचा ठराव मांडला. दारिद्र्यामुळे जगण्याचाच आत्मविश्वास गमावलेल्या शेतकऱ्यांना या कामी राजी करणे मोठे आव्हान असले तरी विखे पाटलांनी ते लिलया पेलले. शेवटी परिषदेचे अध्यक्ष धनंजय गाडगीळ व उपस्थित शेतकऱ्यांनी कारखान्याचे मुख्य प्रवर्तक म्हणून विखे पाटील यांच्यावर विश्वासाने जबाबदारी टाकली. १९४५ ते ५० या पाच वर्षांच्या कालखंडात त्यांनी अतोनात कष्ट घेवून, गावोगावी भेटी देवून, शेतकऱ्यांमध्ये जनजागृती निर्माण करून भागभांडवल उभे केले. एवढेच नव्हे तर आपला हा कारखाना उभा करू शकतो असा आत्मविश्वासही त्यांच्यात निर्माण केला. परिणामी विखे पाटीलांच्या प्रयत्नावर सामान्य शेतकऱ्यांनी विश्वास ठेवून आपापल्या कुवतीप्रमाणे दगदगीने विकूश व गहान ठेवून कारखान्याचे शेअर्स खेदी केले. विखे पाटीलयांचे मोठे पण असे की कारखान्याच्या उभारणीसाठी केलेल्या प्रदिर्घ भटकंतीसाठी त्यांनी शेतकऱ्यांचा एकही पैसा खर्च केला नाही. साखर कारखाना काढण्याची त्यांची संकल्पना काहीजनांनी हस्यास्पद ठरविली असली तरी त्यांनी अतिशय खडतर प्रवास करून जिद्दीने व चिकाटीने कारखान्याची मान्यता मिळविली आणि ३१ डिसेंबर १९५० रोजी प्रवरानगर येथे 'प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्यारूपाने शेतकऱ्यांच्या पहिल्या सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. त्यावेळी मुंबई इलाक्याचे उद्योग व मजूर मंत्री असणारे ना. मालोजीराजे निंबाळकर यांच्या हस्ते १७ जून १९५० रोजी अशिया खंडातील या पहिल्याच सहाकारी साखर कारखान्याचा कोनशिला समारंभ संपन्न झाला.

विठ्ठलराव विखे पाटील यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांना विश्वासात घेवून दी बागायतदार को-ऑपरेटिव्ह शुगर प्रोड्युसर सोसायटी लोणी. या देशातील पहिल्या शेतकरी सोसायटीची स्थापना केली. त्यानंतर बागायतदार साखर उत्पादक सहाकरी संघाची पहिली सर्वसाधारण सभा माहुली मंदिराच्या पटांगणात उत्साहाने पार पडली. या सभेचा मुख्य विषय अध्यक्ष, उपाध्यक्ष, डायरेक्टर्स, मॅनेजींग डायरेक्टर, आणि इतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करणे हा होता. पुण्याचे उपनिबंधक श्री. बी.ए. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सभेत कारखान्याचे पहिले संचालक मंडळ तयार करण्यात आले ते पुढीलप्रमाणे होते -

१) अध्यक्ष - मा. धनंजयराव गाडगीळ

२) उपाध्यक्ष - श्री. विठ्ठलराव विखे-पाटील

३) संचालक - डॉ. आ. जी. काकडे

४) संचालक - श्री. गोपाजी गोलप

५) संचालक - श्री. जगन्नाथराव थेटे

६) संचालक - श्री. जे. एल. मेहता

७) संचालक - कॅप्टर श्री. हंबीराव मोहिते

८) संचालक - श्री. व्ही. पी. वर्दे

९) संचालक - श्री. शंकरराव धुमाण्व

१०) संचालक - श्री. गणपतराव औताडे

११) संचालक – श्री.मुरलीधर कडू-पाटील

१२) संचालक – श्री. यशवंतराव टेकावडे

१३) मॅनेजिंग डायरेक्टर – श्री. आर. जी. सुळे

१४) जनरल सेक्रेटरी श्री. एस.टी. तांबेकर

१५) चिफ इजिनिअर – श्री. एन. सी. डे

१९५० मध्येच कारखानयचे गाळप सुरू होऊन अध्यक्ष धनंजय गाडगीळ यांनी १९५१ या सरत्या वर्षात ७६५ एकरातील सुमारे ३२,४८० टन ऊसाचे गाळप झाल्याचे वार्षिक अहवालात नमूद केलेले आहे. प्रारंभीच्या काळात ऊस उत्पादनाची सरासरी ४२.५ टन एवढी होती. तर ३७.५०१ मोती साखरेचे उत्पादन करण्यात आले. या साखरेचा सरासरी उतारा ११.५० झाला होता. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एक टनाला ३.४५ एवढा दर देवून वरती टनाा २.५ चा बोनस वाटण्यात आला होता. यावरून कारखाना उत्तमरित्या चालू झाला होता हे स्पष्ट होते. कारखान्याचे उद्घाटन पंडीत नेहरूंच्या हस्ते व्हवे असे विखे पाटीलयांना मनोमन वाटत होते. दरम्यान १९६०-६१ हे कारखान्याच्या दशकपूर्तीचे वर्ष म्हणून वर्ष म्हणून साजरे केले जाणार होते. याचेच औचित्य साधन पंडीत नेहरू यांनी प्रवरानगर येथेयेवून कारखान्याचे औपचारिक उद्घाटन केले. यावेळी धनंजयराव गाडगीळ यांनी अध्यक्षपदावरून निवृत्ती पत्करल्यामुळे १९६० पासून विठ्ठलराव विखे पाटील हे कारखान्याचे अध्यक्षपदावर कार्यरत होते.

कारखान्यातील प्रशासकीय अनुषंगाने विचार करता कारखान्याच्या एकूण कामगारावर राज्याचे महाव्यवस्थापक, अतिरिक्त महाप्रबंधक यांचे नियंत्रण असते तर त्यांच्या मदतीला वित्त व्यवस्थापक, डिस्टीलरी व्यवस्थापक, विपणन व्यवस्थापक यासारखे अधिकारी असतात. तर प्रत्यक्ष कारखान्याचे प्रशासन जनरल बॉडिच्या मार्गदर्शनाखाली विविध उपसमित्यांची निर्मिती केलेली असते. त्यामध्ये मुख्यता कार्यकारी समिती, कृषी आणि विकास समिती, खरेदी व कर्मचारी समिती, साखर व उप-उत्पादन समिती, साखर विक्री समिती, नागरी बांधकाम आणि पाटबंधारे समिती यांचा सामवेश असतो.

● **प्रवरा कारखान्याच्या विविध विकास योजना :**

१९५० मध्ये स्थापन झालेल्या प्रवरा साखर कारखान्याने १९५१ च्या गळीत हंगामात ६,७२,६०७ मेट्रीक टन ऊसाचे गाळप करून ६९.५२५ मेट्रीक टन साखरेचे उत्पादन केले तर पुढे १९८१ मध्ये ७४,८२,५२० मेट्रीक टन ऊसाचे गाळप करून ८२,५७५ मेट्रीक टन सखरेचे उत्पादन केले होते. यावरून कारकान्याने उत्तरोत्तर केलेली प्रगती स्पष्ट होते. या प्रगतीबरोबरच प्रवरा कारखान्याने विविध विाकसाच्या योजना सुरू करून आदर्श घालून दिला आहे. विविध योजनांपैकी प्राथमिक स्वरूपात पुढील विकासयोजनांचा आढावा घेता येईल.

**१) ऊस संशोधन केंद्र :**

ऊस उत्पादनाबरोबरच साखर उत्पादनातही वाढ व्हावी, खतांचे योग्य व्यवस्थापन करून नवनवीन पद्धतीने

ऊसाचे उत्पादन घेता यावे आणि ऊसावर पडणाऱ्या विविध रोगांचे उच्चाटन करता यावे यासाठी ऊस संशोधन केंद्राची उभारणी केली गेली. या केंद्राद्वारे ऊसाच्या प्रजाती, रोप प्रजनन, खतांचा वापर इत्यादी गोष्टीवर संशोधन केले जाते.

**२) माती परिक्षण प्रयोगशाळा :**

कोणतेही उत्पादन घेण्यासाठी माती फार महत्त्वाची असते. शेतीमधील उत्पादन वाढीसाठी ही प्रयोगशाळा स्थापन करण्यात येवून कारखान्याच्या परिसरातील विविध मातीचे नमुने गोळा करून त्यांची प्रयोगशाळेत तपासणी करून तीच्या गरजेनुसार खतांचा वापर करण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले जाते.

**३) सिंचन प्रकल्प :**

योग्य पाणी पुरवठा होवून शेतीमधील उत्पादन वाढावे यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला. या योजनेअंतर्गत प्रवरा नदी व कालवा यांचा वापर करून ६५ पाझर तलाव, ३ बंदारे, ४५ पाणी उपसा योजना आणि ७४००० विहीरी यांची निर्मिती करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे या प्रकल्पातील पाणी पुरवठा शेतकऱ्यांना ५०% सवलतीच्या दराने केला जातो.

**४) प्रवरा सहकारी बँक :**

परीसातील शेतकरी, मजूर, व्यापारी, उद्योजक विद्यार्थी यासारख्या आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने १९७५ मध्ये प्रवरा सहकारी बँक लि.,ची स्थापना करण्यात आली. या बँकेद्वारे अल्प व्याजदराने शेती विकास, उद्योग, वाहन खरेदी व स्वयंरोजगारासाठी कर्ज दिले जाते.

**५) प्रवरा सरला हॉस्पीटल :**

ग्रामीण भागातील लोकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कारखान्याच्या वतीने प्रवरा सरला हॉस्पिटल व रिसर्च सेंटर स्थापन करण्यात आले. ८०० खाटांचे मल्टीसोसायटी हॉस्पीटलच्या माध्यमातून रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात.

**६) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था :**

शिक्षणाशिवाय बहुजन समाजाचा विकास होणार नाही हे ओळखणाऱ्या विठ्ठलराव विखे पाटील यांनी १९६४ मध्ये प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना करून सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. या संस्तेच्या माध्यमातून प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण देणाऱ्या विविध शाखा काढल्या. यामध्ये प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरा कन्या विद्यामंदिर, हायस्कूलस, पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड इंजिनिअरिंग, नर्सिंग स्कूल, मेडिकल कॉलेज, ललीत अकादमी यादींचा समावेश होतो.

**७) इतर उपाययोजना :**

वरील प्रमुख योजनांशिवाय विखे पाटील यांनी दूरदृष्टी ठेवून ग्रामीण गृहतारण संस्था स्थापन करून असंख्य

गरिबांचे घर बांधण्याचे स्वप्न पूर्ण करण्यास हातभार लावला. प्रवरा सहकारी दुग्ध व्यवसाय संस्थेची स्थापना करून शेतकऱ्यांच्या जीवनाला अधिक स्थिरता आणली. उच्च प्रतीच्या बि-बियाणांची पैदास करून शेतकऱ्यांना पुरवून भरघोस उत्पादनवाढीसाठी प्रयत्न केले. कर्जबाजारी शेतकऱ्यांचा विवाहावर होणारा खर्च टाळण्यासाठी सामुदायीक योजना सुरू करून नवदांपत्यांना संसारोपयोगी साहित्य भेट देवून त्यांच्या जीवनात आनंदचे क्षण आणण्याचा प्रयत्न केला. अनेक उपाययोजना कारखान्याच्या माध्यमातून सुरू करून विठ्ठलराव विखे पाटील यांनी सामाजिक कार्याचा एक आदर्शन घालून दिला.

**● प्रवरा सहकारी साखर कारखान्यामार्फत चालवले जाणारे उद्योग :**

प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने साखर उत्पादनाबरोबरच इतर काही पूरक उद्योगही सुरू केले. या उद्योगामधून विविध प्रकारची ३५ उत्पादने घेवून शेतकऱ्यांचा व रयतेचा अधिक फायदा होण्यासाठी विशेष प्रयत्न केले. कारखान्याद्वारे सुरू करण्यात आलेल्या इतर उद्योगांमध्ये पुढील उद्योगांचा समावेश होतो.

**१) मळीपासून अल्कोहोल निर्मिती उद्योग :**

या उद्योगाच्या माध्यमातून साखर निर्मितीच्या प्रक्रियेमधील टाकाऊ साहित्यामधून निर्माण करण्यात येणाऱ्या मळीपासन अल्कोहोलची निर्मिती केली जाते. या उद्योगामधून दर दिवसाला सरासरी ९०,००० लिटर्स अल्कोहोलची निर्मिती होते.

**२) अल्कोहोलपासून इथेनॉल निर्मिती उद्योग :**

या उप उद्योगाद्वारे अल्कोहोल पासून प्रतिदिनी सुमारे ५०००० लिटर्स इथेनॉलची निर्मिती केली जाते. शिवाय पेट्रोलियम उद्योगासाठी पूरक असणारे रंगहीन तेलही तयार केली जाते. शिवाय पेट्रोलियम उद्योगासाठी पुरक असणारे रंगहीन तेलही तयार केले जाते.

**३) मद्यनिर्मिती उद्योग :**

प्रवरा कारकान्याचा हा एक मुख्य उपउद्योग असून याद्वारे मद्यनिर्मिती केली जाते. याद्वारे रम या मद्याचे मुख्य उत्पादन होत असून त्याविाय व्हिस्की, ब्रॅन्डी या प्रकारची मद्य ही तयार केली जातात.

**४) कागद उद्योग :**

१९७४ मध्ये बगॅसपासून कागद निर्मितीच्या उद्योगाची सुरूवात करण्यात आली. बगॅसचा जास्तीत जास्त वापर कारखान्याच्या बॉयलरमध्ये इंधन म्हणून केला जातो. उरलेल्या बगॅसचा वापर कागद निर्मितीसाठी केला जातो. यामधून जाड पुठ्ठा व राफ्ट कागद याची निर्मिती होते.

**५) इतर उपउद्योग :**

वरील उद्योगाशिवाय प्रवरा कारखान्याच्या माध्यमातून कचऱ्यापासून बायोगॅस तयार करणे, बगॅसपासून विज निर्मिती व ॲसिटाल्डीहाईड रासायनिक प्लँट सारखे छोटे छोटे उपउद्योगही सुरू करण्यात आलेले आहेत.

● **प्रवरा सहकारी साकर कारखान्याचे योगदान :**

प्रवरा साखर कारखाना स्थापन होण्यापूर्वीही महाराष्ट्रात कारखाना स्थापन करण्याचा प्रयत्न झाला होता. जसे की, ब्रिटीशांनी पहिला प्रयत्न १९१९ मध्ये नगर जिल्ह्यीील हरेगांव येथे कारकाना स्तापन्याचा प्रयत्न केला. तर पुढे सहकारतज्ञ श्री. सहस्त्रबुद्धे जी. एन. व श्री. हिरेमठ आर. एन. यांनीही बारामती येथे सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याचा प्रयत्न केला. शिवाय दरम्यानच काही खाजगी कारखानेही निघाले पण पुढे ते टिकू शकले नाहीत. पण विठ्ठलराव विखे पाटील यांनी लोणी या ठिकाणी सुरू केलेला प्रवरा सहकारी साखर कारखाना महाराष्ट्राचाच नव्हे तर भारताच्या साकर कारखान्याचे स्फूर्तीस्थान ठरला. म्हणजे प्रवरा कारखान्यामध्ये भविष्यता साकर कारखान्यांचे नवे युग अवतरले असेच म्हणाले लागेल. या कारखान्याने विशाल दूरदृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून साखरेच्या उत्पादनाबरोबरच इतर अनेक उपउद्योगही सुरू केले. शिवाय कारखान्याच्या माध्यमातून सेवाभावी वृत्तीने समाजाच्या विकासाला उपयुक्त ठरणाऱ्या विविध लोकोपयोगी योजना सुरू करून एक आदर्श घालून दिला. हाच आदर्श समोर ठेवून स्थापन झालेल्या इतर कारखान्यांनीही वाटचा केल्यामुळे महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलण्यास मदत होवून सामान्य शेतकरी व कष्टकऱ्यांचे जीवनमान उंचावले. अनेकांच्या हाताला रोजगार मिळाल्याने त्यांच्या जीवनात आर्तिक स्थिरता आली.

कारखान्याच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजना हाती घेतलेल्या असतानाच व थोर शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नगर जिल्ह्यात हिंडणे-फिरणे होत असतानाच कर्मवीरांच्या हस्ते लोणी येथील महात्मा गांधी विद्यालयाचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. याचवेळी विठ्ठलराव विखे पाटलांनी कर्मवीरांच्या उपस्थितीमध्येच ऊसावरील 'शिक्षण फंड' नावाची योजना जाहीर केली. या योजनेनुसार कारखान्यात गाळपासाठी येणाऱ्या ऊसाच्या प्रत्येक टनावर चार आणे शिक्षण फंडासाठी बाजूला काढायचे आणि त्यातून बहुजन समाजासाठी शैक्षणिक उपक्रम राबवायचे होते. या कामी कर्मवीरांनीही विठ्ठलरावांचे कौतुक करून या कार्यास आशिर्वाद दिले. त्यामुळे पुढील काळात महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांती घेण्यास निश्चितच मदत झाली.

एकूणच सांधिक बळाच्या जोरावर विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारी तणावावरील प्रवरा कारखान्याच्या माध्यमातून उत्पादकांना मालकी हक्क मिळवून देताना सामान्य रयतेच्या सर्वांगीण हिताला प्राधान्य देवून गोरगरीबांच्या जीवनाला स्थीरता मिळवून देण्याचा महान आदर्श घालून दिला.

**ब) आरे दूध डेअरी मुंबई :**

दुग्ध व्यवसायाच्या विकासात महाराष्ट्राचे स्थान निश्चितच अव्वल दर्जाचे आहे. हा व्यवसाय शेतीचा जोडधंदा म्हणून केला जातो. ग्रामीण भागात उत्पादित केलेले दुध शहरी भागातील ग्राहकांना रास्त दराने पुरवण्यासाठी शासन कठिबद्ध आहे. यासाठी महाराष्ट्र राज्यात दुधाचे संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि पॅकेजींग करण्याकरीता सुविधा निर्माण केल्या गेल्या आहेत. ग्रामीण भागातील दुधाचे संकलन करून ते शहरी भागात आणण्यासाठी सहकारी संस्थांच्या माध्यमातून गावपातळीपासून शशसकीय दूध योजनेपर्यंत एक साखळी निर्माण करण्यात आली आहे. गावस्तरावर प्राथमिक सहकारी दूध संस्था, तालुका व जिल्हा स्तरावर दूध संघ व त्यांच्या मार्फत शासनाकडे दुध पुरवठा अशा प्रकारची ही साखळी होती. १९६० पर्यंत फक्त मुंबईसाठी असलेले

शासकीय दूध वितरण हळूहळू महाराष्ट्रातील अन्य शहरांमध्ये सुद्धा सुरू करण्यात आले. त्यामध्ये मुख्यता पुणे, नागपूर आणि नाशिक या शहरांचा समावेश होतो.

दुग्ध व्यवसायात महाराष्ट्र बराच प्रगतीपतावर आहे. कारण मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर यासारख्या एकूण ३६ ठिकाणी दुध योजना प्रभावीपणे राबवली जाते. त्यापैकी आठ ठिकाणी सहकारी तत्वावरील दुध योजना कार्यरत आहेत. राज्यात १२२ शीतकरण केंद्रे आहेत. दुधापासून दूध भुकटी, लोणी, चीज, तूप, तयार करून त्यांची विक्री केली जाते. मिरज, उदगिर, अकोला येते दुधाची भूकटी तयार करण्याचे कारकाने आहेत. दूध संकलन केंद्रातून ते गोळा करणे व त्यावर प्रक्रिया करून ते वितरीत केले जाते. दुधापासून बनविलेले दूध भूकटी, लोणी, तूप, जीज, पेढे, आईस्क्रिम व इतर वस्तुंची विक्री करणे असे कार्यक्रम या व्यवस्थापनाचे आहेत.

● **प्रशासकीय व्यवस्था :**

दूध प्रशासनाच्या अनुशंघाने विचार करता राज्याचा दुग्धव्यवसाय अधिक विकसीत करण्यासाठी एक प्रशासकीय संरचना उभारण्यासाठी शासनाचा स्वतंत्र दुग्धव्यवसाय विभाग १९५८ मध्ये स्थापन करण्यात आला. यामध्ये दुध आयुक्त हे या विभागाचे प्रमुख असून त्यांच्या मदतीसाठी पाच उपायुक्त नियुक्त केले जातात. पशासन विभागाकडे असणारे उपायुक्त प्रशासनाचे कामकाज पाहत असत. तर दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन व प्रमाण वाढवणेस मदत काम दुसऱ्या उपायुक्ताकडे होते. तिसरा उपायुक्त पदार्थाचे वितरण चौथा उपायुक्त अभियांत्रिकी व तांत्रिक जबाबदारी तर पाचवा सहाय्यक आयुक्त नेमला जात. तर त्याच्या मदतीसाठी कार्यासन अधिकारी, लेखाधिकारी, परिवहन अधिकारी, भू-सर्वेक्षण अधिकारी व दक्षता अदिकारी कार्यरत होते. तालुका व जिल्हा दूध संघ, सहकारी दूध संस्था यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी व मदत करण्यासाठी सहनिबधंक काम पाहत होते. आणि शेवटी इतर अधिकाऱ्यांना मदत व मार्गदर्शन करण्याचे काम उपनिबंधक करत असत. शिवाय ते थेट दुधउत्पादक व नागरिकांशी संपर्क ठेवून त्यांची कामे करतात.

● **दूध महापूर योजना :**

भाकडं जनावरांची संस्था कमी करून अधिक दूध देणाऱ्या जनावरांची पैदास करणे, दुधाचे उत्पादन वाढविणे, जनावरांना सकस आहार मिळवून देणे व दुध व्यवसायात गरीब शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे इत्यादी हेतू साध्य करण्यासाठी महाराष्ट्रात दूध महापूर योना राबविण्यात आली. ती पुढीलप्रमाणे -

**१) पहिली दुध महापूर योजना (१९७५ ते १९८१) :**

ही महापूर योजना वरील कालावधीत राबविण्यात आली. या योजनेंतर्गत कुर्ला दुग्धशाळा, कोल्हापूर आणिजळगांव येथे संघामार्फत चालविण्यात येणाऱ्या दुग्धशाळांची उभारणी करण्यात आली.

**२) दुसरी दुध महापूर योजना (१९८१ ते १९८७) :**

या योजनेनुसार जळगांव, कोल्हापूर, सोलापूर, पुणे आणि अकलूज येथे दुध शितकरण केंद्राची उभारणी करण्यात आली. शिवाय इतर दुग्ध शाळांचे विस्तारीकरणही करण्यात आले.

**३) तिसरी दूध महापूर योजना (१९८७ ते ९२)**

ही योजना वरील कालवाधीत राबविण्यात आली असून या योजने अंतर्गत गुंतवूकीवर जास्त भर देवून सर्व जिल्ह्यांमध्ये राबवली गेली. शिवाय यो योजनेनुसारच २३ करोड रुपयांची गुंतवणूक करण्यात आली.

थोडक्यात महाराष्ट्राच्या दुध क्रांतीसाठी या दूध महापूर योजनेचा मोठा वाटा राहिला आहे. या योजनेअंतर्गत एकूण ८१ कोटीरुपयांची गुंतवणूक राज्यात करण्यात आली होती. तर अतिरिक्त दुध योजनेचा प्रश्न सोडविण्यासाठी १९८५ सालापूसन शाळेत पोषर आहार ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत ४,७७,२९७ विद्यार्थ्यांना ७१५९५ लिटर प्रतिदिन दुधाचा पुरवठा करण्यात आला. शिवाय या योजनेनुसार सुमारे १४ लाख शेतकऱ्यांना जोडधंदा मिळालेला असून १९८३ पर्यंत राज्यात बाहेरून दुध आणावे लागत होते पण त्यानंतर मात्र आपले राज्य बंगाल, आंद्र, मध्यप्रदेश, बहार, दिल्ली येथेही दुध पुरवठा करण्यात येऊ लागला.

**● आरे दुध डेअरीची स्थापना :**

आरे दुध डेअरी ही आरे कॉलनी किंवा आरे फॉरेस्ट या नावांनी ओळखली जाते. आरे हे मुंबई शहरातील गोरेगांव पूर्व येथे वसलेले उपनगर म्हणून ओळखले जाते. आरे दुध वसाहतीची स्थापना १९४९ मध्ये झाली. तर १९५१ मध्ये आरे कॉलनीतील दुध डेअरीचे उद्घाटन भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्ते करण्यात आले. म्हणजेच मुंबई शहरातील नागरिकांना निर्जंतूक केलेले दूध उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १९५१ मध्ये मुंबई येथे आरे ही आशियातील पहिली दुग्धशाखा उभारण्यात आली असून ती स्थापन करण्याचे उद्देश पुढीलप्रमाणे होते.

१) मुंबई शहरातील दुध उत्पादनाबाबत सुधारणा करणे.

२) दुध वसाहतीतील दुधावर प्रक्रिया करणे

३) दुग्धजन्य पदार्थांचे मार्केटींग करणे.

४) मुंबईतील नागरिकांची दुधाची गरज भागवणे.

आरे येथील उभारलेली दुग्धशाळा (डेअरी) ही आशिया खंडातील अशा प्रकारची पहिलीच दुग्धशाळा होती. ही दुग्धशाळा मुंबईतील पश्चिम उपनगरात दुध वितरीत करते. मुंबई येथील वरळी दुग्धशाखेची स्थापना १९६१ साली झाली. दुग्धशाळेची क्षमता ४.५ लाख लिटर प्रतिदिन दुध हाताळण्याची आहे. मसाला दुध, लस्सी, दही, यासारखे दुग्धजन्य पदार्थ या दुग्धशाळेत तयार केले जातात. दुग्धशाळेमार्फत मुंबईच्या मध्य व दक्षिण भागात दुध व दुग्धजन्य पदार्थांचे वितरण केले जाते. दुध महापूर योजनांतर्गत राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाने अधिक सहाय्य देवून विकास घडवून आणला. आरे ब्रॅन्ड अंतर्गत १९७९ पासून तुपाचे वितरण सुरू करण्यात आले. तर १९९६ पासून एगमार्क तुप भरण्यास सुरूवात झाली. एकूण २४० टन क्षमता असलेली तीन शीतगृह सफेदी लोणी साठविण्यासाठी उभारण्यात आली.

● **आरे दुध डेअरीचा विस्तार :**

आरे दुध कॉलनीचे एकूण ३१६६ एकर जमिनीचे क्षेत्र आहे. यामधील जनावरांच्या चाऱ्यासाठी व गवताच्या लागवडीसाठी ४०० एकर जमिनीचे क्षेत्र आहे. यामधील काही जमिन विविध संस्था व संघटनांना भाडेतत्वावर देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्य शासन यांच्याही विविध संस्थांचा समावेश आहे. जसे की केंद्र सरकारच्या संस्थांना २२९, महाराष्ट्र राज्याच्या शासकीय संस्थांना ७२९.१२, रस्ते व इमारतीखालील क्षेत्र ४६०, नाली, तलाव, शेतबंधारे, शेतरस्ते व नद्याखालील क्षेत्र नापीक जमीन इत्यादीसाठी १०२०, लॉन, बगीचा, पेरागवत, फळबाग यांचे क्षेत्र ५३७, एकरांमध्ये विभागलेले आहे.

या विभागामार्फत गरजेनुसार राज्यभरात ३८ दुग्धशाळा व ८१ शितकरण केंद्राची स्थापना करण्यात आली. परिणामी १९६० मध्ये राज्यातील प्रतिदिनी सरासरी दुध संकलन १ लाख लिटर्स इतके होते. ते सन १९१६ मध्ये ११४ लाख लिटर प्रतिदिनी इतके वाढलेले होते. १९६० पर्यंत फक्त मुंबईसाठी असलेले शासकीय दुध वितरण हळूहळू महाराष्ट्रातील अन्य शहरांमध्ये सुद्धा सुरू करण्यात आले.

● **जनावरांसाठी तबेला व्यवस्था :**

आरे कॉलनीमध्ये ५०० ते ५५० गुरे राहण्याची क्षमता असलेले ३० गोठ्यांची तबेले उभारणी केलेली आहेत. या गोठ्यांना लागुनच साह्यभूत ठरणाऱ्या इतर इमारती, शेड, यांचीही उभारणी केलेली आहे. त्यामध्ये गवत, गोडावून, चारा कापणीचे यंत्र, वासरांची सोय, गुराढोरांचे मालक व इतर कर्मचाऱ्यांची रहावयाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये खाजगी गुरेढोरे सांभाळणाऱ्या मालकांचाही समावेश आहे. हे मालक त्यांच्या कळपातील गुराढोरांची चांगल्याप्रकारे देखभाल करू शकतात. सध्या आरे कॉलनीमधील ३० युनीट किंवा गोठ्यामधील १६०७९ गुरे राहण्याची सोय उपलब्ध आहे. परवाना धारकांना आवश्यक परवाना शुल्क, पाणी व वीज शुल्क, व्यवसाय शुल्क व इतर साह्यकारी सुविधांसाठी शुल्क भरावे लागते.

● **पशुसंवर्धन योजना :**

या योजनेंतर्गत चार डेअरी फार्म युनिटमध्ये जवळपास ७०० देशी व संकरीत गायींचे पालन केले जाते. देशी कळपांचा वापर दुध उत्पादन वाढविणेसाठी व संकरित कालवडींची पैदास (क्रॉस ब्रीड) करण्यासाठी केला जातो. आणि क्रॉसच्या प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी संकरीत जातीच्या (क्रॉस) कळपांचा वापर केला जातो. ७.५% आणि ६.५% विदेश खतपातळी पर्यंत पैदास याचा अभ्यासातून शोध घेता येतो.  या अभ्यासाचा उपयोग महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या स्तरावर त्यांना साह्य देण्यासाठी, संकरित जनावरांच्या प्रजननासाठी, वंशवृद्धीसाठी, प्रजनन धोरणाविषयी सल्ला देण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच संकरित गुरांच्या कळपांच्या देखभालीसाठी व आर्थिक तुटीबाबतही मार्गदर्शन ठरतील. तसेच भविष्यातील नियोजनासाठीही हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरेल.

● **महसूलवाढीसाठीचे प्रयत्न :**

आरे दुध डेअरीच्या प्रशासनाने महसूल वाढविण्यासाठी आणि झालेली तुट भरून काढण्यासाठी २००१-०२ पासून पुढील उपाययोजना केल्या.

१) पवई, मालाड, बोरिवली, दिंडोरी, गोरेगांव, अंधेरी येथून दुध कॉलनी मुख्य रस्ता वापरणाऱ्या वाहनांचा टोल कर संकलन.

२) आरे कॉलनीमधील तळ्याचा वापर मौका विहारासाठी भाडेतत्त्वावर ठरवून देणे.

३) गवतचारा व पशुधखाद्य यांचा साठा करण्याकरीता वापरली जाणारी व सध्या उपयोगात न येणारी गोमामे, गोडावून यांचा वापर विविध पक्षांना सभा, मिटींग व इतर उपक्रमासाठी करून घेता येईल.

४) विविध पदार्थ व वस्तुंची विक्री करण्यासाठी विक्रेत्यांना स्टॉल्स, रेस्टॉरंट, जनरल स्टोअर्स भाडेतत्त्वावर देणे.

५) विविध झाडांपासून कृषी उत्पादने मिळवण्यासाठी (नारळ, आंबा) कंत्राटी पद्धतीचा वापर करणे.

६) विविध संसाधने व उपउत्पादने (पाणी, चारा, प्लॉट, गुरे ढोरे) भाडेकरार तत्त्वाचा आधारावर विकणे

मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे कॉलनी यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले अनेक कर्मचारी विविध उपक्रम राबवित आहेत. पुढे १९९१ मध्ये शासकीय दूध योजनांचे सहकारी दूध संघांना हस्तांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेनुसार दूध योजना बारामती, कोल्हापूर, संगमनेर, पंढरपूर यांचे हस्तांतरण करण्यात आले आहे. केंद्र शासनाने १९९२ साली दुधाचा व्यवसाय खाजगी उद्योग क्षेत्रास खुला केला. त्यामुळे शासन व सहकार क्षेत्राबरोबरच खाजगी व्यवसायीक दुधाच्या व्यवसायात उतरले. राज्यामध्ये अतरिक्त दुधाची समस्या उद्भवल्यानंतर शासनाने मुंबई व इतर शहरांमध्ये दुधाच्या विक्रीला सहकारी दूध संघांना परवानगी दिली. त्यामुळे गोकुळ, वारणा सारख्या दुधसंघांनी मुंबई शहरामध्ये दुध विक्री सुरूकेली. परिणामी बृहन्मुंबईच्या दुध योजनेचे मुंबई येथील वर्चस्व कमी होवू लागले. १९९५-९५ साली शासन आणि सहकार मिळून एकूण ३१-४० लाख लिटर प्रतिदिन दुधाचे संकलन केले होते. ते २००५-०६ साली ४०.०० लाख लिटर्स पर्यंत वाढले. शासनाचे दुध वितरण १९९५-९६ साली ८.५९ लाख प्रतिदिनी होते ते २००५-०६ साली ६.६८ लाख लिटर प्रतिदिन एवढे कमी झाले. पण दुसरीकडे सहकारी संघाचे दुध वितरण मात्र वाढत गेले.

● **स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) ............... रोजी प्रवरा सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली.

अ) १९५० ब) १९४० क) १९३० ड) १९२०

२) ............ रोजी प्रवरा सहकारी बँक लि, ची स्थापना झाली.

अ) १९३५ ब) १९५५ क) १९७५ ड) १९९५

३) विखे पाटील यांनी कारखान्याच्या माध्यमातून शिक्षणाच्या विकासासाठी ............... ही योजना

राबवण्यात आली.

अ) शिल्लक फंड ब) तुटीची फंड क) शिक्षण फंड ड) मद्यफंड

४) महाराष्ट्रात ............ या कालावधीत पहिला दुध महापूर योजना राबवण्यात आले.

अ) १९७५ ते ८१ ब) १९७५ ते ८१ क) १९८१ ते ८७ ड) १९८१-८७

५) .............. रोजी आरे येथील दुग्धशाखेची स्थापना झाली.

अ) १९५० ब) १९५१ क) १०५२ ड) १९५३

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) प्रवरा सहकारी साखर कारखान्याची स्थापना कोणी केली.

२) प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे पहिले अध्यक्ष कोण होते.

३) महाराष्ट्र शासनाचा दुग्धव्यवसाय विभाग केव्हा सुरू करण्यात आला.

४) महाराष्ट्रात दुध महापूर योजनेवर किती खर्च करण्यात आला.

५) केंद्र शासनाने कोणत्या साली दुधाचा व्यवसाय खाजगी उद्योग क्षेत्रात खुला केला.

## **२.३ नैसर्गिक आपत्ती (भूकंप-कोयना १९६७ व लातूर १९९३)** (Natural Disasters (Earth quakes - Koyna 1967 and Latur 1993) **:**

पूर्वीपासूनच पृथ्वीवरील जीवसृष्टीला नैसर्गिक आपत्तीचा तडाका असंख्य वेळेला बसलेला आहे. प्रगतलेल्या सिंधु संस्कृतीचाही ऱ्हास घेण्यामागे भूकंप हे एक कारण असल्याचे मानले जाते. अलिकडेच महाराष्ट्रात अतिवृष्टीच्या रूपाने मोठी नैसर्गिक आपत्ती आलेली आपण पाहिले. सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील मानवी जीवन किती अस्थीर, अशांत व भययुक्त झाले होते. झाले होते. याचा आपणास प्रत्यक्ष अनुभव घेता आला. या आपत्तीमुळे प्रचंड जीवीत व मालमत्तेची हानी झालेली आहे. म्हणजेच बहुतांशी सर्वच क्षेत्रावर नैसर्गिक आपत्तीचा कमी-अधिक प्रमाणात दूरगामी परिणाम होत असतो.

**● आपत्ती म्हणजे काय :**

आपत्तीला इंग्रजीमध्ये Disaster असे म्हणतात. तो Dis व Aster या दोन शब्दांपासून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ वाईट तारा किंवा गृह असाही होतो. पण याठिकाणी आपणा Disaster याचा अर्थ आपत्ती असाच घ्यावा लागेल. अचानक आलेले संकट, उत्पत्त, अथवा दुर्घटना की ज्यामुळे मोठ्या प्रमाणात हानी होते आणि अशा प्रकारच्या संकटाशी प्रतिकार करणे स्थानिक लोकांच्या आवाख्याबाहेरचे असते त्यास आपत्ती असे म्हणतात. संयुक्त राष्ट्राने केलेली आपत्तीची व्याख्या म्हणजे, ''अशी घटना की ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जीवीत हानी व इतर प्रकारची हाणी संभवते. त्यास आपत्ती असे म्हणतात.'' तर जगातील

आरोग्य संघटनेने (Who) केलेली आपत्तीची व्याख्या पुढीलप्रमाणे मानवास आलेल्या संकटाची त्यास कोणतीही पूर्वसूचना नसणे आपत्तीमुळे होणारी विध्वंसक परिस्थिती फारच भयानक स्वरूपाची असणे व त्यानुसार होणारी जीवीत व वित्त हानी सहजासहजी भरून न येणे, त्यालाच आपत्ती असे म्हणतात. थोडक्यात सहजासहजी आटोक्यात आणता न येवू शकणारे मानवी जीवनात आलेले अचानक संकट म्हणजेच आपत्ती होय. अशी सर्वसाधारण व्याख्या करता येवू शकते.

● **आपत्तीचे प्रकार :**

सर्वसाधारणपणे आपत्तीचे विविध प्रकार असतात. की, त्सुनामी, महापूर, जंगलात लागणारा वणवा, वादळ किंवा चक्रीवादळ, झंजावत, भूस्कलन म्हणजेच भूमीपात किंवा दरड कोसळणे, आकर्षण म्हणजेच कोरडा दुष्काळ, अतिवृष्टी, विविध रोगांसाठी, भूकंप, ज्वालामुखी यांचा नैसर्गिक आपत्तीमध्ये समावेश होतो. याशिवाय अलिकडे आपत्तीचे पुढील सात प्रकार पाडले जातात. १) पर्यावरणविषयक आपत्ती, २) भौगोलिक आपत्ती, ३) अतिरेकी व कलहामुळे उदभरलेली आपत्ती, ४) निष्काळजीपणामुळे निर्माण झालेली आपत्ती, ५) जैविक आपत्ती, ६) नैसर्गिक आपत्ती, ७) मानवनिर्मित आपत्ती. असे असले तरी सर्वसाधारणपणेआपत्तीचे मुख्य दोनच प्रकार सतात. ते म्हणजे १) नैसर्गिक आपत्ती आणि २) मानवनिर्मित आपत्ती. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास नैसर्गिक आपत्तीचा अभ्यास करावयाचा असून विशेष संदर्भ म्हणून भूकंप यावर अधिक भर द्यावयाचा आहे.

● **भूकंप** (Earth quakes) **:**

भूकंप ही एक नैसर्गिक (पर्यावरणीय) आपत्ती असून आज पृथ्वीच्या पाठीवर कुठे ना कुठे भूकंपाचे धक्के बसत असतात. गर्भगृहातून पृथ्वीच्या कवचाला धक्के बसल्याने भूकंप होत असतात. असे म्हणतात की दरवर्षी पृथ्वीवर सुमारे ३० हजार भूकंप होतात. पण यातील बरेच भूकंप सागर तळाशी व दुर्गम भागात होत असल्यामुळे त्याची दहकता लक्षात येत नाही. ''भूकंप म्हणजे पृथ्वीच्या कवचात कोणत्याही कारणाने क्षोभ निर्माण होऊन पृथ्वीच्या पृष्टभागाला अचानकपणे बसलेले धक्के होय.'' काहीच्या मतेभूकंप या शब्दापासून ध्वनीत होणाऱ्या अर्थामधून भूकवच हादरणे म्हणजे भूकंप होय. तर डब्ल्यू. जी. मुर यांच्या मते, ''नैसर्गिक कारणाने भूपृष्टाखाली निर्माण झालेल्या हालचालींमुळे भूपृष्ठाला जे हादरे बसतात त्यालाच भूकंप असे म्हणतात.

● **भूकंपाची कारणे :**

भूकंप होण्याची कारणे सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ॲरिस्टॉटल यांच्या मते भूकंपाच्या पोकळ्यांमधून त्यात कोंडलेले वायू.

२) भूपृष्टीय दृष्टीकोनातून विचार केल्यास भूपृष्ठावर असणाऱ्या मोठमोठ्या पर्वतरांगा झीज झाल्याने कोसळून खाली पडत असल्याने, काही पठारावर जोरदार भूस्खलन घडून आल्यानेतर काही भागात पावसाचे प्रमाण व दाब यात अचानक परिवर्तन घडून येते. शिवाय समुद्राजवळच्या प्रदेशात समुद्राच्या पाण्याच्यालाटांचा जोरदार आघात झाल्याने भूकंप घडून येत असतात.

३) पृथ्वीच्या खोल भागामध्ये होणाऱ्या भूकंपांना पातालीक भूकंप असे म्हणतात. अशा भूकंपाची तीव्रता भूपृष्ठापासून खाली सुमारे ३०० कि.मी. पेक्षा अधिक खोलीवर असते. खडकांमधील खनिज पदार्थांचे भूगर्भात असलेल्या रासायनिक द्रव्याने स्फटीकरण होत असल्याने भूकंप होतात.

४) अलिकडच्या काळातील सुधारणावादी धोरणांमुळे विविध माध्यमातून पाण्याचा साठपा करून ठेवला जातो. परिणामी पाण्याचा दाब किंवा जलाशयाचा भार वाढल्याने भूकवचामध्ये अस्थिरता निर्माण होऊन भूकंप होत असतात.

५) पृथ्वीवरील विविध बदलांमुळे भूगर्भावर ताण पडण्याची प्रक्रिया सुरू होते. त्यामुळे खडकांमध्ये गती निर्माण होते. त्यामधून अंतर्गत जी हालचाल सुरू होते त्यातूनच भूकंप होतात.

याशिवाय जेव्हा ज्वालामुकीचा उद्रेक होतो तेव्हा जमिनीला प्रचंड हादरे बसत असतात. म्हणजेच भूकवचाच्या कमकुवत भागातून जेव्हा ज्वालामुखी बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असतो तेव्हा जमिनीला हादरे बसून भूकंप होतो त्याला ज्वालामुखीय भूकंप असे म्हणतात. थोडक्यात भूगर्भात प्रचंड शक्ती निर्माण होवून भूपृष्टास जे हादरे बसतात त्या हादऱ्यांनाच आपण भूकंप असे म्हणतो. अलिकडे भूकंप होण्याचे प्रमाण वाढलेले असून प्रतिवर्षी सरासरी ८०० ते १००० इतक्या प्रमाणात भूकंप होत असतात.

● **भूकंपाची तिव्रता :**

भूकंपाचे स्थान व त्याची तीव्रता याबाबी भूकंपलेखाद्वारे निश्चित केल्या जातात. भूकंपमापकाद्वारे भूकंप तरंगाची भूमीवरील हालचाल शोधली जाते. भूकंपाच्या धक्यातून किती ऊर्जा बाहेर पडते त्यारवून भूकंपाची तीव्रता ठरविली जाते. भूवैज्ञानिक चार्लस रिस्टर यांनी १९३५ मध्ये भूकंपाची तीव्रता ठरविणारे मापक तयार केले. या मापन पद्धतीला रिस्टर प्रमाण किंवा स्केल म्हणून ओळखले जाते. या पद्धतीमध्ये भूकंपाची तीव्रता एक अंकाने वाढली तर भूकंपामुळे मुक्त झालेली ऊर्जा ३२ पट वाढली असे मानले जाते. जसे की रिस्टर प्रमाण ७ असलेला भूकंपामुळे रिस्टर प्रमाण ६ असलेल्या भूकंपाच्या तुलनेत ३२ पट अधिक ऊर्जा मुक्त होते. तीन किंवा त्याहून कमी रिस्टर प्रमाण असलेल्या भूकंपाची सहसा फार जाणीव होत नाही. भूकंपाचे सर्व धक्के भूकंप नोंद मापकावर नोंदवले जात असतात. ७ किंव अधिक रिस्टर प्रमाण असणाऱ्या भूकंपामुळे इमारती जमिनदोस्त किंवा उध्वस्त होऊ शकतात.

आजपर्यंत सर्वात मोठा भूकंप १९६० मध्ये चिली या देशात घडून आला आहे. त्याची तीव्रता ९.५ रिस्टर इतकी होती. तर २०११ मध्ये जपानमध्ये झालेल्या भूकंपाची तिव्रता ७.१ इतकी होती. महाराष्ट्राच्या लातूर जिल्ह्यात १९९३ मध्ये झालेल्या भूकंपाची तिव्रता ६.२ रिस्टर एवढी नोंदविली गेली असून त्यामध्ये सुमारे ९५०० जणांचा मृत्यू झालेला आहे. जगातील सुमारे ८०% भूकंप हे पॅसिफिक महासागराच्या पट्ट्यात होतात. अलिकडे भूकंप होण्यापूर्वी त्याचे पूर्वानुमान करण्यासाठीचे संशोधन चालू असून काही सौम्य स्वरूपाचे भूकंपाचे पुर्वानुमान निश्चित करण्यात भूवैज्ञानिकांना यश आले आहे. भूकंपाच्या आपत्तीचे व्यवस्थापन करता यावे म्हणून भूकंपाची पूर्वसुचना तात्काळ पोहचविण्यासाठीची संदेशवहन यंत्रणा कार्यक्षम असावी लागते. त्याच दृष्टीकोनातून

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रात कराड येथे असे भूकंप संशोधन केंद्र उभारण्यात आले आहे.

**अ) कोयना भूकंप – १९६७ :**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये कोयनेचा भूकंप ही एक मोठी नैसर्गिक आपत्ती मानवी लागते. ११ डिसेंबर १९६७ रोजी पहाटे ४ वाजता २१ मिनीटांनी महाराष्ट्रातील कोयना धरणाच्या परिसरात अनपेक्षितपणे भूकंपाचा धक्का बसून सारा महाराष्ट्र हादरून गेला. या भूकंपाचे केंद्र कोयना धरणाच्या दक्षिणेस ३ कि.मी. अंतरावर होते. यावेळी भूकंपाचे दोन धक्के बसले. पैकी एका धक्क्याचे केंद्र ७० ते ८० कि.मी. खोल अंतरावर होते तर दुसऱ्या धक्क्याचे केंद्र ७० ते ८० कि.मी. खोल अंतरावर होते. या भूकंपाची तीव्रता ७.५ रिस्टर स्केल इतकी होती. पण याच्या तीव्रतेबाबत तत्कालीन साधनांमध्ये वेगवेगळी आकडेवारी पहावयास मिळते. जसे की, काही वृत्तपत्रामधून ६.५ ते ७ रिस्टर्ड स्केल इतकी तीव्रता नोंदवलेली आहे. थोडक्यात ५० वर्षापूर्वी कोयनेला झालेल्या ७.५ इतक्या रिस्टर स्केलच्या झालेल्या भूकंपानंतर कोयना येथे अधिकृ भूकंपाची मापनयंत्रे बदलवली गेली आहेत.

कोयना धरण परिसरामध्ये आजपर्यंत सुमारे १ लाख २० हजार ९६० भूकंप झाल्याची नोंद झाली आहे. यामध्ये ३ रिस्टर स्केलपेक्षा कमी तीव्रतेचे १ लाख १९ हजार १९७. ३ ते ४ रिस्टर स्केलचे १६५८, ४ ते ५ रिस्टर स्केलचे ९६ तर ५ रिस्टर स्केल्या वरचे एकूण ९ भूकंप झालेले आहेत. यात ११ डिसेंबर १९६७ च्या विनाशकारी भूकंपासाठी समावेश आहे. तर गतवर्षी ३०४ भूकंपाची नोंद झालेली असून यात ३ रिस्टर स्केलपेक्षा कमी २९९ व ३ ते ४ रिस्टर स्केलच्या ५ भूकंपांचा समावेश होतो. यापैकी ७ भूकंप जानवले असलचीही माहिती मिळते. एवढेच नव्हे तर कोयना परिसरात अद्यापही भूकंपाची मालिका कमी अधिक प्रमाणात सुरूच असल्याचे पहावयास मिळते.

**● जिवीत व वित्तहानी :**

१९६७ मध्ये झालेल्या कोयना भूकंपाचे दुरगामी व विध्वंसक परिणाम मोठ्या प्रमाणावर झालेले आहेत. कोयना नदीवर कोयना धरण बांधले गेले आणि तेथील शिवसागर जलाशयात पाणी वाढल्यामुळे ७.५ रिस्टर स्केल इतक्या तीव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपाचा गडगडाट ध्वनी अणि हादरे जवळजवळ ४५ सेकंदापर्यंत जानवले असून १९० लोकांचा यात बळी गेला. हजारो लोक जखमी झाले. कायमचे जायबंदी झाले. तर हजारो जणांचे संसार अकसेर शहा उध्वस्त झाले. कोयना धरणास मात्र कोणताही गंभीर धोका पोहोचला नाही. धरणाच्या भिंतीवरचा निरिक्षण मनोरा पडला व कोयनानगर मधील कच्च्या बांधणीच्या बहुतांशी सर्व इमारती ढासळल्या गेल्या. नव्याने बसविण्यात आलेल्या साहतींची पूर्णपणे वाताहत झाली. या भूकंपाच्या माध्यमातून पहाटेच्या सुमारास लोक झोपेत असतानाच काळाने घाला घातला होता. त्यामुळे गाडल्या गेलेल्या व बळी पडलेल्या लोकांचे मृतदेह ढिगाऱ्याखाली शोधण्याची वेळ आली.

**● विकासावरील परिणाम :**

कोयना भूकंपामुळे पश्चिम महाराष्ट्रातील कायना परिसर व कोकणातील अनेक गावेच गावे उध्वस्त झाली.

या परिसात पडणाऱ्या वारंवार दुष्काळामुळे हा परिसर पडणाऱ्या वारंवार दुष्काळामुळे हा परिसर भूकंपप्रवण म्हणून घोषित करण्यात आला. त्यामुळे निश्चितपणे येथे औद्योगिक विकासाला व प्रगतीच्या वाटचालीस पायबंद बसला. शिवाय या भूकंपाने सातारा जिल्ह्यास एक नवी ओळख करुन दिली. या भूकंपाच्या पूर्वी कोयनेची ओळख ही देशभरातील पर्यटनाचे महत्त्वाचे ठिकाण व निसर्गाने समृद्ध असणारे ठिकाण अशीच होती. पण या विनाशकारी भूकंपाने एक प्रकारे कोयनेचे सर्वांगीण विकासाचे वैभव जणू हिरावूनच घेतले होते. भूकंपामुळे या परिसराचा चेहरा-मोहराच बदलून गेल्याने त्याच्या विकासावर मोठा परिणाम घडून आला.

भूकंप घडून गेल्यानंतरही वाताहत झालेल्या लोकांच्या मनात भितीचे वातावरण तसेच राहिले होते. अनेकांनी कोयनानगर कायमचे सोडण्याचा निर्णय घेतला. भूकंपग्रस्त परिसर असा बसलेला शिक्का कधीही पुसता आला नाही. कराड, चिपळून या परिसरात उद्योग उभे राहिले. शिक्षण संस्ता उभारल्या, पण कोयनानगरमध्ये मात्र भूकंपाच्या भितीने होती ती माणसेही राहिली नाहीत. थोडक्यता भूकंपाच्या या परिसराची पूरती वाताहत जाली होती.

**● भूकंपानंतरचे प्रयत्न :**

कोयना भूकंपाने तर धरणाच्या भितीला थोड्या प्रमाणात तडे गेले होते. त्यावर तातडीचा उपाय म्हणून ते भरून काढण्यात आले व सांडव्याजवळच्या उंच भाग पोलादाच्या तारा वरपासून खालीपर्यंत ओवून तो एकसंघ करण्यात आला. त्यास प्राथमिक स्थिरिकरण असेही म्हणतात. पुढे १९६९ ते ७२ या काळात धरणाच्या सांडव्याकेरीजच्या भागाला खालून जोडस्तंभ बांधून पूर्णपणे मजबूत करण्यात आला. १९९३ च्या तिल्लारीच भूकंपापर्यंत कोयना धरणाचा सांडवा अतिशय मजबूत असून त्याला कोणत्याही आधाराची गरज नाही असे समजण्यात आले. पण तिल्लारीच्या भूकंपानंतर पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच धरणांचा आढावा देऊसकर समितीने घेवून आवश्यक त्या धरणांच्या मजबूतीकरणाची शिफारस केली. त्यात कोयना धरणाचाही समावेश होता. पुढ १९९६ साली कृष्णाखोरे विकास महामंडळाची स्थापना झाली आणि टेंबू, ताकारी, म्हैसाळ या योजनांसाठी कोयना जलाशयापासून अतिरिक्त २० अब्ज घनफूट पाण्याची मागणी झाली. त्याच्या पुर्ततेसाठी सांडव्याच्या दारांना पाच फुटी झडपा बसवून ५ फूटाने पाणीपातळी वाढवणे व ६.४७ अब्ज घनफूट पाणी साठा साठवणे आी योजना आकली गेली. या वाढीस पाण्याच्या उंची संदर्भात सांडव्याच्या मजबुतीकरणाचे काम २००५-०६ अशी सलग दोन वर्षे करण्यात आले. दरम्यनच्या काळात कोयना प्रकल्पामध्ये बांधली गेलेली वीजगृहे व इतर बांधकामे यंत्रिकी कामे मोठ्या भूकंपाचा विचार करूनच केली गेली हे निश्चित.

**● लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे कार्य :**

कोयनेच्या भूकंपानंतर बाबासाहेब देसाई यांनी विशेष प्रयत्न केले. त्यावेळी ते राज्याचे गृहमंत्री म्हणून कार्यरत होते. मंत्रीमंडळातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा एक वेगळाच ठसा प्रतिष्ठा होती. या अपत्तीला त्यांनी अतिशय निर्धाराने तोंड दिले. प्रत्यक्ष भूकंपाच्या ठिकाणी जावून तळच ठोकला. एवढेच नव्हेतर सुमारे साडनतीन लाख लोकांच्या आयुष्याची विस्कटलेली घडी बसविल्याशिवाय इथून हालायचे नाही अशी प्रतिज्ञाच केली. त्यासाठी त्यांनी भूकंपग्रस्तांची पाहणी करून त्यांना कपडे, जेवनाचे डब्बे, अशा अत्यावश्यक वस्तू स्वत:

फिरून वाटल्या. शिवाय कोयनानगर खाली करण्याचा निर्धार घेवून एस.टी. गाड्या व इतर मिळेल त्या साधनांनी कराड, सांगली, सातारा, पुणे येथील रुग्णालयात पोहचविण्याचे काम केले. मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्यांना बाहेर काढण्यासाठी ढिगारे उपसण्याचे कार्य तातडीने सुरू केले. त्याकामी भोवतालच्या चार-पाच जिल्ह्यातील स्पेशल पोलीस दलाची पथके बोलावून घेतली. जखमी झालेल्या हजारो माणसांची सोय लगतच्या भागातील हॉस्पिटलमध्ये करण्यात आली. त्यांना भाकरी पाठवण्याचे आदेश पाचही जिल्ह्यांना शासनस्तरांवर देण्यात आले. कराडला येवून गावकरी, कार्यकर्ते व सरकारी अधिकारी यांच्याशी मद्यरात्री पर्यंत प्रदिर्घ बैठक घेवून घडलेल्या घटनांचे पंचनामे कसे करावे, मदतीचे स्वरूप काय असावे, वाटपयंत्रणा की असावी, यासंबंधीचे ठोस निर्णय घेतले.

या भयंकर स्वरूपाच्या भूकंपाने खचलेल्या लोकांना आधार व धीर देण्यासाठी बाळासाहेब देसाईंनी तब्बल २ महिने कोयना परिसरात वास्तव्य केले. सर्व प्रकारच्या मदतीचा ओघ कोयनेकडे वाढविला. वाटप केंद्रे निर्माण केली. यासंदर्भातील बातम्या जलदगतीने पसराव्यात म्हणून वायरलेसचे जाळे पसरवले. यांनी उदार अंत:करणाने केलेल्या आवाहनाला महाराष्ट्रातील जनतेने उत्स्फूर्त व जलदगतीने प्रतिसाद दिला. मदतीची वाहनेच्या वाहने येत होती. वैद्यकीय पथके दाखल हावूेन आपले कार्य करत होती. जीवनावश्यक वस्तु हजारोंच्या संख्येने मिळत होत्या. कोयना भूकंपाच्या रूपाने आलेल्या नैसर्गिक आपवीची व्यवस्थापनामध्ये लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या अथक परिश्रमामुळेच उध्वस्त झालेली सुमारे ७०,००० घरे पुन्हा उभी राहू शकली.

**ब) लातूर भूकंप १९९३ :**

कोयनेच्या भूकंपानंतर अखंड महाराष्ट्रावर प्रचंड मोठा आगात करणारा भूकंप म्हणजेच लातूरचा भूकंप होय. या भूकंपापूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व लोहरा तालुक्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसलेले होते.त यांी लातूर येथील भूकंपमापक यंत्रावर ३.१ रिस्टर स्केल इतकी तीव्रता नोंदविली गेली. हे भूकंप भूपृष्ठातील स्तरभंगामुळे झाले असावेत असे मत मांडण्यात आले. पण भूकंपाचे ठोस कारण मिळू शकलेले नाही. लातूर भूकंपापूर्वी एकूण सुमारे १२४ भूकंपाचे धक्के परिसराला बसलेले होते. पण १९९३ चा भूकंप मात्र प्रचंड प्रलयकारी व भयंकर स्वरूपाचा होता.

**● लातूर भूकंपाची स्थिती :**

लातूरचा हा भूकंप किल्लारीचा भूकंप म्हणूनही ओळखला जातो. किल्लारी हे लातूरजवळचे एक छोटेसे गाव या गावाचे तथा परिसराचे वैशिष्ट्य म्हणजे खिलारी जातीची लांब शिंगे असणारी बैल होय. या खिलारी बैलावरून या गावाला किल्लारी हे नाव पडले असावे. या गावाची लोकसंख्या १५ हजाराइतकी होती. ३० सप्टेंबर १९९३ हा दिवस अनंत चतुर्थीचा दिवस होता. हजारो लोक गणपतीचे विसर्ज नकरून रात्री उशीरा झोपी गेल्याने गाढ झोपी गेले होते. हजारो लोकांना जोपताना याची कल्पनाही नव्हती की, उद्याची सकाळ आपण पाहू शकणार नाही. ३० सप्टेंबर १९९३ च्या पहाटे ३ वाजून ५६ मिनीटांनी हा महाभयंकर स्वरूपाचा भूकंप झाला. त्याठिकाणी झालेल्या आतापर्यंतच्या भूकंपात तो सर्वात मोठा भूकंप होता. सुमारे २५ वर्षापूर्वी महाराष्ट्रातील किल्लीयेथे झालेला हा भूकंप म्हणजे महाराष्ट्रासह भारताबरोबरच संपूर्ण जगासाठी पहिली लक्षवेदी

आपत्ती ठरला. बी.बी.सी., न्यूयॉर्क टाईम्स, यसारख्या सर्व वृत्तपत्रांनी दुसऱ्या दिवशी या विध्वंसक भूकंपाचीच मुख्य बातमी छापली होती. किल्लारी भूकंप हा भारतातील आपत्ती व्यवस्थापनाचा वळरबिंदू ठरला. कारण या पूर्वीच्या आपत्तीमध्ये शासन मदत देवून मोकळे होत होते. पण पूनर्वसन कार्यात शासन उतरण्याची ही पहिलीच वेळ ठरली. लातूर तथा किल्लारीच्या भूकंपाची तिव्रता ६.५ रिस्टर स्केल इतकी होती. कोयना भूकंपाच्या तुलनेत या भूकंपाची तीव्रता कमी असली तरी या भूकंपाने सुमारे १० हजार लोकांचा बळी घेतला गेला. शिवाय लातूर जिल्ह्यामधील अनेक गावेच्या गावे उध्वस्त झाली होती. अशा गावाची संख्या ५० वर पोहचली गेली. काही गावांमध्े तोफेसारखे आवाज येत होते. तर काही गावात मोठमोठे खड्डे पडले होते.

- **जीवीत व वित्त हानी :**

लातूरच्या जवळच असणाऱ्या डोंगराच्या कडेला वसलेल्या किल्लारी या छोट्या गावासह लातूर व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांनाही या भूकंपाची मोठी झळ बसली. ३० सप्टेंबरच्या ३ वाजून ५६ मिनीटांनी बसलेल्या पहिल्या धक्क्यानंतर ४ वाजून ४१ मिनीटांनी, सकाळी ६.२४ व ७.४८ वाजता असे आणखी तीन धक्के बसले होते. यातील पहिले दोन धक्के सर्वात मोठे होते. गणपती विसर्जन करून झोपी गेलेल्या असंख्य लोकांवर झडक गातल्याने क्षणार्थात गावे होत्याची नव्हती झाली. घरांच्या ढीगाऱ्याखाली हजारो माणसांचे जीव दडपले गेले. बहुतेक लोक झोपेतच कायमचे विसावले गेले. बळी गेलेल्या लोकांची संख्या वेगवेगळ्या आश्रमांमधून १०,००० पासून ते २०,००० पर्यंत दिली जाते. या भागातील घरे प्रामुख्याने माळवादांची असून मोठमोठे दगड एमेकांवर रचून आणि मध्ये माती घालून या घरांचे बांधकाम केलेले होते. घराचे छप्परही दगड व मातीनेच बनविलेले होते. त्यामुळे भूकंपाच्या जोराच्या धक्यामुळे क्षणार्थात या घरांच्या भिंती व छपरे कोसळली गेली. त्यात हजारो जीव गाडले गेले, हजारो जायबंदी झाले, हजारो जखमी झाले. किल्लारीमधील जवळ जवळ ९०% या भूकंपात भुईसपाट झाली होती. कोयना भूकंपाच्या तुलनेत किल्लारीच्या भूकंपात बळी गेलेल्यांची संख्या अधिक होती. यामुळे या भूकंपामुळे झालेले नुकसान भरून न निघणारे असेच होते.

- **भूकंपाच्या आपत्तीचे व्यवस्थापन :**

या भूकंपाची माहिती मिळताच महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार व महसूलमंत्री विलासराव देशमुख तातडीने किल्लारीत पोहोचले. त्यांनी तात्काळ मदत करण्यासाठी शासकीय यंत्रणा सज्ज करून कार्यरत केली. त्यांच्या जोडीला भारतीय लष्कराचे जवान ही उतरले. घरांच्या आडकलेल्या मृत व जखमींना बाहेर काढणे जखमींना रुग्णालयात पोहचविणे, लोकांना रहाण्यासाठी तात्पुरत्या निवासाची सोय करणे यासारखी महत्त्वाची कामे या यंत्रणेद्वारे करण्यात आली. यावेळी विविध स्वयंसेवा संस्थांनीही या मदतकार्याला मोलाचे योगदान दिले. कपडे, धोतर, लुगडी, अंथरूण-बांघरूण, ब्लँकेटस्, खाऊचे पुडे, साड्या, चादरी, संसारउपयोगी वस्तु यांचा प्रचंड मोठा ओघ सुरू करण्यात आला. सेवाभावी संस्था वैद्यकीय पथके येवून दाखल झाली. यवेळी जगभरातून मदतीचा ओघ सुरू झाला. अमेरिका, इंग्लंड, जपान, स्पेन, फ्रान्स, नेदरलँड, बेल्झीयम यासारख्या देशांनी औषधे, तंबु, ब्लँकेटस्, खाद्यपदार्थ इत्यादी वस्तूंच्या रूपाने भरघोस मदत केली. जागतीक बँकेलाही या भूकंपाच्या पूनर्वसन कामामध्ये मनोमन सहभागी व्हावेसे वाटले.

आपल्याकडे भूकंपरोधक घरांची बांधणी झालेली नसल्याने नुकसान व बळींची संख्या वाढली होती. त्यमुळे भूकंपग्रस्त भागात भूकंपरोधक घरे बांधऱ्याचा निर्धार घेण्यात आला. राज्य शासनाने तांत्रिकदृष्ट्या योग्य पद्धतीने घरे बांधण्याचे प्रशिक्षणही दिले. राज्य शशसन, जागतिक बँक व स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने भूकंपग्रस्तांच्या घरांची बांधणी करण्यात आली. लातूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. प्रधान यांनी १५ ते २० तास झपाटून मदतकार्य केले. मदतीचा गैरवापर होणार नाही. याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. इतिहासात प्रथमच भूकंपामुळे औसा व उमरगा तालुक्यातील अनेक गावांचे स्थलांतर केले गेले. ५५००० लोकांना तयार घरे देण्यात आली. सुमारे २.५ लाख घरांची दुरुस्ती करण्यात आली. महिला गृहउद्योग हिंदुस्थान पेट्रोलीअम, टाटा हवसींग, रामकृष्ण मिशन, टाईम्स ऑफ इंडिया, इतर राज्यातील सरकारे, केवळ हावसींग यांसारख्या विविध संस्तांनी लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यातील सुमारे ४० गावे बांधून दिली. भारतीय जैन संघटनेने भूकंपग्रस्त भागातील १२७० मुलांना पुढील शिक्षण व वनिवासासाठी आधार दिला. विद्यार्थी संघटना व इतर संघटनांचेही योगदान या आपवी निवारण्यामध्ये मोठ्या प्रमाणात राहिले. अशा प्रकारे मन सुन्न करून टाळणाऱ्या या किल्लारीच्या भूकंपाने सर्वार्तांने मानवी जीवनाला नवी दृष्टी दिली. घटना घडल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन करत रहाण्यापेक्षा घटना घडण्यापूर्वीच काळी घ्या, त्याविषयीची आवश्यकता असते हा संदेश मिळाला.

● **भूकंपाचे परिणाम :**

भूकंप नावाची आपत्ती अचानकपणे येत असल्याने काही सेकंदामध्येच होत्याचे नव्हते होत असते. भूकंप हे विध्वंसक प्रकारचीच आपत्ती असल्याने त्याची झळ मानवप्राण्याला व त्याच्या मालमत्तेला बसत असते. भूकंपामुळे भूपृष्ठावरचे स्तर एकमेकांवर आदळून जमिनीला भेगा पडतात व स्तरांच्या रचनेत बदल होतात. तसेच पाण्याचे नळ, दूरध्वनी व विजेच्या तारा, रुळमार्ग वाकडे होतात, रस्ते उखडतात, पूल कोसळून पडतात, इमारती जमिनधोस्त होतात, डोंगराच्या उतारावरील कडे कोसळतात. हिमाच्छादित प्रदेशात मोठ्या प्रमाणात हिमलोट घडून येतात. याशिवाय भूकंपामुळे भूजल पातळीत फार मोठे बदल होतात. जसे की, काही विहिरी व तलाव आटून जातात. तर काही तुडुंब भरतात. पाण्याचे झरे सुरू होतात.

जमिनीला मोठमोठ्या भेगा पडून कालांतराने त्या पुन्हा मिटत असतात. अशावेळी त्या भेगांमध्ये घरेच्या घरे, गावेच्या गावे गडप होत असतात. तसेच समुद्रामध्ये घडून येणाऱ्या भूकंपामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात समुद्रात पाण्याच्या लाटांची निर्मिती होते. त्यांनाच त्सुनामी या नावाने आळखले जाते. त्यांच्यामुळे लाखोंच्या घरात जीवीत हाणी, वित्त हानी व इतर स्वरुपाचे नुकसान होत असते.

● **स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

**अ) योग्य पर्याय निवडुन विधाने पुन्हा लिहा.**

१) आपत्तीला ............... या नावाने ओळखले जात नाही.

अ) संकट ब) दुर्घटना क) उत्पात क) आनंदी घटना

२) जागतिक आरोग्य संघटनेला इंग्रजीमध्ये ............ नावाने ओळखले जाते.

अ) WTO ब) WSO क) WHO ड) WWO

३) जगातील सर्वात मोठा भूकंप १९६० मध्ये ............... या देशात झाला.

अ) रशिया ब) भारत क) जपान ड) चिली

४) ............ रोजी कोयना भूकंप घडून आला.

अ) १८६७ ब) १९६७ क) १८६८ ड १९६८

५) लातूर भूकंपाची तीव्रता .............. इतकी होती.

अ) ६.५ रि.स्केल ब) ५.६ रि.स्केल क) ७.५ रि.स्केल ड) ५.७ रि. स्केल

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सर्वसाधारणपणे आपत्तीचे किती प्रकार असतात.

२) भूकंप ही कोणत्या प्रकारातील आपत्ती असते.

३) भूकंपाची तीव्रता कोणत्या प्रमाणात मोजली जाते.

४) कोणत्या वर्षी लातूर भूकंप घडून आला.

५) समुद्रातील भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या लाटांना काय म्हणतात.

## २.३ सारांश :

कृषीप्रधान असणाऱ्या महाराष्ट्र राज्याला कृषीप्रदान नेतृत्वाची (मुख्यमंत्र्यांची) जी परंपरा लाभलेली आहे त्यामध्ये वसंतराव नाईक यांचा क्रमांक वरचा लागतो. प्रत्यी शेतीकामाची पार्श्वभूमी लभलेल्या शेतकरी कुटुंबाच्या कुशीत जन्मलेल्या नाईक साहेबांना कृषीविकासाची नस ओळखता आली होती. म्हणूनच त्यानी आपल्या १२ वर्षातील मुख्यमंत्र्यांच्या कालावधीत शेतीक्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणणाऱ्या क्रांतीकारक विविध उपाययोजना थाबंविल्या. इतरांचे पोट भरणारा शेतकरी सुद्धा उपाशी राहू नये याचा आत्मीयतेनं विचार करतानाच त्यांनी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न केले. काळाची पाऊले ओळखून त्यांनी दूरदृष्टीने सुरू केलेल्या अनेक महत्त्वपूर्ण योजनांची चांगली फळे आज अखंड महाराष्ट्र वाखानतांना दिसतो. त्यांच्या या कृषी क्षेतिील अमुल्य स्वरूपाच्या महान योगदानामुळेच वसंतराव नाईक यांना महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून ओळखणे क्रमप्राप्त ठरते.

महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला नवा आयाम प्राप्त करून देणाऱ्या उद्योगांमध्ये प्रवरा सहकारी साखर कारखाना आणि आरे दुध डेअरी यांचा महत्त्वाचा वाटा आहे. अत्यंत प्रतिकुल व कठिण परिस्थितीमध्ये विलासराव विखे पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रवरा सहकारी साखर कारखान्याने सर्वार्थाने थोड्या कालावधीत

कारखानदारीचा एक आदर्श निर्माण केला आहे. ऊस पिकवणाऱ्या सामान्य शेतकऱ्यांच्या हिताचा जास्तीत जास्त विचार करणारा याच कारखान्याने अशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याचा मान महाराष्ट्र राज्याला मिळवून दिला आहे. तर मुंबई येथील आरे दूध डेअरीने दूध उत्पादनात राज्याल अग्रेसर बनवण्याबरोबरच धवलक्रांतीसाठी मुलभूत स्वरूपाचे योगदान दिले.

भूकंपाच्या माध्यमातून अखील मानव जातीवर येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचे महत्त्व पटवून देण्यामध्ये १९६७ चा कोयना भूकंप व १९९३ चा लातूर भूकंप यांचे महत्त्वाचे स्थान आहे. या भूकंपामुळे मानवी जीवनात भूकंप काय करू शकतो याचा वास्तववादी प्रत्यी अनुभव मानवाला घेता आला. त्या विध्वंसक अनुभवातून धडा घेणाऱ्या मानसाने पूर्व उपयोजनांच्या माध्यमातून विधायक पाऊल टाकल्याचे दिसून येते.

## २.४ पारिभाषिक शब्दांचे अर्थ :

१) हरितक्रांती : कृषी क्षेत्रात झालेले अमुलाग्र बदल व विकास.

२) रोजगार हमीयोजना : दुष्काळासारख्या कठिण प्रसंगी सरकार मार्फत दिल्या जाणाऱ्या कामाची तथा रोजगाराची योजना.

३) कृषी विद्यापीठ : कृषी क्षेत्रातील संबंधीत घयकांचा अभ्यास व संशोधन करणारे विद्यापीठ.

४) सहकारी साखर कारखाना : सहकारी तत्वावर स्थापन करण्यात आलेला साखर कारखाना.

५) मद्य : दारू म्हणजेच नशा किंवा गुंगी आणणारा दव पदार्थ.

६) श्वेत किंवा धवलक्रांती : दुध उत्पादन क्षेत्रात झालेला अमुलाग्र मदल व विकास.

७) आपत्ती : अचानक आलेले संकट.

८) डब्ल्युएचओ- वल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन

९) त्सुनामी : भूकंपामुळे समुद्रात तयार झालेल्या लाटा.

१०) रिस्टर स्केल : भूकंपाची तीव्रता मोजणारे मापक/यंत्र.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | १) वसंतराव नाईक | २) १९७९ | ३) वसंतराव नाईक |
| | ४) बारा | ५) राहुरी | |
| ब) | १) बारा | २) वसंतराव नाईक | ३) १९७२ |
| | ४) वसंतराव नाईक | ५) १९६९ | |

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | १) १९५० | २) १९७५ | ३) शिक्षण फंड |
| | ४) १९७५ ते ८१ | ५) १९५१ | |
| ब) | १) विठ्ठलराव विखे-पाटील | २) धनंजयराव गाडगीळ | ३) १९५८ |
| | ४) ८१ कोटी रुपये | ५) १९९२ | |

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | १) आनंदी घटना | २) WHO | ३) चिली |
| | ४) १९६७ | ५) ६.५ रिस्टर स्केल | |
| ब) | १) दोन | २) नैसर्गिक | ३) रिस्टर स्केल |
| | ४) १९९३ | ५) त्सुनामी | |

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा**

१) १२ कलमी योजना

२) रोजगार हमी योजना.

३) कृषी विद्यापीठांची स्थापना

४) प्रवरा सहकारी कारखान्याच्या विकास योजना.

५) प्रवरा कारखान्यामार्फत चालवले जाणारे उद्योग.

६) दुध महापूर योजना.

७) पशु संवर्धन योजना.

८) आपत्तीचे प्रकार.

९) भूकंपाची कारणे.

१०) भूकंपाचे परिणाम.

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राच्या विकासातील वसंतराव नाईक यांचे योगदान सांगा.

२) प्रवरा सहकारी साखर उद्योगाची माहिती द्या.

३) आरे दुध डेअरीची सविस्तर चर्चा करा.

४) १९६७ च्या कोयना भूकंपाची माहिती द्या.

५) १९९३ च्या लातूर भूकंपाची चर्चाक करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) विश्वास मेहदब्बे, यठशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे २००७.

२) वसंत जुगळे - योजना जुगळे, कृष्णा खोऱ्यातील पाण्याचे व्यवस्थापन, सेटर फॉर सोशल स्टडींग ॲण्ड रिसर्च पब्लिकेशन, सांगली - २०००.

३) पाटील रा. तु, 'महाराष्ट्राच्या इतिहासातील काही ताजी पाने, वसंतराव आणि यशवंतराव, सन्मीत्र प्रकाशन, कोल्हापूर.

४) किशोर बेडकिहाळ, बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकॅडमी, सातारा, २०१३.

५) घोटाळे विवेक व अभयकांता - महाराष्ट्रातील देकाळ, युनिक अकॅदमी, पुणे.

६) सुरेखा शहा, महाराष्ट्राचे जलगायन, सुमेरू प्रकाशन.

७) मोरवंचीकर रा. शी, भारतीय जलसंस्कृती स्वरूप व व्याप्ती, सुमेरू प्रकाशन.

८) काणिकर राजश्री, जलसंपदा, परममित्र प्रकाशन.

९) शिवाजी यशवंत, महाराष्ट्राचे शिल्पकार, पद्मश्री डॉ. विंठलराव विखे पाटील, महाराष्ट्र राज्य, साहित्य व संस्था मंडळ, मुंबई २००२.

१०) कर्णिक मधू मंगेश, सांस्कृतिक महाराष्ट्र भाग-१.

११) कुलकर्णी चंपानेरकर, असा घडला भारत, रोहन प्रकाशन, २०१२

१२) मराठी विश्वकोश खंड -१२

१३) राठोड राजाराम, ग्रीन हाईटस्, शिवपार्वती कल्पना मुद्रणालय, पुणे.

१४) टाईम्स ऑफ इंडिया, विश्वास कोठारी लिखीत आर्टीकल, कोयना जागतीक अभ्यासाचे केंद्रबिंदू, १५ मार्च २०११

१५. आय.आय.सी. (२०१) आयसीसी-जीईएम ग्लोबल, इंस्ट्रूमेंटल भूकंप कॅटलॉग-२०१२.


❖❖❖

**घटक – ३**

# सामाजिक चळवळी

**अ) मुस्लिम सत्यशोधक समाज    ब) सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष    क) विद्रोही सांस्कृतिक चळवळ**

---

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

    ३.२.१. मुस्लिम सत्यशोधक मंडळ– समाज

    ३.२.२. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष

    ३.२.३ विद्रोही सांस्कृतिक चळवळ

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके:


**३.० उद्दिष्ट्ये :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला......

- मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा इतिहास हमिद दलवाई यांच्या कार्याची माहिती मिळेल.
- मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापना व कार्याची माहिती मिळेल.
- मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या सुधारणावादी धोरणांची ओळख होईल
- सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेचा इतिहास अवगत होईल.
- कॉ. शरद पाटील यांच्या कार्याची माहिती होईल.
- सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे लढे व भूमिका यांची ओळख होईल

- विद्रोही सांस्कृतिक चळवळीची स्थापना व वाटचाल याची माहिती होईल.
- विद्रोही सांस्कृतिक चळवळीची भूमिका कळेल.
- विद्रोही सांस्कृतिक चळवळीची कार्यपद्धती व उपक्रमांची माहिती मिळेल.

## ३.२ : विषय विवेचन व प्रस्तावना :

### ३.२.१. मुस्लिम सत्यशोधक मंडळ– समाज

**● प्रास्ताविक :**

मुस्लिम समाजातील क्रांतीकारी सुधारक म्हणून ख्याती मिळविणारे हमिद दलवाई यांनी आपल्या निवडक मित्रांच्या सहकार्याने २२ मार्च १९७० रोजी पुणे सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि लोकशाही मूल्यांचा अधिकाधिक प्रसार या तत्वावर मंडळाची स्थापना झाली. मुस्लिम समाजाच्या प्रश्नावर व मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी या मंडळाची स्थापना करण्यात आली. हमिद दलवाई यांच्यावर महात्मा गांधी यांच्यासह जयप्रकाश नारायण व राम मनोहर लोहिया यांच्या समाजवादी विचारांचा प्रभाव होता. हमिद दलवाई हे विवेकवादी, धर्मनिरपेक्ष व मानवतावादी असल्यामुळे मंडळाच्या नांवात मुस्लिम शब्दासोबत महात्मा फुले यांचा सत्यशोधकी वारसा जोडून घेण्यात आला व मंडळाचे नांव 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' असे ठेवले. मंडळाच्या कार्यात मुस्लिम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यात आला.

मुस्लिम सत्यशोधक चळवळीची खरी सुरूवात १८ एप्रिल १९६६ रोजी झाली असे म्हणावे लागेल. कारण याच दिवशी महिलांच्या संविधानिक हक्कासाठी हमिद दलवाई यांनी मुंबई येथे सात मुस्लिम महिलांचा मोर्चा विधानभवनावर नेला आणि तोंडी तलाक, बहुपत्नीत्व यासारख्या प्रश्नावर प्रथम आवाज उठविला. भारतीय समाज प्रबोधनाच्या इतिहासात एक वैशिष्टय असे की, बहुतांश प्रबोधनकारांनी समाज सुधारणेच्या कार्याचा प्रारंभ स्त्री - दास्य मुक्तीच्या कार्यक्रमाने केला आहे. हमिद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या चळवळीचे सुध्दा हेच वैशिष्ट्य होते. मुस्लिम राजकारण आणि मुस्लिम महिलांचे प्रश्न हे दोन्ही विषय दलवाईंच्या कार्याच्या केंद्रस्थानी होते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपुर्वी त्यांनी मुस्लिम महिलांच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी 'सदा-ए-निसवॉं' संघटना उभारली होती.

मंडळाच्या स्थापनेनंतर मंडळाच्या कार्यासाठी हमिद दलवाईंना फक्त मोजकीच वर्षे लाभली, परंतू या पाच - सात वर्षाच्या कालावधीत त्यांनी पन्नास वर्षाचे कार्य तुफानासारखे केले. त्यांच्या हयातीतील काही ऐतिहासिक उपक्रम आजही प्रेरक ठरतात. मंडळाच्या माध्यमातून त्यांनी अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद (२८ नोव्हेंबर १९७१), ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स, नवी दिल्ली (३ व ४ डिसेंबर १९७१), मुस्लिम महिला परिषद, पुणे (२७, २८ डिसेंबर १९७१), मुस्लिम शिक्षण परिषद, कोल्हापूर (३०,३१ डिसेंबर १९७३), जिहाद ए तलाक परिषद - राज्यव्यापी सामाजीक परिषद, मुंबई, मुस्लिम सत्यशोधक पत्रिका सुरूवात, मुस्लिम महिला मदत केंद्राची स्थापना असे अनेक कार्यक्रम व उपक्रम राबविले. या काळात त्यांच्या कार्याला

विरोधही तितकाच झाला, मात्र त्यांनी न डगमगता मंडळाचे कार्य चालूच ठेवले. मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाच्या कार्यामुळे ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. रामचंद्र गुहा यांनी त्यांच्या 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' या पुस्तकात 'द लास्ट मॉर्डनिस्ट' म्हणून हमिद दलवाई यांचा गौरवाने समावेश केला आहे. मुस्लिम महिलांच्या समस्या, धर्मांधतता, जमातवादी राजकारण, मदरसा, उर्दू माध्यमातील शिक्षण आणि लोकसंख्या या प्रश्नांना त्यांनी मंडळाच्या माध्यमातून ऐरणीवर आणले. हमिद दलवाई यांच्या निधनानंतरही मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मंडळाचे कार्य अखंडितपणे सुरूच ठेवले आहे. आज मुस्लिम सत्यशोधक मंडळ पन्नास वर्षाच्या इतिहासाचा झाला आहे. या पन्नास वर्षात मंडळाने विविध कार्यक्रम, आंदोलन, उपक्रम व साहित्याच्या माध्यमातून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे.

**● हमिद दलवाई व मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापना –**

हमिद दलवाई यांचा जन्म २९ सप्टेंबर १९३२ ला मिरजोळी ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथे झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण चिपळूण मध्येच झाले. वयाच्या १४ व्या वर्षी १९४६ साली त्यांनी राष्ट्रसेवा दलाचे काम सुरू केले. यामुळे राष्ट्रवाद, देशभक्ती, समाजवाद, अंधश्रध्दा निर्मूलन, धर्मचिकित्सा यासारख्या गोष्टीचे आकर्षण वाढले. याच काळात दलवाई यांचे समाजभान समाजाची निरीक्षणे नोंदवत होते. त्यानंतर त्यांनी १९६३ ते १६६८ दरम्यान आचार्य प्र. के. अत्रे यांच्यासोबत 'मराठा' या दैनिकात पत्रकारिता केली. याच दरम्यान त्यांच्या कथा मौज, सत्यकथा, वसुधा, किर्लोस्कर, मराठवाडा यांसारख्या नामांकित नियतकालिकामध्ये प्रसिध्द होऊ लागल्या.

मुस्लिम समाजात सुधारणावादी चळवळीची गरज ओळखून हमिद दलवाई यांनी २२ मार्च १९७० रोजी पुणे येथे 'मुस्लिम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना केली. मंडळाच्या स्थापनेपुर्वी हमिद दलवाई यांची भूमिका व कार्य महत्वाचे आहे, भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यासोबत फाळणीची जखम घेऊन या देशाची वाटचाल सुरू झाली. फाळणी व तत्कालिन राजकिय परिस्थितीमुळे मुस्लिम समाजमन ढवळून निघाले होते. यानंतर हमिद दलवाई यांनी मुस्लिम समाजाचे वास्तविक आकलन होण्यासाठी भारतभर दौरा केला. या दौऱ्यानंतर भारतभर पसरलेले मुसलमान वेगवेगळ्या विचारसरणीचे विविध व्यक्तीमत्वांचे असल्याचे त्यांचे मत झाले. यानंतर त्यांनी मुस्लिम समाज सुधारणा चळवळ व स्त्रीयांच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वळविले.

वास्तविक मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपूर्वी चार वर्षे, म्हणजे १८ मार्च १९६६ रोजी दलवाईंनी मुंबई विधानसभेवर सात मुस्लिम महिलांचा मोर्चा नेऊन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना मुस्लिम महिलांच्या न्याय हक्काबाबत निवेदन दिले आणि समान नागरी कायद्याची मागणी केली. सन १९६७ – ६८ मध्ये उत्तर भारत, जम्मू – काश्मिर आणि भारत, पाकिस्तान सिमेलगत भागात अभ्यासासाठी प्रवास केला याच काळात त्यांचे 'मुस्लिम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया' हे पुस्तक हे प्रसिध्द झाले. एप्रिल १९६८ मध्ये दलवाईंनी मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी 'सदा–ए–निसवॉं' ही संघटना उभारली होती. त्यानंतर प्रा. अ. भि. शहा यांच्या समवेत 'इंडियन सेक्युलर सोसायटी' ची स्थापना १९६८ मध्ये केली. मंडळाच्या स्थापनेपुर्वी

त्यांचे महिलांचे प्रश्न, मुस्लिम राजकारण आणि धर्मनिरपेक्षता या विषयावर अभ्यास, कार्य आणि लेखन हे कार्य सुरू होते. या सर्व चळवळी सुरू असताना पुणे येथे २२ मार्च १९७० या दिवशी हमिद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली १०० पुरोगामी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी गुरूवर्य जगताप तर उद्घाटक म्हणून यास्मिन लुकमानी उपस्थित होते. मंडळाचा जाहिरनामा व घटना यावेळी हमिद दलवाई यांनी प्रसिध्द केला. भारतीय मुस्लिम समाजात प्रबोधनाचे आंदोलन चालविणे हे मंडळाचे उदिष्ट असल्याचे घटनेद्वारे जाहीर करण्यात आले. मुस्लिम समाजात सुधारणा काम करायचे आहे, त्या समाजात सुधारणा झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता समर्थ बनणार नाही म्हणून मंडळाच्या नांवात मुस्लिम शब्द ठेवण्यात आला. मंडळाच्या नांवातील 'सत्यशोधक' हा शब्द डॉ. बाबा आढाव यांनी सुचविला आणि तो तात्काळ स्वीकारण्यात आला. म. फुले यांनी हजारो वर्षाच्या दुष्ट रूढीविरूद्ध व ग्रंथनिष्ठेविरूद्ध बंड पुकारले होते. तसेच काम मंडळाच्या माध्यमातून करण्याचे निश्चित करण्यात आले व 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' नांव अंतिम करण्यात आले.

**● मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य :**

**१. अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद :**

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतर २८ नोव्हेंबर १९७१ रोजी महात्मा फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त हमिद दलवाई यांनी 'अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद' पुणे येथे आयोजीत केली. या परिषदेमध्ये मुस्लिम समाजाच्या विविधांगी समस्या मांडण्यात आल्या. धर्मवादी राजकारण, महिलांचे प्रश्न यावर भर देण्यात आला होता. मुस्लिम समाजातील मुल्ला, मौलवी, उलेमा यांच्यामुळे समाजातील समस्या कशा पध्दतीने निर्माण होतात आणि धर्माच्या नावाने कसा रूजवला जातो, सामान्यांचे शोषण कसे होते यावर प्रकाश टाकण्यात आला. या परिषदेनंतर लगेच ३ व ४ डिसेंबर १९७१ रोजी ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकींग मुस्लिम्स, नवी दिल्ली येथे घेण्यात आली. यात विविध क्षेत्रातील नामांकित अशा बुध्दीजीवी व उदारमतवादी मुस्लीमांनी विचार मांडले.

**२. मुस्लिम महिला परिषद पुणे २७, २८ डिसेंबर १९७१ :**

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्यावतीने पुण्यात 'मुस्लिम महिला परिषद', पुणे २७, २८ डिसेंबर १९७१ रोजी आयोजीत करण्यात आली. महाराष्ट्र, अहमदाबाद, दिल्ली, कलकत्ता येथून सुमारे १७६ महिला परिषदेस उपस्थित होत्या. पुण्यात झालेल्या या परिषदेला थोडाफार विरोध झालाच. मुस्लिम स्त्रीयांचा समान हक्क व्दिभार्या प्रतिबंध, जुबानी तलका इ. विषयांवर महिलांनी चर्चा केली व ठराव संमत केले. मुस्लिम स्त्रियांनी एकत्र येऊन आपल्या हक्कांची मागणी करणारी ही पहिली परिषद होती. त्यामुळे मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या व मुस्लिम समाजाच्या इतिहासात या परिषदेचे महत्व अनन्य साधारण आहे. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी शरिफा तय्यबजी होते. दोन दिवस चाललेल्या या परिषदेस समाजवादी नेते साथी एस. एम. जोशी व हरिभाऊ परांजपे उपस्थित होते.

**३. महाराष्ट्र मुस्लिम सामाजीक परिषद,  मुंबई – ११ मार्च १९७३ :**

११ मार्च १९७३ रोजी मराठा मंदिर, मुंबई येथे 'महाराष्ट्र मुस्लिम सामाजीक परिषद', मंडळाने भरविली. या परिषदेसाठी 'इंडियन सेक्युलर सोसायटीचे' सहकार्य केले. या परिषदेत मुंबई, पुणे, मुंबई, उपनगर, कोल्हापूर, निपाणी, आजरा, सांगली, सोलापूर, अमरावती, नागपूर, वर्धा, फलटण, चिपळूण, सासवड, भिवंडी, पालघर, गुलबर्गा, श्रीगोंदा या ठिकाणाहून सुमारे ३०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषेदेचे वैशिष्ट्य म्हणजे पन्नास महिलांही यात सहभागी झाल्या होत्या. पुरषदेस पा. असफ ए. ए. फौजी, अ. भि. शहा, डॉ. मोईन शाकीर यांनी मार्गदर्शन केले. मुस्लिम स्त्रीयांना समान हक्काची कायदेशिर व्यवस्था, मुस्लीमांचे शिक्षण मातृभाषेतून व्हावे, समान नागरी कायदा (भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार) या विषयावर चर्चा होऊन मागण्या करणारे ठराव परिषदेत करण्यात आले.

**४. मुस्लिम शिक्षण परिषद, कोल्हापूर,– ३० व ३१ डिसेंबर १९७३ :**

कोल्हापूरच्या केशवराव भोसले नाट्यगृहात ३० व ३१ डिसेंबर १९७३ रोजी मुस्लिम शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेचे उद्घाटन प्रा. अ. भि. शहा व अध्यक्षस्थानी हमिद दलवाई होते. या शिवाय अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, प्रा. ना. गो.कालेलकर, साथी एस. एम. जोशी यांनी परिषदेला मार्गदर्शन केले. महात्मा फुलेंनी 'एवढे अनर्थ .... एका अविद्येने केले' चा मूलमंत्र विचारात घेऊन मुस्लिम शिक्षण, मदरसा शिक्षण, उर्दू माध्यमाचा अनाठाई आग्रह आणि यामुळे समाजाची सध्याची परिस्थिती यावर विचार करून धोरण आखले. शिक्षणात उर्दू माध्यमाऐवजी प्रादेशिक भाषेचा अंगीकर, 'वक्फ' संस्था सरकारने धर्मनिरपेक्ष संस्थाच्या ताब्यात द्यावी व मुस्लिमांचा विकास विशेषत: शैक्षणिक विकास साधण्यासाठी त्याचा विनियोग माध्यमिक पर्यंतच्या मोफत शिक्षणाची सोय व मोफत उच्च शिक्षणासाठीची पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा बाराशे रू. वरून पाच हजार रू. वर नेणे, मदरसा पध्दतीच्या शिक्षणाचे आधुनिकीकरण इ. विषयांवर चर्चा व ठराव परिषदेत झाले. परभणी, जळगांव, उस्मानाबाद, नाशिक, बीड, ठाणे, कुलाबा, धुळे चंदपूर, रत्नागिरी चिपळूण, कणकवली, मनमाड, अहमदनगर, अमरावती, सोलापूर सांगली, सातारा, पुणे, मुंबई व कर्नाटकातील आठशे मुस्लिम प्रतिनिधी परिषदेला हजर होते. यामध्ये दोनशे पन्नास स्त्रीयांचा सहभाग उल्लेखनीय ठरला.

**५. मुस्लिम महिला मेळावा , चिपळूण , ९ जून १९७४**

मुस्लीम सत्यशोक मंडळातर्फे दि. ९ जून १९७४ रोजी चिपळूण येथे मुस्लिम महिलांचा मेळावा पार पडला. मेळाव्याला सुमारे नव्वद महिला उपस्थित होत्या. मेळावा होऊ नये म्हणून काहींनी चिपळूण येथे रस्ते अडविले, निदर्शने केली व धमक्या दिल्या. मेळाव्याच्या आदल्या दिवसी रात्री मिरजोळी येथील हमिद दलवाईंच्या घरावर समोर येऊन काहींनी दंगा केला. अशा तणावपुर्ण वातावरणात हा मेळावा मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन डॉ. शमीम अत्तार यांनी केले. अध्यक्षस्थानी मेहरून्निसा दलवाई होत्या. या मेळाव्यात मुस्लिम महिलांचे प्रश्न सरकारकडे मांडण्याचा ठराव घेण्यात आला.

**६. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका :**

जानेवारी १९७३ मध्ये मुस्लिम सत्यशोधक पत्रिकेचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला. या अंकाचे संस्थापक संपादक हमिद दलवाई होते. प्रबोधन, प्रशिक्षण आणि प्रकाशन या त्रिसूत्रीचा वापर करीत ही पत्रिका मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे कार्य लोकांसमोर पोहचवत आहे. सध्या त्रैमासिक स्वरूपात नियमित स्वरूपात प्रकाशित होत आहे. मुस्लिम नव्या लेखकांचा याला चांगला प्रतिसाद आहे. मुस्लिम जगतातील घडामोडींची नोंद घेऊन मंडळाच्या ध्येय उदिष्टांच्या पुर्ततेसाठी लोकशिक्षणांचे एक महत्वाचे साधन म्हणून हे मुखपत्र नियमित प्रकाशित होत आहे. आगामी काळात या त्रैमासिकाचे 'मासिकात' रूपांतर व्हावे यासाठी मंडळाचे प्रयत्न चालू आहेत. तर सध्या डॉ. शमसुद्दीन तांबोळी या अंकाचे संपादक आहेत. गेल्या अनेक वर्षापासून मंडळाच्या या मुखपत्राची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली आहे.

**७. हमीद दलवाई यांच्या नंतर मुस्लिम सत्यशोधक मंडळाची वाटचाल :**

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना हमिद दलवाई व त्यांच्या सहकाऱ्यांनी १९७० साली केली. त्यानंतर दलवाई यांनी ७ वर्षात तुफानासारखे काम करून मुस्लिम सत्यशोधक मंडळाची कार्यात्मक ओळख देशाला करून दिली. मंडळाच्या स्थापनेनंतर शेवटची दोन वर्षे त्यांना आजाराशी झगडावे लागले. आजारपणाच्या काळातही सत्यशोधकी कार्यकर्त्यांशी संवाद, युरोप दौरा नंतर आजार वाढला. यातच या महान समाज सुधारकाचा मृत्यू ३ मे १९७७ रोजी झाला. हमिद दलवाई नेहमी म्हणत 'मी सर्वप्रथम माणूस आहे, नंतर भारतीय आहे आणि शेवटी मुस्लिम आहे' मानवतेला प्राधान्य आणि धार्मिक अस्मितेला नगण्य स्थान देणाऱ्या दलवाईंनी शेवटी आपण निधर्मी आणि निरिश्वरवादी असल्यामुळे त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात 'माझ्या अंत्यविधीसाठी हिंदू अथवा मुस्लिम पद्धतीने कोणत्याही प्रकारचा धार्मिक विधी होऊ नये, माझे कोणतेही स्मारक उभारले जाऊ नये दहन समयी व नंतर भाषणे किंवा शोकसभा करू नये असे म्हटले. त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्यावर कोणतेही विधी न करता विद्युत दाहिनीत शरीर समर्पण केले. मुस्लिम समाजात प्रबोधनाची मुहर्तमेढ उभी करणारा एक लढवय्या क्रांतिकारक पडद्याआड गेला. दलवाईंनी सुरू केलेला हा चिकित्सक समाज सुधारणेचा लढा मंडळाचे कार्यकर्ते नेटाने पुढे नेत आहेत.

**८. शाहबानो पोटगी निकालाचे स्वागत :**

शाहबानाने पोटगी निकाला नंतर सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने मुंबई येथे १७ ऑगस्ट १९८५ रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने पोटगी बचाव परिषद घेतली. 'मराठा मंदिरात' आयोजीत या परिषदेचे उद्घाटन प्रा. मुमताज रहिमतपुरेंने केले. प्रा. एस. टी. लोखंडवाला प्रमुख पाहुणे प्रमुख पाहुणे होते. समाजवादी नेत्या मृणाल गोरे, रशिदा मुजावर यांनीही परिषदेला मार्गदर्शन केले.

**९. तलाक मुक्ती मोर्चा :**

शाहबानोच्या निकालाच्या बाजूने जनमत संघटित करण्यासाठी 'जुबानी तलाक बंद करा', 'व्दिभार्या

प्रतिबंधक कायदा लागू करा' तलाकपीडीतेला पोटगी मिळालीच पाहीजे या मागण्या घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाने ३ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर १९८५ या काळात महाराष्ट्रभर 'तलाकमुक्ती मोर्चा' हे न भूतो न भविष्यती असे एक जन अभियान चालविले. एस. टी. बस मधून चाळीस मुस्लिम सत्यशोधक यापैकी बावीस स्त्रीया व नऊ मुले कोल्हापूरातून निघून मिरज, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, अंबेजोगाई, परभणी, नांदेड, चंद्रपूर, अमरावती, बुलढाणा, जळगाव, अहमदनगर याठिकाणी मुस्लिम जनसामान्यांशी संपर्क साधत फिरले. मेहरून्निसा दलवाई, हुसेन जमादार यांनी 'तलाक मुक्ती मोर्चा' चे संघटन व नेतृत्व केले. प्रत्येक ठिकाणी जाहीर सभा, पोस्टर प्रदर्शन, निवेदन आणि शक्य तितक्या मुस्लिम कार्यकर्त्यांच्या बैठका असा कार्यक्रम पार पाडला. या मोर्चाला अनेक ठिकाणी विरोध व निषेधाचा सामना करावा लागला. तलाक मुक्ती मोर्चा महाराष्ट्रभर वृतपत्रांनी, नियतकालिकांनी अग्रलेख लिहून व तपशीलवार वृतांत देऊन प्रसिध्दी दिली. ज्या ज्या ठिकाणी हा मोर्चा गेला तेथील सर्व पुरोगामी संघटनांनी या मोर्चाला सहाय्य केले. पुढे १६ जानेवारी १९८६ रोजी विधानभवना समोर तलाक मुक्ती मोर्चाने एक दिवशीय धरणे धरले व मुख्यमंत्र्याची भेट घेऊन निवेदन दिले. या मोर्चात ८० वर्षाच्या बाबूमियाँ बँडवाले यांच्यापासून १० महिन्याच्या बालकांपर्यंतचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### १०. तलाक प्रश्नावर पंतप्रधान राजीव गांधीची भेट :

शाहबानो निकालाला विरोध करण्यासाठी लाखो मुस्लिम बांधव रस्त्यावर उतरले, त्याचा परिणाम असा झाला की, तत्कालीन पंतपधान राजीव गांधी यांनी पोटगीचा अधिकार रद्द करणारे तलाक हक्क संरक्षण विधेयक आणावयाचे ठरवले. या प्रश्नावर मुस्लिम सत्यशोधक मंडळातर्फे तलाक मुक्ती मोर्चा अभियानाचा भाग मुस्लिम म्हणून २१ व २२ फेबुवारी १९८६ रोजी ३५ मुस्लिम स्त्रिया व १५ कार्यकर्ते या विधेयकास विरोध करण्यासाठी पंतप्रधान राजीव गांधी व राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांना भेटले. परंतू हे विधेयक तत्कालिन सरकारतर्फे लोकसभेत मांडण्यात आले.

### ११. ऑल इंडिया प्रोगेसीव्ह मुस्लिम कॉन्फरन्स :

मुस्लीम सत्यशोधक चळवळीतर्फे कोल्हापूरात २६ व २७ सप्टेंबर १९८७ ला ऑल इंडिया प्रोगेसीव्ह मुस्लिम कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली. या परिषदेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती एस. एम. दाऊद होते. अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष बाबूमियाँ बँडवाले होते. या परिषदेत अब्दुल लतीफ आझमी, सीमा काझी, मोहम्मद खुद्दुस, प्रा. रहीमान खान, डॉ. दुराणी, मेहरून्निसा दलवाई, सय्यदभाई, हुसेन जमादार, सारा अबुबकर यांनी मार्गदर्शन केले. या परिषदेत देशभरातून आलेल्या सुमारे चारशे मुस्लिम प्रतिनिधीनी जातीयवादी हिंसाचाराचा विरोध, मुस्लीमांची आर्थिक व शैक्षणिक स्थिती, बहुपत्नीत्व, जुबानी तलाक इ. साठी नव्या कायद्याची मागणी केली. आणि १९८६ च्या कायद्याचा व राजस्थानच्या रूपकंवर सती घटनेचा निषेध करून ठराव संमत केला. याचाच भाग म्हणून १९९० साली ऑल इंडिया प्रोगेसीव्ह मुस्लिम कॉन्फरन्सची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून देशाच्या विविध राज्यात परिषदांचे आयोजन करण्यात आले.

## १२. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा :

हमीद दलवाई यांनी देशभर फिरून मुस्लिम समाजाचा अभ्यास केला. लेखन व संवादातून समाजाचे प्रबोधन केले. २० मार्च १९७० रोजी सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. आता मंडळाची स्थापना होऊन ५० वर्षे होत आहेत. या काळात भारतातील राजकिय आणि सामाजिक परिस्थितीत दखल घेण्यासारखे खूप बदल झाले आहेत. या बदलाची नोंद घेऊन चळवळीच्या मूळ उदिष्टामध्ये गुणात्मक बदल न करता काही विषयांच्या अग्रक्रमात बदल करून नवी दिशा ठरविणे आवश्यक झाले, म्हणून मुस्लिम सत्यशोधक मंडळाने आपल्या जाहीरनाम्यात पुढील प्रमाणे आपली भूमीका व ध्येय ठेवले आहेत.

**● उदारमतवादी कुराण भाष्याचा आधार :**

इस्लाममध्ये कुराणाचा अर्थ सामान्य माणूससुध्दा लावू शकतो. तरीही मुस्लिम समाजात असा पुरोहीत वर्ग निर्माण झालाच, धर्मशास्त्राचा अन्वयार्थ लावण्याचा अधिकार केवळ आपल्यालाच आहे अशी टोकाची भूमिका आहे. या पारंपारिक उलेमांच्या पभावातून मुस्लिम समाजाला मुक्त करणे ही मुस्लिम सत्यशोधक मंडळाची प्राथमिकता आहे. त्यासाठी कुराणाच्या प्रागतिक व उदारमतवादी भाष्यकारांचा आधार घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळ यापुढे आपली वाटचाल करील.

**● मुस्लिम समाजासमोरील जमातवादाचे आव्हान :**

गेल्या काही वर्षात हिंदू जमातवादाचे मोठे आव्हान मुस्लिम समाजासमोर उभे राहीले आहे. क्रिया प्रतिकियात्मक स्वरूपामुळे मुस्लिम समाजातही जमातवादी वृती वाढत आहे, पण एका समाजातातील जमातवादाला दुसऱ्या समाजातील जमातवाद हे उत्तर असू शकत नाही. अशा परिस्थितीत मुस्लिम समाजातील जातीयवादी प्रवृती व संघटना यांच्याविरूध्द भूमिका घेतअसतानााच मुस्लिम सत्यशोक मंडळ हिंदू जमातवादाच्या विरोधातही नि:संदिग्ध भूमिका घेईल. समाजात राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यास सहिष्णुतेच्या आधारावर परस्पर सामंजस्य व भावनिक एकात्मता निर्माण करणे आवश्यक असते. त्याचे भान ठेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळ या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहील. त्याचबरोबर हिंदू व मुस्लिम समाजातील प्रागतीक व्यक्ती व संघटना यांना मंडळ सहकार्य करेल. कोणत्याही प्रतिगामी, जातीयवादी, प्रवृती संघटना वा व्यक्ती यापासून मुस्लिम सत्यशोधक मंडळ, त्यांचे सदस्य आणि कार्यकर्ते दूर राहतील.

**● सेक्युलॅरिझम व निरिश्वरवाद याबद्दल भूमिका :**

धर्म, जाती, लिंग, वर्ण, भाषा इ. कसलेही भेद न मानता सामजिक न्याय आणि समता या मानवी मूल्यांवर आधारीत एकात्म समाज निर्माण करण्यास सहाय्यभूत विचारप्रणाली म्हणजे सेक्युलॅरिझम हा सेक्युलॅरिझमचा अर्थ मुस्लिम सत्यशोधक मंडळाला अभिपेत आहे. अशा तऱ्हेचा एकात्म समाज निर्माण करण्यात मुख्य अडसर असतो तो धर्मसत्तेचा. मग ते धर्मसत्ता कुठल्याही प्रकारची असो, म्हणून समाजकारण, राजकारण आणि धर्मसत्ता यांची फारकात केल्याशिवाय सामाजिक न्याय व समता यावर आधारित एकात्म समाज निर्माण करता येणार नाही अशी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची धारणा आहे. त्याबरोबर सेक्युलॅरिझम

म्हणजे निरिश्वरवाद हे समीकरणही मुस्लिम सत्यशोधक मंडळाला मान्य नाही. व्यक्ती स्वातंत्र्याचा भाग म्हणून एखादी व्यक्ती निरिश्वरवादी असू शकते. त्याला कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही. पण निरिश्वरवादाचे समर्थन, पुरस्कार किंवा विरोध करणे ही मुस्लिम सत्यशोधक मंडळाची भूमिका नव्हती व पुढेही असणार नाही.

**● भारतीय मुस्लिम समाजाच्या विकासाचे स्वप्न :**

स्वातंत्र्यानंतर सर्व राजकीय पक्षांचा फक्त मतपेटी म्हणून वापर केला आहे. त्यामुळे समाजाचे रोजी रपटी व आर्थिक विकासाचे प्रश्न सतत दुर्लक्षित राहीले आहेत. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या अनेक आयोगांच्या व सर्वक्षणांच्या अहवालातून हे विदारक सत्य बाहेर आले आहे. सुदैवाने केंद्र शासनाने अलिकडे या वास्तवाची दखल घेऊन मुस्लिम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी ठोस पावले उचलण्याचे जाहीर केले आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळ अशा नव्या शासकीय धोरणांचा सतत पाठपुरावा करेल. त्याच बरोबर अन्य मागासवर्गीयांच्या विकासासाठी ज्याप्रमाणे शासकीय सवलती, सुविधा मिळतात त्या मुस्लिम समाजातील दुर्बल घटकांनाही मिळाव्यात म्हणून मुस्लिम सत्यशोधक मंडळ आग्रही राहील. मुस्लिम सत्यशोधक मंडळ समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी विविध पातळीवर प्रयत्नशील राहील.

**● मुस्लिम महिलांच्या समस्या :**

मुस्लीम महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्याय व अत्याचाराचे प्रश्न मुस्लिम सत्यशोधक मंडळाने नेहमीच ऐरणीवर आणून ते दूर करण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न केले आहेत. शरियत दैवी असल्यामुळे अपरिवर्तनीय आहे, अशी उलेमांची भूमिका आहे. वास्तविक मुस्लमांच्या विविध पंथामध्ये सुध्दा एकाच प्रकारचे शरियत कायदा नाहीत किंबहुना त्यात प्रचंड विविधता आहे, म्हणून जगातील अनेक मुस्लिम राष्ट्रांनी शरियत कायद्यात कालसुसंगतबदल करून एका दमात तीन तोंडी तलाक देण्यास प्रतिबंध करण्यासारखे कायदे केले आहेत. ब्रिटिशांनी १९३७ साली केलेल्या कायद्यातही कालसुसंगत व न्याय बदल झाले पाहीजेत असे मंडळाची भूमिका आहे. मुस्लिम महिलांना संविधानात्मक अधिकार मिळावेत तसेच मुस्लिम समाजाने अशा कायद्याचे स्वागत करावे यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ प्रयत्नशील राहील.

**● देशासमोरील समस्या :**

काश्मिर, दहशतवाद, बाबरी मशिद - राम जन्मभूमी, समान नागरी कायदा या सारख्या प्रश्नावर भावी काळात निर्माण होणाऱ्या संवेदनशील समस्यांबाबत मुस्लिम सत्यशोधक मंडळ नेहमी बुध्दिवादी व वैज्ञानिक दृष्टीकोन आणि न्याय व देशहित यांच्याशी सुसंगत अशी भूमिका घेईल व आग्रही राहील.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या चळवळीचे वर्तमान व भावी कार्यक्रम निश्चित करताना भारतीय संविधान, त्यात अभिप्रेत असलेली समाजिक न्याय, समता व बंधुत्व ही मानवी मूल्ये, समान नागरिकत्व, त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्ये याबाबी आधारभूत धरूनच मुस्लिम सत्यशोधक मंडळ आपल्या कार्यक्रमांची भावी दिशा निश्चित करेल. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने आपल्या जाहीरनाम्यातील ध्येयानुसार गेल्या पन्नास वर्षापासून आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.

**१३. हमिद दलवाई इस्लामिक रिसर्च  इन्स्टिट्यूट :**

हमिद दलवाई यांनी आपल्या मृत्यूपत्रामध्ये आपले स्मारक नसावे अशी इच्छा व्यक्त केली होती. स्मारकाऐवजीकस जागतीक पातळीवरील इस्लामचा चिकित्सक अभ्यास व्हावा यासाठी एखादे ग्रंथालय, किंवा संशोधन संस्था निर्माण व्हावी, अशी ही अपेक्षा व्यक्त केली होती.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात १९९५ मध्ये हमिद दलवाई यांच्या इच्छेनुसार 'हमिद दलवाई इस्लामिक रिसर्च  इन्स्टिट्यूट' ची स्थापना करण्यात आली. मेहरून्निसा दलवाई यांनी यासाठी पुढाकार घेतला. उद्घाटन प्रसंगी हमिद दलवाई यांच्या गुरूस्थानी असणाऱ्या प्राचार्या कुलसुम पारीख प्रा. मे. पु. रेगे, प्रा. फ. म. शहाजिंदे उपस्थित होते. समाजवादी नेते भाई वैद्य, दलवाईंचे मित्र साहित्यिक दिलीप चित्रे यांनी या संस्थेला सहकार्य केले. इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष म्हणून मेहरून्निसा दलवाई व सचिव  अन्वर राजन, प्रा. डॉ. तांबोळी यांनी काम पाहीले.

**१४.  मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे विविध मंच :**

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने विविध मंच स्थापन करून कार्य चालविले जाते. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका (त्रैमासिक), मुस्लिम सत्यशोक महिला मंच, मुस्लिम सत्यशोधक युवा मंच, हमिद दलवाई स्टडी सर्कल, प्रोग्रेसिव्ह मुस्लिम फोरम या मंचच्या माध्यातून आजही मंडळाचे कार्य निरंतर सुरू आहे.

**१५.  मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे नियमित उपक्रम :**

मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे बकरी ईद दिवसी रक्तदान शिबीर, २२ मार्च हा वर्धापनदिनानिमित्त चर्चासत्र व समाजप्रबोधन पुरस्कार मुस्लिम समाजातील विशष योगदान करणाऱ्या महिलांना सत्यशोधक फातीमाबी शेख कार्य गौरव सन्मान देऊन सन्मानीत केले जाते. ३ मे सत्यशोधक हमिद दलवाई व सत्यशोधक दिनकरराव जवळकर यांचा स्मृतीदिन, ११ नोव्हेंबर मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. स्वातंत्र्य सैनिक व मंडळाचे पहिले अध्यक्ष बाबूमियॉ बँडवाले यांच्या नांवे राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार मंडळामार्फत देण्यात येतो.

**१५. राष्ट्रीय मुस्लिम महिला अधिकार परिषद, पुणे, २०१६ :**

२६ नोव्हेंबर २०१६ संविधान दिनी राष्ट्रीय  मुस्लिम महिला अधिकार परिषद पुणे येथे आयोजीत  केली होती. या परिषदेत सायरा बानू यांचा सत्कार करण्यात आला. काशीपूर (उतराखंड) येथील तलाक पीडीत सायरा बानू यांनी सर्वोच्च न्यायालयात याचीका दाखल करून तोंडी तलाक  पध्दत रद्द करण्याची  दाखल केली. यावर  २२ ऑगस्ट २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालायने  तोंडी तलाक संविधान बाह्य असल्याचा निवाडा दिला. परिणामी आताच्या सरकारने २०१९ मध्ये तलाक 'मुस्लिम महिला विवाह संरक्षण कायदा २०१९' (तलाक बंदी विधेयक)  पास केला. या परिषदेच्या माध्यमातून मंडळाने सायरा बानी यांच्या लढयाचा सन्मान केला.

● **सारांश :**

मुस्लिम सत्यशोधक मंडळ विशिष्ट ध्येय आणि हेतू आणि प्रेरणेने काम करीत आहे, या चळवळीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या इतर चळवळींच्या तुलनेत कमी असली तरीही सर्व मंडळी ध्येयवादी आहे. हमीद दलवाई यांच्या पासून काम करणारे बाबूमियाँ बँडवाले, हुसेन जमादार, सय्यदभाई, मेहरीन्निसा दलवाई, आयेशा जमादार, मुमताज रहिमतपुरे, प्रा. आशा अपराध, ॲड. नजमा शेख, प्राचार्य कुलसुम पारेख यांनी मंडळाचे काम सर्वदूर नेले आहे. वजीर पटेल, प्रा. फक्रुद्दीन बेन्नूर, अब्दुल कादर मुकादम, यांनीही मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी योगदान दिले आहे. वर्तमान स्थितीत नवविचारांनी प्रेरीत झालेली नवी पिढी मंडळाचे काम पुढे नेत आहे. सध्याचे मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शमसुद्दीन तांबोळी, प्रा, साहीरा मुलाणी, प्रा.जमीर शेख, बशीर शेख, प्रा. अजरूद्दीन पटेल, प्रा. डॉ. बेनझीर तांबोळी, तमन्ना इनामदार या नव्या व जुन्या दमाच्या कार्यकर्त्यांनी मंडळाचे कार्य सुरू ठेवले आहे. पन्नास वर्षाचा वैचारिक कृतीशिल प्रवास हे मंडळाचे वैशिष्ट्य आहे. हमीद दलवाईच्या अथक परिश्रमातून उभी राहीलेली ही वैचारीक चळवळ ताकदीने पुढे जाण्यासाठी मुस्लिम समाजातील तरूणांनी पुढे यावे अशी मंडळाची आजही अपेक्षा आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळ धर्माला विरोध करत नाही तर धर्माचा आधार घेऊन होत असलेल्या शोषणाला विरोध करते.विशेषत: स्त्रियां संदर्भातील शरियतचा दृष्टीकोन बदलायला हवा अशी वैचारिकता घेऊन काम करीत आहे, ही भूमिका मानवतावादी असून माणसाला माणूस म्हणून पतिष्ठा मिळायला हवी याचा आगह धरणारी आहे. जे कालबाह्या आहे व मानवता विरोधी आहे त्याला विरोध करावयास हवा आजचे जग विज्ञानवादी विचारांनी भारलेले आहे. त्यामुळे कोणताही विचार मांडतांना त्याला प्रामाणिक आधार घ्यावा, त्याचा चिकित्सक वृतीने अभ्यास करावा. २१ व्या शतकात संपूर्ण जगभर मूलतत्ववादी विचारसरणी हैदोस घालत असताना शांततामय जगाची स्थापना करण्याचे सामर्थ्य मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या विचारधारे मध्ये आहे असे मंडळाचे मत आहे. १८ एप्रिल १९६६ रोजी हमिद दलवाई यांनी तोंडी तलाकविरूद्ध सात तलाक पिडीत महिलांचा मुंबई मंत्रालयावर मोर्चा काढला होता. आज जवळपास पन्नास वर्षानी तोंडी तलाक बंद करण्याच्यादृष्टीने निर्णय घेण्यात आला. तिहेरी तलाक प्रथेला त्याकाळात विरोध करणारे हमिद दलवाई यांचे द्रष्टेपण आज आधोरेखित होत आहे. परंपरावादी समाजाच्या विरोधाला त्यांना तोंड द्याव लागले कारण त्यांनी धर्मातील चालीरितीपेक्षा संविधानातील मूल्यांना अधिक महत्व दिले. सध्या प्रतिकूल परिस्थितीत मुस्लिम सत्यशोधक मंडळास मुस्लिम जमातवाद्या बरोबरच हिंदूत्ववाद्या विरूद्ध लढणे भाग पडत आहे असे मंडळाचे मत आहे. हमिद दलवाई यांच्या विवेकवादी विचारांची लढाई पुढे कशी घेऊन जावी या विचारातून सध्या मुस्लिम सत्यशोधक मंडळ समविचारी संघटनासोबत कार्यक्रम राबवित आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा उद्देश, मुस्लिम समाजात आत्मटिकेची मानसिकता विकसीत करून त्यांना आत्मकल्याणाचे मार्ग शोधण्यास प्रवृत करणे हा आहे. मुस्लिम सत्यशोधक समाजाने सातत्याने महिलांचे प्रश्न, जमातवादा विरोधात अभियान असे कार्यक्रम घेतले आहेत. मुस्लिम सत्यशोधक चळवळ आता पन्नाशी कडे जात आहे. मुस्लिम समाजामध्ये अशा प्रकारच्या प्रबोधन व जागृतीचे काम करणारी ही एकमेव चळवळ आहे.

मुस्लिम समाजात अनेक अंधश्रध्दा आहेत त्याविरूद्ध संघर्ष आणि लोकशिक्षण मंडळातर्फे चालू आहेत. बुध्दिप्रामाण्य, विज्ञान व विवेकवादी समाज निर्मिती तयार करताना अनंत अडचणी येणार त्याची पर्वा न करता मंडळाचे कार्य अविरत चालू आहे. 'भारतीयत्वाचा अभिमान संविधानाचा सन्मान' हे ब्रीद घेऊन मडंळ वाटचाल करीत आहे.

● **स्वयं अध्यंयनासाठी प्रश्न -१**

**अ) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिली आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना यादिवसी झाली.

अ. २३ मार्च १९३१ ब. १५ जुलै १९७१

क. -- २२ मार्च १९७० ड. १७ ऑगस्ट १९७५

२. हमिद दलवाई यांचा जन्म कधी झाला.

अ. २९ सप्टेंबर १९३२ ब. २२ मार्च १९३३

क. ६ ऑक्टोबर १९५० ड. १५ ऑगस्ट १९३५

३. १९७१ रोजी ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकींग मुस्लिम्स कोठे घेण्यात आली.

अ. मुंबई ब. पुणे क. चेन्नई ड. नवी दिल्ली

४. १९७१ च्या मुस्लिम महिला परिषदेच्या अध्यक्षा कोण होत्या.

अ. नजमा शेख ब. शरीफा तय्यबजी

क. रूबिना पटेल ड. आशा अपराध

५. हमिद दलवाई यांचा मृत्यू या दिवशी झाला.

अ. २६ मे १९७२ ब. १५ फेब्रुवारी १९८० क. ३ मे १९७७ ड. २६ एप्रिल १९७७

**ब) खालील उप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. १८ एप्रिल १९६६ रोजी हमिद दलवाई यांच्या मोर्चात किती महिला सहभागी झाल्या होत्या ?

२. हमिद दलवाई यांनी कोणत्या दैनिकात पत्रकारिता केली ?

३. मुस्लिम सत्यशोधक पत्रिकेचा पहिला अंक केंव्हा प्रकाशित झाला. ?

४. मुस्लिम सत्यशोधक मंडळातर्फे तलाक मुक्ती मोर्चा अभियान कोणत्या शहरातून सुरू झाला. ?

५. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष कोण आहेत. ?

### ३.२.२. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष :

**※ प्रस्तावना**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक राजकीय पक्षानी आपली कामगीरी पार पाडली. १९२० नंतर रशियातील कामगार क्रांतीचा भारतीय राजकारण समाजकारण व कामगार चळवळीवर परिणाम झाला. याच दरम्यान मानवेंद्रनाथ रॉय यांनी १७ ऑक्टोबर १९२० रोजी ताश्कंद येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. त्यानंतर भारतामध्ये कानपूर येथे डिसेंबर १९२५ मध्ये देशातील सर्व कम्यनिष्ट विचाराने भारवलेल्या कार्यकत्यांनी भारतातील भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. प्रारंभी कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व कॉ. श्रीपाद अमृत डांगे, मुज्जफर अहमद, पी सी. जोशी, रजनी नागदत्त व शौकत उस्मानी या नेत्यांनी केली.

महाराष्ट्रातील कम्युनिस्ट पक्षाच्या वाटचालीचा विचार करता प्रारंभी या पक्षाचे नेतृत्व कॉ. श्रीपाद अमृत डांगे या उतुंग व्यक्तीमत्वाकडे जाते. कम्युनिस्ट पक्षाने भांडवलशाही, साम्राज्यशाहीविरूद्ध लढा आपल्या केंद्रस्थानी ठेवला. शोषण मुक्ती शेतकरी कामगारांचे हक्क व शांततामय मार्गाने लाकशाही समाजवादाची स्थापना करणे या ध्येयाने कम्युनिष्ट पक्षाने कार्य केले. स्वातंत्र्यानंतर कम्युनिस्ट नेत्यांनी शेतकरी कामगारांच्या लढयातून आपल्या लढ्याचा व हक्काचा संघर्ष चालूच ठेवला होता. भारतीय कम्युनिष्ट पक्ष (भाकपा) १९६४ मध्ये दुभंगला व त्यातून भारताचा कम्युनिस्ट पक्ष -मार्क्सवादी (माकपा) हा नविन पक्ष स्थापन झाला. कॉ. शरद पाटील विद्यार्थी दशेपासून भारतीय कम्युनिस्ट पक्षात सक्रिय होते. पक्ष फुटी नंतर ते भारतीय कम्युनिस्ट पक्ष - मार्क्सवादीत ( माकपा) दाखल झाले. प्रचंड प्रतिभा, व्यासंग व संशोधक वृत्ती असनाऱ्या कॉ. शरद पाटील यांनी अनेकदा लढयांमुळे तुरूंगवास भोगला. १९७८ मध्ये जातिव्यवस्थेच्या प्रश्नावरून त्यांनी मा.क.प. चा राजिनामा देऊन मार्क्सवाद =फुलेवाद= आंबेडकरवाद तत्वावर आधारीत सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली व हयातभर त्यांनी या पक्षाच्या झेंडयाखाली काम केले. महाराष्ट्राच्या राजकिय सामाजिक व वैचारीक जडणघडणीत सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष व कॉ. शरद पाटील यांचा अभ्यास, संघर्ष, लढे व तात्वीक मांडणी महत्वाची आहे.

**● कॉ. शरद पाटील यांचे जीवन व कार्य :**

महाराष्ट्रातील धुळे जिल्हयात महात्मा फुले यांच्या अनुयायांनी सत्यशोधक चळवळीच्या प्रसारांचा प्रसार खेडयापाडयात पाहोचविला होता. ब्राह्मणी हणी कर्मकांडाविरोधात चिकित्सक दृष्टीकोन घेवून या सत्यशोधकी अनुयायांनी कार्य केले होते. धुळयातील अशाच एका सत्यशोधकी कुटुंबात १७ सप्टें. १९२५ रोजी शरद पाटील यांचा जन्म झाला. त्यांचे वडील तानाजी तुकाराम पाटील हे सत्यशोधकी विचाराचे कार्यकर्ते होते. शिक्षण विभागातील नोकरी सांभाळत त्यांनी सत्यशोधकी विचाराचा वसा जोपासला होता. त्यामुळे बालपणापासून शरद पाटील यांच्यावर सत्यशोधकी संस्कार झाले. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण धुळे येथेच झाले. शालेय जिवनात त्यांना चित्रकला व अवांतर वाचनाचा व्यासंग जडला. मुबई येथील सर जेजे स्कुल ऑप आर्ट त्यांनी प्रवेश घेतला. राज्यव्यापी विद्यार्थी संपामुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. धुळयात आल्यानंतर त्यांचा परिचय कम्यनिष्ट नेत्यांशी झाला. १९४५ साली शाहीर अमर शेख, शाहीर आण्णाभाऊ साठे, शाहीर द. ना.

गव्हाणकर यांच्याशी त्यांचा संपर्क आला. यानंतर त्यांनी १९४६ पासून जिवनदानी (पुर्णवेळ) कम्युनिस्ट (भारतीय कम्युनिस्ट पक्ष) कार्यकर्ता म्हणून आपल्या राजकिय कार्याला सुरूवात केली. पुढील काळात जेष्ट कम्युनिस्ट नेते कॉ. बी टी रणदिवे यांच्याशी त्यांची ओळख झाली. १९४७ अखेरीस ते पक्षाच्या शेतकरी आघाडीवर ते काम करू लागले. १९४८ नंतर कम्युनिस्ट पक्षाच्या जहाल कार्यकर्त्यांची देशभर धरपकड झाली. यातच धुळ्याच्या कापड कामगार संपामुळे त्यांना धुळे नंदूरबार व नाशिक भागातून हद्दपार व्हावे लागले. हद्दपारी मोडल्यामुळे त्यांना ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली. कारागृहातून सुटताच त्यांना पून्हा हद्दपार व्हावे लागले. त्यावेळी पक्षाचे महाराष्ट्र सेक्रेटरी कॉ. शामराव परूळेकर यांनी ५० आरोपांचे चार्जशिट बजावून त्यांना पक्षातून काढून टाकले. १९५२ मध्ये ते पुन्हा पक्षात सक्रिय झाले. १९५५ साली त्यांनी गोवा मुक्ती सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतला. १९५५-५६ साली संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही ते सक्रिय राहिले. १९५६ मध्ये तापी नदीवर धरण उकाई येथे धरणाचे काम सुरू झाले. उकाई धरणामुळे विस्थापित होणाऱ्या धरणग्रस्थांचा लढा त्यांनी उभारला. मुंबई प्रांतातील धरणग्रस्थांचा हा पहिलाच लढा होता. याच दरम्यान त्यांनी जातीच्या प्रश्नावर अभ्यास सुरू केला. १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या दरम्यान महाराष्ट्रात भुमिहिनांच्या जमिन हक्कांची लढाई सुरू झाली. भारत चीन युध्दाच्या वेळी भारत विरोधी असल्याच्या आरोपावरून त्यांना दिड वर्षाचा तुरूंगवास भोगावा लागला. ६ महिने बाहेर आल्यानंतर पुन्हा दिड वर्षे १९६४-६५ साली नाशिकच्या जेलमध्ये त्यांना स्थानबध्द करण्यात आले. औरंगाबाद व नाशिक जेल मध्ये असताना त्यांनी कार्ल मार्क्स यांचा 'भांडवलवाद' हा ग्रंथ समजावून घेतला. ग्रंथाची चित्रमय टिपणें काढली, ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात मार्क्सने सोडविलेले गणित चुकिचे असल्याचे लक्षात येताच त्यांनी कॉ. बी टी. रणदिवे यांना पत्र पाठविले. रणदिवे यांनी सर्व चित्रमय टिपणे त्यांनी मागवून घेतली. त्यानंतर कॉ. शरद पाटील बडोद्याला गेले. १९६८ साली बडोद्याहून परत आल्यानंतर त्यांनी आदिवासी भागात काम सुरू केले. यानंतर शेतमजूर व गरीब शेतकऱ्याचा लढा उभा केला. साक्री व नवापूर तालुक्यातील आदिवासी भुमिहीनांची जंगल पिडीत जमिन चळवळीत त्यांनी सहभाग घेतला. पक्षाची जनसंघटना असलेल्या किसान सभेच्या माध्यमातून त्यांनी अनेक सत्याग्रह केले. हे लढे सुरू असताना शासनाची दडपशाही सुरूच होती. व दुसरीकडे अभ्यास व संशोधन चालूच होते. याच दरम्यान १९७२ मध्ये 'दास - शुद्रांची गुलामगिरी' हा महान ग्रंथ लिहून पूर्ण केला.

नंतरच्या कालखंडात पक्षात जातीच्या प्रश्नावरून संघर्ष दिवसेनदिवस वाढतच गेला. आणिबाणीत त्यांना विसापूरच्या जेलमध्ये जावे लागले. यानंतर त्यांनी १९७७ साली हिंदू कोडबिलावर आधारित कायदे आदिवासी स्त्रियांना लावायच्या मागणीसाठी पक्षाने भारतभर चळवळ उभारावी असा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व असणाऱ्या गोदुताई परूळेकर व अहिल्याताई रांगणेकर यांनी नाकारला. त्याच वर्षी मराठवाड्यात जातीय दंगली उसळली व पक्षामधला संघर्ष अधिकच टोकाला गेला. माकप ने जातिव्यवस्थेविरूद्ध लढा उभारण्यासाठी नकार दिला. मात्र शरद पाटील यांनी पक्षाकडे जाविव्यवस्थे विरूध्दचा लढा उभारण्यासाठी आग्रह धरला. या वैचारीक संघर्षाची परिणिती पक्ष सोडण्यामध्ये झाली. अखेर त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा राजिनामा देवून आपल्या सहकाऱ्यांसमवेत मार्क्सवाद - फुले- आंबेडकरवाद या

विचारसरणीवर आधारीत सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९७८ साली केली. पारंपारीक साम्यवादी पक्ष व संघटनांच्या धोरणात्मक मर्यादा छेदून त्यांनी शोषण मुक्तीचा नवा अजेंडा पुढे आणला. जातिव्यवस्थेविरूध्द लढा, शेतकरी लढा, आणि आदिवासी स्त्रीयांच्या समान हक्कासाठीचा लढा या तीन प्रवाहांच्या एकजूटीची हाक त्यांनी दिली. पक्षाच्या स्थापनेनंतर त्यांनी महाराष्ट्रातील महत्वपूर्ण अशा सर्व लढयात सहभाग घेतला. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या सत्याग्रहात दोन हजार आदिवासी सत्याग्रही घेवून ते सहभागी झाले. या सत्याग्रहात त्यांना तुरूंगवास भोगावा लागला. नामांतराच्या या ऐतिहासीक लढयात त्यावेळचा ऐकमेव राजकिय पक्ष सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष सहभागी झाला होता हे विशेष आहे. पक्षाच्या नेतृत्वाखाली चांदवड येथे झालेल्या शेतकरी स्त्री संघटनेच्या मेळाव्यात पक्षाच्या नेत्या नजुबाई गावित यांच्या नेतृत्वाखाली शंभर किमी पायी चालत एक हजार स्त्रीया सहभागी झाल्या. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने असे लढे सुरूच होते. अशाच परिस्थीतीत सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचा विचार सर्वदूर जाण्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक मार्क्सवादी' हे मासिक सुरू केले. हे मासिक म्हणजे पक्षाची वैचारीक भुमिका पुढे घेवून जानारे मुखपत्रच होते.

याच काळात महाराष्ट्रात दलित पँथर ने जातिविरोधी विचार व्यवहाराचा प्रश्न केंद्रस्थानी आनला होता. १९७८ पासून नामांतर चळवळीने गती घेतली होती. परिणामी जातीव्यवस्था अंताच्या प्रबोधनाची गरज प्रकर्षाने पुढे आली. सत्यशोधक चळवळीचा जातिविरोधी वारसा आणि कम्युनिस्ट चळवळीचा वर्गविरोधी वारसा यांचा समन्वय करून मार्क्स फुले आंबेडकरावादाचा (माफुआ) जो अब्राह्मणी दृष्टीकोण होता. तो लोकांपर्यंत नेण्यासाठी 'सत्यशोधक मार्क्सवादी' अंकाचा वापर केला. १९८२ ते ९२ या काळात त्यांनी विविध आंदोलने करून आदिवासींचा लढा अखंडपणे चालू ठेवला. यातूनच पश्चिम भारतीय स्वायत्त आदिवासी (जनस्थान) राज्याची मागणी केली.

महाराष्ट्राच्या साहित्य संस्कृतीच्या चळवळीमध्ये सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष व कॉ. शरद पाटील यांचे महत्वाचे योगदान राहिले आहे. अब्राम्हणी सौंदर्यशास्त्रीची मांडणी करून त्यांनी दलित- आदिवासी - ग्रमीण साहित्याची नाळ प्राचिन अब्राम्हणी चळवळीशी जोडली. शरद पाटील यांनी इतिहास संस्कृती, समाजकारण, अर्थशास्त्र, या विषयावर विपूल लेखन केले. भारतीय तत्वज्ञान, प्राच्यविद्या, व मार्क्सवादी तत्वज्ञान याची मांडणी त्यांनी सविस्तरपणे केली. भारतातील जातिव्यवस्था ही शोषणाची पायाभूत व्यवस्था आहे. हे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. यासाठी त्यांनी मुलगामी लेखन केले. दासशुद्रांची गुलामगिरी, जातीव्यवस्थाक सामंती सेवकत्व, प्रिमिटीव्ह कम्युनिझम मातृसत्ता-स्त्रीसत्ता व भारतिय समाजवाद या ग्रंथातून त्यांनी ऐतिहासीक भौतिकवाद, समाजवादी सौत्रांतीक सौदर्यशास्त्र, तर्कशास्त्र यांची मांडणी केली. या खंडांव्यतिरीक्त त्यांची विपूल साहित्य संपदा आहे. १९९२ साली अयोध्या प्रश्नावर त्यांनी सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर प्रबोधन मोहिम राबविली या प्रश्नावर आंदोलन लढे व प्रबोधनाच्या माध्यमातून त्यांनी जागृती केली. शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचे खरे कोण, महंमदी कि ब्राह्मणी या ग्रंथातून त्यांनी छ. शिवरायांचा खरा इतिहास मांडला. पुढील कालखंडात त्यांनी १९९९ साली अब्राह्मणी साहित्य व कला महासभेच्या जाहिरनाम्याचा मसूदा प्रसिध्द केला. आयुष्यभर कष्टकऱ्यांचा लढा लढणाऱ्या या 'योद्या कॉम्रेड' ने नव्या तर्कशास्त्राची मांडणी करत सौत्रांतीक मार्क्सवाद व सौंदर्यशास्त्रावर २००४ ते २०१० या काळात महाराष्ट्रभर

वादळी व्याख्याने दिली. मार्क्सवादाला फुलेवाद व आंबेडकरवाद यांची जोड दिल्याशिवाय भारतीय समाज व इतिहास समजू शकत नाही अशी मांडणी करणाऱ्या व लढवय्या कार्यकर्ता ते तत्वज्ञानी असा प्रवास करणाऱ्या महान कॉम्रेडचा मृत्यू १२ एप्रिल २०१४ साली झाला.

**⁕ माकप शी मतभेद व सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना :**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात (माकप) असताना पक्षाच्या राजकीय धोरणातील मतभेद, पक्षांतर्गत व संघटनांतर्गत मतभेद व वैचारीक मतभेदामुळे शरद पाटील यांना सतत संघर्ष करावा लागला. या संघर्षाचा परिणाम म्हणजे माकपचा राजिनामा देवून सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. माकपच्या राष्ट्रीय नेतृत्वाच्या आकलनाबाबतही कॉ. शरद पाटील यांनी लक्ष वेधले. माकपच्या वरिष्ठ नेतृत्वाचे इतिहासाबाबतचे आकलन कसे चुकिचे आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. संस्कृतीचे निर्माते व वाहक हे उच्चवर्णीय नसून स्त्रीया, शुद्रातीशुद्र असतात असे त्यांनी सांगीतले. हे त्यांचे मत म्हणजे मार्क्सवादी पोथीनिष्ठतेवर हल्ला होता.

वर्गजातस्त्रीदास्यअंत हा त्यांच्या आयुष्याच्या कार्याचा गाभा होता. भांडवली व्यवस्थेत होणारे वर्गीय शोषण, समाजातील जातीची उतरंड आणि त्यातून निर्माण होणारी विषमता, स्त्रीचं सर्वांगीण दुय्यमत्व या गोष्टी संपवायच्या असतील तर कोणतीही एक विचारपध्दत, विचारसरणी त्यासाठी अपुरी आहे. देशातल्या सर्वसामान्य स्त्री – पुरूषांचं हे सर्वव्यापी शोषण थांबवयाचं असेल तर त्यासाठी लागणारं विचारसरणीचं हत्यारही तितकंच बहुअन्वेषी हवं, हा कॉ. शरद पाटील यांचा आग्रह होता. यातूनंच स्वत: मार्क्सवादी कम्युनिसञट पक्षात पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करत असतानाही त्यांनी परंपरागत मार्क्सवादाची शोषणाकडे केवळ वर्गीय दृष्टीकोनातून पाहण्याची एकारलेली दृष्टी नाकारली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात जातीचा मुद्दा पुढे आणला. या देशात मार्क्सवाद रूजायचा असेल तर त्याला जातव्यवस्थेची दखल घेत जातीअंताची भूमिका घ्यायला हवी, हा त्यांचा आग्रह होता. भूमिकेमुळे कॉ. शरद पाटील यांना पक्षाकडून नोटीस देण्यात आली. या नोटीसला त्यांनी उत्तर दिले. शेवटी संघर्ष वाढत गेला कॉ. शरद पाटील यांनी पक्षाचा राजीनाम दिला व १५ ऑक्टो. १९७८ ला पानखेडयाचा चिंचपाडा, ता. साकरी, जि. धुळे येथे सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली. पक्षाच्या स्थापना परिषदेत बुध्द, मार्क्स, फुले, आंबेडकर यांचे पोटो ठेवण्यात आले. जातवर्ग स्त्रीदास्याच्या अंतासाठी डाव्या लोकशाहीवादी शक्तींची डावी आघाडी स्थापन करणार असल्याचे कॉ. शरद पाटील यांनी घोषीत केले. पक्षासमोर बुध्द धम्माच्या भिक्कू संघाचा आदर्श ठेवला. परिषदेला पाच हजार कार्यकर्ते उपस्थीत होते. पक्षाच्या स्थापना अधिवेशनास प्रमुख पाहुणे म्हणून कष्टकऱ्यांचे लढावू नेते डॉ. बाबा आढाव हे होते. पक्षाच्या अध्यक्ष पदी कॉ. नजुबाई गावित  व सरचिटणीस पदी कॉ. शरद पाटील यांची निवड करण्यात आली. अशा पध्दतीने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षासोबत राजकिय, संघटनात्मक, जातिच्या प्रश्नावर वैचारीक संघर्ष करून जातवर्गस्त्रीदास्याच्या अंताची अब्राम्हणी भुमिका घेवून सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली.

**⁕ सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची घटना व धोरण**

१५ ऑक्टो. १९७८ ला सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली. पक्षाची घटना व धोरण

पुढील प्रमाणे ठरविण्यात आले. पक्षाचे नाव  सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष असे असेल. पक्षाच्या ध्येयामध्ये हा पक्ष जातीव्यवस्थेचे निर्मूलन करण्यासाठी, वर्गव्यवस्थांचे निर्मुलन करण्यासाठी, कामगार वर्गाचे आग्रदल राहिल. जातीभेद, वर्गभेद, स्त्रीपुरूष विषमता, यांचे निर्मूलन करण्यासाठी प्रथम समाजवादाची व नंतर साम्यवादाची उभारणी करणे हे पक्षाचे धेय राहिल. यासाठी पक्षाचे तात्वीक अधिष्ठाण म्हणून मार्क्सवाद, फुलेवाद, आंबेडकरवाद राहिल. पक्षाचा झेंडा हा रूंदीच्या दीडपट लांब लाल रंगाच्या पृष्ठभुमीवर श्रमिक एकजुटीचे प्रतिक असलेला विळा हतोडा व त्याच्या उजव्या बाजूला जातिभेद निर्मूलनाचे प्रतिक असलेली तुटलेली श्रृंखला असा पक्षाचा झेंडा निश्चित करण्यात आला. पक्षाच्या घटनेत सभासदत्वाबाबत धोरण ठरविण्यात आले. पक्षाचा कार्यक्रम धोरण व घटना मान्य असलेली पक्षाचा एका संघटनेत काम करणारी आणि दरवर्षी पक्षाची वर्गणी व लेव्ही भरणारी आठरा वर्षावरील भारतीय व्यक्ती एक वर्ष उमेदवारी केल्यानंतर पक्ष सभासद होवू शकेल.

पक्षाने आपल्या घटनेत प्रतिज्ञा, पक्ष सभासदत्वांची कर्तव्ये व हक्क याबाबत धोरण निश्चित केले. पक्षाने पक्षसंघटनेत लोकशाही मध्यवर्तीत्वाचा सुत्र स्विकारले. अखिल भारतीय पक्ष परिषद पक्षाची केंद्रीय समिती अशी पक्षाची रचना राहिल. पक्षाच्या घटनेत पक्ष शिस्तीचा व पक्षघटनेत दुरूस्ती करण्याचा मुद्दा सुध्दा समावेश करण्यात आला आहे. १९७८ पासून सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची वाटचाल या घटनेनुसार व धोरणानुसार सुरू आहे.

- **सकपचे लढे व कार्य :**

**१. आदिवासी जमिनीचा लढा :**

सत्यशोधक कम्युनिष्ठ पक्षाच्या वतीने आदिवासींच्या वन अतिक्रमणाचा लढा अखंडपणे सुरू आहे. वनजमीनींची चळवळ उभी राहिल्यानंतर १९७४ पासून शासनाची दडपशाही सुरू झाली. आदिवासींना विरोध करण्यासाठी एसआरपी ची तुकडी लावली गेली. मात्र तरीही लोकांनी रात्रीतून शेत पेरून आपले उद्दीष्ट पूर्ण केले. १९७६ पुन्हा एकदा सरकारच्या दडपशाही विरोधात जोमाने चळवळ सुरू झाली. दडपशाही सुरूच होती. तरीही शेकडोंच्या संख्येने लोकांनी जमिनीची मोजणी करून त्याच्या नोंदणी साठी शासनाकडे निवेदन दिले. आदिवासी भागातील शेती पिकायला लागली. या वरून खासगी शेतकऱ्यांचे डोळे पाटले. आदिवासींनी जमिन कसायला घेतली त्यामुळे या शेतकऱ्यांना मजूर मिळेनासे झाले. मग पुन्हा दडपशाही सुरू झाली. आदिवासी भागातील गाव कारभारी पोलिस पाटील लढ्याच्या विरोधात गेले. १९८२ पर्यंत ही दडपशाही सुरूच होती. १९८२ ला पुन्हा धुळे व नंदुरबार जिल्हयात एसआरपी लावण्यात आली. या आंदोलनात कॉ. शरद पाटील यांना अटक करण्यात आली. तरी सुध्दा सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचा वन जमिन चळवळीचा लढा सुरूच होता.

**२. आदिवासी स्त्रीयांच्या समान हक्काचा लढा :**

आदिवासी स्त्रीया या कुटुंबव्यवस्थेच्या बंधिस्थ आहेत. विवाह, घटस्फोट  मालमत्ता, वारसा हक्क या कुटुंब कायद्यानी आदिवासी पुरूषांची पितृसत्ता कायम राहाते. त्यामुळे तील या जाचक रूढीगत कायद्यातून मुक्त

केले पाहिजे. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाने आदिवासी स्त्रीयांच्या समान हक्काचा लढा सुरू केला. कॉ. शरद पाटील यानी नवापूर व साकरी तालुक्यात प्रबोधन मोहिमा सुरू केल्या. आदिवासी स्त्रीयांसाठी सुधारीत हिंदू कोड बील या मागणीसाठ चळवळ सुरू केली. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या जन आघाडयांमार्पत व सत्यशोधक मार्क्सवादी अंकातून प्रबोधन सुरू केले. पक्षाच्या वतीने सभा, मोर्चे, व शिबिरे घेण्यात आली. आदिवासी स्त्रीयांच्या मुक्तीची ही चळवळ उघडपणे पितृसत्तांक कुटुंबाच्या विरोधातील चळवळ म्हणून उभी राहिली. या चळवळीचे नेतृत्व कॉ. साजुबाई गावीत, कॉ. नजुबाई गावीत, व कॉ. होमाबाई आदीवासी स्त्री कार्यकत्यांनी केले. चांदवड येथील शेतकरी चळवळीच्या स्त्री मेळाव्यात कॉ. नजुबाई गावित यांच्या नेतृत्वाखाली शभर किमी पदयात्रा करीत एक हजार स्त्रीया सहभागी झाल्या.

### ३. मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा :

महाराष्ट्र विधानसभेत १९७८ ला औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा प्रस्थाव मंजूर झाला. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर त्याच्या अंमलबजावणी साठी महाराष्ट्रामध्ये अभुतपूर्व असे नामांतर अंदोलन उभे राहिले. नामांतर लढा जातीव्यवस्थाविरोधातील चकमक असून शुद्रातीशुद्रांच्या मानचिन्हांना व प्रतिकांना या व्यवस्थेने सन्मान नाकारला. यामुळे या अंदोलनात दलित पँथर पाठोपाट सर्वाधिक सत्याग्रही कॉ. शरद पाटील यांच्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षातील होते. धुळे ते औरंगाबाद हा लाँग मार्च त्यांनी काढला. पक्षाचे २००० स्त्री पुरूष अनुयायी या संघर्षात उतरले. कॉ. शरद पाटील यांना व इतर नामांतरवादी कार्यकर्त्यांना आंदोलना दरम्यान अटक करण्यात आली. व सर्वांना ठाणे जेलमध्ये स्थानबध्द करण्यात आले. या दरम्यान कॉ. शरद पाटील यांची आई वारल्याची तार आली. आंदोलनातील कोणीही कार्यकर्त्यांने आंदोलनात तुरूंगवास झाल्यास जामिनावर सुटायचे नाही असा निर्णय घेण्यात आला होता. आईच्या मृत्यूची वार्ता करूनही जामिनावर सुटून अंत्यविधीस जाण्याचे कॉ. शरद पाटील यांनी नाकारले. या वरून व्यक्तीगत प्रश्नापेक्षा आपण स्वीकारलेल्या सार्वजणिक कामाला प्राधान्य देण्याची कठोर जिवननिष्ठा प्रत्ययास येते. नामांतराच्या ऐतिहासीक लढयात सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष हा एकमेव राजकिय पक्ष सहभागी झाला होता.

### ४. जातीव्यवस्था विरोधी लढा :

भारतात स्वातंत्रोत्तर काळात जातीव्यवस्थेचा प्रश्न अधिकच गंभिर होत होता. क्रांतीकारक म्हणविणाऱ्या पक्षांनी व नेतृत्वांनी त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. त्यामुळे जातीअंताचे लढे जात संघटनांचया झेंडयाखाली लढले जावू लागले. हे लढे जाती अंतक म्हणून क्रांतीकारक असूनही सत्ताधाऱ्यांना लाभाचे ठरत होते. यावर कॉ. शरद पाटील यांनी उत्तर म्हणून वर्गजातस्त्रीदास्यअंतक, मापुआ विचाराचा सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला. कॉ. शरद पाटील यांनी

### ५. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या जनसंघटना :

### अ. सत्यशोधक –ग्रामिण–कष्टकरी सभा :

सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्याची सत्यशोधक –ग्रामिण–कष्टकरी सभा ही एक लढावू जनसंघटना आहे.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, आदिवासींच्या सवलती, फॉरेस्ट प्लॉट जंगल खेडीतांच्या नावावर करणे, भुमीहीनांना वनजमिनींचे वाटप करणे या प्रश्नावर या जनसंघटनेने लढा उभा केला. या लढयाचा परिणाम म्हणून १९७८ मध्ये सरकारने जंगल खेडूतांना जमिनीचे कायदेशीर मालकी देण्यात यावी असा कायदा केला. पण त्याची योग्य अशी अंमलबजावणी झाली नाही. या जनसंघटनेने पक्षाच्या जोरावर हा लढा अखेरपर्यंत लढून जंगल खेडूतांना न्याय मिळवून दिला.

**ब. सत्यशोधक शेतमजूर सभा :**

सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची सत्यशोधक शेतमजूर सभा ही एक जनसंघटना आहे. २९ मार्च १९८१ रोजी पिंपळनेर, ता. साक्री, जिल्हा धुळे येथे सत्यशोधक शेतमजूर सभेची स्थापना करण्यात आली. पक्षाचे काम व्यापक व बिगर आदिवासी भागामध्ये वाढण्यासाठी व शेतमजुरांचे संघटन करण्यासाठी या सभेची स्थापना करण्यात आली. धुळे, नुदुरबार, नाशिक या जिल्हयात शेतमजूर सभेच्या कार्याचा विस्तार झाला. शेतमजुरांना दिवसाला सात तास काम, रोजगार हमी कामाचे दर वाढविणे, शोतमजुरांना वैद्यकिय मदत अशा विविध मागण्या सभेच्या माध्यमातून करण्यात आल्या. शेतमजुर सभेला अनेक वेळा शासकिय व प्रस्थापितांच्या दडपशाहीला तोंड द्यावे लागले.

**ड. सत्यशोधक विद्यार्थी संघटना :**

सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी सत्यशोधक विद्यार्थी संघटना स्थापन केली. या जन संघटनेच्या माध्यमातून धर्मनिरपेक्ष समतावादी शिक्षणासाठी, विद्यार्थ्यांवरील अन्यायाविरूध्द या संघटनेने लढे उभारले. दलित आदिवासी भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ व्हावी या साठी संघटनेने लढे उभारले. धुळे, नंदुरबार, नाशिक, पुणे या जिल्हयामध्ये शिष्यवृतीसाठी मोर्चे व मेळावे काढण्यात आले. शिष्यवृत्तीसह विविध प्रश्नावर ८ ऑगष्ट १९८९ रोजी सत्यशोधक विद्यार्थी संघटनेने महाराष्ट्राच्या विधान भवनावर मोर्चा काढला. ग्रामिण विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध व्हावित त्यांना सुविधा मिळावी यासाठी लढा उभारण्यात आला.

- **सत्यशोधक मार्क्सवादी अंक :**

दि. १० मार्च १९८२ या क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदीनादिवशी सत्यशोधक मार्क्सवादी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. हा अंक म्हणजे सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्रच ठरला. सत्यशोधक मार्क्सवादीच्या पहिल्या अंकाचे प्रकाश अंतरराष्ट्रीय किर्तीचे बौध्द महापंडीत डॉ. भदंत आनंद कौशल्यान यांच्या हस्ते झाले. या अंकाच्या संपादक मंडळात कॉ. शरद पाटील यांच्या सोबत संपादक म्हणून रणजित परदेशी तर सल्लागार संपादक म्हणून डॉ. रावसाहेब कसबे होते. मार्च १९८२ ते १९९३ पर्यंत सत्यशोधक मार्क्सवादी मासिक सुरू होते. अल्पावधीत या मासिकाने ज्ञानाच्या विविध शाखेत हस्तक्षेपाची भुमिका घेतली. वैचारीक क्षेत्रामध्ये जातीअंताचे राजकारण पुढे घेवून जाण्याचे काम केले.

● **अब्राम्हणी साहित्याचे सौंदर्यशास्त्राची मांडणी :**

१९८८ साली अब्राम्हणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र हे पुस्तक प्रसिध्द झाले. परंतू या पुस्तकाच्या आशयावर चर्चा न होता. शिर्षकावरच जास्त चर्चा झाली. महाराष्ट्राच्या सहित्य संस्कृतीच्या चळवळीमध्ये कॉ. शरद पाटील यांचे महत्वाचे योगदान राहिले. अब्राम्हणी सौंदर्यशास्त्राची मांडणी करून त्यांनी दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्याची नाळ प्राचिन अब्राम्हणी परंपरेशी जोडली. त्यांचे म्हणणे असे की, भारतामध्ये सौदर्यशास्त्र नव्हते केवळ साहित्यशास्त्र व अलंकारशास्त्र होते. पश्चिमात्य देशात भाडवलशाही लोकशाही क्रांतीनंतर सौंदर्यशास्त्र जन्माला आले. भारतात सरमजामदारी जातिव्यवस्था नष्ट झालेली नसल्यामुळे सौंदर्यशास्त्र जन्माला येणे शक्य नव्हते. पण बुध्दाने केलेल्या वर्णदासअंतक समाजक्रांतीनंतर उदयोन्मुख भांडवलदार व कारागिर यांच्यात समता आल्यामुळे दिग्नाग याने सौंदर्यशास्त्राचं प्रवर्तन जाहीर केले. पण सातव्या शतकानंतर जातिव्यवस्था कर्मठ होत गेल्यामुळे तत्वज्ञान व सौंदर्यशास्त्र अस्ताला गेले. या प्राचिन कालखंडानंतर कॉ. शरद पाटील हे मार्क्सवाद -फुले-आंबेडकर वादाचे सौंदर्यशास्त्र मांडतात. साहित्याच्या अब्राम्हणी परंपरेचा शोध घेत ते वैदीक काळापर्यंत जावून पाचव्या शतकातील दिग्नागापर्यत जातात. जाणिव-नेणीवेच्या तर्कशास्त्राची मांडणी करतात. यातून अब्राम्हणी साहित्यनिर्मीतीमागील मानसशास्त्रीय भुमिका ते स्पष्ट करतात. यामुळे निर्मीती मागील मनोभुमीकेपासूनच अब्राम्हणी साहित्याचे वेगळेपण समोर येते.

**सारांश :**

महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळी असणाऱ्या सत्यशोधक कम्युनिस्टाचा अभ्यास महत्वाचा आहे. कॉ. शरद पाटील या महान उत्तुंग व्यक्तीमत्वाच्या कामगिरीमुळे व त्यांनी मांडलेल्या नव्या विचारामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात व सांस्कृतिकक्षेत्रात या पक्षाचे महत्व अनन्य साधारण आहे. भारतीय प्राचीन इतिहासाची, संस्कृतीची नवी मांडणी हे कॉ. शरद पाटील यांच्या कार्याचे वेगळे वैशिष्टय होते. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची धुरा सांभाळत असताना त्यांनी संशोधकवृत्ती कायम ठेवली. प्रचंड प्रतिभा, व्यासंग व संशोधक वृत्ती असणाऱ्या कॉ. शरद पाटील यांनी अनेकदा लढयांमुळे तुरूंगवास भोगला. १९७८ मध्ये जातिव्यवस्थेच्या प्रश्नावरून त्यांनी मा.क.प. चा राजिनामा देऊन मार्क्सवाद-फुलेवाद-आंबेडकरवाद तत्वावर आधारीत सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली व हयातभर त्यांनी या पक्षाच्या झेंडयाखाली काम केले. या पक्षाच्या माध्यमातून आदिवासी, भूमीहिन, दलित, कामगार वर्गाचे पश्न त्यांनी धसास लावले. आदिवासी च्या जमीनीचा लढा, जातीअंताचा लढा, वर्गजातस्त्रीदास्यअंत हा त्यांच्या आयुष्यभराच्या कार्याचा गाभा होता. मार्क्सवादाला फुलेवाद व आंबेडकरवाद यांची जोड दिल्याशिवाय भारतीय समाज व इतिहास समजू शकत नाही असा विचार त्यांनी मांडला. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या विविध जनसंघटनांच्या माध्यमातूनही त्यांनी विविध आयुष्यभर संघर्षशिल योध्दा म्हणून काम केले. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या राजकिय सामाजिक व वैचारीक जडणघडणीत सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष व कॉ. शरद पाटील यांचा अभ्यास, संघर्ष, लढे व तात्वीक मांडणी महत्वाची आहे.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –२**

**अ) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिली आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. भारतामध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना कधी झाली. ?

अ. डिसेंबर १९२५ ब. डिसेंबर १९२७

क. जुलै १९२७ ड. ऑगस्ट १९३०

२. कॉ. शरद पाटील यांचा जन्म कोणत्या दिवशी झाला. ?

अ. २९ सप्टेंबर १९२७ ब. २२ मार्च १९३३

क. १७ सप्टेंबर १९२५ ड. १५ ऑगस्ट १९३५

३. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना कोणत्या गांवी झाला. ?

अ. कापडणे ब. धुळे

क. पानखेड्याचा चिंचपाडा ड. साक्री

४. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्राचे काय आहे.

अ. जिवनमार्ग ब. सत्यशोधक मार्क्सवादी

क. युगांतर ड. पुरोगामी सत्यशोधक

५. कॉ. शरद पाटील यांनी १९७२ मध्ये कोणता ग्रंथ लिहून पुर्ण केला.

अ. मुकनायक ब. शेतकऱ्यांचा आसूड

क. दास कॅपीटल ड. दास – शुद्रांची गुलामगिरी

**ब) खालील उप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कॉ. शरद पाटील यांनी १९५५ साली कोणत्या मुक्ती सत्याग्रहात सहभाग घेतला. ?

२. कॉ. शरद पाटील यांनी १९९९ साली कोणत्या जाहीरनाम्याचा मसुदा प्रसिध्द केला ?

३. कॉ. शरद पाटील पुर्णवेळ कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून कोणत्या साली काम सुरू केले. ?

४. १९८८ साली कॉ. शरद पाटील यांचा कोणता वैचारिक ग्रंथ प्रसिध्द झाला.?

५. नामांतर आंदोलनात कॉ. शरद पाटील यांना कोणत्या जेलमध्ये स्थानबद्द करण्यात आले होते. ?

### ३.२.३ विद्रोही सांस्कृतिक चळवळ

● **प्रस्तावना :**

महाराष्ट्रात स्वातंत्र्यानंतर अनेक चळवळी उभ्या राहील्या, यात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ प्रमुख होती. या चळवळीने महाराष्ट्राचे समाजमन पूर्णपणे व्यापले होते, नंतराच्या कालखंडात भूमीहीनांचा लढा, दलित पॅंथरची चळवळ, एक गाव एक पाणवठा चळवळ, नामांतराचा लढा, धरणग्रस्तांचा लढा, आदिवासींच्या जंगल, जमिनीचा जगण्याचा लढा, लोकविज्ञान चळवळ, अंधश्रध्दा निमूर्लन चळवळ, युवक क्रांती दलाची चळवळ, आदिवासी एकता परिषद, शेतकरी संघटनेची चळवळ समान पाणी वाटपाची चळवळ, मच्छिमारांचा संघर्ष, स्त्री हक्काची चळवळ, अशा अनेक चळवळी झाल्या. या चळवळीनी महाराष्ट्रभर कष्टकऱ्यांच्या - दलितांच्या जगण्याला आत्मभान आणले. १९७० नंतर दलित पॅंथरची चळवळ व दलित साहित्याची चळवळ ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील महत्वाची घटना होती. या चळवळीने केवळ ररत्यावरचा संघर्ष न करता साहित्य व सांस्कृतिक पातळीवर स्वत:ची नवी क्रांतीकारी, आत्मसन्मानची ओळख निर्माण केली. यातूनच अनेक क्रांतीकारी जलसे, भिमगायक तयार झाले. त्यांनी आपल्या कलेतून अन्याय अत्याचाराविरूद्ध बंडखोरीची परखड भूमिका मांडली. १९७८ नंतर नामांतर आंदोलनातून याला नवी धार आली. ९० च्या दशकात सत्ताधाऱ्यांनी साहित्यकांचा अपमान केला. त्यानंतर ९० च्या दशकात महाराष्ट्रात शिवसेना - भाजपा युतीच्या सत्तेच्या काळात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला विरोध व पर्याय म्हणून क्रांतीकारी - बहुजनवादी - कष्टकरी - दलित वर्गाची समतावादी न्यायी भूमिका घेऊन विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा जन्म झाला. या चळवळीने गेल्या २० वर्षात महाराष्ट्राच्या साहित्य सांस्कृतिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळ १९९८ साली सुरू झाली तरी त्याअगोदर 'अखिल भारतीय दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्य संमेलने' होत होती. त्या संमेलनाने पुढील कार्याची एक दिशा मिळाली होती.

● **विद्रोही सांस्कृतिक चळवळीची स्थापना व पार्श्वभूमी :**

महाराष्ट्रात १९९८ साली शिवसेना व भाजप युतीचं राज्य होत. या काळात साहित्यकांना दडपशाहीला तोंड द्यावे लागत होते. सत्ताधारी राज्यकर्त्यांनी साहित्यकांना 'बैल' असे संबोधले होते. फेब्रुवारी १९९९ मध्ये मुंबईत भरलेल्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वंसत बापट होते. त्यांचा उल्लेख सत्ताधारी राज्यकर्त्यांनी 'चपट्या बापट' असा केला होता. या सर्व घटनांचा स्वत:ला आखिल भारतीय साहित्य संमेलनवाले म्हणविणाऱ्यांनी साधा निषेधसुध्दा केला नाही. सरकारकडून साहित्य संमेलनाचा मिळणारा २५ लाखाचा निधी मिळणार नाही यासाठी मूग गिळून बसण्याचा हा प्रकार होता. साहित्यकांना कमी लेखणाऱ्या या प्रवृत्तीचा व विचारवंताच्या अपमानाचा निषेध केला तो महाराष्ट्रातील पुरोगामी संघटनांनी साहित्यकांच्या अपमानानंतर अखिल भारतीय साहित्य संमेलनवाल्यांनी साहित्यकांची बाजू घेतली नाही, उलट संमेलनाला पैसे देणाऱ्या राज्यकर्त्यांचे समर्थन केले. यावर चर्चा करण्यासाठी मुंबईत १९९८ साली पुरोगामी संघटनांच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली. राज्यकर्त्यांचे समर्थंन करणाऱ्या संमलेनावर बहिष्कार टाकावा असा प्रस्ताव आला.

बहिष्कार न टाकता वेगळे संमेलन व्हावे व यातून दुसरे साहित्य संमेलन 'सकल' या नावे घ्यावे असा प्रस्ताव आला. मात्र बहिष्काराबाबत मतभेद झाले. यातूनही काही पुरोगामी कार्यकत्यानी विद्रोही साहित्य संमेलन घेण्याची भूमिका मांडली. यातूनच 'विद्रोही' चा जन्म झाला पर्यायी संमेलन घेण्याबाबत कॉ. अविनाश कदम, क्रांती बांदेकर, डॉ. भारत पाटणकर, कॉ.धनाजी गुरव, शाहीर संभाजी भगत, सुबोध मोरे, कॉ. किशोर ढमाले, कॉ. किशोर जाधव, राजू कोरडे यांचा आग्रह होता. यातूनच धारावीचं पहिलं विद्रोही साहित्य संमेलन जन्माला आलं. यावेळी अभिजनवादी वर्गाचे अखिल भारतीयवाल्याचे संमेलन दादर येथे (५ ते ७ फेब्रुवारी १९९९) मध्ये तर समतावादी कष्टकऱ्यांचे संमेलन धारावीमध्ये (५ ते ७ फेब्रुवारी १९९९) असा संदेश देण्यात आला. धारावी संमेलनाचे अध्यक्ष होते बाबुराव बागुल तर उद्‌घाटक होते. डॉ. आ. ह. साळुंखे. या संमेलनातून विद्रोही सांस्कृतिक चळवळीने आपले नाते स्पष्ट केले. संमेलन पार पाडण्यामध्ये स्वाभिमानी पुरोगाम्यांनी हातभार लावला. मात्र त्याला संघटनात्मक स्वरूप प्राप्त झाले नव्हते. औपचारिकपणे संघटनेचा जन्म १९९९ मध्येच पुण्यात कॉ. यशवंत चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत झाला आणि त्यालाच 'विद्रोही सांस्कृतिक चळवळ' या नावाने संबोधण्यात आले.

**● विद्रोही म्हणजे काय? विद्रोही प्रवाहाची भूमिका :**

'विद्रोही' हा केवळ शब्द नाही. त्याच्या मागे एक संकल्पना व तत्वज्ञानाची परंपरा उभी आहे. परिवर्तनवादी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यापासून विचारवंतापर्यत या संकल्पनेविषयी स्वतंत्र मते आहेत. खरं तर विद्रोह हा द्रोह नव्हे उलट तो स्वद्रोहातून मुक्त होण्याचा प्रवास आहे. ते स्वजननिष्ठ जागृत झाल्यानंतर आपल्या शोषणकर्त्यांना नाईलाजाने दिलेलं जबरदस्त आव्हान आहे. ती स्वजनद्रोही वर्तनातून स्वतंत्र होण्यासाठी केलली उमदी जीवनयात्रा आहे. अशी विद्रोहाची भूमिका डॉ. आ. ह. साळुंखे यानी मांडली आहे.

डॉ. भरत पाटणकर म्हणतात 'विद्रोह' म्हणजे प्रस्थपित व्यवस्था व शासन संस्था यांच्या शोषण आणि दडपशाहीला सहन करण्यास नकार देऊन हृदयात साठलेल्या प्रचंड असंतोषाचा समुदायांच्या सहभागाने झालेला प्रचंड विस्फोट होय. 'विद्रोहीची' ची भूमिका मांडताना पार्थ पोळके म्हणतात, विद्रोही सांस्कृतिक चळवळ श्रमण संस्कृतीचा समर्थन करते. या संस्कृतीत समता आणि मानवी मुल्यांना प्रतिष्ठा आहे. उलट शोषकांच्या संस्कृतीत विध्वंस आणि विकृती यांचा समावेश आहे. त्यामुळे समतेच्या तत्वज्ञानाला, विचाराला मानणारा श्रमण संस्कृतीचा प्रभाव विद्रोही सांस्कृतिक चळवळ आपला वैचारिक आधार मानते.'विद्रोही सांस्कृतिक चळवळी' ची भूमिका मांडताना प्रा. डॉ. बाबुराव गुरव म्हणतात सामान्य, कष्टकरी माणसांच्या पाठिंब्याने 'विद्रोही' साहित्य कलेचा प्रवाह हाच मुख्य राहिला आहे. प्राचीन भारतीय गुहा कला, चित्र शिल्पे, मोहंजदडो, हडप्पात सापडलेले कलात्मक पुरावे, मराठी साहित्यात नामदेव, चोखोबा, ज्ञानोबा, सेना, बंका, तुकोबा असे विद्रोही लेखक विषमतेवर प्रहार करतच राहिले. जनाई, मुक्ताई, बहिणाबाई, कान्होपात्रा अशा निर्णायक विद्रोही मांडणी करणाऱ्या कलाकृती साहित्य प्रसवत राहिल्या. हीच परंपरा विद्रोहीची परंपरा असल्याचे मत या सर्व विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या धुरीणांनी व्यक्त केले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर विद्रोही सांस्कृतिक चळवळीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाबाबत १८८५

मध्ये महात्मा फुले यांनी मांडलेली भूमिकाच पुढे नेली आहे. अखिल भारतीय संमेलनावर प्रस्थापित, ब्राह्मणी, भांडवली साहित्य चळवळ अशी टीका करताना विद्रोहीनी महात्मा फुले यांच्याच विचारांचा वारसा पुढे नेलेला दिसतो. २४ मे १८८५ रोजी न्या. रानड्यांनी पुढाकार घेऊन ग्रंथकाराचे दुसरे संमेलन भरविले. या संमेलनात होण्यासंबधी रानड्यांनी १३ मे १८८५ रोजी जोतीराव फुल्यांना पत्र पाठवून विनंती केली होती. त्या पत्रास फुल्यांनी पाठविलेले उत्तर 'ज्ञानोदय' ने ११ जून १८८५ च्या अंकात छापले होते. या उत्तरात महात्मा फुले म्हणतात, 'परंतु माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्याने खुषीनें व उघडपणे देववत नाहीत. व चालू वर्तनावरून अनुमन केलेले असतां पुढेही देववणार नाहीत. तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकांतील भावार्थाशीं आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही. कारण त्यांच्या पूर्वजांनी आम्हांवर सूड उगविण्याच्या इराद्याने, आम्हास दास केल्याचे प्रकरण त्यांनी आपल्या बनावट धर्म पुस्तकांत कृत्रिम दडपले. याविषयी त्यांच्यातील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हां शूद्रादि अतिशूद्रांस काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागतात हें त्यांच्यातील उंटावरून शेळ्या वळकणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानी आगंतूक भाषण करणारांस कोठून कळणार?

विद्रोही सांस्कृतिक चळवळीने आखिल भारतीय साहित्य संमेलनला विरोधाची भूमिका घेऊन महात्मा फुलेंच्या विचारांचा वारसा जपण्याचं खऱ्या अर्थाने काम केले. कारण प्रस्थापित संमेलनात आमच्या साहित्याचं आमच्या दु:खाचं काय प्रतिबिंब आहे, हा विद्रोही सवाल वास्तव वाटतो. आज सुध्दा महात्मा फुलेंनी दिलेली 'घालमोड्या दादा' ची उपमा आखिल भारतीय संमेलनवाल्यांना लागू पडते हे त्यांच्या व्यवहारावरून दिसते असे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे मत आहे.

**● विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे चिन्ह :**

विद्रोही सांस्कृतिक चळवळीने नकाराला होकार असे चिन्ह निवडले. हे चिन्ह गेल्या २० वर्षात कार्यकर्त्याच्या अभिमानाचे प्रतिक ठरले आहे. या चिन्हाच्या माध्यमातून प्रस्थापित व्यवस्थेने राबणारी बहुजन संस्कृती नाकारली आहे ती आम्ही होकारात परार्वितत करणार आहेत. सर्जनशील, अहिंसक, समतावादी, श्रम आणि श्रमीकांना प्रतिष्ठा देणारी मूल्य जोपासणारी संस्कृती अशी भूमिका चळवळीने घेतली आहे.

**● विद्रोही कार्य व संमेलन :**

पुण्यात झालेल्या बैठकीनंतर १९९९ पासून विद्रोही सांस्कृतिक चळवळ म्हणून संघटनेचा खऱ्या अर्थाने उदय झाला. या चळवळीने गेल्या २० वर्षात १३ साहित्य संमेलने यमस्वी केली आहेत. महाराष्टभराच्या विविध विभागात ही संमेलन पार पाडली आहेत. धारावी, कोल्हापूर, औरंगाबाद, सावंतवाडी, पंढरपूर, धुळे, सोलापूर, इंदापूर, सांगली, राहूरी, परभणी, बीड, शहादा या ठिकाणी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलन अध्यक्ष म्हणून बाबुराव बागुल, वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, बाबा आढाव, राजन खान, डॉ. आ.ह.साळुंखे, राजा शिरगुप्पे, प्रा. डॉ. बाबुराव गुरव, उर्मिला पवार, श्रीराम गुंदेकर, डॉ. रूपा बोधी- कुलकर्णी, कॉ. नजुबाई गावित आदिंची निवड झाली. विभागीय साहित्य निपाणी संमेलन इंचलकंरजी आणि आटपाडी,

मुरगूड, निपाणी येथे घेण्यात आले. पाहिले युवा विद्रोही साहित्य संमेलन २८ नोव्हेंबर २०१८ रोजी पुणे येथे पार पाडले. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात कवी संतोष पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. तर उद्घाटक म्हणून ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे उपस्थित होते. दुसरे युवा विदोही साहित्य संमेलन हुपरी जि. कोल्हापूर या ठिकाणी दि. २५ डिसेंबर २०१८ रोजी पार पडले. या संमेलनाच्या अध्यक्षपदी पत्रकार व राजकीय विश्लेषक विजय चोरमारे तर उद्घाटक म्हणून राष्ट्रसेवा दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सदाशिव मगदूम होते. विद्रोहीच्या मुख्य संमेलनाचे अध्यक्ष झालेल्यापैकी एकाचा अपवाद वगळता आजपर्यंत 'विद्रोही' च्या भूमिकेशी कुणीही विसगंत भूमिका घेतल्याचे दिसून येत नाही. या सर्व संमेलनात बहुजनाच्या विचार प्रवाहाचा - सांस्कृतिचा साकल्याने विचार करण्यात आला. पाहिल्या धारावीच्या संमेलनापासून शहादा संमेलनापर्यत अध्यक्षांनी मांडलेली भूमिक ही चळवळीला गतिमान करणारी ठरली आहे. पाहिल्या संमेलनात बाबुराव बागुल यांनी डाव्यांनी फुले - आंबडेकरवाद व फुले व आंबडेकरवाद्यांनी मार्क्सवाद समजून घेणे गरजेचे आहे. असा विचार मांडला. तर दुस-या संमेलनात वाहरू सोनवणे यांनी 'आमच्यावर अन्याय होणार असले तर त्याच्याविरोधात आमची अभिव्यक्ती असले. मानव मुक्तीच्या दिशेने आम्ही जाणार आहोत. साहित्य, नाटक, गीते यातून तेच विचार व्यक्त होतील' असा संदेश दिला. सोलापूरच्या संमेलनात 'विद्रोही' विचारवंत डॉ. आ.ह. साळुंखे यांनी' आपल्या पंखावरची बंधन तटातट तोडून टाकण्यासाठी आणि विशाल आकाशात मुक्तपणे संचार करण्यासाठी आपला विद्रोह आहे. दुसऱ्या कोणाचे, अगदी आपले पंख बांधणाऱ्यांचेही, पख जखडून ठेवणं, हा आपल्या विद्रोहाचा हेतू नाही', अशी भूमिका मांडली. या सर्व आतापर्यतच्या संमेलन अध्यक्षांच्या भाषणातून मानवमुक्ती, समता व न्यायाची भूमिका मांडण्यात आली. संमलेन अध्यक्षांची ही भाषणे म्हणजे महाराष्ट्राच्या साहित्य-संस्कृतीच्या इतिहासाचा दस्ताऐवज ठरली आहेत.

● **विद्रोहीच्या कार्य पद्धतीची वैशिष्ट्ये :**

संमेलन घेत असताना विद्रोहीने आखिल भारतीयवाल्यांसारखा बडेजाव न ठेवता आपल्या मूल्याशी व विचारधारेशी विसंगत भूमिका घेतली नाही. आखिल भारतीय संमेलनावर कोट्यावधी रूपयाचा खर्च होत असताना त्या खर्चाचा हिशोब देण्याबाबत कायमपणे टाळाटाळ केल्याचे दिसून येते. मात्र विद्रोहीने सरकाराचा एकही पैसा घेणार अशी भूमिका कायम ठेवली आहे. दहाव्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. बाबुराव गुरव म्हणतात 'एक मूठ धान्य व एक रूपया हीच आमची खरी ताकद आहे. सांगलीत २०१० साली झालेल्या १० व्या विद्रोही साहित्य संमेलनात 'एक रूपया व मुठभर धान्य' या मोहिमेतून साडेचार लाख रूपये जमा झाले. यातून संमेलन यथस्वी करण्यात आले. केवळ मुठभर धान्य व एक रूपया हा आमचा मुा नाही तर घाम गाळणा-या माणसांनी आपल्या कष्टाचा एक एक रूपया विद्रोहीच्या झोळीत टाकला, हे महत्वाचे आहे. आम्ही संमेलन घेऊन थांबत नाही तर, संमेलनानंतर एक महिन्याच्या आत पै पैचा हिशोब जनतेसमोर मांडतो ही आमची बांधीलकी आहे. मात्र सांगली मध्येच पार पाडलेल्या ८२ व्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा हिशोब कोर्ट केसेस झाल्यातरी अजूनही देण्यात आला नाही. यातनूच त्यांची खरी ओळख व ढोंगीपणा दिसून येतो' असे विद्रोहीचे मत आहे.

विद्रोहीच्या पारदर्शकतेबाबत दै. महाराष्ट्र टाईम्सने आपल्या संपादकीयात घेतलेली दखल सुध्दा चळवळीच्या दृष्टिने महत्वाची आहे. 'सांगलीत पार पाडलेल्या विद्रोही साहित्य सांस्कृतिक संमेलनाचा जमाखर्च महिना उलटण्या आधीच संयोजन समितीने लोकांसमोर ठेवला. एकूण साडेचार लाख गोळा झाले. त्यापैकी सुमारे सव्वा लाख रूपये शिल्लक उरले. याचाही वापर समाजोपयोगी संस्थासाठी केला. दै. सकाळचे 'विद्रोहीची' श्री शिल्लक असे संपादकीय टिपण नोंदविले. 'केवळ एवढेच नाही तर 'विद्रोही' ने आपल्या सर्व संमेलनातील परिसंवादाचे विषय सुध्दा वेगळेपणा दाखविणारे कष्टकऱ्यांच्या इतिहास मांडणारे ठेवल्याचे दिसून येते. 'इचलकरंजी येथे झालेल्या विभागीय 'विद्रोही' साहित्य संमेलनाच्या परिसंवादाचा विषय होता. पु. ल. गेले, आण्णाभाऊ अमरशेख सुध्दा एकेकाळी गेले होते. अशा विषयातून बहुजन – कष्टकऱ्यांच्या प्रतिकांची खरी मांडणी व खरा इतिहास पुढे आणण्याचे काम 'विद्रोही' ने केले आहे.'विद्रोही' सांस्कृतिक चळवळीने साहित्य निर्मितीत सुध्दा पुढाकर घेतला आहे. आज अनेक नव्या दमाचे बहुजनवादी साहित्यीक विद्रोही च्या माध्यमातून लिहीते झाले आहेत.

**● सम्यक विद्रोही प्रकाशन :**

विदोही सांस्कृतिक चळवळीच्या वतिने स्थापनेपासून अनेक ग्रंथ, वैचारिक पुस्तक व अंकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. या प्रकाशन संस्थेस 'सम्यक विद्रोही प्रकाशन' असे नांव देण्यात आले. या प्रकाशनातर्फे 'सम्यक विद्रोही' अंक सुरू करण्यात आला आहे. 'विद्रोही' ने आपल्या संघटनेतर्फे समतेची मूल्यव्यवस्था मध्यवर्ती ठेऊन संस्कार घडविणारी 'आपली उजळणी' ही अंकलिपी प्रकाशित केली आहे. संघटनेच्या वतीने आतापर्यत ३२ 'महापुरुषाचे विचार व विचार प्रबोधन पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या आहेत. सम्यक विद्रोही प्रकाशन संस्थेतर्फे विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले आहे. 'सम्यक विद्रोही प्रकाशन' म्हणून एक वेगळी ओळख प्रस्तापित केली आहे.

**● असंघटीत – उपेक्षित कलाकरांना उत्तेजन :**

'विद्रोही' सांस्कृतिक चळवळीने नेहमी आदिवासी भटके विमुक्त, अंगमेहनती कष्टकरी व श्रमिक कलाकारांना आपल्या विचारमंचावर मानाचे स्थान दिले आहे. यातूनच आदिवासी – श्रमिकांच्या अनेक कलांना विद्रोही संमेलनातून उत्तेजन देण्यात आले. अनेक कलाकारांनाही 'विद्रोही' सांस्कृतिक चळवळीने मदतीचा हात दिला आहे. आपल्या अस्सल प्रतिभेने महाराष्टाचं सांस्कृतिक विश्व व्यापून टाकणारे तमाशा कलावंत काळू – बाळू या दोघांनाही १० व्या 'विद्रोही' साहित्य संमेलनाचे निमंत्रण त्यांच्या घरी जाऊन देण्यात आले होते. याशिवाय तमाशा सम्राट बाळू यांना आजारपणात महाराष्ट्रभरात सर्वप्रथम आर्थिक मदत 'विद्रोही' ने केली होती. 'विद्रोही' तर्फे त्यांना तातडीने उपचारासाठी मदत देण्यात आले होते.

**● विद्रोही शाहीरी जलसा व नाट्य परंपरा :**

सांस्कृतिक कलेच्या अंगाने विद्रोही आपली कला विकसीत केल्याचे दिसून येते. कॉ. अविनाश कदम, शाहीर शिवराम सुखी यांच्या शाहीरीने विद्रोही चळवळीस गती मिळाली आहे. विद्रोही शाहीर जलसाच्या

माध्यमातून विद्रोही शाहीर संभाजी भगत यांनी आपला आवाज महाराष्ट्रभर घुमविला आहे. त्यांच्या गीताने – आवाजाने चळवळीस बळ दिले आहे. याच परंपरेत आता डॉ. जालदिर घिगे, गौतम कांबळे, कुमार भिंगरे, शाहीर शशीकांत विधाटे, दिपक गोठणेकर, रफीक पटेल, दामू ठाकरे, गंगाभाऊ काकडे हे नव्या पिढीचे शाहीरी कलाकार पुढे आले आहेत.

विद्रोही लेखक राजा शिरगुप्पे यांनी आपल्या नाटकातून विद्रोही परंपरा समृद्ध करण्याचा प्रयन्न केला आहे. तिच्या नवऱ्याचे वैकुंठगमन' होते करूर वेडे', 'निर्णायक क्षणी', या नाटकानी मराठी रंगभूमीवर दमदार पाऊल टाकले आहे. या सर्वात बहुचर्चीत नाटक ठरले आहे. ते 'शिवाजी अंडरग्राऊड इन भिमनगर मोहल्ला' हे नाटक. विद्रोही कार्यकर्ते राजकुमार तांगडे हे नाटकाचे लेखक व मुख्य कलाकार आहेत. या नाटकाची गाणी विद्रोही शाहीर संभाजी भगत यांची आहेत. या नाटकाने मराठी रंगभूमीवर शिवाजी महाराजांच्या खरा इतिहास मांडून तथाकथीत नाटकवाल्यांना उत्तर दिले आहे. शिवचरित्राचा उपयोग जातीय राजकारणासाठी करणाऱ्या राज्यकर्त्यांच्या स्वार्थी शिवप्रेमाचा बुरखा या नाटकाने फाडला आहे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या सातारा शाखेतर्फे गेल्या पाच वर्षापासून 'एकलव्याचा अंगठा हे सडक नाटक प्रभावीपणे व सातत्याने सादर केले जात आहे. या सडक नाटकाचे महाराष्ट्रभर विविध ठिकाणी ४० पेक्षा जास्त प्रयोग सादर झाले आहेत. या सडक नाटकाचे कौतुक ज्येष्ठ विचारवंत डॉ. अ. हा. साळुंखे, क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या कन्या क्रांतीवीर हौसाताई पाटील, विधानसभेतील ज्येष्ठ आ. भाई गणपतराव देशमुख, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रभी सचिव कॉ. शमीम फैजी, प्रा. डॉ. बाबुराव गुरव, माजी पोलिस महासंचालक सुरेश खोपडे, मेधा पानसरे, क्रांतीवीर नागनाथ अण्णा नायकवाडी यांचे चिरंजीव वैभवकाका नायकवाडी, क्रांती अग्रणी जी.डी. बापू लाड यांचे चिरंजीव अरूण अण्णा लाड, महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेचे प्रमुक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, मिळून साऱ्याजणी अंकाच्या संपादक गीताली वि. म. नाटय लेखक व कलावंत राजकुमार तांगडे यांनी केले आहे.

**● बडवे हटाव आंदोलन :**

पंढरपूराचा विठोबा हे महाराष्ट्रातील बहुजन समजाचे दैवत, मात्र गेल्या आठशे वर्षापासून हा विठोबा व त्यांच्या पुजेवर बडवे – उत्पातांची मक्तेदारी होती. या विरोधातही विद्रोहीने भूमिका घेऊन बडवे हटाव आंदोलनाचा नारा दिला होता. ३ एप्रिल २००३ रोजी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन बडवे हटाव विठ्ठल रखूमाई मुक्ती आंदोलनाची घोषणा करण्यात आली व चळवळीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला. गेल्या वर्षाच्या चळवळीनंतर सर्वोच्च न्यायानयाच्या निर्णयामुळे आता पंढरपूरच्या विठोबांची बडव्यांच्या तावडीतून सुटका झाली आहे. विद्रोहीने केलेल्या लढयाचे हे महत्वाचे यश आहे.

**● समतेची युगदिंडी :**

'विद्रोही' सांस्कृतिक चळीवळीतर्फे नोव्हेंबर २०१३ मध्ये महाराष्ट्राला कवेत घेणारी एक युगदिंडी काढण्यात आली त्या दिंडीचे नांव होते बसवकल्याण ते देहू 'समतेची युगादिंडी'. या दिंडीतून बाराव्या शतकात कर्नाटकात क्रातीकारी बहुजनवादी मानवतावादी भूमिका घेणाऱ्या बसवण्णांच्या विचारांचा मेळ जगदगुरू

तुकोबारायांच्या संत परंपरेशी घालण्यात आला. अशा पध्दतीचा जथ्था काढणारी महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ आहे. बुध्द, महावीर येशू ख्रिस्त, महंमद पैगंबरल नाथ परंपरा, शरण परंपरा, वारकरी परंपरा या बहुजनांच्या समतावादी परंपराच्या मानवी जिवनात शिक्षण, ज्ञानमुक्ती, श्रम, स्त्री पुरूष समता, जाती अंत अशा अंगाने काय विचार मांडले याची उजळणी करून श्रमण परंपरांची व्यापक आघाडी बांधण्याचा प्रयत्न केला.

● **वारकऱ्यांसाठी आरोग्य शिबीर :**

विद्रोही सांस्कृतिक चळवळी तर्फे गेली १७ वर्ष वारकऱ्यांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन केले जाते. आषाढी वारीत संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या वारीतील दिंडी मार्गवर चिचंणी टप्पा (जि. सोलापूर) येथे दरवर्षी हे आरोग्य शिबीर पार पडते. या शिबीरात हजारो वारकऱ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. संत तुकाराम महाराज यांच्या दिंडी मार्गावरील इंदापूर (जि. पुणे) येथेही असे आरोग्य शिबीर आयोजित करता येते. वारकरी परंपरा व विद्रोही परंपरा याचे नाते यातून दृढ आहे.

● **आरोहण मोहिम :**

छत्रपती शिवरायांचा खरा इतिहास समाजापर्यत पोहोचण्यासाठी संघटनेच्या वतीने पहिली आरोहण मोहिम पायी चालत १७ फेब्रुवारी २०१६ रोजी काढण्यात आली. या मोहिमेची सुरूवात शिवाजी महाराजांचा खरा इतिहास मांडणारे कॉ. गोविद पानसरे (कोल्हापूर) यांच्या घरापासून ते पन्हाळा किल्ला अशी आयोजित करण्यात आली होती. दुसरी आरोहण मोहिम १९ फेब्रुवारी २०१८ रोजी पार पाडली. या स्वराज्य आरोहण मोहिमेचा मार्ग राहूरी जि. अहमदनगर - देवळाली - म्हैसगांव ते खेडले परमानंद (ता. नेवासा जि. अहमदनगर) असा होता.

● **लोकशाही संघर्ष यात्रा :**

पुरोगामी विचारवंत डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविद पानसरे, डॉ. एम. एम. कुलबुर्गी यांचा खुन झाल्यानंतर त्यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी कृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पुणे ते धारवाड अशी 'लोकशाही संघर्ष यात्रा' काढण्यात आली. सप्टेंबर २०१६ साली काढलेल्या यात्रेत पुरोगामी विचारवंत डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविद पानसरे, डॉ. एम. एम. कुलबुर्गी यांचे वारसदार व तरुणाईंचा उल्लेखनिय सहभाग होता.

● **विद्यार्थी आंदोलने :**

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या विद्रोही विद्यार्थी संघटनेतर्फे राज्यभर विविध आंदोलने करण्यात आले. आदिवासी, दलित, विद्यार्थ्याचे प्रश्न, वसतिगृहाचे प्रश्न, शिष्यवृत्ती प्रश्न, ईबीसी सवलत, अन्यायी फी वसुली या प्रश्नावर आंदोलने करण्यात आले. शासकीय कार्यालयाना घेराव, नाक दबाव आदोलन, मोर्चा, निदर्शने, अन्नत्याग या माध्यामातून अनेक शैक्षणिक प्रश्न तडीस नेले आहेत. कमी पट असणाऱ्या शाळा बंद करणे, चुकीचा अभ्यासक्रम बदलण्यास भाग पाडणे अशी आंदोलनेही संघटनेच्यावतीने करण्यात आली आहेत.

● **विद्रोही सांस्कृतिक चळवळ अधिवेशन :**

अधिवेशन विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे ५ वे अधिवेशन अहमदनगर येथे दि. ७ ऑक्टोंबर २०१८ रोजी पार पाडले. या अधिवेशनात विद्रोहीची नव्याने कार्यकारिणी निवडण्यात आली. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष म्हणून नागपूर येथील प्रसेनजित गायकवाड व अहमदनगर येथील कार्यकर्ते डॉ. जालिदंर घिगे यांची चळवळीचे सचिव म्हणून निवड अधिवेशनात एकमताने करण्यात आली.

● **विद्रोहीची दखल :**

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या कार्याची दखल आज सर्वांनी घ्यावी लागत आहे. त्यागी व विचारधारेवर काम करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यामुळे विद्रोहीची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्याचेच यश म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा या कामाची दखल घेण्यात आली. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे सरचिटणीस कॉ. धनाजी गुरव व नाटयलेखक राजकुमार तांगडे यांना मिळालेला महाराष्ट्र फौडेशनचा पुरस्कार हा त्याचेच प्रतिक आहे. अहमदनगर जिल्हायातील लढाऊ कार्यकर्ते डॉ. जालिदंर घिगे यांना सुध्दा श्रीमती लक्ष्मीबाई गुजराशी लढवय्या सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र अंनिस आणि आटपाट प्रोडक्शन्स आयोजित पहिल्या विवके राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत विद्रोहीची कार्यकर्ती रवीना गोगावले हिची प्रमुख भूमिका असलेल्या 'पावला' या लघुपटास प्रथम क्रमांक मिळाला दुसऱ्या विवके राष्ट्रीय लघुपट स्पर्धा व संजय घोडावत लघुपट स्पर्धेत अमोल कांबळे यांनी लिहीलेल्या स्विकार या लघुपटास प्रथम क्रमांक मिळाला.

### ३.३ सारांश :

१९९९ साली स्थापन झालेल्या विदोही सांस्कृतिक चळवळीने महाराष्ट्राच्या साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. प्रस्थापित अभिजन वर्गाच्या साहित्य चळवळीसोबत फारकत घेऊन आपल्या कार्याची वेगळा ठसा उमटविला आहे. प्रस्थापित ब्राह्मणी, भाडवली साहित्य चळवळीस विरोध म्हणून सांस्कृतिक चळवळीचा जन्म झाला. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा महाराष्ट्राच्या समाजमनावर सकारत्मक परिणाम झाला आहे. विद्रोहीचे नवे साहित्य, कलाकार समाजासमोर गेल्या वीस वर्षात पुढे आहेत. आपल्या विचार आणि व्यवहाराशी कायम पामाणिक राहणे हे विद्रोहीच्या कामाचे वैशिष्ट्य आहे. बुध्द- बसवण्णा- नामदेव - तुकोबाराय - महात्मा फुले - राजर्षी छ. शाहू - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी समतावादी विचाराचा घोष या चळवळीने कायम ठेवला आहे. इतिहास - संस्कृतीचे बहुजनवादी व मानवी मूल्य जपणारे विश्लेषण हा गाभा विद्रोहीने जपला आहे. गेल्या वीस वर्षात बहुजन कष्टकरी - दलित - आदिवासी - भटकेविमुक्त व आवाज नसलेल्या समाज घटकांचा साहित्यिक व सांस्कृतिक आवाज व विचार विदोहीने समोर आणला आणला. नवे सहित्यिक नवे कलाकार यांना आपल्या चळवळीच्या केंद्रस्थानी आणून त्यांना मंच मिळून दिला आहे. त्यागी कार्यकर्ते व तत्वज्ञानी वैचारिक नेतृत्व हे सुध्दा विद्रोहीचे यश आहे. स्थापनेपासून विद्रोही विचार व चळवळ डॉ. आ. ह. साळुंखे, बाबुराव बागुल, कॉ.धनाजी गुरव, कॉ.

अविनाश कदम, क्रांती बांदेकर, डॉ. भारत पाटणकर, शाहीर संभाजी भगत, सुबोध मोरे, कॉ. किशोर ढमाले, कॉ. किशोर जाधव, राजू कोरडे, समर खडस, कॉ. अहिल्याताई रांगणेकर, डॉ. बाबा आढाव, प्रा. यशवंत मनोहर, डॉ. बाबुराव गुरव, प्रा. प्रतिमा परदेशी, कॉ. नजूबाई गावीत, जयंत पवार, राजाभाऊ शिरगुप्पे, निखिल वागळे, उर्मिला पवार, प्रा. डॉ. रूपा बोधी - कुलकर्णी, पार्थ पोळके, विजय मांडके या वैचारिक नेतृत्वाने व कार्यकर्त्यांनी गेल्या वीस वर्षात महाराष्ट्राच्या सामाजिक - सांस्कृतिक व साहित्यिक परंपरेत विद्रोहीची भूमिका क्रांतिकारी पध्दतीने मांडली आहे. ही चळवळ आज आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक भाग झाली आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या कार्याची दखल आज आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे. धनाजी गुरव, राजकुमार तांगडे यांना महाराष्ट्र फौडेशनचा पुरस्कार मिळाला छत्रपती शिवरायांचा खरा इतिहास मांडणारे 'शिवाजी अंडरग्राऊड इन भिमनगर मोहल्ला' हे नाटक महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आले. आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर सुध्दा विद्रोहीचा परिणाम झाला. पुरोगामी चेहरा असलेले उत्तम कांबळे व नागनाथ कोत्तापल्ले सारखे अध्यक्ष निवडून आले. आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या परिसंवादाच्या विषयातही बदल करावा लागला. विद्रोही सांस्कृतिक चळवळीने समाजमनावर एवढा ठसा उमटविला आहे की, चळवळीचे योगदान हा आता संशोधन विषय झाला आहे. विद्रोही स्वत:ची अंकलिपी प्रकाशित करून प्रस्थापित, पारंपारिक शिक्षण पध्दतीलाही छेद देण्याचा प्रयन्न केला आहे. विविध विचार प्रबोधन पुस्तिकांच्या माध्यमातून महापुरूषाचे विचार समाजात पोहचविण्याचे कार्य आहे करत विद्रोही सांस्कृतिक चळवळीने आर्थिक हिशोब व वैचारिक व्यवहारात प्रामाणिक असल्याचे सिध्द केले आहे. विद्रोही आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील विद्रोही ही प्रमुख साहित्यीक व सांस्कृतिक चळवळ ठली आहे.

### ३.४ स्वयं अध्यंयनासाठी प्रश्न -३

**अ) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिली आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. विद्रोही सांस्कृतिक चळवळीची स्थापना कधी झाली. ?

अ. १९९९ ब. १९८८ क. २००२ ड. १९९०

२. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे पहिले संमेलन कोठे झाले. ?

अ. धारावी ब. दादर क. पुणे ड. उस्मानाबाद

३. पहिल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते. ?

अ. नामदेव ढसाळ ब. बाबुराव बागुल क. य.दी. फडके ड. यशवंत मनोहर

४. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे विद्यमान अध्यक्ष कोण आहेत. ?

अ. कॉ. धनाजी गुरव ब. नजूबाई गावीत

क. प्रसेनजीत गायकवाड ड. डॉ. भारत पाटणकर

५. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या प्रकाशन संस्थेचे नांव सांगा ?

अ. लोकवाङमय प्रकाशन ब. सत्यशोधक

क. लोकायत ड. सम्यक विद्रोही प्रकाशन

**ब) खालील उप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे दहावे संमेलन कोठे झाले ?

२. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने समतेची युगदिंडी कोणत्या साली काढण्यात आली?

३. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने कोणती संघर्ष यात्रा काढण्यात आली. ?

४. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या अंकलिपीचे नांव काय ?

५. पहिले युवा विद्राहेही साहित्य संमेलन कोठे पार पडले ?

**३.५ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा सविस्तर आढावा घ्या.

२. हमिद दलवाई यांच्या कार्याची सविस्तर माहिती लिहा.

३. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या कामगिरीचे सविस्तर वर्णन करा.

४. कॉ. शरद पाटील यांच्या कार्याचा आढावा घ्या

५. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या स्थापना व कार्याचा आढावा घ्या

६. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या उपकम व आंदोलनाची माहिती द्या.

**ब) टिपा लिहा.**

१. मुस्लिम शिक्षण परिषद कोल्हापूर ची माहिती लिहा

२. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहिरनामा

३. तलाक मुक्ती मोर्चाची माहिती द्या

४. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची घटना व धोरण

५. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचा मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा

६. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या जनसंघटनांची माहिती द्या

७. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे कार्य व संमेलने यांची माहिती द्या

८. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या कार्याची दखल स्पष्ट करा.

९. विद्रोही शाहीर जलसा व नाट्य परंपरेची माहिती द्या

### ३.६ पारिभाषीक शब्द व शब्दार्थ :

१. सदा ए निसवाॅ – स्त्रियांचा आवाज

२. माफुआ – मार्क्स – फुले – आंबेडकरवाद

३. माकप – मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

४. भाकप – भारतीय कम्युनिस्ट पक्ष

५. विद्रोही – प्रस्थापित व्यवस्था व शासनसंस्था यांच्या शोषण आणि दडपशाहीला अहिंसा तत्वानुसार विरोध करणे.

६. जलसा – शाहीरी पोवाडे व विद्रोही गीतातून प्रबोधन

७. सकप – सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष

### ३.७ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :

**१) स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

अ) १. २२ मार्च १९७०, २. २९ सप्टेंबर १९३२, ३. नवी दिल्ली, ४. एरीफा तय्यबजी, ५. ३ मे १९७७

ब) १. सात स्त्रिया, २. मराठा, ३. जानेवारी १९७३, ४. कोल्हापूर, ५. प्रा.डॉ. शमसुद्दीन तांबोळी

**२ ) स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

अ) १. डिसेंबर १९२५, २. १७ सप्टेंबर १९२५, ३. पानखेड्याचा चिंचपाडा, ४. सत्यशोधक मार्क्सवादी ५. दास – शुद्रांची गुलामगिरी

ब) १. गोवा मुक्ती सत्याग्रह, २. अब्राह्मणी साहित्य व कला महासभा, ३. १९४६ ४. अब्राह्माणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, ५. ठाणे

**३) स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे**

अ) १. १९९९, २. धारावी, ३. बाबुराव बागुल, ४. प्रसेनजीत गायकवाड, ५. सम्यक विद्रोही प्रकाशन

ब) १. सांगली, २. २०१३, ३. लोकशाहीसाठी संघर्ष यात्रा, ४. आपली उजळणी, ५. पुणे.

### ३.७ संदर्भ ग्रंथ :

१. प्रा. तांबोळी शमसुद्दीन : हमीद दलवाई क्रांतीकारी विचारवंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

२. डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभूते भालबा : महाराष्ट्राचा इतिहास :मांडणी व पुनर्मांडणी, शाहु संशोधन केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३. दलवाई हमीद : कानोसा : भारतातील मुस्लिम मनाचा, साधना प्रकाशन पुणे.

४. दलवाई हमीद : राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान, सुगावा प्रकाशन पुणे.

५. दलवाई मेहरून्नीसा : मी भरून पावले आहे, साधना प्रकाशन पुणे.

६. प्रा. तांबोळी शमसुद्दीन : मुस्लिम समाज प्रबोधन आणि विकास, नविन उद्योग प्रकशन, पुणे.

७. दलवाई मेहरून्नीसा :अँग्री यंग सेक्युलॅरीस्ट, साधना प्रकाशन पुणे.

८. दलवाई हमीद : भारतातील मुस्लिम राजकारण, साधना प्रकशन पुणे.

९. दलवाई हमीद : इस्लामचे भारतीय चित्र, साधना प्रकाशन पुणे.

१०. प्रा. तांबोळी शमसुद्दीन : मुस्लिम सत्यशोधक, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, पुणे.

११. पाटील शरद : अब्राम्हणी साहित्य व कलांचे सौंदर्यशास्त्र, मावळाई प्रकाशन, शिरूर, पुणे.

१२. पाटील शरद : प्रिमिटीव्ह कम्युनिझम, मातृसत्ता –स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद, मावळाई प्रकाशन, शिरूर, पुणे.

१३. चव्हाण रमेश : क्रांतीकारी सत्यशोधक कॉ. शरद पाटील, हर्मिस प्रकाशन, पुण.

१४. पाटील शरद : सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे धोरणात्मक निवेदन व घटना, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, धुळे.

१५. पाटील शरद : दास–शुद्रांची गुलामगीरी, खं.१/भा–१ व २, मावळाई प्रकाशन, शिरूर, पुणे.

१६. पाटील शरद : मार्क्सवाद–फुले– आंबेडकरवाद, सुगावा प्रकाशन, पुणे.

१७. पाटील शरद : जातिव्यस्थाक सामंती सेवकत्व, खंड –२, सुगावा प्रकाशन, पुणे.

१८. पाटील शरद : शोध मुलनिवासींचा की शुद्र वर्णाचा की जात्यन्तक समतेचा, मावळाई प्रकाशन, पुणे

१९. पाटील शरद : जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती, सुगावा प्रकाशन, पुणे.

२०. पाटील शरद : शिवाजीच्या हिंदवी स्वराजयाचे खरे शत्रू कोणः महंमदी की ब्राम्हणी? खंड–२, भाग–२, मावळाई प्रकाशन, शिरूर, पुणे.

२१. साळुंखे आ. ह. , विद्रोही तुकाराम, लोकायत प्रकाशन, सातारा.

२२. प्रा.नागावकर प्रशांत, मुसळे सिमा, संपा, विद्रोही भाषणे, प्रकाशक, विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्र.

२३. प्रा. नागावकर प्रशांत : कॉ. धनाजी गुरव यांची मुलाखत, संम्यक विद्रोही प्रबोधन संस्था, कोल्हापूर.

२४. प्रा. मेश्राम केशव : विद्रोही कवीता, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२५. डॉ. मोकाशी सयाजीराजे : महाराष्ट.ातील लोकचळवळी, नाग- नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, सांगली.

२६. कॉ. गुरव धनाजी : बडवे . उत्पात हटाव अंदोलन, प्रकाशक क्ष्कग०उवीत सांस्कृतीक चळवळ महाराष्ट्र.

२७. डॉ. मुरूगकर लता, दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन, पुणे.

२८. कांबळे गौतम : आपली उजळणी, प्रकाशन विद्रोही विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र

२९. कीर धनंजय, डॉ. मालशे स.गं., डॉ. फडके य. दि. संपा. महात्मा फुले समग्र वाड:मय प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,

❖❖❖

## घटक – ४

# महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ प्राथमिक शिक्षणाचा विकास

४.२.२ माध्यमिक शिक्षणाचा विकास

४.२.३ उच्चमाध्यमिक शिक्षणाचा विकास

४.२.४ उच्च व तंत्र शिक्षणाचा विकास

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


**४.० उद्दिष्टे :**

या घटकात आपल्याला अभ्यासता येईल की,

१. महराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती कशी विकसित होत गेली.

२. शैक्षणिक प्रगतीसाठी शासनाची कोणकोणती धोरणे होती.

३. प्राथमिक शिक्षणाचा विकास कसा झाला.

४. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास कसा झाला.

५. उच्च व तंत्र शिक्षणाचा विकास कसा झाला.

## ४.० प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. रजायाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास साध्य करण्यासाठी शिक्षणाचा विकास साधने गरजेचे आहे. हे ओळखूनच प्रारंभिक राज्यकर्त्यांनी राज्यातील पारंपरिक पद्धतीने सुरू असलेले प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व उच्च शिक्षण सुरू ठेवलेच शिवाय आधुनिकीकरणाकडे लक्ष देऊन बदलत्या विज्ञान व तंत्रज्ञानामधील होणारी प्रगती व बदल याकडेही तितक्याच गांभीर्याने पाहिले व राज्यात विज्ञान व तंत्रज्ञान यांचे शिक्षण तितक्याच जोमाने सुरू करून अद्ययावत ठेवले. शिक्षणाची प्रगती होण्यासाठी, शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थाकडे सोपवली तसेच केंद्र सरकारने वेळोवेळी नेमलेले शिक्षण आयोग व समित्या यांच्या शिफारशी व सुधारणा स्वीकारल्या, तर वेळप्रसंगी राज्य सरकारनेही आपल्या स्तरावर शिक्षणाच्या प्रगतीसाठी विविध समित्या नियुक्त करून शिक्षणाचा विकास साधण्याचा प्रामारिक प्रयत्न केलेला दिसतो. एकूणच राज्याचा निर्मितीनंतर शिक्षणाची प्रगती कशी होत गेली हे अभ्यासण्यासाठी विविध शिक्षण आयोग व समित्या यांचा थोडक्यात आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ प्राथमिक शिक्षणाचा विकास :

प्राथमिक शिक्षण हे शिक्षण हक्क कायद्याने (६ ते १४ वर्षे वयोगट) मोफत व सक्तीचे केले आहे. हा कायदा करण्याचे कारण हे शिक्षण केवळ पुढील शिक्षणाची पायरी नाही किवा साक्षरता एवढ्यापुरतेच मर्यादित नाही तर आपला समाज,संस्कृती,सुसंस्कार व एकूणच आपले जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी जी माहिती, ज्ञान व कौशल्य मानवाला गरजेची असतात ते मिळवून देण्याचे हे शिक्षण आहे. हे शिक्षण विध्यार्थी केंद्रित आसून या प्राथमिक शिक्षणाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी याचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी, विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांच्या विकासासाठी शासनाने विविध योजना, समित्या व आयोग नेमून प्राथमिक शिक्षणाचा संख्यात्मक व गुणात्मक विकास साधण्याचा प्रयत्न झाला.

I) **शिक्षणाची व्याख्या :** महात्मा गांधी ''माणसाचा शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्ठतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय'' तसेच रवीन्द्रनाथ टागोर म्हणतात ''शिक्षण म्हणजे आत्माविष्कार'' तर स्वामी विवेकानंद म्हणतात ''शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा आविष्कार''.

II) **प्राथमिक शिक्षणाचे महत्व :**

हे पुढील शिक्षणाचा पाया आसते. हे शिक्षण स्थानिक भाषेतून दिले जाते. हे शिक्षण विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण करणारे व परिसराची वोळख करून देणारे तसेच आपली संस्कृती, समाज, धर्म व एकूणच संस्कारांची पेरणी करणारे व जबाबदार नागरिक बनवणारे असते. त्यामुळेच हे शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले, गोपालकृष्ण गोखले यासारख्या समाजसुधारकांनी आग्रह धरला तर सयाजीराव गायकवाड छत्रपती शाहूनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे सुरु केले. एकूणच

या शिक्षणाचे महत्व ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याचा समावेश राज्यघटनेतील ४५ व्या कलमाद्वारे मार्गदर्शक तत्वात केला.

### III) प्राथमिक शिक्षणाचे उदिष्ट :

हे शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे व मोफत करणे कारण यामुळे बालवयातच त्या विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर त्याची भाषा व संस्कृतीचा प्रभाव पडतो. शाळा व शिक्षणाची आवड निर्माण करणे, त्याचे ज्ञान व कौशल्य वाढीस लागावीत यासाठी परिसर अभ्यास, चित्रकला, इतिहास, भूगोल, संगीत, आरोग्य, शेती, शारीरिकशिक्षण दिले जाते. यामुळे विद्यार्थी ज्ञान व कौशल्य प्राप्त करून आपले जीवन यशस्वीपणे जगू शकतो. एकूणच महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती साध्य करण्यासाठी प्राथमिक शिक्षण महत्वपूर्ण आहे.

### IV) प्राथमिक शिक्षणाचे हेतू :

१) मुलांमध्ये ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता निर्माण करणे. २) मुलांमध्ये शिक्षण विषयाची आवड निर्माण करणे. ३). निरीक्षण शोधकवृत्ती व विनयशीलता याचा विकास करणे. ४) घर व समाज यांना पोषक अशा सांस्कृतिक मुल्यांची जोपासना करणे ५). निर्मळ व निरोगी जीवनाच्या सवई लावणे ६) काही उत्पादक उद्योगांचे कौशल्य हस्तगत करण्यासाठी मुलांगा प्रोस्ताहन देणे. उदा. हस्तकला, संगीत, चित्रकला, लेखन, वाचन, गायन ७) राष्ट्रीय दृष्टी (राष्ट्राभिमान) व भावनात्मक ऐक्य निर्माण करणे. ८) जबाबदारीची जाणीव, सहकाराची वृत्ती व शिस्त निर्माण करणे. ९) सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमात सक्रीय सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.

### V) महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची प्रारम्भिक जबाबदारी :

महाराष्ट्र हे राज्य म्हणून १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रा.शि. कडे जाणीवपूर्वक लक्ष दिले, प्रा.शि. ची प्रारंभिक जबाबदारी जिल्हा शिक्षण मंडळाकडे होती ती १ मे १९६२ नंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपालिका व महानगरपालिका यांच्याकडे सोपवण्यात आली. यांनी आपापल्या क्षेत्रातील शाळाकडे लक्ष देऊन विकास करायचा होता. यामुळे राज्यातील प्रा.शि. मध्ये एकसूत्रीपणा आला. एकूणच महाराष्ट्रातील प्रा.शि. च्या विकासासाची जबाबदारी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या खांद्यावर आहे. या स्थनिक स्वराज्य संस्थेतील वर्ग एकचे कार्यकारी अधिकारी हे शिक्षण अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्य करतात, हे प्रा.शि. शाळेची तपासणी व नियंत्रण करतात. या शाळेतील शिक्षक व कर्मचारी नियुक्ती शासनाकडून होते. प्रा.शि. येणारा खर्च (पगार, फर्निचर, इमारती व इतर.) हा त्या विभागातील शिक्षण संचालक करतात तर काही वेळा स्थानिक स्वराज्य संस्था करताना दिसतात.

### VI) प्राथमिक शिक्षणची प्रगती :

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने प्रा.शि. च्या विकासासाठी राष्ट्रीय स्थरावर स्वतंत्रपणे आयोग किंवा समिती नेमल्याचे दिसत नाही मात्र राष्ट्रीय स्तरावर उच्च व माध्यमिक शिक्षणासाठी नेमलेल्या आयोग व समित्या मधून प्रा.शि. बाबत विविध सूचना व शिफारशी केलेल्या आहेत यांची अंमलबजावणी संपूर्ण देशात झालेली दिसते

त्यामुळे महाराष्ट्रातील प्रा.शि.प्रगती दर्शवण्यासाठी प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन शिक्षण आयोग व समित्या मांडलेल्या आहेत.

**१. कोठारी आयोग :**

(१९६४) डॉ. दौलतसिंह कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षणाला नवी दिशा देण्यासाठी नेमला. यालाच राष्ट्रीय शिक्षण आयोग म्हणतात. या आयोगाने सामाजिक बदलाबरोबर शिक्षणातील बदलाकडेही जाणीवपूर्वक लक्ष वेधले. या आयोगाने प्रा.शि. बाबत काही शिफारशी केलेल्या आहेत. १). प्रा.शि. सक्तीचे व मोफत करण्याचा प्रयत्न संपूर्ण देशभर व्हावा २). प्रा.शि. मधील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी प्रयत्न करावेत. ३). चौथीतील १०० टक्के विध्यार्थी पुढील वर्गात जावेत. ४). प्रा.शि. प्रवेशासाठी ६ वर्ष हे वय निशित करावे. ५). विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात एक मातृभाषा/प्रदेशिक भाषा , गणित, परिसर अभ्यास,सृजनशील उपक्रम, कार्यानुभव, समाजसेवा, आरोग्य इत्यादी विविध विषय असावेत. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये योग्य प्रवृत्ती व चांगल्या सवयी विकसित होतील. ६). प्रत्येक मुलाच्या घरापासून १ मैलाच्या अंतरावर प्रा.शि. शाळा असावी. ७). मुलभूत कौशल्यावर भर द्यावा. ८). विध्यार्थ्याच्या योग्य प्रवृत्ती व सवईचा विकास होईल अशा प्रकारे मूल्यमापन करावे तसेच त्याची लेखी व तोंडी परीक्षा घेऊन मूल्यमापन करावे. एकूणच कोठारी आयोगाने प्रा.शि. सार्वत्रिकीकरण करणे विध्यार्थ्यांना मुलभूत कौशल्य व ज्ञान देणे या गोष्टींना प्राधान्य दिले. या आयोगाच्या कार्यानुभव व मूल्यमापनाच्या शिफारशी तत्काळ स्वीकारल्या मात्र आयोगाचे मूल्य निर्मितीचे उद्दिष्ट मात्र साध्य झालेले दिसत नाही.

**२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :**

(१९६८) या धोरणात कोठरी आयोगाचा प्रा.शि. सार्वत्रिकीकरण हा मुद्दा पुन्हा नव्याने मांडला. तसेच प्रा.शि. सक्तीचे व मोफत करणे, गळतीचे व स्थगितीचे प्रमाण कमी करण्यासाठी वविविध उपक्रम राबवणे अशा विविध शिफारशी केल्या. या आयोगातील शिफारशीनुसार तळातील विद्यार्थ्यांपर्यत पोहोचनेसाठी महाराष्ट्र शासनाने प्रा.शि. अनेक सुधारणा राबवण्यास सुरुवात केली.

**३. पुस्तक पेढी योजना (१९७६) :**

या योजने अंतर्गत ग्रामीण, डोंगरी व आदिवासी भागातील गरीब व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांबरोबरच भटक्या अनुसूचित जाती व जमातीमधील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य व पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणे, ही जबाबदारी २५ टक्के राज्य शासन व उर्वरित अतिरिक्त विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांनी द्यावी असे आवाहन शासनाने केले आहे.

**४. बालवाड्या सुरु करणे :**

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी ही योजना सुरु केली कारण लहान वयातच मुलांना शिक्षणाची आवड लागावी, विविध खेळ, मनोरंजन व चित्रकला या माध्यमातून त्याची ज्ञानेद्रिये विकसित व्हावीत व त्या

मुलाला शाळेची आवड निर्माण होऊन शाळेपासून वंचित मुलांना आकर्षित करणे व त्यांचे गळतीचे आणि स्थगितीचे प्रमाण कमी करणे याच उद्देशाने हे शिक्षण सुरु आहे.

**५. अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती :**

ही योजना १९७९-८० पासून सुरु करण्यात आली. या योजनेतून विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी करून उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी शालेय, लेखन व पाठ्यपुस्तकाच्या साहित्याबरोबरच गणवेश मोफत पुरवण्यात आले. निश्चितच याचा लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना मिळाला व विद्यार्थ्यांना मिळाला व विद्यार्थ्यांचा वोढा शाळेकडे वाढण्यास मदत झाली.

**६. शिक्षकांसाठी निवासस्थाने :**

दुर्गम व डोंगराळ भागात काम करण्यासाठी शिक्षक उस्तुक नसतात त्यामुळे याचा प्रतिकूल परिणाम शिक्षणावर होतो. हे टाळण्यासाठी अशा दुर्गम भागात शिक्षकांना काम करण्यासाठी उत्तेजन मिळावे यासाठी शासनाने १९७६-७७ मध्ये ही योजना सुरु केली मात्र शासनाकडील पुरेशा आर्थिक तरतूदी अभावी ही योजना पुढे १९८२ मध्ये बंद केली गेली.

**७. आदर्श शिक्षक पुरस्कार योजना : (१९५८-५९)**

या योजनेंतर्गत ५ सप्टेंबर रोजी दिला जातो. ग्रामीण भागातील शिक्षकांना काम करण्याची प्रेरणा मिळावी, त्यांना उत्तेजन मिळावे व शिक्षणाचा गुणात्मक व संख्यात्मक विकास व्हावा यासाठी ही योजना महाराष्ट्रात प्राथमिक स्तरावर १९८३-८४ पासून सुरु केली.

**८. नव्या शाळा उघडणे :**

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचा प्रसार व प्रचार होण्यासाठी गावपातळीपर्यंत शाळा सुरु करण्याची उदिष्टे ठेऊन प्रत्येक वस्तीत, डोंगराळ आदिवासी भागात शाळा सुरु करण्यात आल्या.

**९. राष्ट्रीय शिक्षण धोरण: (१९८६)**

सर्व स्त्री-पुरुष व अनुसूचित जाती जमाती यांना शिक्षणाची समान संधी, गळतीचे व स्थगनाचे प्रमाण कमी करणे, नैतिक मुल्यांची जोपासना करणे, खडू-फळा मोहीम राबवणे, नवोदय विद्यालयांची संख्या तालुका पातळीपर्यंत वाढवणे, शैक्षणिक धोरणाची जबाबदारी केंद्र व राज्य राज्यांनी विभागून घेणे, नवोदय विद्यालयातून गरीब-श्रीमंत ही दारी दूर करणे या शिफारशी करण्यात आल्या.

**१०. एकशिक्षकी शाळांचे द्विशिक्षकी शाळेत रूपांतर : (१९८६)**

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरनासाठी गाव, वस्ती व वाडी अशा ठिकाणी प्रा.शि. च्या सुविधा निर्माण झाल्या या शाळेतून प्रथम एक शिक्षक नियुक्त केले, या शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न झाले. १९८६ नंतर या शाळेतून दोन शिक्षकांची गरज व्यक्त होऊन पैकी एक महिला असावी असा प्रयत्न सुरु केला,

कारण एका शिक्षकाच्या गैरहजेरीत शैक्षणिक काम थांबू नये व शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचवावा हा यामागील महत्त्वपूर्ण विचार होता.

**११. खडू–फळा मोहीम : (१९८७–८८)**

प्राथमिक शाळांना मुलभूत सेवा सुविधा पुरविण्यासाठी केंद्रामार्फत ही योजना प्रत्येक राज्यात सुरु करण्यात आली. या अंतर्गत प्रा.शि. पायाभूत सोयी, मानवी संसाधने, संख्यात्मक साहित्य व शिक्षण साहित्य (खडू, फळा, नकाशे) पुरवने हा उदेश होता. याबरोबरच एकशिक्षकी शाळांमध्ये आणखी एक नेमणे पैकी एक महिला असावी, दोन पक्क्या वर्ग खोल्या, शैक्षणिक साहित्य, पाठ्यपुस्तके (ठोकळे, चित्रे, नकाशे, मोजपट्टी, प्राणीजगत, पृथ्वी, नकाशे ई.) अशा विविध सुधारणा सुचविल्या यानुसार १९९३–९४ पासून अनुसूचित जाती जमातीकडे विशेष लक्ष देणे, पटसंख्येनूसार वर्ग खोल्या व शिक्षकांची संख्या वाढविणे याकडे लक्ष पुरवले. २००२–२००३ ही योजना सर्वशिक्षा अभियानात समाविष्ट केली गेली.

**१०. गुणवत्ता विकासासाठी प्रयत्न :**

शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व शिक्षण या तिन्ही घटकांचा विकास अपेक्षित आहे. म्हणून शाळांना अनुदान देऊन अध्ययन व पर्यवेक्षण प्रभावी करणे, ग्रंथालय सुसज्ज करणे, वर्गखोल्या व क्रीडांगण उपलब्ध करून देऊन वेळोवेळी त्यांची तपासणी केली जाते. तसेच त्यांच्यात सुधारणा करण्यासाठी शाळेंना भेटी देऊन बैठका आयोजित केल्या जातात. यासाठी शिक्षण विस्तार अधिकारी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षिणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या नियंत्रणाखाली शाळेसंबंधी बैठका, तपासणी व सुचना देऊन शाळेचा अभ्यासक्रम, शिक्षकांना प्रशिक्षण एकूण कामकाज व विकास ठरविला जातो. ज्यामुळे शाळेचा विकास साधण्यासाठी केंद्रभूत असलेला विद्यार्थी याकडे लक्ष देऊन त्याची स्थगिती व गळती कमी केली जाते.

**११. प्राथमिक शिक्षणासाठी केंद्रीय योजना :**

प्रा. शि. गुणवत्ता व संख्यात्मक वाढीसाठी तसेच याच्या सार्वत्रिकीकरनासाठी केंद्राकडून प्रत्येक राज्यांना वेळोवेळी अर्थसाहाय्य व विविध योजना राबल्या जातात यामध्ये खालील योजनांचा उल्लेख कर्ता येईल. १) आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षकांना पारितोषिके देणे. २) आदिवासी मुलांना शिक्षकांच्या कुटुंबात राहण्याची सोय करून देणे. ३) शैक्षणिक साहित्याच्या खर्चासाठी जिल्हा परिषदांना अनुदान देणे. ४) शैक्षणिक साहित्याव्यतिरिक्त खर्चासाठी जिल्हा परिषदांना अनुदान देणे. ५) शाळा सुधार योजना. ६) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना. या उपरोक्त योजने बरोबरच महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी काही योजना व समित्या नेमण्यात आल्या यामध्ये १) तत्कालीन शिक्षण पार्वतीबाई मलगोंडा यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती केलेली शिक्षण सुधार समिती (१९८४), २) प्राचार्य पी.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली पंचायतराज्य मूल्यमापन समिती (१९८६) ३) प्रा. राम मोघे यांच्या अध्यक्षतेखालील प्राथमि शिक्षण आयोग (१९९२) ४) द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेला अभ्यासगट (१९९३) ५) राष्ट्रीय शैक्षणिक

धोरणाच्या प्रभावी कार्यवाहीसाठी व त्यातील उद्दिष्ट पूर्तीसाठी १९९२ मध्ये तत्कालीन शालेय शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक टास्कफोर्स ची स्थापना केली. ६) प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बालशिक्षण समिती १९९५ साली नेमण्यात आली.

**१२. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण :**

हेतू. १) प्रा. शि. प्रसार होण्यासाठी पोषक वातावरण करणे, २) सर्वांना समान संधी व हक्क मिळवून देणे ३) स्थगन व गळती याचा विचार करून ते थांबवण्याचा प्रयत्न करने ४) साक्षरतेचे प्रमाण वाढवणे ५) समाजाचा विकास करणे.

**१३. प्राथमिक शिक्षणामध्ये इंग्रजी भाषेचा प्रवेश :**

अंतरराष्ट्रीय भाषा व तंत्रज्ञानाचे महत्व ओळखून महाराष्ट्रात डिसेम्बर १९९९ पासून इंग्रजी भाषेचे शिक्षण सुरु केले. मात्र मातृभाषेचे मध्यम व त्याचे महत्व अबाधित ठेवण्यावर लक्ष ठेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी जून २००० पासून सुरु केली. एकूणच प्राथमिक शिक्षणाचा विस्तार व सार्वत्रिकीकरण करून राज्याच्या कानाकोपऱ्यात हे शिक्षण पोहोचवण्याचा प्रयत्न शासन व सेवाभावी संस्था करत आहेत. यांच्या माध्यमातून प्रा. शि.चा संख्यात्मक विकास होईलही मात्र गुणवत्तेचे काय? हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे प्रा.शि. ही केवळ शासन किवा सेवाभावी संस्थांची जबाबदरी नसून ती आपली सर्वांची म्हणजेच समाजाचीच नैतिक जबाबदरी आहे हे स्वीकारल्यास निश्चितच प्रा.शि.चे मुख्य ध्येय साध्य होईल.

- **स्वयं– अध्ययन प्रश्न –१**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) शिक्षण हक्क कायद्यानुसार ----------या वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

अ) ५ ते १०   ब) ६ ते १४   क) ६ ते १२   ड) ६ ते १५

२) राज्यघटनेच्या ------------व्या कलमांतर्गत प्राथमिक शिक्षणाचा समावेश मार्गदर्शक तत्वात केला.

अ) ४५   ब) ४६   क) ४७   ड) ५०

३) महाराष्ट्रात ------------रोजी प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे देण्यात आली.

अ) १ मे १९६०   ब) १ मे १९६१   क) १ मे १९६२   ड) १ मे १९६५

४) कोठारी / राष्ट्रीय शिक्षण आयोग -------------वर्षी नेमण्यात आला.

अ) १९६४   ब) १९६५   क) १९६६   ड) १९७४

५) पुस्तक पेढी योजना -----------या वर्षी सुरु केली.

अ) १९७६ ब) १९७७ क) १९७८ ड) १९८०

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) महारष्ट्रात शिक्षकांसाठी निवासस्थान ही योजना केव्हापासून सुरु झाली?

२) आदर्श शिक्षक पुरस्कार केंव्हा पासून सुरु झाला?

३) एकशिक्षकी शाळांचे द्विशिक्षकी शाळेत केव्हापासून रूपांतर झाले?

४) खडू-फळा मोहीम कोणत्या वार्षी राबण्यात आली?

५) प्राथमिक शिक्षणात इंग्रजी भाषेचा प्रवेश कोणत्या वर्ष्यापासून सुरु झाला?

## ४.२.२ माध्यमिक शिक्षणाचा विकास :

प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण होय. माध्यमिक शिक्षण हे उच्च शिक्षणाचा पाया असून हे विद्यार्थ्यांची दिशा निशित करते. या वयातच विध्यार्थ्याचा समाजाकडे पाहण्याचा एक दुर्ष्टीकोन तयार होतो. हे वय कुमार अवस्थेतील बदलाचे असल्याने या वयात त्याला भविष्यातील जीवन जगण्यासाठी लागणारी कौशल्य विकसित करण्याची संधी असते. एकूणच माध्यमिक शिक्षण हे विध्यार्थ्यांच्या जीवनातील महत्वपूर्ण टप्पा आहे. त्यामुळे हे शिक्षण कशाप्रकारे विकाशित होत गेले याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत प्रकरणात शिकण्यासाठी नेमलेले विविध आयोग व समित्यांचा आढावा घेतलेला आहे.

**I) माध्यमिक शिक्षणाचे महत्व व उद्दिष्टे :**

हे शिक्षण उच्च शिक्षणाची पायरी आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, आर्थिक व नैतिक जान निर्माण करते. मातृभाषेबरोबरच प्रादेशिक व अंतरराष्ट्रीय (इंग्रजी) भाषेचे ज्ञान झाल्याने त्याची विचारांची मर्यादा वाढते.त्याला सामाजिक शास्त्रे, विज्ञान व गणिताचे ज्ञान मिळते. विविध कौशल्य प्राप्त होतात. व्यक्तिमत्व व नेतृत्व गुणांचा विकास होतो.

**II) महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षणची प्रगती :**

केंद्रातील शिक्षण आयोग व समित्यांच्याच निर्णयानुसार राज्यातील शिक्षणाची वाटचाल सुरु असते, त्याबरोबरच राज्यही स्वतंत्रपणे शिक्षण विकासासाठी कार्यरत राहून शिक्षण समित्या नियुक्त करत असते, महराष्ट्र राज्याने १ मे १९६२ पासून माध्यमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवले, यासाठी राज्यात पश्चिम महराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा असे तीन विभाग पडले, मात्र या तिन्ही विभागत अभ्यासक्रम, वर्ग व परीक्षा यातील भिन्नता लक्षात घेऊन त्यातील दोष दूर करण्यासाठी १९७२-७३ पासून १०+२+३ हा समान अभ्यासक्रम राबवण्यास सुरुवात केली व १० वी ची परीक्षा मार्च १९७५ तर १२ वी ची उच्चमाध्यमिक शालान्त परीक्षा मार्च

१९७७ पासून घेण्यास सरुवात केली. प्रस्तुत प्रकणात देशातील विविध शिक्षण आयोग व समित्यांच्या माध्यमातून माध्यमिक शिक्षणासाठी मांडलेले विचार व सुधारणांचा आढावा घेतलेला आहे.

**१. विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८) :**

हा आयोग उच्च शिक्षणासाठी असला तरीही, याने माधामिक शिक्षणासाठी पुढील शिफारशी केलेल्या आहेत, यामध्ये १). व्यावसायिक शिक्षणाला महत्व द्यावे, अभ्यासक्रमात मातृभाषा, प्रादेशिक भाषा व इंग्रजी भाषा असावी बरोबरच गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, इतिहास, संगीत, चित्रकला, हस्तकला, गृहविज्ञान, अकौंट,टायपिंग व शेतीविषयक अभ्यासक्रम असावेत.

**२. माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२) :**

डॉ.लक्ष्मणशास्त्री मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग नेमला यांनी पुढील शिफारशी सुचवल्या, १) सर्व माध्यमिक शाळांचे रुपांतर उच्च माधामिक मध्ये करणे, यासाठी तीन वर्षाचे निम्न माधामिक व चार वर्षाचे उच्च माध्यमिक अशी विभागणी करावी. २) बहुउद्देशीय शाळेची स्थापना करून विध्यार्थ्यांना तांत्रिक, व्यावसायिक, शेती कालाविज्ञान व गृहविज्ञान असे अभ्यासक्रम असावेत. ३) शिक्षणात मुले-मुली असा भेद करू नये तसेच शक्य असल्यास मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरु कराव्यात. ४) अभ्यासक्रम ठरवताना सामाजिकशास्त्रे, विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, गृहविज्ञान यांचा समावेश असावा. ५) मूल्यमापन करताना परीक्षा पद्धतीत सुधारणा करून अंतर्गत कसोट्या व शालेय नोंदी यांचाही विचार करावा. ६) शिक्षक हा पदवीधर असावा. या बरोबरच अध्ययन अध्यापन पद्धती, प्रशासन व व्यवस्थापन, पाठ्यपुस्तके, धार्मिक व नैतिक शिक्षण, आरोग्य शिक्षण, शारीरिक शिक्षण याबरोबरच इमारती, शैक्षणिक साधने, कामाचे तास व सुट्ट्या इत्यादी विविध बाबतीत शिफारशी सुचवलेल्या दिसतात.

**३. कोठारी आयोग (१९६४) :**

या आयोगाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत. १). शिक्षणाचा आकृतिबंध १०+२+३ असावा. २). माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकरण करून किमान २० टक्के मुलांना ते मिळावे. ३). अभ्यासक्रम ठरवताना तीन भाषा, विज्ञान, गणित व नैतीकमुल्ये अशा विविध विषयांचा समावेश असावा. ४). विद्यार्थ्यांना त्यांची आवड व क्षमता समजण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम घ्यावेत. याशिवाय शाळा सुधार, व्यवस्थापन व शरीरिक शिक्षण अशा विविधांगी शिफारशी केलेल्या आहेत. या आयोगाच्या निवडकच शिफारशी स्वीकारल्या मात्र आर्थिक अडचण व प्रशासकीय उदासीनता यामुळे बहुतांशी शिफारशी दुर्लक्षित केल्या.

**४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९६८) :**

या धोरणानुसार १) माध्यमिक स्तरावर त्रिभाषा सूत्राचा अवलंब केला. २) कार्यानुभव व समाजसेवा हे शिक्षणाचे अविभाज्य अंग बनले (तळटीप --- कार्यानुभव : समाजाल उपयोगी अशी सेवा देणारी किंवा समाजउपयोगी वस्तूंचे उत्पादन करणारी हेतूपूर्ण, अर्थपूर्ण, श्रमकेंद्रित कृती म्हणजे कार्यानुभव होय.). ३) विज्ञान शिक्षण व संशोधनावर भर. ४). तांत्रिक व व्यासायिक शिक्षणाची सोय. ५) क्रीडा व खेळाचा विकास.

६) आकृतिबंध १०+२+३ चा स्वीकार एकूणच या धोरणामुळे माध्यमिक शिक्षणाची संख्यात्मक वाढ झाली गुणात्म नाही.

**५. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना (१९७१-७२) :**

केवळ संख्यात्मक वाढ उपयुक्त नाही तर माध्यमिक शिक्षणाचा गुणात्मक विकास होण्यासाठी ही योजना सुरु केली. या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड व प्रेरणा मिळावी हाच उद्देश आहे.

**६. ईश्वरभाई पटेल समिती (१९७७) :**

या समितीने माध्यमिक शिक्षणाचे उद्देश स्पष्ट करताना म्हंटले की, १) स्वअध्ययन कौशल्य संपादन करणे. २) तीन भाषा, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, गणित व कार्यानुभव यांचे शिक्षण. ३) खेळ,एथलेथिक्स व साकार्याची भावनांचा विकास करणे. ४). कलात्मकता व सृजनशीलता वाढवणे. ५) शाळेबाहेरील जीवन समजून देऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे. ६) लोकशाही मुल्यांची जपणूक होण्यासाठी सामाजिक कार्यात सहभागी होणे. या विविध उद्देशांची अंमलबजावणी व्हावी म्हणून काही शिफारशीही केलेल्या आहेत. १) केंद्राने शिक्षणाच्या विकासासाठी राज्य, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्थांना / परीक्षा मंडळे यांना स्थानिक गरज लक्षात घेऊन अभ्यासक्रम व पाठ्यक्रम ठरवण्याचे स्वतंत्र द्यावे. २) विषयाचे किमान ज्ञान होईल इतकाच मर्यादित व मोजकाच आशय असावा. ३) अभ्यासक्रमाची विषयावर व वेळेप्रमाणे आठवड्यात विभागणी करणे उदा. आठवड्यातील भाषा सात तास, गणित चार तास, विज्ञान चार तास. असे. ४) कार्यानुभव हा विषय केंद्रभूत ठेऊन इतर सर्व विषय त्याच्याशी निगडीत ठेवावेत. ५). शैक्षणिक वेळापत्रक लवचिक असावे,प्रतेक विषयासाठी स्वतंत्र व छोटी व मुख्य मुद्देसूद पुस्तके असाविक.

**७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) :**

या धोरणात माध्यमिक स्तरावर १. व्यावसायिक शिक्षण आसवे. २. प्रज्ञावंतांसाठी नवोदय विद्यालये सुरु करावीत. ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एकत्र राहून राष्ट्रीयएकात्मता वाढीस लागेल. ३. या शाळा निवासी असाव्यात ४. नवोदय विद्यालय हा उपक्रम संपूर्ण देशभर राबवावा. या धोरणाचा परिणाम म्हणूनच सन १९९० मध्ये देशात २६१ नवोदय विद्यालये सुरु झाली ज्यामध्ये ७८% ग्रामीण भागातील अनुसूचित जाती-जमातीमधील मुले शिक्षण घेत होती.

**८. राममूर्ती समिती (१९९०) :**

या समितीने नवोदय विद्यालयाबाबत प्रश्न निर्माण करून ती खर्चिक असल्याने येथे वंचित घटकातील मुले अत्यल्प असतात. त्यमुळे या समितीने शिफारशी केल्या की, १) भविष्यात अधिक नवोदय विद्यालये सुरु करू नयेत. २) जी सुरु आहेत त्यांची पुर्नरचना करून त्यांना पुरेशी साधनसामुग्री पुरवावी. ३) जी नवोदय विद्यालय सुरु आहेत ती राज्यसरकारकडे निवासी शाळा म्हणून चालवण्यासाठी द्यावीत. ४) या विद्यालयातून बुद्धीला

चालना देणाऱ्या व अंगभूत गुण विकसित करणाऱ्या कार्यक्रमावर भर द्यावा. अशा विविध शिफारशी करण्यात आल्या.

**९. रेड्डी समिती (१९९२) :**

या सामितीच्या शिफारशी पिढील प्रमाणे १). नवोदय विद्यालय प्रत्येक जिल्ह्यात सुरु करावेत व जुन्यांचा विस्तार करावा. २). माध्यमिक शिक्षण मंडळांना स्वायत्तता द्यावी. ३). मुक्त विद्यालयाना प्रोस्ताहन द्यावे. ४). सर्व राज्यातील माध्यमिक शिक्षण व्यवस्थापनात एकसूत्रीपणा असावा.

**१०. अहिल्याबाई होळकर योजना (१९९६–९७) :**

राज्य शासनाने ही योजना सुरु केली. याअंतर्गत ग्रामीण भागातील मुली आर्थिक कारणाने शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून महाराष्ट्र राज्य वाहतूक महामंडळ सहभागातून विद्यार्थीनीना मोफत प्रवासाची सोयकेली.

**III) माध्यमिक शिक्षणाचा संख्यात्मक व गुणात्मक विस्तार :**

एकूणच माध्यमि शिक्षणाचा संख्यात्मकदृष्ट्या झपाट्याने विकास झाला परिणामी विद्यार्थी संख्या वाढली. माध्यमिक शिक्षणानंतर पुठे काय? हे बऱ्याच विद्यार्थ्यांना माहित नसल्याने यांचा ओढा उच्च शिक्षणाकडे वाढतो परिणामी बेकारी मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे हा शिक्षणाचा विस्तार सुनियोजित व धोरणात्मक असावा, तो होताना दिसत नाही. हीच स्थिती गुणात्मकतेच्या बाबतीत आहे. एकूणच विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्य व जागृक वृत्ती निर्माण करून ती अद्यावत ठेवावीत ज्यामुळे १. तो जीवनातील समस्या सोडवण्यासाठी कौशल्य आत्मसात करेल, २. स्वअध्ययनास प्रेरित होईल, ३. सामाजिक जाणीव निर्माण होऊन त्याला स्वजबाबदारीची जाणीव होईल. या विविध गरजा माध्यमिक शिक्षणात असणे गरजेचे आहे. हे होण्यासाठी माध्यमिक शिक्षणात अमूलाग्र बदलाची गरज आहे.

**४.२.३ उच्चमाध्यमिक शिक्षणाचा विकास :**

माध्यमिक शिक्षण व उच्चशिक्षण याच्यामधील दुवा इतकेच उच्चमाध्यमिक शिक्षणाचे महत्व नसून या टप्प्यावर विद्यार्थी आपला भविष्यातील अभ्यासक्रम व वाटचाल निशित करत आसतो, हे शिक्षण म्हणजे उच्च शिक्षणाचा पाया तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनास वळण देणारे व दिशा दर्शक आहे, त्यामुळेच या टप्प्यातील उच्चमाध्यमिक शिक्षणाबाबत राज्य व राष्ट्रीय पातळीवर गांभीर्याने व सखोल अभ्यासपूर्ण धोरणे आखलेली दिसतात, या शिक्षणाच्या प्रगतीसाठी विविध आयोग व समित्या नेमलेल्या आहेत याचा आढावा थोडक्यात पुढीलप्रमाणे घेतलेला आहे.

**१. कोठारी आयोग (१९६४) :**

या आयोगाने पुढील शिफारशी सुचवल्या, यामध्ये १० वी नंतर पुढील शिक्षणासाठी ५०% विद्यार्थी व्यावसायिक व ५०% सर्वसामान्य शिक्षण घेतील ही सूचना महत्वाची होती. यापैकी सर्वसामान्य अभ्यासक्रम हा कला व विज्ञान असा विभागावा तर व्यावसायिक शिक्षण हे पॉलीटेक्निक व्यतिरिक्त दोन ते चार वर्षाचे असावे

जे शाळेपासूनचा सुरु करावे कीवा विशेष संस्था स्थापाव्यात, यासाठी निवडक मुलेच असावीत ज्यामुळे त्यांचा दर्जा चांगला राहील तसेच या शिक्षणाने बेकारीची समस्या कमी होण्यास मदत होईल. या शिफारशी १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्वीकारल्या मात्र विद्यार्थी या शिक्षणाकडे आला नसल्याने या शिक्षणाचा विकास झाला नाही. या बद्दल शिक्षणतज्ज्ञ जे.पी. नाईक कारण देताना म्हणतात की, १) उच्च व मध्यम वर्गाचा व्यावसायिक शिक्षणाबाबत उदाशीन दृष्टीकोन. २) हे शिक्षण तुलनात्मकदृष्ट्या महाग आहे. ३) योग्य शिक्षकांचा अभाव. ४) हे शिक्षण पूर्ण करूनही नोकरीची हमी नाही. परिणामी कोठारी आयोगाच्या निवडक प्रवेशाची शिफारस स्वीकारली नसल्याने व्यावसायिक शिक्षण नाममात्र राहिले, उच्चमाध्यमिक शिक्षणात केवळ संख्यात्मक वाढ होत राहिली.

**२) पी.डी. शुक्ला समिती (१९७३) :**

उच्च शिक्षणातील १०+२+३ या आकृतिबंधाची अंमलबजावणी देशभर करण्यासाठी ही समिती नेमली, हिने पूढील शिफारशी सुचवल्या १) अकरावी व बारावी स्तरावर दोन प्रकारचे अभ्यासक्रम शैक्षणिक व व्यावसायिक असावेत, हे स्थानिक गरजेनुसार नोकरी व व्यासायास चालना देणारे असावेत. २) व्यावसायिक शाळांना स्थानिक उद्योग व व्यवसायांनी अभ्यासक्रमात मदत करावी. ३) ११वी व १२वी हा शालेय प्रणालीचा भाग असावा.

**३) NCERT उच्चमाध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण समिती (१९७६) :**

या समितीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे प्राधान्याने लक्ष देऊन त्या ठिकाणी शेतीपूरक व्यावसायिक शिक्षणाला उत्तेजन देण्याकडे लक्ष वेधले तसेच अभ्यासक्रम, वेळापत्रक, विषय, परीक्षा पद्धती या बाबत विविधांगी शिफारशी व सुधारणा सुचवल्या व जिल्हा वाईज व्यावसायिक संधीचे सर्वेक्षण करण्यासाठी राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ स्थापन करावे ज्यामुळे ज्यास्ती ज्यास्त तरुणांना नोकरीची संधी प्राप्त होईल.

**४) राष्ट्रीय परीक्षण समिती (१९७७) :**

आदिशेशैया याच्या अध्यक्षतेखाली +२ स्तरावरील अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करण्यासाठी नियुक्त केलेल्या या समितीने उच्चमाध्यमिक शिक्षण हे बालवय व तारुण्य यामधील संक्रमणाचा काळ मानलेला आहे. या काळात बेकारी निर्मूलन, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, ग्रामीण विकास, प्रौढ साक्षरता, दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी प्रामुख्याने शेतीपूरक, स्थानिक उद्योग व वयासाय उपयोगी अभ्यासक्रम ठेवावेत. अभ्यासक्रमात लवचिकता असावी, येथे सत्र पद्धतीने परीक्षा असाव्यात, चार ते पाच शाळेसाठी एक समुपदेशक असावा, स्थानिक उद्योग व व्यवसायाचे सर्वेक्षण करावे, ग्रामीण भागात नवीन शाळा सुरु कराव्यात, हे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकरीत प्राधान्य द्यावे, देशातील सर्व व्यावसायिक शैक्षणिक विभागात समन्वय राखण्यासाठी राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण परिषद स्थापावी, तसचे राज्य स्तरावर राज्य व्यावसायिक शिक्षण परिषद स्थापावी. अशा विविध शिफारशी करण्यात आल्या.

**५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) :**

यामध्ये व्यावसायिक शिक्षणाकडे लक्ष पुरवून स्वयंरोजगार, कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची मागणी व पुरवठा, उच्च शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा प्रवाह रोखणे, याच विचार केला. या अभ्यासक्रमात शेती, स्थानिक उद्योग व आरोग्य यांचा समवेश करून हा राबवण्यासाठी शासना बरोबरच स्थानिक उद्योगांनीही सहभागाची अपेक्षा व्यक्त केली. तसेच अर्धवट शाळा सोडलेले, नवसाक्षर व कामगार यांना अनौपचारिक, लवचिक व गरजेनुसार अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे. अशा विविध शिफारशी सुचवण्यात आल्या.

**६) कृती कार्यक्रम १९८६ :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी हा कृती कार्यक्रम हाथी घेण्यात आला. यानुसार व्यावसायिक शिक्षणाकडे लक्ष देऊन राज्यांना त्यांच्या गरजेनुसार शैक्षणिक आराखडा तयार करण्याची मुभा दिली. या शिक्षणासाठी आवश्यक तो निधी पुरवला जाईल. ४० विद्यार्थी क्षमता असलेल्या शाळा प्रत्येक जिल्ह्यात सुरु करण्यात येतील. व्यावसायिक शिक्षणाच्या संघटनात्मक उभारणीसाठी आकृतिबंध केला जाईल. या शिक्षणासाठी आवश्यक तेवढी साधनसामग्री व सुविधा विकसित केल्या जातील. व्यावसायिक शिक्षण, उद्योग व सेवाभावी संस्था व संघटना याच्यात दुवा विकसित केला जाईल. +२ स्थरावरील व्यावसायिक शिक्षणाचा अभ्यासक्रम NCERT / राज्य व्यवसाय शिक्षण संस्था यांच्याकडूण तयार केला जाईल. व्यावसायिक शिक्षणाचे औपचारिक कार्यक्रम तयार केले जातील.

**७) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व कृती कार्यक्रमाची कार्यवाही (१९८६) :**

माध्यमिक स्थरावर व्यावसायिक शिक्षणाचा विकास होण्यासठी केंदीय अर्थसहाय्य असलेली योजना केली तसेच माध्यमिक शाळांना व्यावसायिक विभाग सुरू करण्याची अनुमती व अर्थसहाय्य देण्याचा समावेश केला. या शिक्षणप्राप्त विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यासाठी भरतीच्या नियमात फेरफार करण्याचा प्रस्ताव मांडून यांना नोकरीत प्राधान्य देण्याचा विचार केल गेला.

**८) राममूर्ती आयोग (१९९०) :**

या आयोगानेही नववी ते बारावीसाठी व्यावसायिक शिक्षणाचे एकात्म प्रतीक (Integrated design) राबवावे, व्यावसायिक शिक्षणात यश येण्यासाठी Modular Courses ची गरज आहे, अनौपचारिक व्यावसायिक शिक्षणाची सोय असावी, या शिक्षणासाठी स्त्री-पुरुष भेद नसावा यासारख्या विविध शिफारशी बरोबरच शिक्षक प्रशिक्षण, व्यवस्थापन, प्रशसकीय रचना, नोकरीच्या संधी, धोरणे, उत्पन्न अशा विविध सूचनांची अंमलबजावणी टप्याटप्याने करण्यात यावी.

● **स्वयं- अध्ययन प्रश्न -२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) माध्यमिक शिक्षण आयोग ------------------या वर्षी नेमण्यात आला.

अ) १९५२ ब) १९५४ क) १९६४ ड) १९८२

२) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना -------------------या वर्षी नियुक्त केली गेली.

अ) १९६०-६१ ब) १९७०-७१ क) १९७१-७२ ड) १९७५-७६

३) नवोदय विद्यालये स्थापनेच्या शिफारशी सर्वप्रथम ----------------या धोरणात मांडल्या.

अ) कोठारी ब) नवीन राष्ट्रीय धोरण

क) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ड) प्रगत शैक्षणिक धोरण

४) अहिल्याबाई होळकर योजना (१९९६-९७) अंतर्गत -----------------ही सुविधा मुलींना मिळाली.

अ) मोफत शिक्षण ब) मोफत वसतिगृह क) मोफत प्रवास ड) मोफत जेवण

५) राष्ट्रीय परीक्षण समिति (१९७७) ---------------यांच्या अध्यक्षपदी नेमली होती.

अ) रामकृष्ण ब) कोठारी क) मुदलीयार ड) आदिशेशैया

**ब) एका वाक्यात ऊत्तर द्या.**

१) १९९० मध्ये नवोदय विद्यालये यांची संख्या किती होती?

२) नवोदय विद्यालये बंद करण्याची शिफारस कोणत्या समितीने केली होती?

३) पी.डी. शुक्ल समिति (१९७३) कशासाठी नेमली होती?

४) +२ स्थरावरील व्यवसायीक शिक्षणाचा अभ्यासक्रम कोण तयार करते?

५) ईश्वरभाई पटेल समिति कोणत्या वर्षी नेमली होती?

**४.२.३ उच्चशिक्षण :**

**१. विद्यापीठ शिक्षण आयोग (राधाकृष्ण आयोग) १९४८ :**

या आयोगाने उच्चशिक्षणाबाबत काही ध्येय व धोरणे निश्चित केलीत, ती थोडक्यात पुढीलप्रमाणे १) जीवनातील ध्येय, नैतिकता व आदर यासारख्या मुलभूत गोष्टी शिकवणे २) तरुणामधील अंतर्गत शिकती जागृत करून त्याना ज्ञानी व शहाणे बनवणे तसेच त्याला मूल्यात्मक शिक्षण देणे. ३) शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे हे त्याला स्वतः शिकण्यास प्रोस्ताहन द्यावे. ४) विद्यार्थ्यांना निर्भय, विवेकी व सुसंस्कृत बनवून त्याला आपल्या संस्कृतीचे शिक्षण मिळणे गरजेचे आहे. ५) विद्यार्थी आत्मनिर्भर होणे, समाजाच्या गरजा भागवणे यासाठी त्याला व्यवसायिक शिक्षणही देणे गरजेचे आहे. आशी ध्येय समोर ठेऊन त्यांनी काही शिफारशी केल्या त्या पुढीलप्रमाणे, यामध्ये १) १२ वर्ष्याचा शालेय शिक्षणानंतर तीन वर्षींचे एकसंध विद्यापीठ शिक्षण असावे. २) शिक्षकांचे विविध वर्ग पडून त्यांच्या गुणवत्तेनुसार बढती द्यावी. ३) शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषेबरोबरच प्रादेशिक भाषेतही असावे. ४) देशातील सर्व विद्यापीठातील प्रविण्याचा दर्जा समान असावा.

५) विद्यापीठामध्ये विद्यार्थी कल्याण मंडळ व शारीरिक शिक्षण विभाग असावा. ६) विद्यापीठाना अनुदान देण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ स्थापावे. ७) ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी ग्रामीण विद्यापीठे स्थापावीत. ८) पारंपारिक शिक्षणाबरोबरच शेती, अभियांत्रिकी, कायदा व वैद्यकीय अशा विविध अभ्यासक्रमाच्या शिफारशी केलेल्या आहेत.

**● शिफारशींची अंमलबजावणी :**

या आयोगाच्या बहुतांशी शिफारशी स्वीकारल्या, यामध्ये १९५३ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना, देशातील सर्व विद्यापीठावर नियंत्रण व समन्वय राखून गुणवत्ता राखण्याची जबाबदरी या आयोगाने घेतली. तीन वर्षीच्या विद्यापीठीय शिक्षणामध्ये संशोधन, विध्यार्थी कल्याण मंडळ व वसतिगृह यांनी चालना देण्यात आली. विविध प्रांतिक भाषेतून शिक्षण सुरु केले. अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक यांची पुनरर्चना करण्यात आली. या विविध सुधारणेमुळे या शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला मात्र गुणवत्त कमी होऊन सुशिक्षित बेकारी वाढली, शिक्षण घेण्याचे ध्येय विद्यार्थ्यांना नसल्याने गैरवर्तन व शिस्त या बाबी गंभीर बनल्या. एकूणच या शिक्षणाचा संख्यात्मकदृष्ट्या विकास झाला गुणात्मक नाही. ही गुणात्मकता सुधारण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली त्याच्या शिफारशी पुठीलप्रमाणे.

**२. विद्यापीठ शिक्षणाची गुणवत्ता विकास समिती (१९६१) :**

यु.जी.सी. ने देशातील विद्यापीठीय शिक्षण सुधारण्यासाठी एन.के. सिद्धांत यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली, या समितीच्या शिफारशी थोडक्यात पुढीलप्रमाणे, १) विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय दृष्टीकोन व उदारमतवाद वाढण्यासाठी प्रयत्न करून विकासाभिमुख शिक्षणावर भर द्यावा. २) गुणवत्ता सुधारून निवडक विद्यार्थ्यांनाच प्रवेश द्यावा, ३) अंशकालीन व पत्राद्वारे अभ्यासक्रमावर भर द्यावा. ४) विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात होणारे बदल लक्षात घेऊन त्यानुसार अभ्यासक्रम अद्यावत असावा. ५) १०+२+३ या आकृतिबंधाचा गांभीर्याने विचार होऊन उच्च माध्यमिक स्तरावरील बहुतांश विद्यार्थ्यांना व्यावसायिक किवा तांत्रिक शिक्षणाकडे वळवावे ६) विद्यापीठातील पदवीत्तर अभ्यासक्रम व संशोधनातून विद्यार्थी विशेष ज्ञान प्राप्त होऊन तो विद्वान शास्त्रज्ञ व विषयतज्ञ बनावा. ७) सुसज्ज प्रयोगशाळा निर्माण करणे, विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड निर्माण करणे. ८) महाविद्यालयइन पातळीवर वर्गामध्ये टिपणे लिहून देणे बंद करणे. प्रादेशिक भाषेत उच्च दर्जाचे शिक्षक व पुस्तके असणे गरजेचे आहे. ९) एकच अंतिम परीक्षा परीक्षा नसावी, प्रत्येक प्रश्न पत्रिका ज्ञान, आकलन, उपयोजन, पृथक्करण, संयोजन व मूल्यमापन ही विविध उद्दिष्टे समोर असावीत. १०) महाविद्यालयाच्या संलग्नतेची देशभर सारखीच पद्धत असावी व त्याची अंमलबजावणी कडक करावी. ११) विद्यापीठाना स्वायत्तता असवी १२) विद्यापीठ गुणवत्ता वाढीसाठी यु.जी.सी. ने परिसंवाद, परिषदा व प्रगत अभ्यास केंद्रे यासारख्या शैक्षणिक उपक्रमांचा विस्तार करावा. एकूणच संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीकडे लक्ष दिले तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययना सारखे गुण वाढवणे, याबरोबरच संलग्नता व स्वायत्तता असे अनेक महत्वपूर्ण मुद्दे मांडले मात्र यांची कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने हेच मुद्दे पुठे कोठारी आयोगाने मांडलेले दिसतात.

● **कोठारी आयोग (१९६४–६६) :**

या आयोगाने उच्च शिक्षणाची उद्दिष्टे त्याची ध्येय धोरणे याबाबत सखोलपणे आपले उद्देश मांडलेले आहेत यामध्ये प्रामुख्याने १) विद्यापीठाने ज्ञानाचा शोध व त्यात वाढ करणे, समाजसेवक व लोकनेते निर्माण करणे, समता, स्वातंत्र्य व न्याय यांचा प्रसार करणे तसेच समाजाला भेडसावणाऱ्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्नांची चिकित्सा करून ते सोडवण्यासाठी बुद्धिवंत निर्माण करणे तसेच त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणे. उच्च शिक्षणाचे ही उद्दिष्टे सध्या करण्यासाठी –अ) शिक्षण आणि संशोधनाच्या गुणवत्तेत मुलभूत बदल करणे, ब) वाढत्या लोकसंखेच्या तुलनेत त्यांची गरज ओळखून उच्च शिक्षणाचा प्रसार करणे, क) विद्यापीठाच्या प्रशासनात सुधारणा करणे इत्यादी २) उच्च शिक्षणात निवडक प्रवेशाचे धोरण स्वीकारणे. ३) पत्राद्वारे शिक्षण व सायंकालीन महाविद्यालये यांचा विस्तार करावा, यामधून पारंपरिक बरोबरच विज्ञान व तांत्रिक शिक्षणाचाही समावेश करावा. ४) विद्यापीठाची अंतरराष्ट्रीय स्थरावर गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी यु.जी.सी.ने देशातील निवडक सहा विद्यापीठाची निवड करून तेथे प्रगत अध्यान केंद्रे स्थापन करावीत व त्यांचा विकास करावा. ५) शैक्षणिक संशोधनाच्या विकासासाठी भरीव प्रयत्न करावेत व त्याचा उपयोग शैक्षणिक धोरण व सुधारणेसाठी व्हावा. ६) महाविद्यालयामध्ये औपचारिक शिक्षनापेक्षा वैज्ञानिक, गटवार चर्चा व चर्चासत्र असे स्वतंत्र अध्ययनावर भर द्यावा, अभ्यासक्रमात लवचिकता आणावी, विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन तो स्वतंत्र विचार करू शकेल यासाठी त्याला प्रोस्ताहन द्यावे. ७) परीक्षा पद्धतीत सुधारणा होण्यासाठी यु.जी.सी. ने एक केंदीय परीक्षा सुधारणा कक्ष निर्माण करावा व प्राध्यापकांनीही सातत्याने अंतर्गत मूल्यमापन करणे गरजेचे आहे. ८) विद्यापीठातील पदवीपूर्व शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषा व पदव्युत्तर शिक्षणाची भाषा इंग्रजी असावी. तसेच हिंदी भाषिक महाविद्यालयाना उत्तेजन द्यावे, ९) विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आरोग्य सेवा, वसतिगृह, शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन, अभ्यासोतर कार्यक्रम व संस्थेची ओळख इत्यादी विविध बाबीकडे लक्ष द्यावे. १०) विद्यार्थ्यांमधील बेशिस्तपणा कमी करण्यासाठी त्यांच्यात सामाजिक मुल्यांची निष्ठा निर्माण करणे, ११) अभ्यासक्रम ठरविताना तत्कालीन मनुष्यबळाची गरज व उपलब्ध व्यवसाय यांचा विचार करावा, तसेच कृषीशास्त्र, स्थापत्यशास्त्र व वैदकशास्त्र इत्यादी व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या सोई वाढवाव्यात. १२) पदव्युत्तर पाठ्यक्रम व संशोधन याचा विस्तार करण्यासाठी विद्यापीठानी महाविद्याचे सहकार्य घ्यावे व केंद्र सरकारने या सर्वांची जबाबदारी घ्यावी. १३) पदव्युत्तर शिक्षणासाठी एक किंवा दोन अभ्यासक्रमांचाच सखोल ज्ञान देणारा असावा, पीएच. डी.चा दोन ते तीन वर्षाचा अभ्यासक्रम असावा तसेच शैक्षणिक विचारमंथन आणि संशोधनास प्रेरणा देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक अकादमी स्थापन करावी. १४) कुलगुरू पदी निवड करताना तो मान्यवर शिक्षणतज्ज्ञ किंवा पुरेसा प्रशाकीय अनुभव असलेला नामांकित विद्वान असावा.

एकूणच या आयोगातील शिक्षणाचे मध्यम, निवडक प्रवेश व प्रगत अध्ययन केंद्र याला समाजघटक, कुलगुरू व शासकीय व्यवस्थेने विरोध केला. या आयोगातील केवळ नाममात्र शिफारशी स्वीकारल्या ज्यामध्ये परीक्षा पुनरर्चना प्रयत्न, पाठ्यक्रम पुनरर्चना, संशोधनाला चालना व विद्यापीठ शिक्षकांच्या वेतनश्रेणी सुधारणा झाली, या पलीकडे काहीच न झाल्याने विद्यापीठीय शिक्षणाची गुणवत्ता खालावलेलीच राहिली.

**४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६):**

या धोरणामध्ये प्रामुख्याने पुढील उद्देश/सुधारणा समोर ठेवण्यात आल्या १) चांगले शिक्षक तयार करणे. २) स्वायत्त महाविद्यालयाच्या विकासासाठी सहाय्य करणे. ३) संशोधनासाठी भरीव सहाय्य देणे. ४) उच्च शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध होण्यासाठी मुक्त विद्यापीठासारख्या समर्थ माध्यमाचा विकास करणे. ५) ग्रामीण विद्यापीठाची नवीन रूपरेषा निशित करणे.

**५) कृतिकार्यक्रम (१९८६) :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कृतिकार्यक्रमाने पुढील गोष्टी ठरविण्यात आल्या, १) शैक्षणिक संस्थांचे पुनर्गठन व विस्तार करण्यासाठी अर्थसहाय्य देणे. २) स्वायत्त महाविद्यालयांचा विकास करणे. ३) अभ्यासक्रमांचा विकास व शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय. ४) विद्यापीठामधील संशोधनास बळकटी आणणे. ५) विद्यापीठाच्या कार्यक्षमतेत संगणकाद्वारे सुधारणा करणे. ६) उच्च शिक्षण संस्थामध्ये समन्वय राखण्यासाठी राज्यस्तरावर स्वायत्त मांडळे व राष्ट्रीय स्तरावर शिखर परिषदेची स्थापना करणे. ७) विद्यापीठामध्ये केवळ गुणवत्तेवर आधारित प्रवेश.

**६) राममूर्ती समिती (१९९०) :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व कृतिकार्यक्रम यांच्या शिफारशी बाबत राममूर्ती समितीने आग्रह धरला. तसेच यांनी १. विद्यापीठ अनुदान मंडळाची पुनर्रचना करणे. २. ग्रामीण विद्यापीठाना अर्थसहाय्य देणे. ३. महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेचा अभ्यास करावा. अशा विविध शिफारीशीही केल्या.

**७) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणान (१९८६) संबंधित अहवालाचे परिणाम :**

या धोरणाच्या प्रभावातून काही बदल स्वीकारण्यात आले. १) १९८७ च्या भारतसरकारच्या योजनेनुसार राज्यसरकारने शिक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा केली. २) विविध राज्यात १०४ महाविद्यालयांना स्वायत्तता दिली. ३) अभ्यासक्रमांची पुर्नरचना केली व शिक्षक प्रशिक्षण याकरिता देशात ४६ अॅकॅडमिक स्टाफ कॉलेज सुरु केली. ४) महाविद्यालय व विद्यापीठ यांना संगणक सुविधासाठी अर्थसाहाय्य केले. ५) इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठमार्फत मुक्त शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरु केले.

**८) रेड्डी समिती (१९९२) :**

या समितीने पुढील शिफारशी केल्या. १) ग्रामीण उच्च शिक्षण संस्थांची केंद्रीय परिषद स्थापन करण्यची गरज आहे. २) राज्य उच्च शिक्षण मंडळाच्या स्थापनेचा विस्तार करावा.

**९) कृतिकार्यक्रम (१९९२) :**

रेड्डी समितीच्या अहवालावर आधारित १९९२ मध्ये कृतिकार्यक्रमात पुढील शिफारशी केल्या. १) राज्य उच्च शिक्षण मंडळाची स्थापना करावी. २) सकाळी व संध्याकाळी वर्ग भरवावेत. ३) अनुदान नियमांची

पुनर्रचना करावी. ४) उच्च शिक्षणातील संसाधने आदान-प्रदान (sharing) करून वापरावीत. ५) उच्च शिक्षणात प्रवेश चाचणी असावी.

एकूणच उपरोक्त विविध समित्या व आयोग यांचा सुरु पाहता उच्च शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा येणारा लोंढा कमी झाला पाहिजे, उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारली पाहिजे तसेच हे शिक्षण घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासली पाहिजे या माफक अपेक्षा ठेऊन भविष्यातील खऱ्या अर्थाने आपल्या कार्यावर निष्टा असणारे शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, स्थापत्यविशारद व समाजसेवक यांची प्रकर्षाने गरज व्यक्त होताना दिसते.

**१०. महाराष्ट्रातील विद्यापीठे :**

महाविद्यालयाची व विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन राज्यातील विद्यार्थ्यांना विध्यापिठीय शिक्षण व संशोधन करण्यास संधी मिळण्यासाठी विद्यापीठाची संख्याही गरजेनुसार वाढत गेलेली दिसते. राज्याच्या निर्मितीवेळी म्हणजेच १९६०-६१ मध्ये विद्यापीठांची संख्या केवळ पाच इतकी होती, टप्याटप्याने ति वाढत गेली, आज महाराष्ट्रात पुढील प्रमाणे विविध विद्यापीठे कार्यरत आहेत. मुंबई विद्यापीठ(१८५७), नागपूर विद्यापीठ (१९२३), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ(१९४८), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ(१९५८), शिवाजी विद्यापीठ(९६३), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ(१९८३), स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ (१९९४), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ(१९९०), श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (१९४९), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ(९८८) या बरोबरच महाराष्ट्र राज्यात मुक्त/ बहिस्थ विद्यापीठे (Deemed University) कार्यरत आहेत ती पुढील प्रमाणे: १) Tilak Maharashtra University' Pune २) Indian Institute of Technology Powai' Mumbai' ३) Tata institute of Social Sciences' Mumbai' ४) Gokhale Institute of Economics' Pune' ५) Deccan College' Pune' ६) Vaikunth Mehta National Co-operative Management Institute' Pune' ७) Bhartiya Vidyapeeth' Pune' ८) International Institute for Population Sciences' Mumbai' ९) Indira Gandhi Institute of Development Research' Mumbai' १०) Central Institute of Fisheries Education' Mumbai सर्व विद्यापीठांना राज्यातील सर्व शासकीय व अशासकीय कला,वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय व विधी इ, विविध अभ्यास शाखा संलग्नित आहेत. कृषी विषयक अभ्यासक्रमासाठी राज्यात स्वतंत्र विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत. १९७४ पूर्वी प्रत्येक विद्यापीठासाठी स्वतंत्र कायदा होता. मात्र १९७४ च्या विद्यापीठ कायद्याने राज्यातील सर्व विद्यापीठे समान कायद्याखाली आणली, टप्याटप्याने विद्यापीठाना स्वायत्ततेचा दर्जा देण्यात आला. ही विद्यापीठे आपापल्या परिक्षेत्रात परीक्षा, अभ्यासक्रम व पदवी, प्रशाकीय कामकाज याबाबत व समित्या याबाबत स्वायत्त आहेत, राज्यातील सर्व विद्यापीठाणा केंद्र व राज्य सरकारचे आर्थिक अनुदान प्राप्त होते. विद्यापीठावर नियंत्रण व त्याच्या विकासासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ कार्यरत असून विद्यापीठाच्या शैक्षणिक धोरणास प्रोस्ताहन देण्यासाठी नवीन धोरण व अभ्यासक्रम यासाठी अनुदान देणे हे अनुदान पाच वर्षे इतक्या काळासाठी असते. पुठील खर्च हा संबंधित विद्यापीठ व राज्यशासन याच्यावर असतो.

II) **तंत्र शिक्षण :**

व्यक्तीच्या, समाजाच्या व एकूणच राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तंत्र शिक्षण गरजेचे आहे. अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा शिक्षणाने पूर्ण केल्या नाहीत तर तर ते शिक्षण निर्थक आहे, पुस्तकी ज्ञान किवा ज्ञानासाठी ज्ञान ही विचारधारा मागे पाडली आहे त्यामुळे यांची जाणीव ठेउनच व्यक्तीला त्याचा उदोग, व्यवसाय किवा कौशल्य प्राप्त करून हमकाश नोकरीची संधी प्राप्त करून देणारे व औद्योगिक क्षेत्रास कुशल कारागीर, तंत्रज्ञ उपलब्ध करून देणारे तंत्र शिक्षण देशात सुरु झाले. या प्रकारचे शिक्षण भारतात स्वातंत्रपूर्व कालपासून सुरु होते, या प्रकारच्या शिक्षणावर नियंत्रण, विकासाठी व देशभरात एकवाक्यता राहण्यासाठी १९४५ मध्ये All India Council for Technical Education (AICTE) (डायरेक्टर जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट एन्ड ट्रेनिग (DGE&T-१९४५)) हा स्वतंत्र विभाग स्थापन केला. स्वातंत्र्यानंतर भारताचा औदोगिक व तांत्रिक विकास साध्य करण्यासाठी विविध शिक्षण आयोग (याबाबतची थोडक्यात माहिती उच्चमाध्यमिक शिक्षण येथे आलेली आहे.) व पंचवार्षिक योजनेच्या मध्मातून तंत्रशिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिलेले आहे. या प्रकारचे शिक्षण माध्यमिक व उच्चमाध्यमिक स्तर, तंत्र माध्यमिक शाळा, आय.टी.आय., तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, एम.बी.ए., हॉटेल मेनेजमेंट अन्ड कॅटरिंग टेक्नोलॉजी व औषधनिर्माणशास्त्र, कृषी या विविध अभ्यासक्रमांच्या पदवी/पदविका, पदव्युत्तर पदवी, यासाठी राज्यात विविध महाविद्यालये सरू आहेत, जी शासकीय, अशासकीय अनुदानित व विनानुदानित स्वरुपाची आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पूर्वीच म्हणजे १९४८ मध्ये तंत्रशिक्षण संचालनालय हा विभाग सुरु करून त्या अंतर्गत राज्यातील तंत्रशिक्षणाचा दर्जा व त्याचा विकास करण्याचा विचार झाला. तंत्रशिक्षण संचालनालय हे उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणात काम करते. तसेच राज्यातील पदविका अभ्यासक्रम यांच्या परीक्षा व अभ्यासक्रम सुधारणा याबाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई काम पाहते. या मंडळा अंतर्गत चार विभाग कार्य करतात यामध्ये मुंबई, पुणे,औरंगाबाद व औरंगाबाद व नागपूर. याचे प्रशासन पाहता १) Directorate of Higher Education २) Directorate of Technical Education, ३) Directorate of Vocational Education ४) Directorate of Vocational Education amp; Training या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चालते. या विभागाचा वाढता विस्तार व मागणी पाहता १९६३ पासून यांची परीक्षा घेण्यासाठी स्वतंत्र बोर्ड सुरु केला व पुढे १९९९-२००० मध्ये याला स्वायत्त दर्जा देऊन त्याचे नाव Maharashtra State Board of Technical Examination (MSBTE) एकूणच आज या शिक्षणाचा विस्तार वाढत आहे याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे:

१) **शासकीय स्वायत्त तंत्रशिक्षण संस्था** (Govt. Autonomous Institutes): १) Government College of Engineering, Amravati (१९६४), २). Government College of Engineering, Aurangabad (१९६०), ३). College of Engineering, Pune (१८५४) अनुदानित स्वायत्त तंत्रशिक्षण संस्था (Govt. Aided Autonomous Institutes): १) Veermata Jijabai

Technological Institute (VJTI), Mumbai (१८८७), २) Walchand College of Engineering, Sangli (१९४७), ३) Sardar Patel College of Engineering, Mumbai (१९६२), ४) Shri Guru Gobind Singhji Institute of Engineering amp; Technology, Nanded (१९८१) विनानुदानित स्वायत्त संस्था (Unaided Autonomous Institutes): १) Rajarambapu Institute of Technology, Sakharale (१९८३) २) Vishwakarma Institute of Technology, Pune (१९८३), ३) Shri Ramdeobaba College of Engineering and Management, Nagpur (Linguistic Minority - Hindi) (१९८४), ४) Yeshwantrao Chavan College of Engineering, Nagpur (१९८४) ५) G. H. Raisoni College of Engineering, Nagpur (Linguistic Minority - Hindi) (१९९६). स्वायत्त तंत्रशिक्षण विद्यापीठ (Autonomous Technological University): १) Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere (१९८९) २) Maharashtra Health Science University (१९९८) या बरोबरच कृषी विद्यापीठे : (Agricultural Universities in Maharashtra) ती पुढील प्रमाणे १) Mahatma Phule Agricultural University Rahuri, Dist. Ahemadnagar, (१९६८) २) Punjabrao Deshmukh Agricultural University Akola, (१९७१) ३) Konkan Agricultural University, Dhapoli, Dist. Ratnagiri (१९७१) ४) Marathwada Agricultural University, Parbhani, (१९७२).

एकूणच २००० पर्यंत तंत्रशिक्षणाची प्रगती पाहता इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी यांची महाविद्यालये Post Graduate १५, degree १२९ and Diploma १७० इतकी आहे. या शिक्षणामुळे राज्या बरोबरच देशाच्या औद्योगिक व तांत्रिक प्रगतीमध्ये निश्चितच भर पडलेली आहे, बदलत्या विज्ञान व तंत्रज्ञान याला अनुसरून अभ्यासक्रम राबवले गेल्याने तरुणांना नोकरीच्या संधी प्राप्त होताना दिसत आहेत. परिणामी सुशिक्षित बेकारीची समस्या नियंत्रित आणण्यास मदत होत आहे.

- **स्वयं- अध्ययन प्रश्न -३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) विद्यापीठ अनुदान आयोग स्थापना ---------- वर्षी झाली.

अ) १९४५ ब) १९४७ क) १८५२ ड) १९५३

२) शिवाजी विद्यापीठाची स्थापना ---------- या वर्षी झाली.

अ) १९५० ब) १९६० क) १८६१ ड) १९६३

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) च्या शिफारशीनुसार देशात ---------- महाविद्यालयाना स्वायत्तता दिली.

अ) १०० ब) १०४ क) ११० ड) १५०

४) देशातील सर्व विद्यापीठीय शिक्षणावर ---------- यांचे नियंत्रण असते.

अ) यु.जी.सी. ब) एम.जी.सी. क) एन.सी.ई.आर.टी. ड) सी.बी.एस.सी.

५) Maharashtra State Board of Technical Examination (MSBTE) ची स्थापना ---------- मध्ये झाली.

अ) ब) क) ड)

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) विद्यापीठ शिक्षणाची गुणवत्ता विकास समिती (१९६१) चे अध्यक्ष कोण होते?

२) All India Council for Technical Education (AICTE) ची स्थापना केव्हा झाली?

३) महाराष्ट्रात 'तंत्रशिक्षण संचालनालय' हा विभाग केंव्हा सुरू झाला?

४) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या चार विभागांची नावे सांगा?

५) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे यांची स्थापना केव्हा झाली?

## ४.३ सारांश :

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर सर्वप्रथम राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. या शिक्षणाचा तळागाळातील लोकांना लाभ व्हावा यासाठी हे शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ताब्यात दिले. याच्या विस्तार व विकासासाठी वेळोवेळी विविध योजना व समित्या नेमण्यात आल्या. या योजना व समित्यांच्या माध्यमातून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, विद्यार्थी, शिक्षक व एकूण समाज यांचाही विचार केला गेला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याकडे वाटचाल सुरू झाली. प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणासाठीही तितक्याच प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यात आले, यामध्ये नवोदय विद्यालय यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देण्यात आले. या पारंपरिक शिक्षणाबरोबरच उद्योग व व्यवसायाचे शिक्षणही सुरू करून तरूणांना आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनवण्याचा प्रयत्न झाला. माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च माध्यमिक शिक्षणाचाही विकास तितक्याच झपाट्याने करून ग्रामीण तरूणांना उच्च शिक्षणाची द्वारे खुली केली. राज्यात पारंपरिक शिक्षांच्या पदवी, पदविका यासारख्या शिक्षणाची सुविधा विविध महाविद्याले व विद्यापीठ यामधून करण्यात आली. या बरोबरच नवीन विज्ञान व तंत्रज्ञान यातील बदल व अद्यावत औद्योगिक तंत्रज्ञान याला अनुरूप कुशल मनुेयबळ तसेच अद्यावत तंत्रज्ञ उपलद्ध होण्यासाठी तंत्रशिक्षर क्षेत्रातही राज्याने भरारी घेतलेली आहे. त्यामुळेच आज भारतात महाराष्ट्र राज्य आर्थिकदृष्ट्या सक्षम व पुढारलेले दिसत आहे याचे सर्व श्रेय राज्यातील शिक्षणाच्या प्रगतीत आहे.

**४.४ पारिभाषिक शब्द :**

१) कार्यानुभव : समाजाला उपयोगी अशी सेवा देणारी किंवा समजाउपयोगी वस्तूंचे उत्पादन करणारी हेतूपूर्ण, अर्थपूर्ण, नमकेंद्रित कृती म्हणजे कार्यानुभव होय.

२) MSBTE : Maharashtra State Board of Technical Examination.

३) AICTE : All India Council for Technical Education.

४) DGE & T : डायरेक्टर जनरल ऑफ एम्प्लॉटमेंट एन्ड ट्रेनिंग

५) NCERT : National Council for Education Research and Training.

**४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) ६ ते १४ २) ४५ वी ३) मे १९६२

४) १९६४ ५) १९७६

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) १९७६-७७ २)१९५८-५९ ३) १९८६

४) १९८७-८८ ५) १९९९

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) १९५२ २) १९७१७२ ३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

४) मोफत प्रवास ५) अदिशेश्य्या

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) २६१ २) राममूर्ती समिती १९६५०

३) १०+२+३ ची अंमलबजावणी देशभरात राबवण्यासाठी

४) एन.सी.ई.आर.टी. ५) १९७७

**स्वयं अध्ययन प्रश्न -३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) १९५३ २) १९६३ ३) १०४

४) यु.जी.सी. ५) १९९९-२०००

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) एन. के. सिद्धांत २) १९४५ ३) १९४८

४) मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर ५) १९५४

### ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची प्रगती स्पष्ट करा.

२) महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शिक्षणाच्या विकासाचा आढावा घ्या.

३) महाराष्ट्र राज्यातील उच्चमाध्यमिक शिक्षणाची प्रगती सांगा.

४) उच्च शिक्षणासाठी नियुक्त केलेले विविध आयोग व समित्या सांगून महाराष्ट्रातील उच्चशिक्षाची प्रगती सांगा.

५) महाराष्ट्रातील तंत्रशिक्षणाची प्रगती स्पष्ट करा.

### ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१) नरवणे डॉ. मीनल, (१९९९), भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, तून प्रकाशन, पुणे.

२) तांबोळी शमसुद्दीन, (२००९), महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास, डायमंड प्रकाशन, पुणे.

३) जाधव मोन, भोसले आरती, सरपोतदार प्राची (२००७), भारतीय शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४) Naik J.P., (1982), The Education Commission and After, allied Publishers, New Delhi.

५) Naik HJ. P., Sayed Nurullah, (1974), A Student History of Education in India, macmillan India, Madras.

६) गटकळ रंजना, (२००७), भारतीय शिक्षणाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७) दुनाखे डॉ. अरविंद (२००६), भारतीय शिक्षण पद्धती व माध्यमिक शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.


❖❖❖